पवित्र कुरआन ज्ञानाचा मूळ स्त्रोत

लेखक

प्रा. दत्तप्रसन्न साठे

अनुक्रमणिका

प्रकाशकाचे दोन शब्द

प्रा. दत्तप्रसन्न साठे यांनी लिहिलेला हा ग्रंथ वाचकांच्या हातात देताना आम्हास अत्यानंद होत आहे. पवित्र कुरआन सर्वांसाठी आहे. हा ज्ञानाचा मूळ स्रोत आहे. या ज्ञानप्रकाशात कोणत्याही प्रकारची मार्गभ्रष्टता आणि अंधकार नष्ट होतो. मुस्लिमेतर बांधव पवित्र कुरआनला फक्त मुस्लिमांचाच धर्मग्रंथ समजतात. पवित्र कुरआनविषयी हा एक फार मोठा गैरसमज त्यांच्या मनात घर करून आहे. या ग्रंथाद्वारे हा गैरसमज दूर होण्यास प्रेरणा मिळेल, तसेच मुस्लिम आणि विशेषत: मुस्लिमेतर बांधवांत कुरआनविषयी अधिक माहिती मिळविण्याची तृष्णा निर्माण होईल अशी, मी आशा बाळगतो.

प्रा. साठे यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करून पवित्र कुरआनविषयी हा लेखसंग्रह तयार केला आहे. आम्हाला विश्वास आहे की हा ग्रंथ एक सकारात्मक दृष्टिकोन अनेक तत्त्ववादाच्या चर्चेला देऊन एक दिशा देईल. वैविध्यपूर्ण समाजाच्या समस्यांची सोडवणूक सकारात्मक पद्धतीने करण्यासाठीचे दिशानिर्देश वाचकाला या ग्रंथातून मिळेल अशी आशा आहे.

आजच्या वैश्विक व आधुनिक मानवी जीवनात स्वार्थ, ऐहिक लालसा आणि हिंसाचाराने थैमान घातले आहे. नैतिक मूल्यांचा झपाट्याने ऱ्हास होत आहे. वर्ण व वंश आणि अन्याय व अत्याचाराला ऊत आला आहे. मनुष्य मनुष्याचा शत्रू बनला आहे. परिणामत: देशाला विनाशाच्या खाईत लोटले जात आहे. अशा भयंकर आणि नाजुक स्थितीत ज्ञानाचा मूळस्रोत - कुरआनच्या संतुलित आणि व्यावहार्य ज्ञानाची नितांत गरज आहे. सर्व मानव एकाच आई-बापाची लेकरे आहेत ही भावना प्रत्येकात रुजविली जाणे आवश्यक आहे. परिणामत: माणसामाणसात बंधुभाव व प्रेम निर्माण होईल, तसेच सामाजिक जीवनात चांगुलपणा आणि नैतिकतेची जपणूक होईल. मानवी जीवन उच्च चारित्र्याने आरासले जाऊन एक आदर्श वैश्विक मानवी समाजनिर्मिती होईल. परिणामत: विश्वकल्याण आणि विश्वशांती जगात नांदू लागेल. या उद्देशप्राप्तीसाठी हा ग्रंथ वाचकाला आपल्या जीवनात कुरआनला ज्ञानदीप बनविण्याची प्रेरणा देईल. मला पूर्ण विश्वास आहे की तो दिवस दूर नाही ज्या वेळी सारे मतभेद विसरून जग कुरआनला परिपूर्ण जीवनसिद्धांत म्हणून स्वीकारील.

या ग्रंथाला पूर्णत्वास नेण्यात आमचे सहकारी व 'साप्ताहिक शोधन'चे संपादक सय्यद इप्तिखार अहमद, डॉ. रफीक सय्यद, प्रा. अब्दुर्रहमान शेख यांचा मोलाचा वाटा आहे. तसेच 'साप्ताहिक शोधन'चे सहसंपादक शाहजहान मगदुम यांचेही या ग्रंथनिर्मितीत सहकार्य लाभले आहे.

तौफीक असलम

जानेवारी २०१३

अध्यक्ष

इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट, मुंबई

लेखकाचे मनोगत

"वाचा आपल्या पालनकर्त्याच्या नावाने, ज्याने निर्माण केले माणसाला जमलेल्या रक्ताने वाचा आणि तुमचा पालनकर्ता मोठा उदार आहे ज्याने लेखणीद्वारे ज्ञान शिकविले माणसाला ते ज्ञान दिले जे त्याला अवगत नव्हते." (कुरआन - ९६:१-५)

'पवित्र कुरआन निर्विवाद ज्ञानस्त्रोत' हे लिखाण आपल्यासमोर ठेवताना एक आत्मिक समाधान लाभले आहे. गेल्या दहा वर्षांपासून मी पवित्र कुरआनचे अध्ययन करीत आहे. सर्व जगवासीयांसाठी अल्लाहने आपली कृपा प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या रुपाने या जगावर बहाल केली. (कुरआन - २१:१०७) प्रेषितांचे चरित्र माझे स्नेही शेख मुहम्मद शेख हुसेन यांनी वाचण्यास दिले. ते वाचल्यावर मी जिज्ञासेने प्रेषितांविषयी काही पुस्तिका वाचल्या. प्रत्येक ठिकाणी प्रेषितांच्या जीवनावर कुरआनचा अत्यंतिक प्रभाव पडल्याचे लक्षात आले. म्हणून मी कुरआन मुळापासून वाचण्यास सुरुवात केली. 'दिव्य कुरआन' वाचले. त्यानंतर 'द होली कुरआन', 'दावतुल कुरआन' वाचले. त्याबाबतीत ज्या शंका निर्माण झाल्या, त्यांचे निरसन करून घेण्यासाठी हैद्राबादचे डॉ. हसनुद्दीन अहमद साहेब (आय.ए.एस. निवृत्त, आंध्र प्रदेशचे माजी मायनॉरिटी कमिशनचे चेअरमन) यांच्याशी व त्यांचे स्नेही सेवानिवृत्त न्यायमूर्ती ए. अब्दुल हादी साहेब, चेन्नई यांच्याशी पत्रव्यवहार सुरू झाला. मी कृतज्ञता व्यक्त करतो की त्या दोघांचे मार्गदर्शन खूपच उपयुक्त ठरले. देगलूर येथील मौलाना अनिस-उल-रहमान, मोहतमीम मदरसा दार-उल-अिहाम दिया अरेबिया देगलूर यांनी खूपच मदत केली. पुण्याचे मोकाशी लियाकत अली खान यांच्यामुळे पुण्यात बऱ्याच लोकांशी माझी ओळख झाली, जी पुढे खूप उपयुक्त ठरली. तसेच मरहूम मु. अ. दळवी यांचे सहाय्य खूपच उपयुक्त ठरले. अनीस चिश्ती यांचेही मार्गदर्शन खूपच उपयोगी पडले. सय्यद इफ्तिखार अहमद (संपादक साप्ताहिक शोधन, मुंबई) यांनी वारंवार जे मार्गदर्शन केले व सातत्याने जो पाठिंबा दिला तो मी विसरू शकत नाही.

सर्वांत शेवटी महत्त्वाचे म्हणजे माझी प्रिय पत्नी कै. सौ. मृणालिनी हीच माझ्या स्फूर्तीचा व प्रेरणेचा स्त्रोत होती व आजही तिची अमीट स्मृती मला सतत स्फूर्ती देते. तीच माझी खरी प्रेरणा होती व आजही आहे.

प्रिय वाचकहो, तुमच्या हाती हे लिखाण देताना काही चुका झाल्या असतील तर क्षमस्व. आपल्या काही सूचना असतील तर त्या स्वागतार्ह आहेत.

- प्रा. दत्तप्रसन्न साठे

फेब्रुवारी २००७

''अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे''

प्रस्तावना

'पवित्र कुरआन ज्ञानाचा मूळ स्रोत' या लेखसंग्रहात पवित्र कुरआनातील व्यावहारिक शिकवणी लेखक प्रा. दत्तप्रसन्न साठे यांनी संग्रहित केल्या आहेत. साधी भाषाशैली आणि इस्लामी शिकवणींचे तंतोतंत वर्णन या लेखसंग्रहाचे ठळक वैशिष्ट्य आहे. सामान्य माणसाच्या साध्या मानसिकतेचा आदर करून सहज सोप्या भाषेत लेखकाने इस्लामच्या नैतिक मूल्यांचे वर्णन केले आहे. दैनंदिन जीवनात, आचरणात आणल्या जाणाऱ्या शिकवणी प्रा. साठे यांनी अशा कुशलतेने मांडल्या आहेत की फक्त मुस्लिमांसाठीच नव्हे तर मुस्लिमेतर बांधवांनाही त्या उपयोगी पडाव्यात. इस्लाम फक्त मुस्लिमांसाठीचा नाही. आणि पवित्र कुरआन हा काही केवळ मुस्लिमांसाठीच अवतरलेला ग्रंथ नाही तर समस्त मानवजातीसाठी ते मार्गदर्शन आहे. इस्लाम या भूतलावरील सर्व मानवजातीसाठी निवडलेला धर्म आहे. प्रेषित मुहम्मद (स.) हे सर्व मानवजातीसाठी दयामूर्ती होते. हाच संदेश या ग्रंथाद्वारे देण्यात आलेला आहे.

इस्लामचे वैशिष्ट्य असे की, साधा, सोपा आणि सहज आचरणात आणला जाऊ शकावा असा हा धर्म आहे. यात एका विद्वानासाठीही सखोल अध्ययन करण्याचे विषय आहेत. त्याचबरोबर निरक्षर, सामान्य माणसाच्या आकलनात येतील अशा शिकवणीदेखील आहेत. प्रत्येकाला आपापल्या क्षमता, विद्वत्ता, आकलनशक्तीनुसार पवित्र कुरआनचे अध्ययन करता येते आणि त्यामुळे प्रत्येक व्यक्ती समाधानी होऊ शकते.

पवित्र कुरआनविषयीचे साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे आणि दिवसेंदिवस यात भरच पडत राहणार आहे. वेगवेगळे भाष्यकार आपापल्या दृष्टिकोनातून व क्षमतेनुसार पवित्र कुरआनातील शिकवणींची मांडणी करीत असतात. असे करीत असताना अनेकदा या शिकवणी तत्वज्ञानाच्या रूपात मांडल्या जातात तर कुणी इतके सखोल अभ्यासांती आपले भाष्य मांडतात की कुरआनचा आत्माच या चर्चेत कुठेतरी गमावला जातो. दैनंदिन व्यावहारिक जीवनाशी ज्या शिकवणींचा संबंध आहे आणि ज्यावर आचरण हेच कुरआनचे मूळ उद्दिष्ट आहे, ते उद्दिष्ट या तत्त्वज्ञानात लोप पावते. कुरआनातील शिकवणींची व्यावहारिकता स्पष्ट होत नाही. या ग्रंथात लेखकाने अशी काही साहित्यिक उद्दिष्टे समोर न ठेवता वाचकाला कुरआनबाबत अधिकाधिक माहिती सरळ व सोप्या भाषेत कशी पुरविता येईल, याचा विचार केला असल्याचे वाचकाच्या लक्षात येईल. तसेच या शिकवणी आचरणात कशा आणता येतील याची लेखकाने पुरेपूर दखल घेतलेली असल्याचे आढळून येईल.

श्रद्धावंतांनी पवित्र कुरआनच्या शिकवणींनुसारच या जगात जगायचे आहे किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास जीवनात धर्म कसा आचरणात आणावा आणि धर्म पाळत असताना कसे जगावे ही युक्ती समजावून देण्याचा प्रयत्न प्रा. साठे यांनी या पुस्तकाच्या प्रत्येक ओळीतून समजावून दिले आहे.

इस्लामच्या शिकवणी प्रत्येक माणसाने आपापल्या आकलनशक्तीनुसार आचरणात आणायच्या आहेत आणि मरणोत्तर जीवनात प्रत्येकाला त्याचे शिक्षण, क्षमता, आर्थिक परिस्थिती, त्याला लाभलेले वातावरण, सामाजिक-राजकीय परिस्थिती, त्यावरील काळाचे दडपण, या सर्व निकषांचा विचार करूनच त्याला त्याच्या कर्मांचा मोबदला मिळणार आहे. हे सत्य समोर न ठेवल्यास माणूस स्वतःहून भलत्याच हाल-अपेष्टांना सामोरे जाण्याचा प्रयत्न करतो. अशा वेळी त्याच्यावर कोसळणाऱ्या संकटांना घाबरून मग तो धर्माच्या सक्तीमुळेच आपल्याला या कष्टांना सामोरे जावे लागत आहे की काय, असा विचार त्याच्या मनात घर करून बसतो. अशा प्रतिकूल परिस्थितीतून आपली कशी सुटका होईल, या पेचप्रसंगात पडतो. इस्लाम म्हणजेच कुरआनच्या शिकवणींचे खरे स्वरूप समोर ठेवून आपल्या शक्तीनुसार त्या आचरणात आणण्याचा शक्यतो प्रयत्न करीत राहिल्यास त्याला अशा परिस्थितीला तोंड देण्याची पाळी येणार नाही. 'सिम्पलिस्टिक' इस्लाम साधा आणि सहज आचरणात व व्यवहारात कसा आणता येईल याकडे इस्लामी विचारवंतांनी विशेष लक्ष दिलेले नाही, असे दिसते. ही उणीव साठे साहेबांनी या लेखसंग्रहाद्वारे भरून टाळल्याचे या ग्रंथाद्वारे वाचकांच्या लक्षात येईल, यात शंका नाही.

सध्या इस्लाम, इस्लामी जीवनशैली आणि पवित्र कुरआनची शिकवण निरनिराळ्या उद्दिष्टांनी आणि कारणांनी चर्चेचा विषय झालेले आहेत. काही विद्वान मंडळी प्रसारमाध्यमांच्या सहाय्याने इस्लामला सतत टिकेचा विषय बनवित आहेत. त्यांच्या प्रक्षोभाला बळी न पडता आणि त्यांच्या ठराविक उद्दिष्टांना ओळखून मुस्लिमांनी इस्लामनुसार आपले जीवनयापन केले तर अशा पूर्वग्रहदूषित मंडळींकडून होत असलेल्या प्रचाराला निकृष्ट ठरवू शकतील. इस्लाम फक्त प्रवचनांच्या, चर्चा-सभांच्या माध्यमातून वैचारिक तत्वज्ञान मांडण्याच्या कर्मकांडाचा धर्म नसून तो प्रत्यक्ष जीवन साकारण्याचा, प्रत्येक माणसाच्या व्यावहारिक जीवनात नैतिक मूल्यांमुळे जो आदर्श घातला जातो त्यामुळे त्याच्याद्वारे एका आदर्श समाजाची कशी निर्मिती होऊ शकते, याचे प्रत्यक्ष दर्शन सर्व मानवांसमोर मांडणारा धर्म आहे. जेणेकरून एका इस्लामी समाजातील

प्रत्येक घटकाच्या हक्काधिकारांचे रक्षण, सांप्रदायिक सद्भावना, सामाजिक समतेला इस्लाम किती महत्त्व देतो; अशा सर्व मुस्लिम समाजाच्या मानवी मूल्यांचे प्रतिबिंब पवित्र कुरआनच्या माध्यातून जगासमोर येऊ शकते. प्रतिकूल परिस्थितीतही या शिकवणींचे भान ठेवणे आणि त्यानुसारच आपले जीवन व्यतीत करणे एका मुस्लिमाचे कर्तव्य आहे. पण यासाठी या शिकवणी समजावून देणे गरजेचे आहे. फक्त भाषणे देऊन किंवा टीकाकारांना प्रत्युत्तर देऊन इस्लामविरुद्ध होत असलेल्या अपप्रचारावर उपाय करता येणार नाही. हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. प्रा. साठे यांनी कोणत्याही स्वरूपाची प्रतिक्रिया समोर न ठेवता सकारात्मक पद्धतीने पवित्र कुरआनच्या शिकवणींवर या ग्रंथात प्रकाश टाकला आहे. ते मुस्लिम नाहीत, अरबी भाषेवर त्यांना प्रभुत्व नाही, कोणत्याही मदरसा किंवा दारुल उलूममधून शिकून बाहेर पडलेले ते आलिम नाहीत; तरीदेखील त्यांनी स्पष्ट शब्दांत इस्लाम आणि पवित्र कुरआनच्या शिकवणींचा परिचय करून दिला आहे. याचे खरे कारण असे की इस्लामच्या शिकवणी आत्मसात करणे हे निसर्गतः प्रत्येक मानवाला ईश्वराची देणगी आहे. सत्य काय आणि खोटे काय, दुष्ट काय आणि पवित्र काय हे अल्लाहने प्रत्येक मानवाच्या हृदयावर कोरलेले आहे. तेव्हा फक्त जन्माने मुस्लिम व्यक्तीलाच इस्लाम किंवा पवित्र कुरआनच्या शिकवणी समजू शकतात अशातली ती बाब नसून हा धर्म आणि हा ग्रंथ सर्व मानवजातीसाठी मार्गदर्शन असल्याने तो सर्वांना आपल्याकडे आकर्षित करू शकतो आणि प्रत्येकाला त्या ग्रंथावर ईश्वराने समान हक्काधिकार दिला आहे.

पवित्र कुरआनातील नैतिक शिकवणी विषद करीत असतानाच प्रा. साठे यांनी कुरआनातील विविध वैज्ञानिक, भौगोलिक, खगोलशास्त्रीय तसेच आपल्या माहिती व सत्यतेवरही यात लिखाण केले आहे. तसेच कुरआनात ज्या प्रेषितांचा उल्लेख आलेला आहे अशा सर्व प्रेषितांचा अल्पसा परिचयही करून दिला आहे.

एकूणच हा ग्रंथ इस्लाम आणि पवित्र कुरआनचा परिचय करून देण्यासाठी एक बहुमोल खजाना आहे. विद्वानांपासून सामान्यांतील सामान्य माणसापर्यंत सर्वांनाच उपयोगी पडणारा असा हा ग्रंथ आहे.

मुंबई — **सय्यद इफ्तिखार अहमद**

फेब्रुवारी, २००७ — संपादक, साप्ताहिक शोधन

प्रकरण पहिले

पवित्र कुरआन

'कुरआन' याचा शब्दशः अर्थ 'वाचणे' असा आहे. या ग्रंथाला या नावाने संबोधण्याचा हेतू असा की विशिष्ट आणि सामान्यजन या सर्वांच्या वाचनासाठी हा ग्रंथ आहे, तसेच मोठ्या प्रमाणात वाचला जाणारा हा ग्रंथ आहे.

पवित्र कुरआन प्रेषित मुहम्मद (स.) यांना अनुभूतीच्या (वही - दिव्य प्रकटन) माध्यमाने विहीत केले गेले. ही अनुभूती त्यांना अल्लाहकडून आद्य देवदूत जिब्राईल (अ.) यांच्याकरवी लाभली. अध्याय (सूरह) अलबकरा मधील १८५ व्या आयतीत (ऋचा) पवित्र कुरआनच्या अवतरणास रमजान महिन्यात सुरुवात झाली असल्याचा उल्लेख येतो.

''रमजान महिन्यात कुरआनचे अवतरण झाले - समस्त मानवजातीकरिता परिपूर्ण मार्गदर्शन व मार्गदर्शनाच्या सुस्पष्ट पुराव्यांनी समाविष्ट सत्य व असत्याची कसोटी.'' (२:१८५)

पवित्र कुरआनची पुष्कळ विशेषनामे आहेत, पण प्रचारातील प्रमुख दोन नावे आहेत. पवित्र कुरआनचा ५० वा अध्याय 'अल क़ाफ़'च्या पहिल्या आयतीत 'वलकुरआनिल मजीद' असा उल्लेख आलेला आहे. 'कुरआन मजीद' म्हणजे गौरवपूर्ण पठण. तसेच अध्याय ५६ 'अल वाकिया' मधील ७७ व्या आयतीत त्याला 'कुरआन करीम' असे संबोधले आहे ते असे 'इन्नहूल कुरआनुल करीम'.

संपूर्ण कुरआनच्या पठणाच्या दृष्टीने सोयीस्कर व्हावे म्हणून परंपरेने ३० भाग (खंड) पाडण्यात आले आहेत त्यांना 'पारा' असे म्हणतात.

प्रत्येक पारा त्याच्या आद्य अक्षराने ओळखला जातो. पहिल्या पाऱ्यास 'अलिफ लाम मीम' म्हणतात व त्याची सुरुवात सूरह 'अल फातिहा'ने होते आणि अंतिम पारा 'अम्म' आहे. सूरह 'नबाह'ने सुरू होतो व त्या पाऱ्याची सुरुवात 'अम्म' शब्दाने होते.

कुरआनात ११४ अध्याय येतात. अध्यायास 'सूरह' म्हणतात. एकूण 'आयती' (ऋचा) पारंपरिक दृष्टिकोनाप्रमाणे ६,६६६ आहेत. प्रत्येक अध्यायाची सुरुवात 'अल्लाह असीम दयावंत व परम कृपावंतच्या नावाने' अशी होते. फक्त अध्याय क्र.९ च्या सुरुवातीस वरील अवतरण येत नाही. बहुधा नववा अध्याय हा आठव्या अध्यायाचा विस्तार मानतात म्हणून ते अवतरण आले नसावे.

आज जसे कुरआन सलग आहे तसे अवतरित झालेले नाही. तर तुकड्या-तुकड्याने ते प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरित झाले. हा अवतरणकाळ इ. स. ६१० ते इ.स. ६३२ असा २३ वर्षांचा समजला जातो. त्यांच्या महान कार्याला अनुसरून वेळोवेळी प्रसंगोचित त्याच्या आवश्यकतेनुसार मार्गदर्शनाच्या स्वरूपात आयती अवतरित होत गेल्या. त्यांनी अनुभूतीप्रमाणे आपल्या अनुयायांसमोर आयतींचे पठण केले. काहींनी आपल्या तीव्र स्मरणशक्तीने त्या आपल्या स्मरणात दृढ केल्या, त्यांच्या काही अनुयायांनी ते अक्षरबद्ध केले. त्यांच्या सोबत्यांनी खजुरीच्या पानांवर, हाडांच्या फासळ्यांवर, पातळ दगडी चीपांवर, कातडी तुकड्यांवर आयती लिहून ठेवल्या होत्या.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या निर्वाणानंतर अरबस्तानात पुन्हा धर्मयुद्धे पेटली. ज्यात प्रेषितांचे साथी ज्यांना 'सहाबा' म्हणतात आणि जे हाफिज (कुरआन मुखोदगत असलेले) होते, ते शहीद झाले. त्यामुळे आता कुरआनची सुरक्षितता कशी राखता येईल यावर माननीय उमर (रजि.) यांनी व माननीय अबूबकर सिद्दीक (रजि.) यांनी प्रेषित मुहम्मद (स.) यांचे असलेले सचिव माननीय जैद बिन साबित (रजि.) यांना कुरआन लिखित स्वरूपात सुरक्षित करण्याची जबाबदारी सोपविली. लिखित स्वरूपात असलेल्या आयती त्या ज्यांना कुरआन मुखोद्गत होते त्यांच्या सहाय्याने ताडून पडताळून लिपीबद्ध करण्यात आल्या. अशी प्रत तयार झाल्यावर प्रेषितांच्या पत्नी हफ्सा (रजि.) यांच्या घरी ती ठेवण्यात आली. त्या प्रतीवरूनच कुरआनच्या नक्कला करण्यास सर्वांना परवानगी देण्यात आली. माननीय उस्मान (रजि.) यांनी इतर साथीदारांच्या सल्ल्याने वरील कुरआनच्या प्रतीवरूनच नक्कल केलेले कुरआनच फक्त अधिकृत कुरआन ठरविले. त्यामुळे आज जगातील कोणत्याही ठिकाणी प्रकाशित झालेले कुरआन हे मूळ प्रतीप्रमाणेच आढळते. त्यामुळे कुरआनच्या सर्व प्रती कानामात्रेचाही फरक नसलेल्या आहेत. जगात जेथे जेथे इस्लाम आहे तेथे हजारोंच्या संख्येने संपूर्ण कुरआन मुखोद्गत असलेले (हाफीज) आहेत. ही मौलिक परंपरा प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या काळापासून आज चौदाशे वर्षांहून अधिक काळ झाला तरी अखंडपणे चालू आहे.

कुरआनचा अवतरण काळ इ.स. ६१० ते इ.स. ६३२ असा असून पहिल्या १३ वर्षांच्या काळात प्रेषित मुहम्मद (स.) मक्केत असताना अवतरित झालेल्या अध्यायांत प्रामुख्याने खालील विषयांवर भर दिलेला दिसतो.

(१) आदरणीय मुहम्मद (स.) यांची प्रेषित म्हणून झालेली निवड.

(२) पुढील कार्यासाठी ईश्वराने प्रेषितांना प्रशिक्षित केले.

(३) प्रचलित अंधश्रद्धा, कुप्रथा, अज्ञान यांचे खंडन.

(४) सद्वर्तन, सद्गुण, सन्मार्ग, नैतिक मूल्य यांचे मार्गदर्शन केलेले दिसते. त्यांच्या अंगीकाराने मानव सुखी-समाधानी बनू शकतो हे बिंबविण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.

त्यामुळे या अध्यायात येणाऱ्या आयती संक्षिप्त पण अर्थपूर्ण दिसतात. त्यांची भाषा शुद्ध, रोचक, आकर्षक, मधूर व प्रभावी दिसते. सर्वसाधारण माणसालाही समजावे व लक्षात यावे अशी उदाहरणे व दृष्टांत आजूबाजूच्या परिस्थितीतूनच दिलेले दिसतात. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सुरू केलेल्या सत्य धर्माकडे अनेक लोक आकर्षित होऊ लागले. त्या वेळी पूर्वीच्या अज्ञानकाळासच चिकटून राहणाऱ्या व परंपरावादी लोकांचा विरोध प्रेषितांना सुरू झाला आणि त्यांनी प्रेषितांवर व त्यांच्या अनुयायांवर मिथ्या आरोप सुरू केले. अत्यंत निर्घृणपणे प्रेषितांचा व त्यांच्या अनुयायांचा छळ सुरू केला. प्रेषितांनी शांतपणे व संयमाने सर्व सहन केले. पण पुढे तर त्यांच्यावर एवढा जुलूम वाढला की त्यांच्या अनुयायांनी दोन वेळा 'हबश' देशाकडे स्थलांतर केले. ज्यांना शक्य नव्हते ते गुपचूपपणे आपल्या 'इस्लाम'चे पालन करीत होते. शेवटी प्रेषितांनीही ईशआज्ञेप्रमाणे मदिनेस स्थलांतर केले.

आता इस्लामचे कार्य गेली १३ वर्षे सुरू होते. ते मदिनेत पोहचल्यावर पुढील १० वर्षे त्यांच्या निर्वाणापर्यंत तेथेच होते. त्यांचे अनेक अनुयायीही त्यांच्या पाठोपाठ मदिनेस पोहचले. मदीना आता इस्लामचे नवे केंद्र बनले. मदिनेतील अन्सार (सहयोगी) लोकांनी प्रेषित मुहम्मद (स.) यांना प्रेमाने व औदार्याने साथ दिली व येथूनच इस्लामी राष्ट्र उभारणीचा पाया घातला गेला. मदिनेतही मक्केतील कुरेशांनी प्रेषितांवर सशस्त्र हल्ले सुरू केले. येथूनच सशस्त्र 'जिहाद' (धर्मयुद्धे) सुरू झाले. त्याबरोबर यहूदी व खिश्चन यांच्याशी गाठ पडली. तसेच इस्लामच्या वाढत्या संघटनेत दांभिक व ढोंगी शिरले आणि त्यांनी अंतर्गत उपद्व्याप सुरू केले. त्यामुळे मदिनेत अवतरित झालेल्या आयतींत दांभिकांची लक्षणे, त्यावर जळजळीत टीका, कधी राजाज्ञेप्रमाणे आदेशाच्या रूपात या आयती अवतरित झालेल्या दिसतात. दांभिकांशी कसे वागावे, 'काफिरां'शी (नाकारणाऱ्यांशी) कसा व्यवहार करावा, जीवनाविषयी आचारसंहिता, उत्तम नागरिकांचे आदर्श, कायदेसंहिता यांची मूलतत्त्वे अवतरित झालेली दिसतात. तसेच जिहाद, हौतात्म्य, यशापयश, सुख-दुःख, संपन्नता, विषन्नावस्था, अभय यांचे धडे शिकविणाऱ्या आयती अवतरित झालेल्या दिसतात. त्याचप्रमाणे कठोरता, मृदुता, न्यायीपणा, संयम व विवेक याविषयीही उपदेश व बोध अवतरित झालेले दिसतात.

आज आपण जेव्हा कुरआन पाहतो तेव्हा प्रथम मक्केत अवतरित झालेले अध्याय व नंतर मदिनेत अवतरित झालेले अध्याय सलग क्रमवारीने येत नाहीत. मक्केतील अध्याय येतो तर लगेच मदिनेतील अध्याय येतो. तेव्हा मक्का व मदीना येथील अध्याय केव्हाही व कोठेही आलेले दिसतात. ११४ अध्यायांची अनुभूतीप्रमाणे क्रमबद्धता दिसत नाही. मक्केत १३ वर्षांच्या काळात ९२ अध्याय तर मदीनेत १० वर्षांच्या अवधीत २२ अध्याय अवतरीत झालेले आहेत. कुरआनातील अध्यायांची क्रमबद्धता प्रेषित मुहम्मद (स.) यांनीच केलेली आहे. ज्या वेळी कोणताही अध्याय किंवा आयती अवतरित होत तेव्हा प्रेषित मुहम्मद (स.) आपल्या लेखनिकास ते अध्याय व आयती कोणत्या अध्यायाआधी व कोणत्या अध्यायानंतर, कोणत्या क्रमवारीने ठेवायच्या ते सांगत असत. एखाद्या वेळी पूर्ण अध्यायाऐवजी त्याचा काही भाग अवतरित होत असे, त्या वेळीही कोणत्या भागानंतर कोणता भाग कसा व कोठे ठेवायचा ते सांगत असत. नमाजात व इतर वेळीदेखील त्याच अनुक्रमाने पठण करीत असत. त्यामुळे जसे ते अवतरित होई तसे अवतरित करणारी शक्तीच (देवदूत जिब्राईल (अ.)) त्याची क्रमबद्धता सांगत असत. त्यामुळे कुरआनच्या अवतरणाबरोबरच त्याची क्रमवारी सुरू झाली व त्याच्या अवतरण समाप्तीबरोबरच क्रमवारीही संपली. म्हणजेच मानवाने ती क्रमवारी ठरवली नसून ईशआज्ञेप्रमाणे ईशदूत जिब्राईल (अ.) यांच्या सांगण्याप्रमाणेच ते क्रमबद्ध केलेले आहे.

कुरआनचे अवतरण अध्याय १६ म्हणजेच सूरह 'अल इक्रा' किंवा 'अल अलक़' यापासून सुरू झाले आणि अध्याय ५ वा 'अल माइदा' यातील तिसऱ्या आयतीने समाप्त झाले.

कुरआनची सुरुवात 'अल फातिहा' या अध्यायाने होते आणि शेवट ११४ वा अध्याय 'अन नास' याने होते.

अध्याय (सूरह किंवा सुरत)

एकूण ११४ अध्याय असून काही अध्याय लघु आहेत तर काही अध्याय दीर्घ आहेत. सर्वांत प्रदीर्घ अध्याय 'अल बकरा' असून यात २८६ आयती आहेत तर सर्वांत लघु अध्याय १०३ 'अल अस्र', अध्याय १०८ 'अल कौसर' व अध्याय ११० 'अन नस्त्र' हे होत. हे केवळ तीन आयतींचे आहेत.

ॠचा (आयती)

काही आयती या 'दृढ' व काही 'लाक्षणिक' दिसतात. 'दृढ आयती'ने अभिप्रेत अशा आयती होत ज्यांची भाषा अगदी स्पष्ट व ज्यांचा अर्थ निश्चित करण्यात कोणत्याही शंकेला वाव नाही. कुरआनच्या अवतरणाचा हेतू या आयतींनी साध्य होतो. म्हणूनच या आयती ग्रंथाचा मूळ आधार आहेत. या आयतींमध्येच जगाला इस्लामचे आवाहन, बोध, धडा, उपदेश, पथभ्रष्टतेचे खंडन, सरळमार्गाचे स्पष्टीकरण केलेले आहे. यात धर्माची मूलभूत तत्त्वे सांगितली आहेत. यात श्रद्धा, उपासना, नीतीमत्ता, अनिवार्य कर्मे आणि हुकूम देण्याच्या व मनाई करण्याच्या आज्ञा दिलेल्या आहेत.

'लाक्षणिक आयती' त्या होत ज्यात लाक्षणिकता आहे. परोक्ष जीवन व परोक्षाच्या हकीकती यात येतात ज्या मानवी ज्ञानेंद्रियाच्या पलीकडे आहेत. दृढ आयतींमुळे कुरआन ही ईशवाणी आहे, याबद्दल शंका राहात नाही व त्यामुळे संदिग्ध आयतींमुळे वाचकाच्या मनात गोंधळ निर्माण होत नाही.

कुरआनची रचना

कुरआनात ११४ अध्याय असून त्याचे ३० 'पारे' म्हणजे भाग किंवा खंड पाडलेले आहेत. कुरआनच्या पठणास 'तिलावत' म्हणतात. यात ५४० 'रुकुअ' (विसावे) आहेत. पठण करताना १४ ठिकाणी पठण करणाऱ्याने व ऐकणाऱ्यांनी 'सजदा' (माथा टेकणे, नतमस्तक होणे) करावा असे अपेक्षित आहे. संपूर्ण कुरआनात ७७,८३४ शब्द व ३,३३,७६० अक्षरे आहेत. पारंपारिक दृष्टिकोनाप्रमाणे ६६६६ आयती 'वादा'-आश्वासने, 'वइद'-नियम, 'नहि'-निषेध, 'अम्र'-आज्ञा, 'मिसाल'-स्पष्टीकरणे, 'कसस'-जुन्या घटनांचा वृत्तान्त देणाऱ्या प्रत्येकी एक हजार याप्रमाणे ६००० आयती आल्या आहेत. 'तहलिल'-रसग्रहण २५०, 'तहरीम'-मना करणे २५०, 'तसबिह'-पठण १०० व 'मुताफरिक'-इतर ६६ असे वर्गीकरण करण्यात येते.

कुरआनची विचारधारा

कुरआनच्या सर्व आयती प्रामुख्याने 'श्रद्धा' व 'नेकी' याविषयीच आलेल्या आहेत. मानवाने जीवनाची मूलभूत तत्त्वे समजून घेऊन आपली उक्ती व कृती त्यांच्याशी सुसंगत ठेवली पाहिजे. खऱ्या श्रद्धाळूने आपल्या दैनंदिन व्यवहारात व आचरणात ती शिकवण आणली पाहिजे.

(१) एकेश्वरवाद : 'एकच एक ईश्वर आहे व त्याचा कोणीही सहभागी नाही' यावर दृढ विश्वास असला पाहिजे. विश्वातील सर्व दृश्य व अदृश्य अस्तित्व त्याच्याचमुळे आहे. तोच सर्वांचा निर्माता, पालनकर्ता आहे. तोच एकमेव पूजनीय आहे. त्याच्या इच्छेनुरुपच विश्वातील सर्व व्यवहार चालतात व तोच सर्वांचा नियंत्रक व सर्वोच्च सत्ताधीश आहे. त्याने निश्चित केलेल्या दिवशी 'कयामत' (प्रलयकाल) येईल व तो सर्वांचा न्यायनिवाडा करणारा आहे. तो अतिशय असीम मेहेरबान व दयावान आहे व तितकाच न्यायनिष्ठूर आहे.

(२) 'मलाइका'वर (देवदूतांवर) विश्वास : एकेश्वरवादाचाच उपसिद्धान्त असा आहे की या विश्वातील सर्व व्यवहार नियमित रूपाने चालविण्यासाठी व त्यांच्या देखरेखीसाठी, तसेच ईश्वराने निर्माण केलेल्या या विश्वातील सर्व व्यवहार त्याने निर्माण केलेल्या चौकटीतच चालले पाहिजे व विश्वातील मानवासहित सर्व निर्मितीची निगा राखण्याचे काम ज्यांच्याकडे सोपविले आहे त्यांचा उल्लेख कुरआनात 'मलाइका' म्हणून येतो. त्याचे साधारणत: भाषांतर 'देवदूत' असे आपण करू शकतो. त्यावर आपण विश्वास ठेवला पाहिजे.

(३) 'मुर्सलीन'वर (ईश्वराच्या प्रेषितांवर) श्रद्धा : ईश्वराने वेळोवेळी जगाच्या विविध भागांत आपले प्रेषित पाठविले ज्यांनी ईश्वराचा मानवाच्या निर्मितीमागील उद्देश आपल्या मानवी समूहांमध्ये स्पष्ट केला व ईश्वराच्या आज्ञा व मर्यादा समजावून सांगितल्या. ईश्वराने पाठविलेल्या या सर्व प्रेषितांवर श्रद्धा ठेवलीच पाहिजे. (कुरआन - ३५:२५)

(४) धर्मग्रंथांवर श्रद्धा : यातील ज्या प्रेषितांवर ईश्वराने धर्मग्रंथांना अवतरित केले त्या धर्मग्रंथांवर श्रद्धा ठेवणे.

(५) परलोक जीवनावर विश्वास : मानव आपल्या जीवनात ज्याप्रमाणे कर्म करतो त्याप्रमाणे त्याला फळ मिळते. येथेच नव्हे तर मृत्युनंतरही ईश्वर त्याने निश्चित केलेल्या निवाड्याच्या दिवशी सर्वांना पुन्हा जीवित करेल व त्याच्या सत्कर्मांचा व दुष्कर्मांचा हिशोब घेईल व त्याप्रमाणे निवाडा करेल. 'परलोक जीवन हे आहेच' असा उल्लेख कुरआनात अनेक आयतीत आलेला आहे. 'परलोक जीवन आहेच' यावर विश्वास ठेवला पाहिजे. (कुरआन - ४:१३६)

पवित्र कुरआनची शिकवण

१) पवित्र कुरआनात शुद्ध एकेश्वरवाद मांडण्यात आला आहे. एकमेव तोच उपास्य आहे. त्यात कोणासही सहभागी करू नका.

२) यात कोणतेही कर्मकांड सांगण्यात आलेले नाही.

३) ईश्वराशी एकात्मता साधण्यासाठी कोणाच्याही मध्यस्थीची गरज नाही. हे वारंवार सांगण्यात आलेले आहे.

४) पवित्र कुरआनात वारंवार 'हे लोकहो' असे आवाहन करण्यात आलेले आहे. त्यामुळे ही ईशवाणी अखिल मानवजातीसाठी असून कोणा विशिष्ट जाती-जमातीसाठी नाही.

५) यात दया, करुणा, क्षमाशीलता, संयम व विवेक यावर सातत्याने भर दिलेला आहे.

६) दुष्कृत्याबद्दल ईशकोपाचे व ईशशिक्षेचे सतत भय दाखविण्यात आलेले आहे.

७) यात सातत्याने ज्ञानप्राप्तीसाठी प्रोत्साहन देण्यात आलेले आहे.

८) सातत्याने ईश्वर हा सर्वशक्तिमान, सर्वश्रेष्ठ, सर्वज्ञानी व महान असल्याचे बिंबिविण्यात आलेले आहे.

पवित्र कुरआनच्या पठणपद्धती

'किरात' म्हणजे पवित्र कुरआनचे पठण. इ.स. ६५५ म्हणजे तिसरे खलीफा माननीय उस्मान (रजि.) यांच्या काळात आदर्श पद्धतीने पवित्र कुरआनचे पठण सुरू झाले. पठणाच्या सात पद्धती मानल्या जातात व ज्या व्यक्तीने ती पठणाची पद्धत प्रथमतः अवलंबिली त्याच्या नावाने ती पद्धत ओळखली जाते.

(१) इब्न कादिन इब्न कसीर, (२) असीम, (३) अबु अब्र इब्न अल अला, (४) हमजा, (५) अल किताई, (६) नफी, (७) इब्न अमीर.

प्रकरण दुसरे

कुरआनातील वैशिष्ट्यपूर्ण अध्याय

१. अल फातिहा : प्रत्येक ईशप्रार्थनेत या अध्यायाचे पठण करतात. कुरआनचे सर्व सार 'सूरह फातिहा'त आले आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी म्हटले आहे, 'सूरह फातिहा' ही दोनतृतियांश कुरआनचे पुण्य देणारी आहे. तसेच ते म्हणतात, ईश्वराच्या खजिन्यातून मला चार खास गोष्टी मिळाल्या आहेत, (१) सूरह फातिहा, (२) आयतुल कुर्सी (सूरह बकरा मधील आयत क्रमांक २५५), (३) सूरह बकरा आणि (४) सूरह कौसर.

पूर्वी अवतरित झालेले तौरात, ज़बुर, इंजील हे ग्रंथ वाचल्याचे पुण्य हा एक अध्याय वाचणाऱ्यास मिळते. 'सूरह फातिहा' अवतरला तेव्हा सैतानाने आक्रोश केला. या अध्यायास 'कुरआनचा आत्मा' म्हणतात.

२. सूरह यासीन : याला 'कुरआनचे हृदय' म्हणतात. हा अध्याय ज्याने ईश्वराच्या प्रसन्नतेसाठी वाचला त्याचे सर्व अपराध माफ होतात.

३. 'सूरह वाक़िआ' चे पठण करणाऱ्यास कधीही अन्नाचा तुटवडा पडत नाही.

४. 'सूरह वाक़िआ', 'सूरह अल हदीद' व 'सूरह अर-रहमान' चे अध्ययन करणारा 'जन्नतुल फिरदौस'चा राहणारा समजला जातो.

५. प्रेषित मुहम्मद (स.) झोपण्यापूर्वी 'हा-मीम अस्सजदा' व 'सूरह तबारकल्लजी' (अल मुल्क) या दोन अध्यायांचे पठण करीत असत.

कुरआनची वर्णनशैली

सय्यद अबुल आला मौदूदी यांनी आपल्या कुरआनवरील भाष्य 'तफहीमुल कुरआन'च्या प्रस्तावनेत अत्यंत चांगल्या रीतीने कुरआनची वर्णनशैली कशी आहे ह्याबद्दल विचार मांडले आहेत. कुरआनचा अभ्यास केल्यास त्यांनी मांडलेले विचार पटतात. ते म्हणतात,

"कुरआनात श्रद्धात्मक नियम, नैतिक आदेश, शास्त्रीय आज्ञा, आवाहन, उपदेश, धडा, टीका, निर्भर्त्सना, भय, शुभवार्ता, सांत्वन, प्रमाण-पुरावे, ऐतिहासिक गोष्टी, सृष्टीतील खाणाखुणांचे संकेत, वरचेवर एकानंतर दुसरे येतात. एकाच विषयाचा निरनिराळ्या पद्धतीने व निरनिराळ्या शब्दांत पुनरुच्चार केला जातो. एका विषयानंतर दुसरा व दुसऱ्यानंतर तिसरा अकस्मातपणे सुरू होतो. किंबहुना एका विषयाच्या मध्येच दुसरा विषय येऊन जातो. संबोधक आणि संबोधित वरचेवर बदलत आहेत आणि

संबोधण्याचा रोख राहून राहून विभिन्न दिशेस वळत आहे. विविध भाग आणि प्रकरणात विभागणीचा मागमूसही नाही. इतिहास आहे पण ऐतिहासिक पद्धतीने नाही, तत्त्वज्ञान व अध्यात्म आहे, परंतु तर्कशास्त्र व तत्त्वशास्त्रीय भाषेत नाही. मानव आणि विश्वातील निर्मितीचा उल्लेख आहे, परंतु भौतिकशास्त्राच्या पद्धतीने नाही. संस्कृती, राजकारण, अर्थकारण व समाजकारणावरील संवाद आहे, परंतु जीवनशास्त्राच्या पद्धतीने नाही. कायद्यात्मक आदेश आणि कायदा व नियम सांगितलेला असला तरी कायदे रचियतेच्या पद्धतीशी अगदी भिन्न, नैतिकतेची शिकवण आहे, पण नैतिकशास्त्राच्या समग्र वाङ:मयाहून त्याची तऱ्हा वेगळी आहे.''

कुरआनची मूळ भाषा अरबी आहे पण जगातील जवळपास सर्व भाषांत त्याचे अनुवाद झालेले आहेत.

कुरआन-ईशवाणी

कुरआन ही ईशवाणी आहे व ती ईश्वराकडून आद्य देवदूत जिब्राईल (अ.) यांच्यामार्फत अवतरित करण्यात आलेली आहे. कुरआनच्या विविध अध्यायांत जवळपास सव्वा तीनशेच्यावर आयती आलेल्या आहेत, ज्यात स्पष्टपणे ही 'ईशवाणी' असे म्हटलेले दिसते. अत्यंत महत्त्वाच्या तीन-चार आयती येथे देत आहे.

सूरह अल बकरा, आयत २३ : ''आणि जर तुम्हाला शंका असेल की हा ग्रंथ जो आम्ही आमच्या दासावर अवतरित केला आहे किंवा नाही, तर याच्यासारखी एकच सुरत (अध्याय) रचून आणा, आपल्या सर्व समर्थकांना बोलवा, एक अल्लाहशिवाय बाकीच्या ज्या ज्या लोकांची हवी असेल त्या त्या लोकांची मदत घ्या, जर तुम्ही खरे असाल तर हे कार्य करून दाखवा.''

सूरह अन नम्ल, आयत ६ : ''हे प्रेषित मुहम्मद (स.) तुम्ही हा कुरआन एका बुद्धिमान व ज्ञानी अस्तित्वाकडून प्राप्त करीत आहात.''

सूरह बनी इस्त्राईल, आयत ८८ : ''सांगून टाका की मानव आणि जिन्न (यक्ष) सर्वच्या सर्वजनांनी मिळून जरी कुरआनसारखी एखादी वस्तू आणण्याचा प्रयत्न केला तरी आणू शकणार नाही. मग ते सर्व एकमेकांचे सहाय्यक बनले तरी.''

हा ग्रंथ ईशवाणी आहे हे खालील गोष्टींवरूनदेखील सहज लक्षात येते. प्रेषित मुहम्मद (स.) 'उम्मी' म्हणजे निरक्षर होते व यात आलेली ऐतिहासिक सत्ये त्यांना माहीत असणे शक्य नाही. भौगोलिक सत्ये त्यांना मांडता येणे अशक्य वाटते, यात आलेली खगोलशास्त्रीय माहिती सर्वसामान्य माणसाच्या अवाक्यातील नाही. कुरआनात दिलेले जीवशास्त्राचे सिद्धान्त, मानवाची उत्पत्ती, त्याची गर्भावस्थेत होणारी वाढ, त्याचा जन्म व नंतर त्याचा होणारा विकास, पर्वत, सागर, सप्त आकाश, स्वर्ग,

नरक यांविषयी आलेली माहिती, यात आलेले सामाजिक विचार, आर्थिक विचार, धर्मशास्त्र, कायदेसंहिता (शरियत) या गोष्टी सर्वसामान्य माणूस मांडूच शकत नाही. तसेच हे अवतरण २३ वर्षे चालू होते. पण कोठेही विचारांची साखळी तुटलेली नाही, जे सामान्य माणसाच्या अवाक्यातले नाही. विशेष म्हणजे खुद्द प्रेषितांनाच काही ठिकाणी तंबी आलेल्या आहेत.

यात आलेले काही संदर्भ तर कितीतरी मागील शतकातील आलेले आहेत. विशेष म्हणजे यात सांगितलेली वैज्ञानिक सत्ये अर्वाचीन काळात काही सिद्ध झाली आहेत व अजून काही सिद्ध व्हायची आहेत. १४०० वर्षांपूर्वी ही मांडलेली शास्त्रीय सत्ये सामान्य माणूस मांडूच शकत नाही. म्हणूनच ही निश्चितच ईशवाणी आहे यात तीळमात्र शंका नाही.

काही महत्त्वाची वचने

पवित्र कुरआनात मानवास उत्कृष्ट मार्गदर्शन करणारी अनेक वचने आली आहेत, त्यातील काही वचने देत आहे ज्यावरून हे सिद्ध होते की, हा मानवी कल्याणासाठी अवतरित झालेला ग्रंथ आहे.

"धर्माच्या बाबतीत कोणावरही सक्ती नाही." (२:२५६)

"आणि जे लोक अल्लाहद्वारे प्रकाशित केलेल्या क़ायद्याला अनुसरून न्याय-निवाडा करत नसतील तेच अत्याचारी होत." (५:४५)

"विश्वासघात कधीही करू नका." (८:२७)

"अत्याचार करणारे कधीही भरभराटीस चढणार नाहीत." (६:१३५)

"खरोखरीच माणूस हा सत्याचा कटु विरोध करणारा प्राणी आहे." (२२:६६)

"सद्वर्तणूक व शुद्ध आचरण हीच खरी परलोकाची शिदोरी आहे." (२:१९७)

कुरआनबद्दल प्रेषित मुहम्मद (स.) यांची वचने (हदीस)

प्रेषित मुहम्मद (स.) यांची अनेक वचने आलेली आहेत. त्यातील महत्त्वपूर्ण असलेली काही वचने.

"माझ्या अनुयायांसाठी सर्वांत तेजस्वी व अभिमानास्पद ठेवा म्हणजे पवित्र कुरआन होय."

प्रेषित मुहम्मद (स.) म्हणाले होते की, "माननीय जिब्राईल (अ.) म्हणाले, मुक्तीचा सर्वांत उत्तम मार्ग पवित्र कुरआन होय."

शेवटच्या प्रवचनात प्रेषित म्हणतात, "तुमच्यासाठी कुरआन करीमसारखा पवित्र ग्रंथ आणि माझे हदीस सोडून जात आहे. त्याप्रमाणे तुम्ही आचरण केल्यास तुम्ही कधीही पथभ्रष्ट होणार नाही."

प्रकरण तिसरे

पवित्र कुरआनात माणसासाठी आलेले मार्गदर्शन

प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारलेल्या शंका, समस्या अथवा त्यांच्या विरोधकांनी घेतलेल्या आक्षेपांना उत्तरे दिव्य वहीद्वारे ईश्वराकडून अवतरित होत होती. त्यामुळे दिव्य कुरआन हे मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे आहे.

खुद्द कुरआनात जवळपास ३०० आयती (ऋचा, ओव्या) येतात ज्यांत ईश्वराकडूनच हे अवतरित होत असल्याचे नि:संदिग्धपणे सांगितले गेले आहे. काहीजण हे प्रेषित मुहम्मद (स.) यांचीच रचना असल्याचा आरोप करीत होते. तेव्हा यात अशी एक आयत अवतरित झाली की ज्यात मानवांना ईश्वराकडून स्पष्टपणे आव्हान दिले गेले आहे ते असे,

"तुम्ही जर तुमच्या आरोपात खरे असाल तर एक सूरह (अध्याय) यासारखी रचून आणा आणि एक अल्लाहला सोडून इतर ज्यांना ज्यांना बोलाविणे शक्य असेल त्यांना मदतीला बोलवा." (सूरह यूनुस - ३८)

सामान्यत: कुरआनविषयी एक असा समज आहे की हे मुस्लिमांसाठी आलेले अवतरण आहे. परंतु सखोल अभ्यास जर कुरआनचा सातत्याने केला तर हे स्पष्ट होते की हे ज्ञान अखिल मानवजातीसाठी ईश्वराकडूनच अवतरित झालेले आहे. तसेच आणखीन एक दुसरा गैरसमज असा आहे की प्रेषित मुहम्मद (स.) हे मुस्लिमांसाठी पाठविले गेलेले प्रेषित होते. पण ते खरे नाही, कारण एका आयतीत स्पष्टपणे म्हटले आहे की, "रहमतुल्लिल-आलमीन" म्हणजे "आम्ही अखिल जीवसृष्टीसाठी आदरणीय मुहम्मद (स.) यांना आमची कृपा म्हणून पाठविले आहे." (अल अंबिया, आयत १०७) सूरह सबा, आयत २८ मध्ये म्हटले आहे,

"आणि (हे प्रेषित मुहम्मद (स.)) आम्ही तुम्हाला अखिल मानवजातीसाठी खूशखबर देणारा आणि सावधान करणारा बनवून पाठविले आहे, परंतु बहुतेक लोक जाणत नाहीत."

ग्रंथ म्हटला म्हणजे सर्वसाधारणत: ज्या पद्धतीने त्यात मूळ विषयाच्या उपोद्घात मांडणी व नंतर उपसंहार येतो. तसे यात घडत नाही. याची मांडणी मोठी विलक्षण आहे. यात ग्रंथिक लिखाणाचे कोणतेही संकेत पाळले जात नाहीत. कुरआनचा अभ्यास केल्यावर लक्षात येते की मध्येच सोडलेले विषय पुढच्याच कोणत्या तरी अध्यायात पूर्ण केले जातात. म्हणून एकाच वाचनात कुरआन समजत नाही. ते जर सातत्याने वाचत गेल्यास अनेक गोष्टींचे उलगडे होतात, पण त्यासाठी संयमाने आणि गांभिर्याने कुरआनचे सतत वाचन करायला पाहिजे.

कुरआनात श्रद्धात्मक नियम, नैतिक आदेश, शास्त्रीय ज्ञान, आवाहन, उपदेश, धडे, टीका, निर्भर्त्सना, भय, शुभवार्ता, सांत्वन, प्रमाण, पुरावे, ऐतिहासिक गोष्टी, सृष्टीतील विविध घटनांकडे निर्देश येत राहतात. विशेष म्हणजे यात ऐतिहासिक गोष्टी व घटनांचे उल्लेखदेखील येतात, पण ऐतिहासिक पद्धतीने नाही. तत्त्वज्ञान व अध्यात्म मांडले आहे, पण तर्कशास्त्र व तत्त्वशास्त्रीय पद्धतीने नाही. मानव व विश्वातील विविध निर्मिती यांची माहिती येते, पण भौतिकशास्त्रीय पद्धतीने नाही. संस्कृती, राजकारण, अर्थकारण व सामाजिक विचार येतात, पण आपल्या परिचित पद्धतीने नाही. नैतिक शिकवण आहे पण नैतिक शास्त्रीय पद्धतीने नाही. या सर्व गोष्टींचा आपण संकल्पित पद्धतीने एकत्रिकरण करून जर अभ्यास केला तर मानवाला यात परिपूर्ण शिक्षण दिले गेलेले दिसते. ईश्वराने मानवास आपला प्रतिनिधी (नायब) म्हणून जगात उतरविले असा उल्लेख कुरआनात येतो. त्याला परिपूर्ण बनविण्याची शिकवण यात येते, त्याचबरोबर मानवातील उताविळपणा, हावरटपणा, कृतघ्नता, मानसिक कमकुवतपणा याकडेही सातत्याने निर्देश केलेले आढळतात.

'कुरआन आणि शिक्षण' याचा विचार आजच्या पद्धतीने विविध दृष्टिकोनातून केल्यास कुरआनात सर्व गोष्टी साकल्याने कशा मांडल्या आहेत हे लक्षात येते. परंतु एक गोष्ट ध्यानात ठेवावी लागते की ही ईशवाणी आहे आणि त्यामुळे यात बारीक-सारीक, किरकोळ गोष्टींचे तपशीलवार उल्लेख येत नाहीत. ज्याला आपण 'आउटलाइन' म्हणतो किंवा रेखाचित्र म्हणतो ते मात्र स्पष्टपणे मांडलेले दिसते. तपशील समजुतदारांनी जाणून घ्यायचा आहे. याचा उल्लेख 'यात समजुतदारांसाठी अनेक निशाण्या आहेत' असा अनेकवेळा येतो.

'शिक्षण' ही एक अविरत चालणारी प्रक्रिया आहे. कुरआनचे अवतरणही एकाच वेळी न येता अविरत २३ वर्षे होत होते. प्रत्येक वेळी येणाऱ्या अडचणी व शंका यांचे निरसन करणाऱ्या आयती अवतरित होत होत्या. त्यात बौद्धिक, शारीरिक, सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक या सर्व अंगाची वाढ, विकास आणि प्रगती यांचे मार्गदर्शन मिळत होते. विशेष म्हणजे शिक्षणाची हीच उद्दिष्टे मानली जातात.

व्यक्ती हा समाजाचा सर्वांत लहान घटक मानला जातो. व्यक्तीविकासाबरोबरच समाजाचा विकास होत जातो.

कुरआनचे अवतरण ९६वा अध्याय, 'अल अलक' हे या शब्दाने सुरू झाले व ती त्यातील पहिली आयत "वाच' ईश्वराच्या नावाने जो जगाचा निर्माता, पालनकर्ता व शासक आहे." पुढे चौथ्या आयतीत म्हटले आहे, "ईश्वराने लेखणीद्वारा मानवास ज्ञान दिले आहे."

विविध अध्यायात आलेल्या आयतींवरून ज्ञानाचे महत्त्व व त्याचबरोबर सामाजिक, नैतिक व आध्यात्मिक विकासाचे मार्गदर्शन मिळते.

'अल बकरा,' 'आलि इमरान,' 'अन कबुत,' 'रुम,' 'लुकमान' व 'अस्सजदा' या सहाही अध्यायांची सुरूवात 'अलिफ लाम मीम' या सांकेतिक वर्णांनी होते. त्याचा अर्थ कोणासही ज्ञात नाही. परंतु त्यामुळे त्या अध्यायात येणाऱ्या आयती समजण्यात कोणतीही अडचण येत नाही. त्यामुळे याचा अर्थ जाणून घेण्यासाठी व्यर्थ धडपड करणे उपयोगी नाही. खुद्द प्रेषित मुहम्मद (स.) यांनीदेखील त्यावर कोणतीही टिप्पणी केलेली नाही. त्या वर्णांचा अर्थ केवळ तो परमात्माच जाणतो.

सूरह 'अनकबुत' मधील आठव्या आयतीत ईश्वर आज्ञा देतो,

''आई-वडिलांशी प्रेमाने वागा व चांगले वर्तन ठेवा. त्यांच्या आज्ञेत राहा. परंतु ईश्वराबरोबर कोणास जर ते सहभागी ठरवून त्याची उपासना करण्यास सांगत असतील तर मात्र त्यांचे ते म्हणणे ऐकू नका.''

आई-वडिलांचे आज्ञापालन करताना डोळसपणे आज्ञापालन करा व आई-वडिलांनीही योग्य त्याच गोष्टी मुलांना करण्यास सांगाव्यात, हा उपदेश दिला आहे. थोडक्यात, ज्या गोष्टींविषयी आपल्याला निश्चित ज्ञान नाही त्याबाबतीत आपण अधिकारवाणीने कोणासही काही सांगू नये हेच सुचविले आहे. यातीलच २२ व्या आयतीत 'ईश्वराशिवाय मानवाचा कोणीही खरा मित्र व सहायक नाही' म्हटले आहे. अशाच अर्थाच्या अनेक आयती विविध अध्यायात आल्या आहेत. म्हणजेच खरा विश्वास, श्रद्धा व भरवसा हा फक्त ईश्वरावरच ठेवून माणसाने वाटचाल करावी आणि आपण आपल्या प्रत्येक कृत्यास त्यालाच जबाबदार आहोत याची जाणीव ठेवली पाहिजे. ईश्वराकडून काही लपत नसते हे ओळखले तर मानव कधीही सरळमार्ग सोडणार नाही व वाममार्गाला लागणार नाही.

याच अध्यायातील २८ व्या आयतीत समलिंगी संभोगाच्या विकृतीवर प्रकाश टाकला आहे आणि अशा विकृत समाजाला कसे उद्ध्वस्त करून नेस्तनाबुत केले गेले याची माहिती पुढील आयतीत आली आहे. 'अल आअराफ' या अध्यायातील ८० व ८१ आयतीत,

''काय तुम्ही असे निर्लज्ज झाला आहात की ती अश्लील कृत्ये करता जी तुमच्या अगोदर जगात कोणी केली नाहीत? तुम्ही स्त्रियांना सोडून पुरुषांकडून आपली कामवासना भागवता, वस्तुस्थिती अशी आहे तुम्ही सर्वस्वी मर्यादांचे उल्लंघन करणारे आहात.''

वरील वक्तव्य प्रेषित लूत (अ.) यांनी आपल्या लोकांना उद्देशून म्हटले आहे. सूरह अनकबुत आयत ३६ ते ३९ मध्ये, घमेंडखोर, गर्विष्ठ, उन्मत्त व माजले होते.

त्या कारून, फिरऔन व हामान यांना कसे नष्ट केले गेले याची माहिती येते. विकृतपणाचे वर्तन व उन्मत्तपणा तुम्हाला सर्वनाशाप्रत नेतो याचे मार्गदर्शन केले गेले आहे.

प्रेषित शोएब (अ.) यांच्या उपदेशाकडे दुर्लक्ष करून त्यांना खोटे ठरविणाऱ्या व उन्मत्तपणे वागणारे आद व समूद जनसमूहांना नष्ट केले गेल्याची माहिती येते.

सूरह 'अनकबुत,' आयत ४५मध्ये नित्य-नियमितपणे ईशप्रार्थनेची-नमाजची आज्ञा आली आहे. अशाच अर्थाच्या अनेक आयती विविध अध्यायात आलेल्या आहेत. ईशभयाने वागणारा नेहमीच दुष्कृत्यांपासून दूर राहतो. ६४ व्या आयतीत,

"दुनियेतील हे ऐहिक जीवन केवळ एक मनोरंजन व अल्पजीवी आहे."

'त्यामागे धावू नका' हा उपदेश आला आहे.

सूरह ३० मधील ३८ व्या आयतीत म्हटले आहे,

"नातेवाईक, लाचार, पांथस्थ यांना सहाय्य करा. ईशप्रसन्नता जे इच्छितात तेच असे वागतात."

३९ व्या आयतीत "व्याजबट्ट्याचा व्यवहार ईश्वरास अजिबात पसंत नाही," असे म्हटले आहे. सूरह 'अल बकरा' मध्ये आयत २७५ व २७६ मध्ये व्याजाची निर्भर्त्सना केली आहे. सूरह 'अल बकरा' मधील आयत २८२ मध्ये 'सर्व आर्थिक व्यवहार लेखीच करावेत' अशी सूचना दिली गेली आहे. आयत ४२ ते ४४ मध्ये म्हटले आहे,

माणसांनी उघडे डोळे ठेवून जर दुनियेत वावरले तर त्यांना कळेल की आपल्या अविवेकी वर्तनाने कशा रीतीने लोकांनी आपला विनाश ओढवून घेतला. जे सद्वर्तनी राहतील त्यांना त्याचा चांगला मोबदला मिळेल.

'सूरह लुकमान'च्या आयत ८ मध्ये सद्वर्तनींना स्वर्गाचे अभिवचन दिले गेले आहे. आयत १४ मध्ये -

"आपल्या आई-वडिलांशी आदराने वागून त्यांची मनोभावे सेवा करा व त्यांनी तुम्हाला मोठे करण्यासाठी किती त्रास व हालअपेष्टा सहन केल्या आहेत याची जाणीव ठेवा.' असा उपदेश दिला गेला आहे.

लुकमान आपल्या मुलाला बोध देतात,

"गर्विष्ठपणे, घमेंडखोरीने वागू नको, कारण ईश्वरास असे वागणारे आवडत नाहीत. चालण्यात आढ्यता नको अथवा मरगळूनही चालू नकोस, तुझी चाल नेहमी मध्यम ठेव. मोठ्याने बोलू नये अथवा कुजबुजल्यासारखे बोलू नये, तर मध्यम आवाजात सौम्यपणे बोलावे."

'सूरह अस्सजदा'मधील १७ व्या आयतीत सद्वर्तन ठेवणाऱ्यांना 'आखिरत'मध्ये स्वर्गाचे वचन दिले गेले आहे.

पहिला अध्याय 'अल फातिहा' ज्याला कुरआनचा आत्मा म्हटले आहे. यात येणाऱ्या सात आयती या ईश्वराची महत्ता व माणसाने सरळमार्गावरच ईश्वराने आपल्याला चालण्याची बुद्धी द्यावी, पथभ्रष्ट होण्यापासून वाचवावे ही करुणा भाकलेली आहे.

सूरह 'आले इमरान' मधील १६० व्या आयतीत 'ईश्वर ज्याला सहाय्य करतो त्याच्यावर इतर कोणीही वर्चस्व निर्माण करू शकत नाही,' याची खात्री दिली गेली आहे.

सूरह 'अन निसा'मधील आयत ५८ व १३५ यात सत्य व न्यायाच्या बाजूने दृढ राहाण्यास सांगितले आहे आणि न्यायनिवाडा करताना संपूर्ण नि:पक्षपातीपणे तो केला पाहिजे याबद्दल बजावले आहे. आयत १६७ व १६८ मध्ये दांभिक कसे घातक असतात व त्यांना ओळखून कसे सावध राहिले पाहिजे हे सांगितले आहे. आयत १८६ मध्ये,

''संयम व ईशभिरूतेच्या वर्तनावर दृढ राहणे अत्यंत धैर्याचे काम आहे.'' असे बजावले आहे.

'अन निसा'तील पहिल्या आयतीच्या उत्तरार्धात म्हटले आहे,

''अनाथांची मालमत्ता खाणे म्हणजे आगीने पोट भरणे होय' असे बजावले आहे.

यातून स्पष्ट जाणीव करून देण्यात आली आहे की असाह्यांना नागवणे हे अत्यंत हीन दर्जाचे कृत्य आहे. स्वैराचाराची निर्भर्त्सना अनेक आयतीत करण्यात आली आहे. व्यभिचारींची निर्भर्त्सना केली असून त्याबद्दल कडक शासनही सांगण्यात आले आहे. आयत ३८ मध्ये दानधर्म हा ईशप्रसन्नतेसाठी करावयाचा असतो दिखाव्यासाठी नाही, याची जाणीव करून देण्यात आली आहे. मानव आपल्या स्वकृत्यांनीच स्वत:वर संकटे ओढवून घेतो, असे आयत ७९ मध्ये म्हटले आहे. आयत ८६ मध्ये उत्तम शिष्टाचार व सभ्य वर्तनाचे महत्त्व विषद केले गेले आहे. आयत १०७ मध्ये कसे वागावे व कसे वागू नये यावर विवेचन आले आहे. आयत ११४ मध्ये कानगोष्टी करणे कसे वाईट आहे हे दर्शविले आहे.

सूरह 'अल माईदा'मध्ये दारू व जुगाराची निर्भर्त्सना केली गेली आहे.

''आपल्या धर्मात अतिरेक करू नका आणि त्या लोकांच्या कल्पनांचे अनुसरण करू नका, जे तुमच्या अगोदर स्वत: पथभ्रष्ट झाले व बहुतेकांना त्यांनी पथभ्रष्ट केले आणि 'सरळमार्गा'पासून ढळले.''

सूरह 'अल माईदा'तील ३८ व्या आयतीत चोर स्त्री अथवा पुरुष जो असेल त्याचे हात तोडण्याची शिक्षा सांगितली आहे. सूरह 'अनआम' या अध्यायात दारिद्र्याच्या भीतीने भ्रूणहत्या करू नका असे बजावले गेले आहे. यातीलच १६५ व्या आततीत,

"प्रत्येक व्यक्तीने जे काही कमविले त्याला जबाबदार ती व्यक्ती स्वत:च असते. कोणीही दुसऱ्याचे ओझे उचलत नसतो." याची जाणीव करून दिली आहे.

'सूरह अनफाल'च्या ६५ व ६६ व्या आयतीत धैर्यशीलतेचे महत्त्व विशद करताना म्हटले आहे,

"धैर्यशीलतेच्या जोरावर अल्पसंख्य असलेले बहुसंख्य शत्रूवर विजय मिळवितात."

'सूरह अत तौबा'च्या १०९ व्या आयतीच्या उत्तरार्धात म्हटले आहे,

"ईश्वराला स्वच्छता बाळगणारेच पसंत आहेत."

'सूरह यूनुस'ची पहिली आयत स्पष्टपणे सांगते,

"हा ग्रंथ हिकमत व बोधाने ओतप्रोत आहे."

'सूरह अल बकरा'मध्ये इजिप्तनरेश फिरऔनच्या जुलूमातून प्रेषित मूसा (अ.) यांच्या नेतृत्वाखालील यहुद्यांची कशी मुक्तता झाली व नरेश फिरऔनला पाण्यात बुडवून कसे नष्ट केले गेले याचा वृत्तान्त येतो. पण यहुदी स्वत:च्या पूर्ववर्तनाने स्वत:च्या अध:पतनास व दुर्गतीस कसे कारणीभूत ठरले याची माहिती येते. ही ऐतिहासिक माहिती इतिहासाच्या पद्धतीने मांडलेली नाही. हा अध्याय सर्वांत मोठा अध्याय असून यात अशा अनेक गोष्टी सुचविल्या आहेत की जेणेकरून मानवाने जीवनाविषयी अनेक प्रकारे बोध घ्यावा व यहुद्यांप्रमाणे आपली दुर्गती करून घेऊ नये. सूरह 'आले इमरान'मध्ये ईसा (अ.) यांच्या जन्मापासून त्यांना देण्यात आलेल्या देणग्या याचा वृत्तान्त येतो. ईसा (अ.) यांना ईशपुत्र मानणे कसे चूक आहे व ईश्वर या सर्व गोष्टींपासून कसा अलिप्त आहे हे दर्शविले आहे. सूरह 'अन निसा'मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे,

"फक्त अल्लाहच एक ईश्वर आहे, तो पवित्र आहे यापासून की त्याचा कोणी पुत्र असावा."

आयत १७१ मध्ये 'ईसा (अ.) एक प्रेषित होते व अल्लाहला कोणी संतान नाही. तो अशा गोष्टींपासून पवित्र आहे.' ईसा (अ.) यांना कुसावर मारले हे कसे खोटे आहे ते "आम्ही त्यांना (प्रेषित ईसा (अ.) यांना) वरच्यावर कसे उठविले" यावरून स्पष्ट होते.

कुरआनच्या इतर अध्यायांत अनेक बोधप्रद आयती आल्या आहेत. तर काही ठिकाणी विविध विषयांची पुनरावृत्ती झालेली दिसते.

"नमाज कायम करा व जकात द्या" असा आदेश देणाऱ्या आयती अनेक वेळा आल्या आहेत. ज्यात "नमाज कायम करा" अशी आज्ञा येते. म्हणजे याचा अर्थ 'नित्य नियमाने मशिदीत जाऊन नमाज पढा' असा आहे. सामाजिक अभिसरणाचा व सामाजिक एकात्मता साधण्याचा महामंत्र दिलेला आहे. 'जकात द्या' याचा अर्थ 'समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या वर्गाला मदत श्रीमंतवर्गाने केली पाहिजे' हे सामाजिक आर्थिक बांधिलकीचे तत्त्व मांडले आहे. "अफवांवर विश्वास ठेवू नका आणि समाजातील धुरिणांनी समाजात येणारे दोष वेळीच मुळासकट नष्ट केले पाहिजेत व त्यासाठी धैर्याने पावले उचलली पाहिजेत" अशी आज्ञा येते. यात समाज निकोप राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे बिंबवले आहे.

मानवाने काय खावे, काय खाऊ नये, काय प्यावे व काय पिऊ नये, पोषाख कसा असावा, शिष्टाचाराचे नियम, माणूस स्वकृत्यांनीच चांगले अथवा वाईट परिणाम कसे भोगतो, ईशप्रसन्नतेसाठी कसे वागावे, कसा दानधर्म करावा, नशा व जुगारापासून दूर राहावे, स्त्रियांचे हक्क, अधिकार व मर्यादाशीलता, त्यांच्या जबाबदाऱ्या, तसेच पुरुषांची कर्तव्ये, त्यांच्या जबाबदाऱ्या, नातेवाईक, शेजारी व पांथस्थ यांच्याशी कसा व्यवहार असावा, अनाथांशी कसे वागावे, नैतिक मूल्ये कशी जपावी, अशा अनेक गोष्टींचे मार्गदर्शन कुरआनात येते.

कुरआनात "आम्ही नव्याने काही सांगत नाही, जे पूर्वीच्या लोकांना सांगितले तेच तुम्हाला सांगत आहोत." असे अनेकदा म्हटले गेले आहे. त्यामुळे पूर्वीच्या लोकांना दिलेले ज्ञान जाणून घ्यायची आपोआपच जिज्ञासा निर्माण होते. जिज्ञासा वाढविणे हे शिक्षणाचे एक महत्त्वाचे अंग मानले जाते.

यात कधी प्रेषित मुहम्मद (स.) यांना संबोधले जाते तर कधी श्रद्धाळूंना संबोधले जाते. अनेक गोष्टींची पुनरावृत्ती झालेली दिसते. जणू शिक्षक व विद्यार्थी यांना प्रत्यक्ष पद्धतीने शिकण्याचे ते तत्त्व असल्याचे या अवतरणात दिसते.

शिक्षणपद्धतीत ज्याला आपण उजळणी म्हणतो तेच तत्त्व अनेक गोष्टींच्या पुनरावृत्तीत आढळते.

जे शिकविले जाते ते जर चांगल्या पद्धतीने आत्मसात केले तर विद्यार्थ्यांना "प्रथम श्रेणी अथवा मेरिटमध्ये तुम्ही निश्चित याल" हे जसे शिक्षक सांगतात तद्वतच ईश्वराची शिकवण आत्मसात केल्यास स्वर्गाच्या सुखमयी जीवनाचे अभिवचन दिले गेलेले दिसते.

संस्कार-सुसंस्कार, आचार-विचार, शुद्धाचरण-चारित्र्यसंपन्नता, मानसिक व आध्यात्मिक विकास आणि नैतिकता ही आपण शिक्षणाची उद्दिष्टे मानतो. याच सर्व

गोष्टींवर कुरआनात भर दिलेला दिसतो. कुरआनच्या शिकवणुकीवर चालणारा निश्चितच आपल्या जीवनात अमूलाग्र बदल घडवून आणू शकतो. मानवाच्या आचार, विचार, वाणी, नैतिकता यात सुयोग्य बदल घडविणे हेच शिक्षणाचे उद्दिष्ट आहे, जे कुरआनच्या शिकवणुकीने निश्चित साधता येते यात तीळमात्र शंका नाही.

मानवाला खरोखरीच जर ऐहिक जीवनात व पारमार्थिक जीवनात साफल्य मिळवायचे असेल तर त्याने अंधश्रद्धेने कुरआनचे नुसते पठण करणे उपयोगाचे नाही, तर जिज्ञासू वृत्तीने व डोळसपणे ही ईशवाणी अभ्यासली पाहिजे आणि आत्मसात केली पाहिजे. तो निश्चितच उत्तम कुटुंबप्रमुख, पिता, भाऊ, पुत्र, उत्तम शेजारी, जबाबदार नागरिक बनू शकतो. स्त्रीदेखील उत्तम माता, कन्या, भगिनी, सून, अर्धांगिनी व सामाजिक उत्थानकर्ती बनू शकते. या शिकवणुकींवर चालणारी स्त्री अथवा पुरूष ऐहिक व पारमार्थिक सफल जीवनासाठी प्रशिक्षित होऊ शकतो, यात शंका नाही.

कुरआनात कोणतेही अवघड, अवजड, क्लिष्ट असे तत्त्वज्ञान नाही. अत्यंत साध्या, सोप्या, सुगम व सुलभ भाषेत व अगदी सामान्यातल्या सामान्य माणसाला सहज समजेल, उमजेल व आकलन होईल असे मार्गदर्शन आलेले आहे.

खुद्द कुरआनच याची साक्ष खालील आयतींवरून स्पष्टपणे देतो.

"आम्ही कुरआनास उपदेश मानणाऱ्याकरिता सोपे बनविले आहे, तर आहे कोणी उपदेश प्राप्त करणारा." (५४:२२)

पुढे ईशवाणी म्हणते,

"आणि आम्ही कुरआनास उपदेश ग्रहण करणाऱ्याकरिता सोपे बनविले आहे, तर आहे कोणी उपदेश ग्रहण करणारा." (५४:३२,४०)

कुरआनात जागोजागी एक आयत वारंवार आलेली आहे (६८:५२, ६९:४३,४८, ७४:३१,५४,५५, ८१:२७) ज्यात अगदी स्पष्ट म्हटले आहे, "हा बोध अखिल मानवांसाठी व जगवासियांसाठी आलेला आहे."

कुरआनचा बोध मानवी जीवनाशी सर्वार्थाने निगडित आहे, सर्वस्पर्शी आहे. मानवी जीवनाचे एकही अंग असे नाही ज्याला याने स्पर्श केलेला नाही.

माणसाच्या उत्पत्तीपासून, सृष्टीच्या उत्पत्तीसह व जमीन, आकाश, अवकाश, सप्तपाताळ व सप्तआकाश, एवढेच नव्हे तर अंतरिक्ष विश्व याविषयी एक ना अनेक गोष्टींना स्पर्श झालेला दिसतो.

भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, वंशशास्त्र, भूगर्भशास्त्र, अर्थशास्त्र, कृषी-फलोद्यान शास्त्र, जीवशास्त्र, प्रसुतीशास्त्र यांचे व यात आलेली अद्‌भूत सत्ये मांडलेली आहेत.

आर्थिक व्यवहाराबद्दल मार्गदर्शन आहे. कंजुषी करू नका; पण त्याचवेळी उधळपट्टीही करू नका. काटकसरीने वागा; पण योग्यवेळी योग्य तो खर्च करण्यात मागे पुढे पाहू नका. महत्त्वाचे आर्थिक व्यवहार हे दोन साक्षीदार ठेवून लेखी स्वरूपात करा. लाचार, गरीब, अनाथ, निराधार यांना ममतेने वागवा त्यांना शक्य होईल ती मदत करा. गरजवंतांच्या परिस्थितीचा फायदा घेऊन त्यांना नाडू नका. योग्य मोज-माप करा व त्यात लबाडी करू नका. कोणाचाही न्याय्य हक्क मारू नका. गुन्हेगारी प्रवृत्ती ही सर्वनाशी ठरते.

कुरआनातील सूरह १५:२९ मध्ये म्हटले आहे,

"तर जेव्हा मी त्याला यथायोग्य बनवीन व त्यात आपला आत्मा फुंकीन तेव्हा त्याला सजदा करावा."

यात मानवनिर्मितीबद्दल आलेली ईशकल्पना मांडलेली आहे. त्यात विशद केलेले विवरण मोठे उद्‌बोधक आहे. मानवाचे अस्तित्व केवळ भौतिक नव्हे; ते बौद्धिक व आत्म्याचे मिश्रण होय. मानवाच्या ठिकाणी ज्ञान, बुद्धी, वाक्‌शक्ती असून सर्वांत महत्त्वाचे म्हणजे चांगल्या व वाईटातील तारतम्य जाणण्याच्या गुणांनी परिपूर्ण आहे. मानवाठायी असलेल्या या गुणवैशिष्ट्यांमुळेच तो सर्वोच्च ईशनिर्मिती ठरला आहे. सर्वांत महत्त्वाचे मानवात वैगुण्य आहे की त्याला कोणत्याही उपजत शक्ती नाहीत. त्याला प्रत्येक गोष्ट एकदा का होईना शिकवावी लागतेच. मानवाठायी असलेल्या गुणवैशिष्ट्यांशी त्याचा परिचय होत नाही तोपर्यंत तो आपल्या उच्च स्थानापर्यंत पोहचत नाही.

ईशनिर्मितीत जे ईशकौशल्य आहे आणि त्यामागील उद्देश जर ओळखला गेला नाही तर माणूस आपल्या विकारांच्या आहारी जातो. विकारांवर मात करायची असेल तर मानवाठायी ईशभय, शालीनता आणि सहजशीलता असली पाहिजे. संयमाशी अभिप्रेत आहे की माणसाने सत्यमार्गावर सहनशील राहावे. श्रद्धाळू दु:स्थितीत आजारपण सहन करतात, विपदांना व संकटांना झेलतात आणि आपली श्रद्धा ढळू देत नाहीत. खरे श्रद्धाळू असतात त्यांचे संपूर्ण जीवन हे संयम व सहनशीलतेचे जीवन असते. अनीतीस नीतीने, सदाचार व सद्‌व्यवहाराने दूर केले जाऊ शकते. बिघडलेल्या वातावरणाचे शुद्धीकरण व सुधारणा करण्याचे शस्त्र फक्त सदाचारच होऊ शकते. सदाचाराने जगल्यास 'जन्नत' (स्वर्ग) हे इनाम दिले जाईल, अशी खात्री कुरआनात जागोजागी दिलेली आहे.

माणूस, त्याच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये, त्याचे आचरण, त्याचे हित-अहित, त्याच्यासाठी योग्य-अयोग्य, कल्याण-अकल्याण हाच कुरआनच्या उपदेशाचा, बोधाचा मूळ उद्देश आहे. म्हणजेच कुरआनच्या कथनाचा केंद्रबिंदू हा माणूसच आहे. कुरआन वाचकाला संबोधित करतो.

शिष्टाचारांचे जीवनात महत्त्व

प्रेषित मुहम्मद (स.) यांचे एक प्रसिद्ध वचन आहे, "शिष्टाचारात सभ्यता व सुसंस्कृतता हे श्रद्धावंताचे लक्षण आहे." (बुखारी)

आपल्या दैनंदिन जीवनात आपण कसे वागावे, बोलावे, चालावे या सर्व गोष्टींबाबत कुरआनात अत्यंत विस्ताराने व बारकाईने सूचना आलेल्या आहेत. प्रत्येक ठिकाणी असे म्हटले गेले आहे;

"हा उपदेश कोणी स्वीकारणारा आहे?" (५४:३२)

याचा अर्थ आहे, "तुला आम्ही (अल्लाह) मार्गदर्शन करतो, स्वीकारणे न स्वीकारणे तुझ्या हाती आहे."

"आणि हा काही सदाचार नव्हे की घरामध्ये मागील बाजूने प्रवेश करावा. सदाचार तर हा आहे की माणसाने संयमाने वागावे. घरांमध्ये त्यांच्या दर्शनी दारांमधून प्रवेश करावा." (२:१८९)

घराच्या मागल्या बाजूने प्रवेश करावा हे संशयीपणाचे लक्षण मानले जाते. घरांमध्ये प्रवेश दारातूनच करावा. सदाचार तर हा आहे की माणसाने संयमाने वागावे व संयम ईश्वराच्या मर्यादांचे पालन करून प्राप्त केला जातो. संयम, विवेक म्हणजे 'तक्वा' होय.

"अल्लाह अनाचाराला कदापि पसंत करीत नाही." (२:२०५)

अनाचाराने वागणे म्हणजे ईशभय नाकारून जगात आपली मनमानी करून वर्तन करणे, जे शांतता व न्याय या मूल्यांची पायमल्ली करणे होय.

"ज्या पूर्ण करू शकाल अशाच शपथा घ्या." (२:२२५)

माणूस शपथ घेऊन सांगतो अथवा बोलतो तो शब्द त्याने पाळला पाहिजे. जर शब्द पाळता येत नसेल तर माणसाने तो देऊ नये. अल्लाहचे नाव घेऊन जो शब्द दिला जातो तो पाळलाच पाहिजे, नाहीतर ईश्वराकडून तुमची त्याबाबत निश्चित विचारणा केली जाईल.

"अल्लाहला संयमी लोकच आवडतात." (३:१४६)

"अल्लाहच्या नावे जो खोटे-नाटे बोलतो तो अत्याचारी आहे." (७:३७)

"क्षमाशीलतेने वागणे व बोलणे हे (दुःख देणाऱ्या) दानापेक्षा श्रेष्ठ आहे." (२:२६३)

क्षमाशीलतेने वागणे व बोलणे हे दानापेक्षा श्रेष्ठ आहे. क्षमाशीलता ही सामर्थ्याचे खरे द्योतक आहे.

"अल्लाह अत्याचारी लोकांना पसंत करत नाही." "अल्लाहला अवज्ञा करणारे पसंत नाहीत." (९:२४)(३:१४०)(३:५७)

"ज्याची बांधिलकी अल्लाहशी भक्कम असेल त्याला निश्चित सरळमार्ग मिळेल." (३:१०१)

अल्लाहशी भक्कम बांधिलकी म्हणजे अल्लाहच्या उपदेशापासून न ढळणे होय.

"ऐहिक जीवन तर फसवणुकीच्या सामानाशिवाय दुसरे काही नाही."(३:१८५)

"धन-संपत्ती व संतती कसोटी आहेत." (८:२८)

"अल्लाह गुन्हेगार अवज्ञाकारी लोकांना सन्मार्ग दाखवत नाही." (९:८०)

"आणि त्यांच्या संपत्ती व संततीने तुम्हाला अचंब्यात टाकावे." (९:८५)

"अल्लाहचे भय बाळगा व सच्चा लोकांसह व्हा." (९:११९)

"नि:संशय अपराधी कधीच सफल होणार नाहीत." (१०:१७)

"कुकर्मी कधीच सफल होत नाही." (१२:२३)

"प्रत्येक माणसाचे शकून /भाग्य त्याच्या गळ्यात बांधलेले आहे." (१७:१३)

"जे अहंकारी आहेत त्यांना अल्लाह पसंत करीत नाही." (१६:२३)

"नरक गर्व करणाऱ्यांसाठीच आहे." (१६:२९)

"अल्लाहच्या बाबतीत जे कुभांड रचतात ते कधीही यशस्वी होणार नाहीत." (१०:६९)

"अत्याचारी एकमेकांचे मित्र असतात." (४५:१९)

समान शीलाचे लोक आपोआपच आपले मित्र बनतात.

"ऐहिक जीवन एक तमाशा व मनोरंजन आहे. श्रद्धा व ईशभय बाळगाल व अंगीकाराल तर तो तुम्हाला मोबदला देईल."

"अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो." (४९:०९)

"हे श्रद्धावंतांनो! ती गोष्ट का सांगता जी तुम्ही करीत नाही."

"अल्लाहजवळ ही गोष्ट सक्त अप्रिय आहे की, तुम्ही गोष्ट बोलावी जी करीत नाहीत." (६१:२,३)

"तुमच्या आवडी-निवडीप्रमाणे वैध-निषिद्ध ठरवू नये." (६६:०१)

अल्लाहने ज्या गोष्टी वैध व निषिद्ध ठरवल्या आहेत, त्यात तुम्ही आपल्या इच्छेप्रमाणे व आवडीप्रमाणे हेराफेरी करता उपयोगी नाही.

"ज्यांनी श्रद्धा बाळगली आणि सत्कृत्ये केली आणि एकमेकांना सत्याचा आदेश दिला व सहनशीलतेचा उपदेश दिला. (तेच यशस्वी होतील.)" (१०३:०३)

श्रद्धावंतांनी सत्याचे पालन करून एकमेकांस मदत करावी. सहनशीलतेने वागावे.

"दिखाव्याची कृत्ये करू नयेत. संपत्तीचा हक्क अदा करावा." (१०७:६-७)

दिखावा हे ढोंगीपणाचे व दांभिकपणाचे द्योतक असते, म्हणून तसे न वागावे व संपत्तीचा हक्क अदा करावा. ईश्वराने जी तुम्हाला संपत्ती बहाल केली ती तुम्ही मुक्त हस्ताने व मोकळ्या अंत:करणाने ईशप्रसन्नता मिळविण्याच्या हेतूने खर्च करावी. कृपणता ईश्वरास पसंत नाही.

सत्यता, धैर्यशीलता, न्यायीपणा व गुन्हेगारीची निर्भर्त्सना

"अल्लाह धैर्यवानांबरोबर आहे." (२:२४९)

"अल्लाहला दृढनिश्चयी लोकच आवडतात." (३:१४६)

"अल्लाहच्या नावाने खोटेनाटे बोलतो तो अत्याचारी आहे." (७:३७)

"भुसभुशीत जमिनीवर बांधलेली इमारत टिकत नाही." (९:१०९)

"अल्लाहचे भय बाळगा व सच्चा लोकांसह राहा." (९:११९)

"अल्लाह आदेश देतो न्यायाचा, भलाईचा व नातेवाईकांना देण्याचा आणि निर्लज्जता, दुष्कृत्य व अत्याचारापासून रोखतो. तो तुम्हाला उपदेश देतो, अशासाठी की तुम्ही बोध ग्रहण करावा." (१६:९०)

"अल्लाह सत्याला सत्य करून दाखवतो, मग अपराध्यांना ते नापसंत का वाटेना." (१०:८२)

"सत्यानाश आहे प्रत्येक खोटारड्या गुन्हेगार माणसाकरिता." (४५:०७)

"अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो." (४९:९)

"अल्लाहच्या जवळ ही गोष्ट सक्त अप्रिय आहे की तुम्ही ती गोष्ट बोलावी जी करीत नाहीत." (६१:०३)

"असत्याचे साक्षी बनू नका, वाह्यात गोष्टींकडे पाहू नका." (२५:७२)

"अल्लाह उत्पात माजवणाऱ्यांना पसंत करीत नाही." (२७:७७)

"अल्लाह गर्व करणाऱ्यांना पसंत करत नाही." (२८:७६)

“आपल्या सर्व जवळच्यांच्या विरोधात सत्य जरी जात असले तरी सत्याची कास सोडू नका. विकारांच्या अनुसरणात न्यायाची उपेक्षा करू नका.” (४:१३५)

“सर्वनाश आहे प्रत्येक खोटारड्या गुन्हेगार माणसाकरिता.” (४५:०७)

“अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो.” (४९:०९)

“अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो.” (६०:०८)

“अत्याचारींना मार्गदर्शन करीत नसतो आणि याहून मोठा अत्याचारी कोण असेल जो अल्लाहवर खोटे कुभांड रचेल.” (६१:०७)

“तो अत्याचारींना चांगल्याप्रकारे जाणतो.” (६२:०७)

“धन-संपत्तीच्या लालसेने माणसाला गफलतीत टाकले जाते, त्याचे अध:पतन होते.” (१०२:०१)

“नि:संशय अपराधी कधीच सफल होणार नाहीत.” (१०:१७)

“ज्या पूर्ण करू शकाल अशाच शपथा घ्या.” (२:२२५, सारांश)

वरील आयतींमध्ये म्हटले आहे की माणसाने धैर्याने वागावे व आपल्या वर्तणुकीत दृढता असली पाहिजे, मनाची अस्थिरता नको. माणसाने आपला स्वार्थ साधण्यासाठी खोटेनाटेपणाने वागू नये, अल्लाहच्या नावाने खोट्या शपथा घेऊ नका. जी माणसे भ्याड असतात व मनाने कमकुवत असतात ती खोट्या-नाट्या शपथांचा आश्रय घेतात. सत्यतेने वागणाऱ्यांच्या संगतीत राहाण्याने सत्याबद्दलची वृत्ती दृढ होते. न्यायी वृत्तीमुळे माणूस चुकीच्या मार्गाने जाण्यास धजत नाही. अत्याचार व दुष्कृत्यांपासून तो आपोआपच विभक्त होतो. या आयतींत अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो, कोणत्याही परिस्थितीत सत्याची, न्यायाची कास सोडू नये व खोट्या आणि गुन्हेगार माणसाचा शेवट अत्यंत करुणास्पद होतो. माणसाने आपला दिलेला शब्द पाळावा, दिलेला शब्द मोडू नये. तसे केल्यास तुमची विश्वासार्हता नष्ट होते. तात्पुरत्या फायद्यासाठी केव्हाही असत्याची बाजू घेऊ नका. असत्याने वागणारा माणूस अन्यायाच्या आहारी जातो व अत्याचारी बनतो. अत्याचारी माणसाचे नैतिक अध:पतन अटळ असते. असा माणूस ईश्वरी नजरेतून खाली गेलेला असतो. त्याला एक ना एक दिवस सत्यासमोर जावे लागते व सत्यासमोर असत्य कदापि टिकत नाही. म्हणून या आयतींमध्ये वारंवार सांगितले गेले आहे की खोटे वागणारा, गुन्हेगारी वृत्तीचा, उत्पात माजविणाऱ्यास अल्लाह कधीच पसंत करीत नाही.

अत्याचार, अनाचार, असत्यता, यापासून अलिप्त राहाणाराच न्यायी, संयमी व धैर्यशाली बनतो. हे ईशमार्गदर्शन मानवास सत्याने वागण्यास धैर्यशाली बनवते.

खान-पान आणि आहार

कुरआनात जागोजागी माणसासाठी खाण्या-पिण्याबद्दल मार्गदर्शन आलेले आहे. काय खाणे व पिणे योग्य आहे आणि अयोग्य आहे? काय वैध आहे व अवैध आहे? काय शुद्ध व अशुद्ध आहे? याबद्दल स्पष्ट निर्देश आलेले आहेत. कुरआनातील आलेल्या सूचना, उपदेश आणि बोध हे सर्वसामान्य माणसास समजेल व उमजेल अशा रीतीने विहित केले गेले आहेत. प्रत्येक मार्गदर्शन हे मानवास केंद्रस्थानी मानून केले गेलेले आहे. विशेष म्हणजे प्रत्येक वेळी ईशवचन आहे,

"हा तर अखिल मानवजातीसाठी दिलेला उपदेश आहे, आहे का कोणी तो उपदेश घेणारा?"

मानवी जीवनाचे हे वैशिष्ट्य आहे की मानवाला प्रत्येक गोष्ट एकदा का होईना पण शिकवावी लागते. मानवाला अफाट बुद्धी दिली आहे, पण त्याला उपजत अशी बुद्धी फार कमी आहे. पशु-पक्ष्यांना बुद्धी ही मर्यादित दिली आहे. पण उपजतच त्याला काय खावे व काय खाऊ नये, काय प्यावे व काय पिऊ नये हे निसर्गतःच समजते आणि त्यामुळे पशु नको अशा गोष्टींकडे बघतदेखील नाही.

कुरआनात सूरह दोन मधील १६८ व १७२ आयतीत म्हटले आहे,

"जीवनात ज्या वस्तू शास्त्रसंगत (हलाल) व शुद्ध आहेत त्या खा."

"आणि सैतानाच्या पावलावर पाऊल टाकू नका. खरोखरच तो तुमचा उघड शत्रू आहे."

कुरआनात ज्या वस्तूंना 'तय्यिब' म्हणजे शुद्ध, चांगले, विहित; 'हलाल' (शास्त्रसंमत व विहित) आणि 'जाइज' (योग्य, उचित) ठरविले आहे. त्या निश्चितच स्वच्छ, शुद्ध व चांगल्या आहेत. खान-पानाचा मानवाच्या नीतीमत्तेवर निश्चितच परिणाम होत असतो.

"श्रद्धा बाळगलेल्या लोकांनो! ज्या शुद्ध वस्तू (असतील) आम्ही तुम्हाला प्रदान केल्या आहेत, त्या खा आणि अल्लाहचे आभार माना जर तुम्ही त्याची गुलामी मानत असाल." (२:१७२) माणसाने हा उपदेश श्रद्धेने स्वीकारला पाहिजे.

"त्याने तुमच्यासाठी फक्त मेलेले (जनावराचे) मांस, रक्त, डुकराचे मांस आणि ते ज्याच्यावर अल्लाहशिवाय दुसऱ्याचे नाव घेतलेले असेल 'निषिद्ध' ठरविले आहे." (२:१७३)

या बाबतीत आपद् धर्मही सांगितले आहे. पुढे म्हटले आहे, "परंतु नाइलाजास्तव, जर त्याची इच्छा नसेल आणि जो मर्यादेचे उल्लंघन करणारा नसेल

(त्याने जर जीव वाचवण्यासाठी पैकी थोडेसे खाल्ले) तर त्याचा कसलाही गुन्हा नाही. नि:संशय अल्लाह क्षमा करणारा व कृपा करणारा आहे.'' (२:१७३)

यात शरीरसंरक्षण व शरीरसंवर्धन ही महत्त्वाची बाब सांगण्यात आलेली आहे.

''ते तुम्हाला दारू व जुगाराबद्दल विचारीत आहेत. सांगा, दोन मोठ्या गुन्ह्यांच्या गोष्टी आहेत आणि लोकांच्यासाठी काही फायदा पण आहे. परंतु त्यांचा गुन्हा त्यांच्या फायद्यापेक्षा अधिक मोठा आहे.'' (२:२१९)

वरील आयतींमध्ये खाण्याबद्दल जे सांगितले आहे, रक्त, डुकराचे मांस, मुर्दाड जनावराचे मांस ह्या आज विज्ञानाने कसे घातक आहे ते सांगितले आणि सिद्ध केले आहे. कारण (पशुचे) रक्त हे मानवी शरीरास घातक आहे. डुकराच्या मांसास निषिद्ध ठरवले आहे, कारण त्याच्या शरीरातील युरिक ॲसिड हे ९८ टक्के त्याच्या शरीरारतच राहाते. मुत्राद्वारे इतर पशुत ९८ टक्के ते शरीराबाहेर टाकले जाते. युरिक ॲसिड उत्सर्जित न होण्यामुळे डुकराचे मांस भक्षण करणाऱ्यास संधिवात होतो. खुद्द डुकरेदेखील संधिवातानेच मरतात. म्हणून डुकराचे मांस निषिद्ध ठरवले आहे.

आता चौथा मुद्दा दारू व जुगार याबद्दल शास्त्रीय सत्य दारू बौद्धिक, वैचारिक, आर्थिक व शारीरिकदृष्ट्या मज्जासंस्थेस घातक आहे. मानवी गात्रे व अवयव आणि मेंदूचे संतुलन नष्ट करते आणि नैतिकदृष्ट्या माणसास अध:पतीत करते. हे सर्व दृष्टिकोनातून आपणास ज्ञात झालेले आहे. या गोष्टी मानवी जीवनास घातक आहेत म्हणून निषिद्ध आहेत.

अर्थशास्त्र जुगाराबद्दल स्पष्ट म्हणते की, जुगारामुळे अर्थोत्पादन कधीच वाढत नाही. फक्त पैसा जागा बदलतो. पैचीही त्यात उत्पादनक्षमता नाही. दुसरे म्हणजे जुगारात हरणारा गेलेले पैसे परत मिळावेत म्हणून खेळत राहतो, तर जिंकणारा जिंकतो म्हणून खेळत राहतो. जुगाराचे हे दुष्ट-चक्र मानवी जीवन उद्ध्वस्त करते.

''हे प्रेषित! तुम्ही का त्या वस्तुला निषिद्ध ठरविता ज्या अल्लाहने तुमच्याकरिता विहित केली आहे. (काय अशासाठी की) तुम्ही आपल्या पत्नीची मर्जी सांभाळू इच्छिता? अल्लाह माफ करणारा, दया करणारा आहे.'' (६६:०१)

यात प्रेषित मुहम्मद (स.) यांनी मध खाणे सोडले, त्याविषयी ही आयत अवतरली होती. ''मध हे प्रेषितांनी स्वत:हून अवैध ठरविले आणि खाणे सोडले.'' याविषयी भाष्यकारांमध्ये अनेक प्रकारे मतभेद आहेत. आपण फक्त येवढे लक्षात घेणे योग्य आहे की, माणसाने स्वत: अल्लाहने वैध ठरविलेल्या गोष्टी अवैध ठरवणे योग्य नाही.

''तिच्या पोटातून विविध रंगांचे एक पेय बाहेर पडते, ज्यात लोकांना आरोग्य आहे.'' (१६:६९)

मध मानवी आरोग्यास अत्यंत उपयुक्त व उपकारक आहे. यावर हल्ली खूप संशोधन झाले आहे. मध हे विविध रंगांचे असते. त्यात अनेक वैद्यकीय गुणधर्म आहेत. तसेच त्यात सुरक्षित ठेवणारा घटक आहे. मधात बॅक्टेरिया वाढीस लागत नाहीत. तसेच मधात जीवनसत्त्वे व खनिज पदार्थ आहेत. मध चांगले टॉनिक आहे. त्यापासून विविध लाभ मानवास प्राप्त होतात.

"हे प्रेषित! स्वच्छ, शुद्ध वस्तु खा आणि सत्कर्म करा." (२३:५१)

ज्या वस्तू शुद्ध व स्वच्छ ठरविलेल्या आहेत त्या खा. दुसरा अर्थ असा आहे की, ईश्वर स्वच्छ व शुद्ध वस्तूंनाच कबुल करतो. पुढे सत्कर्म करा म्हटले आहे. याचाच अर्थ, स्वच्छ व शुद्ध वस्तूंचे सेवन व सत्कर्म यांचा खोलवर संबंध आहे. चांगली उपजीविका चांगल्या आचरणास पोषक ठरते. खान-पानाविषयी अनेक हदीस आल्या आहेत. ज्यांत कुरआनातील कथनांवर उत्कृष्ट भाष्य आलेले आहे.

स्वकर्म

"प्रत्येकाला त्याच्या कर्माचा पुरेपूर मोबदला दिला जाईल." (१२:१११)

"जर तुम्ही सतकृत्ये केली तर तुमच्यासाठीच व दुष्कृत्ये केली तर स्वत:साठीच." (१७:०७)

"मार्गदर्शनाचा मार्ग स्वीकारला तर तो स्वत:साठीच अंगीकारला आणि मार्गभ्रष्टता स्वीकारली तर त्याची आपत्ती त्याच्यावरच येईल." "ज्याचे त्याचे ओझे त्यालाच उचलावे लागणार आहे." (१७:१५)

"कोणीही ओझे उचलणारा अन्य एखाद्याचे ओझे उचलणार नाही."

(३५:१८) (५३:३८)

"जो कोणी सत्कर्म करील ते त्याच्यासाठीच व दुष्कर्म करील त्याचे संकट त्याच्यासाठीच." (४५:१५)

"प्रत्येक माणसावर स्वत:च्या कमाईची जबाबदारी त्याच्यावरच आहे आणि कोणीही ओझे उचलणारा दुसऱ्याचे ओझे उचलणार नाही." (६:१६४)

प्रत्येकाला कयामतच्या दिवशी हजर केले जाईल. त्या दिवशी त्याच्या न्यायदानाचा दिवस असेल.

"प्रत्येक मनुष्यास त्याच्या कमाईचा मोबदला मिळेल. अल्लाह हिशेब घेण्यात अतिशीघ्र आहे." (१४:५१)

"आणि कयामतच्या दिवशी आम्ही न्यायाचे तराजू प्रस्थापित करू, मग कोणत्याही माणसावर किंचितही अन्याय होणार नाही. जर एखाद्याचे एखादे कर्म मात्र मोहरीच्या दाण्याइतके असेल तर आम्ही ते आणून हजर करू आणि आम्ही हिशेब घेण्यास पुरेसे आहोत." (२१:४७)

"आणि असे हमखास घडेल की, ते आपला भार उचलतील व आपल्या ओझ्यासोबत काही इतर ओझीदेखील." (२९:१३)

कुरआन स्पष्टपणे विशद करतो की, प्रत्येकजण आपल्या कर्मास स्वतःच जबाबदार असतो. सत्कर्म करेल त्याचा त्याला मोबदला मिळेल, दुष्कर्म करणाऱ्यास त्याबद्दल शासन भोगावेच लागेल. अल्लाह त्याच्या न्यायनिवाड्याच्या दिवशी प्रत्येकासमोर त्याच्या कर्माचा हिशेब मांडेल. त्याप्रमाणे त्याला बक्षीस किंवा शिक्षा दिली जाईल. त्या बाबतीत तो अत्यंत कठोर आहे किंवा न्यायनिष्ठूर आहे. कोणाला त्याच्यासमोर तोंड उघडू दिले जाणार नाही.

सत्कर्म व दुष्कर्म यांचा लेखाजोखा प्रत्येकाला दाखवला जाईल. जर तुम्ही दुष्कर्म करण्यास इतर कोणास प्रवृत्त कराल तर त्याचे पाप तुमच्या माथी येईल. म्हणून म्हटले गेले आहे, "जैसी करणी वैसी भरणी."

"जो मनुष्य वाईटपणा कमवितो (तो स्वतः) त्याची आपत्ती त्याच्यावरच राहील." (४:११२, सारांश)

"जो सत्कर्म करेल ते त्याच्यासाठीच करील व दुष्कर्म करेल तर त्याचा दुष्परिणामही त्याच्यावरच कोसळेल." (४१:४६)

"तुम्हाला असाच मोबदला दिला जात आहे जसे तुम्ही आचरण कराल. (करीत राहता.)" (६६:०७)

वरील सर्व आयतीत एकच गोष्ट सातत्याने कुरआनात मांडण्यात आली आहे व ती बिंबवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे की माणूस आपल्या स्वकर्माने इष्ट किंवा अनिष्ट प्रसंग आपल्यावर ओढवून घेतो. गहाण ठेवलेली वस्तु परत घेताना मोबदला द्यावा लागतो, तद्वतच कर्माबद्दल इनाम अथवा दंड भरावा लागतो.

आपल्या सत्कर्माचा व दुष्कर्माचा हिशेब तुम्हाला द्यावाच लागतो. त्यामुळे फायदा अथवा नुकसान हे स्वकर्मानुसार आपल्याला 'आखिरत'मध्ये प्राप्त होईल असे वारंवार सांगण्यात आलेले आहे. बक्षीस अथवा दंड हे माणूस स्वकर्मानुसार अर्जित करत असतो. त्याचा इतर कोणीही जबाबदार नसतो. ईश्वर फक्त वारंवार तुम्हाला इशारे देऊन 'सावध हो' हे बजावीत असतो.

व्यावहारिक जीवनात कसे वागावे

''चांगले बोलणे व क्षमाशीलतेने वागणे.'' (२:२६३, सारांश)

'तकवा' हा एक व्यापक शब्द आहे. मनाला रिझवणाऱ्या गोष्टींच्या बाबतीत योग्य व समतोल पद्धत अंगीकारणे व आखिरतच्या अनुग्रहाला जीवनाचे उद्दिष्ट बनविणे म्हणजे 'तकवा'.

''प्रेषित ईश्वर नाहीत. फरिश्ते व प्रेषित ईश्वर नाहीत.'' (३:७९,८०, सारांश)

''धर्माची कदर करून वागा. ज्याने तुमच्यामध्ये कमाल दर्जाचे ऐक्य निर्माण होते; खऱ्या अर्थाने बंधुभाव, संपूर्ण एकोपा व भावनात्मक ऐक्य निर्माण होते.''

(३:१०३, सारांश)

''सत्कृत्य करण्यास प्रोत्साहन व प्रबोधन याची गरज आहे.''

(३:११४, सारांश)

संयम व सहनशीलता हा परमोच्च सद्गुण आहे. संयमाने वागणारा संयमी बनतो.

''दृढ निश्चयाने वागण्यास महत्त्व व तोच खरा श्रद्धेचा पाया आहे.''

(३:१४६, सारांश)

दृढ निश्चयाने तुम्ही खरे निष्ठावान बनता. निष्ठावंत बनण्यासाठी दृढनिश्चयता पाहिजे.

''आप्तसंबंध तोडणारा माणूस स्वर्गात प्रवेश करणार नाही.''(मिश्कात, बुखारी)

आप्तसंबंध राखणाराच खऱ्या अर्थाने ईशकृपा प्राप्त करू शकतो व स्वर्गसुखाच्या प्राप्तीस लायक बनतो.

''विवाहबंधनाला दृढ प्रतिज्ञा म्हणून संबोधले गेले आहे.'' (४:२१, सारांश)

विवाहबंधन पती-पत्नीस दृढ साथीदार बनविते.

''भेटल्यावर एकमेकांचे शुभचिंतन करणे व निदान उत्तरादाखल शुभचिंतन करणे ही सुसंस्कृतपणाची पद्धत आहे.'' (४:८६)

''प्रवासात नमाज छोटी करण्यास हरकत नाही.'' (४:१०१, सारांश)

प्रार्थना ही आत्मिक समाधानासाठी असते, दिखाऊपणासाठी नाही.

''आणि ज्या माणसाने एखादा गुन्हा किंवा अपराध करून त्याचा आरोप दुसऱ्यावर (निरपराधाच्या माथ्यावर) टाकला त्याने मोठ्या आळाचा व उघड अशा गुन्ह्याचा भार आपल्या शीरावर घेतला.'' (४:११२)

अपराध करून तो दुसऱ्यावर लोटणे हे मोठे पाप आहे.

"विकारांच्या अनुसरणात न्यायाची उपेक्षा करू नका." (४:१३५)

न्याय नाकारणे म्हणजे विकारांच्या आहारी जाणे होय.

"अल्लाहला पसंत नाही की तुम्ही एखाद्याची निंदा, कुचेष्टा करण्यासाठी तोंड उघडावे." (४:१४८)

निंदा व कुचेष्टा ही अत्यंत नीच प्रवृत्ती आहे. ईश्वरास ती पसंत नाही हे लक्षात ठेवावे.

"नमाज व जकात या आधारभूत गोष्टींना वाया घालविले तेथे धर्म बाकी राहात नाही." (४:१६२, सारांश)

नमाज व जकात टाळणे म्हणजे धर्माची मूलभूत तत्त्वे नाकारणे होय.

"न्यायाचे साक्षी बना." (५:०८, सारांश)

सामाजिक स्थैर्याचा पाया न्याय आहे व त्यापासून विचलित करू नका.

"ज्याने एखाद्या निष्पाप माणसाची हत्या केली त्याने अखिल मानवजातीची हत्या केली व ज्याने एका निष्पापाला वाचविले, त्याने अखिल मानवजातीला वाचविले." (५:३२, सारांश) ही आयत मानवी जीवनाचा निकोप व सदृढ पाया आहे.

"चोर पुरुष अथवा स्त्री अशा दोघांचे हात कापा." (५:६४)

रोग नष्ट करण्यासाठी कठोर उपाययोजना करावी लागेल.

"अल्लाह उपद्रवींना पसंत करत नाही." (५:६४)

उपद्रवी वृत्ती ही विकृती आहे. विकृती व संस्कृती परस्परविरोधी आहेत.

"दारू, जुगार, मूर्तीस्थान व शकुन बाण ही सर्व गलिच्छ व सैतानी कामे आहेत. त्यापासून अलिप्त राहा." (५:९०)

वरील सर्व गोष्टी सैतानी दुष्कृत्ये आहेत. त्याच्या जवळपासही जाऊ नका.

"अल्लाह सत्चारित्र्य असणाऱ्यांना पसंत करतो." (५:९३)

"निर्लज्जतेच्या गोष्टीजवळ जाऊ नका. संततीची दारिद्र्यामुळे हत्या करू नका." (६:१५१)

निर्लज्जता अध:पतनाकडे नेणारी पहिली पायरी आहे. संतती ही ईशदेणगी आहे ती अव्हेरू नका.

"अनाथांच्या संपत्तीजवळ जाऊ नका, जेव्हा बोलाल तेव्हा न्याय्य बोला. माप-तोल न्यायासह पुरेपूर भरा." (६:१५२, सारांश)

"तुमच्यापूर्वी अनेक जनसमूहांना आम्ही नष्ट केले." (१०:१३)

कोणताही जनसमूह कायम राहात नाही. ठराविक कालावधीनंतर तो नष्ट होतोच.

"वस्तुत: अल्लाह लोकांवर जुलूम करीत नाही, उलट लोक स्वत:वरच जुलूम करतात." (१०:४४)

लोक आपल्या कर्माची फळे भोगत असतात. त्यात ईश्वराचा कोणताही दोष नसतो.

"अल्लाहशिवाय इतर कोणास साद घालू नका." (१०:१०६)

"सर्व दु:ख-यातना दूर होताच घमेंड सुरू करतो व शेखी मिरवू लागतो." (११:१०, सारांश)

प्रतिकूल परिस्थिती बदलताच माणूस घमेंडीने वागू लागतो. आपल्या कतृत्वाबद्दल तो आत्मप्रौढी मिरवू लागतो.

"नि:संशय सत्कृत्ये दुष्कृत्यांना दूर सारतात." (११:११४)

"वाईट गोष्टीस चांगल्या गोष्टीनें दूर सारावे." (१३:२२)

"खाणे पिणे रास्त व निषिद्ध असते ते पाहा." (१६:११६, सारांश)

"व्यभिचाराजवळ जाऊ नका." (१७:३२)

व्यभिचार मानवी समाजास व मानवास सर्वनाशाकडे नेतो.

"आणि जमिनीवर ऐटीने चालू नका. ना तर तुम्ही जमिनीला फाडू शकता आणि ना पर्वतांच्या उंचीपर्यंत पोहचू शकता." (१७:३७)

निसर्गाच्या महान रूपासमोर मानव हा किड्या-मुंगीप्रमाणे क्षुल्लक आहे हे त्याने विसरू नये.

"मुक्तीचे साधन केवळ सदाचार व श्रद्धाच आहे." (२३:१०१)

परलोकाची यशस्वीता सदाचार व श्रद्धेवरच अवलंबून आहे.

"घरमालकांची परवानगी घेतल्याशिवाय कोणाच्याही घरात प्रवेश करू नका." (२४:२७)

सर्वसामान्य शिष्टाचार विसरू नयेत.

"श्रद्धावंतांनो आपल्या नजरांची जपणूक करा. आपल्या लज्जास्थानांचे रक्षण करा." (२४:३१)

नजरेचे पाप पुढील निर्लज्जतेकडे घेऊन जातात म्हणून सावध राहा.

"अकारण शपथा घेणारांचे चारित्र्य विश्वसनीय नसते." (२४:५३, सारांश)

खोट्या शपथा खाणारा दांभिक असतो, तो विश्वासघातकी असतो.

"त्यांच्याशी वाद घालतात तेव्हा ते त्यांना म्हणतात, तुम्हावर सलाम असो."
(२५:६३, सारांश)

अडाणी, वितंडवादींपासून दूर राहणे शहाणपणाचे आहे.

"उधळपट्टी करू नका किंवा कंजुषपणाही करू नका. सुवर्णमध्य राखा."
(२५:६७)

कोणत्याही अतिरेकापासून दूर राहा.

"शेवटी आम्ही त्याला त्याच्या घरासह जमिनीत धसविले." (२८:८१)

कारूनच्या नाशाविषयी बोध देणारी गोष्ट सांगितली आहे.

'सूरह लुकमान' अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यात दैनंदिन वर्तनाचे मार्गदर्शन आले आहे.

"नमाज कायम कर, भलेपणाचा आदेश दे, दुष्कर्मापासून दूर राहा, सहनशीलतेने व धैर्याने संकटांना तोंड दे." (३१:१७)

"लोकांची उपेक्षा करू नकोस, जमिनीवर अकडून चालू नकोस. अल्लाह कोणत्याही अहंकार करणाऱ्यास पसंत करत नाही." (३१:१८)

"आपल्या चालण्यात समतोल अंगीकार, बोलताना स्वर थोडा खालचा. सर्वांत वाईट स्वर गाढवाचा आहे." (३१:१९)

"आणि जो मनुष्य स्वत:ला अल्लाहच्या स्वाधीन करतो तो सदाचारी असेल तर त्याने निश्चितच मजबूत आधार धरला." (३१:२२)

"कयामतच्या दिवशी ना पिता आपल्या मुलांना उपयोगी पडेल ना येणारी संतती आपल्या पित्यास उपयोगी पडेल." (८०:३४-३७, ३१:३३)

या सूरहमध्ये सामान्य माणसास दैनंदिन जीवनाविषयी अमोल मार्गदर्शन आले आहे. हा माणसाने वारंवार वाचावा व आत्मसात करावा.

"तुमच्याकरिता अल्लाहच्या प्रेषिताठायी उत्कृष्ट नमुना आहे. यशाचा मार्ग अग्निदिव्यातून जात असतो."
(३३:२१)

प्रेषित हे जीते जागते मार्गदर्शक होत.

स्त्रियांसाठी चादरीचा आदेश 'सूरह नूर,' आयत क्र.५९ मध्ये आलेला आहे. चादर पांघरणे हे समाजात आपली प्रतिष्ठा जपणारे व शीलाचे रक्षण करणारे माध्यम आहे, हे स्त्रीने लक्षात ठेवावे.

ईशनिष्ठा आणि सदाचार या परस्परपूरक गोष्टी आहेत. विवेकबुद्धी व मानसिक सावधानता असल्याशिवाय बोध प्राप्त होऊ शकत नाही.

"सर्वाधिक चांगल्या गोष्टीने वाईट गोष्टीस दूर करा." (४१:३४)

"आपसात टोमणे मारू नका आणि एकमेकांना टोपण नावाने हाका मारू नका." (४९:११)

जसे चकण्या, लंगड्या वगैरे.

"दुराग्रहापासून दूर राहा, कारण काही तर्क दुराग्रह व अपराध असतात."

दुराग्रहाने माणूस सत्याप्रत पोहचू शकत नाही.

"पाळतीवर राहू नका आणि ना तुमच्यापैकी कोणी एखाद्याची निंदा करावी, काय तुमच्यापैकी एखादा मनुष्य ही गोष्ट पसंत करतो की आपल्या मृत भावाचे मांस खावे?" (४९:१२)

परनिंदा करणे व त्यास बढावा देणे या अत्यंत घृणास्पद बाबी मानल्या आहेत म्हणून आपल्या मृत भावाचे मांस खाण्यासारखे म्हटले आहे.

"दांभिकांपासून सावध राहा." (९:५४)

दांभिकाची लक्षणे याच आयतीत दिली आहेत.

"तुमची संपत्ती व संतती कसोटी आहेत." (६४:१५)

बोध असा दिला आहे की, संपत्ती व संततीने माजू नका, उतु मातु नका, त्याचा सदुपयोग करा, ती तुमची कसोटी आहे.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या बैठकीत बसताना प्रत्येकाने कशाप्रकारे बसावे याचे दिग्दर्शन आलेले आहे. ज्यात स्पष्टपणे सांगण्यात आले आहे की, ज्याचे काम संपले असेल त्याने वायफळ गप्पा मारीत बसू नये. आपले काम संपताच निघून जावे, म्हणजे नव्याने आलेल्यांना जागा मिळते. बसणारांनी ऐसपैस बसू नये. सर्वांना व्यवस्थित बसता यावे म्हणून नीट बसावे. गर्दी झाल्यास अंग चोरून बसावे. तसेच प्रेषितांची विश्रांतीची वेळ असेल तेव्हा अकारण रेंगाळू नये, त्यांच्या विश्रांतीची वेळ लक्षात घेऊन त्यांना भेटण्यास जावे. कोणाकडेही मेजवानीस गेल्यास जेवणानंतर अल्प वेळातच तेथून बाहेर पडावे.

सर्वसाधारणत: ही जागृतता व पथ्ये जेव्हा महत्त्वाच्या व जबाबदारीच्या व्यक्तींना भेटण्यास जाणाऱ्याने पाळावी.

अल्लाहची गुणवैशिष्ट्ये कुरआनात विविध आयतींत आली आहेत. तो दयाळू व कृपाळू आहे, क्षमा करणारा व तो जितका मेहेरबान आहे तितकाच गुन्हा करणाऱ्यांना कडक शासन देणारा आहे. प्रामाणिकपणे पश्चात्ताप व्यक्त करणाऱ्यांना क्षमादानही करणारा

आहे. या गोष्टी लक्षात घेऊन वागणारा आपली वर्तणूक सुधारतो. कारण शेवटी हे विसरता उपयोगी नाही की आपले कर्म आपल्याच बरोबर राहणार आहे. ज्याचा मोबदला ज्याला त्यालाच मिळणार आहे.

''मानव हा उतावळा आहे तसेच कृतघ्नही आहे.'' ही मानवाच्या ठायी असलेली वृत्ती आहे. प्रवृत्ती आहे, ही त्याची प्रकृती आहे. उताविळपणा व कृतघ्नता या दोषांवर माणूस त्याच वेळी मात करू शकतो ज्या वेळी तो कुरआनात ठायी ठायी देण्यात आलेला उपदेश व बोध यांचे चिंतन व मनन करतो. मानव हा ईशोपदेश व त्याने दिलेल्या चेतावणीस विसरून वागला, त्याकडे दुर्लक्ष केले, सैतानाच्या मोहजाळ्यात सापडला व जन्नतमधून अध:पतीत झाला. अवज्ञेचे फळ त्याला भोगावे लागत आहे. माणसातील हाव व लोभ आणि इतर षड्रिपुंच्यावर मात करू शकला किंवा कमीतकमी त्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न केला तर तो सुख-समाधान काहीअंशी का होईना प्राप्त करू शकतो.

कुरआनचे मार्गदर्शन हे उच्चतम व मानवस्वभावाशी सुसंगत आहे. प्रेषितांचा वृत्तान्त हा माणसास इतिहासाची स्मृती करून देतो व आपल्याला जीवनात येणारे संभाव्य धोके यांची जाणीव करून देतो.

स्त्री-पुरुषांनी वैयक्तिक, सांसारिक व सामाजिक जीवनात कसे वागावे, कोणत्या गोष्टी कराव्यात व कोणत्या करू नयेत, कोणाच्या घरी जाताना कसे वागावे, उठावे, बसावे, घरात प्रवेश कसा करावा, भेटण्यास जाणाऱ्याचे शुभचिंतन कसे करावे व परतताना कसा निरोप घ्यावा, स्त्रियांशी कसे वागावे, समाजात वावरताना काही गोष्टी सक्तीने टाळाव्यात. उदा. परस्त्रीचे तोंड न्याहाळू नये, स्त्रीच्या कमनीय अवयवांचे अवलोकन करू नये. स्त्रीनेही आपल्या देहाचे प्रदर्शन करू नये, टिंगलटवाळी, चहाडी, चुगलखोरी, लावालाव्या, भांडणे लावून देणे हे उद्योग स्त्री व पुरुषांनी टाळावेत.

संयमशीलतेला फार महत्त्व आहे. संयमाबद्दल कुरआनात जवळपास ७० आयती आल्या आहेत. संयम हा शुद्धाचरणाचा पाया आहे.

कुरआनात विविध ठिकाणी दिलेला आदेश हा माणसाचा स्वभाव, त्याचे मानसशास्त्र, मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांचा उहापोह केलेला आढळतो. मानवाने आपले दोष, दुजाभाव लादू नये, तो भ्याडपणा आहे. निष्क्रियता व शुद्धता, रास्तपणा जाणूनच आपले वर्तन करावे.

'सूरह लुकमान'मध्ये सर्व शिष्टाचार विषद केलेले आहेत. दुष्कर्मापासून दूर राहा, सहनशीलतेने संकटांना सामोरे जा, बोलण्यात स्वर कसा ठेवावा, बोलण्यात रोह-आरोह

कसे ठेवावे, वर्तनात समतोल ठेवावा. कोणाचीही उपेक्षा करू नये, वागण्यात आढ्यता राखू नये, हे समाजात वावरताना सुसंस्कृतता पाळली पाहिजे. "अच्छे अखलाख भी ईमान का हिस्सा है। चारित्र्य संपन्नता हा श्रद्धेचा एक भाग आहे." (बुखारी)

आपले मित्र, शेजारी, नातेवाईक, यांच्याशी कसे वागावे याचे मार्गदर्शन केलेले आहे.

आपल्या मित्रांना, हितचिंतकांना, नातलगांना व स्वकियांना भेटता तेव्हा त्यांचे शुभचिंतन करणे हा अतिशय चांगला शिष्टाचार मानला जातो.

माणसांनी रागाच्या आहारी जाऊ नये. रागामुळे आपले मानसिक संतुलन बिघडते व आपल्याकडून चुका घडतात. कित्येकदा अत्यंत चुकीचे निर्णय घेतले जातात. माणूस विकारांच्या आहारी जाऊन अत्यंत चुकीचे वर्तन करू लागतो व कित्येकदा सर्वनाशदेखील ओढवून घेतो. कोणाची कुचेष्टा, टिंगल-टवाळी करू नका, ते जिभेने केलेले महापाप असते. समाजात पावलोपावली तुम्हाला दांभिक भेटतात, त्यांच्यापासून सावध राहिले पाहिजे. त्यांच्या मुखात एक असते तर पोटात दुसरेच असते, असे लोक बिनदिक्कत आपली असत्यता वारंवार शपथा घेऊन लपवित असतात. अकारण वारंवार शपथा घेणारा माणूस दगाबाज असतो. अशापासून सावध राहणे हितावह असते.

आपल्या झालेल्या चुका दुसऱ्याच्या माथ्यावर टाकणे म्हणजे तुम्ही आपली कातडी वाचविण्यासाठी दुसऱ्या एखाद्या निष्पापाचा बळी घेता. त्यादृष्टीने ५:३२ ही आयत अत्यंत उत्तम उदाहरण आहे. अज्ञानी माणसाच्या नादी लागू नका, त्यापेक्षा त्याला सलाम करून बाजूस सरका ते उत्तम. दुष्कृत्य ही सत्कृत्याने दूर सारणे हे खरे समंजसपणाचे लक्षण आहे. संपत्ती व संतती ही तुमच्यासाठी परीक्षा आहे. त्यामुळे त्यांच्यावर सुसंस्कार करणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

सदाचाराने माणूस उन्नतीप्रत जातो व त्याच्या श्रद्धात्मक जीवनाने त्याला मन:शांती व समाधान प्राप्त होते. त्याच्या श्रद्धेने तो मुक्तीप्रत जातो व जीवनाचे तेच खरे सार्थक आहे.

सदाचार - चांगले आचरण -

"खरा सदाचार हा नव्हे की तुम्ही आपले तोंड पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे करावे, सदाचार तर त्या लोकांचा आहे जे अल्लाह, शेवटचा दिवस, फरिश्ते, ईशग्रंथ आणि प्रेषित यांच्यावर श्रद्धा ठेवतात आणि आपली संपत्ती अल्लाहच्या प्रेमापोटी, नातलगांवर, अनाथांवर, दीनदुबळ्यांवर, वाटसरूंवर आणि हात पसरविणाऱ्यांवर, त्याचप्रमाणे मान सोडविणाऱ्यांवर (गुलामगिरीतून मुक्त करणाऱ्यांसाठी) खर्च करतात, नमाज कायम

करतात, जकात देतात, वचन दिल्यास ते पाळतात आणि टंचाईत व युद्धाच्या वेळी धैर्याने वागतात. हेच ते लोक होत, जे वस्तुतः अल्लाहचे भय बाळगणारे आहेत.'' (२:१७७)

म्हणजे दिखाऊपणाच्या प्रवृत्तीस अल्लाहजवळ काही महत्त्व नाही. अल्लाहच्या हुकुमावर, शरियतवर जर चालत नसाल तर ईश्वरभक्तीचा दावा निरर्थक व खोटा आहे.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आचार-विचारांवर चालणे महत्त्वपूर्ण आहे. कारण ते अनुयायांचे शुद्धीकरण करतात. ते माणसाला श्रद्धा, नीती, आचार व त्यांच्या अंतरंगाला व बाह्य रूपाला स्वार्थापासून शुद्ध करतात. त्यांची नीती व आचार विकसित करून श्रेष्ठत्वप्रत पोहचवितात.

''जे लोक आपले धन अल्लाहच्या मार्गात खर्च करतात आणि त्यानंतर ना उपकाराची भाषा बोलतात ना मन दुखवितात, त्यांचा मोबदला त्याच्या पालनकर्त्याजवळ आहे.'' (२:२६२)

''चांगले बोलणे आणि चांगले क्षमाशीलतेने वागणे त्या दानापेक्षा (सदकापेक्षा) श्रेष्ठ आहे ज्यामुळे मन दुखविले जाते. अल्लाह स्वसंपन्न, निस्पृह व सहनशील आहे.'' (२:२६३)

''श्रद्धा बाळगणारांनो! उपकाराची भाषा बोलून व मन दुखातून आपल्या दानाला वाया घालू नका. आणि अल्लाहची प्रसन्नता लाभण्यासाठी संपूर्ण समाधानी वृत्तीने खर्च करायला पाहिजे.'' (२:२६४, सारांश)

''तुम्ही गुप्त दान देणे अधिक चांगले आहे.'' (२:२७१)

''जे श्रद्धा बाळगतात, इतरांना वाईटापासून रोखतात, भलाईच्या कामात भाग घेतात व उत्साहाने काम करतात, ते सदाचाऱ्यांपैकी होत.'' (३:११४)

''सुस्थितीत असो वा बिकट परिस्थितीत ते खर्च करतात, रागाला आवर घालतात व सहनशीलतेने वागतात ते सदाचारी होत. जे अल्लाहला आवडतात.'' (३:१३४)

''स्त्रीचा अथवा पुरुषाचा सदाचार वाया घालविणार नाही.'' (३:१९५)

''आप्तसंबंध तोडणारा माणूस स्वर्गात प्रवेश करू शकणार नाही.'' (बुखारी)

''सदाचारी स्त्री आपल्या पुरुषाच्या गुप्त गोष्टींचे संरक्षक असते. त्याच्या घराचे व त्याच्या मालमत्तेचे आणि आपल्या शीलाचे संरक्षण करणारी असते.'' (४:३४)

घरचे हित आणि आपल्या संसारातील सर्व गोष्टी सुरक्षित ठेवणे व हितसंबंध सुरक्षित ठेवणे ही स्त्रीची महत्त्वाची जबाबदारी मानली पाहिजे.

"सर्वांशी चांगली वागणूक ठेवा, नातलग, अनाथ, दुबळे, शेजारी, परके शेजारी, मित्र, वाटसरू आणि तुमच्या ताब्यातील दासी-गुलाम यांच्याबरोबर चांगला व्यवहार करा, अल्लाह ऐट करणाऱ्या व घमेंडखोरांना पसंत करत नाही." (४:३६)

"अल्लाह तुम्हाला आज्ञा देतो की, अमानतींना (ठेवींना) त्याच्या हक्कदाराच्या स्वाधीन करा आणि लोकांमध्ये निर्णय कराल तेव्हा न्यायाने निर्णय करा." (४:५८)

अमानती म्हणजे विश्वासाने ठेवलेल्या वस्तू, अधिकारपदे व त्यामुळे प्राप्त झालेले अधिकार यांचे व्यवस्थित पालन करा. नेतृत्व, मार्गदर्शन आणि राजकारण व शासन जे जे सोपविले असेल ते प्रामाणिकपणे व न्यायाने सांभाळा.

"पवित्र कुरआनावर गंभीरपणे विचार करण्याचे आवाहन." (४:८२)

हे आवाहन म्हणजे खालील गोष्टींवर प्रकाश पडतो व त्यातून स्पष्ट होते की, कुरआनात आलेले विषय अतिशय विशाल म्हणजे मानवी जीवनासाठी संपूर्ण मार्गदर्शन आहे. त्याचा मजकूर परस्पराशी संबंधित आहे व त्याची शिकवण सुसंगत आहे.

माणसाचा स्वभाव, त्याचे मानसशास्त्र, त्याचा प्रारंभ व त्याचा शेवट आणि त्याच्या जीवनाच्या सर्व क्षेत्रांचे प्रबोधन करते. मानवी जीवन कंठण्यासाठी ईश्वराशी योग्य संबंध ठेवण्याबद्दल वारंवार सूचना आलेल्या आहेत. चिंतन करण्यास माणूस प्रवृत्त होतो व त्याच्यासाठी ज्ञानाची विविध दालने उघडू लागतात. यात आलेले मार्गदर्शन सर्वांसाठी उपयुक्त असून त्यावर भर दिला आहे. म्हणजे मार्गदर्शनाचा केंद्रबिंदू या माणूस आहे. याची शिकवण परिपूर्ण असून मानवी जीवनास सर्वस्पर्शी आहे.

"दुराचारी, अप्रामाणिक व गुन्हेगारांना अल्लाह पसंत करत नाही." (४:१०७)

"म्हणून विकारांच्या अनुसरणात न्यायाची उपेक्षा करू नका." (४:१३५)

मानवी जीवनातील बहुतेक चिंता, संकटे ही आपल्या मनातील विकारांमुळे निर्माण होतात. वैचारिक समतोल बिघडतो आणि आपली न्यायबुद्धी भ्रष्ट करतो. म्हणून विकारांपासून सावध राहणे आवश्यक आहे.

"अल्लाह पसंत करत नाही की तुम्ही एखाद्याची निंदा-नालस्ती, कुचेष्टा करण्यासाठी तोंड उघडावे." (४:१४८)

माणसांत दुसऱ्याची निंदानालस्ती करण्यीची प्रवृत्ती ही अनेक कलहांना व कटकटींना आमंत्रण देणारी ठरते. निंदा करणे ही विकृती आहे. त्यापासून दूर राहणेच योग्य व हितावह आहे.

आयत क्रमांक ५:०६ मध्ये शुचिर्भूतता, 'वजू' ज्यात वजूची पद्धत विशद करण्यात आली आहे ती अशी प्रथम हात मनगटापर्यंत धुवावे, गुळणी करावी. नाकात

पाणी घालून स्वच्छ करावे. मग चेहरा, उजवा हात नंतर डावा हात कोपरापर्यंत, डोक्यास पाण्याने मसह, दोन्ही कानांना मसह, शेवटी उजवा पाय व नंबर डावा पाय. या सर्व गोष्टींत शारीरिक स्वच्छतेवर भर दिलेला आहे आणि त्याचे महत्त्व दाखवून दिलेले आहे.

"अल्लाहकरिता उठून उभे राहा आणि न्यायाचे साक्षी व्हा." (५:८)

हा स्पष्ट आदेश आहे की, अन्यायाला विरोध करणे ही ईशआज्ञा आहे. तर पुढे म्हटले आहे, उपकार करणाऱ्यांना अल्लाह पसंत करतो. अर्थात ज्याच्यावर उपकार कराल त्याच्यावर उपकार करीत आहात हे दाखवू नका. कारण आपण ईशप्रसन्नतेसाठी हे केले पाहिजे ही त्याच्या मुळाशी भावना असावी.

"यांचे विद्वान व धार्मिक नेते यांना गुन्ह्याची गोष्ट करण्यापासून का रोखत नाहीत? निषिद्ध खाण्यापासून का रोखत नहीत? फार वाईट कृत्य आहे जे हे करीत आहेत." (५:६३)

या आयतीत स्वत:ला विद्वान व धर्मपंडित समजतात त्यांना तंबी देण्यात आली आहे की, कोणीही दुष्कृत्य करीत असेल व खाद्य-पेयाच्या बाबतीत शुद्धता, निषिद्धता पाळत नसेल त्याला तुम्ही परावृत्त केले पाहिजे, त्यापासून रोखले पाहिजे. ही तुमच्यावर सामाजिक जबाबदारी आहे. त्यापासून अलिप्त राहणे अयोग्य आहे. कारण विद्वान व धर्मवेत्ते हे निष्क्रिय झाले तर समाजाचा ऱ्हास होण्यास, अध:पतन होण्यास वेळ लागत नाही.

'सूरह यूसुफ' हा संपूर्ण सूरहच मानवातील सुष्ट व दुष्ट प्रवृत्ती, द्वेष, मत्सर, घातकीपणा, दगाबाजी, चारित्र्यसंपन्नता, स्त्री-चरित्र जाणणे कठीण, सत्चारित्र्याचे इनाम, पितृभक्ती असे एक ना अनेक बोध मानवास देणारे आहेत. "आई-वडिलांशी प्रेमाने वागा व त्यांना सुख-समाधान द्या." त्याचबरोबर संयम हेच सफलतादायी असल्याचे दर्शविण्यात आले आहे.

"व्यभिचाराजवळ जाऊ नका ही उघड अशी निर्लज्जता आहे व अतिशय वाईट मार्ग." (१७:३२)

ही आयत चारित्र्यसंपन्नतेचे महत्त्व विषद करते. कुरआनात अशी कोणतीही गोष्ट नाही जी बुद्धी, विवेक, न्याय आणि सत्यापासून वेगळी नसावी. यात तत्त्वज्ञानाची गुंतागुंत नाही. परस्परभिन्न निवेदने नाहीत. याची शिकवण अत्यंत साधी, सरळ व मनास भिडणारी आहे. ही शिकवण अत्यंत दृढ व सरळ आहे. याची शिकवण माणसाच्या बुद्धीस बाह्यत्वाकडून अंतरिकतेकडे व अवास्तवतेकडून वास्तवतेकडे घेऊन जाते. हे अत्यंत प्रभावी मार्गदर्शन आहे. विविध प्रेषितांच्या यात आलेल्या कथा, ज्यांत त्यांचा

झालेला छळ, संयमशीलता, मानखंडन, मानवी कल्याणाचा ध्यास व बोध नाकारून मानव विनाशाकडे कसा वळतो याची उदाहरणे नेत्रांजन घालणारी आहेत.

"अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो." (६०:०८)

सर्वसामान्यत: दैनंदिन जीवनात आढळणाऱ्या दोषांवर व कमतरतांवर नेमके बोट ठेवलेले आहे. वरील सर्व आयतीत आलेले मार्गदर्शन हे कोणा जाती-जमातींसाठी आलेले नसून त्यात मानव हाच केंद्रस्थानी आहे. म्हणूनच कुरआन हे मानवाला बोध देणारे आहे. त्यामुळे कुरआनात वारंवार म्हटले गेले आहे की, "आहे कोणी बोध घेणारा?"

शुद्ध व सदाचरणाबद्दल प्रेषित मुहम्मद (स.) यांची अनेक वचने (हदीस) आलेली आहेत. ज्यांत कुरआनात सदाचरणाबद्दल आलेल्या आयतींचे स्पष्टीकरण केलेले आहे. त्यातील काही उदाहरणे पुढे देत आहे.

"जी व्यक्ती निषिद्ध गोष्टींना वैध ठरविते ती व्यक्ती कुरआनवर श्रद्धा ठेवणारी नसते. (माननीय खुबैह रजि. तिरमिजी)

"माननीय इब्ने उमर (रजि.) म्हणतात, प्रेषित मुहम्मद (स.) एकदा म्हणाले, "दोन व्यक्तींबद्दल ईर्षा बाळगावी. एक जो व्यावहारिक जीवनात कुरआनच्या आज्ञांचे पालन करतो व दुसरा तो जो अल्लाहच्या मार्गावर आपले धन खर्च करतो."

(बुखारी, तिरमिजी, मुस्लिम इ.)

पुढील हदीसमध्ये सत्कर्म कोणते किंवा सदाचरणी माणूस कोण याबद्दल जे विवेचन आले आहे ते याप्रमाणे होय.

"हजची यात्रा करणे, अल्लाहच्या कार्यासाठी संघर्ष करणे, आई-वडिलांशी कर्तव्यनिष्ठेने वागणे, निर्धारित समयी नमाज अदा करणे, ओळखीच्या किंवा बिगर ओळखीच्या माणसास सलाम करणे. लोकांमध्ये राहून उपद्रव माजवण्यापेक्षा एखाद्या पर्वताच्या गुहेत राहून अल्लाहची उपासना करीत बसावे." (बुखारी)

हदीसला कुरआनाखालोखाल महत्त्व प्राप्त आहे. कारण त्यात कुरआनातील उपदेश, बोध यांचे सुस्पष्ट मार्गदर्शन आलेले आहे.

अनेक हदीस अशा आहेत ज्यांचा अभ्यास केल्यास एक गोष्ट स्पष्ट होते की, अल्लाहचे भय ज्याच्या ठायी असते तो निश्चितच कुकर्मापासून दूर राहतो. आपल्या हातून काही गैर कृत्य घडल्यास जो आपल्या चुकांबद्दल त्वरीत पश्चात्ताप व्यक्त करतो, चुकीची दुरुस्ती करतो व लगेच सत्कर्म करून त्याची भरपाई करतो. तो सत्कर्मापासून व सदाचारणापासून ढळत नाही. कुरआनातील ११:११४ या आयतीत स्पष्टपणे म्हटले

गेले आहे, "नि:संदेह सत्कर्म दुष्कर्मास नष्ट करते." "दिवसाच्या दोन्ही टोकांवर रात्रीच्या घटिकांमध्ये नमाज अदा करा. नि:संशय सत्कृत्ये दुष्कृत्यांना दूर सारतात." प्रात:कालीन व सूर्यास्ताच्या समयी नमाज अदा केल्याने दिवसभरात आपण काय चांगले व काय वाईट केले याची जाणीव झाल्याने माणूस सदाचरणी बनण्यास मदत होते. "अल्लाहचे भय बाळगा व चूक घडल्यास सत्कर्माने ती दुरुस्त करा आणि सर्वांशी सत्शीलपणे वर्तणूक ठेवा." (तिरमिजी, दारमी)

दांभिकता

"आणि त्या लोकांना पारखावे जे दांभिक आहे." (३:१६७)

उहूदच्या लढाईप्रसंगी ज्यांनी वेगवेगळी कारणे पुढे करून युद्धात सहभागी होण्याचे टाळले, ते शहीद झालेल्यांबद्दल म्हणू लागले की त्यांनी आमचे ऐकले असते तर त्यांची हत्या झाली नसती. आपल्या असत्य वर्तनाचे समर्थन करणारे हे दांभिक असतात.

आयत क्रमांक ४:६१ मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी "तर तुम्ही पाहता की ढोंगी दांभिक लोक कचरतात." पुढे ६२ व्या आयतीत आले आहे की जे दांभिक होते ते म्हणू लागले, "त्यावेळी ते तुमच्याजवळ अल्लाहच्या शपथा घेतील की आम्ही तर भलाई इच्छित होतो आणि आमचा तर उद्देश दोघांमध्ये अनुकूलता निर्माण करणे हा होता.". ढोंगी लोक नेहमी सबबी सांगून आपल्या चुकांचे व गैरवर्तनाचे समर्थन करतात.

"प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आज्ञेचे पालन नि:संकोचपणे व निष्ठुरपणे जो करीत नाही, तो दांभिक असतो मोमिन असू शकत नाही." (४:६५)

४:७४-७७ मध्ये आले आहे, 'जिहाद' विषयी आलेल्या आयती 'जिहाद' अनिवार्य होताच दांभिकांच्या जीवाची घालमेल कशी झाली होती ते दर्शवितात.

"जे लोक 'तोंडाने तर' म्हणतात की, आम्ही आज्ञापालनाचा स्वीकार केलेला आहे. परंतु अपरोक्ष त्याविरुद्ध सल्लामसलत करू लागतात." (४:८१)

४:८१-८८ मध्ये आहे की, दांभिक कशारीतीने आपले हेतू साध्य करण्यासाठी वाऱ्याप्रमाणे पाठ फिरवत राहतात. पाठ फिरवून वर्तन करणाऱ्यांपासून सावध व्हावे, ते निश्चितच दांभिक असतात.

"हे प्रेषित! नाकारणाऱ्यांशी आणि दांभिकांशी 'जिहाद' करा आणि त्यांच्याशी सक्तीने वागा." (९:७३)

समाजाला स्वच्छ व शुद्ध ठेवण्यासाठी दांभिकांचा नाश करणे गरजेचे आहे.

४:१०८ मध्ये म्हटले आहे की, लपून-छपून जे आपली बेईमानी लपविण्याचा प्रयत्न करतात ते अप्रामाणिक दुराचारी व ढोंगी असतात.

"दांभिक लोक अल्लाहबरोबर धोकेबाजी करतात, नमाजसाठी सुस्तीने उभे राहतात. निव्वळ लोकांना दाखविण्यासाठी अल्लाहचे थोडेसे स्मरण करतात."

(४:१४२)

"दांभिकाचे आचरण धार्मिकतेचे प्रदर्शन करणारे असते. त्यांना इहलोकीय आकर्षक जीवनाची मोठी आसक्ती असते. ते फक्त स्वार्थ साधण्यात तत्पर असतात. ते आत्मस्तुती प्रिय असतात. त्यागीवृत्ती त्यांच्यात अजिबात नसते."

(५:५३-५४, सारांश)

"खरे मोमिन कोण असतात व दांभिक कोण असतात यावर आलेली भाष्ये दांभिकतेवर प्रकाश टाकतात. दांभिकतेचे वैशिष्ट्य असे असते की, दांभिक दुष्कृत्य करणाऱ्यांना उद्युक्त करतो, सत्कृत्य करणाऱ्यांना परावृत्त करतो. हे दांभिक पूर्वीही असेच वागत व आजही ते तसेच वागताना दिसतात." (९:४३-५० व ७१)

९:४९ यात स्पष्टपणे म्हटले आहे की, जे तोंडाने म्हणत राहतात, "ते उपद्रवापासून अलिप्त राहण्याच्या गोष्टी करतात." परंतु वास्तवतेत ते 'कुफ्र' व 'निफाक' (दांभिकते)च्या उपद्रवात जो सर्वांत मोठा उपद्रव आहे त्यात ते वाईटरित्या व्यस्त असतात.

"हे म्हणतात आम्ही अल्लाहवर व प्रेषितांवर श्रद्धा बाळगली आणि आम्ही आज्ञापालन अंगीकारले तरीही त्यांच्यातला एक समूह आज्ञापालन न करता आज्ञाभंग करतो. हे लोक कदापि श्रद्धा बाळगणारे नव्हते." (२४:४७)

दांभिक एकीकडे इस्लामशी श्रद्धा व्यक्त करतात तर दुसरीकडे कुरआन व प्रेषित आचरणाच्या अनुसरणापासून दूर राहतात.

२४:४८ मध्ये दांभिकांचे एक लक्षण दिले आहे ते असे की, "प्रेषितांच्या आज्ञेची उपेक्षा करणारे असतात."

"जेव्हा आपल्या हिताची गोष्ट असेल तेव्हा ते प्रेषितांजवळ मोठे आज्ञाधारक बनून येतात." (२४:४९)

म्हणजे आपला जेव्हा फायदा असेल तेव्हा ते आज्ञाधारकपणा दाखवितात.

"ईशआज्ञा व प्रेषितांचे आदेश पाळत नाहीत तेच खरे अत्याचारी असतात. बाह्यतः मात्र आपण आज्ञाधारक आहोत याचा आव आणतात." (२४:५०)

"वेळ आली की ते आज्ञापालन करणारे नसतात, पण आम्ही आज्ञांचे पालन करू अशा पक्क्या शपथा वाहतात. वास्तविकता त्यांनी शपथा घेण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीत व आज्ञांचे पालन केले पाहिजे, पण ते करीत नाहीत. ते ढोंगी असतात." (२४:५३)

"जे (दांभिक) एकमेकाआड लपून खसकतात व प्रेषितांच्या आज्ञांचे पालन करीत नाहीत." (२४:६३)

प्रेषितांच्या आज्ञांचे पालन टाळण्यासाठी दांभिक फक्त निमित्त शोधतात व निसटतात.

दांभिक हे नेहमी घातक असतात. ते आपल्या हिताचे असते तेवढे तत्परतेने आत्मसात करतात. आपण श्रद्धा बाळगणारे आहोत असे दर्शवितात. ज्यांत आपला फायदा नाही असे दिसते तेव्हा ते विविध सबबी पुढे करून पळ काढतात. कुरआनात स्पष्टपणे म्हटले आहे की, तुमची प्रत्येक कृती अल्लाह जाणतो. त्यामुळे तुमच्या प्रत्येक कृतीचा तो अंतिमदिनी हिशेब घेईल. दांभिकता ही समाजाला कलंकित करते.

दारू (नशा व नशिल्या वस्तू) चे सेवन निषिद्ध

"ते तुम्हाला दारू व जुगाराबद्दल विचारीत आहेत. सांगा, या मोठ्या गुन्ह्याच्या गोष्टी आहेत आणि लोकांच्यासाठी काही फायद्याच्या पण आहेत. परंतु त्यांचा गुन्हा त्यांच्या फायद्यापेक्षा अधिक मोठा आहे. आणि ते विचारतात, काय खर्च करावा? सांगा आवश्यकतेपेक्षा जे अधिक आहे. अशाप्रकारे अल्लाह आपल्या आज्ञा स्पष्ट करतो. कारण की तुम्ही विचार करावा." (२:२१९)

"हे श्रद्धा बाळगणाऱ्यांनो! दारू, जुगार, मूर्तीस्थान व शकुन बाण ही सर्व गलिच्छ व सैतानी कामे होत. यास्तव यापासून अलिप्त राहा. अशासाठी की तुम्ही सफल व्हावे." (५:९०)

"सैतान तर हे इच्छितो की, दारू आणि जुगारात व्यस्त ठेवून तुमच्यात वैर व तिरस्कार निर्माण करावे आणि तुम्हाला अल्लाहच्या स्मरणापासून व नमाजपासून रोखावे, मग काय तुम्ही परावृत्त होणार." (५:९१)

दारू हे नशा निर्माण करणारे मादक पेय आहे. त्याचे दुष्परिणाम खालीलप्रमाणे घडतात. (१) बुद्धी व शरीर यावर दुष्परिणाम होतो. (२) नैतिक व आध्यात्मिक जीवनाचे अध:पतन होते. (३) कुटुंब, समाज व राष्ट्र या सर्वांसाठी भयंकर हानिकारक आहे.

दारूमुळे आपली कार्यशक्ती वाढते, असा एक गैरसमज आहे. काही अंशी आपण आपले काम झपाट्याने संपवितो असे माणसास वाटते. नैतिकदृष्ट्या माणसाचे अध:पतन

होते. वैद्यकीयदृष्ट्या ती शरीरास घातक असते. शरीराच्या सर्वांत नाजुक व शरीरातील २५० ते ३०० कार्ये करणारा 'लिव्हर' हा अत्यंत महत्त्वाचा भाग निकामी होऊ शकतो किंवा त्याच्या कार्यक्षमतेवर दुष्परिणाम होऊ शकतो. नित्य सेवनाने लिव्हर खराब होऊन काविळीसारखा घातक रोग होतो आणि तो प्राणघातकही ठरू शकतो. 'एन्साक्लोपीडिया ऑफ रिलिजन ॲण्ड एथिक्स व्हॉल्यूम-१' मध्ये दारूचा प्रमुख घटक अल्कोहोलबाबत अत्यंत सविस्तर व प्रदीर्घ माहिती दिलेली आहे. म्हणूनच कुरआनने त्याला (दारूला) निषिद्ध ठरविले आहे. जुगार आणि दारू केवळ व्यक्तीचा घात करीत नाही तर समाजाला, संसाराला व राष्ट्राला घातक ठरते.

प्राचीन काळापासून दारू-मद्य आणि जुगार मानवी जीवनात रूढ झालेल्या दिसतात. विशेषप्रसंगी हे प्रतिष्ठित लोकांत, उच्चभ्रू सत्ताधीशांत सर्रास चालत आलेले आहे हे तितकेच सत्य आहे.

अंतिमत: दारू मानवी जीवनास घातक म्हणूनच तिला निषिद्ध मानले गेले आहे. पैजा लावून खेळणे, बाणांच्या सहाय्याने शुभाशुभ शकून अरब लोकांत रूढ होते. देवी-देवतांच्या देवळात तर ते सर्रास चालत असे. शिवाय धर्मोत्सवाच्या वेळीही चालत असे.

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी या दोन्ही गोष्टी अत्यंत घृणास्पद व निषिद्ध ठरविल्या आहेत आणि त्यांनी आपल्या इस्लामी राज्यात हद्दपार करून जबरदस्त दंडनीय कृत्ये म्हणून जाहीर केले.

दारूच नव्हे तर सर्वस नशा आणणाऱ्या वस्तुंना निषिद्ध ठरविलेले आहे.

आर्थिक जीवन

"जे अल्लाह, शेवटचा दिवस, फरिश्ते, ईशग्रंथ, प्रेषित यांच्यावर श्रद्धा ठेवतात आणि आपली संपत्ती अल्लाहच्या प्रेमापोटी, नातलगांवर, अनाथांवर, दीनदुबळ्यांवर, वाटसरूंवर आणि हात पसरविणाऱ्यांवर त्याचप्रमाणे माना सोडविण्यासाठी खर्च करतात, नमाज व जकात कायम करतात, दिलेली वचने पाळतात आणि टंचाईत व संकटात, युद्धाच्या समयी सत्याने वागतात आणि प्रामाणिक आहेत ते अल्लाहचे खरे भय बाळगणारे आहेत." (२:१७७)

जे लोक श्रद्धेच्या सर्व अटी पूर्ण करतात व आपली संपत्ती ही अल्लाहची प्रसन्नता मिळवील म्हणून नातलगांवर, अनाथांवर, दीनदुबळ्यांवर, वाटसरूंवर आणि लाचारांवर त्याचप्रमाणे गुलामांच्या मुक्तीसाठी खर्च करतात. तसेच जकात स्वेच्छेने व श्रद्धेने देतात आणि टंचाईच्या, दुष्काळाच्या, आर्थिक आपत्तीच्या काळात त्याचप्रमाणे

धर्मयुद्धांसाठी खर्च करतात तेच खरे प्रामाणिक व श्रद्धाळू असतात. यात कोठेही स्वत:च्या बडेजावासाठी अथवा दिखाव्यासाठी खर्च करण्याचा हेतू नसावा. हा सर्व खर्च केवळ अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी निरपेक्ष बुद्धीने केला पाहिजे. ही वृत्ती ठेवणाराच खरा श्रद्धाळू व ईशभिरू असतो.

"खर्च चांगल्याप्रकारे करा." (२:१९५, सारांश)

म्हणजे खर्च योग्य कारणासाठी व सद्हेतूने करावा.

"आई, वडील, नातलग, अनाथ, असहाय्य, वाटसरू यांच्यासाठी खर्च करा." (२:२१५)

आई, वडील व नातलग यांच्यासाठी खर्च करणे हे तुम्ही बंधनकारक मानले पाहिजे. असहाय्य व वाटसरू यांच्यासाठी शक्य असेल ते सहाय्य करणे हे समाजाचा जबाबदार नागरिक म्हणून तुमच्यावर निश्चितच बंधनकारक आहे.

"दानधर्म करतात व त्यानंतर ना उपकाराची भाषा बोलतात, त्यांच्यासाठी मोबदला आहे." (२:२६२, सारांश)

दानधर्म करताना ती नैतिक जबाबदारी मानली पाहिजे, आपण तो खर्च करताना कोणावर उपकार करतो असे मानता उपयोगी नाही. तो खर्च निरपेक्ष बुद्धीने केला पाहिजे.

"क्षमाशीलतेने वागणे, चांगले बोलणे नावलौकिकासाठी दान करण्यापेक्षा श्रेष्ठ आहे." (२:२६३)

"लोकांना दाखविण्यासाठी खर्च करू नका." (२:२६४)

"अल्लाहची प्रसन्नता लाभण्यासाठी व समाधानी वृत्तीने खर्च करावा." (२:२६५, सारांश)

"चांगल्या व शुद्ध वस्तू खर्च करा. वाईट व अशुद्ध वस्तू देण्याचा कदापि विचार करू नये आणि अशा वस्तू तुम्हाला दिल्या तर तुम्ही कदापि घेणार नाही, अशा देऊ नका." (२:२६७)

"कोणतेही दान गुप्त अथवा उघड दिले तर केव्हाही चांगली गोष्ट आहे." (२:२७१)

"आणि जे व्याज तुम्ही देतात यासाठी लोकांच्या धनात वाढ व्हावी तर ते अल्लाहच्या जवळ वाढत नाही आणि जकात जे (कर्तव्यदान) तुम्ही अल्लाहची मर्जी संपादन करण्यासाठी देतात तर त्याच लोकांच्या धनात खरी वाढ होते." (३०:३९)

कुरआन व्याजाची असमृद्धता विषद करते. शरीयतप्रमाणे व्याज अप्रिय असण्याकडे संकेत दिला आहे. कुरआनात व्याजाच्या निषिद्धतेचा स्पष्ट आदेश मदिनेत

अवतरला. सूरह 'अल बकरा' आयत क्र.२७५, २७९ तसेच सूरह 'आले इम्रान' मध्येही व्याजाचा निषेध केला गेला आहे. व्याजाचा पैसा हा अमंगल व असमृद्ध असतो. अशा धनाला कसलीच बरकत नसते. अल्लाहच्या नजरेत व्याज देणे घेणे हे अप्रिय व्यवहार आहेत.

"जेव्हा तुमच्यापैकी एखाद्याची मरणाची वेळ येईल व तो आपल्या मागे काही संपत्ती सोडत असेल तर त्याने आई-वडील आणि जवळच्या नातलगांसाठी योग्य पद्धतीने मृत्युपत्र करावे. तुमच्याकरिता अनिवार्य करण्यात आले आहे की, अल्लाहचे भय बाळगणाऱ्या लोकांवर त्याचा अधिकार आहे." (२:१८०)

"मग जे लोक मृत्यूपत्र ऐकल्यानंतर ते बदलतील तर तो बदलणाऱ्याचाच गुन्हा आहे, नि:संशय अल्लाह सर्वकाही ऐकणारा व जाणणारा आहे." (२:१८१)

"परंतु ज्याला मृत्युपत्र करणाऱ्याबद्दल पक्षपात वा गुन्ह्याची (हक्क हिरावून घेतल्याची) शंका असेल त्याने जर आपसात तडजोड घडवून आणली तर त्यामध्ये काही गुन्हा नाही. नि:संशय अल्लाह क्षमा करणारा व कृपा करणारा आहे." (२:१८२)

इस्लाममध्ये संपत्तीच्या फक्त एक तृतीयांश भागापर्यंत मृत्यूपत्र करणे योग्य आहे.

"अल्लाहची प्रसन्नता मिळावी म्हणून खर्च कराल तर तुम्हाला कितीतरी पटीने मोबदला मिळेल." (२:२७२)

या सर्व आयतींचा मतीतार्थ एकच आहे व तो म्हणजे आपला बडेजाव करण्यासाठी, दातृत्व दाखवण्यासाठी काही खर्च करणे ही गोष्ट ईशप्रसन्नता प्राप्तीसाठी केलेला खर्च ठरत नाही. कोणालाही दिलेले दान शुद्ध व स्वच्छ स्वरूपाचे असावे. टाकावू अथवा तुम्हाला नको असेल ती वस्तु देणे म्हणजे दान नव्हे. दान हे निरपेक्ष बुद्धीने दिले पाहिजे. आपल्या मनात रुखरुख ठेवून दिलेले दान काही उपयोगाचे नसते. तसेच कोणतेही दान समोरच्याचे मन दुखवून, उपकार केल्याच्या भावनेने केलेले हीन ठरते. लोकांचे मन न दुखवता प्रेमाने व सदिच्छेने दिलेले दान हे खरे दान ठरते. उघड अथवा गुप्तपणे दान दिलेले केव्हाही पुण्यकारकच असते. प्रेमाची, त्यागाची भावना ही महत्त्वपूर्ण मानली जाते.

"व्याज व व्यापार समान नाहीत. व्यापाराला वैध व व्याजाला निषिद्ध ठरविले आहे." (२:२७५)

व्याज व व्यापार यात अर्थोत्पादन होते, पण त्यात महत्त्वाचा हा फरक आहे की व्याज निषिद्ध मानले जाते. तर व्यापार शुद्ध मानला जातो. व्यापारात बुद्धीचा तसेच 'रिस्क फॅक्टर' असतो. व्याजात तसे नाही. त्यात व्याज घेणारा कोणाचे तरी शोषण

करतो. अर्थव्यवस्थेत उत्पन्न व उत्पादन वाढत नाही. उलट अडतखाऊ वृत्ती असते. व्याज देण्या-घेण्यावरून समाजजीवनाची हानी होते. 'हज्जतुल विदा'च्या प्रवचनात प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सर्व खानदानच्या लोकांचे व्याज देण्या-घेण्याचे सर्व व्यवहार रद्दबातल केले. फक्त असलेली मुद्दल घेण्यास अनुमती दिली. ही आयत अवतरित झाली की, "अल्लाह व्याजाला नेस्तनाबूत करतो." (२:२७६)

कर्ज देण्या-घेण्याबद्दल कुरआनात याप्रमाणे मार्गदर्शन आलेले आहे.

"ठराविक मुदतीसाठी कर्जाचा व्यवहार कराल तर तो लिहून करावा. दस्तऐवज लिहिणाऱ्याने लिहिण्यास नकार देऊ नये व साक्षीदार घ्यावेत. कर्जाचा व्यवहार लहान रकमेचा असो अथवा मोठ्या रकमेचा. मुदत लिहिण्याबद्दल आळस करू नका. हात-उधारीचा व्यवहार लिहिला नाही तरी चालेल. खरेदी-विक्रीच्या व्यवहारात साक्षीदार ठेवा. लिहिणाऱ्याला व साक्षीदाराला त्रास देऊ नका." (२:२८२)

"अनामंत ज्याची त्यास परत करा. प्रवासात जर लिहिणारा नसेल तर गहाण ठेवून व्यवहार करावा." (२:२८३)

कर्ज देणे-घेणे, दिलेली रक्कम, त्यात घातलेली मुदतीची अट, तसेच खरेदी-विक्रीचे करार सर्व व्यवहार लेखीच केले जावेत याबद्दल आलेल्या आज्ञा अगदी स्पष्ट व परखड शब्दांत आलेल्या आहेत. प्रत्येक लहान-मोठ्या व्यवहारात साक्षीदाराशिवाय व्यवहार करण्यात येऊ नयेत, असे स्पष्ट बजावले गेले आहे. लेखी साक्षी-पुराव्याने व्यवहार करणे अत्यंत महत्त्वपूर्ण सांगितले आहे. म्हणूनच म्हणावे लागते की, सर्वसामान्य माणसाला उद्देशून आलेल्या अशा आज्ञा व मार्गदर्शन आहेत.

"सुस्थितीत असा किंवा बिकट परिस्थितीत, प्रत्येक अवस्थेत खर्च करतात."
(३:१३४)

सामाजिक जीवनात आवश्यक असणारे खर्च हे सुस्थितीत अथवा बिकट परिस्थितीत निभावलेच पाहिजेत. कारण निघून गेलेली वेळ कधी परत येत नाही हे विसरता उपयोगी नाही.

"अनाथांची संपत्ती त्यांच्या स्वाधीन करा, त्यांच्या चांगल्या संपत्तीची अदलाबदल करू नका. त्यांच्या संपत्तीत आपली संपत्ती मिसळू नका. तसे करणे फार मोठा गुन्हा आहे." (४:०२)

"त्यांची संपत्ती परत कराल तेव्हा साक्षीदार ठेवा." (४:०६)

"एखाद्याची संपत्ती सांभाळणाऱ्याने त्यातून काही मोबदला घेतला तरी हरकत नाही. पण त्याची मालमत्ता उधळू नये." (४:०६)

“जे अनाथाची संपत्ती अनाचाराने खातात ते आपल्या पोटांत आग भरीत आहेत.” (४:१०)

अनाथाच्या मालमत्तेचे संरक्षण करणाराने कोणती पथ्ये पाळावी हे स्पष्ट केले गेले आहे. तसेच साक्षीदार ठेवून त्याचा हिशेब द्यावा. जो बदनियतीने वागेल तो त्याच्या पोटात आग भरीत आहे, एवढी कडक तंबी दिली गेली आहे.

“स्वत: कंजुषपणा करू नका व लोकांना कंजुषपणा करा असेही सांगू नका.” (४:३७)

“ज्यांच्या त्यांच्या अमानती परत करा व त्या परत करताना न्यायाने निर्णय करा.” (४:५८)

अमानती परत करणे हे परम कर्तव्य मानले गेले आहे. सत्तेने तुमच्या हाती दिलेले अधिकार यांनासुद्धा अमानतीच मानले गेले आहे. आपले अधिकार दुरुपयोगासाठी वापरू नका. न्यायाची कास सोडू नका.

“मृत्युपत्र करणाऱ्याने न्यायी लोकांना साक्षीदार ठेवावे. जर तुम्ही प्रवासात असाल तर मुस्लिमेतर दोन साक्षीदार द्यावे.” (५:१०६)

यात मृत्युपत्राचे महत्त्व विशद केले आहे. त्यावर साक्षीदार ठेवावे म्हणजे ते कार्यान्वित करण्यात कोणतीही अडचण येणार नाही.

“उधळमाधळ करू नका, अल्लाह उधळमाधळ करणाऱ्यांना पसंत करत नाही.” (६:१४१)

माणसाने कंजुष नसावे, पण उगाच उधळमाधळ करू नये. तसे करणे हादेखील तुमच्या साधनसंपत्तीचा दुरुपयोग ठरतो.

“सद्‌कात (दान) तर केवळ गरजुंसाठी, गोरगरिबांसाठी, दान कार्यकर्त्यासाठी नियुक्त आहेत. इस्लामबद्दल प्रेम निर्माण करायचे असेल त्यांच्यासाठी, माना सोडविण्यासाठी, कर्जदारांचे ओझे हलके करण्यासाठी, अल्लाहच्या मार्गात व प्रवाशांसाठी खर्च करीत जावे.” (९:६०)

नव्याने धर्मात आलेल्यांना सहाय्य देण्यासाठी ‘सदकात’मधून खर्च करण्यास हरकत नाही.

“वायफळ खर्च करणारे सैतानाचे भाऊ आहेत.” (१७:२७)

“ना हात गळ्याशी बांधा ना मोकळा सोडा.” (१७:२९)

वरील आयतींत वायफळ खर्च करणारांची व उधळमाधळ करणारांची, कंजुषांची निर्भर्त्सना केली गेली आहे.

"अल्लाह 'सदका' देणाऱ्यांना मोबदला देतो." (१२:८८)

निस्वार्थपणे ईश्वराच्या प्रसन्नतेच्या प्राप्तीसाठी जे दान दिले जाते ते ईश्वर कधीही वाया जाऊ देत नाही. उलट त्याला त्याच्या औदार्याबद्दल योग्य मोबदला देतो.

"जे कृपणता करतात आणि इतरांना कृपणता करण्यास सांगतात, या (उपदेशा) पासून जो तोंड फिरवील, तर (त्याने लक्षात असू द्यावे की,) अल्लाह निस्पृह आणि गुणविशेषांनी युक्त आहे." (५७:२४)

कृपण माणूस इतरांचे हक्क अदा करत नाही व त्याला इतरांबद्दल सहानुभूती नसते. कृपणता करून आपले इतरांवर श्रेष्ठत्व प्रस्थापित करावे म्हणून ते धनसंचय करतात.

"जे काही अल्लाह वस्तीच्या लोकांकडून आपल्या प्रेषिताला देववील, ते अल्लाह आणि प्रेषित व नातेवाईक व अनाथ आणि गोरगरीब व प्रवाशांकरिता आहे अशासाठी की हे (धन) तुमच्यातील या धनवानांच्याच दरम्यान फिरत राहू नये. आणि प्रेषित जे तुम्हाला देतील ते घ्या व ज्यापासून रोखतील त्यापासून अलिप्त राहा." (५९:०७)

'माले फै' हा आदेश 'फै' म्हणून तुमच्या ताब्यात आलेल्या धनसंपदेबद्दल आला आहे. 'माले फै'चा विनिमय कसा केला जावा याबद्दल 'इस्लामिक इकॉनॉमी' मध्ये वर्णन केले गेले आहे. विनिमय याप्रमाणे करावा अशी अपेक्षा व आदेश आहे.

(१) अल्लाहच्या खातीर खर्च करणे, धर्मप्रचार, प्रसार व 'जिहाद'साठी. (२) प्रेषितांचा हक्क आपल्या गरजांसाठी पुरविण्यासाठी ते धर्मकार्यामुळे अर्थार्जन करू शकत नव्हते. जकातीतून काही घेत नसत, त्यामुळे स्वत:साठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी 'माले फै'चा हिस्सा निर्धारित केला गेला आहे. हा प्रेषितपदासाठी असल्याने प्रेषितांनंतर हा भाग राहिला नाही. तसेच प्रेषित आपल्या मागे वारसा सोडत नाहीत. प्रेषित मुहम्मद (स.) यांचे कथन आहे की, "आमचा कोणीही वारसदार नाही, आम्ही जे काही सोडले ते दान होय." (बुखारी). (३) प्रेषितांचे नातेवाईक यांच्यासाठी विनिमय 'माले फै' मधून दिले जात असे, कारण त्यांना जकातीतून काही मिळत नव्हते. (४) 'माले फै' मधील चौथा, पाचवा व सहाव्वा हिस्सा अनाथ, गोरगरीब व प्रवाशांकरिता, हा खर्च दारिद्र्य, अगतिकता दूर करण्यासाठी.

यात महत्त्वाचा भाग असा की, संपत्तीचा ओघ केवळ श्रीमंतांकडेच झुकलेला राहू नये. संपत्ती ठराविकांच्या हाती केंद्रिभूत होता उपयोगी नाही. जकात, सदका (दान), कफ्फारा (प्रायश्चित) अदा करणे, 'माले गनीमत' व 'माले फै' यांत गोरगरिबांना हिस्सा

देऊन त्यांचे दारिद्र्य दूर करण्याचा प्रयत्न केला गेला. व्याज निषिद्ध ठरवून आर्थिक शोषण थांबिवले गेल्याची उपाययोजना केली गेली. वारसांच्या वाटणीद्वारे संपत्तीचे केंद्रिकरण रोखले गेले. या इस्लामिक व्यवस्थेमुळे आर्थिक समतोल साधण्याचा प्रयत्न केला गेला. ही व्यवस्था ना श्रीमंतांच्या लाभाची अथवा कोणाचा हक्क हिरावण्याची संधी देणारी. ही व्यवस्था सत्य व न्यायाची परिपूर्णता करणारी आहे.

सूरह 'अनफाल'मध्ये ४१ व्या आयतीत 'माले गनीमत'चा चार पंचमांश भाग लढणाऱ्या सैनिकांसाठी हिस्सा दिला गेला आहे. न लढता मिळालेली संपत्ती 'माले फै' प्रमाणे वाटली जावी असे म्हटले गेले आहे.

"जो खर्च करतात तर ना उधळपट्टी करतात आणि ना काटकसर, किंबहुना त्यांचा खर्च दोघांच्या दरम्यान समतोल असतो." (२५:६७)

ना माणसाने कंजुष असावे ना उधळपट्टी करावी. माणसाने त्यांच्यातील सुवर्णमध्य साधावा.

"बहुतेक भागीदार एकमेकांवर अतिरेक करतात." (३८:२४)

भागीदारीचा धंदा हा विश्वासावर चालतो. त्यात अतिशय सावधानता राखली पाहिजे. बहुतेक भागीदाऱ्या भागीदारांमध्ये तंटे होऊन मोडतात. तरी हा व्यवहार सांभाळूनच केला जावा. भागीदारांनी आपसातील व्यवहारात पारदर्शकता ठेवावी.

"वस्तुत: जो कंजुषपणा करतो तो स्वत:शीच कंजुषपणा करतो." (४७:३८)

कंजुषपणा हा बऱ्यांचदा स्वत:चेच नुकसान करणारा ठरतो. कंजुषपणामुळे मिळणाऱ्या संधी गमावतो.

"कृपणता करतात व इतरांना कृपणता करण्यास सांगतात." (५७:२४)

बऱ्याचदा कृपणता आत्मघातकी ठरते. कृपणता हा गुणविशेष नसून गुणदोष आहे.

"अधिक प्राप्तीच्या उद्देशाने उपकार करू नका." (७४:०६)

स्वार्थी वृत्तीने केलेला खर्च कित्येकदा नुकसानकारक ठरतो. प्राप्ती तर होत नाहीच, उलट त्यात घाटाच होतो.

"वजन-मापे बरोबर करा, पुरेपूर पैसे घेता तर पुरेपूर मोजून द्या."
(८३:०१-०३)

पूर्ण मोबदला देणे हे योग्य व नैतिकतेचे कर्म आहे.

महान अल्लाहने जकात प्रत्येक धनवान मुसलमानासाठी अनिवार्य कर्तव्य ठरविले आहे. ज्याच्याकडे साडेसात तोळे सोने अथवा साडेबावन्न तोळे चांदी अथवा तत्सम रक्कम एक संपूर्ण वर्षाच्या काळासाठी उरली असेल त्याने त्या रकमेचा ४० वा भाग (२.५ टक्के) आपल्या एखाद्या कफल्लक नातेवाईकास किंवा एखाद्या लाचार माणसास, एखाद्या दारिद्र्यपीडितास, एखाद्या नवमुस्लिमास, एखाद्या अडचणीत असलेल्या प्रवासी माणसास किंवा एखाद्या कर्जबाजारी माणसास द्यावा.

अशा तऱ्हेने अल्लाहने धनवानाच्या संपत्तीमध्ये गोरगरिबांसाठी कमीतकमी अडीच टक्के हिस्सा नियुक्त केला आहे. यापेक्षा जास्त प्रमाणात एखाद्याने दान केले तर ते उपकारक होईल आणि त्याचे पुण्य आणखी अधिक असेल.

येथे 'जकात' रोख रकमेपुरतीच नसून सोने, चांदी, व्यापारी माल व पशु धनासही लागू आहे. या सर्व वस्तुंमध्ये किती मालमत्तेसाठी किती जकात द्यावी याचे कोष्टक इस्लामी कायदे पुस्तकात - 'शरियत'मध्ये आढळेल. येथे केवळ जकातच्या मागे असलेली उद्दिष्टे, तसेच त्यापासून कल्याण विशद करणे हाच हेतू आहे.

अल्लाहचे प्रेषित त्यांचे वंशज म्हणजे हाशमी लोकांनी जकात स्वीकारणे निषिद्ध ठरविले आहे. सादात व बनी हाशीम यांनी जकात देणे तर अनिवार्य आहे. परंतु जकात घेणे त्यांच्यासाठी धर्मसंमत नाही.

कुरआनात म्हटले गेले आहे की, ईश्वरास स्वत:साठी कोणत्याही दानाची गरज नाही व त्याचा वाटा त्याला पोहचतही नाही. निर्धन बांधवास दिले तर ते आपल्याला दिले असे अल्लाह म्हणतो व तसे देणाऱ्यास कितीतरी पटीने फळ देतो. दान देणाऱ्याने निरपेक्ष बुद्धीने, स्वत:चा गाजावाजा करण्यासाठी, प्रसिद्धीसाठी, स्वत:च्या नावासाठी दान देऊ नये. ईशप्रसन्नतेसाठी ते दिले जावे. ईश्वरासाठी त्याग करण्याची व त्याला प्राधान्य देण्याची भावना व जाणीव असली पाहिजे. स्वार्थ, संकुचित मनोवृत्ती, धन-लालसा हे दुर्गुण नष्ट होतात. संपत्तीचा व्यय ईशप्रसन्नतेसाठी केला पाहिजे.

आपल्या बांधवांत सहकार्याची भावना वाढते, अनाथ, गरीब, विधवा, निराधार व निर्धनाचा वाटा दिला पाहिजे. अपंग, गरजू, शिक्षण इच्छुकांना आर्थिक सहाय्य दिले पाहिजे.

जकातविषयी महत्त्वपूर्ण आयती अशा आहेत.

"नमाजचे पालन करावे व जकात द्यावी हाच खरा धर्म आहे." (९८:०५)

"जकात हे कर्तव्यधन अल्लाहची मर्जी संपादण्यासाठी व आपल्या धनाला वाढविणारे आहे." (३०:३९)

"जकात समृद्धीदायक व अर्थवृद्धी करते. प्रेषितांच्या पत्नींनाही जकात देण्याचा आदेश दिला गेला आहे." (३३:३३)

"जकात अदा न करणे (न देणे) हे 'काफिर'पणाचे लक्षण होय." (४१:०७)

जकात उपासनेचे एक महत्त्वपूर्ण स्वरूप आहे. जकात देण्याबाबत गाफील राहू नये. जकात देणे हा श्रद्धावंताचा गुणधर्म आहे. जकात देण्याबद्दल कुरआनात वारंवार आदेश दिला आहे. जकात देणे ईश्वर व प्रेषितांच्या आज्ञेचे पालन होय. ते श्रद्धावंतांचे लक्षण होय. जकात दानाचे संवर्धन करते. 'नमाज कायम करा व जकात द्या' ही आज्ञा कुरआनात शेकडो ठिकाणी आली आहे.

आर्थिक जीवनासंबंधी हे मार्गदर्शन आलेले आहे.

ईशदेणगी

"निःसंशय रात्र व दिवसाच्या एका पाठोपाठ येण्यात व त्या समस्त गोष्टींमध्ये ज्या अल्लाहने आकाशात व जमिनीत निर्माण केल्या आहेत, त्या लोकांकरिता निशाण्या आहेत जे अल्लाहचे भय बाळगतात." (१०:०६)

रात्र आणि दिवस हे सातत्याने, अविरतपणे चालू आहेत. त्यात फार मोठा बोध आहे. रात्र ही विश्रांतीस्थान मानली जाते तर दिवस हा उद्योगशीलतेस चालना देतो. अंधकार याची संकटाबरोबर तुलना केली जाते. त्यानंतर येणारा प्रकाशमान दिवस पुन्हा सुखसमृद्धीची चाहुल देतो. निराशेकडून आशेकडे होणारे हे स्थित्यंतरही मानले जाते. रात्र व दिवस हे पृथ्वी गोल असण्याचे वैज्ञानिक सत्य प्रकाशात आणते. तसेच त्यांच्या हेराफेरीने दिनगणना करणे शक्य झालेले आहे.

माणसाने उघड्या डोळ्यांनी जर निसर्गाचे अवलोकन केले तर अनेक अचंबित करणारी सत्ये उकलू शकतात. निसर्गामुळे मानवी जीवन सुखी व्हावे म्हणून किती मुक्त हाताने अल्लाहने देणग्यांचा वर्षाव केला आहे हे लक्षात येते, पण आपण हे जाणून घेण्याची उत्सुकता व क्षमता दाखविली पाहिजे.

बोधप्रद खडकाळ जमिनी

"आणि चांगल्या जमिनीतून तिच्या पालनकर्त्याच्या आदेशाने (भरपूर) उत्पन्न निघते व निकृष्ट जमिनीतून दूषित उत्पन्नाखेरीज काहीही निघत नाही. अशाप्रकारे आम्ही आपल्या निशाण्यांचे विविधरीत्या वर्णन करतो. त्या लोकांकरिता जे कृतज्ञता दर्शविणारे आहेत." (७:५८)

पावसाचे उदाहरण असे दिले आहे की, पाऊस सर्वत्र पडतो. परंतु केवळ तीच जमीन टवटवीत व हिरवीगार होते जी सुपीक असते. निकृष्ट जमिनीपासून काहीच लाभ होत नाही. याविषयी एक हदीस आलेली आहे, ज्यात म्हटले आहे की, जेव्हा पाऊस पडतो तेव्हा चांगली जमीन पाणी शोषून घेते. तिच्यात गवत उगवते, पेरलेले जे असते त्याचे उत्तम उत्पादन मिळते. तसेच सखल जमीन पाण्यास थोपवून धरते व इतरांनाही उपयुक्त ठरते. पिण्यास पाणी देते व त्यांची तृष्णा भागवते. परंतु खडकाळ जमीन पाणी शोषूनही घेत नाही व त्यामुळे थोपवून धरता येत नाही. अशी जमीन ना उत्पादन देते ना पाणी साचवू शकते, ते पाणी वाहून जाते. जलवर्षावाची देणगी उपयुक्त ठरत नाही. त्यापासून जे लोक समंजस असतात ते बोध घेऊन ईशदेणगीने कल्याण साधून घेतात. खडकाळ जमीन स्वत: लाभ घेत नाही व इतरांनाही उपयुक्त ठरत नाही.

मर्यादित राहा

"हे आदम संतती! प्रत्येक मस्जिदीत उपस्थित राहताना स्वत:ला वस्त्र प्रावरणाने सुशोभित करा आणि खा व प्या, मात्र मर्यादेचे उल्लंघन करू नका. कारण अल्लाह मर्यादांचे उल्लंघन करणारांना पसंत करीत नाही." (७:३१)

"तो मर्यादेचे उल्लंघन करणारांना पसंत करीत नाही." (७:५५)

या आयतीत शुचिर्भूतता, स्वच्छता व शुद्धता यावर भर दिला गेला आहे. मस्जिदीत तुम्ही उभे राहता, ते ईश्वरासमोर उभे राहता. जसे आपण एखाद्या प्रतिष्ठित माणसास भेटायला जाताना नीटनेटकेपणे जातो, तसेच मस्जिदीत म्हणजे ईशआराधनेसाठी जाता तेथे तुम्ही सर्व जगाच्या किंवा विश्वाच्या स्वामीसमोर उभे राहता, तेव्हा तुम्ही किती स्वच्छताप्रत शुचिर्भूतता पाळली पाहिजे हे लक्षात ठेवले पाहिजे. खाण्या-पिण्यासाठी तुम्ही स्वच्छता पाळली पाहिजे, आचार-विचारशुद्धता राखणे आवश्यक आहे. ईश्वराने तुमच्या सर्व सुख-सोयी उपलब्ध केल्या आहेत. त्याची जाणीव ठेवून आपण मर्यादाशील राहून त्याचे ऋणी असले पाहिजे. जर तुम्ही मर्यादांचे उल्लंघन कराल तर तुम्ही कृतघ्न ठराल. या सतत जाणिवेने आपले वर्तन ठेवले पाहिजे. त्यांचे उल्लंघन करणे म्हणजे ईशउपकारांचे विस्मरण करणे होय.

"अल्लाह अनाचाराला कदापिही पसंत करीत नाही." (२:२०५)

योग्य मोजमाप

"आणि माप-तोल करण्यात कमी करू नका." (११:८४)

"आणि हे माझ्या जनसमूहातील लोकांनो! माप-तोल न्यायाला धरून पूर्ण करा आणि लोकांना त्यांच्या वस्तू कमी देत जाऊ नका आणि जमिनीवर उत्पात माजवित फिरू नका." (११:८५)

"नाश आहे वजन-मापात कमी करणाऱ्यांसाठी, जे लोकांकडून मोजून घेतात तेव्हा पुरेपूर घेतात आणि जेव्हा त्यांना मोजून वा वजन करून देतात तेव्हा कमी करून देतात." (८३:०१-०३)

"शुद्ध व अशुद्ध दोन्ही समान होऊ शकत नाहीत." (५:१००)

माणसाच्या दैनंदिन जीवनात वस्तूंचे मोजमाप करून देणे-घेणे या व्यवहारात सातत्याने चालू असतात. एकही दिवस आपले याशिवाय चालत नाही. कुरआनात या दैनंदिन व्यवहारात वजन-मापात ज्या लबाड्या होतात त्याबद्दल 'हे चूक आहे. नुसते चुकच नसून तो अपराध आहे' असे स्पष्टपणे म्हटले आहे. आपण घेताना जसे मोजमाप करून घेतो तसे देतानाही योग्य मोजमाप करून दिले पाहिजे. अर्थात यात भेसळ करणे हादेखील गुन्हा मानला गेला आहे. कारण शुद्ध मालात अशुद्ध किंवा हलका माल मिसळून देणेही चूक ठरविले आहे. शुद्ध मालाचे पैसे घेणे व अशुद्ध माल देणे हीदेखील फसवणूक आहे. तो अप्रामाणिकपणाच आहे. या सर्व गैरव्यवहाराची नोंद ईश्वराजवळ असते व तो 'कयामत'च्या दिवशी सर्व हिशेब तुझ्यासमोर दाखवील. योग्य मोजमाप न करणे म्हणजे दुसऱ्याच्या न्याय्य हक्कास नाकारणे आहे.

मानवातील अधाशीवृत्ती

"जर आम्ही इच्छिले असते तर या (आयती) द्वारे त्याला अत्युच्च स्थान प्रदान केले असते, परंतु तो जमिनीकडेच झुकला व आपल्या इच्छा अभिलाषांच्या मागे लागला, म्हणून त्याचे उदाहरण कुत्र्यासारखे झाले आहे की, तुम्ही त्याला झिडकारले तरीही तो जीभ बाहेर काढील व न झिडकारले तरीही. हे त्या लोकांचे उदाहरण होय ज्यांनी आमच्या आयतींना खोटे ठरविले. तेव्हा हा वृत्तांत लोकांना ऐकवा, यासाठी की त्यांनी विचार-चिंतन करावे." (७:१७६)

मानवातील असलेल्या कमजोरीवर या आयतीत बोट ठेवले गेले आहे. कुत्रा हा सर्वांत आघाशी व हावरट प्राणी आहे. जमिनीवर तो हिंडत असतो, तेव्हा सर्वत्र हुंगत फिरत असतो. एखादे हाडुक मिळते का हे तो धुंडत असतो. सतत धापा टाकीत, जीभ बाहेर लोंबकळत चालत असतो. कोणी त्याला झिडकारले अथवा सोडून दिले तरी त्याचे वणवण फिरणे चालूच राहते, तसेच ऐहिक लाभाच्या लालसेपोटी माणूस कुत्र्याप्रमाणे सतत अस्वस्थ असतो. अल्लाहच्या आयतींकडे वळायचे सोडून कुत्र्याप्रमाणे लाळ गाळत सतत ऐहिक लाभामागे धावत असतो. ऐहिक जीवनात तो रमत असतो, कितीही उपदेश केला तरी तो आपली हाव सोडत नाही. ऐहिक जीवनातल्या हव्यासामागे तो धावत राहतो.

स्त्रीच्या शुचिर्भूततेबद्दल

"ते तुम्हाला विटाळाबद्दल विचारतात, सांगा तो अस्वच्छ आहे आणि म्हणून विटाळाच्या काळात स्त्रियांपासून दूर राहा आणि त्यांच्याशी जवळीक करू नका. जोपर्यंत त्या स्वच्छ होत नाहीत. मग त्या चांगल्याप्रकारे स्वच्छ होतील तेव्हा त्यांच्या जवळ जा, अशाप्रकारे जशी अल्लाहने तुम्हाला आज्ञा दिली आहे." (२:२२२)

स्त्रीच्या मासिक पाळीच्या मुदतीत स्त्रियांपासून दूर राहण्याची आज्ञा दिली गेली आहे. तिचा अर्थ स्त्रियांना अस्पृश्य समजून वेगळे ठेवणे हा नसून त्याचा अर्थ आहे की, फक्त त्यांच्याशी संभोगापासून दूर राहावे. ही गोष्ट प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या एका हदीसवरून स्पष्ट करण्यात आलेली आहे.

ही गोष्ट स्त्री व पुरुष दोघांसाठी योग्यही आहे आणि वैद्यकीयदृष्ट्या आवश्यकही आहे. विटाळाचा काळ संपल्यानंतर संभोगाची मनाई राहत नाही. पण स्नान केल्यानंतर स्वच्छ होऊन नंतरची स्त्रीशी जवळीक करणे योग्य आहे. तसेच "त्यांच्या जवळ जावे अशाप्रकारे जशी अल्लाहने तुम्हाला आज्ञा दिली आहे." याचा अर्थ असा आहे की, संभोग हा नैसर्गिक व स्वाभाविक पद्धतीनेच करावा. त्यात विकृती करू नये. निसर्गाच्या विरुद्ध पद्धत अवलंबू नये.

पापापासून दूरच राहावे

"आणि उघड पापालाही सोडून द्या व गुप्त पापालादेखील. जे लोक पाप कमवितात त्यांना निश्चितच आपल्या कमाईचा मोबदला मिळेल." (६:१२०)

ही आयत खासकरून आहारासंबंधात आलेली आहे. कुरआनातील या आयतीमागील व पुढील आयतीत स्पष्ट केले गेले आहे की, ईश्वराचे नाव न घेता जे जनावर कापले जाते ते श्रद्धावंतांनी खाऊ नये. त्यापासून दूर राहावे. अनेकेश्वरवाद्यांनी मारलेल्या जनावराला वैध न मानणे हे योग्य आहे. कारण ज्या जनावराला (जबीहला) अल्लाहच्या नावाने कापले नसेल ते कुरआनने व काही हदीसमध्येही निषिद्ध ठरवले आहे. अल्लाहने जे निषिद्ध ठरवले आहे त्याला स्पर्शही करू नका. अशीही सक्त ताकीद दिली आहे. प्रत्येक श्रद्धावंताने या ईशआज्ञेचे व प्रेषितांच्या वचनाचे अगदी कसोशीने व पूर्ण श्रद्धेने पालन केलेच पाहिजे. या आज्ञांचे उल्लंघन हे पापच आहे. पाप हे नकळत अथवा समजून उमजून करणे हे सर्वकाळ निषिद्धच मानले पाहिजे. त्यात कोणत्याही पळवाटा शोधणे अशोभनीय आहे व सर्वतः निषिद्ध मानले गेले आहे.

सामाजिक जीवनातील पाळावयाची नीतीमत्ता

माणसाने वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक जीवनात कोणती पथ्ये पाळली पाहिजेत याविषयी आलेले मार्गदर्शन हे कुटुंबाचा एक जबाबदार सदस्य, समाजातील एक जबाबदार नागरिक या नात्याने जीवन कसे व्यतीत करावे हे खरोखरीच सामान्य माणसांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणणारे आहे. सुसंस्कृत व सत्शील जीवन हे समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. कुरआनात दर्शविलेल्या नीतीनियमांचे पालन जो समाज स्वीकारील व अंगीकारील तो समाज निश्चितच स्वकल्याण साधू शकेल यात संशय नाही.

प्रथमत: स्त्रियांसाठी आलेले मार्गदर्शन पाहणे अगत्याचे आहे. म्हणच आहे - 'एक स्त्री सुशिक्षित व सुसंस्कृत बनते तेव्हा एक कुटुंब सुशिक्षित व सुसंस्कृत बनते.' समाजाच्या स्वास्थ्याचा पायाभूत आधार कुटुंबच असते.

"नजरा झुकलेल्या ठेवाव्यात श्रद्धावंत स्त्रियांनी व आपल्या लज्जास्थानांचे संरक्षण करावे आणि आपल्या शृंगारास उघड करू नये, त्याशिवाय जो जो उघड व्हावा आणि आपल्या छातीवर दुपट्ट्यांचे पदर टाकावेत आणि आपला शृंगार जाहीर करू नये, परंतु आपल्या पतीसमोर किंवा आपल्या पिता अथवा पतीचा पिता किंवा आपले पुत्र अथवा आपले भाऊ किंवा आपल्या भावांचे पुत्र अथवा आपल्या बहिणींचे पुत्र अथवा आपल्या स्त्रिया किंवा आपले दास वा अशा पुरुषांसमोर जे आपल्या आधीन असतील वा (स्त्रियांशी) गरज राखत नसतील किंवा अशा मुलांसमोर जे स्त्रियांच्या गुप्त बाबींशी अद्याप परिचित झाले नसतील. आणि आपल्या पायांना जमिनीवर आपटत चालू नये, की आपला जो शृंगार त्यांनी लपवून ठेवला आहे तो कळून यावा आणि हे श्रद्धावंतांनो! तुम्ही सर्व अल्लाहसमोर तौबा करा, यासाठी की सफलता प्राप्त करावी." (२४:३१)

नजरा खाली ठेवाव्यात याचा अर्थ परपुरुषांकडे रोखून पाहू नये, गरज नसताना स्त्रियांनी अनोळखी पुरुषांपासून सावधानतेने वागावे. आपली लज्जास्थाने दिसतील अथवा 'एक्सपोज' होतील अशा रीतीने कपडे वापरू नयेत, स्त्री शरीराची कमनीयता दृगोचर होऊ नये, पोषाख हा नीटनेटका असावा, सुरमा, मेहंदी, अंगुठी वगैरे घालण्यास हरकत नाही. चेहरा व हाताचे तळवे दिसले तरी चालतात, स्त्रीने खरेदी-विक्री व्यवहाराच्या वेळी आपला चेहरा खुला ठेवण्यास हरकत नाही.

वरील आयतीमध्ये मांडल्या गेलेल्या सूचनांविषयी विशेषत: स्त्रीचा चेहरा दिसल्यावर; हात-पाय दिसल्यावर विविध भाष्यकारांनी भाष्ये केलेली दिसतात. तसेच याबाबतीत असे म्हणणे संयुक्तिक ठरते की स्त्रीने आपल्या पोषाखामुळे तिच्या शालीनतेला धक्का पोहचता उपयोगी नाही. भाऊ, वडील, जवळचे नातेवाईक सोडून इतर पुरुष, ज्यांच्या बाबतीत मर्यादाभंग होणार नाही याची काळजी घ्यावी.

"श्रद्धावंत पुरुषांना सांगा की त्यांनी आपल्या नजरा खाली ठेवाव्यात व आपल्या लज्जास्थानांचे संरक्षण करावे, ही पद्धत त्यांच्यासाठी अधिक स्वच्छ व शुद्ध आहे."

(२४:३०)

यात पुरुषांना असा उपदेश दिला आहे की, त्यांनी इतर स्त्रियांची तोंडे न्याहाळू नयेत, नजरा या कामवासनेस प्रेरक असतात व कामवासना निर्लज्जतेस प्रवृत्त करते. खरे पाहता यात लज्जा व संकोचाचे लक्षण म्हणजे नजर खाली ठेवणे असा आहे. इस्लामप्रमाणे स्त्रियांकडे वाईट नजरेने पाहणे, स्त्रियांकडे डोकावून पाहणे, एकटक पाहणे निषिद्ध ठरविले आहे. म्हणूनच स्वच्छ व शुद्ध आचरण ठेवणाऱ्यांनी आपल्या नजरेवर नियंत्रण ठेवले आहे. जसे - "तो डोळ्यांचा अपहार जाणतो." (अल मोमीन-१९) भिरभिरणारी नजर कुलक्षणी मानली जाते. कामवासनेने स्त्रियांकडे पाहणे म्हणजे डोळ्यांचा व्यभिचार आहे.

लज्जारक्षणाचे संरक्षण करणे म्हणजे अनैतिक कामांपासून दूर राहाणे. इस्लामप्रमाणे पुरुषांच्या नाभिपासून गुडघ्यापर्यंतचा भाग गुप्तांग मानले जाते.

सूरह २४:३१ मध्ये स्त्रियांना आपल्या गुप्तांगांचे म्हणजेच लज्जास्थानांचे संरक्षण करण्याचा आदेश आलेला आहे.

"विश्रांती घेणाऱ्या पालकांची परवानगी घेऊनच त्यांच्या शयनगृहात प्रवेश करावा." (२४:५९, सारांश)

"तुम्हा लोकांची ती मुले जी अजून पूर्ण वयात पोहचली नाहीत त्यांनी तीनवेळा तुमच्याकडून परवानगी घेत जावी, फज्रच्या नमाजपूर्वी, दुपारी जेव्हा कपडे काढून आराम करतात आणि ईशाच्या नमाजनंतर. या तीन वेळानंतर (परवानगी न घेता त्यांच्या येण्यात) ना त्यांच्यावर काही दोष आहे आणि ना तुमच्यावर, तुमचे एकमेकांजवळ वारंवार येणे-जाणे होत असते." (२४:५८)

यात दर्शविलेल्या वेळी कसे वागावे याचे मार्गदर्शन आलेले आहे. सूरह २४:५९ मध्ये असेच कसे वागावे याबाबतही सांगण्यात आलेले आहे. २४:६० मध्ये "म्हाताऱ्या व विवाहाची आशा बाळगत नाहीत, त्यांनी जर दुपट्टा उतरवून ठेवलेत तर त्यांच्यावर काही दोष नाही. मात्र या अटींवर की त्या प्रदर्शन करणाऱ्या नसाव्यात. परंतु त्यांच्या हक्कात हेच अधिक चांगले आहे की, यापासून अलिप्त राहावे."

"हे प्रेषित! आपल्या पत्नींना, आपल्या मुली आणि श्रद्धावंतांच्या स्त्रियांना सांगा की आपल्या अंगावर चादरी टाकून घ्याव्यात. हे या दृष्टीने अधिक योग्य आहे की त्यांची ओळख व्हावी आणि सतावल्या न जाव्यात." (३३:५९)

अंगावर चादरी टाकून घ्याव्यात म्हणजे त्या सुशील, लज्जाशील व कूलीन स्त्रिया म्हणून ओळखल्या जाव्यात. त्यामुळे असामाजिक तत्त्व त्यांच्याशी वेडेवाकडे आचरण करणार नाहीत. येथे दुपट्टा, चादरी अंगावर टाकणे म्हणजे ज्यात त्यांच्या शरीराच्या उघड्या भागास सौंदर्य व पोषाखाचा रेखीवपणा लपविणे हा आहे.

सूरह ३३:३० मध्ये प्रेषितांच्या पत्नींना तंबी देण्यात आली आहे की, त्यांनी आपल्या जीवनाद्वारे उत्कृष्ट नैतिक जीवनाचा आदर्श समाजात निर्माण करावा. प्रेषितांच्या पत्नी म्हणून त्यांना कसेही वागण्याची मुभा दिलेली नाही.

"तो नजरांच्या चोरीसही जाणतो आणि त्या गोष्टींनाही ज्या छातीत (अंत:करणात) लपवून ठेवल्या आहेत." (४०:१९)

नजरांची चोरी म्हणजे माणसाने लपून छपून त्या गोष्टींवर नजर टाकली, जी त्यांना पाहण्याची मनाई आहे. उदाहरणार्थ, एखाद्या अनोळखी स्त्रीला पाहण्यासाठी डोकावणे, गुप्तपणे एखाद्याच्या लपविण्याजोग्या अवयवांवर नजर टाकणे किंवा अश्लील दृश्ये, चित्रे पाहणे इत्यादी. जो खरा नीतीमान असेल त्याने असल्या गोष्टींपासून अलिप्त राहणे. अशा कोणत्याही गोष्टीवर जिला निषिद्ध ठरविले आहे, ती न पाहावी. अल्लाह सर्वज्ञाता आहे, त्याच्यापासून काहीही लपू शकत नाही, तुम्ही लपून-छपून जे पाहता तेदेखील तो पाहतो.

"जे मोठ्या अपराधांच्या व निर्लज्जतेच्या कामापासून अलिप्त राहतात आणि जेव्हा राग येतो तेव्हा माफ करतात." (४२:३७)

निर्लज्जतेच्या गोष्टींमध्ये व्यभिचार, कुकर्म, नग्न आणि अश्लील चित्रे किंवा चित्रपट पाहणे, प्रेमाचे चाळे करणे, शारीरिक आकर्षण निर्माण करणारी गाणी गाणे अथवा पाहणे, स्त्रियांचे बिभत्स चाळे, नृत्ये, हावभाव या सर्व गोष्टी निर्लज्जतेत प्रथम क्रमांकाच्या मानल्या जातात.

येथे हे अपेक्षित आहे की निर्लज्जतेच्या गोष्टींपासून अलिप्त राहणे, निर्लज्जता उद्युक्त करणाऱ्या गोष्टींपासून दूर राहणे. माणसाने बाह्यांगाने व अंतर्मनानेदेखील शुद्ध व पवित्र राहिले पाहिजे.

ही प्रथा इस्लाममध्येच आहे असे नाही तर सर्वसाधारणत: सुशील व सुसंस्कृत स्त्रिया आपल्या डोक्यावर पदर घेतात. तसेच त्यांच्या बोलण्या-चालण्यात, हिंडण्या-फिरण्यात, वावरण्यात आदबशीरपणा असतो.

कुरआनचे बरेच भाष्यकार ३३:५३ ही आयत पडद्यासंदर्भात आलेली पहिली आयत म्हणून मानतात. तसेच पडद्याच्या आदेशाची सुरुवात प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या

घरापासून केली गेली. सूरह नूर व अहजाब यांचे अवलोकन केल्यास स्त्रियांबाबत विस्ताराने माहिती देण्यात आलेली आहे.

सार्वजनिक जीवनात कसे वागावे हे सर्वसामान्य स्त्री-पुरुषांना मार्गदर्शन देते. आपण ज्याला नैतिकता म्हणतो ते नैतिकतेचे सर्वसाधारण नियम व निर्बंध यात सुचविलेले आहेत.

नमाजचे महत्त्व

"नि:संशय नमाज निर्लज्जता व दुष्कर्मापासून रोखते आणि अल्लाहचे नामस्मरण फार मोठी गोष्ट आहे." (कुरआन - २९:४५)

नित्य नियमाने नमाज पढणे इतके सोपे नाही. कारण नमाज पढण्यासाठी नमाज पढणाऱ्यास अनेक बंधने पाळावी लागतात. शुद्ध नैतिक आचरण व वैचारिक शुद्धतादेखील पाळावी लागते. त्याशिवाय शरियत व 'मिन्हाज' म्हणजे आचरणाचे नियम व त्याप्रमाणे वर्तनही ठेवणे आवश्यक आहे. तरच तुमची नमाज ईश्वरास मान्य होते. म्हणूनच म्हटले आहे की, नमाज फार कठीण आहे. माणूस आपोआपच दुष्कर्मापासून दूर होतो. नमाजबरोबर ईश्वराचे चिंतन हे फार मोठे पुण्यप्रद काम आहे. नित्य नियमाने नमाज अदा करणाऱ्यावर अनेक बंधने येतात व त्यामुळे तो आपोआपच निर्लज्जता व दुष्कर्मांपासून रोखला जातो. ईशस्मरणात गुंतणारा इतर सर्व गोष्टींपासून अलिप्त बनत जातो. म्हणून नमाज व अल्लाहचे नामस्मरण फार मोठी गोष्ट आहे असे म्हटले गेले आहे.

अनाथावर सक्ती करू नका

"म्हणून तुम्ही अनाथावर सक्ती करू नका आणि याचकाला झिडकारू नका." (कुरआन - ९३:९-१०)

ईश्वराची इच्छा आहे की, जे अनाथ असतात त्यांना मदत करा, ते असहाय्य असतात म्हणून त्यांना सहाय्य करा. कोणी अनाथांचे हक्क जर हिरावून घेत असेल तर त्याला प्रतिबंध करा व त्याच्या हक्काचे संरक्षण करा. त्यांच्याशी जुलमाने व निष्ठूरपणे वागू नका. कुरआन असे सांगते की, ईश्वराने तुम्हाला दिलेले आहे त्यातून तुम्ही लोकांना द्या. धन हे खर्चण्यासाठीच आहे. तुम्ही धनपूजक होऊ नका. धन हे तुमची परीक्षा पाहण्यासाठी ईश्वराने दिलेले आहे. दीनदुबळे, गरीब व लाचार यांना झिडकारू नका. त्यांच्याशी प्रेमाने व सद्‌भावनेने वागा. म्हणूनच म्हटले आहे की, तुमच्या प्रत्येक पैशाच्या प्राप्तीत गरिबांचा वाटा आहे. याचक हा मजबुरीने तुमच्या दारी येतो, त्याला झिडकारू नका, जर काही देऊ शकत नसाल तर त्याला सलाम करून बाजूस व्हा.

आपल्या नजरा खाली ठेवा

"श्रद्धावंत पुरुषांना सांगा की त्यांनी आपल्या नजरा खाली ठेवाव्यात व आपल्या लज्जास्थानांचे संरक्षण करावे, ही पद्धत त्यांच्यासाठी अधिक स्वच्छ व शुद्ध आहे."

(कुरआन - २४:३०)

समाजात सभ्यपणे वागणे गरजेचे आहे. म्हणून सूचित केले गेले आहे की, पुरुषांनी आपल्या नजरा खाली ठेवाव्यात म्हणजे परस्त्रियांशी तुम्ही बोलताना त्यांचे मुखावलोकन करीत किंवा त्यांच्याकडे टक लावून बोलू नका. तसेच आपली वस्त्र-प्रावरणे व्यवस्थित घालावीत. वस्त्रे ही आपली लज्जास्थाने झाकण्यासाठी असतात याचा विसर पडू नये. अर्थात ही सूचना स्त्रियांनादेखील लागू पडते. ही पद्धत स्वच्छ, शुद्ध व पवित्र समजली पाहिजे. माणसाच्या राहणीवरून व बोलण्या चालण्यावरून त्याची सुसंस्कृतता दिसते. आपले राहणे शुद्ध व स्वच्छ असावे. छचोरपणा अथवा उतशृंखलपणा तुमच्या पेहरावात व वर्तनात दिसता उपयोगी नाही.

तुमच्या कमाईचा मोबदला तुम्हाला मिळेल

"आणि उघड पापालाही सोडून द्या व गुप्त पापालादेखील. जे लोक पाप कमावतात त्यांना निश्चितच त्यांच्या कमाईचा मोबदला मिळेल." (कुरआन-६:१२०)

जे दुष्कर्म आहे ते पाप आहे व तुम्ही कोणतेही कुकर्म गुप्तपणे केले अथवा उघड केले तरी ते ईशदृष्टीतून चुकत नाही. ईश्वर हा सर्वसाक्षी व सर्व जाणणारा आहे हे विसरू नका. म्हणून माणसाने अपराधाच्या-पापाच्या केवळ बाह्य पैलूपासून अलिप्तता राखणे पुरेसे नाही. त्याने आंतरिक परिणामांपासूनदेखील अलिप्त राहणे आवश्यक आहे. प्रत्येक अपराधाबद्दल-कुकर्माबद्दल ही सर्वसाधारण ईशआज्ञा आहे. म्हणून या आयतीत (ऋचेत) सर्वांना सचेत करण्यात आले आहे की तुमचे गुप्त अथवा उघड पाप याचे उत्तरदायित्व तुमच्यावर आहे ते तुम्ही टाळू शकत नाहीत. त्यामुळे स्पष्ट जाणीव देण्यात आली आहे की तुमच्या कर्माचा तुम्हाला मोबदला मिळेलच म्हणून सावधतेने वागा व बेफिकीरपणे वागू नका.

जालीम जनसमूहाचा विनाश होणारच

"तुमच्यापूर्वी आम्ही (कित्येक) जनसमूहांना नष्ट केले आहे, जेव्हा त्यांनी अत्याचार केला. आम्ही अपराधी समूहास असा मोबदला देतो." (कुरआन-१०:१३)

जे जनसमूह आपल्या दुर्वर्तनात आघाडीवर होते व त्यांना त्यांच्याकडे त्यांची सुधारणा घडविण्यासाठी आपले प्रेषित अल्लाहने पाठविले. त्या प्रेषितांची शिकवण त्यांनी स्वीकारली नाही आणि उलट त्यांची अवहेलनाच केली व उन्मत्तपणे त्यांनाच खोटे ठरविण्याचा प्रयत्न केला. त्यांना पुरेपूर संधी देऊनही त्यांनी त्यांच्यात सुधारणा केली

नाही. अशा विद्रोही जनसमूहावर ईश्वराचा प्रकोप कोसळला व त्यांचा सर्वनाश झाला. त्यांच्या सर्वनाशास ते स्वत:च कारणीभूत ठरले. कुरआनात अशा उद्ध्वस्त केल्या गेलेल्या जनसमूहांची उदाहरणे दिलेली आहेत. उदा. आद, समूद, मदयन वगैरे, त्यांच्यावर ईश्वराचा प्रकोप उतरला व ते नष्ट झाले. त्यांच्या खुणा अरबस्तानातील विविध प्रदेशांत आजही आढळतात.

ऐहिक मोहजालात सापडू नका

"हे श्रद्धाळुंनो! तुमच्या संपत्तीने व तुमच्या संततीने तुम्हाला अल्लाहपासून गाफील न करावे. जे लोक असे करतील तेच तोट्यात राहणारे आहेत."

(कुरआन-६३:०९)

या आॅयतीत श्रद्धावंतांना उद्देशून उपदेश केला गेला आहे की संपत्ती व संतती यांच्या मोहात अडकून अल्लाहच्या स्मरणापासून गाफील होऊ नये. संपत्ती व संतती यांचा मोह माणसाला चुकीच्या मार्गाकडे घेऊन जातो. तो संपत्ती व संतती यांच्या विचारात गुरफटून, ऐहिक जीवनात मग्न होऊन भौतिक सुखे मिळविण्यात इतका मग्न होत जातो की त्याला ईश्वराचे स्मरण करण्यासही उसंत मिळत नाही. तो ईशप्रार्थना व ईशआदेशाने जगण्याचेही विसरून जातो व आखिरत (परलोक जीवन) याविषयी गाफील बनत जातो. ऐहिक जीवन हे क्षणभंगूर आहे व पारलौकिक जीवन हे कायम राहणारे आहे असे कुरआनात स्पष्टपणे म्हटले आहे. त्यामुळे माणूस आपल्या जीवनाच्या खऱ्या पारमार्थिक जीवनास मुकतो त्यामुळे तो तोट्यात राहतो, असे सुचविले आहे.

ईश्वराचा करिष्मा

"अल्लाहने तुम्हाला तुमच्या मातांच्या उदरातून अशा स्थितीत काढले की, तुम्ही काहीही जाणत नव्हता आणि त्याने तुमच्यासाठी कान, डोळे व हृदय बनविले. अशासाठी की तुम्ही कृतज्ञ व्हावे."

(कुरआन-१६:७८)

माणूस जेव्हा जन्माला येतो तेव्हा तो अज्ञान असतो. परंतु हळूहळू त्याची दृकश्राव्यशक्ती विकसित होत जाते. हळूहळू तो विचार व चिंतन करू लागतो. त्यामुळे तो आपल्या बुद्धीच्या जोरावर विविध ज्ञानशाखात प्रगत झालेला आहे. पशुंना त्यांची ज्ञानशक्ती सीमित असते. मानवाने आपल्या अफाट बुद्धीच्या जोरावर सृष्टीतील इतरांवर (सजीवांवर) प्रभुत्व मिळविले आहे. ही सर्व सामर्थ्ये ईश्वरानेच मानवास प्राप्त करून दिली आहेत. पण दुर्दैवाने मानव आपल्या पालनकर्त्या जगन्नियंत्याला पार विसरून जातो व आपल्याच भ्रामक कर्तृत्वाच्या कल्पनेत मशगुल होतो आणि ईश्वराप्रत कृतज्ञता व्यक्त करण्यास विसरतो.

खोट्याच्या कपाळी गोटा

"सर्वनाश आहे प्रत्येक खोटारड्या गुन्हेगार माणसाकरिता."

(कुरआन-४५:०७)

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व दुर्गुणांचे मूळ खोटारडेपणात आहे. भ्याड मनुष्य खोटे बोलतो. एक खोटे लपविण्यासाठी दुसरे व तिसरे अशी खोटेपणाची मालिकाच सुरू होते. खोटे बोलण्याची सवय त्याच्या वर्तनातही प्रतिबिंबित होते. खोटे वागणारा हळूहळू अगदी निर्ढावतो आणि त्याला खोटे बोलण्याचे व वागण्याचे काहीच वाटेनासे होते. खोटी प्रवृत्ती ही विकृती निर्माण होते व ती गुन्हेगारी प्रवृत्तीस चालना देते. खोटा मनुष्य आपली विश्वासार्हता गमावून बसतो. मुळात खोटेपणा सर्व लहान-मोठ्या दुर्गुणांची जननी बनतो. एक खोटेपण जर माणसाने सोडले तर त्याच्यातील अनेक दोष नाहिसे होतात. म्हणूनच ईशवचन आहे की खोटारडेपणा सर्वनाशाप्रत नेतो. खोटारडेपणा हा तुम्हाला गुन्हेगार बनवितो व त्यातून तुमची सर्वनाशाकडे वाटचाल होते.

मानवी समूह एकच आहे

'सूरह अररूम' मधील २२ वी आयत "आणि त्याच्या निशाण्यांपैकी आकाशाची व पृथ्वीची उत्पत्ती आणि तुमच्या भाषा व तुमच्या वर्गांची भिन्नता आहे. निश्चितच यात बऱ्याच निशाण्या आहेत बुद्धिमान लोकांसाठी." तसेच सूरह २१ मधील ९२ व ९३ व्या आयतीत म्हटले आहे, "हा समूह वास्तविकत: एकच समूह आहे आणि मी तुमचा रब आहे, म्हणून तुम्ही माझी 'बंदगी' करा (परंतु हे लोकांचे कारस्थान आहे की) त्यांनी आपसांत आपला धर्म तुकडे करून टाकला. सर्वांना आमच्याकडेच परतायचे आहे."

वास्तविक संपूर्ण मानवजात ही मुळच्या एकाच दांपत्याच्या संतानांचा विस्तार आहे. त्या ईश्वराने निर्मिलेल्या पृथ्वीतलावरच मानवजात नांदत आहे. मानवसमाज कालांतराने सर्व पृथ्वीतलावर पसरला. विविध भागांतील भौगोलिक परिस्थिती, हवामान, तापमान याचा त्यांच्या बाह्य ठेवणीवर-रंगरूपावर परिणाम झाला. स्थळ-काळपरत्वे हा बदल अपेक्षितच होता. कालांतराने त्यांच्या भाषा बदलल्या, उच्चारणपद्धती बदलल्या, वेशभूषेत फरक पडला.

ईश्वराने आपले प्रेषित विविध भागांत पाठविले, ज्यांनी ईशसंदेश त्यांच्यापर्यंत पोहचविले. परंतु पुढील काळात लोकांनी त्या संदेशांची मोडतोड केली. आपल्या सोयीनुसार संकुचितवृत्तीने त्यांच्या नावावर आपले विचार पसरविले. बंधुत्वाची भावना

नष्ट होऊन मानवी समूह विविध धर्मांत, पंथांत व गटांत विभागले गेले. परंतु त्रिकालाबाधित सत्य हे आहे की, ईश्वराच्या पृथ्वीतलावर व आकाशाखाली तो नांदत आहे व त्याला त्याच्याकडे परतावे लागते. त्यामुळे विचारी माणूस एकच एक ईश्वर आहे आणि अखिल मानवजात एकच आहे हे विसरू शकत नाही.

जालिमांना शिक्षा अटळ आहे

कुरआनातील विविध अध्यायांत विविध आयती आल्या आहेत. ज्यांत जालिमांना ईश्वर शिक्षा देणारच आहे व ती कोणीही टाळू शकणार नाही, असे म्हटले आहे.

सूरह 'अनआम'मधील २१ व्या आयतीत म्हटले आहे, "जो ईश्वरावर खोटे आळ लावतो त्याच्यापेक्षा अधिक अत्याचारी कोण असेल?"

सूरह 'इब्राहीम'मधील तिसऱ्या आयतीत म्हटले आहे, "जे अल्लाहच्या मार्गावर चालणाऱ्यास रोखतात व वक्र मार्गावर त्यांनी चालावे म्हणून प्रयत्न करतात ते पथभ्रष्टतेत फार दूर गेले आहेत."

सूरह 'अल कसस'मधील ३७ वी आयत म्हणते, "जुलमी कधीही सफल होणार नाहीत."

सूरह 'यूसुफ' आयत ५२ मध्ये म्हटले आहे, "विश्वासघात करणारे सफल होत नाहीत."

सूरह 'अल मोमिन' ३४ व ३५ व्या आयतीत आले आहे की, "गर्विष्ठ व जुलमी लोकांच्या हृदयावर अल्लाह मोहोर लावतो."

सूरह 'अश शुरा' ८ वी आयत अशी आहे की, "जालिमांना कोणी वालीही नाही व सहाय्यकही नाही."

वरील आयतींवरून स्पष्ट होते की, लोकांना चुकीचे सल्ले देणे, चुकीचे मार्गदर्शन करणे, ईशआज्ञा व आदेशांना खोटे ठरविणे, खोटे आळ घेणे, गर्विष्ठपणे वागणे, विश्वासघात करणे, स्वतःच्या सुखप्राप्तीसाठी अवैध मार्गाचा अवलंब करणे व सन्मार्गी लोकांना कुमार्गास लावणे ही सर्व कृत्ये ईशदृष्टीत जालीमपणाची लक्षणे आहेत. ही कृत्ये कितीही लपूनछपून केली तरी ईशनजरेतून सुटणार नाहीत व त्यांना ईशशिक्षा ही होणारच. ईश्वराच्या नजरेत जी कृत्ये जालीम ठरतील त्यापासून दूर राहावे, हेच हितकारक आहे.

आहार

सूरह 'अल बकरा'तील १७२ व्या आयतीत म्हटले आहे की, "हे श्रद्धाळूनों! ज्या शुद्ध वस्तू आम्ही तुम्हाला दिल्या आहेत, त्या खा आणि अल्लाहचे आभार माना." त्याच अध्यायातील १७३ व्या ऋचेत म्हटले आहे, "त्याने तुमच्यासाठी मेलेल्या जनावरांचे मांस, रक्त, डुकराचे मांस आणि ते ज्याच्यावर अल्लाहशिवाय दुसऱ्याचे नाव घेतले असेल निषिद्ध ठरविले आहे." तसेच 'अल माईदा' या अध्यायातील ११ व्या ऋचेत "तुमच्यासाठी चारा खाणारी चतुष्पाद जनावरे रास्त ठरविली आहेत."

मेलेल्या जनावराचे किंवा पक्ष्याचे मांस खाऊ नये कारण त्याचे रक्त शरीरातच राहते व त्यामुळे त्याचे मांस अशुद्ध व आरोग्यास अपायकारक ठरते. नैसर्गिक मृत्यु पावलेले जनावर एखाद्या रोगाने मेले असल्याची शक्यता असते. रक्त हिंस्त्र पशु पितात, मानवाने ते अशुद्ध असल्यामुळे पिऊ नये. मानसात हिंसक वृत्ती निर्माण होऊ शकते व नैतिक अध:पतन होऊ शकते. जे जनावर अल्लाहच्या नावाशिवाय इतर नाव (देवतेचे) घेऊन कापले असेल तर ते एकेश्वरवादाविरुद्ध ठरते म्हणून मुस्लिम असणाऱ्याने ते खाऊ नये. डुकराच्या अंगातील यूरिक ॲसिड हे मुत्राद्वारे केवळ २ टक्केच बाहेर पडते बाकी त्याच्याच शरीरात राहते, जे माणसाच्या आरोग्यास घातक आहे हे आज विज्ञानाने सिद्ध केले आहे. इतरांच्या बाबतीत मानवासहित युरिक ॲसिड ९८ टक्के मुत्राद्वारे बाहेर फेकले जाते. सतत डुकराचे मांस खाणाऱ्यात संधीवाताचे प्रमाण सर्वांत जास्त आहे. आपद् धर्म म्हणून वरील आज्ञेचा भंग झाला तर ईश्वर त्यास क्षमा करतो. तसे करताना ईश अवज्ञेचा हेतू नसावा.

सब्र (संयम)

कुरआनात सब्र-संयम यावर सातत्याने भर देण्यात आला आहे. संयम याबद्दल कुरआनात ७०पेक्षा जास्त आयती (ऋचा) आलेल्या आहेत.

सूरह (अध्याय) 'अल बकरा' मधील ४५ व्या ऋचेत म्हटले आहे, "सहनशीलता व नमाजाचे सहाय्य घ्या. नि:संशय हे कठीण आहे. परंतु जे लोक नम्रता धारण करतात, त्यांना हे कठीण नाही."

त्याच अध्यायात १५३ व्या आयतीत म्हटले आहे, "श्रद्धाळू लोकांनो, सहनशीलतेचे व नमाजचे सहाय्य घ्या. नि:संशय अल्लाह सहनशील लोकांबरोबर आहे." त्याच अध्यायातील १५५ आयतीत "सहनशीलता अजमावण्यासाठी आम्ही तुम्हाला सर्व तऱ्हेच्या अडचणींमध्ये घालू. पाहू खरा सहनशील कोण आहे!"

वरील आयतीत संयम महान शक्ती असल्याचे विशद केले आहे. अल्लाहच्या आज्ञाधारकतेचे जीवन व्यतीत करण्यासाठी ज्या सुप्त शक्तीची गरज आहे ती संयम व नमाज (प्रार्थना) द्वारे प्राप्त होऊ शकते. जोपर्यंत मनुष्य आपल्या इच्छा, आकांक्षा, अभिलाषा नियंत्रित करू शकत नाही तोपर्यंत तो ईशआज्ञापालन व ईशदास्यत्व खऱ्या अर्थाने स्वीकारू शकत नाही.

म्हणून दुसऱ्या अध्यायातील १९७ व्या आयतीत ठामपणे सांगितले आहे, "आखिरतच्या (परलोक) प्रवासासाठी सर्वोच्च शिदोरी संयम हीच आहे."

नाहक हत्या भयंकर अपराध आहे

पवित्र कुरआनातील अध्याय 'अल माईदा' यातील ३२ व्या ऋचेत (आयतीत) म्हटले आहे, "ज्याने एका निष्पाप व्यक्तीची हत्या केली त्याने समस्त मानवजातीची हत्या केली. ज्याने एका निष्पाप व्यक्तीचे प्राण वाचविले, त्याने समस्त मानवजातीला जीवदान दिले."

वरील आयतीवरून स्पष्ट होते की इस्लामच्या नजरेत नाहक हत्या भयंकर अपराध आहे आणि एखाद्या निष्पाप माणसास वाचविणे केवढे मोठे पुण्यकर्म आहे! जो एखाद्याचा नाहक जीव घेतो तो मानवतेविरुद्ध पाऊल उचलतो. जेव्हा मानवी प्राणाची कदर वाटत नाही तेव्हाच असा अपराध करण्यास तो धजावतो. असा माणूस संपूर्ण मानवजातीस धोकादायक ठरतो. याउलट जो एखाद्याला मृत्युच्या दाढेतून वाचवतो तो केवळ एक पुण्यकर्म करतो असे नव्हे तर तो मानवजातीची व मानवी प्राणाची कदर करतो. तो मानवतेची खरी सेवा करतो व तो मानवतेचा खरा हितचिंतक असतो. असाच मनुष्य मानवी समाजाचा संरक्षक होऊ शकतो. म्हणूनच त्याने मानवजातीला जीवदान दिले असे म्हटले आहे.

पुढे याच आयतीत म्हटले आहे, "आमचे प्रेषित यांच्याजवळ स्पष्ट आदेश घेऊन आलेत, परंतु एवढे असतानाही यांच्यात बहुसंख्य लोक असे आहेत जे जमिनीवर अतिरेक करतात."

हा उपदेश यहूदींसाठी असला तरी तो अखिल मानवांसाठीसुद्धा मार्गदर्शक ठरतो.

सामूहिक उत्पाताचे निर्मूलन

कुरआनातील 'अल अनफाल' या अध्यायातील २५ व्या ऋचेत ईशआज्ञा आली आहे, "आणि अलिप्त राहा त्या उपद्रवापासून ज्याचा दुष्परिणाम प्रामुख्याने फक्त त्याच लोकांपर्यंत मर्यादित राहणार नाही ज्यांनी तुम्हांपैकी पाप केलेले असेल आणि जाणून असा की अल्लाह कठोर शिक्षा देणारा आहे."

आपण ज्या समाजात राहतो त्यातील काही लोक जर काही उपद्रव निर्माण करू पाहात असतील तर ते मुळातच दाबले पाहिजेत. त्यासाठी सर्व समाजाने अतिशय जागरूक असले पाहिजे. आपला काय त्याच्याशी संबंध? असे म्हणून डोळेझाक करता उपयोगी नाही. नाहीतर कदाचित त्या उपद्रवापासून मोठा विघातक उद्रेक होऊन उपद्रव निर्माण करणाऱ्यालाच नव्हे तर सर्व समाजाला जबरदस्त झळ बसू शकते.

समाजातील उपद्रवी लोक काय करीत आहेत याकडे सतत जागरुकपणे सर्व समाजाने लक्ष दिल पाहिजे. असे उपद्रव मुळातच उखडून टाकले पाहिजेत म्हणजे संभाव्य उत्पात टाळला जाऊन समाजाची होणारी हानी टाळता येईल. थोडक्यात, समाजातील सर्वांनीच आपले कान व डोळे उघडे ठेवून वावरले पाहिजे म्हणजे उपद्रवी लोकांची उपद्रव निर्माण करण्याची हिंमत होणार नाही व सर्व समाजास सुरक्षितता लाभेल, नाहीतर गव्हाबरोबर किडे या नात्याने निष्पाप लोकही भरडले जाऊ शकतात याची समाजाने जाणीव ठेवावी.

अनाथांची संपत्ती हडप करू नका

सूरह 'अन निसा' मधील आयत २ व १० मध्ये अनाथांची संपत्ती ते ती सांभाळण्यास योग्य होताच त्यांच्या विश्वस्तांनी त्यांच्या स्वाधीन करावी. जो विश्वस्त असेल त्याने त्या संपत्तीत हेराफेरी करू नये. आपली वाईट मालमत्ता त्यांच्या चांगल्या मालमत्तेत मिसळू नये अथवा त्यांची चांगली संपत्ती हडप करून त्याजागी आपली निकृष्ट संपत्ती ठेवू नये. तसे जर तुम्ही कराल तर तो मोठा अपराध ईशनजरेत ठरेल. अनाथ असाहाय्य आहेत म्हणून कोणीही त्यांची फसवणूक करू नये. कारण तुम्ही इतरांच्या डोळ्यांत धूळफेक करू शकाल पण सर्वसाक्षी व सर्वज्ञानी अशा अल्लाहच्या नजरेतून तुम्ही सुटणार नाही. कोणाच्याही असहाय्यतेचा फायदा घेऊन स्वत:चा स्वार्थ साधणे हे ईशनजरेत महापाप व घोर अपराध आहे हे कोणीही विसरू नये. दहाव्या आयतीत स्पष्टपणे म्हटले आहे, "जे लोक अनाथांची संपत्ती अत्याचाराने खातात ते आपल्या पोटांत आग भरीत आहेत. लवकरच ते भडकत्या आगीत दाखल होतील."

अत्याचाराने जो अनाथांची संपत्ती हडप करतो तो प्रत्यक्ष आपले पोट आगीने भरत आहे जी त्याला अंतर्बाह्य जाळून भस्म करेल. तात्पुरता तुम्ही स्वार्थ साधाल पण ईशनिवाड्याच्या दिवशी तुम्ही कायमचे भडकत्या नरकाग्नीत टाकले जाल.

मत्सरी बनू नका

सूरह 'अन निसा'मधील ३२ व्या आयतीत आले आहे, "आणि जे काही अल्लाहने तुमच्यापैकी एखाद्याला दुसऱ्याच्या तुलनेत अधिक दिले आहे, त्याची अभिलाषा धरू नका.

पुरुष व स्त्रिया जे काही कमावतात त्यांचा वाटा त्यानुसार आहे. अल्लाहजवळ त्याच्या कृपेची प्रार्थना करा नि:संशय अल्लाह प्रत्येक वस्तूचे ज्ञान राखतो.''

अल्लाहच्या कृपेने काही स्त्री-पुरुषांना इतरांपेक्षा जास्त लाभ होतो. बाह्यत: ही आपल्याला विषमता वाटते, परंतु हा लाभ देण्यामागे ईश्वराची काही विशेष योजना असते हे आपल्या लक्षात येत नाही. अर्थात त्यामागील हेतू फक्त ईश्वरच जाणतो. आपल्यापेक्षा धन, सामर्थ्य, इभ्रत, बुद्धिमत्ता, सुख, दर्जा यांत इतरेजण जे वरचढ आहेत त्याबद्दल आपणास मत्सर वाटता उपयोगी नाही. आपण जास्त मिळविण्यासाठी आपल्यातील मत्सर नाहिसा करून प्रयत्नशील व्हावे. यशप्राप्तीसाठी ईशोपसना करावी. त्यामुळे आपल्यातील कमतरतांची जाणीव होऊन आपण त्यावर मात करून ईशकृपेने जास्त लाभ मिळवू शकतो. आपल्यापेक्षा वरचढ असलेल्यांचा द्वेष व मत्सर करण्यापेक्षा आपल्यातील कमतरता दूर करून यश मिळावे म्हणून ईश्वराची प्रार्थना करावी. प्रयत्न करणाऱ्यांना ईश्वर सहाय्य करतो. म्हणूनच ''प्रयत्नांती परमेश्वर'' म्हटले आहे. आपण फक्त शुद्ध मनाने व रास्त मार्गांनी आपल्या प्रगतीसाठी प्रयत्न करावेत. इतरांचा द्वेष व मत्सर करण्यात आपली बुद्धी व शक्ती वाया घालवू नये.

शुद्ध व अशुद्ध समान नाहीत

''सांगा, अशुद्ध व शुद्ध दोन्ही समान होऊ शकत नाहीत, मग अशुद्धेतेची अधिकता तुम्हाला कितीही चांगली वाटेना. तर हे बुद्धिमंतांनो, अल्लाहचे भय बाळगा, अशासाठी की तुम्हाला सफलता प्राप्त व्हावी.'' - सूरह अल माईदा, आयत १००

शुद्ध व अशुद्ध, सत्य आणि असत्य हे कधीच समान नसतात. असली आणि नकली हे आकर्षक दिसले तरी ते सत्याची, शुद्धतेची आणि अस्सल जे असते त्याची बरोबरी कधीच करू शकत नाही. माणूस नकलींच्या आकर्षकतेस बळी पडतो व स्वत:च नुकसानीत येतो. म्हणून कुरआनात हे आवाहन करण्यात आले आहे की, बुद्धिमंतांनी, शहाण्यांनी या नकली गोष्टींच्या आकर्षणास बळी पडू नये. ईश्वराची सतत प्रार्थना करून आपणास अशा गोष्टींपासून दूर राहण्याची बुद्धी त्याने द्यावी असे मागावे. असेच शुद्ध-अशुद्ध, सत्य-असत्य, असली-नकली यातील भेद ओळखून अशुद्धतेच्या आहारी जाणार नाहीत व आपल्या जीवनात सफल होतील. असत्याच्या मोहात पडून माणसाने नुकसानीत येण्यापासून वाचावे. म्हणूनच म्हणतात, विनाशकाले विपरीत बुद्धी, त्यापासून वाचण्यासाठी ईश्वरास शरण जाऊन सत्य-असत्यातील भेद जाणण्याची क्षमता मागून यशस्वीतेकडे वाटचाल करावी.

प्रकरण चौथे

पवित्र कुरआनातील आश्चर्यकारक भाकिते

पवित्र कुरआनात विशद केलेली काही भाकिते अगदी आश्चर्यकारकरीत्या खरी ठरली आहेत. हे पाहिल्यावर खरोखरीच वाचक स्तंभित होतो.

कुरआनातील 'सूरह रूम' मध्ये आलेली भाकिते लक्षात घेण्यासारखी आहेत.

''रोमन पराभूत झालेत, जवळच्या प्रदेशात आणि ते आपल्या पराभूततेनंतर वर्चस्वशाली होतील काही वर्षात. अल्लाहचाच अधिकार आहे. पूर्वीदेखील व नंतरही आणि त्या दिवशी श्रद्धा बाळगणारे आनंदविभोर होतील, अल्लाहच्या मदतीने तो ज्याला इच्छितो मदत प्रदान करतो, तो वर्चस्वशाली व दयावंत आहे.''

(सूरह अररूम, आयत २ ते ५)

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आगमनकाळात दोन विशाल साम्राज्ये होती. एक पर्शियन साम्राज्य व दुसरे रोमन साम्राज्य, रोमन साम्राज्यात पॅलेस्टीन, सीरिया, तुर्कस्तान वगैरे प्रदेश होता. ज्याची राजधानी कुस्तुतुनिया होती. रोमन लोक येशूला मानत होते. अंतर्गत बंडखोरीमुळे त्यांचे साम्राज्य कमकुवत झाले होते. पर्शियन लोक अग्नीपूजक होते. अंतर्गत बंडाळीमुळे कमकुवत झालेल्या रोमन साम्राज्याला पराभूत करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांनी सतत आक्रमणे करून सीरिया व पॅलेस्टीनच्या भागावर आपला कब्जा केला. ते इसवी सन ६१६ मध्ये अरब देशाच्या उत्तर सीमेपर्यंत येऊन पोहचले, ज्या ठिकाणी रोमन लोकांचा ताबा होता. रोमन लोकांच्या पराभवाने मक्केचे अनेकेश्वरवादी कुरैश आनंदीत झाले, जे मुस्लिमांना हिणवत होते की, तुमच्याप्रमाणेच रोमन ग्रंथधारी होते, त्यांची कशी वाताहत झाली. जर ते सत्यमार्गावर असते तर पराभूत का झाले? पर्शियन अग्नीपूजक असून अनेकेश्वरवाद्यांना जवळचे वाटत होते.

जवळच्या प्रदेशात म्हणजे अरब व सीरिया देशांच्या दरम्यानची सीमा होय, जिला अजअरात म्हणत. हा तबुकचा वरचा भाग होता. हा प्रदेश रोमन लोकांच्या ताब्यात होता. त्यामुळे आता युद्ध अरब देशाच्या दारात येऊन ठेपले होते. कुरैश आपल्या विजयाची स्वप्ने पाहू लागले होते. याच काळात कुरआनात सूरह '३०:' मध्ये भविष्यवाणी अवतरित झाली की, रोमन आज पराभूत झाले असले तरी ते लवकरच वर्चस्वशाली होतील. कुरआनात 'बिजअ' शब्द आला आहे, ज्याचा अर्थ ३ ते ९ वर्षे असा होतो.

रोमन सम्राट हर्क्युलस याने आपल्या सैन्याची पुनर्रचना व पुनर्संघटन केले व इसवी सन ६२३ मध्ये त्यांनी पर्शियावर हल्ले सुरू केले. रोमन लोकांनी पर्शियन

लोकांचा पराभव केला (इसवी सन ६२३-६२४). त्यानंतर काही वर्षांतच पॅलेस्टीन व इतर प्रदेश परत जिंकले. एवढेच नव्हे तर पर्शिया देशात आतापर्यंत आक्रमणे करून पर्शियन लोकांची दैना उडवली. कुरआनने वर्तविलेले भविष्य खरोखरीच शब्दशः खरे ठरले. "श्रद्धा बाळगणारे आनंदविभोर होतील." हे म्हटले आहे ते प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या संदर्भात आले आहे. कारण प्रेषितांना कुरैशांवर विजय प्राप्त झाला. (हिजरी ८ मध्ये-इ.स. ६३०)

कुरआनची भविष्यवाणी रोमन लोकांच्या बाबतीत व प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या बाबतीत तंतोतंत सत्य आहे. हे आश्चर्यकारक ऐतिहासिक सत्य आहे.

पवित्र कुरआनचे बारकाईने अध्ययन केल्याने प्रत्येक अध्ययनाच्या वेळी नवनवीन गोष्टींचा उलगडा होतो. वाचक या नवनव्या सत्यांमुळे खरोखरीच अचंबित होतो. यात कुरआनात आलेली भाकिते अथवा भविष्यवाणी खरोखरीच पडताळून पाहिल्यावर अक्षरशः सत्य उतरलेली दिसते. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यासारख्या अशिक्षित माणसाला त्या भविष्यवाणीचे कथन करणे केवळ अशक्य वाटते. विशेष म्हणजे ही भाकिते कुरआनच्या अवतरणानंतर कित्येक वर्षांनी खरी ठरलेली दिसतात. त्यांचा संदर्भ या लेखांच्या मालिकेत देत आहे. रस असणाऱ्यांनी कुरआनवरील विविध भाष्ये जरूर वाचावीत व ही भाकिते कशी सत्य अवतरित झालेली आहेत ती पाहाणे खरोखरीच एक आगळा-वेगळा आनंद देतात.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आगमनाबद्दल (प्रेषित म्हणून) प्राचीन अशा विविध धर्मग्रंथांत उल्लेख आल्याचे आढळतात. तौरात, इंजिल, पार्शी धर्मग्रंथात, हिंदूंच्या पुराणात, प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आगमनाविषयी आलेल्या भविष्यवाणी पाहाणे मोठे रंजक ठरते.

(१) "जे या निरक्षर पैगंबर-नबी (मुहम्मद (स.)) यांचे अनुयायित्व पत्करतील ज्याचा उल्लेख त्यांना त्यांच्या तौरात व इंजीलमध्ये लिखित स्वरूपात आढळतो. तो त्यांना सदाचाराची आज्ञा देतो, दुराचारापासून रोखतो, त्यांच्यासाठी स्वच्छ वस्तू हलाल करतो व अस्वच्छ वस्तू हराम करतो, आणि त्यांच्यावरून ते ओझे उतरवितो जे त्यांच्यावर लादलेले होते आणि ती बंधने सोडतो ज्यामध्ये ते जखडलेले होते. म्हणून जे लोक याच्यावर श्रद्धा ठेवतील आणि याचे समर्थन व सहाय्य करतील व त्या प्रकाशाचे अनुसरण करतील जो याच्याबरोबर अवतरला गेला आहे, तेच सफल होणारे आहेत."

(कुरआन - ७:१५७)

(२) ''आणि जेव्हा मरियमपुत्र ईसा (अ.) ने म्हटले की, हे बनी इस्राईल! मी तुमच्याकडे अल्लाहचा प्रेषित आहे आणि तौरातपैकी जे काही माझ्यासमोर हजर आहे त्याचे सत्य समर्थन करणारा आहे आणि शुभवार्ता देणारा आहे एका प्रेषिताची जो माझ्यानंतर येईल. त्याचे नाव अहमद असेल. तर जेव्हा तो त्यांच्याजवळ स्पष्ट निशाण्या घेऊन आला तेव्हा ते म्हणाले, ही तर उघड जादू आहे.'' (कुरआन - ६१:०६)

अहमद हे प्रेषित मुहम्मद (स.) यांचे दुसरे नाव होते असे हदीस वचनात उल्लेखित आहे. 'अहमद' या शब्दाचा दुसरा अर्थ 'अत्याधिक ईशस्तवन करणारा' असाही आहे.

विशेष म्हणजे आपल्यानंतर कोणी प्रेषित येणार आहे असा मुहम्मद (स.) यांनी कोठेही उल्लेख केलेला नाही. उलट ते अंतिम प्रेषित असल्याचा उल्लेख कुरआनात 'अल अहजाब'मध्ये आला आहे. (कुरआन-३३:४०)

(३) तौरात स्पष्टपणे म्हणते की, ''तुमच्या भाऊबंदांपैकी एकजण येईल जो संदेष्टा असेल आणि त्याच्या तोंडात मी माझी वचने घालीन.'' अर्थात - मुहम्मद (स.) हे संदेष्टा व मूसा (अ.) यांच्या भाऊबंदांपैकीच आहेत. ते इस्माईल (अ.) यांच्या शाखेतील होत. जे इस्राईल यांच्या भावकीतील होते. (तौरात-यहुद्यांचा धर्मग्रंथ मूसा (अ.) यांच्यावर जो अवतरित झालेला आहे.)

(४) जॉन-१४:१५ व जॉन १६:०७ यात आदरनीय मुहम्मद (स.) प्रेषित म्हणून येणार आहेत असा स्पष्ट उल्लेख ईसा (अ.) यांनी केलेला आहे.

(५) पारसी धर्मग्रंथातील DASATIR व अवस्ता यांत मुहम्मद (स.) यांच्याबाबत येणारे प्रेषित म्हणून उल्लेखिलेले आहे.

(६) भविष्य पुराणात पर्व ३, खंड ३, अध्याय ३, यांत ५ ते ८ श्लोकांत म्हटले आहे, ''आध्यात्मिक गुरू त्याच्या सहकाऱ्यांसह येईल ज्याचे महम्मद असे नावे असेल, मानवतेचा भूषण ठरेल जो अरबस्तानचा राहणारा असेल.''

अथर्व वेदाच्या २०व्या खंडातील १२७व्या सुक्तात व १ ते ३ मंत्रात म्हटले आहे, ''मानवतेचा भूषण म्हणून येईल जो उंटाची स्वारी करणारा असेल.''

अलाहाबाद विद्यापीठाचे संस्कृत पंडित वेदप्रकाश यांनी व इतर आठ विद्वानांनी म्हटले आहे,

अ) वेदांमध्ये उल्लेख आला आहे की ईश्वराचे संदेश अखिल मानवांसाठी येतील, कलकीकडे येतील जे गुहेत राहणाऱ्यांकडे, देवदूताकडून कलकीकडे आलेले असतील.

ब) कलकीच्या पित्याचे नाव विष्णू भागवत किंवा विष्णू भगत असेल व आईचे नाव चोमाबिन असेल. यात भगत म्हणजे ईशदास, अब्दुल्लाह, चोमाबिन म्हणजे शांती-म्हणजे अमीना, जी प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या वडिलांची व आईची नावे आहेत.

क) कलकी-खजूर खाणारा व ऑलीव्ह तेल वापरणारा, अत्यंत विश्वासू (अल अमीन) जी मुहम्मद (स.) यांच्याशी जुळणारी माहिती आहे.

ड) कलकी - तेज घोड्यावर स्वार होणारा व पृथ्वी प्रदक्षिणा घालणारा व सहा आकाशांवर आरूढ होऊन येणारा. जी माहिती कुरआनातील १७व्या अध्यायातील मेअराज प्रसंगाशी जुळणारी आहे. (तमिळ मासिक 'समारसम', १-१५ जुलै १९९८)

पवित्र कुरआनात अनेक भाकिते आलेली आढळतात. विशेष म्हणजे पुढील काळात ती तंतोतंत सत्य उतरलेली दिसतात.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या बाबतीत बायबल (जुना करार) मध्ये ही भविष्यवाणी आली आहे की, आपण अल्लाहची वाणी अल्लाहचे नाव घेऊन सादर कराल.

इस्लामचे प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर ईशवाणीचे अवतरण म्हणजे ईश्वराच्या संदेशाची-पवित्र कुरआनची सुरुवात रमजान महिन्यात इ.स. ६१० मध्ये मक्केजवळील 'हिरा' या गुंफेत 'कद्र'च्या रात्री झाली.

कुरआनची जी सुरवात झाली ती या आयतीने (ऋचेने, महावाक्याने) "इकरा बिस्मि रब्बिकल्लजी खलक..." अर्थात - "ज्याने निर्माण केले त्या पालनकर्त्याच्या नामोच्चाराने वाच." या शब्दांनी झाली आहे. यानंतर सर्वश्रेष्ठ अल्लाहने 'बिस्मिल्लाह' ही आयत अवतरून मानवास मार्गदर्शन केले, ज्याचे मानवाने पालन करावे.

(पवित्र शास्त्र रस्तिस्ना, १८:१८, १९) यातही भविष्यवाणी आली आहे, "मी त्यांच्यासाठी त्यांच्या भाऊबंदातून तुझ्या (मूसा) सारखा एक संदेष्टा उभा करीन, त्याच्या मुखात मी आपली वचने घालीन आणि त्याला ज्या आज्ञा मी देईन त्या सगळ्या तो त्यांना निवेदन करील. तो माझ्या नावाने बोलेल. वचने जो कोणी ऐकावयाचा नाही त्याला मी जाब विचारीन."

संदेष्टा म्हणजे संदेश पोहचविणारा - प्रेषित मुहम्मद (स.) व संदेश म्हणजे पवित्र कुरआन. ही आलेली भविष्यवाणी कुरआनच्या रूपाने सत्य ठरली.

प्रेषित मुहम्मद (स.) हे प्रेषित मूसा (अ.) यांच्या भाऊबंदांपैकीच आहेत. ही कुरआनच्या रूपाने ईशवचने त्यांच्या (मुहम्मद (स.)) यांच्या मुखातून अवतरित झाली.

मूसा (अ.) यांच्या काळात म्हणजे इ.स. पूर्व पंधराशे वर्षे ही भविष्यवाणी वर्तवली गेली होती, जी शब्दश: सत्य रूपाने जगासमोर आली. ही भविष्यवाणी खरोखरीच अचंबित करणारी आहे.

"बनी इस्राईलींनो! स्मरण करा माझ्या त्या कृपेचे जी मी तुमच्यावर केली आणि तुम्ही माझ्याबरोबर केलेली प्रतिज्ञा पुरी करा. मी तुमच्याबरोबर केलेली प्रतिज्ञा पुरी करीन आणि माझे भय बाळगा." (कुरआन-२:४०)

कुरआनात आलेली ही दुसरी भविष्यवाणी आहे. बनी इस्राईल म्हणजे प्रेषित याकूब (अ.) यांच्या संततीला म्हणतात. याकूब (अ.) यांना इस्राईल हा किताब होता. त्यांच्या वंशीयांना 'बनी इस्राईल' असे म्हणतात. याकूब (अ.) हे प्रेषित इब्राहीम (अ.) यांचे नातू होत. प्रेषित इसहाक (अ.) यांचे पुत्र होत.

'बनी इस्माईल' म्हणजे कुरैश होत. या कुरैशांपैकीच अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) हे होत.

बनी इस्त्राईलींना प्रेषित इब्राहीम (अ.) यांचा वारसा म्हणून जी जीवनपद्धती (दीन) मिळाली होती ती इस्लामच होती. परंतु पुढील काळात बनी इस्राईल लोकांनी त्यात फेरफार करून त्याला यहूदी धर्माचे स्वरूप दिले. म्हणून यानंतर या लोकांना यहूदी म्हणून संबोधिले जाते. वास्तविकत: त्यांचा मूळ धर्म इस्लामच होता. पवित्र कुरआन त्यांना खऱ्या वस्तुस्थितीची आठवण करून देत आहे.

आता येथे ज्या प्रतिज्ञेचा उल्लेख केला आहे ती प्रतिज्ञा म्हणजे शरिअत (इस्लामी धर्मशास्त्र), जो वस्तुत: अल्लाह व त्याच्या दासांमधील करार होय. ज्यात म्हटले आहे, पुढील काळात येणाऱ्या प्रेषितावर तुम्ही श्रद्धा (ईमान) ठेवावी. म्हणजे प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर श्रद्धा ठेवावी. परंतु इ.स. पूर्व दीड हजार वर्षांपूर्वी मूसा (अ.) यांच्या काळात दिलेला शब्द यहुद्यांनी पाळला नाही.

प्रेषित मुहम्मद (स.) यांना यहूदी प्रेषित मानण्यास तयार नव्हते. मुहम्मद (स.) हे प्रेषित आहेत हे लक्षात येऊनही यहूदी मानण्यास तयार नव्हते. कारण इसहाक (अ.) यांच्याच वंशात सगळे म्हणजे माननीय मूसा (अ.), माननीय दाऊद (अ.), माननीय सुलेमान (अ.), माननीय ईसा (अ.) हे प्रेषित झाले. बनी इस्माईल यांच्यात फक्त हजरत मुहम्मद (स.) हे प्रेषित झाले व त्यांना कुरआनने अंतिम प्रेषित म्हणून घोषित केले, त्याची यहुद्यांना चीड होती. यहुद्यांनी ईश्वराला दिलेला शब्द पाळला नाही. त्यामुळे पुढील काळात त्यांचे सतत अध:पतन झाले व त्यांना आपल्या मूळ पॅलेस्टाइन या वस्तीस्थानापासून परागंदा व्हावे लागले.

बायबलमध्ये म्हटल्याप्रमाणे त्यांना त्यांच्या बेईमानाबद्दल शिक्षा म्हणून परागंदा म्हणून जगावे लागले. 'जाब विचारीन' ही भविष्यवाणी खरी ठरली.

"माझ्याबरोबर केलेली प्रतिज्ञा पूरी करा आणि माझेच भय बाळगा."

(कुरआन - २:४०)

"सांगा जो जिब्राईलचा शत्रू आहे, त्याला हे माहीत असावयास पाहिजे की जिब्राईलने अल्लाहच्या परवानगीने हे कुरआन (हे प्रेषिता!) तुमच्या अंत:करणावर उतरविले आहे, त्या भविष्यवाणीप्रमाणे जी पहिल्यापासून अस्तित्वात आहेत आणि ईमान आणणाऱ्यांसाठी सदुपदेश व शुभ संदेश आहे." (कुरआन - २:९७)

पवित्र कुरआन हे आद्य ईशदूत जिब्राईल (अ.) यांच्याकडून आदरणीय मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरित झाले. प्रेषित मूसा (अ.) यांनी भविष्यात एक प्रेषित त्यांच्या भाऊबंदांतून येणार आहे याची ग्वाही इ.स. च्या १५०० वर्षांपूर्वी दिलेली आहे. त्याप्रमाणे प्रेषित मुहम्मद (स.) यांचे आगमन झाले व त्यांच्यावर ईशदूत जिब्राईल (अ.) मार्फत कुरआनचे अवतरण झाले.

परंतु यहूदी आपल्या हेकेखोरपणाने व मत्सराने देवदूत जिब्राईल (अ.) यांना आपला शत्रू समजतात. त्यांचा जिब्राईल (अ.) यांच्यावर यासाठी राग होता की ते प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याकडे ईशसंदेश घेऊन येत असत. त्यांनी हे संदेश मुहम्मद (स.) यांच्यावर न आणता आपल्या जातीतील एकाकडे तरी आणावयास पाहिजे होते. वास्तविकता जिब्राईल (अ.) ईशआज्ञेप्रमाणे काम करीत होते. स्वत:हून ते काही करत नसत. ते स्वत: ईशआज्ञेचे पालन करीत असत. एवढेही यहूदी समजून घेण्यास तयार नसत. ते वास्तविकता यहूदी माणसावरच ईशसंदेश घेऊन यायला पाहिजे होते असा यहुद्यांचा दूराग्रह होता. खरे पाहता ईशदूत जिब्राईल (अ.) यांना शिव्याशाप देणे म्हणजे प्रत्यक्ष ईश्वराला शिव्याशाप देणे होय. एवढादेखील सारासार विचार त्यांच्यात शिल्लक राहिला नव्हता. जिब्राईल (अ.) यांच्याशी शत्रुत्व म्हणजे ईश्वराशी शत्रुत्व होय हेही ते विसरले.

कुरआनातील 'सूरह अआराफ'मधील १५७ व्या आयतीत स्पष्टपणे म्हटले आहे, "(आणि आज या कृपेला असे लोक पात्र आहेत) जे या रसूलचे की जो निरक्षर आहे, अनुसरण करतील, ज्याचा उल्लेख त्यांना आपल्या येथे तौरात व इंजिलमध्ये लिहिलेला दिसून येतो." (तौरात म्हणजे मूसा (अ.) यांना मिळालेला ईशग्रंथ व इंजिल म्हणजे बायबल, ईसा (अ.) यांना मिळालेला ईशग्रंथ.)

हे भाकित कुरआनात आलेले आहे, जे मूसा (अ.) व ईसा (अ.) यांनी वर्तविले होते.

"आठवण करा, जेव्हा अल्लाहने (तुमच्याकडून) प्रेषितांसंबंधी प्रतिज्ञा घेतली होती की मी तुम्हाला ग्रंथ व बुद्धी देऊन गौरविले आहे. यानंतर जेव्हा कोणी प्रेषित (रसूल) या ग्रंथाचे, जो तुमच्याजवळ पहिल्यापासून आहे, समर्थन करीत तुमच्याकडे येईल तेव्हा तुम्ही त्याच्यावर अवश्य ईमान (श्रद्धा) आणाल आणि त्याची जरूर मदत कराल. विचारले, तुम्ही हे मान्य करता काय? आणि माझ्याकडून टाकण्यात आलेल्या जबाबदारीचा स्वीकार करता काय? त्यांनी सांगितले की आम्ही मान्य केले. फर्माविले तर मग साक्ष असा मी पण तुमच्याबरोबर साक्ष आहे." (कुरआन-३:८१)

कुरआनच्या 'सूरह आले इमरान'मध्ये दिलेल्या या निवेदनाच्या शैलीवर विचार केल्यास स्पष्ट असे आढळून येते की ही प्रतिज्ञा बनी इस्राईलकडून आदरणीय मुहम्मद (स.) यांच्या प्रेषितत्वाबद्दल घेतली गेली होती. तौरात व इंजिलमध्ये आदरणीय मुहम्मद (स.) यांच्या प्रेषितत्वासंबंधी स्पष्ट अशा भविष्यवाणी नमूद होत्या. त्याकडे पवित्र कुरआनने ठिकठिकाणी इशारे केले आहेत आणि प्रचलित बायबलमध्येसुद्धा, त्यामध्ये फेरफाराचे दोष असले तरीदेखील या भविष्यवाणीचे अवशेष आढळून येतात.

पूर्वी झालेल्या जवळपास प्रत्येक प्रेषिताकडून आपल्यानंतर पुढील काळात येणाऱ्या प्रेषिताविषयी सूचित केलेले आढळते व तो प्रेषित आपल्या अनुयायांना सांगत आला होता की त्याच्यानंतर येणाऱ्या प्रेषितावर श्रद्धा ठेवा व त्याला सर्वतोपरी सहाय्य करा. कारण प्रत्येक प्रेषिताचा 'दीन' एकच असतो. त्यामुळे त्या प्रेषिताशी ईमान आणाल आणि त्याची प्रतारणा करणार नाही. तर तुम्ही सरळ मार्गावर राहाल.

कुरआनात अशा प्रतिज्ञांचा अनेक ठिकाणी उल्लेख आलेला आहे. परंतु प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याकडून अशी कोणतीही प्रतिज्ञा घेतलेली दिसत नाही. असे का? तर त्याचा एकच अर्थ आहे की, या प्रेषितानंतर कोणीही प्रेषित येणार नाही. म्हणजेच प्रेषित जगात पाठविण्याची शृंखला खंडित होईल. म्हणूनच प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याविषयी कुरआनात स्पष्ट उल्लेख केला आहे, "ते प्रेषित, अल्लाहचे रसूल व अखेरचे नबी होत." (कुरआन-३३:४०)

यामुळेच प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याकडून पुढे येणाऱ्या प्रेषितावर श्रद्धा बाळगण्याची प्रतिज्ञा घेतलेली नाही. म्हणजेच मुहम्मद (स.) हे अंतिम प्रेषित असल्याची स्पष्ट भविष्यवाणी करण्यात आलेली आहे. त्यानंतर आजपर्यंत कोणीही प्रेषित आला नाही. त्यानंतर सुधारणा करणारे व खलीफा आले पण कोणीही प्रेषित नाही.

"हे प्रेषित! तुमच्या पालनकर्त्याकडून जे काही तुमच्यावर अवतरित झाले आहे ते (लोकांपर्यंत) पोहचवा. जर तुम्ही असे केले नाही तर तुम्ही प्रेषितत्वाचे कर्तव्य पार पाडले नाही. अल्लाह तुम्हाला लोकांच्या दुष्टतेपासून वाचविणार आहे. निश्चितच अल्लाह नाकारणाऱ्यांना मार्गदर्शन करणार नाही." (कुरआन-५:६७)

सक्त ताकीद असलेला हा आदेश आहे जो प्रेषित मुहम्मद (स.) यांना दिला गेला. प्रेषित अल्लाहचा संदेशवाहक असतो. म्हणून त्याच्या पदाचे हे कर्तव्य आहे की त्याने अल्लाहचा संदेश काहीही कमी-अधिक न करता व कोणत्याही भयाची पर्वा न करता लोकांपर्यंत पोहचवावा. यात गफलत म्हणजे प्रेषितकर्तव्याच्या अदायगीत गफलत होय. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी या कर्तव्यास यथायोग्य पार पाडले आणि पूर्ण कुरआन जसेच्या तसेच लोकांपर्यंत पोहचते केले. शेवटच्या हज्जप्रसंगी जे प्रेषितांनी आपल्या निधनाच्या तीन महिन्यांपूर्वी केले होते, अनुयायी समुदायास विचारले, "तुम्हाला माझ्याबद्दल विचारले जाईल तर तुम्ही काय उत्तर द्याल?" उपस्थित असलेल्यांनी म्हटले, "आम्ही या गोष्टीची साक्ष देऊ की, आपण आमच्यापर्यंत अल्लाहचा संदेश (कुरआन) पोहचविला. आपले कर्तव्य पार पाडले आणि आमचे हित चिंतिले."

प्रेषितांनी आपल्या तर्जनीचे बोट आकाशाच्या दिशेने उंचावले व फर्माविले, "आज कुरआन आपल्या मूळ स्थितीत जसे अवतरले तसे आमच्या हातात विद्यमान आहे. त्यामुळे अल्लाहच्या न्यायनिवाड्याच्या दिवशी कोणीही म्हणू शकणार नाही की अल्लाहचा संदेश आमच्यापर्यंत पोहचवला नव्हता."

कुरआनचे हे भाकित शब्द नू शब्द खरे ठरले. यास्तव विरोधकांची कारस्थाने व युद्धविषयक कारवाया चालू असतानाही प्रेषित मुहम्मद (स.) लोकांच्या अपयापासून सुरक्षित राहिले आणि कोणतीही शक्ती प्रेषितांची हत्या करण्यात यशस्वी होऊ शकली नाही.

स्पष्टपणे हे दिसते की, नाकारणारे आपल्या मनोरथात कदापि यशस्वी ठरू शकले नाहीत. "अल्लाह तुम्हाला नाकारणाऱ्या लोकांपासून सुरक्षित ठेवील." (कुरआन-५:६७) ही भविष्यवाणी सत्य ठरली. त्यामुळेच पवित्र कुरआन जसेच्या तसे सुरक्षितपणे आपल्या सर्वांपर्यंत पोहचले.

"आपल्या तुमच्या पालनकर्त्याची गोष्ट सत्य आणि न्यायासह पूर्ण झाली, असा कोणीही नाही जो त्याच्या गोष्टी बदलू शकेल आणि तो सर्वकाही ऐकणारा, जाणणारा आहे." (कुरआन-अनआम:११५)

हे प्रेषित मुहम्मद (स.) यांना उद्देशून म्हटले असले तरी त्या संभाषणाचा रोख कुरआन वाचकाकडे आहे आणि हे समजविण्याचा हेतू आहे की, कुरआन अवतरण ही काही अद्‌भूत बाब नव्हे. यापूर्वीही सर्वश्रेष्ठ अल्लाहने ग्रंथ अवतरित केले (जसे-जबुर, तौरात, इंजिल वगैरे) होते. ज्यांचा समूह ईशग्रंथ बाळगणारा आहे व त्यांच्यात जे लोक सत्यनिष्ठ आहेत, ते कुरआनची वाणी ऐकून ओळखतात की, ही ईशवाणी आहे. म्हणून कुरआन ईशग्रंथ असल्याबद्दल तिळमात्र संशयाला जागा नाही.

म्हणजे प्रेषित मुहम्मद (स.) यांना पाठविण्यासंबंधी जो वायदा सर्वश्रेष्ठ अल्लाहने ग्रंथ बाळगणाऱ्यांशी केला होता (यहूदी / ख्रिश्चन) व त्याचा उल्लेख तौरात व बायबलमध्ये विद्यमान (अस्तित्वात आहे) तो अखेर पूर्ण झाला. अशाप्रकारे ईश्वराच्या फर्मानाची सत्यता सिद्ध झाली व न्यायाची निकडही पूर्ण झाली. म्हणजे कुरआनच्या अवतरणाने अल्लाहचे प्रमाण लोकांवर कायम झाले.

कुरआन हा ईशग्रंथ आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आगमनाबद्दल व त्यांच्यावर पुढे अवतरित होणाऱ्या या ग्रंथाबद्दल विविध ठिकाणी भविष्यवाणी आलेली आढळते. विशेष म्हणजे ही भविष्यवाणी तौरात व बायबलमध्ये या ठिकाणी आलेली आढळते.

बायबलमध्ये ८:१५-१९ (See Duteronomy) पॅश्यु २१:३३-४६, जॉन १:१९-२५, १४:१५-१७, २५:३०, १५:५-६, ५:७-१५.

विशेष म्हणजे प्रेषित मुहम्मद (स.) यांचे आगमन व ते अंतिम प्रेषित म्हणून ठरणार आहेत हे कुरआनात स्पष्टपणे सांगण्यात आले आहे. ते अंतिम प्रेषित ठरल्यामुळे त्यांच्यावर अवतरित झालेला कुरआन हाही अंतिम ईशग्रंथ ठरतो. आता महाप्रलयापर्यंत कोणीही प्रेषित येणार नाही व कोणताही ईशग्रंथ येणार नाही. ही ईशवाणी व भविष्यवाणी कुरआनात आलेली आहे.

"आणि आज या कृपेला असे लोक पात्र आहेत जे या रसूलचे, की जो निरक्षर प्रेषित आहे, त्याचे अनुसरण करतील. ज्याचा उल्लेख त्यांना आपल्या येथे तौरात व इंजिलमध्ये लिहिलेला दिसून येतो." (कुरआन - अअराफ : १५७)

तौरात इ.स.पू. १५०० ला मूसा (अ.) यांच्यावर व इंजिल ईसा (अ.) यांच्यावर अवतरित झालेले ग्रंथ कुरआनच्या अवतरणापूर्वी शेकडो वर्षे आधी झालेले आहेत. जे आदरणीय मुहम्मद (स.) यांच्या प्रेषितत्वाविषयी साक्ष देतात व भविष्यवाणी वर्तवितात ती आता या अशिक्षित व निरक्षर प्रेषिताद्वारे सत्य ठरली आहे. पुढे म्हटले आहे की, त्या प्रेषिताचे जे लोक अनुसरण करतील तेच जीवनात सफल होतील.

विशेष म्हणजे प्रेषित मुहम्मद (स.) निरक्षर असूनही त्यांनी जी शिकवण दिली ती पाहून विविध ज्ञान क्षेत्रातील प्रकांडपंडितही स्तंभित होतात. विद्वान, विचारवंत व तत्त्ववेत्ते सर्वचजण कुरआनने दिलेले ज्ञानामृत प्राशन करून उपकृत होत आहेत. त्यांची (प्रेषितांची) निरक्षरता त्याच्या प्रेषितत्वाचे प्रमाण बनले व प्रमाणही असे की ज्याचे उत्तर देण्यास संपूर्ण जग असमर्थ आहे.

तौरातमधील अनुवाद १८:१८-१९ इस्माईल यांच्या भाऊबंदांपैकी संदेष्टा येईल असे म्हटले आहे. हे बनी इस्माईलपैकी इतर कोणास नव्हे तर प्रेषित मुहम्मद (स.) यांनाच लागू पडते. कारण प्रेषित मुहम्मद (स.) हे बनी इस्माईलपैकी होत, जे बनी इस्त्राईल यांचे भाऊबंदांपैकी आहेत.

येशूच्या कथनात (मत्तय - २१:४२-४४) यात भाकित आले आहे की, मुहम्मद (स.) कोनशीलेचा दगड अर्थात अंतिम प्रेषित होत. योहान - १:२१ मध्ये म्हटले आहे, "जगाचा अधिकारी येतो आहे." योहान - १५:३६ मध्ये "सत्याचा आत्मा येईल." असे म्हटले आहे. जेव्हा तो माझ्याविषयी साक्ष देईल तो अनंत काळापर्यंत तुमच्यासोबत राहील.

प्रेषित मुहम्मद (स.) यांना वंश, वर्ण, देश, जाती, धर्म इत्यादींच्या कसल्याही बंधनाशिवाय समस्त मानवजातीसाठी प्रेषित बनवून पाठविले आहे.

"आम्ही तुम्हाला (मुहम्मद (स.) यांना) समस्त मानवजातीसाठी आमची कृपा म्हणून पाठविले आहे." (कुरआन - अलअंबिया - १०७)

ते सर्व मानवजातीसाठी आले आहेत. याची मान्यता त्यावरून स्पष्ट होते की, आज जगातील विविध देशांतील, विविध वंशांतील लोक त्यांना आपला प्रेषित मानतात.

"काय या लोकांना हे दिसत नाही की आम्ही या भूमीकडे तिच्या सरहद्दींना घटवित आहोत. अल्लाह आदेश लागू करतो. त्याच्या हुकूमाला टाळू शकेल असा कोणी नाही आणि हिशेब घेण्यात तो अतिशिघ्र आहे." (कुरआन-अररअद-४१)

"नाकारणारे म्हणतात की, तुम्ही त्यांचे प्रेषित नाही. सांगा, माझ्या व तुमच्या दरम्यान साक्ष देण्यास अल्लाह पुरेसा आहे. तसेच ते लोक जे ईशग्रंथाचे ज्ञान बाळगतात." (कुरआन-अररअद-४३)

इस्लामचा दिवसेंदिवस प्रभाव वाढू लागला होता आणि वेगवेगळ्या कबिल्यांमध्ये इस्लाम स्वीकारणाऱ्यांची संख्या वाढत होती. काही ठिकाणी तर कबिलेच्या कबिले इस्लाम कबुल करू लागले होते. हे या गोष्टीचे लक्षण होय की इस्लामचा प्रभाव वाढत

चालला होता. अनेकेश्वरवादी व नाकारणारे यांच्यावर मक्केची भूमी दिवसेंदिवस संकुचित होत चालली होती. कुरआनचे हे निवेदन तंतोतंत खरे ठरले व काही वर्षांच्या कालावधीत केवळ मदीनेतच इस्लाम प्रभावशाली झाला नाही तर मक्केवर विजय मिळवित संपूर्ण अरब देशात पसरला.

मागील ईशग्रंथांमध्ये एका प्रेषिताच्या आगमनाबद्दल जी भाकिते होती ती पूर्णपणे खरी ठरत होती. ग्रंथधारकांपैकी ज्यांना ईशग्रंथाचे ज्ञान होते व जे सत्यप्रिय होते त्यांच्या लक्षात आले की येणारा प्रेषित म्हणून जी भविष्यवाणी येत होती ती प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या रूपाने सत्य ठरली आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांचे आवाहन अगदी तेच आवाहन होते जे पूर्वीच्या प्रेषितांनी केलेले होते. त्यामुळे ईसाई जनसमूहांपैकी नज्जाशी (हब्शाधिपती) सारख्या लोकांची त्याच्यावर श्रद्धा आणणे साक्ष-संदर्भात मोठी महत्त्वपूर्ण गोष्ट होय. मक्केतील कुरैशांना प्रेषितत्वाबद्दल व प्रेषितांबद्दल काहीच ज्ञान नव्हते. पण इतर ग्रंथधारक प्रेषित व प्रेषितत्व चांगल्याप्रकारे जाणत होते. त्यामुळे आदरणीय मुहम्मद (स.) हे प्रेषित आहेत व त्यांचे प्रेषित म्हणून आगमन होणे भविष्यवाणीप्रमाणे ठरले हे त्यांच्या (इतर ग्रंथधारकांच्या) लक्षात आले.

अशा रीतीने कुरआनात इस्लामच्या प्रसाराविषयी भविष्यवाणी सत्य ठरली. एकेकाळी मदीनेत मर्यादित भागात इस्लाम स्थिरावला, मग अल्पावधीत संपूर्ण अरबस्तान व्यापून तो जगात सर्वत्र प्रसार पावला.

"आणि घोषित करा की, सत्य आले व असत्य नष्ट झाले आणि असत्य आहेच नामशेष होणारे." (कुरआन - बनी इस्राईल - ८१)

असत्य हे कधीच चिरःकालापर्यंत टिकून राहात नाही. ते एक ना एक दिवस नष्ट होणारच असते.

ईश्वर हाच खरा आमचा निर्माता आहे. तोच सर्वांचा पालनकर्ता आहे. तोच आमचा विनाशही करतो. जगात किंवा सृष्टीत जे सजीव अथवा निर्जीव आहेत ते सर्व नश्वर आहेत. केवळ सत्य व निरंतर टिकणारे फक्त ईश्वराचेच अस्तित्व आहे. तो सर्व चराचर सृष्टीचे नियंत्रण करतो. त्या कार्यासाठी त्याचा कोणीही सहभागी नाही. त्याची मूर्ती स्थापन करून त्याची उपासना करणे हे धादांत असत्य आहे. त्याचा कोणी सहभागी मानणे याला शिर्क म्हटले आहे व तो अक्षम्य गुन्हा आहे. ज्याबद्दल कोणाला कधीही क्षमा केली जाणार नाही. मूर्तीपूजा म्हणजे जो चराचराचा निर्माता आहे त्याला मानवाने निर्माण करून त्याची उपासना करणे होय.

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी जन्मापासून कधीही मूर्तीपूजा केली नाही. ईश्वराला ना जन्म-उगम आहे ना अंत आहे. अशा ईश्वराची-अल्लाहची उपासना ते करीत असत. प्रेषितांना प्रेषितत्व प्राप्त झाल्यानंतर तीन वर्षांनंतर अल्लाहच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी जाहीररीत्या एकेश्वरत्व (तौहीद) मांडला, मूर्तीपूजेचा धिक्कार केला. अल्लाह एकमेव आहे. तोच सर्व जाणणारा पाहणारा आहे. त्याला सर्व गोष्टी विदित होत असतात, त्याचा कोणीही सहभागी नाही हे त्यांनी सांगण्यास सुरुवात केल्यावर मूर्तीपूजक व रूढीप्रिय कुरैशांनी त्यांचा व त्यांच्या अनुयायांचा अनन्वित छळ सुरू केला. शेवटी त्यांना आपला भाग मक्का सोडून बाहेर पडावे लागले. त्यावरूनच ही आयत अवतरित झाली. मक्का विजयानंतर हिजरी ८ मध्ये "असत्य नष्ट झाले व सत्याचा विजय झाला, असत्य पराजितच होणार होते."

या प्रसंगी प्रेषितांनी काबागृहात ठेवलेल्या मूर्तींना आपल्या भाल्याने खाली पाडत ही आयत म्हटली होती. सत्याच्या प्रभावित होण्याचे व असत्याचा विनाश होण्याचे दृश्य लोकांनी पाहिले.

हे कुरआनचे भाकित होते की या वेळी मक्केत सत्य अत्याचारपीडित असले तरी ते प्रभावशाली झाले व असत्याचा नाश झाला म्हणून ही भविष्यवाणी सत्य ठरली.

"हे लोक म्हणतात, हा आपल्या पालनकर्त्यातर्फे एखादी निशाणी आमच्याजवळ का आणत नाही? काय यांच्याजवळ आधीच्या ग्रंथांमध्ये जे काही (निवेदन केले गेले) आहे. त्याची साक्ष नाही पोहचली?" (कुरआन - ताहा - १३३)

मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांचे असे म्हणणे होते की हा मनुष्य जर खरोखर प्रेषित आहे तर तो एखादा अद्भूत चमत्कार का दाखवत नाही. या आक्षेपाला उत्तर म्हणून म्हटले गेले आहे, जे काही पूर्वीच्या धर्मग्रंथात उल्लेखित आहे त्याची साक्ष यांच्यापर्यंत पोहचली नाही काय? अर्थात तौरात व इंजिलमध्ये जी काही भाकिते येणाऱ्या प्रेषिताविषयी उल्लेखित आहेत अगदी त्यांच्यानुसार या प्रेषिताला पाठविले गेले आहे आणि ही साक्ष तो (मुहम्मद (स.)) प्रेषित असण्याचे स्पष्ट प्रमाण होय. या प्रमाणानंतर अद्भूत चमत्काराची गरज उरत नाही.

कुरआनचे भाष्यकार म्हणतात, स्पष्ट असावे की कुरआन अवतरणाच्या वेळी तौरात, इंजिलच्या ज्या प्रती अस्तित्वात होत्या त्यात प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याविषयी स्पष्टपणे अनेक भाकिते जी आली होती यहूदी आणि खिश्चन यांनी कितीतरी परिच्छेद या ग्रंथामधून गायब केले. यासाठी की कुरआनच्या विरोधात असलेली त्यांची भूमिका

कमजोर होऊ नये. त्यांनी काही परिच्छेदांचा अनुवाद अगम्य अशा भाषेत (वाक्यरचनेत) केला. तरीही तौरात व इंजिलच्या आजच्या अनुवादातही काही भाकिते स्पष्ट आलेली आढळतात.

तौरातमधील (अनुवाद - १८:१८) मध्ये म्हटल्याप्रमाणे "त्यांच्या भाऊबंदांतून एक संदेष्टा उभा करीन जी ईशवचने त्याच्या मुखातून बाहेर पडतील.

"तुम्हा लोकांकडे आम्ही त्याच प्रजेत एक प्रेषित तुमच्यावर साक्षीदार बनवून पाठविला आहे जसे आम्ही फिरऔनकडे एक प्रेषित पाठविला होता."

(कुरआन मुजम्मिल - १५)

"त्याच्या (प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या) मुखात मी आपली वचने घालीन आणि त्यांना ज्या आज्ञा मी देईन त्या सगळ्या तो त्यांना निवेदन करील."

आदरणीय मुहम्मद (स.) यांच्या मुखाने अल्लाहचे शब्द म्हणजे कुरआन अदा केले गेले. कुरआन त्यांचा ईशचमत्कार ठरला.

सूरह २ मधील ८९ व्या आयतीत म्हटल्याप्रमाणे ते (यहूदी व ख्रिश्चन) येणाऱ्या प्रेषिताची प्रतिक्षा करीत होते. 'येणारा प्रेषित' मुहम्मद (स.) हेच होत.

"आणि जेव्हा अल्लाहकडून त्यांच्याकडे एक ग्रंथ आला, जो त्यांच्याजवळ पहिल्यापासून असलेल्या ग्रंथाचे समर्थन करीत होता आणि ते पहिल्यापासून इन्कार करणाऱ्यांविरुद्ध विजय प्राप्तीबद्दल प्रार्थना करीत असत. परंतु जेव्हा ती गोष्ट त्यांच्याजवळ आली आणि जिला त्यांनी ओळखलेदेखील तेव्हा त्यांनी तिचा इन्कार केला. अशा इन्कार करणाऱ्यांवर अल्लाहचा धिक्कार असो." (कुरआन - अलबकरा - ८९)

यहूदी लोकांच्या ईशग्रंथामध्ये शेवटच्या प्रेषितासंबंधी भविष्यवाणी-भाकिते आलेली होती आणि म्हणून ते शेवटच्या प्रेषिताच्या आगमनाची मोठ्या उत्सुकतेने वाट पाहात होते. त्यांचा समज होता की त्याच्या आगमनानंतर त्यांना त्यांच्या शत्रूविरुद्ध विजय प्राप्त होईल. या अशा विजयाबद्दल ते प्रार्थना करीत असत.

परंतु जेव्हा आदरणीय मुहम्मद (स.) यांचे आगमन झाले आणि यहूदी लोकांनी जो येणार होता तो प्रेषित हेच आहेत हेही ओळखले तरीदेखील निव्वळ हट्टधर्मी व मत्सर यांच्या आहारी जाऊन त्यांनी आदरणीय मुहम्मद (स.) यांना प्रेषित म्हणून मानण्यास नकार दिला.

यहूदी लोकांचा या गोष्टींवर राग होता की अल्लाहने शेवटच्या प्रेषिताला बनी इस्माईल या वंशातून का निर्माण केले, बनी इस्राईल या वंशातून का पाठवले नाही?

यहूदी आपला धार्मिक ग्रंथ तौरात यावर श्रद्धा बाळगणे पुरेसे समजत. पवित्र कुरआनचे अवतरण ठीक ठीक तौरातमधील भविष्यवाणीप्रमाणे झालेले आहे आणि म्हणून पवित्र कुरआनला खोटे ठरविणे म्हणजे तौरातला खोटे ठरविण्यासारखे होते.

तौरातवर श्रद्धा बाळगण्याचा दावादेखील त्यांचा खोटा होता. जर त्यांनी तौरातवर श्रद्धा बाळगली असती तर त्यांनी कधीही आपल्या प्रेषितांची हत्या केली नसती.

प्रेषित इब्राहीम (अ.) यांचे पुत्र इसहाक (अ.) यांच्या याकूब (अ.) या पुत्रास इस्राईल पदवी होती व पुढे त्यांना यहूदी म्हटले जाऊ लागले. या शाखेत ईसा (अ.) पर्यंतचे सर्व प्रेषित झाले. इस्माईल या इब्राहीम (अ.) यांच्या पुत्राच्या शाखेत झालेल्यांना कुरैश म्हणत. त्यात एकमेव परंतु अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) झाले. यहूद्यांना ही गोष्ट रुचत नव्हती. म्हणून ते मुहम्मद (स.) यांच्या विरोधात सतत कारवाया करीत असत.

"खरी गोष्ट अशी की आम्ही यांना व यांच्या वाडवडिलांना संपन्न केले. (येथपावेतो की) त्यांना एक दीर्घकाळ होऊन गेला. परंतु काय हे पाहात नाहीत की आम्ही या भूमीकडे तिच्या सीमांना घटवित पुढे येत आहोत, मग हे प्रभावशाली राहतील."

(कुरआन - अल अंबिया - ४४)

कुरैश यांच्यावर ईशकृपा झाली त्यामुळे त्यांना मानमरातब मिळाले. धन-संपदा मिळाली व सत्ता पण मिळाली. त्याच्या प्राप्तीमुळे ते नुसते माजले. ईश्वराच्या कृपेला विसरले. जी काही संपन्नता मिळाली ती ईशकृपा न समजून आपल्या कर्तृत्वाने मिळाले असे समजून ते वागू लागले.

वास्तविकता अल्लाहच्या कृपेने कुरैश यांना सुख व संपन्नता मिळाली. त्या समाजाचे प्रमुख सरदाराप्रमाणे बनले. परंतु दीर्घकाळपर्यंत ते सुख-संपन्न स्थितीत राहिले व त्यांना मिळालेल्या सत्ताधिकारामुळे ते ईश्वराविषयी बेपर्वा बनले. धनसंपत्ती व सत्तेची धुंदी माणसांला ईश्वराविषयी गाफील बनविते. तेच या कुरैश लोकांच्या बाबतीत झाले.

प्रेषित मुहम्मद (स.) हे त्या कुरैश वंशातीलच होते. त्यांचे आजोबा, चुलते हे काबागृहाच्या प्रमुखांपैकी होते. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी ईशआज्ञेप्रमाणेच एकेश्वरत्व मांडण्यास सुरुवात केली. वारंवार ते सांगत होते, "मी अल्लाहचा प्रेषित आहे. मी त्याचे संदेश जसेच्या तसे तुम्हाला ऐकवीत आहे व त्याबद्दल मला कोणाकडून काहीही नको." परंतु कुरैशांनी तिकडे दुर्लक्ष केले. एवढेच नव्हे तर त्यांचा भयंकर छळ मांडला. त्यांना जीवन जगणे अशक्य बनविले. पुढे तर त्यांना जिवे मारण्यापर्यंत त्यांची मजल गेली. शेवटी त्यांना हिजरतचा - स्थानांतराचा आदेश आला व त्याप्रमाणे एका रात्री अबूबक्र सिद्दीक या आपल्या विश्वासू मित्रासह त्यांनी मदीनेस प्रयाण केले.

मदीनेत लोकांनी इस्लामचा स्वीकार करण्यास सुरुवात केली व अल्पावधीत ठिकठिकाणच्या लोकांनी इस्लामचा स्वीकार केला. परिणामी मक्केच्या जवळपासही इस्लामचा प्रभाव वाढत गेला. याचा संकेत या आयतीत आलेला आहे असे भाष्यकार मानतात. तात्पर्य, मक्केतील अनेकेश्वरवाद्यांचे महत्त्व संकुचित होत गेले. म्हणजेच या अनेकेश्वरवादी मक्कावासियांचा भूभाग दिवसेंदिवस संकुचित होत गेला. येथपावेतो की या सूरहच्या अवतरणानंतर काही वर्षांनी प्रेषित मुहम्मद (स.) यांना मदीनेत सत्तधिकार प्राप्त झाला व हा सत्ताधिकार मक्का विजयाकडे पहिले पाऊल ठरला.

या आयतीत दर्शविलेली भविष्यवाणी खरी ठरत गेली. "या भूमीकडे तिच्या सीमांना घटवीत पुढे येत आहोत..."

"रोमन पराभूत झालेत. जवळच्या प्रदेशात आणि ते आपल्या पराभूततेनंतर वर्चस्वशाली होतील." (कुरआन - अररुम - २-३)

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आगमनकाळात दोन विशाल साम्राज्ये अस्तित्वात होती. एक होते पर्शियन साम्राज्य व दुसरे होते रोमन साम्राज्य, पर्शियन साम्राज्यात इराण व इराक होते, तर रोमन साम्राज्यात पॅलेस्टीन, सीरिया, तुर्कस्तान इत्यादींचा समावेश होता. रोमन साम्राज्याची राजधानी कुस्तूंतुनीया होती. रोमन लोक ग्रंथधारक व प्रेषित ईसा (अ.) यांना मानणारे होते. परंतु त्यांच्यात अंतर्गत बंडाळीमुळे त्यांचे साम्राज्य बरेच कमजोर झाले होते. फारसी लोक अग्नीपूजक होते. त्यांना माजूसी म्हणत. रोमन साम्राज्य हे अंतर्गत बंडाळीमुळे खिळखिळे झाले होते. याचा फायदा घेऊन फारसी लोकांनी रोमनांवर वारंवार हल्ले करून सीरिया व पॅलेस्टीनच्या प्रदेशावर कब्जा मिळविला होता. इ.स. ६१६ पर्यंत त्यांनी अरब देशाच्या उत्तर सीमेपर्यंत मजल मारली होती, ज्या ठिकाणी रोमन लोकांचा कब्जा होता. रोमन लोकांच्या पराभवामुळे मक्केचे अनेकेश्वरवादी फार आनंदीत झाले. ते रोमनांच्या-ग्रंथधारकांच्या पराभवाने खूश झाले. कारण ते (रोमन) मुस्लिमांप्रमाणेच ग्रंथधारक होते. रोमन जर ग्रंथधारक होते व सत्यावर श्रद्धा ठेवणारे असते तर पराभूत झाले नसते, असे म्हणून, अनेकेश्वरवादी लोक मुस्लिमांची टिंगलटवाळी करू लागले.

फारसींच्या विजयाने अनेकेश्वरवाद्यांचे साम्राज्य आता अरबस्तानपाशी येऊन ठेपले. आपल्याला फारसींप्रमाणे विजय मिळणार असे अनेकेश्वरवाद्यांना वाटू लागले व ते उत्साहित झाले.

या (३०:२-३) आयतींमुळे स्पष्ट भविष्यवाणी केली गेली की आज जरी रोमन पराभूत झाले असले तरी नजीकच्या भविष्यात ते पुन्हा वर्चस्वशाली होतील. मूळ ग्रंथात 'बिजअ' हा शब्दप्रयोग आला आहे. ज्याचा अर्थ अरबी भाषेत '३ ते ९ पर्यंत' असा होतो. याचाच अर्थ रोमन जास्तीतजास्त नऊ वर्षांच्या आत पुन्हा प्रभावशाली होतील. मुस्लिमही ग्रंथधारक होते, त्यामुळे त्यांना ग्रंथधारक रोमनांबद्दल सहानुभूती होती. रोमनांच्या सम्राट हर्क्युलस याने आपल्या सैन्याची पुन्हा बांधणी व रचना केली आणि अल्पावधीत विजयामागून विजय घेत फारसी साम्राज्याच्या सम्राटाला पराभूत करून आपल्या साम्राज्याला फारसी साम्राज्याचा मोठा भाग जोडला. (इ.स. ६२३ ते ६४४)

कुरआनात आलेली ही भविष्यवाणी सत्य ठरली. पूर्वीप्रमाणेच आपले साम्राज्य पुनर्स्थापित केले. बद्रच्या लढाईतील विजयानंतर मुस्लिम एकापाठोपाठ विजय मिळवित गेले आणि हिजरी ३ पर्यंत त्यांनी संपूर्ण अरबस्तान जिंकला. हा विजय रोमन विजयाप्रमाणे ठरला.

''आणि ग्रंथ बाळगणाऱ्यांपैकी ज्या लोकांनी यांची (आक्रमक समूहांची) मदत केली होती, अल्लाहने त्यांच्या गडांमधून त्यांना खाली उतरविले आणि त्यांच्या मनात असा धाक बसविला की एका समूहास तुम्ही ठार करीत राहिले व दुसऱ्या समूहास तुम्ही कैद केले.''
(कुरआन - अल्‌अहजाब - २६)

''आणि तुम्हाला त्यांची जमीन, त्यांची घरे व त्यांच्या धनसंपत्तीचे वारस बनविले आणि अशाही जमिनीचा जिच्यावर अद्याप तुम्ही पाऊल ठेवले नाही. अल्लाह प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहे.''
(कुरआन - अल्‌अहजाब - २७)

या दोन्ही आयतींचा संबंध मदीनेत असलेल्या बनी कुरेजा यांच्याशी आहे. बनी कुरेजा हा यहूदी धर्माचा जनसमुदाय होता. हे लोक मदीनेच्या पूर्वेकडील भागात राहात होते. त्यांनी आदरणीय मुहम्मद (स.) यांच्याशी मैत्रीचा करार केला होता. परंतु यहूदी आपल्या वचनाशी एकनिष्ठ राहू शकले नाहीत आणि अहजाब युद्धाची प्रसंगी त्यांनी वचनभंग करून आक्रमक काफिरांना प्रेषितांविरुद्ध मदत केली. जेव्हा प्रेषित मुहम्मद (स.) हे खंदकयुद्ध आटोपल्यानंतर घरी परतले तेव्हा जिब्राईल (अ.) यांनी अल्लाहचा आदेश दिला, ''क्षणाचीही उसंत न घेता बनी कुरेजांविरुद्ध मोर्चा वळवला जावा व त्यांच्याविरुद्ध ताबडतोब लष्करी कार्यवाही करावी.'' प्रेषित आपल्या अनुयायांसह तिकडे गेल्यावर त्यांनी त्यांच्या भागास वेढा घातला, जो पंचवीस दिवस चालला. शेवटी बनी कुरेजा या अटीवर आपल्या गढीतून उतरले की ओस कबिल्याचा सरदार सअद बिन

मुआज जो निर्णय देईल त्याप्रमाणे वागावे. सअद बिन मुआज यांच्या निर्णयाप्रमाणे बनी कुरेजातील पुरुषांची कत्तल करण्यात आली. बायका-मुले गुलाम बनविले गेले व त्यांची सर्व संपत्ती-स्थावर व जंगम जप्त करण्यात आली. या निर्णयानुसार यहूद्यांच्या तौरातमध्ये सांगितल्याप्रमाणे दगाबाजांना शासन दिले गेले. (अनुवाद - २०:१०-१४)

या कार्यवाहीत मुस्लिमांना मोठी धनसंपदा, त्यांची घरे-दारे, जमीन-जुमला व हत्यारे याचा लाभ झाला. कुरआनच्या भविष्यवाणीप्रमाणे बनी कुरेजा यांचा नायनाट झाला आणि मोठी धनसंपदा व शेती-भाती यांचा मुस्लिमांना लाभ झाला. मुस्लिमांना हा लाभ त्या भविष्यवाणीप्रमाणे मिळाला ज्यात म्हटले होते, "अशा जमिनीचाही जिच्यावर तुम्ही पाऊल टाकले नाही. त्यांचे तुम्हाला वारसदार बनविले. अल्लाह प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहे."

"तेव्हा आज आम्ही तुझे शव वाचवू, अशासाठी की नंतरच्या लोकांकरिता तू (बोधचिन्ह) ठरावेस आणि वस्तुस्थिती अशी की बहुतेक लोक आमच्या संकेतांपासून बेसावध राहतात." (कुरआन - यूनुस - ९२)

"या वेळी आम्ही मूसा (अ.) वर 'वह्य' पाठवली की आपली काठी समुद्रावर मारा, तेव्हा समुद्र फाटला व प्रत्येक हिस्सा महापर्वतासारखा बनला. तेथे आम्ही दुसऱ्या गटालाही जवळ आणले आणि मूसा (अ.) व त्यांच्यासोबत होते त्यांना आम्ही वाचवले. मग इतरांना बुडवून टाकले." (कुरआन - अशशुरा - ६३-६६)

इजिप्तचा राजा फिरऔन याने मूसा (अ.) व त्यांचे अनुयायी यहूदी यांना देशातून बाहेर पडण्याची अनुमती दिली. पण ते बाहेर जाण्यास निघाले व चालू लागले तेव्हा फिरऔनने त्यांचा पाठलाग सुरू केला. तेव्हा अल्लाहने त्याला पाण्यात बुडवून नष्ट केल्याची हकीगत कुरआनात आलेली आहे.

इजिप्तचा राजा रमीस (दुसरा) त्याचा मुलगा फरोह यासंबंधी कुरआनात म्हटले आहे, "या पाठलाग करणाऱ्या राजाला व त्याच्या सैन्याला समुद्रात बुडविण्यात आले." बायबलमध्ये म्हटले आहे, "आणि वर पुन्हा पाणी पसरले व फरोह राजाला त्याचा रथ, सारथी, सैन्य व स्वत: फरोहला झाकून टाकले. तेथे त्यांच्यापैकी काहीही शिल्लक राहिले नाही." (Exodus - 14 : 28)

पवित्र कुरआनात विस्मयकारक म्हटले आहे,

"आज आम्ही तुमच्या मृत शरीराला सुरक्षित ठेवू जेणेकरून ते पुढील सर्व पिढ्यांना एक निशाणी ठरावी." (कुरआन - १०:९२)

कुरआन अवतरणाच्या वेळी कोणाला ठाऊक नव्हते की फरोहचे शरीर खरोखर एकसंघ राहिले आहे आणि सुमारे १४०० वर्षांनंतर हे सर्वांना कळू शकले.

इ.स. १८९८ मध्ये प्रा. लोरेट यांनी मोझेसच्या वेळचे फरोहच्या शरीराचे अवशेष, जे ममीच्या स्वरूपात होते, ते शोधून काढले. थेबेस येथे नेकोपोलिसच्या थडग्यात ३००० वर्षांपूर्वी कपड्यात गुंडाळलेले अवशेष ८ जुलै १९०७ मध्ये इलियट स्मिथने उघडले आणि त्यांची शास्त्रीय तपासणी करण्यासाठी उपलब्ध करून दिले. इ.स. १९१२ मध्ये त्याने एक 'राजेशाही ममी' नावाचे पुस्तक प्रकाशित केले. त्याच्या संशोधनाने सिद्ध केले की प्रा. लोरेट यांनी शोधून काढलेली ममी खरोखरीच फरोह राजाचीच आहे, ज्याला मोझेस ठाऊक होता. ज्यास त्याने विरोध केला, त्याचा पाठलाग झाला व त्यात त्याने आपला जीव गमावला. त्याचे अवशेष ईश्वराच्या इच्छेप्रमाणे पुढील पिढ्यांसाठी बोधचिन्ह म्हणून राखले गेले. याप्रमाणे कुरआनातसुद्धा उल्लेख आहे.

इ.स. १९७५ मध्ये डॉ. बुकाईल यांनी फरोहच्या शरीराची पाहणी बारकाईने कैरो येथे जाऊन केली. त्यात आश्चर्यकारक निष्कर्ष पुढीलप्रमाणे निघाले. "आधुनिक बायबलमधील पवित्र वचनांच्या पुराव्याचा जे मागोवा घेतात, त्यांनी कुरआनातील असंख्य वचनांमध्ये लक्ष द्यायला हवे, ज्यात कैरो येथील इजिप्शियन संग्रहालयातील राजेशाही ममींच्या खोलीत ठेवलेले फरोहच्या शरीरासंबंधी वचने आहेत."

इसवी सनाच्या सातव्या शतकातच कुरआनात असे प्रतिपादन केले होते, "फरोहचे शरीर मानवजातीसाठी एक निशाणी म्हणून राखले जाईल." हे ऐतिहासिक सत्य कुरआनात आलेले आहे.

पवित्र कुरआनात विशद केलेली काही भाकिते अगदी आश्चर्यकारकरीत्या खरी ठरली आहेत हे पाहिल्यावर खरोखरीच वाचक स्तंभित होतो.

"ज्या लोकांनी स्वत:वर अत्याचार झाला असताना अल्लाहच्या मार्गात हिजरत (स्थलांतर) केली, आम्ही त्यांना जगात खचितच चांगले स्थान देऊ आणि आखिरतचा मोबदला तर कितीतरी अधिक आहे, जर त्यांनी हे जाणून घेतले असते."

(कुरआन - अन्नहल - ४१)

सुरुवातीच्या काळात इस्लामविरोधी अनेकेश्वरवादी कुरैशींनी इस्लाम स्वीकारलेल्या अल्पसंख्याकांना जगणे मुश्किल केले होते. त्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले. शेवटी प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आज्ञेप्रमाणे या लोकांनी मक्का सोडून बाजूला ॲबिसिनीयात आश्रय घेतला. या स्थलांतरीतांना ॲबिसिनीयाच्या राजाने औदार्याने

वागविले. कुरैशांनी मुस्लिमांना तेथून हुसकावण्याचे प्रयत्न सुरु केले. प्रेषित मुहम्मद (स.) मदीनेस गेल्यावर स्थलांतरित झालेले मुस्लिम मदीनेस गेले. तेथे त्याचे कष्टमय जीवन संपले. एवढेच नव्हे तर मक्का विजयानंतर ते आनंदित झाले व सुखी जीवन जगू लागले आणि ईश्वराने वचन दिले की पारलौकिक सुखी जीवन देईल. जे फक्त अल्लाहच्या खुशीसाठी आपली घरेदारे सोडून गेले होते, अल्लाहने त्यांना त्याचा चांगला मोबदला दिला व ते सुखी जीवन व्यतीत करू लागले. ही वरील आयतीत दिलेली भविष्यवाणी शब्दश: खरी ठरली.

"अबू लहबचे दोन्ही हात तुटून गेले आणि त्याचा सर्वनाश झाला. त्याची धनसंपत्ती व त्याची कमाई त्याच्या काहीही कामी आली नाही. लवकरच तो ज्वालामय दाखल होईल." (कुरआन - अललहब - १०३)

अबू लहब हा प्रेषित मुहम्मद (स.) यांचा चुलता होता. तो काबागृहाच्या विश्वस्तांपैकी एक असून उझ्झा देवतेचा पूजक होता. मूर्तीपूजक असून श्रीमंत होता व अतिशय घमेंडखोर होता. तो सुरवातीपासून इस्लाम व प्रेषित मुहम्मद (स.) यांचा विरोधक होता. त्याने प्रेषितांशी असलेले नातेही तोडून टाकले होते. शत्रुत्वात तो सर्व नीतीमत्ता सोडून बसला होता. त्यानेच प्रेषितांवर सर्वंकश बहिष्कार टाकण्यात आलेल्या चळवळीचे नेतृत्व केले होते. तो अत्यंत कृपण असून धनाचा लोभी होता. त्याला आपल्या उपास्यमूर्तींबद्दल अभिमान होता व प्रेषित एकेश्वरत्व मांडत होते व मूर्तीपूजेस त्यांचा विरोध होता. 'अबू लहब याचे दोन्ही हात तुटले' याचा अर्थ त्याची शारीरिक शक्तीही नष्ट झाली होती व आर्थिक हानीही झाली होती. बदरच्या युद्धात त्याचे सामर्थ्य खचले. त्याचे अनेक समर्थक मारले गेले व त्याचे ऐश्वर्य लयास गेले. त्याचा सर्वनाश झाला. तो बदरच्या युद्धात सहभागी झाला नाही आणि तो युद्ध संपून एक आठवडाही उलटला नाही तेव्हा त्याला देवीचा (माता) रोग झाला व त्याच रोगाने त्याचा मृत्यु झाला. इतर कथनातून ही माहिती मिळते की त्याचा मृत्यु झाल्यानंतर माता रोगामुळे त्याच्याजवळदेखील कोणी गेले नाही व त्याचे प्रेत तीन दिवस सडत राहिले. कोणीही त्याची विल्हेवाट लावणारा नव्हता. माता रोग संसर्गजन्य समजला जात असे. त्यामुळे खुद्द त्याच्या मुलांनीही त्याचे प्रेत एका भिंतीआड ठेवले व लांबूनच त्यावर दगड टाकून ते दफन केले.

अबू लहब याचा कोणीही वारस राहिला नाही व त्याच्या मृत्युनंतरही त्याचा धिक्कार करणारी एक संपूर्ण उम्मत (जातीसमूह) अस्तित्वात आहे (मुस्लिम). मुस्लिम नमाज पठणात 'अबुलहब' सूरहचे पठण करतात व प्रेषितांच्या या शत्रुची निरंतर निर्भर्त्सना व धिक्कार चालू आहे व कयामतपर्यंत चालू राहील.

कुरआनचे हे भाकित, "प्रेषितांचे वर्चस्व निर्माण होईल व प्रेषितशत्रू नाश पावेल." हे शब्दश: खरे ठरले. कुरआनचा हा सत्यतेचा पुरावा कयामतपर्यंत शिल्लक राहणार आहे.

"आणि आमचे लष्करच वर्चस्वी होऊन राहील. तेव्हा त्यांच्याकडून आपले लक्ष हटवा एकवेळपावेतो. आणि बघत राहा तेही लवकरच पाहतील. काय हे आमच्या शिक्षेकरिता घाई माजवत आहेत, जेव्हा ती (शिक्षा) त्यांच्या अंगणात अवतरित होईल, तेव्हा मोठी वाईट असेल त्या लोकांची सकाळ ज्यांना यापासून खबरदार केले गेले आहे." (कुरआन - अस्सफात - १७३-१७७)

ईश्वराने प्रेषितांना साथ देणाऱ्या श्रद्धावंतांना आपले सैन्य या अर्थाने नेहमीच संबोधिले आहे आणि नेहमी हेच सैन्य प्रत्येक प्रतिकूलतेवर मात करून यशस्वी होईल, असे म्हटले आहे.

विविध प्रेषितांचा इतिहास याच गोष्टीची साक्ष देतो. याचमुळे फिरऔनच्या मुकाबल्यात बनी इस्राईल यांचाच विजय झाला. इतर प्रेषितांच्या बाबतीतही असेच घडले. त्यांच्या विरोधकांचाच नायनाट झाला व श्रद्धा बाळगणाऱ्यांना नेहमीच ईश्वराने वाचवले व शेवटी त्यांनाच अधिकार लाभला. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या बाबतीतही असेच घडले व वरील कुरआनचे निवेदन हे शब्दश: खरे ठरले. श्रद्धा बाळगणाऱ्यांचे सैन्य शेवटी नाकारणाऱ्यांवर वर्चस्वी ठरले आणि अरबच्या भूमीवर इस्लामची अधिसत्ता प्रस्थापित झाली.

"इन्कार करणारे अडून बसले असतील, त्याबाबतीत त्यांच्याकडे दुर्लक्ष करा. अल्पावधित त्यांना दुष्परिणतीस तोंड द्यावे लागेल." ही कुरआनातील वरील आयतीत भविष्यवाणी आलेली आहे.

श्रद्धा बाळगणाऱ्यांच्या हस्ते नाकारणाऱ्यांचा (काफिरांचा) सर्वनाश घडून आला.

बद्रची लढाई सकाळच्या वेळेस झाली. तसेच मक्का विजयाची घटनादेखील सकाळीच घडली. जेव्हा प्रेषित मुहम्मद (स.) दहा हजार सैन्यांसह मक्का शहरात दाखल झाले आणि काबागृह ताब्यात घेऊन मस्जिद हरममध्ये दाखल झाले, नव्हे! हा विजयी क्षण प्रेषितांनी 'क्षमेचा दिवस' म्हणूनही घोषित केला. सर्वांना माफ केले! अशा रीतीने कुरआनातील वरील ३७:१७३-१७७ आयतीत वर्तविले गेलेले भाकित अक्षरश: खरे ठरले.

"हे (नाकारणाऱ्या) समूहांपैकी एक सैन्य होय जे याच ठिकाणी पराभूत होईल."
(कुरआन - सॉद - ११)

याच सूरहमधील आयत क्र.१२ ते १५ यात विविध जनसमूहांच्या विनाशाचा संदर्भ देण्यात आला आहे. नूह यांचे राष्ट्र आद यांचे राष्ट्र, लूत यांचे राष्ट्र व आयकावाले आणि फिरऔन या बंडखोरवृत्तीच्या राष्ट्रांनी त्यांच्याकडे आलेल्या प्रेषितांची अवहेलना केली. त्यांची टिंगल-टवाळी केली व त्यांना वेडे ठरविले. त्यांच्या उपदेशांकडे पाठ फिरवली. परिणामी त्यांनी ईशप्रकोपास आमंत्रण दिले व प्रत्येक राष्ट्रांवर तो कोसळला व त्यांचा नायनाट झाला.

कोणाला प्रेषितत्व द्यायचे हे त्याचा - (अल्लाहचाच) संपूर्ण अधिकार आहे. तो ज्याला इच्छितो त्याला प्रेषितत्व देतो. त्यात हस्तक्षेप करण्याचा इतर कोणालाही अधिकार नाही. मुहम्मद (स.) यांना प्रेषित म्हणून ईश्वराने निवडले. त्याविरोधात असणारे नाकारणारे म्हणू लागले, "आमच्यातील कोणा श्रीमंत किंवा बलशाही अशा सरदारास अथवा प्रमुखास का प्रेषित म्हणून निवडले नाही? मुहम्मद (स.) यांच्यासारख्या अशिक्षिताला का म्हणून प्रेषित बनविले गेले?" त्यांचा हाच प्रमुख आक्षेप होता. जणू ईश्वराने या नाकारणाऱ्यांना विचारून प्रेषित कोणास नेमावे हे ठरवावयास पाहिजे होते. वास्तविक प्रेषितत्व हे अर्जित करता येत नाही. ती अल्लाहची देणगी असते, तो इच्छितो त्याला ती बहाल करतो. एवढी साधी गोष्ट त्यांना समजत नव्हती.

अल्लाहच्या प्रेषितास हे आपल्या घमेंडीत राहून विरोध करीत आहेत, परंतु लवकरच त्यांना कळून येईल की सत्य-असत्याच्या युद्धात या इन्कार करणाऱ्यांचे लष्कर निष्प्रभ ठरेल. असत्य अगदी वाईटरीत्या पराभूत होईल व त्याचा विनाश होईल. यास्तव मक्का विजयाप्रसंगी या नाकारणाऱ्यांचे लष्कर अगदी कूचकामी ठरले. येथपावेतो की हे लोक इस्लामच्या सैन्याशी दोन हातही करू शकले नाहीत.

प्रेषितांच्या विरोधात नाकारणाऱ्यांचे हे सैन्य शेवटी पराभूत झाले. कुरआनच्या भविष्यवाणीप्रमाणेच श्रद्धावंतांच्या मुकाबल्यात इन्कार करणारे पराभूत झाले. प्रेषितांच्या मुकाबल्यात दुसऱ्या समूहांनादेखील पराभूत व्हावे लागले.

'सत्यासमोर असत्य पराभूत झाले, असत्य नष्ट होणारच होते' ही ईशवाणी मक्का विजयाने पुन्हा एकदा सिद्ध झाली. 'प्रेषितांच्या मुकाबल्यात नाकारणारे पराभूत होऊन नष्ट झाले' ही भविष्यवाणी सत्य ठरली.

"सूरह मुहम्मद ही जिहाद (धर्मयुद्ध) संबंधीची सूरह आहे. नाकारणाऱ्यांच्या बाबतीत ही सूरह ईशप्रकोप बनून अवतरली आहे. यातील आयती १ ते ५ या महत्त्वपूर्ण आयती आहेत. यात म्हटले गेले आहे,

"ज्या लोकांनी कुफ्र केले आणि अल्लाहच्या मार्गापासून रोखले त्यांची कर्मे त्याने निष्फळ केलीत. आणि ज्या लोकांनी ईमान बाळगले व सत्कर्म केले, मुहम्मद (स.) वर अवतरित केले गेले जे सत्य आहे व त्यांच्या पालनकर्त्यातर्फे त्यांची दुष्कृत्ये त्यांच्यापासून दूर केलीत. ज्यांनी कुफ्र (इन्कार) केले त्यांनी असत्याचे अनुसरण केले. तुमचा सामना नाकारणाऱ्यांशी होईल तेव्हा त्यांच्या मानेवर प्रहार करा. जेव्हा ते पूर्ण हतबल होतील, तेव्हा एक तर उपकार करणे आहे किंवा फिदियाचा व्यवहार करणे येथपर्यंत की लढणाऱ्यांनी शस्त्र खाली ठेवावे. तो त्यांना मार्ग दाखविल व त्यांची अवस्था ठीक करील."
(कुरआन - मुहम्मद - १-५)

अल्लाहच्या मार्गापासून रोखणे याचा अर्थ इस्लाम धर्म स्वीकारण्याच्या मार्गात अडथळे निर्माण करणे, धर्माच्या प्रसारास व प्रसारकार्यात अडथळे निर्माण करणे अथवा मुस्लिमांना या गोष्टींकरता विवश करणे की त्यांनी इस्लामच्या आदेशांचे पालन न करावे. मक्केतील नाकारणाऱ्यांनी मुस्लिमांना इस्लामप्रमाणे वागण्यास सतत विरोध केला. शेवटी भयंकर छळ सुरू केला की त्यामुळे त्यांना मक्का सोडून मदीनेस स्थलांतर करून जावे लागले. त्या वेळी कुरआनात भविष्यवाणी आली, "नाकारणाऱ्यांची सर्व कर्मे वाया जातील. त्यांचे सर्व कट व त्यांची कारस्थाने अयशस्वी ठरतील. त्यांचे कोणतेही कर्म अल्लाह स्वीकारणार नाही." कुरआनचे हे भाकित खरे ठरले आणि नाकारणाऱ्यांचे सर्व प्रयत्न फोल ठरले, ते जे अल्लाहच्या प्रेषिताविरुद्ध करीत होते.

अल्लाह प्रामाणिक व श्रद्धावंत लोकांना मानतो जे प्रेषितांच्या आज्ञांचे पालन करतात व कुरआनात दर्शविलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे जीवन व्यतीत करतात. त्याविरुद्ध वागणाऱ्यांना 'नाकारणारे' (काफिर) म्हणतात. "अल्लाह प्रामाणिक, श्रद्धा बाळगणाऱ्यांचे अपराध माफ करील व त्यांची धार्मिक, नैतिक व ऐहिक स्थिती ठीक करील." असे म्हटले आहे. मक्का विजयानंतर त्याची प्रचिती आली. श्रद्धा बाळगणाऱ्यांचे जीवन सुशोभित झाले आणि त्यांची स्थिती दिवसेंदिवस उत्तम होत गेली. कुरआनात हे जे भाकित मांडले होते तेही सत्य ठरले.

या आयती वरवर वाचून समजत नाहीत व त्यात आलेली जी गर्भित भाकिते आहेत ती समजून घेण्यासाठी मुळातून इस्लाम, नाकारणारे व त्यांच्यात झालेले संघर्ष हे

समजून घेणे आवश्यक आहे. याशिवाय त्यातील सत्य समजत नाही. नसता अकारण अनेक गैरसमज निर्माण होतात हे वाचकाने लक्षात घेतले पाहिजे.

"तेव्हा तुम्ही कमजोर पडू नका आणि तहाचे आमंत्रण देऊ नका. तुम्हीच वर्चस्वशाली व्हाल. अल्लाह तुमच्या सोबतीला आहे आणि तो तुमची कर्मे निष्फळ ठरू देणार नाही." (कुरआन - मुहम्मद - ३५)

या आयतीत युद्ध परिस्थितीत श्रद्धावंतांनी कसे वागावे याचे मार्गदर्शन केले आले आहे. नाकारणारे आणि श्रद्धावंत जेव्हा युद्धासाठी एकमेकांसमोर उभे असताना तुम्ही स्वत: होऊन शत्रूशी सौम्यपणे वागून त्याच्यासमोर तहाचा प्रस्ताव मांडू नका. कारण तसे जर तुम्ही केलात तर तुमचे निमंत्रण म्हणजे भ्याडपणाचे लक्षण ठरेल. म्हणून तसे करण्यास मनाई करण्यात आली आहे. मात्र जेव्हा नाकारणारा समूह स्वत:हून तहाचा प्रस्ताव मांडेल तर तसा प्रस्ताव स्वीकारण्यास हरकत नाही. या आयतीच्या पुष्ट्यार्थ 'सूरह अनफाल'ची ६१ वी आयत लक्षात घेण्यासारखी आहे. "जर ते तहाकरिता झुकतील तर तुम्हीसुद्धा त्यासाठी झुका आणि अल्लाहवर भरवसा ठेवा."

येथे हे विशेषत्वाने लक्षात ठेवले पाहिजे की रक्तपात न होता शांततेच्या मार्गाने जर तुमचा हेतू साध्य होणार असेल तर तो जरूर साधा. येथे "तुम्हीच वर्चस्वशाली राहाल." हे ईशवचन दर्शविते की "तुम्हाला विजय मिळेल व तुम्ही प्रभावशाली ठराल." हे भाकित कुरआनात येथे दर्शविते. ही वस्तुस्थिती आहे की श्रद्धा बाळगणाऱ्यांचे पारडे प्रत्येक युद्धात जड राहिले व ते नाकारणाऱ्यांवर वर्चस्वशाली ठरले. अशा रीतीने कुरआनचे हे भाकित शब्दश: खरे ठरले.

"अल्लाह तुमच्या सोबतीला आहे आणि तो तुमची कर्मे निष्फळ करणार नाही." याचा अर्थ म्हणजे अल्लाहचे वचन बुलंद करण्यास्तव तुम्ही केलेले प्रयत्न या जगतात प्रभावशाली ठरतील. तसेच ईशदरबारी आखिरतमध्ये देखील हे प्रयत्न सफल ठरतील.

यावरून एक गोष्ट आपोआपच स्पष्ट होते की, श्रद्धा बाळगून ईशभयाने वर्तन ठेवणाऱ्यांचे जीवन खेळ-तमाशा नसते, तर गांभीर्यपूर्ण व उद्दिष्टपूर्ण असते. आखिरतपासून जे गाफील होतात त्यांच्यासाठी हे ऐहिक जीवन केवळ एक मनोरंजन, खेळ व तमाशा बनून राहते. या आयतीवरून (कुरआन - मुहम्मद - ३५) तुम्ही संयमाने वागा. पण त्याचबरोबर तुमचे बाह्य जीवन व आंतरिक जीवन किती सुसंगत आहे हे महत्त्वाचे आहे. त्यावरून तुम्ही श्रद्धेच्या दालनात कितपत सच्चे आहात तेही तितकेच महत्त्वाचे ठरते.

"लवकरच यांचा जथा हार खाईल आणि हे पाठ फिरवून पळ काढतील."

(कुरआन - अल्-कमर - ४५)

कुरआनातील अल-कमर या सूरहमधील आयत क्रमांक ४५ मध्ये असे भविष्य मांडले गेले आहे, "लवकरच त्यांचा जथा हार खाईल व ते पाठ दाखवून पळ काढतील." कुरआनने हे भाकित मक्केत मांडलेले होते. या काळात वास्तविकता कुरैश जनसमूहाचा पराभव होण्याची बाह्यत: कोणतीही लक्षणे दिसत नव्हती. कुरआनचे हे भाकित काही वर्षांनंतर बद्रच्या लढाईत सत्य ठरले. हदीसवचनात असा उल्लेख आला आहे की बद्र युद्धाप्रसंगी हिजरी सन २ मध्ये प्रेषित मुहम्मद (स.) यांनी चिलखत घातले होते. युद्धासाठी ते बाहेर पडले त्या वेळी "यांचा जथा हार खाईल आणि हे पाठ फिरवून पळ काढतील.'' या आयतीचे पठण करीत होते.

थोड्याच वेळात नाकारणाऱ्यांची त्रेधा-तिरपीट उडाली आणि त्यांचा मोठा पराभव झाला व त्यांची नामुष्की झाली. विशेष म्हणजे प्रेषितांच्याजवळ फक्त ३१३ सैनिक होते, तर नाकारणाऱ्या कुरैशांची संख्या जवळपास एक हजार होती. प्रेषितांच्या सैनिकांजवळ नीट हत्यारेदेखील नव्हती. पण त्यांच्याजवळ मजबूत श्रद्धा होती व अल्लाहवर प्रखर निष्ठा होती. त्याच्या जोरावर त्यांनी दृढपणे मुकाबला केला व ईश्वराने सर्व परिस्थिती बदलून टाकली. श्रद्धावंतांसमोर नाकारणाऱ्यांचा निभाव लागला नाही व त्यांनी कच खाऊन माघार घेतली. प्रेषितांपाशी कोणतीही पुरेशी साधनसामुग्री नसतानाही व संख्येने कमी असतानाही त्यांना नाकारणाऱ्यांवर मोठा विजय मिळाला, जो श्रद्धावंतांचा लष्करीदृष्ट्या पहिला विजय ठरला.

अशाच प्रकारे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये खंदकांच्या लढाईत हिजरी सन ५ मध्येही नाकारणाऱ्यांवर मोठा विजय मिळाला.

पुढील आयतीत म्हटले गेले आहे की "प्रेषितांच्या विरोधात नाकारणारे पराभूत झालेच आहेत, कयामतच्या दिवशीही त्यांना मोठ्या जबरदस्त शिक्षेस तोंड द्यावे लागेल."

कुरआनात आलेले हे भाकित अगदी तंतोतंत खरे ठरलेले आढळते. श्रद्धावंतांच्या मदतीला नेहमीच अल्लाहची मदत मिळेल, पण त्यासाठी तेवढीच त्यांची अल्लाहवर व प्रेषितांवर प्रखर निष्ठा असली पाहिजे.

"तुम्ही त्या दांभिकांना नाही पाहिले, जे आपल्या त्या भावांना जे ग्रंथधारकांपैकी नाकारणारे (काफिर) झाले, म्हणतात, "जर तुम्हास बाहेर घालविले तर आम्हीही तुमच्यासोबत निघू आणि तुमच्या बाबतीत आम्ही कदापि कोणाचे म्हणणे मानणार नाहीत

आणि जर तुम्हा लोकांशी युद्ध केले गेले तर आम्ही अवश्य तुमची मदत करू, परंतु अल्लाह साक्ष देतो की, हे लोक अगदी खोटारडे आहेत.'' (कुरआन - ५९:११)

''जर त्यांना बाहेर घालवले गेले तर हे त्यांच्यासोबत निघणार नाहीत आणि जर मदत करतील तर पाठ फिरवतील, मग त्यांची मदत नाही केली जाणार.''

(कुरआन -५९:१२)

कुरआनातील सूरह अल हश्रमधील आयत ११ व १२ यात जे भाकित वर्तविले आहे ते पुढील काळात सत्य ठरलेले दिसते.

मदीनेतील दांभिक मुस्लिम ज्यांचा यहुदी लोकांशी मैत्रीसंबंध होता ते गुप्तरीत्या त्यांचा पाठपुरावा करीत होते. म्हणून या प्रसंगी त्यांची दशा निवेदन करून मुस्लिमांना यापासून सावध केले गेले व त्यांना धीर दिला गेला की ''हे नेभळट लोक आहेत, ते तुमच्याशी लढण्याची कधीही हिंमत करणार नाहीत.''

मदीनेच्या आसपास असलेले बनी नजीर, बनी कुरेजा हे मदीनेतील दांभिक मुस्लिमांप्रमाणेच वागणारे होते. दांभिक मुस्लिम व यहूदी हे दोघे एकाच लायकीचे होते.

बनी नजीर संकटात असताना त्यांना कोणतीही मदत केली नाही. बनी कुरेजांनाही ते काही मदत करणार नाहीत हे कुरआनने भाकित वर्तविले होते ते शब्दशः खरे ठरले. कारण मुस्लिमांचा व बनी कुरेजा यांच्याशी संघर्ष उद्‌भवला तेव्हा त्यांना कोणतीही मदत दिली नाही. ''जर त्यांच्याशी युद्ध केले गेले तर हे त्यांची मदत करणार नाहीत आणि जर मदत करतील तर पाठ फिरवतील.'' हे भाकित सत्य ठरलेले दिसते.

यहुदींचे कबिले मुस्लिमांशी मुकाबला करण्यास कधीही समोर आले नाहीत. रणक्षेत्रांत समोर येऊन त्यांनी कधीही लढण्याची हिंमत दाखविली नाही. बनी कुरेजा व बनी नजीर कबिल्यांनी कधीच समोर येऊन युद्ध केले नाही. खैबर युद्धाच्या वेळीदेखील बनी कुरेजा यांनी मुस्लिमांशी दगाबाजी करून त्यांच्या शत्रुंना मदत केली व त्यांच्याशी केलेला युद्धकरार भंग केला. यहुदींना कुरआनात भविष्य वर्तविल्याप्रमाणे प्राण व मालाचे भयंकर नुकसान सोसावे लागले. देश परांगदा व्हावे लागले. अशा प्रकारे कुरआनच्या निवेदनाची सत्यता अगदी जाहीरपणे सिद्ध झाली.

''आणि जेव्हा मरियमपुत्र ईसाने म्हटले, हे बनी इस्त्राईल! मी तुमच्याकडे अल्लाहचा प्रेषित आहे आणि तौरातपैकी जे काही माझ्यासमोर हजर आहे त्याचे सत्य

समर्थन करणारा आहे आणि शुभवार्ता देणारा आहे. एक प्रेषिताची, जो माझ्यानंतर येईल त्याचे नाव अहमद असेल तर जेव्हा तो त्यांच्याजवळ स्पष्ट निशाण्या घेऊन आला तेव्हा ते म्हणाले, ही तर उघड जादू आहे." (कुरआन - ६१:६)

या आयतीत जे म्हटले आहे ते ईसा (अ.) यांनी बनी इस्राईलना उद्देशून म्हटले आहे, "मी तुमच्याकडे अल्लाहचा प्रेषित म्हणून आलो आहे." याचा अर्थ स्पष्ट आहे की ईसा (अ.) यांना अल्लाहचा पुत्र म्हणून जे म्हटले जाते त्याचे खंडन होते व ते फक्त अल्लाहचे प्रेषित म्हणून आले आहेत. "आणि तौरात जे काही माझ्यासमोर हजर आहे" याचा अर्थ तौरात मूळच्या शुद्ध स्वरूपात राहिला नसून त्याचा काही अंश जो शुद्ध स्वरूपात शिल्लक होता, त्यानुसार ही भविष्यवाणी वर्तवली आहे की "ईसा (अ.) यांच्यानंतर एक प्रेषित येणार आहे, त्याचे नाव अहमद असेल."

कुरआनात स्पष्ट भाकित मांडले की, ईसा (अ.) हे बनी इस्त्राईल वंशाचे अंतिम प्रेषित असून त्यांच्यानंतर बनी इस्माईल वंशात सर्वांत शेवटच्या प्रेषिताचे आगमन होणार आहे ही शुभवार्ता देण्याचे कार्य प्रेषित ईसा (अ.) यांच्यावर सोपविली गेली. त्यांनी शुभसमाचार दिला की "माझ्यानंतर येणारा प्रेषित हा महान प्रेषित ठरणार आहे."

येथे त्याचे नाव 'अहमद' असे जे म्हटले आहे ते गुणवाचक नाव सांगितले आहे.

मुहम्मद (स.) यांच्या एका हदीसमध्ये म्हटले आहे की "मी अहमद आहे."

शब्द 'अहमद' याचा संकेत प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या शुद्ध शीलाकडे आहे. यावरून स्पष्ट करण्यात आले आहे की नीती व चारित्र्यवान मुहम्मद (स.) म्हणजे प्रशंसनीय असतील.

'अहमद' या शब्दाचा दुसरा अर्थ अत्याधिक ईशस्तवन करणारा असाही आहे. मुहम्मद (स.) यांनी विपूल प्रमाणात अल्लाहची स्तुती-प्रशंसा केली आहे.

योहान -१४:३०, योहान - १६:०७, मत्तयकृत बायबलमध्ये ही अंतिम प्रेषिताबद्दल अशा प्रकारची भाकिते आली आहेत ती अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) यांना साजेशी आहेत. ख्रिश्चन व यहूदी यांच्या धार्मिक वाङ्मयात मुहम्मद (स.) हे अंतिम प्रेषित म्हणून पाठविले गेले आहेत, असे वेगवेगळ्या प्रकारे उल्लेख आलेले आहेत.

"आणि अन्य गोष्टीही ज्या तुम्ही इच्छिता, अल्लाहतर्फे मदत आणि लवकरच प्राप्त होणारा विजय, आणि (हे प्रेषित!) श्रद्धा बाळगणाऱ्यांना याचा शुभसमाचार द्या."

(कुरआन - ३१:१३)

या आयतीत म्हटले आहे की, जिहाद करण्यास जे सिद्ध होतात व आपले अर्थ व प्राण त्यागून केव्हाही आपली श्रद्धा अढळ ठेवतात त्यांना आखिरतच्या यशाखेरीज त्या गोष्टीही लाभतील ज्या तुम्हाला प्रिय आहेत. अर्थात अल्लाहची मदत व लवकर प्राप्त होणारा विजय. जवळच्या विजयाचा संकेत मक्का विजयाकडे आहे, जो लवकर प्राप्त होण्यासाठी श्रद्धावंत बेचैन होते. याप्रसंगी त्या जिहाद करणाऱ्यांना अल्लाहच्या मदतीच्या उदयासोबतच ही शुभवार्ता दिली गेली आहे की मक्का लवकरच जिंकले जाईल. यास्तव या सूरहच्या अवतरणानंतर फार लवकर मक्केवर विजय प्राप्त झाला आणि कुरआन व प्रेषितांची सत्यता अशी सिद्ध झाली की इस्लामचे कट्टर विरोधकही त्याला मानणारे झाले.

मक्का विजयाचे भाकित व या विजयानंतर इस्लामचा झपाट्याने झालेला विस्तार मोठे आश्चर्य करणारा ठरला.

"आणि (याचे अल्लाहतर्फे पाठविले जाणे) या (निरक्षरां)पैकी त्या इतर लोकांकरिताही आहे, जे अद्याप त्यांना सामील झाले नाहीत आणि अल्लाह वर्चस्वशाली, बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे." (कुरआन - ६२:०३)

यात शुभसमाचार दिला आहे की "प्रेषितांच्या अनुयायींचा परिघ व्यापक होत जाईल आणि यात इतर अरब कबिलेही सामील होतील." हे कुरआनचे भाकित खरे ठरले आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या जीवनातच अरबांचे सर्व कबिले मुस्लिम झाले.

येथे हे स्पष्ट करण्यात आले आहे की प्रेषित मुहम्मद (स.) हे अरब लोकांमध्ये आले असले तरी कुरआन स्पष्ट म्हणते, त्यांना केवळ अरबांसाठीच पाठवले नव्हते. अरब व अरबेतर, ग्रंथधारक व ग्रंथधारकेतर, साक्षर व निरक्षर या सर्वांसाठी, तसेच केवळ विशिष्ट काळापुरतेच नव्हे तर कयामतपर्यंत समस्त कालखंडाकरिता पाठविले आहे."

बनी इस्त्राईल यांना यासाठी राग होता की, इस्माईल (अ.) यांच्याशिवाय त्याच्या वंशात कोणीही प्रेषित आला नाही तर आताच आणि तोही अंतिम प्रेषित त्यांच्या शाखेत कसा आला. वास्तविक प्रेषितास कोठे आणि का पाठवावे हा अल्लाहचा अधिकार आहे, इतर कोणासही नाही. ईश्वर आपल्या इच्छेनुसार ज्याला पाहिजे त्याला प्रेषितपद देतो. परंतु विद्वेषाने व वर्णव्देषाने पछाडलेले यहूदी यांना हे अजिबात रुचले नाही.

"(हे प्रेषित!) आम्ही तुम्हाला शिकवू, मग तुम्ही विसरणार नाही."

(कुरआन - ८७:०६)

"आणि आम्ही तुमच्यासाठी सोपा मार्ग अनुकूल करून देऊ."

(कुरआन - ८७:०८)

या आयतीत प्रेषित मुहम्मद (स.) यांना संबोधिले गेले आहे आणि फर्माविले जात आहे की, कुरआनच्या स्वरूपात जो संदेश (वही) आम्ही उतरवित आहोत त्याला तुमच्या मनात सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी आम्ही पत्करली आहे आणि म्हणून या गोष्टीची काही शंका नाही की याचा एखादा भाग तुम्ही विसराल. स्पष्ट आहे की, प्रेषित मुहम्मद (स.) सुरुवातीस या शंकेने की एखादी आयत वा शब्द विसरला जाईल, जेव्हा कुरआनचा एखादा भाग अवतरत असे तेव्हा त्याचे ग्रहण करण्यात घाई करीत असत. सर्वश्रेष्ठ अल्लाहचे हे आश्वासन म्हणजे कुरआन आणि प्रेषितांच्या सत्यनिष्ठेचा पुरावा आहे. कारण संपूर्ण कुरआन प्रेषित मुहम्मद (स.) यांना अशाप्रकारे स्मरणात राहिले की, ते त्याचा एकही शब्द विसरले नाही आणि त्यांनी अत्यंत निकोप स्थितीत संपूर्ण कुरआनला समाजाकडे सोपविले आणि आज आमच्यासमोर त्याच्या लाखो, करोडो प्रती आपल्या मूळ स्वरूपात अशाप्रकारे उपलब्ध आहेत की कयामतपर्यंत ते सुरक्षित ठेवण्याची (राहण्याची) व्यवस्था झाली आहे. जणू पवित्र कुरआन हा एक चिरस्थायी चमत्कार आहे, ज्याचे अवलोकन प्रत्येक काळातील लोक करू शकतात.

या आयतीद्वारे प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या समाधानाची अधिक व्यवस्था केली गेली आहे की ''पवित्र कुरआनला जसेच्या तसे लोकांप्रत पोहचविणे कठीण आहे. तरीही सर्वश्रेष्ठ अल्लाह सर्व अडचणींतून तुमच्यासाठी सोपा मार्ग काढील.''

कुरआनची ही भविष्यवाणी खरी ठरली. प्रेषित मुहम्मद (स.) निरक्षर होते तरी संपूर्ण कुरआनचे पाठांतर करणे त्यांच्यासाठी सोपे झाले. त्याबरोबर त्याला लोकांकरिता पोहचविणे, पाठांतर करवून घेणे, त्याचे स्पष्टीकरण व खुलासा करणे, त्यातील गहन व चातुर्याच्या गोष्टींचे निवेदन करणे, त्याचा अर्थ काढणे, त्याच्या आज्ञांची अंमलबजावणी करणेदेखील सोपे झाले. सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना थोड्या अवधीत अशा सहकाऱ्यांचा लाभ करून दिला जे कुरआनचे व्यवस्थित व सुरक्षित जतन करणारे निघाले. त्यामुळे पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित राहण्याची व्यवस्था झाली. त्याचप्रमाणे आपल्याला कितीतरी सहकारी लाभले, त्यांनी आपल्या अंतःकरणात कुरआनला सुरक्षित करून ठेवले. अशांना 'हुफ्फाज व कारी' म्हणतात. त्यांच्याकडून कुरआनच्या प्रसाराची बहुमोल सेवा घडली.

सूरह 'अलहिज्र' मधील ९ व्या आयतीत म्हटलेले आजही सत्य म्हणून आपल्यासमोर आहे, ''निःसंशय हा कुरआन आम्ही अवतरीत केला आहे आणि आम्ही स्वतःच त्याचे संरक्षक आहोत.'' (कुरआन - १५:९)

"निःसंशय तुमचा शत्रूच मांगल्यापासून वंचित आहे." (कुरआन - १०८:०३)

हे अनेकेश्वरवाद्यांच्या त्या अशिष्टतेच्या उत्तरादाखल आहे जी ते प्रेषितांच्या प्रतिष्ठेसंबंधात करीत होते. ते अपमानजनक वचनांद्वारे प्रेषितांविरुद्ध प्रचार करीत होते, तो असा की, प्रेषितांचा संबंध शिर्क व मूर्तीपूजेच्या विरोधामुळे आपल्या जातीशी पूर्णपणे तुटला आहे. कुरैश वंशास जगात जे सामर्थ्य, अधिकार, प्रतिष्ठा व मान्यता प्राप्त आहे त्यापासून प्रेषित अगदीच वंचित झाले आहेत आणि आता प्रेषितांची पात्रता एखाद्या असहाय्य व अगतिक माणसासारखी झाली आहे. याच्या प्रत्युत्तरात फर्माविले गेले आहे, "प्रेषित मुहम्मद (स.) यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहनेच तर विपूल कल्याण प्रदान केले आहे. किंबहुना प्रेषितांचे विरोधक प्रत्येक प्रकारच्या मंगल गोष्टीस पारखे झाले आणि निरंतर त्यांच्या माथी वंचितता लिहिली गेली आहे."

वस्तुतः हे भाकित होते जे अगदी सत्य सिद्ध झाले. प्रेषितशत्रू अशाप्रकारे अपमानित व बरबाद झालेत की आज त्यांचे नावही शिल्लक राहिले नाही आणि अल्लाहच्या प्रेषितास अशी प्रतिष्ठा व मान्यता प्राप्त झाली की कोट्यवधी लोक प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर प्रत्येक नमाजीत दरुद सलाम पाठवितात आणि कयामतपर्यंत पाठवीत राहतील.

स्पष्ट व्हावे की या भाकिताचा संबंध केवळ तत्कालीन प्रेषितशत्रुंशीच नव्हता किंवा प्रत्येक युगात निर्माण होणाऱ्या प्रेषितशत्रुंशी आहे, जो कोणी प्रेषितांच्या संदर्भात अशिष्टता करील किंवा त्यांचा विरोध करील त्याच्या नशिबी भल्या व कल्याणदायी गोष्टी कदापि नसतील आणि निश्चितपणे तो अपमानीत होऊन राहील. (सलमान रश्दीचे उदाहरण.)

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी पुरस्कार केलेल्या एकेश्वरत्वामुळे त्यांच्या जातीच्या विरोधकांनी त्यांना बहिष्कृत केले. प्रेषितांना व त्यांच्या अनुयायांना अतिशय हलाखीत व त्रासात जगावे लागले. शेवटी तर काही अनुयायांना प्रेषितांनी देशत्यागास सांगितले. प्रेषितांनादेखील स्थलांतर करून जावे लागले. कुरैशांनी केलेल्या छळामुळे व पुढे तर त्यांच्यावर प्राणघातकी चाली खेळण्यास सुरुवात झाली व त्यामुळे ईशआज्ञेने त्यांना स्थलांतर करून मदीनेस जावे लागले. त्यानंतर जिहादची आज्ञा आली आणि तेथून प्रेषित व त्यांचे अनुयायी यांना एकापाठोपाठ प्रत्येक क्षेत्रात जबरदस्त यशप्राप्ती झाली आणि त्यांचे मंगल झाले. विरोधक मात्र असे नष्ट झाले की त्यांचे नामोनिशाण राहिले नाही आणि ते खऱ्या अर्थी मांगल्यापासून निरंतर काळासाठी वंचित झाले.

"लवकरच तुमचा पालनकर्ता तुम्हाला इतके काही देईल की तुम्ही खूश होऊन जाल." (कुरआन - ९३:०५)

ही आयत दर्शविते की यानंतर प्रेषितांवर ईशकृपेने देणग्यांचा असा वर्षाव होईल की ज्याची कल्पनाही करता येणार नाही.

प्रेषित मुहम्मद (स.) यांचे जर जीवन पाहिले तर तुमच्या लक्षात येईल की, ते अत्यंत खडतर गेले. जन्मापूर्वीच पित्याचा मृत्यु झाला. सहा वर्षांचे झाले तेव्हा आईचे छत्र गेले. आजोबांनी पालनपोषण केले, पण आजोबाही प्रेषितांच्या आठव्या वर्षी निधन पावले. तेव्हा त्यांच्या चुलत्याने त्यांचा सांभाळ केला. त्यांनी प्रेषितांवर पुत्रवत प्रेम केले. अनाथ असूनही चुलत्यांनी त्यांना कधीही ते अनाथ होते याची जाणीव होऊ दिली नाही.

प्रेषित मुहम्मद (स.) यांना अनाथांच्या परिस्थितीत असताना अनेक संकटांना व कष्टांना तोंड द्यावे लागले. त्यांना बालपणापासून आई-वडिलांचा आधार तुटलेल्या अवस्थेत जीवन जगावे लागले. त्यामुळे त्यांच्यात संकटांना सामोरे जाण्याचा आत्मविश्वास आपोआपच निर्माण झाला. "जिसका कोई नहीं उसका खुदा होता है" हा विश्वास निर्माण झाल्यामुळे ईश्वरावर आपोआपच निष्ठा दिवसेंदिवस प्रबळ व प्रखर होत गेली. जीवनाच्या प्रत्येक क्षणी ते अल्लाहची करुणा भाकत असत. जीवाचा कर्ताधर्ता अल्लाहच आहे ही भावना अत्यंत दृढ झालेली होती. क्षणोक्षणी ते ईशभय बाळगून असत व सातत्याने ईशप्रार्थनेत मग्न असत.

आयत ५-११ मध्ये निर्देश केला आहे, "प्रेषितांवर मरणोत्तर जीवनात अनंत पुरस्कार दिले जातील व ते सन्मान आणि श्रेष्ठतेच्या उच्च स्थानावर असतील व त्यांच्यावर ईशकृपा व बक्षिसांचा वर्षाव होईल." याची झलक या आयतीत आलेली आहे, पालनकर्त्याकडून त्यांच्यावर कृपेचा वर्षाव होईल.

अनाथ असलेल्या मुहम्मद (स.) यांच्यावर प्रेषितत्वाची देणगी बहाल केली गेली. मक्का विजयानंतर संपूर्ण अरबस्थानावर त्यांचा प्रभाव आणि एकेश्वरत्वाचा प्रसार व प्रचार अपेक्षेबाहेर झाला. प्रेषितांवर प्रत्येक नमाजनंतर त्यांच्या अनुयायांच्या शांतीच्या प्रार्थना (दरुद शरीफ). त्यांच्यावर अवतरीत झालेला धर्मग्रंथ ही जगाला मिळालेली देणगी प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यामुळेच प्राप्त झाली. आज त्यांचे करोडो अनुयायी जगभर पसरलेले आहेत आणि अरबस्थानात सुरू केलेल्या एकेश्वरत्वाची पताका जगभर फडकत आहे. या सर्व त्यांच्याकडून भूतो ना भविष्यती अशी देणगी लाभली. यापेक्षा अल्लाहकडून आणखी काय दिले जाणार होते? ते अंतिम प्रेषित ठरले व त्यांच्यावर अवतरित झालेला

कुरआन हा अंतिम ईशग्रंथ समजला जातो. ‘‘पालनकर्त्याकडून तुम्हाला इतके काही मिळेल की तुम्ही खूश होऊन जाल.’’ ही भविष्यवाणी सत्य ठरली आहे.

‘‘अबू लहबचे दोन्ही हात तुटून गेले आणि त्याचा सर्वनाश झाला.’’

(कुरआन - १११:०१)

अबू लहब ‘कुन्नियत’ (संकेत शब्द) आहे. त्याचे मूळचे नाव अब्दुल उज्जा होते. अर्थात उज्जा देवीचा दास. अबू लहब हा कुरैश जमातीच्या बनी हाशिम वंशाचा प्रख्यात सदस्य अब्दुल मुत्तलीबचा पुत्र आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांचा काका होता.

ज्या कारणान्वये त्याच्या जीवनातच त्याचा भाग्यनिर्णय केला गेला व त्याच्या परिणतीशी सचेत करण्याकरिता एक सूरह अवतरित केली गेली, ती कारणे खालीलप्रमाणे होत.

(१) तो काबागृहाचा विश्वस्त होता. ज्यात ३६० मूर्ती होत्या आणि उज्जा त्यापैकी एक देवता होती. तो उज्जा देवीचा दास होता. तो मूर्तीपूजक होता. (२) जो मान व प्रतिष्ठा त्याला लाभली होती त्यामुळे तो अतिशय गर्विष्ठ व मुजोर वृत्तीचा बनला होता. फिरऔनप्रमाणेच त्याची उन्मत्त अवस्था झालेली होती. (३) इस्लामच्या आवाहनाच्या प्रतिकाराचा त्यानेच प्रारंभ केला. (४) तो प्रेषित मुहम्मद (स.) यांचा कट्टर वैरी-द्वेष्टा होता. त्याने शत्रुत्वात नीतीमत्तेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या होत्या. त्यानेच प्रेषितांवर सामाजिक व आर्थिक बहिष्कार घालण्यात पुढाकार घेतला होता. प्रेषितांना त्याच्यामुळे वनवासात जावे लागले व उपासमारीस तोंड द्यावे लागले. (५) जीवनभर त्याने इस्लामला सतत विरोध केला व एकेश्वरत्वाचा विरोध केला. प्रेषितांच्या आवाहनास तो जाहीररित्या विरोध करून त्यांच्यावर खोटे आरोप करीत राहिला. (६) तो अत्यंत कृपण व धनाचा लालची होता. (७) लात व उज्जा नामक देवींची उपासना सोडण्यास सांगणाऱ्या प्रेषितांना तो सातत्याने अत्यंत हीन पातळीवर जाऊन विरोध करीत होता व कुरैशांना प्रेषितांविरुद्ध भडकवत होता.

हात तुटल्याचा अर्थ त्याची शक्ती खचणे व वैभव लोप पावणे होय. त्याने जीवाचा आटापीटा करून विरोध केला. परंतु बद्रच्या युद्धात त्याचे समर्थक व सहाय्यक वाईटरीत्या मारले गेले व त्याचे सर्व ऐश्वर्य लोप पावले. प्रेषितांनी सफा पर्वतावर चढून आपले एकेश्वरत्वाचे आवाहन केले तेव्हा अबू लहबने त्यांना हुसकावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळीच ‘‘अबू लहबचे दोन्ही हात तुटले व त्याचा सर्वनाश झाला’’ ही आयत अवतरली.

बद्रच्या युद्धात त्याच्या समर्थकांचा नाश झाला व त्यानंतर एक आठवड्यानेच त्याला 'देवी' रोग झाला व त्यातच त्याचा करुण अंत झाला. त्याच्या शवाचीदेखील अतिशय वाईटरीत्या वाट लावली गेली. कारण देवी रोगामुळे त्याच्या प्रेताजवळ त्याची मुलेसुद्धा गेली नाहीत. दुरूनच त्याच्यावर माती लोटली गेली.

अबू लहबचे नाव शिल्लक राहिले नाही. उलट त्याचा सतत धिक्कारच केला गेला व नमाजमध्ये या सूरहचे आजही पठण करून त्याची निर्भर्त्सना केली जाते. ''प्रेषितांना वर्चस्व प्राप्त होईल आणि त्यांच्या शत्रुंचा नाश होईल'' हे भाकित सत्य ठरले.

''ज्या लोकांनी स्वत:वर अत्याचार झाला असताना अल्लाहच्या मार्गात स्थलांतर केले, आम्ही त्यांना जगात खचितच चांगले स्थान देऊ आणि आखिरतचा मोबदला तर कितीतरी अधिक आहे, जर त्यांनी हे जाणून घेतले असते.'' (कुरआन - १६:४१)

प्रेषितत्व प्राप्तीनंतर तीन वर्षांनी मुस्लिमांना आपली श्रद्धा उघडपणे स्वीकारण्यास अल्लाहने अनुमती दिली. ज्यांनी धीटपणे उघडरीत्या श्रद्धा दाखविली त्यांचा अनन्वीत छळ मक्केत कुरैशांकडून सुरू झाला. आदरणीय मुहम्मद (स.) यांना प्रेषितत्वाच्या पाचव्या वर्षी स्थलांतराची ईशआज्ञा आली. श्रद्धावंतांनी आपल्या धर्माच्या संरक्षणार्थ प्रेषितांच्या सूचनेनुसार हबश ॲबिसिनीयाकडे स्थलांतर केले. पहिल्या काफिल्यात पंधरा जणांनी ज्यात चार स्त्रिया होत्या, स्थलांतर केले. पुढे हळूहळू स्थलांतरितांची संख्या ८३ पर्यंत पोहचली.

या स्थलांतरित झालेल्यांत माननीय उस्मान, त्यांची पत्नी म्हणजे प्रेषितांची कन्या रुकैया, माननीय झुबेर, अब्दुल रहमान, हातिब, अब्दुल्लाह, जाफर हे इस्लाममधील पुढील काळात महत्त्वाचे ठरलेले येथून निघून गेले. स्थलांतर करणाऱ्यांना ''आम्ही त्यांना जगात खचितच चांगले स्थान देऊ'' हे अल्लाहचे 'महाजिरीन'ना (देशत्याग करणाऱ्यांना) दिलेला वायदा तेथे पूर्ण झाला. कारण हबशाधिपतीने जो प्रेषित ईसा (अ.) यांच्यावर श्रद्धा बाळगत होता, नवागतांना शांतीपूर्वक राहण्यास परवानगी दिली. अनेकेश्वरवाद्यांचे नेते तेथेही जाऊन धडकले व त्यांनी मुस्लिमांविरुद्ध ॲबिसिनीयाच्या राजास भडकाविले, पण त्या राजाने त्यांचे म्हणणे ऐकून घेतले नाही. एवढेच नव्हे तर पुढे त्या राजाने प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर श्रद्धा बाळगली.

पुढे मुहम्मद (स.) मदीनेस स्थलांतर करून गेले तेव्हा देशत्याग करणारे लोक मदीनेस जाऊन पोहचले. अल्लाहने या लोकांना मान व प्रतिष्ठा दिली. ''तर त्यांनी हे जाणून घेतले असते.'' यात हिजरत करून जाणाऱ्यांना केवढा मोठा

मोबदला तयार ठेवला आहे. ज्यामुळे त्यांच्या हिजरतच्या मार्गात झालेल्या कष्ट-यातना ते विसरतील ही या आयतीत आलेली भविष्यवाणी मदीनेत गेलेल्यांना सत्य ठरलेली आढळली. ईश्वराचे वचन व त्याचा वायदा त्याने सत्य करून दाखविला. ती भविष्यवाणी सर्वार्थाने सत्य ठरली.

"(हे प्रेषित!) आम्ही तुम्हाला निश्चितच खुला विजय प्रदान केला."

(कुरआन - ४८:०१)

अभिप्रेत मक्का विजय होय, ज्याची प्रस्तावना हुदैबिया तहाने झाली. या कराराच्या दोन वर्षांच्या आत हिजरी सन ८ मध्ये मक्केवर विजय प्राप्त झाला आणि कुरआनचे हे भाकित की, "आम्ही तुम्हाला खुला विजय प्रदान केला." अगदी खरे ठरले. हुदैबिया तहाचा बाह्य पैलू मुस्लिमांना अप्रियकारक होता. कारण त्यांना या वर्षी उमरा न करताच परत जावे लागले होते. परंतु अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या दूरदृष्टीस याचे चांगले परिणाम दिसून येत होते आणि वस्तुस्थिती अशी की इस्लामच्या विजयांचा क्रम हुदैबियाच्या तहानंतरच सुरू होतो.

ही नांदी होती एका भव्य अशा विजयाची, ज्याद्वारे सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या प्रेषित व आपल्या सैन्यास प्रतिष्ठा प्रदान केली आणि लोकांनी जथ्थ्या-जथ्थ्याने इस्लामचा (धर्माचा) अंगीकार केला, तेव्हा हा तह विजयाचे द्वार होते. तसेच त्याची पूर्वघोषणा होती. हा तह एक भव्य विजय होता. कारण याच्यामुळे लोकांना शांती लाभली आणि मुस्लिमांना काफिरांशी भेट-गाठ घेण्याची त्यांच्यासमोर सत्य आवाहन प्रस्तुत करण्याची, त्यांना कुरआन ऐकविण्याची व निर्भयपणे त्यांच्याशी इस्लामबाबत चर्चा करण्याची संधी मिळाली. ज्यांनी गुप्तपणे इस्लाम स्वीकारला होता, ते प्रकटपणे तहाच्या कालावधीत ज्यांना अल्लाहने सुबुद्धी दिली, त्यांनी इस्लामचा स्वीकार केला. म्हणून अल्लाहने यास 'फतह मुबीन' (स्पष्ट विजय) ठरविले. बाह्यत: मुस्लिमांना हा तह आपला हक्क हिरावून घेणारा वाटला; परंतु 'त्याच्या अंतरंगात प्रतिष्ठा, विजय व अल्लाहची मदत होती' असे भाष्य 'जादुल मिआद', खंड २, पृष्ठ १३० वर आलेले आहे.

येथे लक्षात ठेवले पाहिजे की, हा तह एका विशिष्ट प्रसंगी केला गेला होता, ज्याचा प्रस्ताव मक्केच्या नाकारणाऱ्यांनी मांडला होता, मुस्लिमांनी नव्हे. "धैर्य सोडू नका आणि तहाकरिता बोलावू नका." (कुरआन-मुहम्मद-३५) बद्रचे युद्ध हिजरी २, उहदचे युद्ध हिजरी ३ व खंदकांचे युद्ध हिजरी ५ मध्ये लढले गेले. हुदैबियाचा तहकाळ संपल्यानंतर मुस्लिमांनी आपल्या बळाच्या दबावाने मक्का ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांनी

अरबस्तानाबाहेरील सत्तांनाही आव्हान देणे सुरू केले. आव्हान आणि आवाहन या दोन्ही आघाड्या आता सुरू झाल्या.

अल्लाहने अशी मदत दिली की, "जो कोणी टक्कर देईल तर तो क्षतविक्षत होईल." बायबल (मत्तय - २१:४३-४४) मध्ये विजयाचे भाकित आले. ही व अशी भाकिते विविध हदीसवरूनदेखील आलेली होती जी भविष्यात सत्य उतरली.

"अल्लाहने आपल्या प्रेषितास खरे स्वप्न दाखविले होते, जे सत्यावर आधारित होते. अल्लाहने इच्छिल्यास तुम्ही खचितच 'मस्जिदे हराम' मध्ये शांतीपूर्वक दाखल व्हाल. आपले डोके मुंडवा व केस कतरवा. तुम्हाला कसलेही भय नसेल. तेव्हा त्याने जाणली ती गोष्ट जी तुम्ही नाही जाणली. यास्तव त्याने यापूर्वी तुम्हाला एक निकटचा विजय प्रदान केला." (कुरआन - ४८:२७)

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी असे स्वप्न पाहिले की, ते आपल्या सहकाऱ्यांसह मक्केत दाखल झालेत व उमरा अदा केला. या स्वप्नालाच संकेत समजून ते आपल्या सोबतच्या अनुयायांसह उमरा करण्याकरिता निघाले होते. परंतु हुदैबियाहून जेव्हा उमरा न करताच परतावे लागले तेव्हा अनुयायांच्या मनात हा प्रश्न उद्‌भवला की, प्रेषितांचे स्वप्न जर खरे असते तर आम्ही उमरा न करताच का परत जात आहोत? या प्रश्नाचे उत्तर या आयतीत आले आहे की, हे स्वप्न अल्लाहतर्फे होते जे अगदी खरे व सत्यावर आधारित होते म्हणून ते अगदी निश्चितपणे पूर्ण होईल. तुम्ही अवश्य 'मस्जिदे हराम' मध्ये दाखल व्हाल आणि शांतीपूर्वक दाखल व्हाल. कसल्याही प्रकारची भीती, धोका नसेल. तुम्ही एहरामच्या अवस्थेत असाल आणि निश्चितपणे विधी पार पाडू शकाल.

हदीस वचनातील उल्लेखांवरून हा प्रश्न प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारला गेला तेव्हा त्यांनी उत्तर दिले, "मी केव्हा म्हटले की या वर्षी तुम्ही मक्केत दाखल व्हाल. तुम्ही मक्केत जरूर दाखल व्हाल व काबागृहाची यात्रा-प्रदक्षिणाही कराल." (बुखारी) हे स्वप्न दुसऱ्या वर्षी पूर्ण झाले. यास्तव प्रेषित मुहम्मद (स.) यांनी जिलकद हिजरी सन ७ मध्ये अनुयायांसह मक्का पोहचून उमरा अदा केला. ज्याला 'उमरातुल कजा' असे म्हटले जाते. याप्रसंगी मक्केच्या नाकारणाऱ्यांनी तीन दिवसांसाठी शहर खाली केले होते, त्यामुळे मुस्लिमांनी शांती व समाधानाने उमराचा संपूर्ण विधी पार पाडला. अशा प्रकारे स्वप्नही खरे ठरले आणि कुरआनची सत्यतादेखील प्रकट झाली. जेव्हा उमराचा एहराम उतरविला जातो तेव्हा मुंडन केले जाते. "एहराम चढवून यात्रा पूर्ण कराल व सर्व विधी पार पाडून एहराम उतरवाल." हे स्वप्नही खरे ठरले.

या वेळी 'युद्ध न करता मक्केत दाखल व्हाल व शांतीपूर्वक सर्व घडेल' असे त्यांना माहीत नव्हते. परंतु अल्लाह जाणत होता म्हणून त्याने तुम्हाला यांची पूर्वसूचना दिली. म्हणजे युद्धाची पाळी न येताच उमरा पार पडला. त्यासाठीच पुढील वर्षासाठी उमरा निर्धारित केला गेला.

हुदैबियाचा तह उमरा करण्यापूर्वीच एक तातकाळ स्वरूपाचा विजय ठरला. इस्लाम प्रचाराचा व प्रसाराचा मार्ग खुला झाला व तो मक्का विजयाची प्रस्तावना ठरला.

"मुहम्मद तुमच्यातल्या पुरुषांपैकी कोणाचेही बाप नाहीत. किंबहुना ते अल्लाहचे रसूल (प्रेषित) आणि अंखेरचे नबी होत आणि अल्लाह प्रत्येक गोष्टीचे ज्ञान बाळगणारा आहे."

(कुरआन - ३३:४०)

या आयतीतील पहिला भाग 'दत्तकपुत्र' या संकल्पनेचे खंडन करण्यात आले. म्हणूनच प्रेषित मुहम्मद (स.) 'कोणाचेही बाप नाहीत' हे वचन आलेले आहे, तर यावरूनच किंवा त्यात आलेल्या ईशसंकेतावरून प्रेषितांनी आपल्या मानलेल्या पुत्राच्या तलाक दिलेल्या पत्नीशी विवाह केला. म्हणूनच कुरआनद्वारे दत्तकपुत्र घेण्याची असलेली पूर्वापार पद्धत नष्ट करण्यात आली.

'ते अल्लाहचे रसूल व अखेरचे नबी' असे त्यांच्याबाबत कुरआनात आलेले भविष्य तंतोतंत खरे ठरले. नबी व रसूल यांचा अर्थ प्रेषित असला तरी त्यात फरक आहे. जसे प्रत्येक रसूल हा नबी असतोच पण प्रत्येक नबी हा रसूल असतोच असे नाही. ज्या नबींवर 'वही'चे अवतरण झालेले आहे त्यांना रसूल म्हटले जाते. (तसा नबी व रसूल यांत असलेला फरक बराच तात्त्विक आहे) प्रेषित मुहम्मद (स.) यांचा 'रसुलुल्लाह' असा स्पष्ट उल्लेख कुरआनात आलेला आहे.

या आयतीत प्रेषितत्व संपण्याची जी गोष्ट नोंदवली गेली आहे, ती इस्लामी श्रद्धेचा एक महत्त्वपूर्ण अंश होय. कुरआन केवळ भविष्यात येणाऱ्या कोणत्याही नबी अथवा प्रेषितांचे भाकित सादर करीत नाही; वस्तुत: यापूर्वीच्या ईशग्रंथांमध्ये भविष्यकाळात येणाऱ्या प्रेषितासंबंधी भाकिते उपलब्ध आहेत. किंबहुना कुरआन आदरणीय मुहम्मद (स.) यांना अंतिम नबी ठरवत धर्माच्या परिपूर्णतेची घोषणाही करतो. 'अल् हिज्र'च्या नवव्या आयतीत म्हटले आहे, "आम्हीच कुरआनचे संरक्षक आहोत."

प्रेषित मुहम्मद (स.) अंतिम नबी असल्याबद्दल अनेक हदीस आलेल्या आहेत. येथे काहींचा उल्लेख करीत आहे.

"प्रेषितत्वाची इमारत पूर्ण झाली आहे व त्यातील मी अंतिम वीट आहे."

(बुखारी)

"मला समस्त ईशनिर्मितीकडे रसूल बनवून पाठविले आहे आणि प्रेषितक्रम माझ्यावर संपविला गेला आहे." (बुखारी)

"मी अंतिम प्रेषित आहे. माझ्यानंतर कोणीही प्रेषित नाही." (तिर्मिजी)

इस्लाममध्ये प्रेषितांनंतर काही सुधारक आले, काही खलीफा आले, पण त्यानंतर कोणीही प्रेषित आला नाही.

"लवकरच आम्ही त्यांना आपल्या निशाण्या क्षितिजामध्येही दाखवू आणि त्यांच्या स्वत:मध्येही. येथपावेतो की त्यांना या गोष्टीचा उलगडा होईल की हे सत्य आहे. काय ही गोष्ट पुरेशी नाही तुमचा पालनकर्ता सर्वसाक्षी आहे." (कुरआन - ४१:५३)

हे फार मोठे भाकित आहे जे कुरआनने केलेले आहे की, "त्याच्या सत्यतेच्या निशाण्या जगाच्या क्षितिजावरही जाहीर होतील आणि माणसांच्या स्वत:मध्येही." ही वस्तुस्थिती आहे की, थोड्या कालावधीनंतर कुरआनचा इन्कार करणाऱ्यांनी हे पाहिले की, कुरआनने प्रेषित व त्यावर ईमान बाळगणाऱ्यांच्या हक्कात अल्लाहच्या मदतीविषयी जे भाकित केले होते ते पूर्ण झाले. इस्लामला वर्चस्व आणि सत्ताधिकार प्राप्त झाला. कुरआनच्या उज्ज्वल प्रकाशात वाटचाल करणाऱ्यांचे स्वच्छ शुद्ध जीवन पाहून लोक हा विचार करण्यास प्रवृत्त झाले की, ही ना काव्यात्मक रचना आहे आणि ना वेडसरपणाच्या गोष्टी आणि ना जादू-टोण्याच्या. जनसमूहच्या जनसमूह इस्लामचा अंगीकार करीत गेले आणि जे कट्टर नाकारणारे होते. त्यांची परिणिती या जगातच मोठी वाईट झाली. परंतु आयतीचा अर्थ एवढ्यापुरताच मर्यादित नाही. याच्या सत्यतेची चिन्हे कयामतीपर्यंत जाहीर होत राहतील.

भूतकाळात कुरआनच्या कितीतरी गोष्टी लोकांना मोठ्या विचित्र वाटत होत्या. परंतु आजच्या काळात माणसाने अशा आश्चर्यजनक गोष्टींचा शोध लावला आहे की, कुरआनची कोणतीही गोष्ट विचित्र किंवा नवलाईची राहिली नाही.

कयामतच्या दिवशी माणसाची कर्मे तोलली जातील, ही गोष्ट विचित्र वाटते, पण आज उष्णतामापक, भूकंपमापक यंत्रे शोधली आहेत तशी ईश्वराजवळ सत्कर्म व दुष्कर्ममापक यंत्र का नसावीत. प्रत्येक गोष्टीचे रेकॉर्ड ईश्वराजवळ आहे. ही कल्पना विचित्र वाटते, पण आज शेकडो वर्षांची विविध रेकॉर्डस् मायक्रोफिल्मद्वारे केले जाते हे सिद्ध झाले आहे. विश्वातील विविध क्षेत्रांची ओळख आज विज्ञानाने करता येते. तसेच ईश्वराला आपल्याला अगम्य वाटणाऱ्या गोष्टी नक्कीच जाणणे शक्य आहे. म्हणूनच म्हटले जाते, "तो सर्व जाणणारा आहे."

प्रकरण पाचवे

प्रेषित आणि प्रेषितत्व

पवित्र कुरआनातील प्रेषित व प्रेषितत्व या संकल्पना समजावून घेण्यापूर्वी कुरआनची ईश्वर 'अल्लाह' एकेश्वरत्व, 'आखिरत' म्हणजे परलोक जीवन, 'कयामत' म्हणजे अल्लाहच्या न्यायनिवाड्याचा दिवस, मानवनिर्मितीचा उद्देश खरा श्रद्धावंत कोण असतो या गोष्टी समजावून घेतल्या पाहिजेत. त्याशिवाय प्रेषित व प्रेषितत्व या संकल्पना नीट लक्षात घेणे शक्य नाही.

तौहीद (एकेश्वरत्व)

ईश्वराचा उल्लेख अल्लाह म्हणून आलेला आहे. 'अल्लाह' हा शब्द कुरआनात २६९७ वेळा आलेला आहे. अल्लाह हा अनादि अनंत असून तोच एकमेव दृश्य व अदृश्य सृष्टीचा निर्माता आहे. तोच पालनकर्ता, मालक, शासक व व्यवस्थापक (रब) असून लयकर्ताही आहे. या सर्व कार्यांत त्याचा कोणीही सहभागी नाही. तो मर्त्य मानवास चर्म चक्षूंनी दिसू शकत नाही. तोच एकमेव उपास्य आहे. फक्त त्याचीच उपासना व भक्ती केली पाहिजे. हेच एकेश्वरत्व कुरआनात वारंवार मांडलेले आहे. इतर कोणास त्याचा सहभागी (शिर्क) मानणे हा अक्षम्य अपराध असून त्याबद्दल कोणीही क्षमेस पात्र नाही. तसेच त्याची मूर्ती स्थापून तिची उपासना करणे हे अक्षम्य पाप आहे. इतर देव, देवी, देवता मानणे, त्यांच्या मूर्ती स्थापून त्यांची उपासना करणे हे महत् पाप असून अशा मूर्ती व असे उपासक हे त्याच्या निवाड्याच्या दिवशी नरकाग्नीचे इंधन होतील असे जागोजागी सांगण्यात आलेले आहे. यालाच एकेश्वरत्व म्हटले जाते. अल्लाह प्रत्येक उघड व गुपित चाललेल्या गोष्टी जाणतो. त्याच्यापासून काहीही लपू शकत नाही. सूरह (अध्याय) 'अल बकरा' मधील २५५ व्या आयतीत (ऋचा) त्याचे यथार्थ वर्णन आलेले आहे व ती आयत 'आयतुल कुर्सी' या नावाने संबोधिली जाते. अल्लाह अविनाशी व चिरंतन आहे. तो अत्यंत कृपाळू व दयाळू आहे.

आखिरत (पारलौकिक जीवन)

कुरआनाप्रमाणे या जगातील जीवन क्षणभंगूर असून पारलौकिक जीवन हे चिरंतन आहे. जन्म व मृत्यू यांचे फेरे यास मान्यता नाही. मृत्यूनंतर परलोक जीवन सुरू होते. तेच कायमस्वरूपी आहे. अल्लाह त्याच्या अंतिम निवाड्याच्या दिवशी

मानवाला या जगातील त्याच्या (मानवाच्या) कर्मानुसार स्वर्ग अथवा नरक हे निवासस्थान देईल व तेच त्याचे कायमचे निवासस्थान ठरेल. पुनर्जन्म या कल्पनेस कुरआनात अजिबात स्थान नाही. म्हणूनच या जगातील जीवनात मानवाने सतत पारलौकिक जीवनाविषयी जागरूक राहिले पाहिजे. याविषयी सातत्याने जाणीव दिलेली आहे. हे जीवन म्हणजे या जगातील जीवन हे क्षणिक असून पारलौकिक जीवन हे चिरंतन आहे. हे ध्यानात ठेवूनच या जगातील जीवन जगले पाहिजे अशी सतत जाणीव कुरआनात जवळपास प्रत्येक अध्यायात दिलेली दिसते.

अंतिम निवाड्याचा दिवस

एक दिवस अल्लाह हा मांडलेला सृष्टीचा खेळ गुंडाळेल. सूर्य, चंद्र, सर्व नक्षत्रे, तारे निखळून पडतील. आकाश गुंडाळले जाईल. सागरांना आग लागेल. पिंजलेल्या कापसाप्रमाणे पर्वत हवेत तरंगायला लागतील. पृथ्वी आपल्या पोटातील सर्व गोष्टी ओकून टाकेल. प्रचंड आवाज होऊन सर्वत्र सपाट मैदान होईल. तोच दिवस कयामतचा-महाप्रलयाचा दिवस असेल. तो कधी येणार याचे ज्ञान केवळ अल्लाहलाच आहे. तो दिवस निश्चित येणारच एवढे नक्की. त्यानंतरच अल्लाह आपल्या न्यायनिवाड्यास सुरूवात करेल.

पहिले नरशिंग फुंकले जाईल व सर्व उलथापालथ होऊन सपाट मैदान होईल. त्यावेळच्या होणाऱ्या आवाजांनी सर्वजण गर्भगळीत होऊन सुन्न होतील. अल्लाह आपली न्यायतुला प्रस्थापित करेल व दुसरे नरशिंग फुंकले जाताच सृष्टीच्या सुरुवातीपासून ते अंतापर्यंत झालेले सर्व मानव सावयव जिवंत होऊन झुंडीच्या झुंडींनी अल्लाहच्या न्यायासनासमोर हजर होतील. प्रत्येकाच्या डाव्या हातात त्याच्या दुष्कर्मांचा व उजव्या हातात सत्कर्मांचा हिशेब दिला जाईल. अल्लाहच्या अनुमतीशिवाय कोणी एक शब्दही बोलू शकणार नाही. तुम्ही केलेल्या कर्मांची साक्ष तुमची इंद्रिये व अवयव देतील. तेथे कोणावर कणभरही अन्याय होणार नाही. ज्यांचे सत्कर्मांचे पारडे जड असेल त्यांचे फरिश्ते स्वागत करून त्यांना सर्व सुखसोयी व समृद्धींनी युक्त असलेल्या स्वर्गात नेतील व ज्यांचे दुष्कर्मांचे पारडे जड असेल त्यांना फरिश्ते नेऊन नरकाग्नीत फेकतील जे अत्यंत वाईट स्थान आहे. स्वर्ग अथवा नरक हे त्यांचे कायमचे निवासस्थान राहील. त्या दिवशी कोणाचीही अल्लाहच्या परवानगीशिवाय शिफारस चालणार नाही. कोणी कोणाचे ओझे उचलणार नाही. प्रत्येकजण आपल्या कर्मानुसार अल्लाहच्या ईनामास अथवा शिक्षेस पात्र ठरेल.

मानवाबद्दलची संकल्पना

"मानवाची उत्पती एकाच जोडप्यापासून झालेली आहे." (४:१)

तर एके ठिकाणी म्हटले आहे,

"अल्लाहने आपला प्रतिनिधी म्हणून मानवाला भूतलावर पाठविले आहे." (२:३०)

"मानवात मी माझे चैतन्य फुंकले आहे." (१५:२९)

"मानवास आम्ही संघर्षमय जीवनासाठी सक्षम बनविले आहे." (कुरआन)

मानवाला पंच ज्ञानेंद्रिये देऊन चांगले व वाईट यांची पारख करण्याची क्षमता दिली आहे.

"मानवांमध्ये भाषा व वर्ण यांची भिन्नता आढळते." (३०:२२)

वरील सर्व आयतीत मानवनिर्मितीबद्दलची कुरआनाची संकल्पना याप्रमाणे मांडलेली दिसते.

त्याचवेळी मानवातील वैगुण्येदेखील कुरआनात दर्शविलेली आहेत.

"मानवाला आम्ही मातीपासून निर्माण केले आहे." (३०:२०) (१५:२६) (३२:७)

"मानव हा निसर्गतःच उतावळा आहे." (२१:३७)

"थोड्याशा यशानेही मानव हुरळून जातो." (२१:३७)

तसेच "मानव हा निसर्गतःच कृतघ्न आहे." (१७:६७)

अल्लाहकडून त्याला यशप्राप्ती झाली तर तो त्याचे श्रेय इतरांना देतो अथवा स्वतःच्या कर्तृत्वाचे गोडवे गातो. पण दुःख मिळताच ईश्वराच्या अवकृपेमुळे हे झाले म्हणून ईश्वरास अथवा नशिबास दोष देतो. याचा उल्लेख अनेक आयतींत आलेला आहे.

अवतार कल्पना अमान्य

ईश्वर अवतार घेतो ही कल्पना कुरआनने अमान्य केलेली आहे. "ईश्वर हा जन्म व मृत्यु यापासून अलिप्त आहे. तो अनादि अनंत असून मानवी रूपाने तो कोणाचा पिता अथवा कोणाचा पुत्र होत नाही." (४२:२) तसेच अल्लाह या सर्व गोष्टींपासून पवित्र आहे. अशा आशयाच्या अनेक आयती आलेल्या आहेत.

(अ) प्रेषित : कुरआनात आलेल्या प्रेषित व प्रेषितत्वाची संकल्पना यावर विविध भाष्यकारांनी खालीलप्रमाणे भाष्य केलेली दिसतात.

कुरआनात प्रेषितांबद्दल 'नबी' व 'रसूल' हे अरबी शब्द आलेले आहेत. या शब्दांचा मराठीत प्रेषित असा अनुवाद होतो. 'नबी'पासून 'नबुवत' व 'रसूल'पासून 'रिसालत' हे शब्द प्रेषितत्वाबद्दल येतात. 'रसूल' शब्दाचा अर्थ पाठवलेला असा होतो. परंतु 'नबी' या शब्दाच्या अर्थाबद्दल अरबी शब्दशास्त्र पंडितांत मतैक्य नाही. काहींच्या मते 'नबी' म्हणजे खबर देणारा असा आहे. तर काहींच्या मते 'नबी' या शब्दाचा अर्थ 'उच्च दर्जा बाळगणारा' व 'उच्चपदस्थ' असा होतो. म्हणून 'रसूल नबी' म्हणजे 'उच्चपदस्थ रसूल' असा अर्थ होतो. म्हणजेच उच्चपदस्थ प्रेषित असा त्याचा अर्थ आहे किंवा सर्वोच्च अल्लाहतर्फे वार्ता देणारा प्रेषित असा होतो.

पवित्र कुरआनात हे दोन्ही शब्द सामान्यपणे समानार्थी प्रयुक्त झाले आहेत. परंतु काही ठिकाणी 'रसूल' आणि 'नबी' हे शब्द अशा रीतीने प्रयुक्त झाले आहेत जेणेकरून या उभय शब्दांत दर्जा अथवा कार्याच्या दृष्टीने काही पारिभाषिक अंतर असल्याचे निदर्शनास येते. 'रसूल' आणि 'नबी' हे दोन वेगवेगळे पारिभाषिक शब्द आहेत. त्यांच्यामध्ये काहीतरी अर्थात्मक फरक निश्चितच आहे. त्यामुळेच भाष्यकारांमध्ये सदरहु फरक कोणत्या स्वरूपाचा आहे म्हणून वाद निर्माण झाला आहे. परंतु निर्णायकरीत्या 'रसूल' व 'नबी' यांच्यातील वेगवेगळ्या स्थानाची - दर्जाची कोणीही निश्चिती करू शकलेले नाही. येवढेच म्हणता येते की 'रसूल' हा शब्द 'नबी' शब्दाच्या तुलनेत विशेष आहे. सरळ अर्थ असा होतो की, प्रत्येक 'रसूल' हा 'नबी' असतोच पण 'नबी' हा 'रसूल' असेलच असे नाही. आदरणीय मुहम्मद (स.) यांच्या हदीसमध्ये प्रेषित - 'रसूल' यांची संख्या ३१३ सांगितली आहे तर 'नबी'ची संख्या १ लाख २४ हजार सांगितली गेली आहे. (दिव्य कुरआन, पान ४७२, तळटीप १४)

(ब) प्रेषितत्व : अल्लाहने मानवी समूहात प्रेषित का पाठविले? याचे उत्तर कुरआनावरील भाष्यकारांनी याप्रमाणे दिलेले आढळते.

अल्लाहचा मार्ग म्हणजे कोणता मार्ग हे निश्चितपणे जाणण्याचे मानवाजवळ कोणतेही साधन नाही. त्यामुळे मानवास अल्लाहचा मार्ग, त्याच्या आज्ञापालनाच्या पद्धती, तसेच ईश्वरास काय आवडते व काय आवडत नाही यांचे आकलन त्याला फक्त अल्लाहकडून मार्गदर्शन आले तरच होऊ शकते. त्यासाठीच सर्वश्रेष्ठ अल्लाहने निरनिराळ्या भाषांमध्ये व निरनिराळ्या देशांमध्ये आपले प्रेषित पाठविले. ते ईश्वरानेच

पाठविले असल्यामुळे त्या प्रेषितांवर श्रद्धा ठेवणे म्हणजेच ईशप्रणित प्रेषितत्वाच्या योजनेवर श्रद्धा ठेवणे आवश्यक ठरते.

प्रेषित हे अल्लाहकडूनच पाठविले गेले होते अथवा नियुक्त केले गेले होते याविषयी कुरआनात खालीलप्रमाणे संदर्भ दिसतात.

''आणि कोणताही असा जनसमुदाय झाला नाही की ज्यात कोणी सावध करणारा आला नसावा.'' (३५:२४)

''त्यांच्या भाषेतच समजावणारे प्रेषित पाठविले.'' (१४:४)

''माणसेच प्रेषित म्हणून पाठविली होती.'' (२१:७)

''सर्व मानवांपर्यंत आपल्या आज्ञा पोहचविण्याचे कार्य अल्लाह प्रेषितांमार्फत करीत असतो.'' (२४:५४,५६)

''आम्ही पूर्वीही प्रेषित पाठविले होते.'' (१३:७)

''पूर्वीही आम्ही पुष्कळ प्रेषित विविध जनसमूहांकडे पाठविले.''
(१५:१०, १६:६३, ४३:६, २३:४१)

''त्यावेळीही व आताही आम्ही लोकांना ईशसंदेश पोहचविणारे प्रेषित पाठविले.''
(२८:४५)

''या पूर्वीही आम्ही माणसांनाच प्रेरित म्हणून पाठविले व त्यांच्यामार्फत लोकांकडे ईशसंदेश पाठविले.'' (१६:४३ व ४४)

''आणि सतत सावध करणारे प्रेषित पाठविले होते.'' (४१:१४, ४२:३)

''पूर्वीच्या लोकांप्रमाणेच त्यांचेकडेही प्रेषित आला.'' (५१:५२)

''ज्याप्रमाणे पूर्वी प्रेषित पाठविले होते.'' (१३:३०)

''अल्लाह ज्याला पाहिजे त्यालाच रसूल म्हणून निवडतो. तो ईशआज्ञेशिवाय चमत्कार दाखवू शकत नाही.'' (१४:११)

वरील सर्व आयतींवरून स्पष्ट होते की विविध भूभागांत व विविध जनसमुदायांकडे अल्लाहने आपले प्रेषित पाठविलेले होते.

प्रेषित हे मानवापासूनच अल्लाहने नियुक्त केले होते. अश्रद्ध म्हणत असत की अल्लाहला प्रेषितच पाठवायचे होते तर मानवांतून पाठविण्यापेक्षा ईशदूतांना (फरिश्ते) प्रेषित म्हणून का पाठविले नाही? या शंकेचे अतिशय समर्पक व उत्तम स्पष्टीकरण पवित्र कुरआनात याप्रमाणे आलेले आहे.

"सांगा जर पृथ्वीवर फरिश्ते राहात असते व सुरक्षितपणे वावरत असते, तर आकाशातून प्रेषित म्हणून आम्ही ईशदूतच धाडला असता." (१७:९५)

या आयतीवरून स्पष्ट होते की माणसांना मार्गदर्शन करण्याची क्षमता फक्त मानवातच आहे, कारण त्याचे व्यवहारी जीवनच लोकांना मार्गदर्शक ठरू शकते. पृथ्वीवर माणसेच राहतात आणि त्यांच्या मार्गदर्शनासाठी प्रेषित म्हणून पाठविल गेलेली माणसेच ते महान कार्य करण्याची क्षमता बाळगत होते.

"ते विचारतात त्यांच्याकडे एखादा फरिश्ता का धाडला नाही? जर आम्ही ईशदूत पृथ्वीवर धाडला असता, आम्हाला निर्णय घ्यावा लागला असता, त्यांना (अंतर्मुख होऊन विचार करण्याची) आणखीन मुदत दिली गेली नसती आणि ईशदूतच आम्ही आमचा संदेशवाहक नेमला असता (प्रेषित) तरी मानवी रूप देऊनच आम्ही धाडले असते." (६:८ व ९)

ईशदूत हे मानवी भावना बाळगत नाहीत त्यामुळे ते मानवाचे चांगले मार्गदर्शक ठरू शकत नाहीत. मानवी भावना बाळगणारे प्रेषितच (मानव) आपल्या उक्तीने व कृतीने मानवांसमोर जीवनाचा आदर्श निर्माण करू शकतात. प्रेषित हे मानवातूनच निवडले गेले. कारण ते मानवी जीवन जगताना जी सुखदु:खे भोगतात ती भोवतालच्या लोकांना सहज जाणवू शकतात.

इब्न अल काय्यिम यांनी त्यांच्या सुप्रसिद्ध 'झाद-अल-अमाद' या पुस्तकात प्रेषित व प्रेषितत्व याबद्दल केलेले विवेचन अतिशय मार्मिक आहे. "प्रेषितत्व ही काही अशी गोष्ट नव्हे की जी अर्जित करता येते. ते केवळ सर्वशक्तिमान अल्लाहकडूनच बहाल केले जाऊ शकते. प्रेषितत्वाचे वाटप अल्लाह सर्वसकट करीत नाही. ईश योजनेनुसार प्रेषितांना वाढविले जाते व अद्वितीय आणि दुर्मिळ गुणवत्ता असलेल्या माणसांनाच या उच्चपदापर्यंत नेले जाते."

"प्रेषित हे कायम सहनशील व शांत स्वभावाचे असतात." (६:७५)

"प्रेषित ईश्वरच निवडतो." (२८:६८)

"अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो की प्रेषितत्वाच्या प्रतिष्ठेस सर्वाधिक कोण योग्य आहे व तो अशाच व्यक्तीला प्रेषितत्वाच्या देणगीने उपकृत करतो." (६:१२४)

"प्रेषितत्व ही अल्लाहची कृपा आहे. तो ज्याला इच्छितो त्याला त्या कृपेने भूषवितो." (३:७३)

प्रेषितत्व कोणाला बहाल करावे, हे अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो."

(मु.पै.प.जी., पान ५५)

वरील सर्व आयतींवरून हे स्पष्ट होते की सर्वसाधारण असणारा प्रत्येक माणूस ते उच्चपद मिळविण्यास पात्र नसतो. अल्लाह ज्यांना त्यासाठी पात्र व लायक समजतो त्यांनाच ते पद बहाल करतो. प्रेषित हे सर्वसामान्य माणसांपैकीच होते व ते स्वत:ही 'आम्ही तुमच्याप्रमाणेच माणसे आहोत' असे म्हणत आले आहेत. सूरह (अध्याय) यूसुफ मध्ये म्हटले आहे की, "नि:संशय (प्रेषित) हे जेवत-खात असत व बाजारहाटही करीत असत." तसेच "आम्ही त्यांना पत्नी व मुलेबाळे बाळगणारे (संसारी माणसे) बनविले होते." (२५:२०) त्याचप्रमाणे "तुमच्यापूर्वी झालेले प्रेषित संसारी होते, त्यांना मुलेबाळे होती." (१३:३८)

प्रेषितांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

पवित्र कुरआनात आलेल्या विविध आयतींवरून प्रेषितांची प्रमुख कर्तव्ये व जबाबदाऱ्या यावर प्रकाश पडलेला दिसतो.

"अल्लाहचा संदेश पोहचविणे, श्रद्धावंतांना खूशखबर ऐकविणे व इन्कार करणाऱ्यांना दुष्परिणामाबद्दल सावध करणे व या उपरान्त जे आज्ञाभंग करतील त्यांची जबाबदारी प्रेषितांवर नाही व त्याबद्दल त्यांना अल्लाहला जाब द्यावा लागणार नाही."

(२:११९)

"प्रेषितांचे काम सावध करणारे आहे ते त्यांच्यावर दरोगा नाहीत."

(८८:२० व २९)

"प्रेषित हा हवालदार नाही." (१०:१०८)

"प्रेषितांचे कार्य फक्त सावध करण्याचे आहे." (६४:१२)

"ईशसंदेश पोहचविण्याची फक्त जबाबदारी प्रेषितांची असते."

(१६: ३४ व ३५)

"अल्लाहच्या आयती ऐकविणे म्हणजेच सप्रमाण ईशसंदेश पोहचविणे, प्रेषित अल्लाहचे आदेश, कायदे, नियम यांची शिकवण देणे, अल्लाहचे त्यामागील उद्दिष्ट यांचे योग्य ज्ञान देणे, माणसांना श्रद्धा, नीती, आचार व त्यांच्या अंतरंगाला व बाह्य स्वरूपाला स्वार्थापासून शुद्ध करतात व त्याची नीती आणि आचरण विकसित करून श्रेष्ठत्वाला पोहचवितात." (२:१२९)

“प्रेषितांनी ईशसंदेश पोहचवावेत, शरिअत (धर्मशास्त्र) सांगावी व लोकांनी त्याप्रमाणे न्यायी वृत्तीने वागावे.” (५७:२५)

“प्रेषित विवेक, ज्ञान, मार्गदर्शन व सावध करणारे असतात जे अल्लाहकडून पाठवले जाते, ते फक्त सचेत करणारे असतात.” (९५: २४ व ३७:७२)

“प्रेषित हे लोकांवर देखरेख ठेवण्यासाठी नियुक्त केलेले नाहीत.” (६:६६ व ६:१०७)

“प्रेषित फक्त सावध करणारे होते, देखरेख करणारे नव्हेत.” (१७:५४)

“(प्रेषित म्हणतो) माझा लाभ अथवा हानीदेखील माझ्या अखत्यारीत नाही.” (१०:४८)

“प्रेषित अल्लाहच्या सत्य धर्माचा साक्षी असतो. श्रद्धावंतांना खूशखबर देणारा व अन्यायींना अल्लाहच्या शिक्षेचे भय दाखविणारा असतो. सत्यधर्माकडे आवाहन करणारा व प्रकाश दाखविणारा असतो.” (३३:४५ व ४६)

“प्रेषित फक्त मार्ग दाखवतात.” (२८:५६ व २९:२५)

“मी (प्रेषित) फक्त ईशभय दाखवणारा आहे.” (५१:५०)

“प्रेषित अल्लाहचे संदेशवाहक व त्याला भिऊन वागणारे होते. अल्लाहच्या संदेशात ते एकाही अक्षराचा फेरफार करीत नाहीत. तो संदेश जसाच्या तसा पोहचविणे हेच त्यांचे कर्तव्य होते.” (३३:५९)

“प्रेषित अल्लाहचा संदेशवाहक असतो, त्याच्यात ना ईशत्वाचा गुण असतो ना तो ईश्वराचा अवतार असतो.” (२:२५२)

प्रेषितांचे आवाहन राष्ट्र, जात, वंश व वर्ण वगैरेंच्या आधारावर माणसामाणसात भेदभाव करणारे नसते. ते अखिल मानवजातीसाठी असते. प्रेषित इतरांना ईशोपदेशाचे आवाहन करण्यापूर्वी ईशउपदेशांचे स्वत: पालन करीत असतो व त्यानुसार स्वत:चे आचरण ठेवतो. म्हणजे तो स्वत:पासूनच ईशआज्ञांच्या पालनाचे कार्य सुरू करतो.

“तो स्वत: पूर्णत: अल्लाहच्या अधीन बनून, त्याचीच उपासना करून त्याच्या आज्ञांचे तंतोतंत पालन करतो.” (६:१४)

प्रेषित अल्लाहचा फक्त संदेशवाहक असतो, त्याच्यात ना ईशत्वाचा गुण असतो ना तो ईश्वराचा अवतार असतो. पवित्र कुरआनाची प्रेषितांविषयीची कल्पना खोट्या लोकभ्रमापासून अगदी शुद्ध आहे.

प्रेषितांनादेखील ईशशिक्षेचे भय असतेच म्हणून आयत (६:१५) मध्ये आले आहे, "सांगा, जर मी आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञा पाळल्या नाहीत तर मला एका मोठ्या दिवसाच्या (कियामतच्या) शिक्षेचे भय आहे."

"प्रेषितांना आम्ही (अल्लाह) या कारणास्तव पाठविले की त्यांनी शुभवार्ता देणारे व सावध करणारे व्हावे." (६:४८) यात प्रेषितांना पाठविण्याचे खरे कारण चमत्कार दाखविणे नव्हे तर सत्याचे आवाहन प्रस्तुत करणे हे होय.

एका सच्चा प्रेषिताला आवश्यक असणारी गुणवत्ता अशी आहे की तो उच्च दर्जाचे पुण्यशील सदाचारी जीवन जगतो, अल्लाहवर त्याची परिपूर्ण निष्ठा असते, त्याचे चारित्र्य निष्कलंक असते. त्याची त्यागीवृत्ती व मानवतेशी निस्सिम प्रेम आणि अल्लाहच्या कार्याशी व त्याच्या उदात्त शिकवणींशी त्याची अटळ श्रद्धा व निश्चल निष्ठा असते.

कुरआनात प्रेषित वारंवार सांगताना आढळतात, "मी ईशआज्ञा तशाच्या तशा तुमच्यापर्यंत पोहचवित आहे व त्याबद्दल मी तुमच्याकडून काडीचीही अपेक्षा करीत नाही."

प्रेषित हे आपल्या मनाचे काहीही सांगत नसत. त्यांची प्रत्येक उक्ती व कृती अल्लाहच्या प्रेरणेप्रमाणेच होत असे. ईशमार्गदर्शनावरच त्यांचे वर्तन असे. हे कुरआनातील खालील आयतींवरून स्पष्ट होते.

१) "हे प्रेषित त्यांना (लोकांना) सांगा, मला अल्लाहने जी प्रेरणा दिली आहे त्याप्रमाणेच मी वागतो." (७:३)

२) "प्रेषित हे स्वत:च्या इच्छेने बोलत नाहीत." (५३:३)

कुरआनात श्रद्धावंतांनी प्रेषितांच्या आज्ञांचे पालन करावे व त्यांचे अनुकरण करावे असे सांगण्यात आले आहे.

१. "जो अल्लाहवर व त्याच्या शब्दांवर श्रद्धा ठेवतो व प्रेषिताचे अनुकरण करतो तो सरळमार्गावर चाललेला आहे." (७:१५८)

२. "अल्लाहचे प्रेषित हे तुमच्यासाठी उत्कृष्ट आदर्श आहेत." (३३:२१)

३. "अल्लाहने (कुरआनात) व प्रेषितांनी एखाद्या बाबतीत निर्णय दिला असेल तर त्या बाबतीत श्रद्धावंतांनी स्वत:चा निर्णय घेऊ नये. (घेता येणार नाही.)" (३३:३६)

४. "प्रेषितांनी जे सांगितले आहे ते करा व जे प्रतिबंधित केले आहे ते करू नका." (५९:७)

प्रेषित हा कधीही मोबदल्याचा इच्छुक नसतो. तसेच तो कधीही आपल्या म्हणण्याप्रमाणेच वागा असा आग्रह करीत नाही. प्रेषितांच्या आज्ञा ज्यांनी दुर्लक्षित केल्या, प्रेषितांचा उपहास केला व मनमानी वागत राहिले अशा जनसमूहांना अल्लाहची शिक्षा भोगावी लागते. त्या बाबतीत कुरआनात खालीलप्रमाणे वृत्तान्त आलेला दिसतो.

(१) "तुमच्यापूर्वी अनेक जनसमूहांकडे आम्ही प्रेषित पाठविले आणि त्या लोकांना संकटात व दुःखात गुरफटविले जेणेकरून त्यांनी आमच्या समोर झुकावे."

(६:४२)

(२) "आम्ही प्रेषित जो पाठवितो तो याचकरता तर पाठवितो की त्याने सदाचारींना खूशखबर द्यावी व दुराचारींना भय दाखवावे. जे लोक ऐकतील व आपल्या कार्यपद्धतीत बदल करतील त्यांच्याकरिता कोणत्याही प्रकारचा भय व दुःखाचा प्रसंग नाही." (६:४८)

(३) "हे नबी (स.) तुमच्या अगोदरदेखील कित्येक प्रेषितांचा उपहास केला गेला आहे. परंतु त्या कुचेष्टा करणाऱ्या लोकांवर सरतेशेवटी तीच सत्यता उलटल्याशिवाय राहिली नाही. ज्याचा ते उपहास करीत असत त्यांना सांगा, जरा पृथ्वीतलावर फेरफटका मारून पाहा, खोटे ठरविणाऱ्यांचा कसा शेवट झाला आहे."

(६:१० व ११)

(४) "लोकहो! आम्ही तुमच्या पूर्वीच्या जनसमूहांना गारद करून टाकले जेव्हा त्यांनी अन्यायाचे वर्तन केले आणि त्यांचे प्रेषित त्यांच्यासाठी उघडउघड निशाण्या घेऊन आले आणि त्यांनी ईमान आणलेच नाही. अशाप्रकारे आम्ही गुन्हेगारांना त्यांच्या गुन्ह्याचा बदला देत असतो." (१०:१३)

प्रेषितांवर श्रद्धा ठेवणे व त्यांचे अनुसरण करणेच सर्वार्थाने हितावह आहे, हे दर्शविण्याच्या या दोन आयती अत्यंत महत्वाच्या आहेत.

"प्रेषितांचे आज्ञापालन निःसंकोचपणे व निमूटपणे केले जावे ही ईमानची (श्रद्धेची) निकड आहे." (४:६५)

वरील आयतीत अगदी स्पष्ट इशारा सर्वांसाठी अल्लाहने दिलेला दिसतो.

प्रेषितांचा दर्जा किती उच्च आहे हे या आयतीत स्पष्टपणे दर्शविलेले दिसते,

"अल्लाह, त्याचे ग्रंथ व त्याचे प्रेषित सर्वांत जास्त आदरास पात्र आहेत. कोणीही खरा श्रद्धावंत त्यांची थट्टा उडविण्याचे धारिष्ट्य करणार नाही." (९:६५)

पवित्र कुरआनचा सखोल अभ्यास करणाऱ्यांच्या लक्षात येते की काही प्रेषितांकडून इतर काही महत्त्वाची कार्येदेखील अल्लाहने करवून घेतलेली दिसतात.

उदाहरणार्थ - इब्राहीम (अ.) व इस्माईल (अ.) यांच्याकडून काबागृहाची उभारणी व त्याचे पावित्र्य राखण्याची जबाबदारी सोपविल्याचे दिसते.

दाऊद (अ.) यांच्याकडून खिलाफतीची स्थापना करवून घेतली.

सुलैमान (अ.) यांनी इस्लामी साम्राज्याची स्थापना केली व जेरूसेलम येथील बैतुलमकदसची उभारणी करून घेतली. जिन्न, पशु, पक्षी व कीटक यांची भाषा त्यांना अवगत होती. त्यांनी या जिन्नांकडून महत्त्वाची कामे करून घेतली.

मूसा (अ.) यांनी एकेश्वरत्वाचे केलेले आवाहन, तसेच जुलमी फिरऔनच्या ताब्यातून इस्राइलींची मुक्तता व त्या जुलमी फिरऔनचा सर्वनाश मूसा (अ.) यांच्यामुळेच घडून आला.

पवित्र कुरआनात आदम (अ.) या प्रथम प्रेषितांपासून ईसा (अ.) या प्रेषितापर्यंतच्या प्रेषितांचे वृत्तान्त प्रेषित मुहम्मद (स.) यांना ऐकविलेले दिसतात. हे वृत्तान्त ऐकविण्यामागील अल्लाहचा उद्देश काय होता, हे सूरह 'हूद' मधील १२० व्या आयतीत स्पष्ट करण्यात आलेले आहे.

"आणि हे प्रेषित (स.) या प्रेषितांच्या गोष्टी आम्ही तुम्हाला सांगत आहोत, या त्या गोष्टी आहेत ज्यामुळे आम्ही तुमचे हृदय बळकट करतो, यात तुम्हाला सत्याचे ज्ञान मिळते आणि ईमान आणणाऱ्यांना उपदेश आणि जागृती लाभावी." (११:१२०)

कुरआनात आलेल्या प्रेषितांशिवाय आणखीन कोणी प्रेषित झाले नाहीत का? असी शंका येऊ नये म्हणून -

"तुमच्यापैकी अनेक प्रेषित पाठविले ज्यापैकी काहींच्या हकिकती आम्ही तुम्हाला ऐकविल्या आहेत व अनेक असे आहेत, ज्यांच्याविषयी आम्ही तुम्हाला काहीही सांगितलेले नाही." (४०:७८)

याचाच अर्थ याशिवायही अनेक प्रेषित होऊन गेले आहेत.

प्रेषितांच्या आज्ञापालनातच मानवांचे भले आहे.

"प्रेषितांचे आज्ञापालन केले जावे कारण ते अल्लाहकडून आदेश व कायदेकानू घेऊन येत असतात, त्यांच्या पदरचे ते काही सांगत नाहीत." (४:६४)

प्रेषितांचे आगमन का होत राहिले याचे फार सुंदर रीतीने कुरआनाच्या सूरह 'अल अअराफ' मधील ३५ ते ५३ व १९९ ते २०६ या आयतीत स्पष्टीकरण देण्यात आले

आहे. मार्गदर्शनाकरिता प्रेषित पाठविले होते आणि तेच सफल होतील जे त्यांचे अनुसरण करतील. जे नाकारतील ते आखिरतमध्ये ईशशिक्षेस पात्र ठरतील.

कुरआनातील सूरह 'अल अहजाब' मधील ४० व्या आयतीत स्पष्ट उल्लेख आलेला आहे, "मुहम्मद (स.) हे अल्लाहचे प्रेषित आहेत व प्रेषित मालिकेतील अंतिम प्रेषित आहेत." He is the seal of the prophets. याचाच अर्थ आता कोणीही प्रेषित म्हणून पृथ्वीतलावर अल्लाहकडून पाठविला जाणार नाही. म्हणून प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरित झालेला ईशग्रंथ कुरआन, ईशआज्ञा व आदेश, शरिअत हे सर्व अंतिम आहेत. आता कोणी प्रेषितच येणार नाही त्यामुळे कोणताही ईशधर्म, ईशआज्ञा, शरिअत व ईशग्रंथ यापुढे अवतरित होणार नाही. त्यामुळे या अंतिम प्रेषिताच्याच आज्ञांचे पालन केले जावे.

कुरआनात याप्रमाणे प्रेषित, प्रेषितत्वाची योजना याविषयी आलेले विवेचन संक्षिप्तरित्या मांडले आहे.

प्रेषित आदम (अ.)

अरबी भाषेत 'आदम' या शब्दाचा अर्थ 'मानव' असा होतो. कुरआनातील (३०:२०) मध्ये म्हटले आहे, "मानवाला आम्ही मातीच्या सत्वापासून निर्माण केले आहे." आज विज्ञानाने हे सिद्ध झाले आहे की माणसात जेव्हा दुर्बलता येते तेव्हा जीवनसत्त्वे (जी जमिनीतूनच निर्माण होतात) देऊन आपण आलेली कमतरता भरून काढतो.

कुरआनात याच आंदमला पहिला प्रेषित मानले आहे. प्रेषित म्हणजे मानवांना सरळमार्ग दाखवणारा, ईशआज्ञा पोहचविणारा व ईशमार्गदर्शन देणारा ईश्वराने नियुक्त केलेला मानव. कुरआनात म्हटले आहे, "जगात जेथे जेथे मानवी समूह होते तेथे आम्ही प्रेषित पाठविले होते." (६:४२) हे प्रेषित माणसांतून निवडले होते.

(सूरह यूसुफ)

कुरआनप्रमाणे आदरणीय मुहम्मद (स.) हे अंतिम प्रेषित आहेत. (खतिमुन नबियीन) कुरआनातील (२:३०) प्रमाणे सर्व फरिश्ते (ज्यांची उत्पत्ती प्रकाशापासून आहे व जिन्न हे अग्नीपासून निर्मिलेत) त्या सर्वांना जमा करून अल्लाहने आपण मर्त्य मानवाची निर्मिती करणार असल्याचे सांगितले, तेव्हा अल्लाहने असे करू नये अशी सर्वांनी त्याच्याकडे विनवणी केली. कारण असा मानव खोडसाळपणा करेल. भयंकर रक्तपात करेल व पृथ्वीवर सर्वत्र अराजक निर्माण करेल अशी भीती व्यक्त केली.

अल्लाहने आदमला आपला पृथ्वीवर नायब (प्रतिनिधी) म्हणून निर्माण केले व त्याला विविध वस्तूंची नावे व त्यांचे गुणधर्म यांचे ज्ञान दिले. (२:३१) ईश्वराने त्यानंतर सर्व फरिश्ते व जिन्नांच्या समक्ष आदमला विविध प्रश्न विचारले ज्यांची त्याने अगदी बरोबर उत्तरे दिली. त्यानंतर सर्वांना आदम (अ.) समोर नतमस्तक होण्यास सांगितले. तेव्हा इब्लीसखेरीज सर्वांनी अल्लाहजी आज्ञा पाळली. (२:३४) इब्लीसने ईशआज्ञा पाळली नाही. त्याचे म्हणणे होते की आदम मातीपासून निर्मिला आहे पण तो अग्नीपासून निर्माण झाला आहे म्हणून आदमपेक्षा तो श्रेष्ठ आहे. असे म्हणून त्याने ईशआज्ञा पाळली नाही. तेव्हा ईश्वराने इब्लीसला आनंदवनातून हाकलले. इब्लीसने ईश्वरासमोर विनवणी करून अंतिम निवाड्याच्या दिवसापर्यंत त्याला अस्तित्वात राहू देण्याची विनंती केली. ईश्वराने ती मान्य करताच ईश्वरास इब्लीसने 'मी मानवास सर्व बाजूने घेरीन व पथभ्रष्ट करीन' असे सांगितले. (७:१४-१८) इब्लीस किंवा सैतान म्हणजे मोह, माया, मद, मत्सर, लोभ हेच होत.

आदम (अ.) ला त्याची सहचारिणी म्हणून हव्वाला निर्माण केले. ते स्वर्गात सुखाने राहात होते. ईश्वराने त्यांना एका विशिष्ट झाडास स्पर्श न करण्याची आज्ञा दिली. सैतानाने वेगवेगळ्या तऱ्हेने आदम (अ.) व हव्वा (अ.) ला बहकावले व त्यांनी त्या झाडास स्पर्श केला व ईशआज्ञा भंग केली. त्याबरोबर त्यांची गुप्तांगे उघडी पडली व ती त्यांनी पानांनी झाकली. (७:२२-२४) ईश्वराने त्यांना व इब्लीसला स्वर्गातून पृथ्वीवर उतरण्यास सांगितले. आदम (अ.) यांनी पश्चात्ताप व्यक्त केला. दयाळू ईश्वराने त्यांचा पश्चात्ताप स्वीकारला व आदम (अ.) ला मार्गदर्शन केले.

आदम (अ.) ला आनंदवनातून बाहेर हाकलले जाऊन पृथ्वीवर उतरताच मर्त्य मानव बनला. पण आदम (अ.) ने खरा ईशधर्म, एकेश्वरत्व व शुद्ध आचरणाची शिकवण आपल्या बरोबरीच्या सर्वांना दिली. ईशधर्मावर व मार्गदर्शनावर चालणारा कधीही सैतानाच्या प्रभावाखाली येणार नाही याची ग्वाही दिली.

(२:३९-४०) सूरह 'अल बकरा' मधील ३९ व ४० नंबरच्या आयतीत आदम (अ.) हे पहिले प्रेषित होत.

प्रेषित शीश (अ.)

आदम (अ.) नंतर त्यांचा तृतिय पुत्र शीश (अ.) हे प्रेषित नियुक्त केले गेले. अल्लाहने त्यांच्यावर ईशग्रंथातील पन्नास भाग अवतरित केले होते असे मानतात. त्यांनी आपल्या अनुयायांना सन्मार्गावर चालण्याचा सतत उपदेश केला. पण पुढील काळात त्यांच्या अनुयायांनी त्यांनाच देवत्व देऊन त्यांचीच आराधना सुरू केली. त्यांच्या या अनुयायांचा पंथ इजिप्तमध्ये चौथ्या शतकापर्यंत अस्तित्वात होता.

शीश (अ.) यांच्या अनुयायांनी पुढील काळात अनेकेश्वरत्व सुरू केले व ते सन्मार्गावरून ढळले व भ्रष्ट मार्गाने वागू लागले. शीश (अ.) यांनी त्यांच्या अनुयायांना एकेश्वरत्वाचा केलेला उपदेश व 'एकेश्वरत्वावरच श्रद्धा ठेवून वागा' ही शिकवण दिली.

(आदम (अ.) ते प्रेषित मुहम्मद (स.) या ग्रंथाचा आधार)

प्रेषित इद्रीस (अ.)

संपूर्ण कुरआनात प्रेषित इद्रीस (अ.) यांचा दोन वेळा उल्लेख आला आहे. पहिला उल्लेख सूरह 'मरयम' मधील आयत क्र. ५६ व ५७ मध्ये आलेला आहे, तो असा -

कुरआन-१९:५६-५७ मध्ये "आणि ग्रंथात इद्रीसचा उल्लेख करा. तो फार सच्चा होता व प्रेषित होता आणि आम्ही त्याला उच्च स्थानावर उठविले होते."

प्रेषित इद्रीस यांचा उल्लेख कुरआनात अगदी संक्षेपाने आला आहे.

दुसऱ्यांदा त्यांचा उल्लेख सूरह 'अंबिया'तील आयत ८५ मध्ये आलेला आहे. त्यांचा मेअराजवाल्या हदीसमध्ये, त्यांचे चौथ्या आकाशावर असण्याचा उल्लेख आहे. बायबलमध्येही या नावाच्या व्यक्तिमत्त्वाचा उल्लेख नाही. कुरआनातील निवेदनानुसार प्रेषित इद्रीस यांचे व्यक्तिमत्त्व सत्यनिष्ठेच्या व एकनिष्ठेच्या दृष्टीने महान होते. इतिहासात त्यांचा कोठेही उल्लेख नाही. कुरआनात त्यांचा उल्लेख वरील आयतींमध्ये आलेला आहे.

सूरह 'अल अंबिया' मध्ये ८५ च्या आयतीत म्हटले आहे, "आणि इस्माईल व इद्रीस व जुलकिफ्ल यांनाही (आपल्या कृपेने उपकृत केले) हे सर्व सहनशील होते." आयत ८६ मध्ये म्हटले आहे, "त्यांना आम्ही आपल्या कृपेत दाखल केले, निःसंशय ते सत्कर्म करणारांपैकी होते."

प्रेषित इद्रीस (अ.) हे प्रेषित आदम (अ.) यांच्यानंतर शंभर वर्षांनी जन्मले. इद्रीस (अ.) यांना लिहिता वाचता येत होते. असे म्हटले जाते की अल्लाहकडून त्यांच्यावर तीस भाग अवतरीत झाले होते. त्यांनी खगोलशास्त्र व अंकगणितावर संशोधन केले होते असे म्हटले गेले आहे.

प्रेषित इद्रीस (अ.) यांनी एकेश्वरत्वाचा प्रचार केला. त्यांनी मूर्तीपूजेची निर्भर्त्सना केली होती. 'संपत्ती व आर्थिक मालमत्तेत गुरफटू नका,' हे ते सतत सांगत राहिले. त्यांनी दारू व नशिल्या वस्तूंपासून दूर राहण्याचा सतत उपदेश केला. त्यांच्या

समाजाने त्यांच्या उपदेशाकडे दुर्लक्ष केले तरी ते संयमाने आपले विचार बिंबवत राहिले. लोकांना सुधारण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. शेवटी ते लोकांच्या न ऐकण्याच्या वृत्तीमुळे निराश झाले. त्यांना इजिप्तला स्थलांतर करण्याची ईशआज्ञा झाली. त्याप्रमाणे ते नाईल नदीच्या काठावरील भागात स्थायिक झाले.

लोकांना त्यांनी उपदेश केला की, "इतरांच्या बरोबर ईर्षा करू नका, पैशाची व मालमत्तेची हाव कधीच संपत नाही व माणूस सुख-समाधान गमावून बसतो. दृढतेने ईश्वराची आराधना करा, खोट्या आणा-शपथा घेऊ नका, सहनशीलता व संयम हे यशस्वी होण्यासाठी आवश्यक आहे, जो आपल्या वासनांच्या व भावनांच्या आहारी जात नाही तो कयामतच्या दिवशी ईशकोपापासून वाचेल, माणसाने उच्च नैतिक जीवन जगावे व अनैतिक गोष्टींपासून अलिप्त राहावे."

प्रेषित नूह (अ.)

प्रेषित आदम (अ.) यांनी जो एकेश्वरत्वाचा ईशधर्म सांगितला होता तो पुढील काळात लोकांनी बाजूस सारला. ते एकेश्वरत्व सोडून अनेकेश्वरत्वाकडे वळले. मूर्तीपूजा सुरू केली. लोकांनी खऱ्या अनादि अनंत अशा ईश्वराची उपासना सोडली. हा भ्रष्ट समाज विविध दुर्गुणांनी पोखरला गेला. विविध पंथ अस्तित्वात आले. षड्रिपुंचे (काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ व मोह) यांचे थैमान सुरू झाले. अन्याय, जुलूम बिनदिक्कतपणे सुरू झाला. सत्गुणी व सज्जन लोकांना जगणे मुष्किल झाले. अशा या समाजाला सुधारण्यासाठी अल्लाहने नूह (अ.) यांना आपला प्रेषित म्हणून पाठविले. त्या भागात जो आज इराक या नावाने ओळखला जातो.

कुरआन १०:७१, ७२ या आयतीवरून स्पष्ट होते की, "आदरणीय नूह ज्यांना सर्वप्रथम मानव वस्तीकडे प्रेषित या नात्याने पाठविले गेले होते. मुस्लिम होते म्हणजे इस्लाम हाच त्यांचा धर्म होता आणि ते एकमेव ईश्वराचे दास होते." ११:२५ मध्ये, "ज्या समूहाकडे गेले त्यांना म्हणाले, मी तुम्हाला खबरदार करणारा आहे."

"अल्लाहशिवाय कोणाचीही उपासना करू नका." (११:२६) असे त्यांनी सांगण्यास सुरूवात केली तेव्हा तेथील लोकांनी त्यांना खोटारडे आहात असे म्हटले. (११:२७) मला ईश्वराने खास कृपेने उपकृत केले. परंतु तुम्हाला ते दिसत नसावे. तर काय आम्ही तुम्हाला चिकटवून राहावे. (११:२८) "मला तुमच्याकडून कशाचीही अपेक्षा नाही. जर मी त्यांना धुडकावून लावीन तर अल्लाहच्या तावडीतून कोण आहे जो मला वाचवेल? माझ्याजवळ अल्लाहचे खजिने आहेत व मी अपरोक्षाचे ज्ञान बाळगतो, मी फरिश्ता आहे वगैरे जर म्हटले तर मी अत्याचारी होईल."

(आयत - ११:२८ ते ३१)

"नूह तुम्ही खूप वाद केला. आता तुम्ही ते आणा ज्याची आम्हाला भीती दाखवता. अल्लाहने इच्छिले तर तुमच्या आवाक्यात नाही की तिला रोखू शकाल. अल्लाहने जर तुम्हाला मार्गभ्रष्ट करायचे ठरवले तर कोणीही तुम्हाला वाचवू शकणार नाही." (११:३२ ते ३४)

"जर मी माझ्या पदरचे सांगेन तर ती जबाबदारी माझ्यावर आहे. नूहवर वह्य आली की, ज्यांनी ईमान आणले ते सोडून आता कोणीही ईमान आणणार नाही त्याचे तुम्ही दु:ख करू नका." (११:३५ ते ३६)

यानंतर नूह यांना नौका तयार करण्याची ईशआज्ञा आली. त्यांनी तशी मोठी नौका बांधण्याचे काम सुरू केले तेव्हा अश्रद्धांनी त्यांची टवाळी सुरू केली, थट्टा सुरू केली. नौका तयार होताच ईशआदेश आला की, तुमच्या अनुयायांसह त्यात स्वार व्हा. प्रत्येक प्रकारच्या नर-मादीचे जोडे बरोबर घ्या व नौकेत तुमची पत्नी घेऊ नका, कारण ती ईमान बाळगणारी नाही. ही माहिती (११:३५ ते ४१) आली आहे.

आयत क्र. ११:४० प्रमाणे हे समजते की सर्वजण नौकेवर स्वार होताच प्रचंड पाऊस सुरू झाला व जमिनीतूनही पाण्याचे लोंढेच्या लोंढे उफाळून वाहू लागले. थोड्याच वेळांत प्रर्वतप्राय लाटा उसळू लागल्या. नूहने आपल्या पुत्रास नौकेत येण्यास पुकारले. तो म्हणाला, "मी उंच टेकडीवर जाऊन बसेन." पाण्याचा एवढा वेग होता की एका प्रचंड लाटेने त्यांच्या मुलास लपेटले व तो बुडून वाहून गेला. ईशआदेश येताच पाऊस थांबला व जमिनीस पाणी शोषून घेण्याचा आदेश येताच सर्व पाणी ओसरले व त्यांची नाव जूडी पहाडाला जाऊन लागली. आयत क्र. ११:४० ते ४७ पर्यंत ही माहिती येते.

"नौकेतून उतरण्याचा आदेश आला व त्याच वेळी सर्वांना समृद्धी लाभेल असे ईश्वराने आश्वासन दिले पण त्याच वेळी हेही सांगितले की, जर वाममार्गाकडे वळलात तर ईशकोपास पात्र ठराल." (११:४८)

नूह येथे येण्यापूर्वी राहात होते तेथे देवी-देवतांचा पुजारीवर्ग अतिशय प्रबळ होता. ते विविध धार्मिक विधी करीत होते. नूह (अ.) एकेश्वरत्वाचे आवाहन करीत तर त्यांची हे लोक हेटाळणी करून त्यांची निर्भर्त्सना करीत. नूह सतत सांगत होते की, ईशभयाने वागा, सत्कर्म करा, दयेने वागा, ईश्वराचा कोणी सहभागी नाही. तो दयाळू आहे व तुम्हाला क्षमा करणारा आहे. त्यामुळे तुम्हीसुद्धा समाधानाने नांदाल. पुजारीवर्ग व मदोन्नत श्रीमंतांनी नूह यांना ईशप्रकोप आणूनच दाखवा असे आव्हान दिले. तेव्हा नूह (अ.) यांनी शेवटी वैतागून ईश्वराने यांना धडा शिकवावाच अशी ईश्वराजवळ प्रार्थना

केली. ''एकासही सोडू नकोस, नाहीतर त्यांचे पुढे होणारे वंशज भयंकर उच्छाद मांडतील,'' असे म्हटले. ''फक्त आमच्या श्रद्धाळू अनुयायांना व त्यांच्या पालकांना वाचव,'' अशी प्रार्थना केली. ती ईश्वराने स्वीकारून नौका बांधण्याचा आदेश दिला व मागे आल्याप्रमाणे सर्वनाश होऊन फक्त नूह (अ.) व त्यांचे अनुयायी व श्रद्धावंत वाचले.

प्रेषित नूह यांचा काळ ख्रिस्तपूर्व सुमारे चार-पाच हजार वर्षांपूर्वीचा असेल. नूह समूहाचे निवासस्थान दजला व फुरात या नद्यांच्या दरम्यान अर्थात इराकच्या उत्तर भागात मौसिल शहराच्या आसपास होते.

आदम (अ.) नंतर नूह पहिले प्रेषित होत जे मानव वस्तीकडे पाठविले होते. (४२:१३)

आदरणीय नूह पहिले प्रेषित होते आदमनतंर त्यांच्या वंशात जन्माला आले. त्यांच्या वस्त्या इराकच्या कुसर भागात होत्या आणि त्यांच्यात एक प्रदीर्घ काळ लोटल्यामुळे श्रद्धा व आचरणविषयक उत्पात निर्माण झाला होता. (७१:१)

कुरआन - ५१:४६, ५१:५२, ५४:९-१५, ५७:२६, ७१:२-१२, यात लोकांनी नूह (अ.) यांना झिडकारले, त्यांचे आवाहन नाकारले, त्यांची हेटाळणी केली व आपला सर्वनाश ओढवून घेतला ही माहिती मिळते.

नूह (अ.) यांची नाव जेथे थांबली त्या पहाडाचे नाव 'जूदी' होते जे कुर्दीस्तानमध्ये आहे. हा 'अरारात' पर्वताचा एक भाग होता. जो अर्मेनियापासून कुर्दिस्तानपर्यंत पसरलेला आहे. नूह (अ.) यांची नाव जेथे थांबली व स्थिरावली त्या ठिकाणाचे नाव बायबलमध्ये 'अरारात' असे आहे. परंतु कुरआनात त्या स्थानाचा 'जूदी' म्हणून स्पष्ट उल्लेख आलेला आहे. भाष्यकार कुरआनात 'जूदी' हे म्हटलेलेच स्थान योग्य आहे असे मानतात.

भाष्यकार पुढे म्हणतात, ''स्पष्ट असावे की या वादळाविषयी कुरआनने हे कोठेही म्हटले नाही की हे संपूर्ण पृथ्वीतलावर आले होते, किंबहुना कुरआन जी गोष्ट स्पष्ट करते ती अशी की ज्या लोकांना नौकेत वाचविले गेले होते त्यांच्यापासूनच मनुष्य वंशक्रम चालत राहिला. याचा अर्थ असा की त्या वेळी मनुष्यवस्ती एका विशिष्ट भूभागामुळे जाऊ शकली नव्हती. म्हणून या भूभागावर जे वादळ आले त्याने संपूर्ण मानववस्तीला बुडविले, फक्त त्या ईमानधारकांना ज्यांस नौकेत आश्रय मिळाला होता.'' (दावतुल कुरआन, पान ७५१, तळटीप ६५) ही आदम (अ.) नंतर आलेली पहिली जगबूडी असावी.

"तुम्ही त्या लोकांची संतती आहात ज्यांना आम्ही नूहसोबत नौकेत स्वार केले होते. जो खरोखर एक कृतज्ञ दास होता." (१७:३)

१७:१७ मध्ये म्हटले आहे, "नूहनंतरच्या काळाता आम्ही कितीतरी जनसमूहांना नष्ट केले."

२१:७६ "नूहने जेव्हा प्रार्थना केली व आम्हाला पुकारले त्याची प्रार्थना मंजूर केली, त्याला व त्याच्या साथीदारांना यातनेपासून मुक्त केले."

१७:१७ व २१:७६ यात जगबुडी का आली त्याचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

२९:१४,१५ "आम्ही नूहला त्याच्या जनसमूहाकडे पाठविले आणि तो त्यांच्या दरम्यान हजार वर्षाला कमी पन्नास वर्षे पर्यंत राहिला. मग त्यांना वादळाने तावडीत घेतले अशा अवस्थेत की ते अत्याचारी बनले होते."

त्यांच्या लोकांत नूह (अ.) ९५० वर्षे राहिले आणि राष्ट्र विनाशानंतर किती काळ जिवंत होते याचा उलगडा कुरआनात आलेला नाही. पण एवढे निश्चित दिसते की त्यांचे वय ९५० वर्षांपेक्षा जास्त होते. बायबलमध्ये ९५० वर्षे असा उल्लेख येतो. नूहचे वडील ७७७ वर्षे व आजोबा ९६९ वर्षे जगले असे बायबलमध्ये निवेदन येते. (बायबल निर्मिती, प्रकरण ५)

३७:७५-८२ मध्ये या आपत्तीनंतर काय घडले ते समजते. जे बचावले ते बहुतेक त्यांच्या घरातले सदस्य होते. वाचलेल्यांतून मानववंश वृद्धिंगत होत गेला. बायबलच्या निवेदनाप्रमाणे नूह (अ.) यांना तीन मुलगे होते.

(१) साम : अरब, रोमन वगैरे सेमेटिक जनसमूह अस्तित्वात आले.

(२) हाम : हबशी, नीग्रो, मिसरी, इजिप्शियन वगैरे.

(३) याफस : तुर्क, मोगल आणि याजूस माजूस.

जोपर्यंत त्यांनी आपल्या मर्यादा उल्लंघिल्या नाहीत तोपर्यंत त्यांची भरभराट झाली.

प्रेषित लूत (अ.)

प्रेषित लूत हे प्रेषित इब्राहीम (अ.) यांचे समकालीन होते. ते प्रेषित इब्राहीम (अ.) यांचे पुतणे होते आणि इराकहून त्यांच्यासह हिजरत-स्थलांतर करण्यासाठी निघाले होते. सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना 'समूद' वस्तीकडे प्रेषित बनवून पाठवले होते.

समूदचा इलाका मृतसागराच्या किनाऱ्याशी होता. जो जॉर्डन नदीकडे आहे. बायबलमध्ये प्रेषित लूत व समूद आणि अमूराहच्या वस्त्यांचा उल्लेख आहे. (निर्मिती प्रकरण १४ व १९)

प्रेषित लूत यांचा जन्म समूद जनसमूहात झालेला नव्हता. परंतु तोच भाग त्यांची कर्मभूमी असल्यामुळे त्या समूहाचा 'लूत यांचा प्रदेश' म्हणून उल्लेख येतो.

हा जनसमूह किळसवाण्या विकृतीत पडला होता. ही किळसवाणी विकृती म्हणजे समलैंगिक संबंध. या निर्लज्जतेबद्दल त्यांना लाज व शरम वाटत नव्हती. प्रेषित लूत यांनी प्रथमत: या विकृतीविरुद्ध आवाज उठविला. नीतिमत्ता, स्वभाव व धर्म या सर्वांच्या मर्यादा त्यांनी ओलांडल्या होत्या. उलट ते लोक सदाचारी लोकांची टर उडवीत असत.

"प्रेषित लूत हे मेसोपोटेमिया (हल्लीचा इराक) मधील उर या गावाचे रहिवासी होते. अल्लाहने त्यांना आपल्या मूळ गावातून सोडोल व गोमोराह येथे जाऊन अनेक अश्लाघ्य आणि अश्लील विकृतीने पाप करणाऱ्या तेथील लोकांना सुधारण्याचा आदेश दिला. तेथील लोक (रहिवासी) हे दरोडे, चोऱ्या करणारे व समलिंग संभोगी होते."

(२९:२९)

कुरआनातील सातव्या सूरह 'अआराफ' मधील आयत ८० ते ८४ मध्ये लूत (अ.) विषयी अशी माहिती मिळते -

"आणि लूत (अ.) ला आम्ही प्रेषित बनवून पाठविले. त्याने जेव्हा लोकांना सांगितले, काय तुम्ही असले बेशरम झाला आहात की, ती अश्लील कृत्ये करतात जी जगात तुमच्या अगोदर केली गेली नाहीत? तुम्ही स्त्रियांऐवजी पुरुषांकडून आपली कामवासना भागविता, वस्तूस्थिती अशी आहे की, तुम्ही सर्व मर्यादांचे उल्लंघन करणारे आहात. परंतु त्या लोकांनी लूत (अ.) यांना दुरुत्तरे सुरु केली व म्हणू लागले, त्यांनाच येथून हाकलून द्या. मोठे पवित्र आणि सोवळे समजतात स्वत:ला. सरतेशेवटी आम्ही लूत (अ.) व त्यांच्या परिवाराला फक्त त्यांची पत्नी सोडून कारण ती अश्रद्ध मागे राहणाऱ्यांपैकी होती, वाचवून बाहेर काढले आणि त्या जनसमूहावर वर्षाव केला एका दगडाधोंड्याच्या वृष्टीचा व त्या अपराध्यांचा शेवट पाहा कसा झाला." (७:८०-८४)

लूत (अ.) यांनी त्या लोकांना सूरह 'अन कबूत' मधील आयत २८ व २९ मध्ये त्या लोकांना म्हटले जे वाटमारी करीत त्यांची कानउघाडणी केली. उलट त्या लोकांनी लूत (अ.) यांचीच हेटाळणी सुरू केली (२९:२९) व म्हणाले, "आणा तुमच्या अल्लाहचा प्रकोप जर तुम्ही खरे असाल तर."

सूरह 'अशशुरा'तील आयत १६७ ते १६९ मध्ये ही माहिती येते. प्रेषित लूत (अ.) यांनी त्या लोकांना अश्लील विकृती व वाटमारीपासून दूर राहण्याचे आवाहन केले. तेव्हा ते लोक त्यांना म्हणाले, ''लूत (अ.) जर या गोष्टींपासून (उपदेश देण्यापासून) परावृत्त झाला नाहीत तर तुम्हाला आम्ही आमच्या वस्तीतून हाकलून देऊ. जसे पूर्वी असा उपदेश करणाऱ्यांना आम्ही काढून दिले.'' त्यावर लूत (अ.) यांनी म्हटले की, ''मला तरी तुमचे आचरण कोठे आवडते.'' पण अल्लाहने सोपविलेले कर्तव्य पार पाडण्यासाठी त्यांना तेथेच राहणे भाग होते. १६९ या आयतीत लूत (अ.) यांनी ''आपल्या परिवाराला व आपल्याला या लोकांच्या दुष्कर्मापासून वाचव'' म्हणून धावा केला. याच सूरतीत १७० ते १७३ मधील आयतीत माहिती येते की, ''सरतेशेवटी आम्ही त्याला व त्याच्या सर्व कुटुंबियांना वाचविले. एका म्हातारीला वगळून, जी मागे राहणाऱ्यांपैकी म्हणजे त्या लोकांबद्दल सहानुभूती बाळगणारी होती. मग आम्ही उरलेल्या लोकांना एका भयंकर खंगरी विटांच्या वर्षावाने नष्ट करून टाकले.

अल्लाहने जेव्हा या लोकांना नष्ट करण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्याने दोन फरिश्त्यांना देखण्या मानवी रूपात लूत (अ.) यांच्याकडे पाठविले. ते पाहुणे गोरे-गोमटे व देखणे पाहून लूत (अ.) भयभीत झाले. त्या वेळी त्या वस्तीतील लोक त्यांच्या घराभोवती जमले व पाहुण्यांना आमच्या स्वाधीन करा, असे म्हणू लागले. लूत (अ.) यांनी ''अरे तुमच्या स्त्रिया असताना हे कसले नीच कृत्य तुम्ही करत आहात,'' असे सांगितले, त्यावर मानवी रूपात आलेल्या फरिश्त्यांनी लूत (अ.) यांना निश्चिंत राहण्यास सांगितले व आम्ही अल्लाहकडून आलेलो आहोत. उद्याच पहाटे आम्ही ही वस्ती नष्ट करणार आहोत, असे सांगितले. आपल्या कुटुंबियांसमवेत उत्तर रात्री त्यांना तिथून जाण्यास सांगितले. त्यांची पत्नी मागे राहिली. पहाटे भयंकर अशा प्रकोपाने त्या वस्तीस नष्ट केले. सूरह 'हूद' आयत ७७ ते ८३ यात सविस्तर माहिती आली आहे.

प्रेषित लूत (अ.) यांनी त्या लोकांना ''स्त्रियांना अल्लाहने तुमच्यासाठी निर्माण केले आहे,'' असे समजावले पण उपयोग झाला नाही. शेवटी हताश होऊन ते म्हणाले, ''जर तुम्हाला सरळ करण्याचे माझ्यात सामर्थ्य असते किंवा माझ्याजवळ एखादा भक्कम आधार असता,'' ज्याचा मी आश्रय घेतला असता, त्यावेळीच फरिश्त्यांनी त्यांच्या येण्याची वास्तवता त्यांना सांगून वस्ती सोडून जाण्यास सांगितले. लूत (अ.) व त्यांचे कुटुंबिय पत्नीखेरीज वस्ती सोडून सुरक्षित स्थळी पोहचतात. आयत ८३ मध्ये म्हटल्याप्रमाणे, ''आम्ही त्या वस्तीला उलथेपालथे करून टाकले व त्याच्यावर

भाजलेल्या मातीच्या, दगडांचा वर्षाव केला, ज्यापैकी प्रत्येक दगड चिन्हांकित होता आणि जालिमांपासून ही शिक्षा काही दूर नाही.''अशी माहिती सूरह 'अल हिज्र' मधील ७३ ते ७५ या आयतीत आली आहे.

हा भाग हल्लीचा 'अल खलील' शहराच्या अग्नेय दिशेस काही मैलांवर मृत समुद्रात होता. हल्ली त्यावर समुद्राचे पाणी पसरले आहे. हा प्रदेश, उतारावर असून 'हबरून'च्या उंच पर्वतावरून स्पष्ट दिसतो.

प्रेषित लूत (अ.) पॅलेस्टाइनमध्ये मृत्यु पावले व त्यांची कबर हेब्रॉनजवळील बनी नाईमा येथे आहे.

प्रेषित इसहाक (अ.)

प्रेषित इसहाक (अ.) हे प्रेषित इब्राहीम (अ.) यांचे द्वितीय पुत्र होते. इब्राहीम (अ.) यांची पत्नी सारा यांना हा पुत्र झाला. त्यांचा जन्म म्हणजे एक मोठा ईशचमत्कारच होय. कारण इसहाक (अ.) यांचा जन्म झाला तेव्हा इब्राहीम (अ.) यांचे वय शंभर वर्षांचे होते व पत्नी सारा यांचे वय नव्वद वर्षांचे होते. कुरआनातील सूरह 'साऽऽफ्फात' आयत १११ ते ११३ अशी माहिती आलेली आहे.

''आणि आम्ही त्याला (इब्राहीम (अ.) यांना) इसहाकची शुभवार्ता दिली. एक प्रेषित होईल सदाचारी लोकांपैकी.'' (३७:११२)

''आणि आम्ही त्यावर आणि इसहाकवर अनेक (प्रकारची) समृद्धी अवतरित केली. आणि या दोघांच्या वंशापासून सत्कर्मीही आहेत आणि आपल्या जीवावर उघड अत्याचार करणारेदेखील.'' (३७:११३)

''निःसंशय तो आमचा मोमीन (ईमान बाळगणाऱ्या) दासांपैकी होता.''

(३७:१११)

हा प्रसंग फरिश्ते लूत (अ.) यांच्या जनसमूहाला शिक्षा-नष्ट करण्यासाठी जात असताना इब्राहीम (अ.) यांना भेटले असताना घडलेला आहे. ही सविस्तर माहिती सूरह 'हूद' मधील आयत ७१ ते ७३ आलेली आहे. ती अशी -

''आणि त्या (इब्राहीम) ची पत्नीदेखील उभी होती. ती हसली तेव्हा आम्ही तिला इसहाक व इसहाकनंतर याकूबची खूशखबरी दिली. ती म्हणाली, ''हाय मला संतती होईल? वस्तुतः मी म्हातारी झाली आहे व माझे पतीदेखील म्हातारे झाले आहेत, ही मोठी विचित्र गोष्ट आहे.'' (११:७१-७२)

यावर पुढे फरिश्ते म्हणाले, "काय तुम्ही अल्लाहच्या आदेशावर आश्चर्य व्यक्त करता? हे प्रेषिती घराण्याच्या लोकांनो! अल्लाहची कृपा व समृद्धी असो तुमच्यावर, नि:संशय तो स्तुतीस पात्र आहे आणि मोठा वैभवशाली आहे." (११:७३)

ईश वरदानामुळेच इसहाक (अ.) यांचा जन्म झाला. ते अत्यंत नीतिमान, चारित्र्यसंपन्न व परोपकारी असून उदार अंत:करणाचे होते. त्यांनी आपल्या पित्याप्रमाणेच सद्वर्तन ठेवून ईशधर्माचा प्रसार केला. ४० व्या वर्षी त्यांचा रिबेकाशी विवाह झाला. त्यांना इसौ (ESAU) व याकूब असे दोन जुळे पुत्र झाले. उतारवयात त्यांची दृष्टी गेली व १८० व्या वर्षी हेब्रॉन येथे त्यांचे निधन झाले व त्यांना आपल्या माता-पित्यांच्या शेजारीच दफनवले गेले. ज्यू लोक त्यांना आपला आदरणीय प्रेषित मानतात.

प्रेषित याकूब (अ.)

प्रेषित याकूब (अ.) यांच्या जन्मापूर्वीच त्यांच्या जन्माविषयीची भविष्यवाणी (११:७१ मध्ये) आलेली दिसते. प्रेषित इब्राहीम (अ.) यांच्या घरी पाहुणे आले होते. त्या पाहुण्यांचा आदरसत्कार करण्याच्या उद्देशाने इब्राहीम (अ.) यांनी त्यांना जेवणासाठी भाजलेले वासरू आणून त्यांच्या समोर ठेवले. "पण पाहुण्यांचे हात पुढे सरसावत नाहीत, तेव्हा त्यांना अनोळखी समजले व त्यांच्याकडून भीती जाणली. पाहुणे म्हणाले, भीती बाळगू नका. आम्हाला (अल्लाहने) लूत समाजाकडे पाठविले आहे आणि त्या (इब्राहीम) ची पत्नीदेखील उभी होती. ती हसली. तेव्हा आम्ही तिला इसहाक व इसहाकनंतर याकूबची खुशखबरी दिली." (११:७०-७१) हे पाहुणे दुसरे तिसरे कोणी नसून फरिश्ते होते, ज्यांना लूत समाजाच्या नाशासाठी पाठविले होते. त्यांनी जाताना इब्राहीम (अ.) यांना वरीलप्रमाणे ईशवाणी वर्तवली.

याकूब (अ.) हे ज्यूंचेच प्रेषित होते. इसौ शिकारी होते व म्हातारपणी आई-वडिलांना शिकारीचे मांस आणून देत याकूब (अ.) आपल्या वडिलांच्या व आज्याच्या वळणावर गेले होते.

सूरह 'मरयम' मधील ४९ व ५० आयतीत माहिती मिळते ती अशी, "मग जेव्हा तो (इब्राहीम (अ.)) त्यांच्यापासून (त्यांच्या पूर्वजांच्या उपास्यापासून), ज्यांना ते अल्लाहशिवाय पुकारीत होते वेगळा झाला तेव्हा आम्ही त्याला इसहाक व याकूब प्रदान केले आणि त्यांच्यापैकी प्रत्येकाला प्रेषित बनविले." (१९:४९)

"आणि त्यांना आपल्या कृपेने नवाजले व त्यांना खरा नावलौकिक प्रदान केला." (१९:५०) प्रेषित इब्राहीम (अ.) यांचे नातू याकूब यांचे दुसरे नाव इस्राईल होते त्यांच्यापासून बनी इस्राईलचा क्रम चालू झाला.

याकूब (अ.) यांनी आपला चुलता लबान यांची सेवा सात वर्षे केली व त्यानंतर लबान यांनी आणखीन तीन विवाह केले. त्यांना एकूण बारा मुलगे झाले व त्यांच्याच पुढे बनी इस्राईल यांच्या बारा जमाती झाल्या. याच यहुद्यांच्या बारा जमाती होत. राचेल पत्नीपासून त्यांना बिन यामिन व यूसुफ (अ.) हे दोन पुत्र झाले.

सूरह 'अल बकरा' मधील आयत १३२ व १३३ मध्ये याकूब (अ.) यांनी आपल्या मुलांना मृत्युशय्येवर असताना उपदेश केला, "आणि इब्राहीमनी याच मार्गावर आचरण करण्याचा उपदेश जाताना आपल्या मुलांना केला होता. आणि हाच अखेरचा आदेश याकूबनी आपल्या मुलांना दिला. 'माझ्या मुलांनो! अल्लाहने तुमच्यासाठी हाच 'दीन' (इस्लाम धर्म, इस्लामी जीवनपद्धती) निवडला आहे आणि म्हणून मरेपर्यंत तुम्ही मुस्लिमच राहा.' त्यांनी आपल्या मुलांना विचारले, 'माझ्यानंतर तुम्ही कोणाची भक्ती कराल?' त्यांनी उत्तर दिले, 'आम्ही आपले उपास्य आणि आपले वाडवडील इब्राहीम, इस्माईल व इसहाक यांचे उपास्य, जो एकच आहे, त्याची भक्ती करू आणि आम्ही त्याचेच आज्ञाधारक आहोत." (२:१३३) स्पष्ट जाणीव दिली आहे की, "पूर्वजांप्रमाणेच तुम्ही मुस्लिम बनून राहाल तरच तुम्हाला सुटका-मुक्ती मिळेल. नुसते त्यांचे नाव सांगून नाही."

याकूब (अ.) आपले पुत्र यूसुफ (अ.) यांच्याकडे इजिप्तला गेले व ते तेथेच त्यांच्याजवळ कायमचे राहिले. वयाच्या १४० व्या वर्षी त्यांचे निधन झाले व त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांना हेब्रॉन येथे दफनवण्यात आले.

कुरआन - ३८:४५ मध्ये म्हटले आहे, "इब्राहीम, इसहाक व याकूब यांचे स्मरण करा जे कार्यशक्ती बाळगणारे व दृष्टी बाळगणारे होते." याचा स्पष्ट अर्थ होतो की, इब्राहीम, इसहाक व याकूब हे डोळस दृष्टीने पाहात होते व घटनांचे अंतर्बाह्य दृष्टीने अवलोकन करीत आणि ज्ञान व अंतर्दृष्टीच्या प्रकाशात आपली वाटचाल करीत असत.

प्रेषित यूसुफ (अ.)

प्रेषित यूसुफ (अ.) यांचा वृत्तान्त सर्वोत्कृष्ट वृत्तान्त समजला जातो. यूसुफ यांच्या जीवनात कशी कशी वळणे आली व वेळोवेळी ईश्वराने त्यांना कसे मार्गदर्शन केले व त्यांनी आपल्या उच्च चारित्र्याने कसे आपले अद्वितीय स्थान निर्माण केले हे खरोखरच संस्मरणीय ठरले आहे. त्यांची सतूशीलता व जीवनात वेळोवेळी त्यांचे कठीण कसोटीस उतरणे याचे इतिहासात उदाहरण सापडणे कठीण आहे. त्यांच्या चरित्रात बोध व उपदेशाचे असंख्य पैलू दिसतात. त्यांचे चारित्र्य व त्याचे आलेले वर्णन आश्चर्यकारक व अचंबित करणारे आहे. 'यूसुफ' हा स्वतंत्र सूरह यांची सर्व हकीकत मांडतो.

प्रेषित यूसुफ (अ.) यांचा वृत्तान्त बायबलमध्ये आलेला आहे. (निर्मिती प्रकरण ३७ ते ५०) परंतु यात आलेली माहिती व कुरआनात आलेली माहिती यात फरक आहे. कुरआनात त्यांच्या जीवनाचे विविध पैलू वर्णीलेले दिसतात. त्यांची वंशपरंपरा अतिशय श्रेष्ठ होती. त्यांचे पणजोबा इब्राहीम (अ.), आजोबा प्रेषित इसहाक, वडील प्रेषित याकूब हे केवळ प्रेषितवंशाचे नव्हते तर त्या सर्वांना प्रेषितत्व प्राप्त झाले होते. प्रेषित मुहम्मद (स.) यांची या संदर्भात हदीस आली आहे ती अशी- ''ते स्वत: पण सभ्य होते व सभ्य पित्याचे पुत्रही होते. ते त्याचे आजोबा व पणजोबा दोघेही सभ्य होते. यूसुफ पिता याकूब पिता इसहाक पिता इब्राहीम.'' (अल् बुखारी किताबुत्तफसीर)

बायबलमध्ये प्रेषित यूसुफ (जोसेफ) यांची कथा आलेली आहे ती लोककथेसारखी आलेली आहे, ज्यात प्रामुख्याने बुद्धिमान आणि आर्थिक व्यवहारात हुशार असल्यामुळे इजिप्तमध्ये आपले वर्चस्व कसे निर्माण केले याचा उल्लेख आहे.

कुरआनात सावत्र भावांनी केलेला कट, यूसुफ (अ.) यांना कसे गुलाम म्हणून विकले गेले, पण स्वत: उच्च नैतिक वर्तनामुळे व स्वप्नांचा अर्थ जाणण्याच्या कसबांमुळे (जी त्यांना ईश्वरी देणगी होती) कसे उच्चपदावर पोहोचले व शासकीय उच्चाधिकारी म्हणून केलेले कार्य व पुन्हा आपल्या सावत्र भावांना, वडिलांना व कुटुंबियांना इजिप्तला आपल्याजवळ आणून उदार अंत:करणाने भावांचे दुष्कृत्य विसरून सर्वांशी प्रेमाने व ममतेने वागून आपलेसे करणारे व ईश्वराने जी दया व कृपा दाखविली त्याबद्दल ईश्वराची करुणा भाकणारे यूसुफ (अ.) यांची कुरआनात अगदी तपशीलवार माहिती आलेली आहे.

सूरह 'यूसुफ' मधील आयती १०० व १०१ मध्ये यूसुफ (अ.) म्हणाले, ''हे पिताश्री, हे फळ आहे माझ्या त्या स्वप्नाचे जे पूर्वी मी पाहिले होते. माझ्या पालनकर्त्याने स्वप्न साकार केले. त्याचे उपकार आहेत की त्याने मला तुरुंगातून बाहेर काढले आणि तुम्हा लोकांना ओसाड भागातून आणून मला भेटविले, वस्तुत: सैतानाने माझ्या आणि माझ्या भावांच्या दरम्यान बिघाड निर्माण केला होता. वस्तुस्थिती अशी आहे की माझा पालनकर्ता नकळत उपाययोजनेद्वारे आपले मनोरथ साकार करतो, नि:संशय तो सर्वज्ञ बुद्धिमान आहे. हे माझ्या पालनकर्त्या, तू मला राज्य प्रदान केले आणि मला गोष्टींच्या तळापर्यंत पोहचण्याचे शिकविले, पृथ्वी व आकाश बनविणाऱ्या तूच इहलोकात व परलोकात माझा वाली आहेस. माझा शेवट इस्लामवर कर आणि परिणामांती सदाचारींमध्ये सामील कर.'' (१२:१००-१०१)

यूसुफ (अ.) हे याकूब (अ.) यांचे पुत्र होत. याकूब (अ.) यांना चार पत्नी होत्या व एकूण बारा पुत्र होते. त्यातील बेंजामीन व यूसुफ (अ.) हे सख्खे भाऊ होते व दहा सावत्र भाऊ होते. बायबलमध्ये त्यांच्या ज्या भावाचे नाव बेंजामीन येते त्याचे इस्लामी परंपरेप्रमाणे नाव 'बिनआमिन' असे येते. यूसुफ (अ.) हे अतिशय देखणे असून सद्गुणी होते. त्यामुळे ते वडिलांचे अतिशय लाडके होते. त्यांचे सावत्र भाऊ त्यामुळे त्यांचा अतिशय द्वेष करीत असत.

सूरह 'यूसुफ' मधील चौथ्या आयतीत म्हटले आहे, "यूसुफ (अ.) आपल्या वडिलांना म्हणाले, मी स्वप्न पाहिले आहे की, अकरा नक्षत्रे (तारे) आहेत व सूर्य आणि चंद्र आणि ते मला सजदा करीत आहेत." उत्तरात पाचव्या आयतीत म्हटले आहे, "हे स्वप्न आपल्या भावांना सांगू नकोस अन्यथा ते तुला त्रासात टाकतील." याकूब (अ.) यांना स्वप्नाचा अर्थ कळला होता की सूर्य म्हणजे याकूब (अ.) चंद्र म्हणजे यूसुफ (अ.) त्यांची सावत्र आई व अकरा भाऊ म्हणजे अकरा नक्षत्रे (तारे). हे सर्व यूसुफ (अ.) समोर नतमस्तक होतील. एवढा यूसुफ (अ.) महान होईल.

सर्व सावत्र भाऊ यूसुफ (अ.) यांचा द्वेष करीत. त्यांनी एकदा यूसुफ (अ.) यांना ठार करण्याची योजना आखली. पण त्यांच्यातील काहींनी तसा विचार करू नये असे आपले मत मांडले. शेवटी त्यांनी एखाद्या अंध कुपात टाकण्याचे ठरविले. याकूब (अ.) यांचा इतर पुत्रांवर विश्वास नव्हता. शेवटी सर्व भावांनी आपल्या पित्याला यूसुफ (अ.) ना बरोबर घेऊन खेळायला जायची परवानगी मागितली व राना-वनात हिंडू, फिरू, मजा करू व लगेच परत येऊ. यूसुफ (अ.) ची सर्वतोपरी काळजी घेऊ, असे शपथेवर सांगितले व ते यूसुफ (अ.) यांच्याबरोबर बाहेर पडले.

खेळत हिंडत फिरत ते एका कोरड्या विहिरीपाशी गेले व त्यांनी यूसुफ (अ.) यांना तेथे नेले व त्यांनी त्यांना त्या विहिरीत ढकलून दिले. घरी सर्वांनी रडत रडत येऊन सांगितले की, आम्ही खेळत असताना यूसुफ (अ.) एकटे फिरत होते. त्यांना लांडग्याने खाल्ले. यूसुफ (अ.) यांचा सदरा ज्यावर त्यांनी रक्ताचे डाग पाडून आणलेले होते तो सदरा दाखविला व अतिशय ढोंगीपणे नक्राश्रू गाळू लागले. आपल्या मुलांनी काहीतरी काळेबेरे केले हे याकूब (अ.) यांनी जाणले. पण करणार काय? ते म्हणाले, "किंबहुना तुमच्या वासनेने तुमच्याकरिता एक मोठे काम सोपे केले. बरे संयम राखीन आणि चांगल्याप्रकारे संयम बाळगीन. जी गोष्ट तुम्ही रचत आहात त्यावर अल्लाहकडूनच मदत मागितली जाऊ शकते." (१२:११-१८) यात वरील सर्व गोष्टी येतात.

यूसुफ (अ.) यांनी त्या कोरड्या विहिरीतून वर येण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्यांना यश आले नाही. शेवटी निराश होऊन ते ईश्वरास या संकटातून सोडविण्यासाठी आळवू लागले. त्याच वेळी जवळून चाललेला व्यापारी काफिल्यातून एकजण पाणी काढण्यासाठी त्या विहिरीजवळ आला तेव्हा त्याला यूसुफ (अ.) दिसले व त्याने त्यांना बाहेर काढले. त्या व्यापाऱ्यांनी त्यांना आपल्याबरोबर (इजिप्तला) नेले. जेथे त्यांनी एका श्रीमंत उच्चपदस्थ माणसाला गुलाम म्हणून विकले. (सूरह यूसुफ २०-२१ सारांश)

यूसुफ (अ.) त्याच्या घरी सेवा करू लागले. ते अतिशय देखणे असल्यामुळे त्यांच्यावर लूब्ध होऊन त्यांच्या मालकिणीने त्यांना आपल्या मोहात पाडण्याचा प्रयत्न केला. पण आपल्या मालकाशी बेईमानी करण्यास त्यांनी नकार दिला व ते जाऊ लागताच त्यांच्या मालकिणीने त्यांना मागून ओढले. त्या ओढाताणीत त्यांचा सदरा मागून फाटला. त्याच वेळी त्यांचा मालक आला. तेव्हा मालकिणीने यूसुफ (अ.) यांच्यावरच आपल्याशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला असा आळ घेतला. पण मालकाच्या लक्षात सर्व आले. मागून फाटलेल्या सदऱ्याने त्यांचे निर्दोषत्व सिद्ध झाले. आपल्या पत्नीची बेअब्रू टाळावी म्हणून त्यांनी ती गोष्ट तेथेच निकालात काढली. सर्वांना चूप बसण्यास सांगितले. परंतु काही दिवसांनी ही गोष्ट सर्वत्र चर्चेचा विषय झाली. तेव्हा त्या बाईने आपल्या घरी सर्व आजूबाजूस राहणाऱ्या प्रतिष्ठित स्त्रियांना फराळासाठी बोलाविले. त्या बाया जमल्या. त्याच्यासमोर तिने विविध फळे आणून ठेवली व प्रत्येकीस फळांबरोबर ती फळे कापण्यासाठी सुऱ्या दिल्या. आधी ठरल्याप्रमाणे यूसुफ (अ.) यांनी त्या दालनात अचानक प्रवेश केला. त्यांना पाहताच त्यांच्या आकर्षक व देखण्या रूपाने आश्चर्यचकित झालेल्या स्त्रियांनी फळे कापत असताना आपली बोटे कापून घेतली. तेव्हा मालकीण म्हणाली, "हाच तो आहे ज्याच्याबद्दल व माझ्याबद्दल लोक चर्चा करीत आहेत." (सूरह यूसुफ - ३१-३२)

त्या स्त्रियांना यूसुफ (अ.) यांच्याबद्दल वाटणारे आकर्षण त्या सर्व उच्चभ्रू समाजात अस्वस्थता निर्माण करणारे ठरले. त्याच वेळी या लैंगिक मोहापासून वाचव म्हणून यूसुफ (अ.) यांनी ईश्वराची प्रार्थना सुरू केली. (सूरह यूसुफ - ३३) त्या लोकांनी यूसुफ (अ.) निर्दोष असल्याचे जाणूनही त्यांना तुरुंगात टाकले. तुरुंगात पडल्यामुळे या स्त्रियांच्या उपद्रवापासून आपण बचावलो असे त्यांना वाटले.

त्यांच्याबरोबर तुरुंगात असलेल्या दोन कैद्यांनी त्यांना पडलेल्या स्वप्नांना अर्थ विचारला. त्यातील एकास स्वप्नात आपण दारू गाळत व वाटत असल्याचे दिसले. तर दुसऱ्यास आपण भाकऱ्याची टोपली डोक्यावर घेऊन जात आहोत व पक्षी खात आहेत

याचा आम्हाला अर्थ सांगा. यूसुफ (अ.) यांनी पहिल्याला, "तुला दरबारात राजास मद्य पाजण्याचे काम मिळेल" व दुसऱ्याला, "तुला सुळावर दिले जाईल." असे भाकित सांगितले. ती भविष्यवाणी खरी ठरली. (सूरह यूसुफ-४१) पहिल्याला "तू बाहेर आल्यावर राजाला माझ्या मुक्ततेबद्दल सांग" असे सांगितले. पण तो निसटला. पुढे राजाने दरबाऱ्यांना त्याला पडलेल्या स्वप्नांचा अर्थ विचारला. ज्यात त्याला सात रोडक्या गायी सात धष्टपुष्ठ गायींना खाऊन टाकताना दिसल्या. तर सात हिरवीगार धान्याची कणसे आणि सात सुकलेली कणसे दिसली. पण त्याचा अर्थ कोणा दरबाऱ्याला सांगता येईना. दरबारात मद्य वाटणाऱ्याला (१२:४५) यूसुफ (अ.) यांची आठवण झाली व त्याने राजाला यूसुफ (अ.) यांना सांगता येईल असे सांगितले. तो कारागृहात गेला व त्यांना भेटला. त्यांनी त्याचा अर्थ सांगितला. "येणारी सात वर्षे निरंतर उत्तम कृषी उत्पन्न येईल. तेव्हा तुम्ही खाण्यापुरते धान्य खर्च करा व बाकीचे तसेच कणसात राहू द्या. पुढील सात वर्षे टंचाईची येतील. त्या काळात हे साठवलेले धान्य तुम्हास उपयोगी पडेल. त्यानंतर एक वर्ष असे येईल ज्यात लोकांकरिता वर्षा लाभदायक ठरेल व ते रस पिळतील." (१२:४७-४९)

बादशाहाने हा अर्थ समजल्यावर 'या कैद्याला माझ्याकडे आणा' असे फर्मावले व त्यांना आणण्यास अधिकारी पाठविला. तेव्हा 'यूसुफ (अ.) आणि ज्या स्त्रियांनी आपले हात कापून घेतले त्यांचा काय मामला आहे?' असे विचारले. राजाने त्या स्त्रियांकडे विचारणा केली. त्यांनी 'यूसुफ (अ.) निर्दोष आहेत' असा निर्वाळा दिला व त्यांच्या मालकाच्या पत्नीने आपणच दोषी असल्याचे कबुल केले. त्यामुळे यूसुफ (अ.) यांचे चारित्र्य निर्मळ आहे हे सिद्ध झाले. (१२:५०-५२) राजाने त्यांना इभ्रत दिली व (१२:५४-५५) प्रमाणे त्यांना संपूर्ण राज्याचे पुरवठा खाते सोपविले.

नेकीने काम करणारा व शासन आणि जनता यांच्या हिताला बाधा येऊ न देता कार्यतन्मयतेने काम करणारा म्हणून त्यांचा लौकिक पसरला व ते यशस्वी कोठाराध्यक्ष ठरले.

पुढे पॅलेस्टाईन भागात दुष्काळ पडला. इजिप्तमध्ये स्वस्त भावात धान्य मिळत असल्यामुळे त्यांचे सावत्र भाऊ धान्यासाठी तिथे आले. यूसुफ (अ.) यांनी आपल्या भावांना ओळखले. पण त्यांना ओळख न देता धान्य दिले. पण 'यापुढे तुमच्या धाकट्या भावास बरोबर आणले तरच धान्य मिळेल नाहीतर धान्य मिळणार नाही' असे बजावले. भाऊ घरी गेले व धान्याच्या थैल्या उघडून पाहिल्या तर आश्चर्यचकित झाले. कारण धान्याबरोबर त्यांनी दिलेले पैसे परत केलेले आढळले. त्यांनी ईश्वराला

वास्ता देऊन धाकट्या भावाला बरोबर घेऊन जाण्याची वडिलांजवळ परवानगी मागितली. पूर्वीच्या अनुभवावरून त्यांचे वडील त्यांच्याबरोबर लहान पुत्रास पाठवण्यास तयार नव्हते. शेवटी इतर मुलांनी अल्लाहची शपथ घेऊन त्यांची खात्री पटवली तेव्हा त्यांनी परवानगी दिली. त्यांचे सावत्र भाऊ धाकट्या भावाला बरोबर घेऊन यूसुफ (अ.) जवळ आले. त्यांनी आपल्या सख्ख्या भावाला जवळ ठेवून घेतले व यूसुफ (अ.) यांनी धाकट्या भावाच्या पिशवीत एक चांदीचा पेला लपविला व ते सर्व जाण्यास निघाले तेव्हा चांदीचा पेला यूसुफ (अ.) यांच्या भावाच्या सामानात निघाला म्हणून त्याला तेथेच थांबवून ठेवले व ते भयंकर घाबरले. तेव्हा यूसुफ (अ.) यांनी 'आपणच यूसुफ (अ.) आहोत ज्याला तुम्ही विहिरीत ढकलून दिले होते. तोच मी आहे' हे सांगितले. तेव्हा ते सर्वजण फार खजिल झाले. आपला सदरा त्यांच्याजवळ घेऊन घरी गेल्यावर आपल्या अंध पित्याच्या तोंडावर तो सदरा टाकण्यास सांगितले.

बाकीचे सर्व सावत्र भाऊ पुन्हा इजिप्तला परतले. धाकटा भाऊ त्यांच्याजवळच राहिला. हे भाऊ इजिप्तला पोहचल्यावर त्यांनी सर्व हकीकत वडिलांना सांगितली व यूसुफ (अ.) यांचा सदरा वडिलांच्या तोंडावर टाकला. त्याबरोबर याकूब (अ.) यांची गेलेली दृष्टी परत आली व म्हणू लागले, "या सदऱ्याला यूसुफचा गंध येतो आहे." खडतर प्रवास करून ते इजिप्तला आले. वडिलांची व त्यांची भेट अनेक वर्षांनंतर झाली. यूसुफ (अ.) यांनी आपल्या भावांना उदार अंत:करणाने क्षमा केली व त्यांच्यासह आनंदाने एकत्र राहू लागले.

यूसुफ (अ.) यांना पडलेले स्वप्न (१२:१००) अशा रीतीने परिपूर्ण झाले. ही सर्व हकीगत सूरह यूसुफ (अ.) कुरआनमध्ये आलेली आहे.

यूसुफ (अ.) अत्यंत आकर्षक व देखण्या व्यक्तिमत्त्वाचे होते व तितकेच उच्च चारित्र्याचे होते. ते प्रामाणिक व नैतिक मूल्ये जपणारे होते. त्यांचे नैतिक मूल्यांची जपणूक व संयम हे खरोखरीच मार्गदर्शन ठरणारे आहे.

प्रेषित शुऐब (अ.)

शुऐब (अ.) हे प्रेषित इब्राहीम (अ.) यांच्यापासून चौथ्या पिढीतील होते. त्यांची आई ही प्रेषित लूत (अ.) यांची मुलगी होती.

बायबलच्या निवेदनानुसार प्रेषित इब्राहीम (अ.) यांची दासी कतूरा होती व तिच्यापासून जो मुलगा झाला होता तो मदयान होता, ज्यास त्यांनी मदयनच्या इलाक्यात वसविले व त्याच्या नावाने हा इलाका ओळखला जाऊ लागला. प्रेषित शुऐब

(अ.) त्याच वंशाचे होते. यात 'मदयन' असा जो उल्लेख आला आहे तो मूळ प्रदेश 'हिजाज'च्या वायव्य दिशेस आणि पॅलेस्टाईनच्या दक्षिणेस तांबडा समुद्र व अकबा खाडीच्या किनारी स्थित होता. परंतु सीना द्विपकल्पाच्या पूर्व किनारपट्टीवरदेखील याचा काही भाग पसरला होता. मदयनवासी मोठे व्यापार-व्यवसायी होते. प्राचीन काळी तांबड्या समुद्राच्या किनारी यमेनहून मक्का आणि यनाबुवरून सीरियापर्यंत जो व्यापारी राजमार्ग होता, तसेच इराकपासून इजिप्तकडे जो व्यापारी राजमार्ग जात असे ते एकमेकांना मिळतात. तेथेच या लोकांच्या वस्त्या होत्या. येथील जमीन अत्यंत सुपीक होती. त्यामुळे हे लोक सधन व समृद्ध जीवन जगत होते.

पवित्र कुरआनात प्रेषित शुऐब (अ.) यांचा उल्लेख 'सूरह अल आअराफ', 'सूरह हूद' व 'सूरह अश शुअदा' यांत आलेला आहे. सूरह अल आअराफ मधील आयत ८५ मध्ये अशी माहिती येते - "आणि मदयनकडे आम्ही त्यांचा भाऊ शुऐबला पाठविले. तो म्हणाला, हे माझ्या जनसमूहाच्या लोकांनो! अल्लाहची उपासना करा. त्याच्याखेरीज तुमचा कोणीही ईश्वर नाही, तुमच्याजवळ तुमच्या पालनकर्त्यातर्फे स्पष्ट प्रमाण आले. जेव्हा माप व तोल पुरेपूर करा. लोकांना त्यांच्या वस्तू घटवून देऊ नका आणि जमिनीवर तिच्या सुधारणेनंतर उत्पात माजवू नका. हे तुमच्यासाठी अधिक चांगले आहे, जर तुम्ही श्रद्धा बाळगणारे असाल."

शुऐब जनसमूहाचा वृत्तान्त आयत ८५ ते ९३ पर्यंत सूरह 'आअराफ' मध्ये आलेला आहे. तसेच सूरह 'हूद' मध्ये आयत ८४ ते ९५ मध्ये सविस्तर वृत्तान्त आलेला आहे.

सूरह 'आअराफ'च्या आयतीत (८५ ते ९३) म्हटले आहे की मदयनचे लोक अपराधी वृत्तीचे होते. ते टपून बसत व एखाद दुसरा वाटसरू दिसताच त्याला धाकदपटशा दाखवून लुटत. मदयनचा वंश सुरुवातीला छोटासा होता. त्याने एका मोठ्या कबिल्याचे व जातीसमूहाचे स्वरूप धारण केले. त्याबद्दल ईश्वराचे आभार मानायचे सोडून त्यांनी कृतज्ञता व्यक्त न करता कृतघ्न झाले. शुऐब (अ.) यांनी एकेश्वरत्वावर श्रद्धा ठेवण्याचा उपदेश केला. त्यांच्या जनसमूहातील सरदारांनी व श्रीमंतांनी आपल्या कबिल्याचा धर्म सोडून जर एकेश्वरत्व मानू लागले तर त्यांना कबिल्यातून हाकलून देण्याची धमकी दिली. शुऐब (अ.) यांच्या मार्गाने जाणारे नाश पावतील असे म्हणू लागले. शुऐब (अ.) यांनी ईश्वराने योग्य निर्णय घ्यावा अशी अल्लाहजवळ याचना केली. तेव्हा थरकाप उडविणाऱ्या आपत्तीने त्यांना घेरले व शुऐब (अ.) व त्यांचे साथीदार, जे तेथून निघून गेले ते वाचले व बाकीचे अशा रीतीने नष्ट झाले की जणू ते तेथे कधी वसलेच नव्हते.

सूरह 'हूद' मधील आयत क्र.८४ ते ९५ मध्ये माहिती मिळते की मदयनकडे त्यांचे बंधु शुऐब यांना पाठविले. त्यांनी 'योग्य तोल-माप करा, एकाच ईश्वराची उपासना करा, दुसरा कोणी पालनकर्ता नाही' अशी शिकवण दिली. त्यांच्या जनसमूहातील धनदांडग्यांनी शुऐब (अ.) यांना 'आम्ही आमची संपत्ती वाढवण्याचा आम्हाला अधिकार नाही का? तुम्ही कमजोर माणूस आहात. जर तुमच्या बिरादराची माणसे नसती तर तुम्हाला ठार केले असते. तुमची आमच्यासमोर ताकद ती काय?' असे घमेंडीने म्हणाले. त्यावर शुऐब म्हणाले, 'तुम्ही माझ्या बिरादरीच्या भीतीने माझ्याविरुद्ध पाऊल उचलण्यास घाबरला. पण अल्लाहचे भय तुम्हाला वाटले नाही. तुम्ही माझा कबिला तुमच्या दृष्टीने अल्लाहपेक्षा अधिक प्रकोपी व प्रभुत्वशाली समजता काय?' शेवटी शुऐब यांनी त्यांच्या जनसमूहास 'तुमचे काम तुम्ही करा, माझ्याबरोबर माझा पालनकर्ता आहे,' असे सांगितले. काही काळातच शुऐब व त्यांच्या साथीदारांना सुखरूप बाहेर पाठविले व अचानक मोठा आवाज झाला व इतर समूहांप्रमाणे हा समूह आपल्या जागीच नष्ट केला गेला.

शुऐब जनसमूहाचे अवशेष आजही अस्तित्वात आहेत. जो राजमार्ग हिजाजहून सीरिया व पॅलेस्टाईनला जातो. घनदाट वृक्षवाले (ऐकावाले) व लूत जनसमूहाच्या वस्त्या पडतात व त्यांचे अवशेष आजही दिसतात.

यानंतर शुऐब (अ.) यांना 'ऐका' या भागातील लोकांना सुधारण्यासाठी पाठविले गेले. 'ऐका' घनदाट वृक्षांना म्हणतात. मदयनजवळचा इलाका घनदाट वृक्षांनी व्यापलेला होता. त्यात शुऐब यांचा जनसमूह वसत होता. म्हणून या जनसमूहास 'ऐकावाले' म्हटले गेले. (१५:७८-७९) तेव्हा आम्ही त्यांनादेखील शिक्षा दिली आणि या दोन्ही वस्त्या आजदेखील राजमार्गावर अस्तित्वात आहेत. कुरआनात 'ऐका' यांचा उल्लेख चार वेळा आला आहे. २६:१७६-१९१, ३८:१३-१४ आणि ७:८५-९३. काही भाष्यकारांच्या मते 'ऐका' हे गावाचे नाव असावे अथवा एखाद्या भूभागाचे नाव असावे किंवा हे लोक मदयनवासीयांतील एखादा गट असावा. त्यांना इंग्रजीत 'कम्पॅनियन्स ऑफ वूड' म्हटलेले आहे.

सूरह 'अशशुअरा'त १७६ ते १९३ यात त्यांच्याविषयी आलेला गोषवारा असा आहे. ''खऱ्या तराजूने वजन करा, लोकांना वस्तू कमी देऊ नका, पृथ्वीतलावर उपद्रव माजवत फिरू नका आणि त्या अस्तित्वाचे भय बाळगा ज्याने तुम्हाला व तुमच्यापूर्वी ज्यांना निर्मिले आहे. मी फक्त अल्लाहचे संदेश पोहचविणारा आहे व त्याबद्दल मी कोणाकडून कशाचीही अपेक्षा करीत नाही.''

ऐकावाल्यांनी शुऐब (अ.) यांना "तू जादूपीडित इसम आहेस, तू आमच्यासारखाच एक सामान्य माणूस आहेस, आम्ही तर तुला खोटा समजतो." अशारीतीने त्यांनी प्रेषितालाच खोटे ठरविले व म्हणाले, "जर तू प्रेषित आहेस तर आणून दाखव तुझ्या निर्मात्याकडून आमच्यावर त्याचा प्रकोप."

शेवटी अल्लाहने एक ढग त्यांच्याकडे पाठविला व तो छत्रीसमान तोपर्यंत अच्छादीत राहिला व त्यातून वीजेचे लोळ त्यांच्यावर कोसळले व ते नष्ट झाले.

मदयनवासीयांच्या व ऐकावाल्यांच्या विनाशानंतर शुऐब (अ.) हे हादरामाउत येथे स्थायिक झाले व त्यांना तेथेच दफनवण्यात आले. त्यांच्या कबरीच्या दर्शनासाठी आजही बरेच लोक जातात. (ज्यूंच्या ग्रंथातील माहिती व कुरआनात आलेली माहिती यात तफावत आहे.) कुरआनची माहिती मात्र विश्वसनीय आहे. ते ओजस्वी वाणीने आपले म्हणणे मांडून त्यांचा उल्लेख 'खातिबुल अंबिया' म्हणजे 'प्रेषितांचा उपदेशक' असा केला आहे.

प्रेषित दाऊद (अ.)

दाऊद (अ.) हे इस्राईलींच्यासाठी अल्लाहने नियुक्त केलेले प्रेषित होते. ते याकूब (अ.) यांच्या वंशातील असून बैत-उल-लाहमचे रहिवासी होते. हे जेरुसेलमपासून १६ किलोमीटर अंतरावर वसलेले होते. दाऊद (अ.) अतिशय देखणे व आकर्षक व्यक्तिमत्त्वाचे होते. त्यांना पाहणारा त्यांना पाहताच प्रभावित होत असे. दाऊद (अ.) हे तंतूवाद्य वाजवण्यात अत्यंत निपूण होते. ते आपल्या वडिलांना मेंढपाळीच्या कामातही मदत करीत असत. तालूत या इस्राईलींच्या राजाने त्यांना तंतूवाद्य वाजवण्यासाठी नियुक्त केले होते. त्यामुळे ते राजा तालूतच्या निकट सहवासात आले, अशी माहिती तौरात ग्रंथात आली आहे.

एकदा पॅलेस्टीनी व इस्राईली यांच्यात युद्ध झाले. पॅलेस्टीनींचा नेता जालूत हा बलवान, शस्त्रास्त्रांनी सज्ज व अतिशय बलाढ्य योद्धा होता. त्याच्यासमोर आपला निभाव लागणार नाही असे इस्राईली राजा तालूतला वाटत होते. त्यावेळी जालूतने गर्जना केली "इस्राईलींनो लढायला तयार व्हा, जर मला कोणी हरवले तर मी त्याच्या पुढे शरणागती घेईन, पण जर तुम्ही हरलात तर मात्र माझ्या वर्चस्वाखाली तुम्हाला गुलामीचे जीवन जगावे लागेल. असेल हिंमत तर पुढे या." त्याच्या आवेशाने व दरारायुक्त भाषेने गळीतगात्र होऊन इस्राईलींचे आवसान गळून उभे राहिले. प्रेषित दाऊद (अ.) यांना जालूतचा उद्दापपणा सहन झाला नाही. तालूतने (राजाने) कितीही विनविले तरी न

डगमगता जालूतवर चालून गेले. शत्रुला तुच्छ लेखीत जालूतने दाऊद (अ.) यांच्याकडे तिरस्काराने दृष्टिक्षेप टाकून आपल्या देव-देवतांचा जयघोष करीत दाऊद (अ.) यांच्यावर हल्ला चढविला. परंतु दाऊद (अ.) यांनी त्याच्याकडे दुर्लक्ष करून प्रतिआघात करून जालूतला ठार केले. जालूत मारला गेला पाहताच पॅलेस्टीनी सैरावैरा पळू लागले व दाऊद (अ.) यांचा मोठा विजय झाला. सूरह अल बकराच्या आयत २४९ ते २५१ मध्ये म्हटले आहे, "इस्राईलींनी दाऊद (अ.) यांचा जयजयकार केला. कारण त्यांच्या शौर्यामुळे व धैर्यामुळे ते फार मोठ्या निर्भर्त्सनेतून वाचले होते."

बायबलमध्ये माहिती मिळते की, "दाऊदने जालूतला ठार केले. जालूत हा एक पॅलेस्टीनी पैलवान होता. तो पॅलेस्टीनी सैन्याचा प्रमुख सेनापती होता. तो सदृढ असून लढण्यात निपूण होता." बायबलमध्ये त्याचे नाव Goliath असे म्हटले आहे. (१ शमुवेल १७:४५-५१) यात म्हटले आहे की दाऊदने गोफण गुंड्याने जालूतच्या कपाळावर मारलेला धोंडा घुसला व तो पडला. त्याबरोबर दाऊदने त्याचीच तलवार घेऊन त्याचे शीर कापले व मोठा विजय मिळविला."

तालूतने दाऊद (अ.) ना आपली कन्या दिली व त्यांना आपला सरसेनापती केले. त्याबरोबर त्यांच्या वाढत्या प्रभुत्वामुळे तालूत भयभीत झाला. दाऊद (अ.) यांनी त्याला अनेकदा निश्चिंत राहण्यास सांगितले. तालूतला त्याच्या शत्रुंनी घात करून ठार केले व तालूतच्या मुलाने आत्महत्या केली. तेव्हा लोकांनीच दाऊद (अ.) यांना आपला राजा बनविले. ही माहिती (१ शामुवेल १७:४५-५१) मध्ये येते.

दाऊद (अ.) यांनी मोठा राज्यविस्तार केला. लोकांचे नैतिक जीवन उंचावले व उत्तम प्रशासन देऊन आपल्या राज्याची भरभराट केली. आपल्या शस्त्रास्त्रात सुधारणा केली. लोखंडी कड्यांचे चिलखत बनविले. ज्याचा उल्लेख सूरह 'अंबिया' मध्ये आला आहे. तसेच सबा या सूरहमध्ये आला आहे. त्यांना पशु-पक्ष्यांची भाषा अवगत होती.

दाऊद (अ.) यांच्याविषयी खालील आयती कुरआनात आलेल्या आहेत.

"दाऊदला आम्ही आपल्या कृपेने उपकृत केले, जेव्हा ते एका शेताच्या तंट्यात फैसला करीत होते, ज्यात एका गटाच्या शेळ्या रात्री सुटल्या होत्या आणि आम्ही त्यांच्या निर्णयास पाहात होतो." (कुरआन - २१:७८)

"आम्ही दाऊद व सुलेमान यांना ज्ञान प्रदान केले होते. आणि ते आम्ही अल्लाहचे कृतज्ञ आहोत म्हणू लागले ज्याने आम्हाला इतरांवर जे श्रेष्ठत्व प्रदान केले याबद्दल." (कुरआन - २७: १५)

"आम्ही दाऊदला आपल्या जवळून कृपाप्रसाद केला होता. पर्वतांनो तुम्हीदेखील त्याच्यासोबत ईशस्तवनात प्रतिध्वनी देणारे व्हा आणि हाच आदेश आम्ही पक्ष्यांनादेखील दिला होता आणि आम्ही त्याच्याकरिता लोखंडास नरम केले होते. यासाठी की परिपूर्ण चिलखते बनवा आणि त्यांच्या कड्या ठीक ठीक अनुमाने राखा आणि सर्व सतकृत्य करा जे काही तुम्ही कराल ते आम्ही पाहात आहोत." (कुरआन - ३४:११)

"दाऊद आपल्या विशिष्ट स्वरात ईशस्तवन करीत तेव्हा पर्वतातूनही तेच बोल निघत, पक्ष्यांचे थवेच्या थवे येत व ईशस्तवनात तल्लीन होत. त्याने मजबूत राज्य स्थापले व परिणामी राज्यविस्तार वाढला. मेंढ्याच्या खटल्याची कैफियत, महान चारित्र्य, आदर्श राजसत्तेचा स्वामी, त्यांची निष्ठा, प्रामाणिक ईशभय, आपल्या कामाचे कठोर आत्मपरीक्षण करीत व चुकांबद्दल पश्चात्ताप व ईशक्षमा-याचना करीत, न्यायपूर्ण व सदाचारावर आधारित राज्यशासन व्यवस्था होती. त्यांचे सर्व निवाडे न्यायाधिष्ठित असत." (कुरआन - ३८:१८-२६)

वरील सर्व माहिती या आयतींमध्ये सविस्तर आली आहे ती थोडक्यात मांडली आहे.

अत्यंत सत्शील, शूर व राज्यशासन चालविण्यात निपूण व त्याचवेळी प्रेषितत्व प्राप्त झालेले दाऊद (अ.) यांचे निधन वयाच्या सत्तराव्या वर्षी झाले. त्यांची जेरूसेलम येथे मजार आहे. इस्राईलच्या राष्ट्रध्वजावर एक तारा आहे त्याला 'स्टार ऑफ किंग डेव्हीड' असे म्हणतात. इस्राईलीपैकी एक प्रतिष्ठित व प्रभुत्वशाली दाऊद (अ.) हे खलीफा होते व प्रेषितही. त्यांच्यावर जबूर हा ग्रंथ अवतरित झाला. पण आज 'जबूर' ग्रंथ अस्तित्वात नाही.

प्रेषित सुलेमान (अ.)

माननीय सुलेमान प्रेषित होते. त्यांचा काळ इ. स. पूर्व दहाव्या शतकाचा होता. त्यांचे साम्राज्य फार मोठे व भव्य होते. हे साम्राज्य त्यांना अल्लाहच्या विशेष कृपेने लाभले होते. अल्लाहने हवा, पक्षी व जिन्नांना त्यांच्या नियंत्रणाखाली दिले होते. त्यांनी केलेली भव्य कामे केवळ धार्मिक उद्दिष्टांसाठी होती. त्यांनी स्वच्छ व शुद्ध साधनांचा अंगीकार केला होता. अल्लाहच्या खास कृपेने त्यांना असामान्य सामर्थ्य लाभले होते. परंतु पुढील काळात काही उपद्रवी लोकांनी त्यांना ज्या विशेष शक्ती लाभल्या होत्या त्या जादू व अमलियातद्वारे लाभल्या होत्या असा उल्लेख केलेला आढळतो. सूरह 'अल बकरा' मधील आयत १०२ जर आपण विचारपूर्वक वाचली तर उपद्व्यापी लोकांनी मांडलेली माहिती किती फोल आहे, हे स्पष्ट होते.

"आणि दाऊद व सुलेमानलाही (आम्ही आपल्या कृपेने) उपकृत केले होते."

(कुरआन - २१:७८)

प्रेषित दाऊद (अ.) हे प्रेषित याकूब (अ.) यांच्या वंशातील होते. त्यांचा काळ इ. स. पूर्व दहाव्या शतकाचा समजा जातो. ते प्रेषित होते व खलीफादेखील. त्यांच्यावर जबूर ग्रंथ अवतरित झाला होता. प्रेषित सुलेमान हे प्रेषित दाऊद यांचे पुत्र होते. प्रेषितपदाबरोबरच त्यांनी आपले भव्य दिव्य प्रशासन प्रदान केले होते.

"सुलेमानला आम्ही सामंजस्य प्रदान केले व बुद्धीकौशल्य व ज्ञान प्रदान केले."

(कुरआन - २१:७९)

यात स्पष्टपणे म्हटले आहे की सुलेमानला सामंजस्य, बुद्धीकौशल्य व ज्ञान प्रदान केले होते.

"आणि आम्ही सुलेमानकरिता जोराच्या वाऱ्यास त्याच्या आधीन केले होते, जो त्याच्या आदेशाने त्या भूमीकडे वहात होता." (कुरआन - २१:८१)

सुलेमान (अ.) यांच्या ताब्यात समृद्ध भूमी म्हणजे पॅलेस्टाइन व सीरियाचा इलाका होता. सुलेमान यांच्यावर सर्वश्रेष्ठ अल्लाहने एक विशेष कृपा केली होती ती म्हणजे सोसाट्याच्या वाऱ्याला त्यांच्या सेवेत लावले होते. त्यांचा प्रवास वेगाने व्हावा हा त्यात उद्देश होता. बहुतेक भाष्यकार मानतात की सुलेमान (अ.) या वेगवान वाऱ्यामुळे ते जेथे पाहिजे तेथे त्वरीत जात असावेत. त्याचे निश्चित स्वरूप काय असावे ते फक्त अल्लाहलाच ज्ञात आहे.

"आणि सैतानांपैकी काही असे जे त्याच्याकरिता समुद्रात सूर मारीत व याखेरीज इतर कामेही करीत त्यांच्यावर देखरेख ठेवणारे आम्हीच होतो."

(कुरआन - २१:८२)

याचा अर्थ काही बंडखोर जिन्नांना त्यांच्या ताब्यात दिले होते जे सागरातून मौल्यवान मोती, प्रवाळ त्यांच्यासाठी काढून आणीत. मोठमोठ्या शिला व दगड उचलून आणून त्यांच्याकडून भव्यदिव्य इमारती बांधून काढीत. या मिळालेल्या असामान्य देणगीमुळेच सुलेमान (अ.) यांनी बैतुल मक्दीसची (मसजिद अक्साची) उभारणी करून घेतली. युद्धविषयक गरजांची पूर्तता त्यांच्याकडून करून घेत. बनी इस्राईलचा काळ सुवर्णकाळ होता. सुलेमान यांनी व्यापक इस्लामी साम्राज्य निर्माण केले.

कुरआनातील सूरह 'अन् नम्ल' मधील आयत १५ ते ४४ मध्ये खालील माहिती मिळते.

"आम्ही दाऊद व सुलेमान यांना ज्ञान प्रदान केले, ते म्हणाले, आम्ही अल्लाहशी कृतज्ञ आहोत. त्याने आम्हाला आपल्या असंख्य श्रद्धा बाळगणाऱ्या दासांवर (प्राधान्य दिले) श्रेष्ठत्व प्रदान केले आणि दाऊदचा वारसदार सुलेमान झाला, त्याला पक्ष्यांची बोली शिकवली गेली आहे आणि सुलेमानकरता त्याचे लष्कर जे जिन्न, मनुष्य व पक्ष्यांपैकी होते, जमा केले गेले होते व पंक्तीबद्ध केले जात होते. सुलेमान यांचे सैन्य जेव्हा मुंग्यांच्या खोऱ्यात पोहचले तेव्हा एक मुंगी म्हणाली, मुंग्यांनो बिळांत शिरा नाहीतर सुलेमानच्या फौजेच्या पायाखाली तुडवल्या जाल. सुलेमान यांनी हे ऐकले तेव्हा अल्लाहची प्रार्थना केली की, "मला सुबुद्धी प्रदान कर की मी तुझ्या अनुग्रहाबद्दल कायम कृतज्ञ राहावे व मला सदाचारी दासांमध्ये सामील कर." त्यांना पक्ष्यांचीही भाषा समजत होती. त्यांच्याजवळ असलेल्या हुदहुद पक्ष्याने सबा राणीच्या राज्याबद्दलची सर्व माहिती त्यांना दिली. सबा भागावर एक राणी शासक होती व ती अतिशय हुशार असून तिचे सिंहासन मोठे वैभवशाली आहे. ती व तिची प्रजा सूर्योपासक आहे. तेव्हा सुलेमान यांनी एक पत्र त्या राणीकडे पाठविले व त्यात "त्यांच्याविरुद्ध बंड न करता मुस्लिम होऊन माझ्याजवळ राहा." असे म्हटले. तिने आता त्या बाबतीत तिच्या दरबाऱ्यांचा सल्ला मागितला. तिचे योद्धे युद्ध करावे म्हणू लागले. पण राणी चतुर होती. तिच्या मते युद्धामुळे प्रजेची अपरमीत हानी होईल, असा विचार मांडला. सुलेमानकडे नजराणा देऊन आपला दूत पाठविला. सुलेमाननी नजराणा परत पाठविला, "माझे सैन्य जर चालून आले तर तुम्ही पार धुळीस मिळाल." त्यांच्याजवळील अतिशय शक्तिशाली जिन्नाने सबा राणीचे सिंहासन क्षणार्धात आणून सुलेमान समोर ठेवले व "हे तुझेच सिंहासन आहे का" म्हणून विचारले. तीही संभ्रमात पडली. राणी त्यांच्या दरबारात आली. तेथील जमीन आरसपाणी होती. त्यामुळे ती पाण्याप्रमाणे भासली व त्यात आपले कपडे भिजू नयेत म्हणून तिने आपले पायावरील कपडे वर ओढले. पण ते पाणी नसून ती आरसपाणी जमीन असल्याचे सांगितले, तेव्हा ती आचंबित झाली व तिने आपण आपल्या म्हणण्याप्रमाणे सर्व विश्वाच्या स्वामीसमोर नतमस्तक आहोत म्हणून सांगितले आणि सुलेमान यांच्याकडून ईशमार्गदर्शन स्वीकारले."

कुरआनातील सूरह 'सबा' मधील आयत १२ ते १४ सुलेमान (अ.) बद्दल महत्त्वापूर्ण माहिती आलेली आहे, ती अशी -

"आणि वाऱ्याला आम्ही सुलेमानच्या अधीन केले. त्याचे प्रात:कालीन चालणे ही महिनाभर (अंतराचे असे) आणि त्याचे संध्याकालीन चालणेही (महिनाभर) अंतराचे

असे. आणि आम्ही त्यांच्याकरिता तांब्याचा झरा प्रवाहित केला आणि असे जिन्न त्याच्या ताब्यात दिले जे आपल्या पालनकर्त्याच्या आदेशाने त्यांच्या पुढ्यात कामे करीत. त्यांच्यापैकी जो आमच्या आज्ञेचे उल्लंघन करीत असे, त्याला आम्ही धगधगत्या आगीच्या गोडी चाखवीत असत. ते त्याच्याकरिता बनवीत असत जे काही तो इच्छित असे. इमारती, चित्रे, मोठमोठ्या हौदासारख्या पराती आणि आपल्या जागी स्थिर राहणाऱ्या वजनदार डेगी. हे दाऊदच्या वंशजानो, कृतज्ञतेसह आचरण करा आणि माझ्या दासांमध्ये कमीच लोक कृतज्ञशील आहेत. मग जेव्हा आम्ही त्याच्या मृत्युचा आदेश लागू केला तेव्हा त्यांना त्यांच्या मृत्युपासून पूर्वसूचना देणारी गोष्ट फक्त जमिनीचा कीडा होता, जो त्याच्या लाठीला खात होता. जेव्हा सुलेमान खाली कोसळला तेव्हा जिन्नांनाही ही गोष्ट स्पष्ट कळाली की, जर ते अपरोक्ष जाणत असते तर या अवमान संकटांत पडून राहिले नसते.''

सुलेमान (अ.) यांचा मृत्यू चमत्कारिकरीत्या झाला. आपल्या काठीच्या टेक्याने ते उभे होते व त्याच स्थितीत त्यांचा अचानक मृत्यू झाला. काठीच्या टेक्यामुळे त्यांचे शरीर ढासळून पडले नाही. वास्तू पूर्ततेचे काम पूर्ण झाल्यावर जमिनीतील किड्याने त्यांची लाठी पोखरली व ती पूर्णत: पोखरताच त्यांचे कलेवर कोसळले. जिन्नांना कळले की सुलेमान (अ.) यांचे निधन झाले.

कुरआनातील अध्याय ३८ मधील आयत ३० ते ४० मध्ये सुलेमान (अ.) यांच्याबद्दल अशी माहिती आलेली आहे.

''आम्ही दाऊदला सुलेमान प्रदान केला, अत्युत्कृष्ट दास जो अल्लाहकडे फार रुजू करणारा होता. त्यांना उत्तम घोड्यांची पारख होती, प्रशिक्षित घोड्यांचे त्यांच्याजवळ मोठे दळ होते. स्वत: ते घोड्यांकडे लक्ष पुरवीत व त्यांची देखभाल करीत. सर्वांना प्रेमाने थोपटत व आंजारत-गोंजारत, हवेला अल्लाहने त्यांच्या हवाली केले होते. जिन्नांना त्यांच्या सेवेसाठी शृंखलांनी जखडलेले होते आणि त्यांच्याकरिता आमच्याजवळ निकटचे स्थान व उत्कृष्ट ठिकाण आहे.''

सुलेमान (अ.) अत्यंत निष्णात शासक होते. जिहादकडे चालण्यास त्यांचे घोडदळ व रथदळ सदैव तयार असे. महान साम्राज्याचा शासक असूनही ते अतिशय विनम्र होते. ते आपल्या अपराधाबद्दल सतत ईश्वराजवळ क्षमायाचना करीत असत. पश्चात्तापदग्ध होऊन ते अल्लाहकडे एकाग्रचित होऊन त्याचे स्मरण करीत असत.

सुलेमान हे प्रेषित व खलीफा असलेले दाऊद (अ.) यांचे सर्वांत लहान पुत्र होते.

त्यांच्या ठिकाणी असलेल्या बुद्धीचातुर्याकडे व अनेक गुणवैशिष्ट्यांमुळे दाऊद (अ.) यांनी त्यांना आपला वारस म्हणून घोषित केले. ते उत्तम योद्धा होते त्यामुळे त्यांना उमदे घोडे अतिशय आवडत. घोड्यांची उत्तम पारख असल्यामुळे ते घोड्यांची देखभाल जातीने पाहात असत. इस्राईलींपैकी महत्त्वपूर्ण प्रेषित मानले गेले. त्यांचा काळ हा इस्राईलींचा सुवर्णयुगाचा काळ समजला गेला. सुलेमान (अ.) यांनी तीस वर्षे राज्य केले. त्यांचा मृत्यु वयाच्या ८९० व्या वर्षी झाला. त्यांच्यानंतर त्यांचा पुत्र रोहोबोम राजा झाला. तो अत्यंत विलासी व मोहमयी जीवनात रममाण झाला. परिणामी जनतेने त्याच्याविरुद्ध बंड केले व त्याची राजवट उलथवून टाकली. दाऊद (अ.) यांच्या घराण्याची राजवट अशा रीतीने संपली व दैदिप्यमान, भव्य व दिव्य असलेले राज्य लयास गेले.

प्रेषित इलियास (अ.) वा प्रेषित अलयस (अ.)

प्रेषित इलियास (अ.) अथवा इलयास (अ.) यांचा उल्लेख पवित्र कुरआनात सूरह 'अनआ' व सूरह 'साफ्फात' मध्ये आलेला आहे.

सूरह अनआममधील ८५ व्या आयतीत म्हटले आहे -

"आणि जकरिया, यहया, ईसा व इलयास देखील हे सर्व सदाचारी लोकांपैकी होते." (६:८५)

प्रेषित इलयास (अ.) यांचे नाव बायबलमध्ये एलयो असे आहे. ज्यांनी बनी इस्राईलच्या अनेकेश्वरवादी हरकतींवर अंकुश लावीत एकेश्वरत्वावर जोर दिला होता. यांचा उल्लेख सलातीन (राजे-१) मध्ये आहे, "संध्याकाळच्या यज्ञसमयी एलिया संदेष्टा पुढे होऊन म्हणाला, हे ईश्वरा, अब्राहम, इसहाक व इस्लामच्या देवा इस्रायलमध्ये तूच देव आहेस. मी तुझा एक सेवक आहे आणि मी या सर्व गोष्टी तुझ्याच आज्ञेने केल्या आहेत हे सर्वास विहित कर. हे ईश्वरा, ऐक माझी विनंती ऐक, हे ईश्वरा ऐक, माझी विनंती ऐक, हे ईश्वरा, तूच देव आहेस आणि तूच यांची हृदये पराङ्मुख केली आहेस याची या लोकांस जाणीव होऊ दे." (१८:३६-३७)

जकरिया, यहया, ईसा व इलयास प्रेषितांच्या त्या समूहाशी संबंधित आहेत, ज्यांनी फकिरीतही (दारिद्र्यातही) बादशाही केली. म्हणजे हे लोक मोठे बुजूर्ग लोक होते, पण त्याच्यापैकी कोणीही ईश्वर नव्हता; तथापि ते ईश्वराचे नेक बंदे होते. (दावतुल कुरआन, पान ४५४) यांच्यापैकी प्रत्येकजण सदाचारी होता. हे सर्व प्रेषित गुणवंत होते. यांनी एकाकी राहूनही सत्यधर्माच्या प्रसारास व प्रचारास स्वतःस वाहून घेतले होते. म्हणूनच त्यांना अतिशय गुणवंत म्हणून भाष्यकारांनी गौरविले होते.

सूरह 'साफ्फात' मधील आयत १२३ ते १३२ पर्यंत इलयास यांच्याबद्दल खालीलप्रमाणे वृत्तान्त आलेला आहे.

''आणि निश्चितच इलियास देखील प्रेषितांपैकी होता. जेव्हा तो आपल्या जनसमूहास म्हणाला, तुम्ही लोक (अल्लाहचे) भय बाळगत नाहीत. काय तुम्ही 'बअल'ला पुकारता आणि सर्वोत्कृष्ट निर्मात्या अल्लाहला सोडून देता, जो तुमचाही पालनकर्ता आहे आणि तुमच्यापूर्वी होऊन गेलेल्या वाडवडिलांचाही! परंतु त्यांनी त्यास खोटे ठरवले. जेव्हा निश्चितच त्यांना बंदिस्त करून सादर केले जाईल. मात्र अल्लाहचे विशेष दास यापासून सुरक्षित राहतील आणि नंतर त्या लोकांमध्ये आम्ही त्याचे सुस्मरण बाकी ठेवले. सलाम आहे इलियासवर. आम्ही सत्कर्मी लोकांना अशा प्रकारे मोबदला देतो. निःसंशय तो आमच्या मोमीन दासांपैकी होता.''

प्रेषित इलियास यांचे नाव बायबलमध्ये इलियाह असेही आहे व ते बनी इस्त्रायल वंशाचे होते. त्यांचा काल इ.स. पूर्व ९व्या शतकाचा सांगितला जातो. बायबलमधील साम्राज्ये प्रकरणातील १८ मध्ये यांचा वृत्तान्त दिलेला आहे. इलियास यांना कोणत्या जनसमूहाकडे पाठविले होते याचा तपशील मिळत नाही. पण बायबलमध्ये बनी इस्त्रायलच्याच एका जनसमूहाकडे त्यांना पाठविले गेले होते; जो मूर्तीपूजेत व्यग्र झालेला होता. यात 'बअल' असा उल्लेख आला आहे. त्याचा अर्थ मालक किंवा सरदार असा होय. 'बअल' ही त्यांची उपास्यदेवता होती, जिच्या मूर्तीला ते लोक पालनकर्ता या अर्थाने म्हणत.

प्रेषित इलियास यांनी आपल्या जनसमूहास मूर्तीपूजेपासून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. हे स्पष्टपणे सांगत राहिले की, ''तुम्ही ज्या मूर्तीला घडवता तिला कसा आपला पालनकर्ता मानता? खरे अल्लाहच आपल्या सर्वांचा निर्माता व पालनकर्ता आणि त्राता आहे. प्रेषितांना खोटे ठरवून मूर्तीपूजाच योग्य आहे असे जे मानतात त्यांना अंतिम निवाड्याच्या दिवशी अल्लाहसमोर बंदिवान म्हणून आणले जाईल. जे त्यापासून अलिप्त राहतील व फक्त एकेश्वरत्वाचे म्हणजे अल्लाहचे उपासक असतील तेच ईशशिक्षेपासून वाचतील.'' शेवटी ईशवाणी आहे की, ''इलियास हे सच्चे मोमीन असून त्यांच्या त्या कार्याबद्दल मोबदला म्हणून त्यांचे स्मरण राखले जाईल व त्यांची गणना मोमीन दासांमध्ये होईल.''

इतर ठिकाणी अशी माहिती मिळते की, सुलेमान (अ.) यांच्यानंतर त्यांच्या घराण्याची वाताहत झाली. सर्वत्र अराजक माजले. प्रत्येकजण मनमानी करू लागला.

सदाचारी लोक कवडीमोल किंमतीचे समजले गेले. सत्याने वागणाऱ्यांची टिंगल-टवाळी सुरू झाली. सोमालीच्या सत्ताधीशाने विद्वान व बुद्धिमान लोकांची कत्तल केली. सर्वत्र नैतिक अध:पतन झाले होते. अशा वेळी इलियास यांना अल्लाहने त्या भागाकडे प्रेषित म्हणून पाठविले. या काळात अहल इस्त्रायलवर राज्य करीत होता. अनेकेश्वरत्व फोफावले होते. 'बअल' या देवतेचे मोठे माहात्म्य माजले होते. इलियास यांनी एकेश्वरत्वाचे आवाहन केले. परंतु लोक त्याकडे दुर्लक्ष करीत होते. त्या वेळी इलियास (अ.) यांनी राजदरबारात जाऊन सांगितले, ''तीन वर्षे दुष्काळ पडेल व त्या वेळी तुझी 'बअल' देवता काही करू शकणार नाही.'' त्यानंतर खरोखरच दुष्काळ पडला, उपासमार होऊ लागली. शेवटी इलियास (अ.) यांनी ईश्वराची करुणा भाकली. उपासमारीने हैराण होऊन लोकही ईशप्रार्थना करू लागले. ईश्वराने त्यांच्यावरील कोप हटवला. पर्जन्यधारा बरसू लागल्या. लोक ईश्वराचे आभार मानू लागले व समाज सुधारून एकेश्वरत्वाकडे वळला.

ईशआज्ञेप्रमाणे इलियास यांनी आपले कार्य अलयसआ (अ.) यांच्याकडे सोपविले. तर काही ठिकाणी ते अचानक नाहिसे झाले, असा उल्लेख आलेला आहे. तर काही ठिकाणी त्यांनी आपल्या मृत्युसमयी अलयसआ (अ.) यांना आपला वारस नेमले.

अलयसआ (अ.) हे इलियास (अ.) यांचे पुतणे होते असा उल्लेख येतो; तर काही ठिकाणी त्यांचे भाऊ असा उल्लेख येतो. काही भाष्यकारांच्या मते त्यांच्या वडिलांचे नाव उखतुब होते असा येतो. बायबलमध्ये त्यांच्या वडिलांचे नाव 'शफात' असल्याचा उल्लेख येतो.

सूरह 'सॉद' मध्ये ''अलयसआ ऊर्फ एतिशाहा सदाचरणींपैकी होता,'' असे म्हटले आहे.

ईशआज्ञेप्रमाणे अलयसआ (अ.) यांना इलियास (अ.) यांनी वारस नेमले. त्यांनी 'यरिथा' भागात जाऊन सत्य धर्माच्या प्रचाराचे कार्य केले. त्यांच्या प्रार्थनेमुळे त्या भागात सर्वत्र धनधान्याची सुबत्ता झाली व तो भाग आवर्षणमुक्त झाला.

प्रेषित जुल्किफ्ल (अ.)

प्रेषित जुल्किफ्ल (अ.) यांना आणखीन इसाईह व खारकील बिन थौरी नावाने ओळखले जाते. पवित्र कुरआनात सूरह 'अल अंबिया' यातील ८५ व ८६ व्या आयतीत म्हटले आहे,

"आणि हीच देणगी इस्माईल (अ.) व इद्रिस (अ.) आणि जुल्किफ्ल (अ.) यांना दिली की, हे सर्व संयमी लोक होते आणि त्यांना आम्ही आपल्या कृपाछत्राखाली दाखल केले कारण ते सदाचारींपैकी होते."

तसेच यांचा उल्लेख ३८ वा सूरह 'सॉद' मध्ये ४८ व्या आयतीत असा आला आहे की,

"आणि इस्माईल (अ.) व अलयसअ (अ.) आणि जुल्किफ्ल (अ.) ची आठवण करा, हे सर्व पुण्यशील लोकांपैकी होते."

यात किल्फ हे विशेषण आहे. याचा अर्थ असा होतो, ज्याच्याजवळ दुप्पट भाग आहे किंवा जो दुप्पट मोबदला देतो किंवा नेहमीच्या कापडापेक्षा दुप्पट जाड्याभरड्या कापडाचा झगा बाळगणारा असाही होतो. 'एनसायक्लोपीडिया ऑफ इस्लाम'मध्ये जुल्किफ्ल याविषयी अशी माहिती मिळते की, त्यांनी इराकमधील मेशादअलीला भेट दिली होती. तसेच नजअफ व हिल्ला (बॉ बिलिऑन) यांच्या दरम्यान वसलेल्या केफिल या लहानशा गावाला भेट दिली होती. अरबी भाषेतील एझेकिल म्हणजे केफिल होय. म्हणून जर 'जुल्किफ्ल' हे विशेषण मानले नाही, तर अरबी भाषेतील एझेकीलचेच एक रूप होय असे मानले तर बऱ्याच गोष्टी सरळ रीतीने मांडता येतात, असे काही भाष्यकारांना वाटते. कारण वरती आलेल्या केफिल या गावी एझेकिल यांची पवित्र मजार आहे जेथे अनेक ज्यू लोक दर्शनासाठी यात्रेला जात असत. एझेकिल हे ज्यूंचे प्रेषित होते. ज्यांना जेरुसलेमच्या दुसऱ्यांदा झालेल्या पाडावानंतर बॅबिलॉन येथे कैदी म्हणून नेले गेले होते व तेथे त्यांना डांबवून ठेवले होते. तरी त्यांनी तेथूनही ज्यूमधील दोषांवर टीका करून सुधारणा करण्याचे सतत आवाहन केले होते. जुल्किफ्ल यांच्यावर इसाईह नावाचे एक पुस्तक असून त्यातील एक ते एकोणचाळीसव्या प्रकरणात माहिती येते ज्यात ज्यू व खिश्चन परंपरेत त्यांनी केलेल्या कार्याचा उल्लेख येतो.

जेरुसलेमच्या मंदिरात इ.स. पू. ७४२ मध्ये त्यांना प्रेषितत्व प्राप्त झाले. याच वेळी ॲसेरियन साम्राज्याचा विस्तार पश्चिमेकडे सुरू झाला होता. ज्यापासून इस्त्रायलच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला होता. त्यावेळी ईशधर्माशी प्रतारणा करण्याबद्दल आलेला हा इशारा आहे, असे त्यांनी ज्यू लोकांना बजावले. इ.स. पू. ७०१ मध्ये हे परचक्र टळले. तरी ईश्वराकडून यहुदी लोकांना सर्वनाशाचा हा निर्वाणीचा इशारा आहे अशी स्पष्ट जाणीव त्यांनी दिली. त्याचवेळी त्या आणीबाणीच्या काळातही त्यांनी इजिप्तचे सहाय्य घेण्यास स्पष्ट नकार दिला. ईश्वराने जर मदत करावी असे वाटत असेल

तर आपली नैतिक मूल्ये जपा व उच्च नैतिक जीवन अनुसरा. कारण ईशकृपेनेच कोणत्याही राष्ट्राचे अस्तित्व टिकते. पण जर त्याने पाठ फिरवली तर त्या राष्ट्राला कोणीच वाचवू शकत नाही असा यहुदी लोकांना सतत उपदेश दिला.

ज्यू धर्मग्रंथात मनासेह या ज्यूंच्या राजाने त्यांना ठार केले व त्यांनी ते हौतात्म्य न उमगता स्वीकारले असा उल्लेख येतो. (इ.स. पू. ६४७ ते ६४२ च्या दरम्यान) परंतु बायबलच्या साहित्यात याचा कोठेही उल्लेख आलेला नाही. ओल्ड टेस्टॅमेंटमध्ये त्यांचा आझेमपुत्र म्हणून उल्लेख येतो.

त्यांना जे अनुयायी मिळाले त्यांनी त्यांचे विचारधन पुढील पिढीपर्यंत पोहचविले व त्यांचे नाव अजरामर केले.

प्रेषित अय्यूब (अ.)

पवित्र कुरआनात 'सब्र'चा उल्लेख करणाऱ्या जवळपास ७० आयती आल्या आहेत. सब्र म्हणजे संयम. याला फार महत्त्व दिलेले आहे. अरबी भाषेत सब्र या शब्दाला विविध छटा आहेत.

दुःख, कष्ट, हालअपेष्टा यांना न उबगता अगदी पक्क्या निश्चयाने संयमाने वागणे, आपल्या मनाची शांती न ढळू देता आपल्या प्रयत्नात कसूर न करणे, अचानक लाभाच्या मागे न लागता बिनतक्रार आपल्या भोगांना सादर होणे या मनाच्या संयमाला फार महत्त्व दिलेले आहे. मनाचे धैर्य न खचू देता व संयमाने, विचल न होता प्रत्येक संकटास सामोरे जाणे यासाठी सब्र असावा लागतो. ती त्याची कसोटी असते.

सूरह 'अल बकरा' मधील १५५ ते १५७ आयतीत म्हटले आहे -

"आम्ही तुम्हाला काही प्रमाणात भयभीत करून तुमची उपासमार करून तुमच्या धनाचे, प्राणांचे, फळफळावळीचे, पिकांचे नुकसान करून अवश्य आजमावून पाहू आणि सहनशील लोकांना खूशखबर द्या."

"त्यांची अवस्था अशी आहे की त्यांच्यावर जेव्हा एखादी आपत्ती येते तेव्हा ते म्हणतात, आम्ही अल्लाहसाठीच आहोत आणि आम्हाला अल्लाहकडेच परत जायचे आहे."

"हेच ते लोक आहेत, ज्यांच्यावर त्यांच्या पालनकर्त्याची मेहेरबानी व कृपा राहील आणि हेच लोक योग्य मार्गावर असतील."

सहनशील लोकांच्या अडचणीच्या काळात, संकटांच्या काळात जे दृढ निश्चयाने व हिंमतीने वागतात त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह सहाय्य देतो. अशा लोकांना अल्लाहची मेहेरबानी व कृपा लाभते.

कुरआनमध्ये २:५३ मध्ये म्हटले आहे,

"श्रद्धावंत लोकांनो! सहनशीलतेचे व नमाजाचे सहाय्य घ्या, नि:संशय अल्लाह सहनशील लोकांबरोबर असतो."

खंबिरपणा व निर्धार महत्त्वाचा असतो व त्याचबरोबर ईशप्रार्थनाही सहनशीलता वाढवण्यास सहाय्यक ठरते.

प्रेषित अय्यूब (अ.) यांचा बायबलमध्ये जॉन म्हणून उल्लेख आलेला आहे. ते प्रेषित इब्राहीम (अ.) यांच्या वंशातील असून ते प्रेषित याकूब (अ.) यांचे पुतणे होते. त्यांना पॅलेस्टाईनच्या ईशान्य भागातील वाळवंटी प्रदेशाकडे प्रेषित म्हणून पाठविले होते. त्यांचा काळ प्रेषित मूसा (अ.) यांच्या पूर्वीचा काळ असावा. ते उज येथील रहिवासी होते जो भाग पॅलेस्टाईनच्या पश्चिमेस एडोम उत्तर पश्चिमेस होते. लोकांना दुष्कृत्यांपासून अलिप्त राहण्यास व सदाचरणाने वागण्याचा सदुपदेश करत राहिले. प्रथमत: लोकांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. पण हळूहळू त्यांचे अनुयायी वाढत गेले. त्यांनी सातत्याने एकेश्वरत्व ईशसत्यधर्म यांचा प्रचार केला.

अय्यूब (अ.) हे अत्यंत सधन होते. शेतीवाडी, जमीन-जुमला, गुरेढोरे व अनेक मौल्यवान वस्तू त्यांच्याजवळ होत्या. पण सधनतेने ते उतले-मातले नाहीत. जे काही आहे अल्लाहचे आहे व त्याची ती कृपा आहे असे ते नेहमी म्हणत.

काही काळाने त्यांच्यावर एकापाठोपाठ संकटे कोसळली. त्यांच्या मळ्यावर चोरांनी धाड घालून लुटालूट केली. नोकर-चाकर यांना ठार मारले. सर्व धन-धान्य व गुरेढोरे पळवून नेली. या धक्क्यातून ते सावरतात न सावरतात तोच त्यांच्या घराचे छत कोसळले व त्यात त्यांचे अनेक प्रियजन दबून गेले. या धक्क्याने ते पार हादरले. पण अल्पावधीत त्यांनी स्वत:स सावरले. दु:ख आक्रोश न करता ते म्हणू लागले, "ते सर्व अल्लाहचेच होते ते त्याने परत घेतले. कशाकरता आपण खंत व खेद करायचा?"

त्यानंतर त्यांना भयंकर असा त्वचारोग झाला. सर्व शरीरावर चट्टे उठले. जागोजागी चिघळणाऱ्या जखमा झाल्या. पण त्यांनी आपला संयम सोडला नाही व त्याबद्दल अल्लाहला दोष दिला नाही. चेहऱ्यावर व अंगावर चित्रविचित्र गाठी व फोड

आले व ते फुटून जीवघेण्या यातना होऊ लागल्या तरी त्यांनी संयम सोडला नाही. त्यांची ती अवस्था पाहून लोक त्यांचा तिरस्कार करू लागले व "आपल्या पापाची फळे भोगतो आहे" असे तिरस्काराने म्हणू लागले. त्यांची ती अवस्था पाहून त्यांचे नातेवाईक व सगेसोयरे त्यांना सोडून पळून गेले. रहीमा नावाची त्यांची पत्नी त्यांची सेवा करीत होती. शेवटी तीही म्हणू लागली की, "अय्यूब (अ.) यांना लवकर मृत्यू येवो व त्या हालातून ते लवकर मुक्त होवोत."

"शेवटी अल्लाह तूच अत्यंत दयाळू आहेस, मला झालेल्या रोगातून व कोसळलेल्या दु:खातून सोडव व कृपा कर अशी त्यांनी करुणा भाकली."

(कुरआन - सूरह अल अंबिया : ८३)

ईश्वराने त्यांची प्रार्थना स्वीकारली व "त्यांना त्यांच्यावरील आपत्तीतून मुक्त केले. त्यांच्यावर कृपा केली. त्यांना व्याधीमुक्त करून पुन्हा अतिशय संपन्न व समृद्ध जीवन प्रदान केले." (कुरआन - २१:८४)

ईश्वराने केलेल्या कृपेचा उल्लेख सूरह सॉदमधील आयत ४१ ते ४३ मध्ये अशी माहिती येते.

"आणि आमचा दास अय्यूबचे स्मरण करा जेव्हा त्याने आपल्या पालनकर्त्यास पुकारले की सैतानाने मला अतिशय दु:ख-यातनेत त्रस्त केले आहे. आम्ही (त्याला म्हणतो) आपला पाय जमिनीवर मार. हे थंड पाणी आहे. स्नानाकरिताही व पिण्याकरिताही. आम्ही त्याला त्याची बायका-मुले प्रदान केली आणि त्यांच्यासोबत अधिक इतकेच आपली कृपा म्हणून आणि बुद्धिमानांकरिता स्मरणिका म्हणून."

(कुरआन - ३८:४१-४३)

यात म्हटल्याप्रमाणे जमिनीतून निघालेल्या पाण्याच्या स्रोताने त्यात स्नान केल्यानंतर ते व्याधीमुक्त झाले व पहिल्यासारखे सदृढ निरोगी व सतेज झाले. पहिल्यापेक्षा त्यांना दुप्पट अनुयायी लाभले व पहिल्यासारखी सफलता त्यांना प्राप्त झाली.

कुरआनात म्हटल्याप्रमाणे संयमी व धीराने वागणाऱ्यांना अल्लाह विविध परीक्षेत घालतो व ते कसोटीवर उतरताच त्यांच्यावर आपल्या कृपेचा वर्षाव करतो. अय्यूब (अ.) हे धैर्य व सहनशीलतेचे उत्तम उदाहरण ठरले.

संयमाने बोलके उदाहरण म्हणून अय्यूब (अ.) यांचे जीवन म्हणता येते.

प्रेषित जकरिया (अ.)

प्रेषित जकरिया (अ.) यांचा प्रथम उल्लेख पवित्र कुरआनमध्ये सूरह 'आले इमरान' मधील ३७ व्या आयतीत आला आहे.

''तेव्हा तिच्या पालनकर्त्याने तिचा चांगल्याप्रकारे स्वीकार करून तिला गौरविले. उत्तमप्रकारे तिचे पालनपोषण केले आणि जकरिया यांना तिचा पालक बनविले. जेव्हा जेव्हा जकरिया तिच्याजवळ तिच्या मेहराबमध्ये (प्रार्थनेच्या खोलीत) जात तेव्हा तिच्याजवळ खाण्याचे पदार्थ पाहात. त्यांनी विचारले, हे मरियम! हे तुझ्याजवळ कोठून येते? तिने उत्तर दिले, हे अल्लाहकडून येते. अल्लाह ज्याला इच्छितो त्याला अमर्याद देतो.'' (३:३७)

माननीय मरयम अनाथ होत्या. त्यांना ध्यानमग्न व्हायचे असे, त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था अल्लाहने केली होती. माननीय जकरिया (अ.) हे प्रेषित होते व मरयमच्या मावशीचे पती होते. अल्लाहने त्यांना त्यांचा पालक बनविले.

बैतुल मुकद्दस (जेरूसलेममधील पवित्र मसजिद) मध्ये ध्यान धारणेसाठी अनेक खोल्या होत्या. मरयमच्या खोलीचा उल्लेख 'मेहराब'ने केला गेला आहे. मरयम या अल्लाहच्या खास अशा भक्त होत्या. जकरिया (अ.) जेव्हा त्यांच्या खोलीपाशी जात, तेव्हा तेथे असलेले खाद्यपदार्थ कसे येतात याने आश्चर्यचकित होत. म्हणून त्याविषयी विचारणा केली.

मरयम यांची अनन्यसाधारण भक्ती पाहून व अल्लाहने त्यांच्या अन्नपाण्याची केलेली व्यवस्था पाहून प्रभावित होऊन आपल्यालाही सदाचारी संतती असावी अशी इच्छा निर्माण झाली. मरयम यांचे वडील इमरान बिन मातान होते. आईचे नाव हन्ना होते. इमरान हे प्रेषित दाऊद (अ.) यांच्या वंशापैकी होते. मरयमच्या आईने गरोदर असताना पुत्र झाल्यास देवास अर्पण करीन असे म्हटले होते. (नवस केला होता.) पण त्यांना मुलगी झाली. मरयमच्या जन्मापूर्वीच इमरान यांचा मृत्यु झाला होता. कुरआनमध्ये सूरह ३ च्या ३७ व्या आयतीत म्हटल्याप्रमाणे अल्लाहने तिचा स्वीकार केला व गौरविले आणि जकरिया (अ.) यांना पालक बनविले.

सूरह 'आले इमरान' मधील ४४ व्या आयतीत माहिती येते की मरयमचे पालकत्व देण्यावरून हैकलच्या देवस्थानच्या सेवकांमध्ये वाद झाला, तेव्हा त्यांच्या लेखण्या पाण्यात टाकल्या गेल्या व ज्याची लेखणी प्रवाहाच्या वरच्या बाजूने आली ती जकरियांची होती. त्यांना मरयमचे पालकत्व दिले गेले.

मरयम यांच्यावर असलेली ईशकृपा पाहून आपल्यालाही संतान अल्लाहकडून मागून घ्यावी असे वाटू लागले व त्याप्रमाणे त्यांनी एक दिवस "आपणास एक सदाचारी व नैतिक मूल्य जपणारा मुलगा दे" अशी त्यांनी अल्लाहची प्रार्थना केली. याची माहिती सूरह 'आले इमरान'च्या ३८ ते ४० या आयतीत आलेली आहे.

"जकरियाने आपल्या पालनकर्त्याला आळविले व विनवणी केली. हे माझ्या पालनकर्त्या! मला खास तुझ्या जवळून चांगल्या संततीचा लाभ होऊ दे. निःसंशय तू विनवणी ऐकणारा आहेस. फरिश्त्यांनी याला पुकारले जेव्हा तो मेहराबमध्ये (प्रार्थना कक्षात) उभा राहून नमाज अदा करत होता. अल्लाह तुला याहयाची खूशखबर देत आहे. तो अल्लाहच्या वचनाचे समर्थन करणारा प्रमुख व अत्यंत आत्मनिग्रह करणारा होईल व सदाचारी प्रेषितांपैकी असेल. तो म्हणाला, हे माझ्या पालनकर्त्या! माझ्या येथे पुत्र कसा जन्मेल, जेव्हा मी वृद्ध झालो आहे व माझी पत्नी वांझ आहे? फर्माविले, त्याचप्रकारे अल्लाह जे इच्छितो ते करतो." (कुरआन - ३:३८-४०)

हे ऐकताच जकरिया यांनी प्रार्थना केली,

"माझ्या पालनकर्त्या! माझ्यासाठी एखादी निशाणी निश्चित कर. फर्माविले तुझ्यासाठी निशाणी ही आहे की, तू तीन दिवस लोकांशी इशाऱ्यांशिवाय बोलू शकणार नाहीस आणि आपल्या पालनकर्त्याचे सारखे स्मरण कर आणि सकाळ-संध्याकाळ त्याच्या पावित्र्याचा जप करीत राहा." (कुरआन - ३:४१)

या वेळी जकरिया (अ.) यांचे वय १०० वर्षांचे होते व त्यांची पत्नी ९८ वर्षांची होती. यहुद्यांच्या प्रेषितांपैकी जकरिया हे एक आदर्श प्रेषित होऊन गेले. ते प्रेषित सुलेमान (अ.) यांच्या वंशातील होते. त्यांच्या पत्नीचे नाव अल-यशबी असून त्या प्रेषित हारून (अ.) यांच्या कुटुंबातील होत्या. जकरिया (अ.) हे सुतारी काम करून आपली उपजीविका चालवीत. ते मूसा (अ.) यांच्या कायदेसंहितेचे पालन करणारे होते. पती-पत्नी अतिशय सदाचरणी असून सत्शील होते. त्यांचे सर्व नातेवाईक अधःपतीत झालेले होते व मनाला येईल तसे वागत असत. ते अत्यंत कष्टी व दुःखी होते. आपली हैकलची परंपरा आपल्या मागे कशी चालवली जाईल याबद्दल ते चिंतीत होते. जकरियांच्या प्रार्थनेला उत्तर म्हणून त्यांना याहयासारखा पुत्र झाला.

जकरिया (अ.) सतत सत्यधर्माचे आवाहन करीत व ईशधर्माचे आचरण करा म्हणून सांगत यहुदी लोकांना जकरिया (अ.) यांचा राग येत असे. कारण त्यांच्या गैरवर्तणुकीवर ते अंकुश ठेवत. शेवटी या दुराचरणींनी जकरिया (अ.) यांना ठार मारण्याचा कट रचला व ते एका झाडाच्या ढोलीत बसले असताना त्यांनी झाडाचा तो भाग कापून काढला ज्यात जकरिया (अ.) यांचे दोन तुकडे झाले. या प्रेषितांचा असा करुण अंत झाला.

प्रेषित उज्जैर - एझ्रा (अ.)

प्रेषित मूसा (अ.) यांच्यानंतर यहुदी ज्याला महत्त्वाचा प्रेषित मानतात ते अझिज (अ.) यांना. त्यांना उज्जैर किंवा एझ्रा किंवा एस्ड्रास या नावाने ओळखले जाते. त्यांच्याविषयी यहुदी लोकांमध्ये अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. ओल्ड टेस्टामेंटप्रमाणे त्यांचा काळ इ. स. पू. ४२ या शतकापर्यंतचा मानला जातो. ब्रिटानिका एन्सायक्लोपीडियातही त्यांच्याविषयी बरीच माहिती दिलेली आहे. त्यांच्या जीवनाचा मोठा काळ बॅबिलॉन व जेरुसलेम येथे गेला. ते यहुदींचे धार्मिक नेते व धार्मिक गुरूदेखील होते. इराणच्या राजाच्या आज्ञेने ते जेरूसलेम येथे बॅबिलॉनमधील विजनवासातून परतले. जेरुसलेम येथे त्यांना ज्यू लोकांच्या धार्मिक जीवनाची, नियम व निर्बंधांची पुनर्बांधणी करण्याचे काम सोपविण्यात आले होते. ते जेरूसलेमला पोहचले तेव्हा ते पूर्ण मोडकळीस आलेले दिसले व तेथील लोक अत्यंत विस्कळीतपणे जीवन जगत असलेले दिसले. या अशा वस्तीची पुनर्स्थापना व लोकांना व्यवस्थित जीवनपद्धतीत कसे आणता येईल व ते शक्य होईल का? अशा साशंक अवस्थेत होते. त्याचेच वर्णन पवित्र कुरआनातील सूरह 'अल बकरा' मधील २५९ व्या आयतीत आलेले आहे, ते असे -

"अथवा उदाहरण म्हणून त्या माणसाकडे पाहा ज्याचे एक अशा वस्तीवरून जाणे झाले जी आपल्या छतावरून पडली होती. त्याने म्हटले, ही वस्ती जी नाश पावली आहे. हिला अल्लाह कशाप्रकारे पुन्हा जीवन प्रदान करेल? यावर अल्लाहने त्याचे प्राण काढून घेतले आणि तो शंभर वर्षे मृतावस्थेत पडून राहिला. नंतर अल्लाहने त्याला पुन्हा जीवन प्रदान केले आणि त्याला विचारले, "सांग तू किती काळ पडून राहिला आहेस?" त्याने उत्तर दिले, एक दिवस किंवा काही तास राहिला असेन. तेव्हा फर्माविले, अशा स्थितीत तू शंभर वर्षे पडून होतास. जरा आता आपल्या अन्न व पाण्याकडे पाहा. त्याच्यात काही एक फरक पडलेला नाही. दुसरीकडे आपल्या गाढवाकडेही बघा त्याच्या हाडांचा सापळा जर्जर झालेला आहे आणि आम्ही हे यासाठी केले की, आम्ही तुला लोकांसाठी एक निशाणी बनवू इच्छितो. मग पाहा आम्ही हाडांच्या सापळ्याला कसे पुनर्उत्थापित करून त्याच्यावर कातडी व मांस कसे चढवितो. अशा प्रकारे जेव्हा सत्य परिस्थिती त्याच्यासमोर पूर्णपणे प्रकट झाली तेव्हा तो म्हणाला, मला माहीत आहे की, अल्लाह प्रत्येक गोष्टीवर प्रभुत्व राखतो." (कुरआन - ५:२५९)

यहुदींमध्ये अशी दंतकथा आहे की, एझ्रा (अ.) हे आपल्या कबरीतून शंभर वर्षांनी पुनरुत्थापित झाले. त्यानंतर मूसा (अ.) वर अवतरित झालेला तौराह या गहाळ

झालेल्या ग्रंथाची आपल्या स्मरणातून पुन्हा प्रतिष्ठापना केली. त्यांनी सर्व विस्कळीत व विखुरलेल्या ज्यूंना पुन्हा ईश्वरासमोर गंभीरपणे 'तौराह' मधील नियम व निर्बंध पाळण्याची शपथ घ्यायला लावली व पुन्हा ज्यूंची एक जमात म्हणून बांधणी केली. धार्मिक नियम व निर्बंधांनी बद्ध झालेले ज्यू एक जमात म्हणून उभे केले.

कुरआनात ९ व्या सूरह अततौबा मधील ३० व्या आयतीत असा उल्लेख येतो -

"यहुदी म्हणतात, उजैर अल्लाहचा पुत्र आहे आणि ख्रिश्चन म्हणतात की, इसा (अ.) मसीह-येशू अल्लाहचा पुत्र आहे."

वास्तविकत: अल्लाह या गोष्टींपासून पवित्र आहे.

"या अवास्तव गोष्टी आपल्या तोंडून काढतात." (९:३०

बायबलप्रमाणे एइज्रा-उज्जैरचे नाव आहे व ते इ.स. पूर्व ५ व्या शतकात होऊन गेले. बुख्त नस्सरच्या हातून बनी इस्राईलवर जो विनाश आला आणि ज्या धार्मिक, नैतिक व आचरणीय अध:पतनाचे ते शिकार झाले, त्यापासून त्यांना मुक्त करण्यास तौरातशी त्यांचा संबंध मजबूत करून त्यांची सुधारणा करण्याचे व त्यांच्यात धर्माची जागृती करण्याचे कार्य ज्या व्यक्तीने पार पाडले ती प्रेषित उज्जैर होय. त्यांच्यामुळेच इस्राईलला नवजीवन लाभले. बैतुल मुकद्दसची दुसऱ्यांदा उभारणी झाली व तौरातची शरीयत अंमलात आली. अशा रीतीने प्रेषित उज्जैर यांच्या हातून इस्राईलच्या पुनर्जीवनाचे कार्य पार पडले. ज्यूइश एन्सायक्लोपीडियात म्हटले आहे की, एइब्रा पॅलेस्टिनियन यहुदी जनसमूहाचे नवे संस्थापक व सुधारक आहेत. एन्सायक्लोपीडियात म्हटले आहे की, ज्यू जनसमूहाच्या नजरेत ते इतके महान ठरले की, नंतरच्या लोकांनी त्यांना द्वितीय मूसा (अ.) चे स्थान दिले. एवढेच नव्हे तरर एका गटाने त्यांना अल्लाहचे पुत्र ठरविले. (ज्यूइश एन्सायक्लोपीडिया, पान नं.६६० व ब्रिटानिका एन्सायक्लोपीडिया, व्हॉल्यूम ७ व पान नं.१२७)

एवढे मात्र सत्य आहे की, एइब्रा (अ.) हे बुद्धिमान, धर्मशास्त्रप्रविण, उत्तम धर्मगुरू, समाजसुधारक होते व त्यामुळेच विखुरलेली व आपली जीवनपद्धती भ्रष्ट करून बसलेली (परकीय आक्रमणांमुळे उध्वस्त झालेली) ज्यू जमात मूसा (अ.) यांच्या तौरात या धर्मग्रंथानुसार असलेली जमात म्हणून पुन्हा उभी राहिली.

त्यांचा मृत्यु सैराबाद येथे (इराकजवळ) झाला व तेथेच त्यांना दफन केले गेले. तर काही इतिहासकारांच्या मते त्यांची कबर दमास्कस येथे आहे.

प्रेषित याहया (अ.)

सूरह 'आले इमरान' मध्ये जकरिया (अ.) यांना पुत्र होण्याची इच्छा झाली व त्यांनी ईशकरुणा भाकली व त्याला प्रत्युत्तर म्हणून अल्लाहने त्यांना एक सुपुत्र देण्याची खूशखबर फरिश्त्यांद्वारे दिली. अल्लाहच्या कृपेने जकरिया (अ.) यांना १०० व्या वर्षी व त्यांची पत्नी अल-यशबी यांना त्यांचे वांझपण नष्ट करून ९८ व्या वर्षी याहया (अ.) हा सदाचारी व सत्‌शील पुत्र झाला.

सूरह 'मरयम' मधील आयत २ ते १५ पर्यंत प्रेषित याहया यांच्याबद्दल माहिती मिळते. "हे जकरिया (अ.) तुला एका पुत्राची आनंदवार्ता देतो, ज्याचे नाव याहया असेल. या नावाचा कोणी इसम यापूर्वी निर्माण झाला नाही." (१९:०७) याहया (अ.) यांचा उल्लेख ख्रिश्चन व यहुदी धर्मग्रंथात जॉन द बासिष्ट म्हणून येतो. आयत १२ ते १५ मध्ये "हे याहया, ईशग्रंथाला भक्कमपणे धारण कर, आम्ही त्याला बालपणापासूनच हुकुमाने नवाजले आणि आपल्याकडून त्याला कोमलहृदयता, निर्मळता प्रदान केली आणि तो मोठा पापभिरू होता आणि आई-वडिलांचा हक्क जाणणारा होता. तो शिरजोरही नव्हता व अवज्ञाकारीदेखील नाही. सलाम असो त्यावर ज्या दिवशी तो जन्मला व ज्या दिवशी तो मृत्यू पावला आणि ज्या दिवशी तो जिवंत करून उठविला जाईल."

'याहया'चा शाब्दिक अर्थ 'तो जिवंत राहील' असा आहे. बायबलमध्ये त्यांचा उल्लेख योहान असा आला आहे. याहया (अ.) यांचे व्यक्तिमत्त्व असाधारण गुणवैशिष्ट्यांमुळे अनुपमेय ठरले. बालपणातच त्यांना बुद्धीकौशल्य लाभले होते. त्यांच्या ठायी आध्यात्मिक आत्मसंयम होता. ऐहिक सुख व विलासापासून ते आयुष्यभर अपरिचित राहिले.

बायबलमध्ये म्हटले आहे, "योहानाचे वस्त्र उंटाच्या केसाचे होते, त्याच्या कमरेस हातकड्याचा कमरबंध होता आणि त्याचा आहार टोळ व रानमध होता. तो ज्युदियाच्या वाळवंटात फिरत." (मत्तय ३:४) त्यांनी आपले जीवन सत्य उद्दिष्टांच्या मग्नतेत घालवले. ते सतत ईशोपासनेचा उपदेश करीत. ते रानावनात सतत एकटे वणवण फिरत.

याहया (अ.) व ईसा (अ.) यांचा अलौकिकरीत्या जन्म झाला. (आई-वडिलांच्या वार्धक्यात, वांझ आईच्या पोटी व ईसा (अ.) याचा जन्म बापाविना) हे दोघे मावस भाऊ होते.

याहया (अ.) यांच्याविषयी सूरह 'मरयम' मधील आयत ११ ते १४ अशी माहिती मिळते, "मग तो (जकरिया (अ.) उपासनेच्या कक्षेतून बाहेर येऊन आपल्या लोकांसमोर आला व संकेताद्वारे त्यांना म्हणाला की, सकाळ-संध्याकाळ अल्लाहची 'तस्बीह' करा. हे याहया, ग्रंथास मजबूतपणे धरा आणि आम्ही त्याला बालपणातच हिकमत (बुद्धिकौशल्य) प्रदान केले आणि खास आपल्यापासून सहृदयता व शुद्धता आणि तो मोठा ईशभय बाळगणारा होता. आपल्या मातापित्याशी सद्व्यवहार करणारा होता. शिरजोर व आज्ञा भंग करणारा नव्हता." (१९:११ ते १४)

रोमन राज्यकर्ता हेरॉड ॲन्टिफास हा गॅलिलीचा राज्यकर्ता होता. त्याचे आणि त्याची भावजय हेरोजयस यांचे अनैतिक संबंध होते. आपल्या भावजयीशी जी हेरॉड फिलीपची बायको होती, हे लक्षात येताच याहया (अ.) यांनी राज्यकर्त्याची या अनैतिक वर्तनाबद्दल कानउघाडणी केली तेव्हा पापकर्मापासून दूर राहा असा उपदेश केला. त्यामुळे रुष्ट होऊन राज्यकर्त्याने याहया (अ.) यांना तुरुंगात टाकले. एकदा या राज्यकर्त्याने फार मोठी मेजवानी दिली. या मेजवानीत हेरोडिआसची कन्या सलोमी हिने नृत्य केले. तिच्या नृत्यावर खूश होऊन मागशील ते इनाम देतो म्हणून जाहीर केले. त्या नृत्यांगनेने याहया (अ.) यांचे शीर मागितले. त्यामुळे राज्यकर्ता मोठ्या अडचणीत आला. परंतु त्याने याहया (अ.) चे शीर कापून तिला भेट दिले. अशा रीतीने एका महान प्रेषिताचा करूण अंत झाला.

प्रेषितांना छळणे, त्यांना जखमी करणे, त्यांच्या हत्या करणे हे सतत घडत आल्याचा उल्लेख कुरआनात आला आहे. सूरह 'आले इमरान' मधील २१ व्या आयतीत म्हटले आहे, "हे काफिर ईश प्रकटनावर विश्वास ठेवत नाहीत. ते अल्लाहच्या प्रेषितांचा छळ करतात व माणुसकीला काळीमा फासणारे असतात. त्यांना नरकाग्नीत टाकले जाईल."

याहया (अ.) यांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी होते व ते अत्यंत प्रभावीपणे प्रवचन करीत. त्यांच्या वाणीने लोक प्रभावित होत असत. याहया (अ.) यांना प्रेषित ईसा (अ.) यांच्यापुढे चालणारे असे मानतात किंवा त्यांच्या पदचिन्हांवर ईसा (अ.) यांची वाट झाली, असे भाष्यकार मानतात.

जकरिया (अ.) यांचा व त्यांचा पुत्र याहया (अ.) यांचा दुःखद अंत झाला. त्यांचा दोष फक्त हाच होता की त्यांनी कळकळीने ईशधर्माचे आवाहन व नीतीमूल्यांची जपणूक करण्याची शिकवण दिली.

प्रेषित सालेह (अ.)

कुरआनातील सूरह 'अअराफ' मधील ७३ व ७४ व्या आयतीत उल्लेख येतो की, "आणि समूदकडे त्यांचे बंधु सालेह (अ.) ला पाठविले."

ऐहिक भव्यता आणि भौतिक प्रगतीत श्रेष्ठ ठरलेला 'आद' व्यतिरिक्त दुसरा समाज म्हणजे समूद होय. हाही समाज प्रेषित इब्राहीम (अ.) यांच्या पूर्वकालीन होय.

कुरआन ८९:८९ यात म्हटले आहे, "आणि समूदबरोबर जे दरीत खडक कोरीत असत." (येथे आलेल्या दरीचा संदर्भ 'अल-कुरा' या दरीशी आहे. ही दरी हिजाज आणि सीरिया यांच्या मध्ये आहे.) या दरीतील 'हिज्र' ही अत्यंत महत्त्वाची जागा होती. सध्या ती 'मदायन सालेह' या नावाने ओळखली जाते. मदीनेपासून जवळजवळ १८० मैल किंवा २८८ किलोमीटर अंतरावर उत्तरेला येते. हे समूद समाजाचे वस्तीस्थान होते. खडक कोरून गुंफेत राहणारे लोक म्हणून 'समूद समाज' ओळखला जात होता. खडकांच्या कोरीव कामात ते तरबेज होते. या कलेच्या इच्छापूर्तीत ते पूर्णतया डुंबून गेले होते. बांधकामाच्या कलेत त्यांनी नेत्रदिपक प्रगती केली होती. त्यांच्या बांधकामाच्या कलेमुळे ते सर्व दृष्टीने आपण सुरक्षित आहोत, असे समजत होते.

प्रेषित सालेह (अ.) हे ज्या समूद लोकसमूहापैकी होते, ते 'आद संस्कृती व सभ्यता' यांचे वारस होते. समूद लोक आद लोकांच्या चुलत खानदानीचे होते. नूह (अ.) यांचा पुत्र सॅम - पुत्र अबिर - पुत्र समूद होते. हे आद लोकांच्या खालच्या भावकीचे होते. हे अरबस्तानच्या वायव्य कोपऱ्यात मदीना व सीरिया यांच्या मधल्या भागात स्थायिक झाले होते. त्यात खडकाळ प्रदेश, वाडीचा सुपीक खोऱ्याचा भाग होता - कुराच्या सपाट मैदानाचा भाग येत होता. मदीना शहराच्या उत्तरेस हिजाज ओलांडून येणारा भाग येत होता. वर्तमानकाळात 'मदायन सालेह' म्हणून मदीना व तबुक यांच्या दरम्यान एक ठिकाण आहे हेच समूद लोकांचे केंद्रस्थान होते. प्राचीन काळी याला 'हिज्र' म्हटले जात होते. तेथे झालेल्या उत्खननात मानजवळ खडकाळ शहर सापडले होते. तेथे समूद लोकांच्या काही भव्य इमारती अस्तित्वात आहेत. या इमारती त्यांनी पर्वतराजी कोरून बनविल्या होत्या.

कुरआनातील सूरह 'अअराफ' मधील ७३ व ७४ आयतीत उल्लेख येतो, "आणि समूदकडे त्यांचे बंधु सालेह (अ.) ला पाठविले होते. त्यांनी सांगितले की, हे समाजबांधवांनो! अल्लाहची बंदगी करा, त्याच्याशिवाय तुमचा कोणी ईश्वर नाही. तुमच्याकडे तुमच्या पालनकर्त्याचे उघड प्रमाण आले आहे. ही अल्लाहची उंटीण तुमच्याकडे एक निशाणी स्वरूप आहे. म्हणून हिला मोकळी सोडा, जेणेकरून ती

अल्लाहच्या जमिनीत चरत राहावी, तिला कोणत्याही वाईट इराद्याने स्पर्श करू नका. नाहीतर एक अत्यंत दु:खदायक प्रकोप तुम्हाला गाठील. आठवा तो प्रसंग जेव्हा अल्लाहने आद लोकांना नंतर तुम्हाला त्यांचे उत्तराधिकारी बनविले आणि तुम्हाला भूतलावर वास्तव्य प्रदान केले की, आज तुम्ही त्यांच्या समतल मैदानावर वैभवशाली महाल बनविता आणि त्याच्या पर्वतांना गृहांच्या स्वरूपात कोरता म्हणून त्याच्या सामर्थ्यापासून गाफील बनू नका आणि भूतलावर उपद्रव माजवू नका."

प्रेषित सालेह (अ.) यांच्या आवाहनाला समूदमधील गरीब व दुबळ्या लोकांनी ताबडतोब साथ दिली. परंतु समूदमधील सरदारांनी व धनदांडग्यांनी सालेह (अ.) यांच्या प्रेषितत्वाला मान्य केले नाही. उलट जर ते प्रेषित असतील तर त्यांनी त्याबद्दल काही निशाणी आणावी असे म्हणून त्यांना हिणवू लागले. तेव्हाच वरच्या आयतीत आल्याप्रमाणे उंटीण ही ईश्वराची निशाणी आहे, असे सालेह (अ.) यांनी सांगितले.

समूद ज्या भागात राहात होते त्या भागात चराऊ कुरणे जास्त नव्हती. तसेच पाण्याचा तुटवडा होता. समाजातील वर्चस्व असणारा वर्ग स्वत:ची जनावरे वरील कुरणात चरवत व गरिबांच्या जनावरांना हुसकावून लावीत. तसेच पाणवठ्यावरही गरिबांच्या जनावरांना त्रास देत. म्हणून सालेह (अ.) यांनी सर्व जमीन अल्लाहचीच आहे व पाणवठे हे ईश्वरानेच निर्माण केले आहेत. तेव्हा कोणावरही जुलूम करू नका म्हणून आवाज उठविला व उंटिणीला मुक्त संचारासाठी सोडले. पण उन्मत्त वर्गाने सालेह (अ.) यांचे एकेश्वरत्वाचे आवाहन स्वीकारले नाही. उलट त्यांची अवहेलना केली. कुरआन ११:६५ मध्ये आल्याप्रमाणे या उन्मत्त लोकांनी त्या उंटिणीचे कुचे कापून टाकले. तेव्हा तो म्हणाला, "आपल्या घरात आणखीन तीन दिवस निवास करा, हा वायदा आहे तो खोटा ठरणार नाही." या वेळी उन्मत्त समूहांनी आव्हान दिले, "खरे असाल तर ज्या प्रकोपाचा धाक दाखवता तो आणून दाखवा."

शेवटी वैतागून ते म्हणाले, "हे माझ्या राष्ट्रबांधवांनो! मी आपल्या पालनकर्त्याचा संदेश तुम्हाला पोहचविला आणि मी तुमचे खूप हित चिंतले; पण मी काय करावे, तुम्हाला हितचिंतक पसंतच नाही." असे म्हणत आपल्या अनुयायांसह ते वस्तीतून बाहेर पडले. ते बाहेर पडताच भयंकर अशा भूकंपाने ती वस्ती पार उलथून टाकली आणि विरोधक घरातच पालथेच्या पालथे पडून राहिले. ही सर्व माहिती कुरआनच्या सूरह अआराफ - ७५-७९ आयतीत आली आहे. सूरह 'हूद' मधील ६५ ते ६८ मध्येही ही माहिती आली आहे.

मूर्तीपूजक, सालेह (अ.) यांची टिंगल-टवाळी करणारे आद लोकांनंतर दोन

शतके खूप भरभराटीस चढले, अतिशय संपन्न असलेले व पर्वतराजींमध्ये मोठमोठ्या इमारती कोरणारे समूद लोक एका भयंकर अशा भूकंपाने नष्ट झाले.

सूरह 'हूद' मधील ६१ ते ६८, सूरह अआराफ मधील ७३ ते ७९ आणि ८९:९ मध्ये व त्यावरील भाष्यांमध्ये आलेली माहिती तपशीलवार आहे.

प्रेषित यूनुस (अ.)

प्रेषित यूनुस (अ.) यांचे नाव बायबलमध्ये योनाह असे आहे. हे इस्राईली प्रेषित होते. त्यांना नायनेवेह या शहरी पाठविण्यात आले होते, जे इराकमध्ये दजलाकिनारी मौसल शहराजवळ वसले होते व जी आशुरेची राजधानी होती. हे राष्ट्र बिघडलेले होते. त्याला सत्यधर्मावर आणण्यासाठी प्रेषित यूनुस यांना पाठविले होते.

सही बुखारीप्रमाणे यूनुस (अ.) यांच्या वडिलांचे नाव मित्ता किंवा मिट्टा होते. तौरातप्रमाणे त्यांचे नाव अमित्ताई होते. ओल्ड टेम्टामेंटप्रमाणे ते म्हणजे प्रेषित 'योनाह' (Jonah) होते.

कुरआनात त्यांचा उल्लेख प्रेषित यूनुस (अ.) या नावाने आला आहे, तर कधी 'जुन्नुन' (Dhon-Nun) व 'सहिशुल हुज' म्हणून आला आहे. ज्याचा अर्थ मासेवाला हा किताब असलेले. 'मासेवाला' म्हणजे ते मासे पकडत असत अथवा विकत असत असा नव्हे तर सर्वोच्च अल्लाहच्या आज्ञेने त्यांना एका मोठ्या माशाने गिळंकृत केलेले होते व ईशआज्ञेने पुन्हा ओकून बाहेर टाकले.

कोणताही प्रेषित ईशआज्ञेने पाठविला जातो व सांगितल्या ठिकाणाहून ते ईशआज्ञेशिवाय स्थलांतर करू शकत नाही.

त्यांना ॲसिरियाची राजधानी नायनेवेह या शहरी आपल्या प्रेषितत्वाचे कार्य पार पाडण्यासाठी ईशआज्ञेने नियुक्त केले होते. हे शहर तैग्रीस नदीच्या उजव्या किनाऱ्यावर वसलेले होते. ज्याची वस्ती त्या काळात वीस हजाराच्या आसपास होती. हे लोक सुखसमृद्धीचे जीवन जगत होते. पण समृद्धीमुळे येणारे सर्व दोष त्यांच्या ठायी निर्माण झाले होते. तेव्हा त्यांनी उच्च नैतिक जीवनाचे व खऱ्या ईशधर्माचे पालन करावे. यासाठी यूनुस (अ.) यांना पाठविले होते. परंतु समृद्धीने अंध झाल्याने यूनुस (अ.) यांच्या आवाहनास कोणीही लक्ष देण्यास उत्सुक नव्हते. यूनुस (अ.) यांनी त्यांना विविध प्रकारांनी समजाविले, ईशकोपचे भयही दाखवले, पण कोणीही त्यांना प्रतिसाद दिला नाही. शेवटी यूनुस (अ.) वैतागले व आपल्या रागाच्या आहारी जाऊन "या लोकांवर

ईशकोप होवो'' असा ईशधावा केला. ईशआज्ञेशिवाय ते आपले कार्य सोडून निघून गेले. एक बोट घेऊन ते सागरात उतरले. आपण ईश्वराच्या अंकित आहोत व त्याच्या आज्ञेशिवाय आपण स्थलांतर करीत आहोत याचेही त्यांना भान राहिले नाही. त्यामुळे त्यांनी स्वत:वर ईश्वराची नाराजी ओढवून घेतली. ते बोटीवर चढताच भयंकर तुफान सुरू झाले व नावाडी म्हणू लागले, या अपशकुनी माणसामुळेच सागरी तुफान आले आहे व ते त्यांना समुद्रात ढकलू लागले. पण इतर प्रवाशांनी विनंती केल्यारून त्यांना समुद्रात लोटले नाही. शेवटी फांसे टाकण्यात आले व त्यात यूनुस (अ.) यांचे नाव आल्याने त्यांना समुद्रात फेकून देण्यात आले. (कदाचित बोटीचे वजन कमी करण्यासाठी हे फांसे टाकले गेले असावेत.) ईशआज्ञेने प्रचंड माशाने किंवा अवाढव्य व्हेल माशाने त्यांना गिळले. समुद्रावरील अंधार व माशाच्या पोटात असल्यामुळे झालेला अंधार यूनुस (अ.) घाबरले व आपण केलेल्या ईशआज्ञेचा भंग याबद्दल ते पश्चात्ताप व्यक्त करू लागले. करुणामय अल्लाहने माशास त्यांना किनाऱ्यावर फेकण्यास सांगितले. माशाच्या पोटातून मुक्ती मिळण्याचा उल्लेख सूरह अंबियात आयत क्र.८७ मध्ये आला आहे.

"आणि मासेवाल्याने अंधकारात पश्चात्ताप व्यक्त करून पुकारले की, तुझ्याशिवाय कोणी उपास्य नाही, तू पवित्र आहेस नि:संशय मीच अपराधी आहे.''

(२१:८७)

ईशआज्ञेप्रमाणे माशाने समुद्रकिनाऱ्यावर सपाट मैदानावर फेकले. तेथे ईश्वराने त्यांच्यावर फळफुलांनी बहरलेल्या वेलीने अच्छादन केले. शुद्धीवर येताच फळे खाऊन ते ताजेतवाणे झाले व ईशकरुणा भाकू लागले. ईश्वराने त्यांना क्षमा केली व ईशकोपाच्या भीतीने भयग्रस्त झालेल्या नगरवासीयांनीही पश्चात्ताप व्यक्त करून ईशप्रार्थना सुरू केली. तेव्हा ईश्वराने त्यांना क्षमा करून काही काळ आपल्या कोपापासून वाचवले. ही माहिती कुरआनच्या ३७ व्या 'अस साफ्फात' मधील आयत क्र. १३९ ते १४८ मध्ये आलेली आहे.

जेव्हा त्यांची प्रकृती सुधारली तेव्हा एक लाखाहून जास्त लोकसंख्या असलेल्या नेतवा राष्ट्राकडे त्यांना जाण्याचा आदेश दिला. पुन्हा त्यांना नेतवाकडेच पाठविले. ही शिक्षा यूनुस (अ.) यांना ईशआदेशाचे उल्लंघन केल्यामुळे दिली गेली. प्रेषित यूनुस जेव्हा परत नेतवाला परतले तेव्हा त्यांच्या आवाहनास संपूर्ण राष्ट्राने स्वीकारले व जेव्हा त्यांनी ईमान बाळगले तेव्हा अल्लाहने त्यांच्यावर आपली कृपा केली. संपूर्ण राष्ट्राने प्रेषितांवर ईमान बाळगले, असे हे एकमेव उदाहरण आहे जे प्रेषितांच्या इतिहासात मिळते. सूरह 'यूनुस' आयत क्र.९८ मध्ये म्हटले आहे.

"एक यूनुस जनसमूहाखेरीज की एखाद्या राष्ट्राने ईमान बाळगले." (१०:९८)

पश्चात्ताप व्यक्त करणाऱ्यास ईश्वर माफ करतो व त्याच्यावर कृपा करतो याचे स्पष्टीकरण येथे आलेले दिसते. "मासेवाल्यालादेखील आम्ही नवाजले जेव्हा तो रुसून गेला होता, पण त्याने अंधारातून धावा केला, आम्ही त्याची प्रार्थना स्वीकारली व त्याची दुःखातून मुक्तता केली."

यूनुस (अ.) यांचा काळ इ.स. पू. ८ व्या शतकाचा समजला जातो. ते ईशआज्ञा मोडून निघून गेले व 'याफा' या बंदरात नावेवर चढले जे त्याकाळी जेरूसलेमजवळ होते.

"जर तुमच्या पालनकर्त्याने कृपा केली नसती तर तो दुरावस्थेत उघड्या मैदानातच टाकला गेला असता, मग त्याच्या पालनकर्त्याने त्याला निवडले आणि त्याला सदाचारी लोकांत सामील केले." (सूरह : ४८-५०)

पुढे यूनुस (अ.) यांचा मृत्यु नेतवात झाला व त्यांना त्याच शहरी दफनवण्यात आले. काहींच्या मते त्यांची कबर हलमोल खेड्यात हेब्रॉनपासून दहा मैलांवर (१८ कि.मी.) आहे. त्यांच्या मृत्युनंतर ते लोक पुन्हा मूर्तीपूजक बनले आणि अनैतिक व पापकर्मात, व्यभिचारात गुरफटले. पुढील काळात स्कियियनांनी त्यांचा पाडाव करून त्यांना उद्‌ध्वस्त केले.

प्रेषित हूद (अ.)

प्रेषित हूद (अ.) हे बनी आद लोकांपैकी होत. आद लोकांविषयी अशी माहिती मिळते की आद हे नूह (अ.) यांच्या वंशातील असून त्यांचा Eponymous Ancestor आद हा औसचा पुत्र, औस आरमचा पुत्र, आरम हा सॅमचा पुत्र व सॅम हा नूह (अ.) चा पुत्र होता. हे आद लोक अरबी आखाताच्या तोंडाशी असलेल्या उम्मानपासून हजरमोत आणि चमन या तांबड्या समुद्राच्या दक्षिण टोकापर्यंतच्या दक्षिण अरबस्तानात वसलेले होते. आद लोक उंच धिप्पाड असून वास्तूशिल्प कलेत प्रविण होते. त्यांनी आपल्या भागात पाण्याचे पाट (कालवे) काढून कृत्रिम जलसिंचनाद्वारे तेथील रेताड भागात पाणी आणले होते. या लोकांनी खऱ्या ईश्वराची उपासना सोडून देऊन अनेक देव व देवता यांची उपासना सुरू केली होती आणि समाजातील दुर्बल लोकांवर जुलूम सुरू केला होता. सतत तीन वर्षे या भागात दुष्काळ पडला तरी त्यापासून त्यांनी धडा घेतला नाही. आपली दुष्कर्मे चालूच ठेवली. या आद लोकांपैकीच हूद (अ.) यांना त्यांची सुधारणा करण्यासाठी प्रेषित म्हणून ईश्वराने नियुक्त केले.

कुरआनातील ११:५० मध्ये म्हटले आहे, "आणि आदकडे आम्ही त्यांचे बंधु हूदला पाठविले. तो म्हणाला, हे माझ्या राष्ट्रातील लोकांनो! अल्लाहची उपासना करा. त्याच्याखेरीज तुमचा कोणीही ईश्वर नाही. निखालस खोटे आहे जे तुम्ही रचले आहे."

कुरआन - ११:५१ ते ११:६० मध्ये खालीलप्रमाणे माहिती मिळते.

"हूद (अ.) यांनी बजावले की, मी कशाचीही अपेक्षा न करता तुम्हाला सांगत आहे की, तुम्ही पाखंड्याप्रमाणे वागू नका, ईश्वराशी एकनिष्ठ राहा. तुमच्यावरील तो सर्व संकटे नाहिशी करेल. भरपूर पाऊसपाणी देईल व तुमची भरभराट होईल. ते एकेश्वरत्व न स्वीकारता आपल्या अनेकेश्वरत्वाला सोडण्यास तयार झाले नाहीत. उलट आमच्या परंपरागत चालत आलेल्या दैवतांपैकी कोणाचा तरी कोप आमच्यावर झाला आहे असे म्हणू लागले. हूद (अ.) त्यांना वारंवार "अल्लाहची उपासना करा, त्याच्याशिवाय कोणीही उपास्य नाही" हे सांगत होते. त्यांच्या ठायी प्रेषितत्वाची चिन्हे होती, पण आद त्यांना मानण्यास तयार नव्हते. या जगाचा तोच स्वामी आहे व सर्वचजण त्याच्याच अधीन आहेत. तुम्ही जर एकेश्वरवादी बनून केवळ अल्लाहची उपासना करण्याचे नाकारत आहात तर तुम्हाला हटवून अल्लाह दुसऱ्या समूहास येथे आणेल असे धमकावले; पण ते ऐकून घेण्यास तयार नव्हते. शेवटी अल्लाहने हूद (अ.) व त्यांचे अनुयायी यांना वाचवले आणि बाकीच्यांना त्यांच्या प्रेषितांच्या संदेशाला नाकारले म्हणून त्यांना भयंकर कोपाने नष्ट केले. हा कोप वादळाच्या रूपाने आला."

सूरह 'अहकाफ' मधील आयत २४ व २५ मध्ये व सूरह 'जारीयात' मधील आयत ४१ व ४२ मध्ये त्यांचा कसा नायनाट झाला याची माहिती आली आहे.

सूरह 'हूद' मधील आयत १२३ ते १३९ मध्ये हूद (अ.) यांचे सर्व प्रयत्न फोल ठरले. पण त्यांचे लोक उलट त्यांची निर्भर्त्सना करू लागले. सूरह 'अहकाफ' मधील आयत २१ ते २६ प्रमाणे त्यांच्यावर आलेल्या ईशकोपाची आज्ञा आली व जो जनसमूह संपवला गेला. तसेच सूरह सात 'अआराफ' मधील आयत ६५ ते ७२ मध्ये हूद (अ.) यांचा समूह कसा नष्ट झाला याची माहिती आहे.

या आद लोकांनी मोठाले महाल बांधले होते, भव्य इमारती व मंदिरे ते बांधत होते. ते अनेक देव-देवतांचे व ग्रह-ताऱ्यांचे उपासक होते.

साकिआह, सातिमाह, रझिकाह व हाफिझून या त्यांच्या देवता होत्या. शहाद हा त्यांचा प्रसिद्ध राजा झाला. त्याने खूप राज्यविस्तार केला व आदांच्या राज्याच्या सीमा या सीरिया, इराक व पूर्वीच्या हिंदुस्थानच्या सरहद्दीपर्यंत पोहचल्या होत्या. त्यांच्याजवळ सोने-नाणे, पशुधन व संतती यांचे वैभव ओसंडून वहात होते. शहादने आदानजवळ

एक भव्य व दिव्य राजवाडा बांधला होता. त्याला 'इरामणचे उद्यान' म्हणत असत. त्यांची संपन्न शेतीवाडी, बागबगिचे होते. परंतु सुबत्तेबरोबर त्यांच्यात उन्मत्तपणाही वाढला. शेवटी ईश्वराने प्रेषित हूद (अ.) यांना त्यांच्यात सुधारणा करण्यासाठी नियुक्त केले. हूद (अ.) एकेश्वरत्वाचे आवाहन करत राहिले. उच्चपदस्थ असलेल्या आद लोकांनी त्यांची 'खुळा बावळा' म्हणून निर्भर्त्सना केली. ईश्वराच्या कोपाने सतत तीन वर्षे दुष्काळ पडला तरी ते लोक सुधारले नाहीत.

कुरआनात दर्शविल्याप्रमाणे त्यांच्या भागात आठ दिवस व सात रात्री भयंकर झंझावाताने सर्व पार मुळापासून उखडून टाकले. परंतु हूद (अ.) यांच्या अनुयायांना सुखरूप वाचविले व आपल्या कृपाछत्राखाली घेतले आणि दुष्कर्म्यांना पूर्ण नष्ट केले. कुरआनात हूद (अ.) यांच्या नावाने ११ वा सूरह 'हूद' या नावाने आला आहे.

जे लोक वाचले ते यमनमध्ये स्थिरावले. अरब लोक रजब महिन्यात हूद (अ.) यांच्या हजरा मौत येथील मजारवर दर्शनासाठी जातात.

सूरह 'हूद' मधील १२० व्या आयतीत म्हटले आहे, "आणि हे प्रेषित मुहम्मद (स.) या प्रेषितांच्या गोष्टी तुम्हाला ऐकवित आहोत. या त्या गोष्टी आहेत ज्यांच्याद्वारे आम्ही तुमचे हृदय बळकट करतो. त्यांच्यात तुम्हाला सत्याचे ज्ञान मिळेल आणि ईमान आणणाऱ्यांना उपदेश आणि जागृती लाभेल."

म्हणजेच कुरआनात आलेल्या प्रेषितांच्या गोष्टी तुम्हाला केवळ कथा किंवा वृत्तान्त अथवा इतिहास सांगण्यासाठी नाही तर त्यात तीन उद्देश आहेत - (१) ते किती उच्चकोटीचे आध्यात्मिक सत्य होते, (२) मानवांनी त्यापासून मार्गदर्शन, इशारे समजून आपल्या दैनंदिन जीवनाला व्यवस्थित नियंत्रित करावे व (३) यावरून ईश्वराच्या, मानवी जीवन सुरळीत चालण्यासाठी असलेल्या नियम-निर्बंधांची आपण जागरूकपणे व सावधपणे जाणीव ठेवावी.

प्रेषित ईसा मसीह (अ.)

"अल्लाहने आदम, नूह, इब्राहीमची संतती व इमरानची संतती यांना जगातील साऱ्या लोकांवर प्राधान्य देऊन निवडले." (३:३३)

इमरान बिन मातान हे माननीय मरियम यांच्या वडिलांचे नाव होते. ते ईसा (अ.) यांचे आजोबा असून प्रेषित दाऊद (अ.) यांचे वंशज होते. मरियम व ईसा (अ.) हे नावाजलेल्या व कुलीन घराण्यातील होते. इमरान यांची पत्नी हन्ना गरोदर असताना इमरान यांचा मृत्यू झाला. हन्ना यांनी होणारे मूल ईश्वराच्या नावाने भक्तीसाठी अर्पण करीन

असा नवस केला होता. बनी इस्राईल लोकांत देवाला मूल अर्पण करण्याची पद्धत होती. हन्ना यांना मरियम ही मुलगी झाली. मरयम अनाथ होत्या. त्यांचे पालकत्व जकरिया (अ.) यांच्याकडे दिले गेले. ते मरियमच्या मावशीचे पती होत.

कुरआनमधील ३:४४ मध्ये म्हटले आहे, "जेव्हा ते मरियमचा पालक ठरविण्यासाठी आपापल्या लेखण्या फेकीत होते आणि तुम्ही त्यावेळीही हजर नव्हता जेव्हा ते आपसात भांडत होते." या काळात अशी पद्धत होती की आपापल्या लेखण्या नदीत फेकल्या जात असत आणि ज्यांची लेखणी नदीच्या प्रवाहात परत येत असे त्याच्या बाजूने निर्णय केला जात असे. त्याला 'कुर्राअंदाजी' म्हणत व ते शास्त्रसंमत होते.

मरियम अनाथ असल्यामुळे ईश्वराने त्यांच्या उदरनिर्वाहाची खास अशी व्यवस्था केली होती. त्या ज्या खोलीत (हॅकलच्या) राहात असत तेथे त्यांचे जेवणाचे ताट व फळफळावळ आपोआप हवेतून खाली येत असे. हे मरियम यांचे पालक जकरिया (अ.) यांनी तेथील खास पदार्थ स्वत: पाहिले होते. मरियम हॅकलमध्ये जेरुसेलम येथील एका खोलीत एतिकाफ करीत होत्या.

"आणि जेव्हा फरिश्ते म्हणाले, हे मरियम! अल्लाह तुला एका वचनाची खूशखबर देत आहे. त्याचे नाव मरियमपुत्र ईसा मसीह असेल, जो हे जग व आखिरत दोहोंमध्ये प्रतिष्ठित होईल. आणि अल्लाहच्या निकटवर्तीयांपैकी असेल." (३:४५)

"कलि मतिम् मिनल्लाह" - अल्लाहचे वचन म्हंणजे ईसा (अ.) आहे.

"तो पाळण्यात असतानादेखील लोकांशी बोलेल व उतारवयातसुद्धा आणि सदाचारी लोकांपैकी असेल." (३:४६)

"हे माझ्या पालनकर्त्या! मला पुत्र कसा होईल जेव्हा मला कोणी पुरुषाने हातदेखील लावला नाही. फर्माविले, अल्लाह जे इच्छितो ते होते. त्याने फक्त 'हो' म्हणताच ती गोष्ट होऊन जाते." (३:४७)

"आणि अल्लाह त्याला ग्रंथाची व बुद्धीची शिकवण देईल आणि त्याला 'इंजील' व 'तौरात' शिकवील." (३:४८)

या चार आयतींवरून स्पष्ट होते की, ईसा (अ.) हे अल्लाहचे पुत्र नसून त्याच्या कृपेने नवाजलेले मानवच होते. त्यामुळे त्यांना अल्लाहचे पुत्र मानणे चूक आहे, हे स्पष्ट होते. मसीह हे ईसा (अ.) यांचे उपनाव होते. त्यांचा ईसा बिन मरियम असा जो उल्लेख येतो यावरून बापाशिवाय ते जन्मास आले होते. इतर पैगबरांच्या वडिलांची नावे आली आहेत. पण ईसा (अ.) यांचा उल्लेख मरयमपुत्र असा खुलासा आलेला आहे.

"मी तुमच्याकडे प्रेषित म्हणून पाठविला आहे. मी तुमच्यासमोर मातीपासून पक्ष्यासारखा आकार बनवितो, त्यात फुंक मारतो. तेथे तो अल्लाहच्या आज्ञेने खरोखरच पक्षी बनतो. मी अल्लाहच्या आज्ञेने जन्मजात आंधळ्या व कोड असलेल्याला बरा करतो. आणि मृताला जिवंत करतो. आणि मी तुम्हाला जे तुम्ही खाता व तुम्ही जे काही आपल्या घरामध्ये साठा करून ठेवता ते सांगतो. जर तुम्ही श्रद्धा ठेवीत असाल तर तुमच्यासाठी यामध्ये मोठी निशाणी आहे." (३:४९)

ईसा (अ.) यांनी पाळण्यात असतानाच बोलणे सुरू केले व वरील चमत्कार दाखविले ते ईश्वराज्ञेनेच. कारण प्रेषित स्वतःच्या इच्छेने काही करीत नसतात. ते ईशआज्ञेने होतात. ३:५२ मध्ये हवारीनी ईसा (अ.) यांचे शिष्यत्व घेतले होते व त्यांच्याकडून जे शक्य होते ते सहाय्य करीत होते.

पुढे ३:५४ मध्ये स्पष्ट म्हटले आहे, "बनी इस्त्राईल यांनी ईसाविरुद्ध कट केला, पण अल्लाहने त्याची तोड केली." पुढे ३:५५ मध्ये म्हटले आहे, "मी तुला माझ्या ताब्यात घेणार व माझ्याकडे उठविणार आहे." आदम (अ.) यांना मातीपासून बनविले तर ईसा (अ.) यांना बापाविना निर्माण केले. ४:१५७ मध्ये स्पष्टपणे कुरआनात म्हटले आहे, "ते ना हत्या करू शकले व ना क्रूसावर चढवू शकले. निःसंशय त्यांनी त्यांची हत्या केली नाही." ईश्वराने ईसा (अ.) यांना परस्पर उचलून घेतले असा उल्लेख कुरआनात आलेला आहे की, ते त्यांना ठार करू शकले नाहीत अथवा सुळावर देऊ शकले नाहीत. ईसा (अ.) यांच्याविषयी हदीस अशी आहे की, कयामतच्या दिवशी प्रेषित ईसा कयामत जवळ आली की अवतरित होतील व यहुदींचा सर्वात मोठा नेता व उपद्रव माजवणाऱ्या दज्जालला ठार करतील. दज्जालविषयी बऱ्याच हदीस आलेल्या आहेत. ज्यात दज्जालचा विनाश केला जाईल असे म्हटले आहे. आणखी एक हदीस आहे की, जेव्हा दज्जाल उत्पात निर्माण करीत असेल, अल्लाह मरियमपुत्र ईसा (अ.) ला पाठवील आणि ते दज्जालच्या पूर्व भागात पांढऱ्या मिनारांजवळ पिवळ्या रंगाच्या दोन चादरी परिधान करून दोन फरिश्त्यांच्या बाजूंवर आपले हात ठेवीत अवतरित होतील व जेव्हा डोके झुकवतील तेव्हा जाणवेल की जणू मोत्यांचे दाणे ओघळत आहेत. त्यांच्या श्वासांची जेथपर्यंत हवा जाईल तेथपर्यंत काफिर मरण पावेल. नंतर दज्जालचा पाठलाग करून लुदच्या दरवाजाजवळ पकडून ठार करतील. (मुस्लिम) मरियमपुत्र ईसा (अ.) हे दज्जालला लुदच्या दरवाजावर ठार करतील. (तिर्मिजी)

५:१७ मध्ये "निःसंशय त्या लोकांनी कुफ्र केला ज्यांनी म्हटले की, अल्लाहच आहे मरियमपुत्र मसीह." अत्यंत चूक म्हटले आहे. कारण अल्लाह कोणाचा पुत्र नाही.

५:४६ मध्ये "आम्ही या (प्रेषितांच्या) पाठोपाठ त्यांच्या पदचिन्हांवर मरियमचा पुत्र ईसाला पाठविले."

५:७५ मध्ये "याखेरीज काही नाहीत की मसीह एक प्रेषित होते."

५:११० मध्ये "अल्लाहने ईसा (अ.) यांना ज्या विविध देणग्या दिल्या व त्यांनी जे विविध चमत्कार केले ते केवळ ईशआज्ञेने केले. बाकी काही नाही."

५:११७ मध्ये "मी त्यांना तर दिलेल्या आदेशांखेरीज काहीही सांगितले नाही की अल्लाहची उपासना करा. तो माझाही पालनकर्ता आहे."

१९:२९-३० मध्ये "ते बाळ बोलले जे पाळण्यात आहे. मी अल्लाहचा दास आहे, त्याने मला ग्रंथ दिला व प्रेषित बनविले."

१९:३१-३४ मध्ये "ईसा (अ.) यांना समृद्ध जीवन लाभेल ते नमाज व जकातचा आदेश देतील. मातेचे आज्ञाधारक होतील. सद्‌वर्तनी राहतील. त्यांना शिरजोर व दुर्दैवी बनविले नाही. सलामती राहील त्यांच्यावर व ते मरतील त्या दिवशी, तसेच मृत्युनंतर पुन्हा - जिवंत करून उठविले जातील."

१९:३४-४० मध्ये "अल्लाह सर्वांचा रब आहे, फक्त त्याचीच उपासना करा. फक्त ईश्वर एकमेव आहे व तोच कयामत आणेल."

२१:९१ मध्ये मरियम यांच्याबद्दल गौरविण्यात आले आहे, "तिने आपल्या शीलाचे रक्षण केले होते. आम्ही तिच्यात आपला आत्मा फुंकला आणि तिला व तिच्या मुलाला इहलोकवासियांकरिता एक निशाणी बनविले."

२३:५० मध्ये "ईसा मरियमपुत्र होते." याचा अर्थ ते अल्लाहचे पुत्र नव्हे. "ईसा (अ.) यांचा जन्म बेथलहेम येथे झाला."

३३:७ मध्ये म्हटले आहे, "मरियमपुत्र ईसा (अ.) कडूनही आम्ही पक्के वचन घेतले होते." यातही त्याचा उल्लेख मरियमपुत्र म्हणूनच आला आहे.

४३:६३ मध्ये "आणि जेव्हा ईसा स्पष्ट निशाण्यांसह आला होता, त्याने म्हटले होते की, मी तुम्हा लोकांजवळ बुद्धिकौशल्य घेऊन आलो आहे... तुम्ही अल्लाहचे भय बाळगा व माझे आज्ञापालन करा." त्यांनी इंजिल ग्रंथ आणला. अल्लाहचे भय बाळगा व मी त्याच्याच आज्ञा तुम्हाला ऐकवित आहे. (कारण प्रेषित स्वत:चे काही सांगत नाही.)

६१:४ मध्ये "आणि शुभवार्ता देणारा आहे एका प्रेषिताची, जो माझ्यानंतर येईल त्याचे नाव अहमद असेल."

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आगमनाची भविष्यवाणी ईसा (अ.) यांनी केली आहे.

ईसा (अ.) मानवच होते, अल्लाहच्या फर्मानाने त्यांचा जन्म झाला. ते अल्लाहचे पुत्र नाहीत. फक्त मरियम यांचेच पुत्र होत व विना बापाचा त्यांचा जन्म झाला आहे. त्यांना विविध शक्ती अल्लाहने प्रदान केल्या होत्या व ईशआज्ञेनेच त्यांनी चमत्कार केले. त्यांचा उपदेश पूर्वीच्या प्रेषितांच्या उपदेशाप्रमाणेच असून ते फक्त एक प्रेषित होते ईशपुत्र नव्हते.

प्रेषित इब्राहीम (अ.)

प्रेषित इब्राहीम (अ.) हे बनी इस्माईल व बनी इस्राईल या दोहोंचे पितामह होते. यहुदी, ईसाई व मक्केचे अनेकेश्वरवादी त्यांना मानत असत. इब्राहीम (अ.) हे कधीही अनेकेश्वरवादी नव्हते व मुस्लिम होते.

“हे ग्रंथधारकांनो! तुम्ही इब्राहीमसंबंधी का वाद घालता? यद्यपि तौरात व इंजिल हे तर त्यांच्यानंतर उतरले गेले.” (३:६५)

“इब्राहीम (अ.) ना यहुदी होते ना ख्रिश्चन, ते एक सरळमार्गी मुस्लिम होते. ते कधीही अनेकेश्वरवादींपैकी नव्हते.” (३:६७)

“अल्लाहने इब्राहीम (अ.) यांना आपला सच्चा मित्र बनविले होते.”(४:१२५)

इब्राहीम (अ.) यांचा काळ ईसा पूर्वी तीन हजार वर्षांचा आहे. ते दक्षिण इराकमधील ‘उर’ गावचे रहिवासी होते. ‘उर’ फुरात नदीच्या काठी वसलेले होते. त्यांच्या वडिलांचे नाव तेराह व आडनाव आधर होते. बायबलमध्ये त्यांच्या वडिलांचे तारह हे नाव आलेले आहे. कुरआन ही माहिती मानत नाही.

इब्राहीम (अ.) यांचे वडील उत्तम कारागीर होते व ते लाकडी बाहुल्या बनवत. त्यांच्या समाजात लाकडी आणि पाषाणाच्या मूर्तींची उपासना चाले. त्यांचे वडील मूर्तीपूजक होते व आपल्या मुलानेही तशीच उपासना करावी असा त्यांचा आग्रह होता. इब्राहीम (अ.) म्हणत, “ज्या मूर्ती पाहू शकत नाहीत, ऐकू शकत नाहीत व बोलूही शकत नाहीत अशांची उपासना मी करणार नाही.” त्या समाजात पुजारीवर्गाचे महत्त्व व प्राबल्य होते. ते मूर्तीपूजा विधीतून भरपूर पैसा मिळवीत व त्यांना समाजात व राजदरबारात मानाचे स्थान होते. सामान्य जनता राज्यकर्ते व धर्ममार्तंड यांच्या जुलूमाखाली भरडली जात होती.

इब्राहीम (अ.) यांना ईश्वराने प्रेषित म्हणून निवडले व आद्य देवदूत जिब्राईल (अ.) यांच्यामार्फत त्यांना ईशआज्ञा दिली गेली. मूर्तीपूजा त्यांना मान्य नव्हती. त्यांनी

ईशआज्ञांचा प्रचार करण्यास सुरुवात केली. त्यांना समाजात प्रस्थापित पुजारीवर्ग व प्रतिष्ठित वर्गाने अतिशय तीव्र विरोध केला. पण त्यांनी कणखरपणे व निश्चयाने ग्रह-तारे, चंद्र, सूर्य यांच्या वाडवडिलांपासून चालू असलेल्या उपासनांना विरोध केला. त्यामुळे त्यांच्याबद्दल भयंकर असंतोष निर्माण झाला. उलट वाडवडिलांचा मार्ग जर चुकीचा असेल तर तो आपण मानणे योग्य नाही, असे इब्राहीम (अ.) यांचे म्हणणे होते. सर्व विश्वाचा जो स्वामी आहे तोच खरा आपला एकमेव ईश्वर आहे, असे ते आग्रहाने प्रतिपादन करीत. "मी निश्चितच तुम्ही दूर गेला असताना तुमची मूर्तीपूजा कशी फोल आहे, हे तुम्हाला दाखवून देईन, त्याला तुम्हीही साक्षी आहात आणि अल्लाहलादेखील हे माहिती आहे." ही माहिती सूरह 'अल अंबिया'तील आयत ५३ ते ५८ मध्ये मिळते.

इब्राहीम (अ.) ज्या प्रदेशात राहात होते त्या प्रदेशावर नमरूद नावाच्या राजाचे राज्य होते. त्याच्याजवळ मोठे सैन्य होते व तो एका मोठ्या किल्ल्यात राहात असे. स्वत:ला तो खुदावंद म्हणवत असे व प्रजेने ईश्वराप्रमाणेच आपणास मानले पाहिजे हा त्याचा आग्रह होता. प्रजेवर जुलूम करून त्याने आपली दहशत निर्माण केलेली होती. त्याने इब्राहीम (अ.) यांना बोलावून "तू लोकांना अदृश्य ईश्वराच्या उपासनेस कशासाठी उद्युक्त करतोस." असा जाब विचारला. आपल्या निश्चयी स्वभावानुसार इब्राहीम (अ.) यांनी तोच अदृश्य ईश्वर माझा व आपल्या सर्वांचा निर्माता व पालनकर्ता आहे. तोच सर्वांचा जीवनदाता व जीवनहर्ता आहे. इतर कोणीही त्याचे स्थान घेऊ शकत नाही, असे राजाला ठणकावून सांगितले. त्यावर राजाने सांगितले, मीही कोणाला जीवनदान देतो किंवा मृत्यू देतो. तेव्हा इब्राहीम (अ.) यांनी मोठा खोचक व चतूर सवाल राजाला केला, "माझा पालनकर्ता सूर्याला पूर्वेकडून उगवतो व पश्चिमेस मावळतो तसे तुम्ही करू शकाल काय?" या खोचक प्रश्नाने नमरूद निरुत्तर होऊन खजिल झाला.

आता मूर्तींची आगतिकता व त्यांची उपासना कशी फोल आहे हे त्यांना सर्वांना पटवून द्यायचे होते. ते तशा संधीची वाट पाहात होते. तशी संधी येताच त्यांनी तिचा लाभ उठविण्याचे ठरविले. त्यांच्या वस्तीत मोठा उत्सव गावाबाहेर चालला होता. गावातील व वस्तीतील सर्व लोक त्यासाठी जमले होते व नशापाणी करून धुंद झाले होते. इब्राहीम (अ.) यांनी या संधीचा फायदा घेतला. ते मंदिरात शिरले व त्यांनी एका हातोड्याने मोठी मूर्ती सोडून सर्व मूर्त्या फोडून त्यांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या केल्या व हातोडा मोठ्या मूर्तीच्या गळ्यात अडकवून ठेवला. दुसऱ्या दिवशी मंदिर उघडताच मूर्तींचा झालेला विध्वंस पाहिला व ते बेभान झाले. हा विध्वंस करणारा कोण? हा प्रश्न सर्वांना सतावू लागला. प्रत्येकाच्या मनात इब्राहीम (अ.) यांचेच कृत्य आहे, असे खात्रीने वाटत होते. कारण

मूर्तीपूजेची सातत्याने जाहीररीत्या निर्भर्त्सना इब्राहीम (अ.) करीत असत. शेवटी राजासमोर इब्राहीम (अ.) यांच्याकडे त्याबद्दल विचारणा करण्यात आली तेव्हा इब्राहीम (अ.) यांनी "हे कोणी केले? ते त्या तेथेच असलेल्या मोठ्या मूर्तीस विचारा. तीच त्याचे उत्तर देऊ शकेल!" असे सांगितले. या उत्तराने सर्व स्तिमीत झाले. कारण दगडी मूर्ती न काही पाहू शकतात न बोलू शकतात हे त्यांना माहीत होते. या संपूर्ण प्रसंगाचे वर्णन सूरह 'अल अंबिया' यातील आयत ५७ ते ६५ व ६८ मध्ये आलेले आहे. अशा रीतीने इब्राहीम (अ.) हे इस्लाममधील पहिले मूर्तीभंजक होते. इब्राहीम यांच्याबद्दल लोकांना भयंकर राग होता. राजदरबारी उच्चभ्रू व पुजारीवर्गाने संगनमत करून हटवादीपणे इब्राहीम (अ.) यांना धगधगत्या आगीत (भट्टीत) झोकण्याचे ठरविले. त्यांनी त्यांचे हातपाय बांधून त्यांना धगधगत्या भट्टीत झोकले.

सूरह 'अंबिया'तील ७० व्या आयतीत म्हटले आहे,

"ईश्वराच्या आज्ञेने आगीने इब्राहीम (अ.) यांना कोणतीही इजा केली नाही. अग्नी थंड झाला होता." ईशआज्ञेने अग्नीने इब्राहीम (अ.) यांना सुखरूप ठेवले व ते एकही चटका न बसता भट्टीतून बाहेर आले. विशेष म्हणजे अज्ञानाने गुरफटलेले लोक यातून काही शिकले नाहीत. इब्राहीम (अ.) एवढ्या अग्नीदिव्यातून बाहेर पडले हे पाहूनही अज्ञानी समाज त्यांचे काही ऐकून घेण्यास तयार नव्हता. तो भाग सोडून इब्राहीम (अ.) यांना पॅलेस्टाइन भागात जाण्याची ईशआज्ञा झाली. त्याप्रमाणे पॅलेस्टाइनच्या भागात स्थलांतर केले. (हिजरत केली). (२१:५१-७१)

२६:६९-७८ यात "इब्राहीमने आपल्या लोकांना मूर्तीपूजेस त्यागून खोट्या उपासनांच्या मागे न जाण्याचे, एकेश्वरत्वावर श्रद्धा ठेवण्याचे आवाहन केले. पण व्यर्थ." नक्षत्रे, ग्रह, तारे, सौदर्य देवता, सूर्य, चंद्र यांच्या पूजेस विरोध केला.

२९:१६-१७ मध्ये, "इब्राहीम (अ.) यांनी एकेश्वरत्वाची शिकवण दिली. मूर्तीपूजेपासून अलिप्त व्हा, म्हणून बजावले. सर्वज्ञानी, सर्वव्यापी व सर्वशक्तिमान ईश्वराचीच फक्त उपासना करण्याचे आवाहन केले."

६:४८-८२ यात त्यांनी मूर्तीपूजा न करण्याचे वडिलांना सांगितले.

२९:२४-२६ मध्ये इब्राहीम (अ.) यांना अग्निदिव्यातून कसे जावे लागले व ईशआज्ञेने स्थलांतर करावे लागले याची माहिती आली आहे. तसेच लूत (अ.) यांनी इब्राहीम (अ.) यांचे स्थलांतर व ईशआज्ञा यांच्याविषयी माहिती दिली आहे.

इब्राहीम (अ.) यांची पहिली पत्नी सारा हिला संतती न झाल्याने त्यांनी हाजरा किंवा हाजीरा ही दुसरी पत्नी केली. इब्राहीम (अ.) यांनी पुत्रप्राप्तीसाठी ईश्वराची करूणा भाकली. ईश्वराने त्यांना पुत्र प्राप्त होण्याचे वरदान दिले.

२९:२७-३१ मध्ये माहिती मिळते की, "इब्राहीमला इसहाक व याकूब दिले व त्याच्या वंशात प्रेषित व ग्रंथ दिला. त्याला जगात मोबदला दिला व आखिरतमध्येही देऊ."

३७:८३-११३ यात इब्राहीम (अ.) मूर्तीपूजेविरुद्ध सतत प्रचार केला, मूर्तीभंजन केले व शेवटी त्यांनी ईशआज्ञेने तो भाग सोडून गेले. तेव्हा पुत्रप्राप्तीसाठी प्रार्थना केली ती ईश्वराने मंजूर केली व त्यांना इस्माईल (अ.) सदाचारी व शांत आणि गंभीर वृत्तीचा पुत्र देणार असल्याची वार्ता दिली.

५१:२४-३७ यात आले आहे की लूत समाजाला नष्ट करण्यासाठी गेलेल्या फरिश्त्यांनी त्यांना एका येणाऱ्या ज्ञानी पुत्राची खबर दिली. फरिश्ते व इब्राहीम (अ.) आणि त्यांची पत्नी यांच्यात झालेला संवाद वरील आयतींमध्ये सविस्तर आला आहे. त्यांनीच लूत समाजावर भाजलेल्या मातीचा, दगडांचा व खंगरांचा वर्षाव करणार आहोत, हे इब्राहीम (अ.) यांना सांगितले.

५७:२६ मध्ये "आम्ही नूह आणि इब्राहीमला प्रेषित बनवून पाठविले आणि या दोघांच्या वंशामध्ये प्रेषितत्व आणि ग्रंथ राखले. तेव्हा त्यांच्यापैकी काही लोकांनी मार्गदर्शन पत्करले आणि बहुतेक दुराचारी झाले."

नूहच्या वंशातील प्रेषित हूद, सालेह, इब्राहीम व लूत हे सर्व एकाच वंशातील होत. इब्राहीम-इस्माईल व मुहम्मद (स.) हे बनी इस्माईल म्हटले जातात. कुरआन हा ईशग्रंथ या वंशात आला, तर बनी इस्त्राईल म्हणजे इसहाक, याकूब वगैरे अनेक प्रेषित व जबूर, इंजिल हे ईशग्रंथ या वंशातील प्रेषितांवर अवतरित झाले.

इब्राहीम (अ.) यांना त्यांच्या वयाच्या ८६ व्या वर्षी हाजरा या पत्नीपासून इस्माईल (अ.) हा पुत्र झाला. त्यानंतर काही महिन्यांनी त्यांना बाथाकडे (मक्का) येथे जाण्याची ईशआज्ञा झाली व त्याप्रमाणे ते वाळवंटातील अत्यंत त्रासदायक प्रवास करीत ईशआज्ञेने सांगितल्या ठिकाणी पोहोचले. तो भाग खडकाळ व टेकडांचा असून तेथे एकही झाडझुडूप नव्हते. तेथे पोहोचल्यावर काही दिवसांत इब्राहीम (अ.) यांनी आपली पत्नी व मुलगा इस्माईल यांच्यापाशी थोडी खाद्यसामुग्री दिली व पाण्याची एक मशक ठेवली. तेथून ते मागेदेखील वळून न पाहता ईशआज्ञेप्रमाणे पॅलेस्टाईनकडे निघून गेले.

जवळचे पाणी संपताच आई हाजरा तहानेने व्याकूळ झालेल्या इस्माईल (अ.) या लेकरासाठी जवळपासच्या टेकडावर पाणी मिळते का म्हणून धुंडाळू लागल्या. सफा व मरवा या दोन टेकड्यांमध्ये त्या फेऱ्या मारू लागल्या, पण पाणी मिळाले नाही. शेवटी हताश होऊन त्या परतल्या. पाहतात तो इस्माईल (अ.) यांनी तहानेने व्याकूळ होऊन ज्या जागी टाचा रगडल्या होत्या तेथे त्यांना पाण्याचा झरा निघालेला दिसला. मायलेकरांनी त्या झऱ्याच्या पाण्याने आपली तहान भागवली. त्या झऱ्याच्या भोवती कडा बांधला. तो झरा आजही ज़मज़म झरा म्हणून प्रसिद्ध आहे. मक्केहून परतताना हजहून परत येणारे यात्रेकरू ते पाणी तीर्थ म्हणून घेऊन जातात. (जवळपास चार साडेचार हजार वर्षे) प्रतिवर्षी लाखो करोडो लिटर पाणी त्यातून वहाते तरी तो झरा आजही तेथे अव्याहत वहात आहे. वाळवंटात मुबलक पाणी असलेल्या या झऱ्याभोवती लोकवस्ती वसू लागली व तीच वस्ती साडेतीन ते चार लाखांची मक्का नगरी म्हणून आज ओळखली जाते. पाण्यासाठी हाजरा यांनी सफा व मरवा येथे ज्या फेऱ्या मारल्या त्यालाच 'सई' म्हणतात व मक्कायात्रेत 'सई' करणे हा एक महत्त्वाचा विधी मानला जातो.

ईशआज्ञेप्रमाणे इब्राहीम (अ.) मक्केस आले व ईश्वराने दाखविलेल्या जागी अल्लाहच्या उपासनेसाठी तेथे एक घर बांधले. तेच आजचे काबागृह होय. इब्राहीम (अ.) यांनी हे जे काबागृह बांधले व त्याचे बांधकाम पूर्ण झाले तेव्हा अल्लाहने त्यांच्या श्रद्धेने भारावून जाऊन काबागृहास आपले घर म्हणून घोषित केले. "ज्याला (माझी) अल्लाहची उपासना करावयाची असेल त्याने या काबागृहाची यात्रा करावी," असा आदेश दिला व तसे इब्राहीम (अ.) यांना घोषित करण्यास सांगितले. त्यांनी ईशआज्ञेप्रमाणे 'ऐलान' केले व आश्चर्य म्हणजे सर्व अरबस्तानातील लोकांना ती आज्ञा ऐकू गेली व "लब्बैक! लब्बैक अल्लाहुम्मा लब्बैक" म्हणजे, "मी तुझ्या सेवेत हजर आहे. हे अल्लाह, मी हजर आहे," असे म्हणून लोकांनी मक्कायात्रेस जमण्यास सुरूवात झाली. पवित्र कुरआनात १४:३५, ३७ व ४१, २:१२६, ६:७४-८३, २२:२६-३३ मध्ये याबद्दल सविस्तर माहिती मिळते.

काबाचे बांधकाम ज्या शिलेवर उभे राहून इब्राहीम (अ.) पाहात होते, तेथे त्यांच्या पाऊलाचा ठसा उमटलेला आहे, ज्याला 'मकामे इब्राहीम' म्हणतात. त्या जागी यात्रेकरू दोन रकअत नमाज पढतात. या बांधकामाच्या वेळी इस्माईल (अ.) हे वडिलांबरोबर कामावर देखरेख ठेवीत असत. आपला मुलगा मोठा होताच इब्राहीम (अ.) यांनी "आपण

ईशआज्ञेने तुझी कुर्बानी देत आहे असे स्वप्न पाहिले'' म्हणून इस्माईल (अ.) यांना सांगितले. तेव्हा ''आपण आपले स्वप्न पूरे करा'' असे इस्माईल यांनी आपल्या पित्यास सांगितले. त्याप्रमाणे मुलास घेऊन 'मिना' येथे गेले व त्याला पालथे पाडून कुर्बानी देण्यासाठी सुरी घेतली. तेव्हाच ईशवाणी अवतरली, ''इब्राहीम! तू तुझे वचन सत्य केलेस.'' इस्माईलच्या जागी एक मेंढा कापला गेला व ही घटना जिलहज्जच्या १० तारखेस घडली म्हणून आजही त्या दिवसास 'कुर्बानीची ईद' म्हणून जगभर साजरी केली जाते. या कुर्बानीप्रसंगी सैतानाने इब्राहीम (अ.) यांना आपल्या इराद्यापासून बहकवण्याचा प्रयत्न केला होता म्हणून मिना येथे 'रमी' सैतानाचे प्रतीक असलेल्या तीन स्तंभांवर कंकर मारले जातात.

कुरआनात २:१२५,१२७,१३५,२५८; ३:३३,६५,६७,६८,९५; ४:१२५; ६:७४-७६,७९-८१,८४-८६; ११:६९-७६; १४:३५-४१; १५:५१-५७; १६:१२०-१२४,१२९; १९:४१-५०; २२:१६,१७,२७-२९ यात इब्राहीम (अ.) यांच्याविषयीचा सर्व वृत्तान्त सविस्तर आलेला आहे.

इब्राहीम (अ.) यांची शिकवण ''एकेश्वरत्व, ईश्वराचा कोणीही सहभागी नाही. ग्रह, नक्षत्रे, तारे, चंद्र, सूर्य यांची उपासना अजिबात करू नका,'' कुरआनातील अध्याय सूरह २९, ३७, ४३, ५१, ५७, ६०, ६१ यात मांडलेली दिसते.

(१) मूर्तीपूजेपासून परावृत्त व्हा. (२) अल्लाहचा कोणीही सहभागी नाही. (३) लोकांनी सन्मार्गी राहावे.

कुरआनात अनेक ठिकाणी इब्राहीम (अ.) अत्यंत कोमल हृदयाचे व सन्मार्गी प्रेषित असून त्यांना इहलोकात व परलोकातही उच्च स्थान मिळाले आहे. इब्राहीम (अ.) यांचा उल्लेख कुरआनातील जवळपास ३५ सूरहमध्ये आलेला आहे. त्यांचा संदर्भ जवळपास ७० ते ८० वेळेला आलेला आहे. त्यांचे जीवन ईशश्रद्धेचे जीवन होते. त्यांना अनेक दिव्यातून जावे लागले, पण त्यांची ईशश्रद्धा अविचल राहिली.

विशेष म्हणजे मुस्लिम, यहूदी व ख्रिश्चन सर्वचजण त्यांना महान प्रेषित मानतात. वयाच्या १७५ व्या वर्षी ते निर्वाणास गेले व त्यांची मजार जेरुसलेमच्या नैऋत्येस ३२ किलोमीटर अंतरावर हेब्रॉन येथे आहे. या महान प्रेषितांपासूनच बनी इस्माईल व बनी इस्त्राईल हे दोन महान वंश निर्माण झाले, ज्यात अनेक प्रेषित झाले. अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) हे बनी इस्माईल या वंशात जन्मले.

प्रेषित इस्माईल (अ.)

प्रेषित इस्माईल (अ.) यांनी त्यांचे वडील प्रेषित इब्राहीम (अ.) यांच्यासमवेत काबागृह उभारले. इब्राहीम (अ.) आणि इस्माईल (अ.) यांना अल्लाहचा आदेश होता,

"माझ्या या घराला परिक्रमा आणि एकांतवास तसेच रुकुअ व सजदा (नमाज अदा) करण्यासाठी स्वच्छ (पवित्र) ठेवा." (कुरआन - २:१२५)

इस्माईल (अ.) सत्यवचनी नबी व प्रेषित होते.

"आणि या ग्रंथात इस्माईल (अ.) चा उल्लेख करा. तो वचनाचा खरा होता आणि प्रेषित होता. तो आपल्या कुटुंबियांना नमाज आणि जकातची आज्ञा देत होता आणि आपल्या पालनकर्त्यापाशी तो एक प्रिय मनुष्य होता." (कुरआन - १९:५४-५५)

इस्माईल (अ.) यांना अल्लाहने जगवासियांवर श्रेष्ठत्व प्रदान केले. प्रेषित इस्माईल (अ.) संयमी होते. ते अल्लाहच्या हुकुमावरून स्वतःला कुर्बान करण्यास तयार झाले.

"तो मुलगा (इस्माईल (अ.)) जेव्हा त्याच्यासमोर धावपळ करण्याच्या वयात आला तेव्हा (एके दिवशी, पिता) इब्राहीम (अ.) ने त्याला सांगितले, 'हे माझ्या मुला, मी स्वप्नात पाहतो की मी तुला बळी देत आहे, आता तू सांग तुझा काय विचार आहे?' त्याने उत्तर दिले, 'हे पित्या, जी काही आज्ञा आपणास दिली जात आहे, तसेच करा. अल्लाहने इच्छिले तर आपणास मी धैर्यशील आढळेन. सरतेशेवटी जेव्हा या दोघांनी आज्ञापालनात मान तुकविली. आणि इब्राहीम (अ.) यांनी पुत्र इस्माईलला पालथे केले आणि आम्ही पुकारले, 'हे इब्राहीम, तू स्वप्न साकार केलेस. आम्ही सत्कर्म करणाऱ्यांना असाच मोबदला देत असतो. निश्चितच ही एक उघड परीक्षा होती. आम्ही एक मोठे बलिदान प्रतिदानात देऊन त्या मुलाची सुटका केली. आणि त्याची प्रशंसा व गुणगान भावी पिढ्यांत सदैव ठेवले.'" (कुरआन - ३७:१०२-१०९)

प्रेषित मूसा (अ.)

पवित्र कुरआनात वारंवार ज्या प्रेषितांचा उल्लेख आला आहे त्यापैकी मूसा (अ.) हे एक होत. कुरआनात त्यांच्या नावाचा उल्लेख जवळपास १६० वेळा आला आहे. पॅलेस्टाइनच्या समृद्ध भूमीवर यहुदी त्यांच्यामुळेच स्थायिक झाले.

यूसुफ (अ.) यांच्यामुळे इजिप्तमध्ये यहुदी मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित झाले. तेथे त्यांच्यामुळे त्यांचा मोठा जनसमूह स्थायिक झाला. परंतु ते सतत इतर लोकांपासून वेगळेच राहिले व त्यांनी स्वत:ची ओळख स्वतंत्रच राखली. पण जशी त्यांची संख्या वाढू लागली तसा इजिप्तचा राजा फिरऔन अस्वस्थ झाला. (रशियाच्या राजाला जसे 'झार' म्हणत तसे इजिप्तच्या राजाला 'फिरऔन' म्हणत.) वाढत्या संख्येच्या बळावर आपली सत्ता बळकावतील अशी भींती यहूद्यांची फिरऔनला वाटू लागली. त्यातूनच त्याने यहुद्यांच्या पुरुष संततीस जन्मताच ठार करण्यास सुरुवात केली. फिरऔन स्त्री संतीतस जिवंत ठेवत होता, ज्याचा उल्लेख कुरआनात सूरह अल कसस मधील ४ व ५ आयतीत आला आहे. याच सूरहमधील आयतीत फिरऔन ज्यांच्याशी दृष्टपणे वागत होता त्यांनाच प्रबळ करावे व सत्ता प्रदान करावी असे अल्लाहने ठरविले असल्याचा उल्लेख आला आहे.

इजिप्तमध्ये यहुद्यांचा उल्लेख बनी इस्त्राईल म्हणून आला आहे. आपल्या सत्तेच्या जोरावर फिरऔन बनी इस्त्राईलना जुलमाने भरडत होता. त्याच इस्त्राईलींमध्ये प्रेषित मूसा (अ.) यांचा जन्म झाला. मूसा (अ.) यांच्या आईने त्यांना फिरऔनच्या अधिकाऱ्यांपासून लपवून छपवून काही महिने वाढविले व एक दिवस एका बंदिस्त लाकडी पेटीत बंद करून नदीत सोडले. मूसा (अ.) यांची मोठी बहीण त्या पेटीवर लांबून लक्ष ठेवून किनाऱ्यावरून चालत राहिली. एका घाटावर कपडे धुणाऱ्या लोकांनी ती पेटी पाहिली व धरून किनाऱ्यावर आणली व उघडून पाहिली तर त्यात अतिशय गोंडस असा मुलगा दिसला. ते ती पेटी घेऊन राजाकडे गेले. तो गोंडस मुलगा पाहून राणीने त्याला आपणच वाढवू असे राजास सांगितले. ते मूल भुकेने व्याकूळ होऊन रडू लागले. राणीने त्याला दायीकडे दिले पण ते मूल दायीकडे जाऊन दूध न पिता जोरजोरात रडू लागले. या लोकांबरोबर मूसा (अ.) यांची बहीण दरबारात गेली होती. तिने त्या मुलास दूध पाजण्यासाठी एक बाई आणते सांगून मूसा (अ.) यांच्या आईला आणले. मूसा (अ.) या बाईच्या (म्हणजेच त्यांच्या आईच्या) अंगावर दूध पिऊन शांत झाले. अशा रीतीने ताटातूट झालेल्या माय-लेकराची भेट ईशसंकेताप्रमाणे घडून आणली. ही सर्व हकीकत सूरह 'अल कसस' मधील ७ व्या व १०व्या, १३ व्या आयतीत आली आहे. त्याची पुनरावृत्ती सूरह 'तॉहाच्या' ३८ व ३९ व्या आयतीत येते.

मूसा (अ.) फिरऔनच्या राजवाड्यात चैनीत वाढत होते. एकदा ते शहरात फिरत असताना एका ठिकाणी दोन माणसे बाचाबाची करताना त्यांना दिसली. त्यात एक यहुदी होता व दुसरा इजिप्तच्या राजाचा सेवक होता. दोघांत हाणामारी चालू झाली. मूसा (अ.)

यांनी त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला, पण इजिप्शियन ऐकण्यास तयार नव्हता. शेवटी मूसा (अ.) यांनी आपल्या काठीचा त्याच्या डोक्यावर एक तडाखा दिला. त्यात तो इजिप्शियन खाली कोसळला व मेला. हा आपल्या हातून अपघाताने खून झाला आहे त्याचे त्यांना दु:ख झाले व त्यांनी त्याबद्दल ईश्वराची क्षमा-याचना केली. त्याच वेळी एक माणूस धावून येऊन मूसा (अ.) यांना म्हणाला, ''तुम्ही त्वरित निघून जा. तुम्हाला ठार करण्याचा इजिप्शियन लोक कट करीत आहेत.'' त्याच वेळी ईश्वराने मूसा (अ.) यांना स्थलांतर करण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणे मूसा (अ.) त्याच रात्री आपले जुजबी सामान घेऊन अंधारात फिरऔनचा राजवाडा सोडून निघून गेले. ही सर्व माहिती सूरह 'अल कसस' मधील आयती २४, २७, २८ मध्ये आली आहे.

इजिप्त सोडून मूसा (अ.) यांनी मदयनची वाट धरली तेव्हा ते म्हणाले, ''माझा पालनकर्ता मला योग्य मार्गावर लावील.'' आणि मूसा (अ.) जेव्हा मदयनमधील पाणवठ्यावर पोहचले तेव्हा तेथे त्यांना काही धनगर आपल्या जनावरांना पाणी पाजत होते. तेथे दोन युवती आपल्या मेंढ्या घेऊन उभ्या असलेल्या दिसल्या. त्या तेथे का उभ्या आहेत? याची विचारणा मूसा (अ.) यांनी केली. त्यावर त्या म्हणाल्या, जोपर्यंत ते धनगर आपली जनावरे घेऊन जाणार नाहीत तोपर्यंत त्यांना आपल्या मेंढ्यांना पाणी पाजता येणार नाही. आमचे वडील वृद्ध आहेत. त्यामुळे आम्ही हे काम करतो. मूसा (अ.) यांनी पुढे होऊन त्यांच्या मेंढ्यांना पाणी पाजले व ते आपल्या जागी जाऊन बसले. ही माहिती 'अल कसस' मधील २२ व २३ आयतींमध्ये मिळते.

काही वेळानंतर त्या दोन युवतींपैकी एकजण लाजत लाजत परत आली व आपल्या वडिलांनी त्यांना बोलावले आहे असे सांगून ती मूसा (अ.) यांना आपल्या घरी घेऊन गेली. मूसा (अ.) यांनी आपली सर्व हकीकत त्या युवतींच्या वृद्ध पित्यास सांगितली. त्या वृद्धाने त्यांना निश्चिंत राहण्यास सांगितले व आपल्याबरोबर जेवू घातले. त्या दोन मुलींपैकी एकीने मूसा (अ.) यांना आपल्या घरी नोकर म्हणून ठेवावे असे सुचविले. त्या वृद्धाने मूसा (अ.) यांना सुचविले की, आपल्या एका मुलीशी विवाह करून आपल्यापाशी कमीतकमी ८ वर्षे राहून सर्व व्यवहार सांभाळावा. जर दहा वर्षे राहिलात तर जास्त चांगले होईल, असे सुचविले. तेव्हा मूसा (अ.) यांनी तो करार मान्य केला व एका मुलीशी विवाह करून ते तेथेच राहिले. हा सर्व वृत्तान्त 'अल कसस' मधील २५ ते २८ या आयतींमध्ये आलेला आहे.

आपली मुदत संपल्यावर मूसा (अ.) आपल्या कुटुंबियांसमवेत इजिप्तला जाण्यास निघाले. रात्री तूर पर्वताच्या दिशेस त्यांना अग्नी दिसला तेव्हा कुटुंबियांना

तेंथेच थांबवून ते पुढे जाऊन तेथे कोणी आहे का? हे पहाण्यास गेले व तेथून अग्नी मिळाल्यास घेऊन येतो जेणेकरून तुम्हाला शेकोटी करून उब मिळू शकेल. त्या अग्नीच्या दिशेस ते गेले. तेव्हा एका वृक्षाच्या उजव्या बाजूने आवाज आला, "हे मूसा! तू तूरच्या पवित्र खोऱ्यात आला आहेस. तुझी पादत्राने काढ. मी अल्लाह आहे आणि तू लक्ष देऊन ऐक. मी तुला प्रेषित म्हणून निवडले आहे. माझ्याशिवाय इतर कोणीही ईश्वर नाही. तेव्हा माझीच उपासना कर व माझ्या स्मरणासाठी रोज प्रार्थना करीत राहा." सूरह तॉहामधील आयत ११ ते १४.

मूसा (अ.) यांच्या लक्षात आले की आपण ज्याला अग्नी समजतो होतो तो अग्नी नसून ईश्वराच्या तेजाचे प्रतिबिंब होते. त्यानंतर अल्लाहने मूसा (अ.) यांना हातातील काठी फेकण्यास सांगितले. त्यांनी काठी फेकताच त्या काठीचा अक्राळविक्राळ सर्प बनला व तो सरपटू लागला. यावरून मूसा (अ.) मागे पाठ फिरवून पळू लागले. तेव्हा पुन्हा ईशवाणी झाली की, "मूसा तू घाबरू नकोस. तू सुरक्षित आहेस. तुझा उजवा हात तुझ्या गळपट्टीत घाल व बाहेर काढ तो चकाकत निघेल." मूसा (अ.) यांनी तसे करताच त्यांचा हात चकाकून बाहेर निघाला. "या तुला दोन निशाण्या दिल्या आहेत." त्यांनी तो सर्प उचलताच त्याची पूर्ववत काठी झाली. अल्लाहने मूसा यांना फिरऔनच्या दरबारात जाण्याची आज्ञा दिली. तेथे जाऊन त्याला या दोन निशाण्या दाखव म्हणून फर्मावले. परंतु आपल्या हातून फिरऔनचा एक माणूस मारला गेला आहे त्यामुळे फिरऔन आपणासच मारेल याची मूसा (अ.) यांना भीती वाटू लागली. मूसा (अ.) यांना स्वच्छ व स्पष्ट बोलता येत नव्हते. त्यांची जीभ जड होती. म्हणून मूसा (अ.) यांनी आपला भाऊ हारून यांना आपला सहाय्यक म्हणून बरोबर घेऊन फिरऔनच्या दरबारात जाण्याची ईश्वराकडे अनुमती मागितली. अल्लाहने ही अनुमती देताच हारुनसह ते फिरऔनकडे जाऊन पोहचले. सूरह 'अल कसस' मधील ३१ ते ३५ या आयतीत हा वृत्तान्त आलेला आहे.

मूसा (अ.) यांनी फिरऔनच्या दरबारात पोहचून त्यांना मिळालेल्या निशाण्या दाखविल्या, तेव्हा फिरऔनने ही तर जादू आहे म्हणून त्याची टवाळी केली व आपणच फक्त खुदावंत आहोत व इतर कोणांही ईश्वरास मानत नाही अशी प्रौढी मारली. तेव्हा आपल्या हमाना या मंत्र्यास उपरोधाने सांगितले, "एक उंच मनोरा बांध ज्यावर चढून मी मूसा (अ.) चा ईश्वर पाहीन." मूसा (अ.) च्या अल्लाहची त्याने अशा रीतीने हेटाळणी केली.

आता उलट फिरऔनने मूसा (अ.) यांना आपल्या देशातील जादूगारांशी मुकाबला करण्याचे आव्हान दिले. इजिप्तमधील मोठ्या उत्सवाच्या दिवशी सर्व लोकांच्या समक्ष खुल्या मैदानामध्ये हा मुकाबला ठरला. सर्व जादूगार जमले. त्यांनी मूसा (अ.) यांना पहिला डाव टाका म्हणून सूचविले. मूसा (अ.) यांनी "तुम्हीच पहिला डाव टाका" असे प्रतिआव्हान दिले. त्या जादूगारांनी आपल्या जादूचे इंद्रजाल फेकले. तत्क्षणी मूसा (अ.) यांनी आपली काठी जमिनीवर फेकताच तिचा आक्राळविक्राळ सर्प बनला व त्याने या जादूगारांचे इंद्रजाल गिळून टाकले. त्याबरोबर सर्व जादूगार ओरडले, "मूसा (अ.) यांचा अल्लाह महान आहे व आम्ही त्याच्यावर ईमान आणले." चिडून फिरऔनने जादूगारांना त्यांचे हात छाटून टाकण्याची धमकी दिली. तेव्हा ते फिरऔनला म्हणाले, "खुशाल तुला जे करायचे ते कर, पण आम्ही आता अल्लाहवरील श्रद्धा बदलणार नाही."

त्यावेळी अल्लाहचा आदेश आला, "मूसा (अ.) यांनी व तेथील इस्राईल लोकांनी ताबडतोब इजिप्त सोडून निघून जावे. तुमचा पाठलाग जर फिरऔनने केला तर मी तुम्हाला सुखरूप बाहेर जाण्याची व्यवस्था करीन. पण तुम्ही ताबडतोब देशत्याग करा." आदेशाप्रमाणे मूसा (अ.) आपल्या लोकांसह इजिप्त सोडून जाऊ लागले. सागरापाशी येताच सागर दुभंगला व कोरडी वाट समोर आली आणि मूसा (अ.) व त्यांचे लोक त्या मार्गाने बाहेर पडले. (२६:६३)

मूसा (अ.) व इस्राईली इजिप्त सोडून जात आहेत हे दिसताच फिरऔन आपल्या सैन्यासह त्यांचा पाठलाग करत पोहचला व दुभंगलेल्या सागराच्या वाटेने त्यांच्या मागे धावला. ते सर्व मध्यावर येताच ईशआज्ञेने सागराच्या लाटांनी फिरऔन व त्याच्या सैन्यास (सागराच्या पाण्याने) पाण्यात बुडवून टाकले व त्यांना जलसमाधी दिली. 'अल बकरा' मधील ५० वी आयत, 'अल कसस' मधील ३६ ते ४१ या आयतीत ही माहिती आली आहे. त्यातच मूसा (अ.) ईशग्रंथ तौरात व धर्मशास्त्र-कायदेसंहिता दिली याचा उल्लेख आयत ४३-४४ मध्ये आलेला आहे.

मूसा (अ.) यांना अल्लाहने तूर पर्वतावर पाचारण केले. तेथे ४० दिवस व ४० रात्री इजिप्तहून आलेल्या या इस्राईली लोकांना शरिअतचे कायदे व व्यावहारिक जीवनाविषयी मार्गदर्शन दिले. (अल बकरा - ५१)

मूसा (अ.) हे अल्लाहशी बातचीत करत म्हणून त्यांना 'कलीमुल्लाह' म्हटले आहे. एकदा मूसा (अ.) यांनी "आपल्याला दर्शन दे" म्हणून अल्लाहजवळ हट्ट धरला. "चर्मचक्षूंनी मला कोणीही पाहू शकत नाही" हे अल्लाहने बजावले तरी त्यांनी हट्ट धरलाच. तेव्हा त्यांना अल्लाहने "तूर पर्वताच्या पायथ्याशी ये व पाहा, जर तो पर्वत स्थिर

राहिला तर तू मला पाहू शकशील,'' असे फर्मावले. मूसा (अ.) तूर पर्वताच्या पायथ्याशी गेले व पर्वतावर अल्लाहच्या तेजाची नुसती आभा पर्वताच्या भागावर पडताच पर्वताचा तो भाग वालुकामय बनला व मूसा (अ.) बेशुद्ध पडले. ते शुद्धीवर येताच आपल्या हट्टाबद्दल क्षमा मागू लागले व पश्चात्ताप व्यक्त करू लागले. (अल आअराफ - १४३)

ते शरीअतचे आदेश घेऊन परतले तर त्यांनी पाहिले की त्यांच्या गैरहजेरीत बनी इस्राईलनी एक सोन्याचे वासरू करून त्याचे ईश्वर म्हणून उपासना सुरू केली होती. या लोकांनी जादूगार सामरीच्या नादाने हे केले होते. या वासराच्या तोंडाच्या पोकळीतून आवाज येत असे. हे सर्व पाहून मूसा (अ.) यांनी त्यांचे बंधु हारुन यांची खूप निर्भर्त्सना केली व त्यावेळी ''एक गाय कापण्याची अल्लाहची आज्ञा झाली.'' (२:६७) काही लोक पश्चात्ताप व्यक्त करून मूसा (अ.) यांच्या आदेशानुसार उपासनेकडे वळले.

सूरह 'अल बकरा' मधील ६०-६१ व्या आयतीत माहिती मिळते की जेव्हा पाण्याचे दूर्भिक्ष निर्माण झाले तेव्हा त्याच्या लोकांनी ''पाण्यासाठी प्रार्थना करा'' म्हणून मूसा (अ.) यांना विनविले तेव्हा त्यांनी अल्लाहची प्रार्थना केली, तेव्हा ईशआदेश आला की, ''एका अमुक मोठ्या खडकावर लाठी मार.'' त्याप्रमाणे मूसा (अ.) यांनी आपली लाठी त्या खडकावर मारताच त्या खडकातून पाण्याचे बारा स्रोत सुरू झाले. इस्राईलींच्या बारा घराण्यांसाठी हे बारा स्रोत आले. त्यांनी ते प्रत्येक घराण्यासाठी एक याप्रमाणे वाटून घेतले. विशेष म्हणजे आजही हे बारा स्रोत दिसतात व तो बारा फूट उंचीचा व त्यापेक्षा रूंदीचा खडक प्रत्यक्ष पाहावयास मिळतो. त्यांनी पाण्याचा उपयोग करून विविध प्रकारचे अन्नधान्य निर्माण केले.

मूसा (अ.) यांनी आपल्या काही लोकांना नवीन भूभाग शोधार्थ पाठविले. त्यांना भरपूर पाणी असलेला सुपीक भूभाग (पॅलेस्टाइन) सापडला. पण तेथील रहिवासी बलशाली होते. मूसा (अ.) यांनी त्या भूभागावर आक्रमणाची तयारी केली व संख्याबळ आणि शक्तीची वाढ होताच त्या भागावर आक्रमण करून ती भाग जिंकला. इस्राईली त्या भागात स्थायिक झाले. दाऊद (अ.) नंतर इस्राईलींमध्ये मूसा (अ.) बलवान योद्धा म्हणून ओळखले जातात.

जोपर्यंत इस्राईली 'तौरात'वर श्रद्धा ठेवून व शरिअतप्रमाणे वर्तन करीत राहिले तोपर्यंत त्यांची खूप भरभराट झाली. पण पुढे ते भ्रष्ट जीवन जगू लागले व त्यांचे अध:पतन झाले. ते पॅलेस्टाइनमधून हुसकावले गेले व सर्व जगात विखरून परागंदा जीवन जगू लागले. दुसऱ्या महायुद्धानंतर पॅलेस्टाइनमध्ये दोस्तराष्ट्रांच्या मेहरबानीने त्यांचे इस्राईल हे राष्ट्र अस्तित्वात आले. (जवळपास दोन हज़ार वर्षे निर्वासित जीवन जगून ते फिरत राहिले.) इस्राईल हे याकूब (अ.) यांचे उपनाम होते व ते एक प्रेषित होते.

प्रकरण सहावे

प्रेषित मुहम्मद (स.) यांचे जीवन (अल्पचरित्र)

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आगमनापूर्वीचा अरबस्तान

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आगमनापूर्वी अरबस्तानची असलेली धार्मिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती इत्यादींचा आपण आढावा घेतल्यास त्या काळाला 'अज्ञान-काळ' का म्हणतात हे सहज वाचकांच्या लक्षात येते. या अशा भयंकर परिस्थितीचा प्रेषितांच्या शिकवणुकीने जो क्रांतिकारी बदल घडवून आणला, ज्यामुळेच प्रेषित मुहम्मद (स.) यांना महान क्रांतिकारक व अरबांच्यात सर्व विविध सुधारणा घडविणारा व सांस्कृतिक पुनरुत्थान करणारा महामानव म्हटले जाते. विशेष म्हणजे त्यांचे सुधारणा कार्य, सांस्कृतिक कार्य हे अग्रिजन्य खडकावर उभे असलेले दिसते व हे बदल अंतिम प्रलयाच्या दिनापर्यंत टिकणारे ठरणार आहेत.

मूर्तीपूजक अरब

अरब हे कबिल्या-कबिल्याने अथवा टोळ्या-टोळ्यांनी राहात. प्रत्येकाने टोळीशी श्रद्धा राखलीच पाहिजे. टोळीचा अभिमान, टोळीसाठी जगणे व मरणे हा त्यांच्या जीवनाचा अलिखित नियम होता.

टोळीशी प्रत्येकाने एकनिष्ठतेने जगलेच पाहिजे. त्या बाबतीत कोणतीही तडजोड त्यांना मान्य नव्हती. अरब माणूस त्याच्या टोळीशी व टोळीप्रमुखाशी एकनिष्ठ असे. त्यांचा आदर राखण्यासाठी तो आपले सर्वस्व पणास लावण्यातच धन्यता मानत असत. शत्रूबद्दल तीव्र द्वेष त्याच्या मनात खदखदत असे. कोणी वार केल्यास त्याच्यावर प्रतिवार केलाच पाहिजे, न केल्यास त्याला भ्याड समजले जाई. पाणउतारा व मानखंडना याचा योग्य वेळ येताच पुरेपूर बदला घेतलाच पाहिजे. त्यासाठी जमेल त्या रीतीने तयारी ठेवावी व योग्य संधीसाठी टपून राहावे व ती मिळताच सर्व ताकदीनिशी प्रहार केलाच पाहिजे ही त्यांची मानसिकता होती.

आपल्या शत्रूवर भयंकर सूड उगवण्याची भावना त्यांच्या मनात कायम राहात असे. प्रत्येक टोळी स्वतंत्र असल्याने सातत्याने त्यांच्यात रक्तपात घडत असे. त्यांच्यातील वादग्रस्त प्रश्न तलवारीच्या सहाय्यानेच सोडविले जात. त्यांचा सगळा कायदा लढायांच्या कायद्याभोवती, रक्ताचे हाडवैर, रक्ताचा मोबदला व लुटीचा माल या केंद्रबिंदूभोवतीच फिरत असे.

त्यांच्या अनेक देवता होत्या व त्या देवतांच्या स्वतंत्र मूर्ती काबागृहात ठेवत होते. प्रेषितांच्या काळी काबागृहात ३६० अशा देवतांच्या मूर्ती होत्या. त्यात अल लात, अल उझ्झा, अल मनाह याशिवाय वद्द देवता, सुवा देवी, यूनुस देवी, यऊक देवता, नस्त्र देवता, रिआम देवता, अशा अनंत देवता होत्या. सर्वांत मोठी मूर्ती हुबलची होती. उसाफ, नाइला या देवता होत्या. दगडाला मानवी आकार दिलेल्या मूर्तीस 'असनाम' असे म्हणत. कोरलेल्या मूर्तीस 'अवेसान' म्हणत. दगडाच्या मूर्तींना 'दौर' असे म्हणत, ज्याला ते प्रदक्षिणा घालत.

इब्राहीम (अ.) आणि इस्माईल (अ.) यांच्या धर्मश्रद्धेऐवजी ते मूर्तींची व पुतळ्यांची पूजा करू लागले. अरब पुरुष व महिला पूर्णपणे विवस्त्र होऊन टाळ्या वाजवीत काबागृहाला प्रदक्षिणा घालत.

इस्लामपूर्व काळात ग्रह-ताऱ्यांची, वृक्षांची व त्यांच्या टोळीतील मृत वीरांचीही ते पूजा करीत. आकाश (सुहैल), तारे (अल शिरा) बुधाची, गुरूची, शनिची पूजा करीत. प्राण्यांची रूपे असलेल्या अनेक देवता होत्या. देवी-देवतांशिवाय त्यांच्या पुजाऱ्यांशीदेखील आदराने वागत.

पुरोहितवर्गाशिवाय, भूत-पिशाच्च, जिन्न यांची कृपा साधण्यासाठीही ते प्रयत्नशील असत. पूर्वजांच्या कबरींची व थडग्यांचीदेखील पूजा चाले. मृतात्मे मानवी व अमानवी स्वरूप धारण करू शकतात, असा त्यांच्या अंधविश्वास होता.

काही पशु व पक्षी शुभ असल्याचे मानतात. काही अनाकलनीय चिन्हे होती ज्यांची पूजा केली जात असे. शुभ-अशुभ शकून पाहिले जात. त्या काळी कवड्या, फासे, बाण फेकणे वगैरे वापरत. विविध प्रकारे जुगार खेळला जाई, अत्याचार, व्यभिचार, कत्तली नेहमीच घडत. बहुतेक अरब वंशात मुलींना जन्मताच जिवंत गाडत; स्त्रीला उपभोगाची वस्तू मानत, तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नव्हते. स्त्रीच्या मनाचा कोणताही विचार न करता कोणीही कोणाच्याही स्त्रिया आपसांत बदलत, कोणाच्याही मुलीबाळी कोणीही घेऊन जात असत, बापाच्या मृत्यूनंतर त्याचे मुलगे बापाच्या बायका खुशाल बाहुत घेत, त्यांना सावत्र आई म्हणून दर्जा नव्हता. फक्त उपभोगाची वस्तू म्हणून स्त्रीकडे पाहिले जाई.

दारू पाण्यासारखी वापरली जाई. पुरुष स्त्रिया एकत्र बसून दारू पीत, खुशाल उघड्यावर बिभत्स चाळे चालत. चोऱ्या, लूटमार यात 'जो बळी तो कान पिळी' न्याय होता. कोणतेही विधी-नियम नव्हते. स्त्रियांना-मुलींना पळवणे, विकणे सर्रास चालत असे.

काही अरब व्यापारात होते. ते अरबस्तानमध्येही व बाहेरच्या देशांशी व्यापार करीत. जीवनात कोणतीही नीतीमूल्ये नव्हती. वर्षातून एकदा काबागृहाची यात्रा करीत.

मक्का विजयानंतर प्रेषित मुहम्मद (स.) यांनी काबागृहातून सर्व मूर्ती तोडून फोडून फेकल्या, काबागृह मूर्त्यांच्या घाणीपासून मुक्त केले व कुरआनच्या आधारावर शरियत, धार्मिक विधी-नियम, आराधना, आर्थिक व्यवहार आणि सामाजिक अभिसरण सुरू केले. स्त्रीला मालमत्ता म्हणून न समजता पतीच्या, मुलांच्या, वडिलांच्या व इतरांच्या संपत्तीत कुरआनात सांगितल्याप्रमाणे वारसाहक्क दिला.

सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात आमुलाग्र बदल करून कुरआनच्या अधिष्ठानावर नव्या समाजाची ('उम्मत'ची) उभारणी केली. सामाजिक विषमता, उच्च-नीचता नष्ट केली गेली. गरीब, गरजू व दुबळ्या वर्गाला 'जकात'मधून सहाय्य मिळाले. प्रेषितांनी सर्व विषमतेतून मुक्त असा स्वातंत्र्य असलेला समाज निर्माण केला. कुरआनचे व प्रेषितांचे आदेश सक्तीने पालन करण्यास लावले. प्रेषितांच्या नंतरच्या खलीफांनी तसाच कारभार चालविला. व्याज, सट्टा, आर्थिक शोषण कायद्याने हाणून पाडले. कोणालाही कोणत्याही शोषणास संधी ठेवली नाही. मध्ययुगीन काळात सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या आदेशांचे पालन सुरू झाले व आजही जेथे 'इस्लामिक स्टेट' म्हणून राजकीय मान्यता दिलेले राज्य आहे तेथे त्याच कायद्याप्रमाणे राज्य चालवले जाते.

इस्लामी राज्यात इस्लामी कायदा लागू होतो. कुरआन, सुन्नाह, हदीस यांच्या आधारे सर्वांना आचरण ठेवावे लागते. अशा राज्यात बिगर मुस्लिमांना कुरआनातील नियमाप्रमाणेच राहिले पाहिजे व वागले पाहिजे हे पाहिले जाते.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याविषयी आलेली भविष्यवाणी

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आगमनाविषयी आलेली विविध भविष्यकथने खालीलप्रमाणे आहेत.

जबुर : हा ग्रंथ दाऊद (अ.) यांच्यावर अवतरित झालेला धर्मग्रंथ होय. हा हीब्रु भाषेत होता. आज हा धर्मग्रंथ उपलब्ध नाही, पण यात आलेले अनेक संदर्भ हे उपलब्ध आहेत. जबुर साडेतीन हजार वर्षांपूर्वी अवतरित झालेला होता. (भाग-६८ : आयत ७ व ८, भाग-८४ : आयत १ ते ६)

तौरात : हा प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यापूर्वी ३००० वर्षे मूसा (अ.) यांच्यावर अवतरित झालेला आहे. यात पुढील काळात यहुद्यांनी खूप फेरफार केले आहेत. तरी प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याविषयी आलेले भविष्यकथन आढळते. (हबकूक, भाग ३, आयत ३)

प्रेषित मूसा (अ.) आपल्या ज्यू समाजास सांगत होते, "तो पवित्र प्रेषित (मुहम्मद (स.)) फारानच्या पर्वतातून उदयास येईल आणि त्याच्या प्रकाशाच्या तेजाने सर्व आकाश प्रकाशमान होईल. हा मक्केजवळील 'फारान पर्वत' होय, ज्यावरून मुहम्मद (स.) यांनी सर्वप्रथम अल्लाहचा संदेश लोकांना सांगितला.

'तौरात' - "तुमच्याच भाऊबंदांतून एक संदेष्टा निर्माण होईल, ज्याच्या मुखातून माझे (ईश्वराचे) संदेश ऐकविल." (यहूदी आणि अरब हे इसहाक (अ.) व इस्माईल (अ.) यापासूनचे वंश आहेत. (इस्त्राईल व इसहाक हे प्रेषित इब्राहीम (अ.) यांचे पुत्र होत. इसहाक यांचे पुत्र याकूब ज्यांना इस्माईल हा किताब होता, ज्यांना पुढे यहूदी म्हणू लागले. इस्माईल वंशीयांना कुरैश म्हणत.)

गॉस्पेल - इंजील : कुरआनातील ६१:०६ मध्ये म्हटले आहे, जिझस म्हणतात, "मी संदेष्टा आहे व मी तुम्हाला आनंदी समाचार देतो की माझ्यानंतर येणारा प्रेषित ज्याचे नाव अहमद असेल." अहमद हे मुहम्मद यांचे दुसरे नाव होते.

जॉन १४:१५, जॉन १६:०७, योहान (जॉन) भाग १ - वाक्य १९ ते २१, भाग १४ - वाक्य १७, २५ ते ३०, भाग १५ - वाक्य २५ ते ३६, भाग १६ - वाक्य ७ ते १५, शखिना (DEUT) भाग ३३ - वाक्य २ व १८, भाग १८ - वाक्य १५, १८ व १९. मित्ती भाग ४ - वाक्य १७, भाग २१ - वाक्य ३३ ते ४२ यात आलेली भविष्यवाणी पुढे प्रेषित मुहम्मद (स.), इस्लाम याबाबतीत सत्य ठरली आहे.

फारसी धर्मग्रंथात : DASATIR & ZAND AVASTA

"फारसी समाजाचे एवढे नैतिक अध:पतन होईल की अरबस्तानात जन्मलेल्या माणसाचे अनुयायी तुमचा धर्म, तुमची सत्ता एवढ्या सर्व गोष्टींचा विनाश करेल, अनेक मूर्ती ज्या गृहात स्थापलेल्या असतील जे त्या गृहांकडे तोंड करून प्रार्थना करतील, त्यांचे तुमच्यातील शहाणी माणसे अनुकरण करतील." ही फारसी धर्मग्रंथातील भविष्यवाणी पुढे पुरेपूर सत्य ठरली आहे.

हिंदू धर्मग्रंथ :

(अ) भविष्य पुराण, खंड ३, अध्याय ३

"इतक्यात परकीय भाषेतील सानी, आत्मिक वक्तव्य करणारा मुहम्मद (स.) नावाने प्रसिद्ध असा आपल्या अनुयायांबरोबर प्रकट होईल.

(ब) भागवत पुराण व कल्की पुराण : जगतगुरुच्या पित्याचे नाव विष्णूभक्त, आईचे सोमती असेल आणि जन्म तिथी वैशाख १२, सोमवारी सूर्योदयानंतर दोन

तासांनी, त्याचे वडील मृत असतील, त्याच्या बालपणी आईचा मृत्यु होईल, शालमाळ द्विपाच्या राणीशी तो लग्न करील, लग्नात चुलता व तीन भाऊ असतील, तो एका गृहेत परशुराम इंद्रापासून सान मिळवील आणि जेव्हा जनसमूहात येऊन धर्मप्रसार करील तेव्हा लोक त्याला त्रास देतील, या अत्याचारांमुळे तो उत्तरी पर्वतात जाईल, तेथून तलवार घेऊन तो पुन्हा वस्तीत येईल व तोच देश जिंकेल. त्याच्याजवळील वेगवान घोड्याच्या सहाय्याने तो पृथ्वी व सातही आकाशांची यात्रा करेल. (मेअराजची घटना).

विष्णूभक्त-अब्दुल्लाह, सोमती-अमीना, त्यांची १२ रबिवुल अव्वल जन्म तारीख, गुहा-हिरा, धर्मप्रचार व त्यास विरोध व त्रास, राणीशी विवाह-श्रीमंत खदिजांशी, उत्तरेकडे-मदीनेकडे, मक्का विजय व मेअराजची घटना - सप्त आकाश भ्रमण. या सर्व गोष्टी वरील भविष्यकथनाशी जुळणाऱ्या आहेत.

(क) अर्थर्व वेद, कांड २०, सुक्त १२७, मंत्र १ ते ३ : "स्तुतीपात्र व त्याच्या समूहातीलच जे उंटावर सवारी- प्रवास करणारे असतील..." हे मुहम्मद (स.) यांच्याशी जुळणारे कथन आहे.

चरित्राचा अल्पसा आढावा

प्रेषित मुहम्मद (स.) यांचा १२ रबिउल अव्वल, सोमवार या दिवशी पहाटे जन्म झाला. इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे २० एप्रिल ५७१ इ. स. मानला जातो. काही जण त्यांचा जन्म ९ रबिउल अव्वलला झाला असे मानतात. त्याचा मृत्यू इ.स. ६३२ मध्ये झाला हे निश्चित आहे व ते एकूण ६३ वर्षे व ४ दिवस जगले.

त्यांच्या वडिलांचे नाव अब्दुल्लाह व आईचे नाव अमीना किंवा आमिना होते. आजोबांचे-वडिलांच्या वडिलांचे नाव अब्दुल मुत्तलीब होते. वडिलांच्या वंशाचे नाव बनी हाशिम व जमात कुरैश होती. बनी हाशिम हा वंश प्रेषित इब्राहीम (अ.) यांचा पुत्र इस्माईल (अ.) यांचा आहे. इस्माईल (अ.) यांच्यापासूनची ही ६० वी पिढी होय.

कुरैश जमातीत व अरब लोकांत हा वंश कुलीन व श्रेष्ठ समजला जाई. त्याच्या वंशातील नज्र, फहर कोसई बिन किलाब या त्यांच्या पूर्वजांपैकी प्रसिद्ध व्यक्ती होत्या. कोसई हाजींच्या पिण्याच्या पाण्याची व राहण्याची सर्व सोयी पाहात असत.

अरब लोक टोळ्यांनी राहात असत. त्या काळी मक्केची यात्रा अरबांच्या जीवनातील महत्त्वाचा भाग होता. अरब टोळ्यांच्या (कबिल्यांच्या) कुलदेवतांच्या मूर्ती मक्केच्या भव्य काबागृहात ठेवलेल्या असत. वर्षातून एकदा मक्केची यात्रा करून आपल्या कुलदेवतांची पूजा करण्याचा अरब कबिल्यांमध्ये प्रघात होता. सर्वच अरबांचे

मक्केचा काबा यात्रेचे स्थान असल्यामुळे काबागृहाचे उत्पन्नही मोठे होते. त्या काळी मक्का शहरावर कुरैशांचे वर्चस्व होते. कोसई याचा काबाच्या व्यवस्थापनातही सहभाग होता. त्यांच्या वंशात व्यापारही होता. काबागृहाचे व्यवस्थापक घराणे असल्यामुळे त्यांच्या घराण्यावर अरबांची श्रद्धा होती. त्यामुळे त्यांच्या काफिल्यावर हल्ले होत नसत अथवा त्याची लूटमार केली जात नसे.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या पंजोबाचे नाव हाशिम होते. त्यांच्या आजोबाचे नाव शैबा होते, पण ते अब्दुल मुत्तलीब या नावानेच प्रसिद्ध होते. मुहम्मद (स.) यांच्या आजोबांनीच त्यांचे नाव मुहम्मद ठेवले होते. मुहम्मद याचा अर्थ 'बेहद तारीफ झालेला' किंवा 'ज्याची तारीफ दुनियाभर होईल'. हे नाव नेहमीतील नावांप्रमाणे नव्हते.

अब्दुल मुत्तलीब यांना दहा-बारा पुत्र असून त्यातील पाच जणांची माहिती मिळते. (१) अब्दुल्लाह, वडील (२) अबु तालिब व अब्दुल्लाह हे सख्खे भाऊ होते. त्यांनीच मुहम्मद (स.) यांचे लालनपालन केले. त्यांनी इस्लाम स्वीकारला नव्हता, पण प्रेषितांना नेहमी संरक्षण दिले. आजोबानंतर त्यांचा त्यांना भक्कम आधार होता. (३) माननीय हमजा. (४) माननीय अब्बास. माननीय हमजा व अब्बास यांनी इस्लाम स्वीकारला होता. (५) अबु लहब हा चुलता इस्लामचा व प्रेषित मुहम्मद (स.) यांचा कट्टर विरोधक होता. मुहम्मद (स.) यांच्या वडिलांचा विवाह सतराव्या वर्षी झाला होता. ते व्यापारासाठी सीरियात गेले होते. परत येताना मदीना येथे असताना आजारी पडले व तेथेच मुहम्मद (स.) यांच्या जन्मापूर्वीच त्यांचा मृत्यु झाला.

आईच्या दुधानंतर काका अबू लहब यांची दासी 'सो ऐबा' हिच्या दुधावर वाढले. अरब लोकांत दासीचे दूध पाजण्याची रूढी होती. त्याप्रमाणे मुहम्मद (स.) यांना ग्रामीण भागातील दासी जिचे नाव हलीमा सादिया, जी कबिला हवाजनची होती. हिच्याकडे सुपूर्द करण्यात आले होते.

खेड्यातील शुद्ध हवेत मूल वाढावे तसेच शुद्ध अरबी भाषा खेड्यात बोलली जात असे. ती मुलाने शिकावी म्हणून प्रतिष्ठित अरब आपल्या कुळातील मुले ग्रामीण भागातील दायांकडे सुपूर्द करीत असत. तशी त्या काळी प्रतिष्ठित अरबांत पद्धत होती.

दोन वर्षांचे झाल्यावर प्रेषितांना मक्केत आणण्यात आले. पण मक्केत रोगराई असल्यामुळे त्यांना परत खेड्यात पाठविले गेले. वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत ते खेड्यातच वाढले. नंतर ते आपल्या आईबरोबर त्यांच्या मदीनेतील नातेवाईकांस

भेटण्यास गेले. एक महिन्याने मक्केस येण्यास निघाले. पण परतत असताना वाटेतच अबुवा येथे त्यांच्या आईचा मृत्यु झाला. वयाच्या सहाव्या वर्षी ते अनाथ बनले. त्यांच्या आजोबांनी त्यांना वाढविले, पण प्रेषित आठ वर्षांचे असताना त्यांच्या आजोबांचे निधन झाले. त्यानंतर चुलते अबू तालिब यांनी त्यांना आपल्याजवळ ठेवले. रात्रंदिवस ते प्रेषितांना आपल्यापाशीच ठेवत.

प्रेषित मुहम्मद (स.) इतर अरबांच्या मुलांप्रमाणे घरच्या बकऱ्या, मेंढ्या, उंट चारण्यासाठी घेऊन जात. ते कोणत्याही पाठशाळेत गेले नाहीत अथवा कोणा गुरूजवळ त्यांचे शिक्षण झाले नाही. त्यांना काही लिहिता वाचता येत नव्हते. म्हणूनच त्यांचा उल्लेख अशिक्षित म्हणून कुरआनात आलेला आहे. 'उम्मी' याचा अर्थ अशिक्षित.

शिक्षण घेतलेले नसले तरी ते अत्यंत सुसंस्कृत होते. त्यांनी कधी अपशब्द काढले नाहीत, भांडण-तंटा कधी कोणाशी केला नाही. ते स्वभावाने शांत, प्रेमळ व मृदुभाषी होते. वयाच्या बाराव्या वर्षीच ते चुलत्यांबरोबर व्यापारासाठी बाहेर देशातही गेले.

ते सच्चे व प्रामाणिक होते, त्यामुळे सर्वजण त्यांना 'सादिक' म्हणत. व्यापारात कधी असत्य व्यवहार केला नाही, हेराफेरी केली नाही, खोटेपणाने वागले नाही, त्यामुळे लोकांना त्यांच्याविषयी आदर वाटत असे. अत्यंत विश्वासू वर्तनामुळे त्यांना लोक 'अमीन' म्हणत असत.

चुलते अबु तालिब यांनी प्रेषितांना अतिशय चांगली वागणूक दिली. मक्केत असताना कुरैशांनी त्यांच्याशी (प्रेषितांशी) वैर मांडले. त्या काळातही प्रेषितांना त्यांनी नेहमी संरक्षण दिले. त्यांनी इस्लाम स्वीकारला नाही तरी प्रेषितत्वानंतरही मुहम्मद (स.) यांच्यावर त्यांचे पुत्रवत प्रेम होते.

येथे एक महत्त्वपूर्ण गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे प्रेषित अनाथ होते. त्यामुळे येणाऱ्या सर्व बिकट परिस्थितींशी मुकाबला करण्याची त्यांच्यात क्षमता वृद्धिंगत झाली. त्या काळात त्यांचा आत्मविश्वास वाढत गेला आणि त्या वेळी ईशश्रद्धा बळकट होत गेली. बालपणापासून ज्या परिस्थितीतून ते गेले त्यामुळे संयम, ईशनिष्ठा, आत्मविश्वास व स्वावलंबन त्यांच्याठायी विकसित होत गेले. त्यामुळेच अनाथ, निराधार यांच्याविषयी त्यांना अपार माया वाटत असे. त्यांचे अत:करण सर्वांविषयी अपार मायेने, प्रेमाने व सहानुभूतीने ओथंबलेले होते.

इस्लामचा उदय होण्यापूर्वी व प्रेषितत्वाची जबाबदारी पडण्यापूर्वी मुहम्मद (स.) हे अत्यंत विवेकाने व विचारीपणे वागत. विवेक व विचारही माणसात समतोल वृत्ती निर्माण करते. हे दोन्ही गुण त्यांच्या अंगी होते. प्रेषितत्वाच्या पूर्वीदेखील मुहम्मद (स.) हे हिरा नावाच्या गुंफेत जाऊन राहात. कित्येक वेळा सातु व पाणी बरोबर नेत आणि तेथेच काही दिवस वास्तव्य करीत असत. त्यांचे सातत्याने ईशचिंतन व मनन चालत असे. एकेश्वरत्वावर त्यांची अढळ श्रद्धा होती. त्यांचे व्यक्तिगत जीवन शुद्ध होते. त्यांच्या आत्यंतिक प्रामाणिकपणामुळे त्यांना त्यांच्या समाजात 'अमीन' - विश्वासपात्र म्हणून ओळखत.

अरबांमध्ये या काळातही इब्राहीम (अ.) यांनी प्रस्थापित केलेली काही तत्त्वे व रीतीरिवाज अस्तित्वात होते. जसे काबादर्शन, बैतुल्लाहची यात्रा, हज यात्रा वगैरे.

काबागृहाचा जीर्णोद्धार

काबागृहाचा जीर्णोद्धार करणे आवश्यक बनले होते. काबागृहावर छत नव्हते. फक्त चार भिंती होत्या. आपल्या डोक्यापेक्षा थोडीशी उंची होती. पावसाळ्यात पाणी त्या भिंतीजवळून वाहात असे. खूप पडझड झाली होती. कुरैशांनी जीर्णोद्धार करण्याचे ठरवले. संगे अस्वद कोणाच्या हस्ते बसवावा यातून वाद निर्माण झाला. सकाळी जो काबागृहात प्रथम माणूस येईल त्याच्या हस्ते संगे अस्वद (काळा दगड) स्थापित करायचा ठरविले. दुसऱ्या दिवशी सकाळी काबागृहात प्रथम प्रवेश करणारे मुहम्मद (स.) आले. त्यांनी सर्वांचे समाधान व्हावे म्हणून चादर पसरली व त्यावर तो दगड ठेवला आणि इतर सर्व सरदारांनी चादरीचे पदर पकडले आणि त्या स्थळी प्रेषितांच्या हस्ते तो संगे अस्वद स्थापित केला गेला. त्यांच्या या चातुर्यामुळे संघर्ष टळला व आपला हात लागला हे समाधान सर्व कबिलाप्रमुखांना लाभले.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर त्यांच्या अनुयायांचे प्रचंड प्रेम होते. त्यांच्या मृत्युचे वर्तमान समजताच त्यांचे अनुयायी दु:खातिरेकाने उन्मळून पडले. त्यांना सत्य स्वीकारणे अवघड झाले. त्यांच्या सोबत्यांना-सहकाऱ्यांना माननीय अबू बक्र सिद्दीक यांनी उद्देशून सत्य स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही याची जाणीव करून दिली. आतापर्यंत जगात आलेल्या प्रेषितांना प्रत्येकाला आपले कार्य संपल्यावर अंतधीन पावावेच लागले. ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेलच हे पटवून दिले. दु:खाच्या आवेगातून हळूहळू त्यांचे सोबती सावरले.

प्रेषित मुहम्मद (स.) यांचा प्रभाव त्यांच्या सोबत्यांवर होताच, पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आजही मुस्लिमांवर आढळतो. त्यांना जाऊन आज जवळपास चौदाशे वर्षे झाली तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जादू आजही यत्किंचित कमी झालेली दिसत नाही.

या जगावर प्रभाव टाकणाऱ्या सर्वश्रेष्ठ शंभर महापुरूषांची जी यादी प्रसिद्ध झालेली आहे त्यात प्रेषित मुहम्मद (स.) हे पहिल्या क्रमांकावर आहेत. असा प्रचंड प्रभाव पाडू शकणाऱ्या प्रेषितांचे व्यक्तिमत्त्व कशा प्रकारचे होते हे जाणण्याची जिज्ञासा अनेकांना असणे अत्यंत साहजिक व स्वाभाविक आहे.

प्रेषित मुहम्मद (स.) यांचे एकही चित्र नाही व असणेही शक्य नाही. कारण इस्लाममध्ये प्रतिमा, चित्र यांस थारा नाही. प्रेषितांनी त्यांच्या मक्का विजयानंतर काबामधील सर्व ३६० पुतळे-प्रत्येक कबिल्याच्या देवतांचे जे पुतळे होते - ते फोडून तोडून टाकले, भिंतीवर रंगविलेली चित्रे खरडून टाकली. काबागृहात असलेली माननीय इब्राहीम (अ.) व इस्माईल (अ.) यांचीदेखील चित्रे काढून टाकण्यात आली. प्रेषितांच्या सहकाऱ्यांच्या आणि त्यांच्या (प्रेषितांच्या) पत्नींच्या कथनातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आढावा घेतला जातो.

प्रेषित व त्यांचे काही अनुयायी मक्का सोडून मदीनेस स्थलांतर करून गेले त्या वेळी 'गारेसौर' हा पहिला टप्पा ओलांडून पुढे निघाले. वाटेत तहान लागली म्हणून ते थांबले. तेथे उम्मे माबद या म्हातारीने प्रेषितांना पाहिले व त्यांचे जे वर्णन आपल्या पतीस सांगितले त्यावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आपणास कल्पना येते. तिने कथन केलेले वर्णन येणेप्रमाणे होते.

"रूंद तेजस्वी व सात्त्विक चेहरा, अत्यंत उत्कृष्ट वर्तणूक असणारा, ना पोट सुटलेला व ना डोक्यावरील केस झडलेला, तेजस्वी व सुरेख काळे व मोठे डोळे असलेला, लांब आणि दाट केस असलेला, भारदस्त आवाजाचा, भरलेल्या मानेचा, तेजस्वी बाहुल्या व सुरमा घातलेले डोळे, बारीक भुवयांचा, काळ्या कुरळ्या केसांचा, शांत, भारदस्त, अत्यंत आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा, अतिशय देखणा, मधूर आवाजाचा, तोलून मापून बोलणारा व बोलताना मोत्यांची लडी उलगडते आहे असे वाटणारा, मध्यम बांधा असलेला व त्यांचे साथीदार त्यांच्या समीप राहून त्यांचा प्रत्येक शब्द न शब्द जीव ओतून ऐकणारे व त्यांचा शब्द तोंडून निघताच त्याची पूर्तता करणारे." या वर्णनावरून प्रेषित मुहम्मद (स.) यांचे साफ शब्दचित्र वाचणाऱ्याच्या डोळ्यांसमोर उभे राहते.

त्यांचे त्यांच्या सान्निध्यात राहणाऱ्या व समकालीन अनुयायींनी, निरनिराळ्या ठिकाणी केलेली वर्णने, त्यांची शरीरयष्टी, पेहराव, चालणे, बोलणे, वागणे यावर प्रकाश पडतो.

१) बर्रा बिन आजिम (रजि.) - त्यांचा चेहरा चंद्रासारखा गोलाई असलेला होता.

२) हिंद बिन अबिहाला (रजि.) - चेहरा चांदीसारखा चमकदार होता.

३) काब बिन मालिक (रजि.) - चेहरा सदा आनंदी असे.

४) माननीय अली (रजि.) - चेहरा एकदम गोल नव्हता पण गोलसर होता.

५) हिंद बिन अबिहाला (रजि.) - रूंद व भव्य कपाळ, वक्र भुवया, बारीक पण दाट, दोन्ही भुवया विलग होत्या व त्यामध्ये एक शीर स्पष्ट दिसायची. त्यांना राग आला की ती शीर फुगायची.

प्रेषित मुहम्मद (स.) यांचे मोठे डौलदार मस्तक होते. केस काळे दाट, काहीसे कुरळे, एकदम सरळ नव्हते किंवा पूर्ण कुरळे नव्हते. कधी कानाच्या पाळीपर्यंत लांब असत तर कधी खांद्यावर रुळायचे, - माननीय हुरैरह (रजि.) माननीय कतादा (रजि.), माननीय अनस, माननीय बिनहाला.

ते मध्यभागी भांग पाडत असत. लांबसडक पापण्या व काळेभोर डोळे. - माननीय अली (रजि.)

डोळ्यांचा आकार लांबुळका असून सुरमा घालायचे. बुबुळावर लालसर रेशमी दोऱ्यासारख्या रेषा होत्या. डोळ्यांच्या बाहुल्या काळ्या असून नजर नेहमी खाली असायची व ते अतिशय लाजाळु होते. नाक उंच असल्यामुळे मोठे वाटे व त्यावर एक प्रकारची चमक होती. - जबीर बिन सबुरा.

मान पातळ असून सुबक व त्यावर चांदीसारखी चमक होती व भरदार वाटत असे, चेहऱ्यावर दाट काळी दाढी होती. गालांचा भाग समान असून खालच्या बाजूस गोबरे होते. दात पांढरे स्वच्छ असून बारीक होते. पुढच्या दातांत शोभणारी फट होती. शरीर सुदृढ, कमवल्यासारखे व सांध्याची हाडे मोठी व मजबूत होती. छाती भरदार असून बेंबीपर्यंत केसांची बारीक रेघ होती. दोन्ही खांद्यातील अंतर किंचित जास्त वाटे व तो भाग मांसल होता. रंग काळा नाही किंवा पांढरा नाही. गहु वर्णापेक्षा उजळ होता. अंग कांती सतेज होती, कांती चांदीप्रमाणे चमकदार व गुलाबी होती. चारचौघांत उठून दिसेल अशी उंची होती. सतत चेहऱ्यावर तजेलदारपणा असून उत्साह ओसंडत असे. हाताचे तळवे रुंद व खोलगट असून रेशमासारखे मऊ व लुसलुशीत होते. हात लांब असून बोटे लांबसडक होती.

पोशाख

प्रभावी व्यक्तिमत्त्व असून पाहणारा एकदम प्रभावित होत असे. त्यांना घमेंडीपणा व दिखाऊपणा अजिबात आवडत नसे. राहणीत डामडौल आवडत नव्हता. ते अतिशय साधे पण स्वच्छ कपडे वापरत. दिखाऊपणा व भडकपणा त्यांना पसंत नव्हता. रेशमी, दीबा, हरीर हे कापड त्यांनी निषिद्ध मानले होते.

इतर धर्मियांप्रमाणे आपला पोषाख नसावा या बाबतीत प्रेषित मुहम्मद (स.) आग्रही होते.[१] कारण नाहीतर तुम्ही तुमची स्व:ची स्वतंत्र ओळख गमावून बसाल. ते नेहमी लुंगी वापरत व खमीज घालत. सामान्यत: पांढरे कपडे वापरत. याशिवाय क्वचित मातकट रंगाचे, पिवळ्या अथवा हिरव्या रंगाचे कपडे वापरत. घरात नेहमी डोक्यावरती असलेली टोपी वापरत, बाहेर जाताना अमामा (पगडी) किंवा फेटा बांधत. फेटा व पगडीच्या आत ते कापडाचा तुकडा वापरीत त्यामुळे ते तेलकट होत नसत. प्रवासात उंच टोपी वापरत.

चार गज लांबीची व सव्वा गज रुंदीची चादर वापरीत. बहुधा चादर अंगाला लपेटत असत. उजव्या काखेखालून दुसरे टोक डाव्या खांद्यावर घेत. कोणी आल्यास चादर बसण्यासाठी पाहुण्यांसाठी बसण्यास पसरत. इतर वेळी तीच चादर घडी घालून उशाशी घेत. चादरीवर हिरव्या, लाल रेषा असत. पेहराव साधा पण स्वच्छ असे. भपकेबाजपणा आवडत नसे. तैलवानी व किसरवानी पद्धतीचे झब्बे वापरत. घट्ट बाह्यांचा रुमी अथवा रेघांचा झब्बाही वापरत.

पायात चप्पलसारखे पायतण वापरीत. मोजे पण वापरीत. केसाळ पायतणे वापरीत नसत. नजाशी बादशाहने पाठविलेले मोजे फाटेपर्यंत वापरले. वहवा कलबीने मोजे भेट म्हणून पाठविले होते.

बोटांत लोखंडाची, चांदीचे पाणी दिलेली किंवा चांदीची अंगठी वापरत. अंगठीत कधी हबशी खडा बसविलेला असे, खडा आतल्या बाजूला राहील असा वापरत. करंगळीत अंगठी घालत. उजव्या किंवा डाव्या बोटांत अंगठी वापरत. अंगठीवर 'मुहम्मद रसुलुल्लाह' असे शब्द होते. ती अंगठी सील सारखी वापरत.

ओठावरील मिशांचे केस कातरत. कात्रीने कापून दाढी व्यवस्थित ठेवत. वेडेवाकडे केस राखलेल्या आपल्या सोबत्यांना ते टोकत असत. पोशाखात व राहणीत त्यांना गबाळेपणा व अव्यवस्थितपणा आजिबात आवडत नसे.

---

१) धार्मिक पोषाख घालून भाविकांची फसवणूक करणाऱ्या धर्मपुरोहितांप्रमाणे आपला पोषाख नसावा, असे कदाचित त्यामागील कारण असावे.)

नेहमी सात वस्तू वापरत : (१) तेलाची बाटली, (२) कंगवा अथवा फणी, (३) काळ्या रंगाची सुरमादानी, (४) कात्री, (५) मिस्वाक - दात घासण्याच्या काड्या, (६) आरसा आणि (७) लाकडाची पातळ खपची.

अत्तराची व सुगंधाची अतिशय आवड होती. त्यातही रैहान हे अत्तर अतिशय प्रिय होते. घरात उदाची धुरी द्यायला आवडत असे. अत्तराची भेट आनंदाने स्वीकारत.

रस्त्याने सरळ नजर ठेवून रूबाबदार चालीने, शरीर किंचित पुढे झुकवत चालत. पावले पूर्ण उचलून टाकीत. साधारण माणसास त्यांच्या गतीने बरोबर चालणे जमत नसे.

ते नेहमी विचारमग्न असत. चेहरा नेहमी उल्हासित असे. मोजके माफक पण अर्थपूर्ण बोलण्याची त्यांची पद्धत होती. आवाज रूबाबदार असून बोलणे भारदस्त असे. निष्फळ बडबड आवडत नसे. घुमेपणा नापसंत होता. सर्वांशी मिळून मिसळून राहात. त्यांचा आवाज व शब्द अतिशय प्रभावी होते. त्यांना बोलण्यात अश्लीलता, बिभत्सता अजिबात पसंत नव्हती. हसतमुख, भाषा ओघवती, प्रभावी असून ऐकणारांवर त्यांची छाप पडे, त्यांच्या वक्तव्यात गहन अर्थ असे. मोजक्या शब्दांत मोठा आशय व्यक्त करण्याची त्यांची बोलण्याची पद्धत होती. त्यांच्या वाणीस ईशदेणगी होती. ते स्वत: म्हणत ''मला 'जामिऊल कलिम' (मोजक्या शब्दांत व्यापक आशय व्यक्त करण्याची वाणी) प्रदान करण्यात आली आहे.''

त्यांच्या हदीसमध्ये अथवा कोणालाही समजावून सांगताना थोडक्यात दृष्टांत देऊन ते समोरच्याचे शंकानिरसन अतिशय आत्मविश्वासाने करीत असत.

''आपल्या वक्तव्यात आपण अल्लाहचे प्रेषित आहोत व त्याच्याच प्रेरणेने त्याच्या आज्ञा तुमच्यापर्यंत पोहचवीत आहोत,'' असे ते नेहमी म्हणत. त्यांची भाषा मृदु, निसंदिग्ध, स्पष्ट पण ठामपणे विचार मांडणारी होती. कोठेही वैचारिक गोंधळ त्यांच्या उक्तीत दिसत नाही. बोलताना समोर व उजव्या-डाव्या बाजूस नजर फिरवून व हातवारे करून आपले म्हणणे ते बिंबवीत असत. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाचे नमुने म्हणजे सुरुवातीच्या काळात इस्लामकडे आमंत्रणाचे आवाहन मानले जातात. त्यांचे सफा पहाडाजवळी प्रवचन, तसेच 'हज्जतुल विदा'चे प्रवचन हे उत्कृष्ट वक्तृत्वाचे नमुने म्हणून मानले जातात. त्यांच्या वक्तव्यातील प्रभावी वाक्ये म्हणजे, ''त्या पवित्र अस्तित्वाची शपथ, ज्यांच्या कब्जात माझे प्राण आहेत,'' ही असत. मक्का विजयानंतर त्यांनी दिलेले प्रवचन वक्तृत्वाचा उत्कृष्ट नमुना म्हणून मानले जाते.

मक्का विजयानंतर प्रेषित मुहम्मद (स.) यांनी जे वक्तव्य केले ते असे होते. ''हे कुरैश लोकांनो, आज ईश्वराने बापदादांच्या नावाने गर्विष्ठपणे वागणाऱ्या व अज्ञानाच्या अंधकारात घमेंडखोरपणे वागणाऱ्या तुमचे गर्वहरण झाले आहे. वास्तविकत: सर्व मानव हे आदमची संतान आहे व आदमला मातीपासून अल्लाहने घडविले आहे. ईश्वराचे आवाहन आहे की, हे मानवांनो! आम्ही तुम्हाला एका पुरुष व स्त्रीपासून निर्माण केले आहे. विविध मानव जमाती-कबिले तर केवळ तुमच्या ओळखीसाठी निर्मिले आहेत. अल्लाहजवळ सर्वांत जास्त त्याची इज्जत असते, तो अतिशय संयमी असतो. (कुरआनात अशा अर्थाच्या काही आयती आलेल्या आहेत.)''

समाजातील आचरण

आदरणीय मुहम्मद (स.) प्रेषित (नबी) असूनही आपण सर्वसामान्यांपेक्षा वेगळे आहोत, असे कधीही वागत नसत. समाजातील प्रत्येक व्यक्तीशी, मग ती लहान असो अथवा मोठी, स्त्री असो अथवा पुरुष श्रीमंत असो की गरीब; ते नेहमी ममतेने वागत. माननीय आयेशा (रजि.) म्हणतात, ''प्रेषितांनी कधीही आपल्या पत्नींना, दास-दासींना दटावले नाही, अपशब्द वदले नाही अथवा मारहाण केली नाही.''

भेटायला येणाऱ्यांशी ते प्रेमाने व आदराने वागत. प्रत्येकाला ते सलाम करीत. कोणाकडे भेटण्यास गेल्यास त्याची परवानगी घेऊनच त्याच्या घरात प्रवेश करीत. (कुरआनातील आदेशाप्रमाणे) त्यांची वागणूक होती. आजारी लोकांची विचारपूस करीत. कोणाचा मृत्यु झाल्यास त्याच्या लोकांचे ते सांत्वन करण्यास जात. ईश्वराजवळ मृताबद्दल ईश्वराची करुणा भाकत. दफनविधीत सामील होत.

ते प्रत्येकाशी आदराने वागत. त्यांना बोलण्या-चालण्यात गावंढळपणा आवडत नसे. कधीही तोंडावर त्याची निर्भर्त्सना करीत नसत, पण अप्रत्यक्षरीत्या आपली नाराजी व्यक्त करीत असत. कोणासही दटावले नाही. कोणाचेही बोलणे ते कधीही अर्थवटपणे तोडत नसत. कोणाकडेही आपण दुर्लक्ष करीत आहोत असे वाटू नये याची काळजी घेत. समोरच्याचे शंकानिरसन करीत, त्यांच्या वागणुकीत सर्वसमभाव असे. आपण नबी आहोत अशी घमेंडखोर वृत्ती त्यांच्यात नव्हती. आपल्या वर्तनात ते अतिशय सौम्य व नम्रता बाळगत. सर्वांशी मिळून मिसळून वागत. लोकांच्या अगदी किरकोळ आनंदातही ते भाग घेत. प्रवासातून येणाऱ्याचे आलिंगन देऊन स्वागत करीत. गैरमुस्लिमाची प्रेतयात्रा दिसली तरी उठून उभे राहात किंवा स्तब्धपणे बसत. आपल्या जवळच्या साथीदारांना ते त्याच्या नावास लहान करून हाका मारीत, लहान

मुले त्यांना अतिशय आवडत, त्यांच्या केसांवरून प्रेमाने हात फिरवत व त्यांना कुरवाळत असत आणि म्हणत, "ही अल्लाहच्या बागेमधील सुंदर फुले आहेत."

आपल्या नोकरांना अथवा गुलामांना त्यांनी कधीही रागावले नाही. आयेशा (रजि.) यांचे कथन आहे की, "ते कोणाशीही मनात अढी ठेवून वागले नाहीत."

खाण्या-पिण्याच्या आवडी

त्यांना मांसाहार अतिशय आवडत असे. त्यातल्यात्यात 'सरीद' म्हणजे मटणाच्या रश्यात शिजवलेली रोटी फार आवडत असे. त्यांना मध, सिरका, खजूर, खरबुजे, काकडी, भोपळे, खिचडी, लोणी अतिशय आवडत असे. दूध, मधाचे सरबत, मीठ लावलेली काकडी, साखर पेरलेले खरबुज, कच्ची लस्सी अतिशय आवडत असे. त्यांना एकट्याना जेवणे आवडत नसे. सर्वांबरोबर जमिनीवर बसून जेवण अतिशय आवडत असे. चांदी व सोन्याच्या भांड्यात जेवणे ते निषिद्ध मानत. सामान्यतः काचेच्या, चीनीमातीच्या, लाकडाच्या, तांब्याच्या किंवा मातीच्या पात्रात जेवण घेणे पसंत करीत. अशीच भांडी त्यांच्या घरात वापरत असत. कोणी निमंत्रण दिल्यास ते भोजनास जात. स्वतःकडे आलेल्यांना आग्रहाने जेवायला घालत असत. सर्वांना दिल्यावर ते कोणतेही पेय घेत असत. जेवताना बडबड करणे तसेच खाद्य पदार्थांवर टीका करणे त्यांना अजिबात पसंत नव्हते. दुर्गंधी अजिबात पसंत नव्हती व त्यामुळे कच्चा कांदा व लसणाचा मोठ्या प्रमाणावर वापर त्यांना आवडत नसे. अन्नातून त्यांच्यावर जेव्हापासून विषप्रयोग झाला होता तेव्हापासून अनोळखी माणसाकडे ते जेवत नसत. अनोळखी माणसाने जर खाद्य पदार्थ दिल्यास त्याला प्रथमतः थोडा खायला लावीत व नंतरच स्वतः घेत. खाद्यपदार्थ झाकून ठेवण्यावर त्यांचा कटाक्ष होता.

उठणे, बसणे व वागणे

सामान्यतः ते उकड बसत, दोन्ही पायाभोवती हात गुंडाळून किंवा चादर गुंडाळून बसत. चिंतातूर असताना डाव्या हातावर टेका देऊन बसत व उजव्या हाताने काडीने जमीन उकरत असत. समोरच्याच्या अंगावर ओलांडून जाणे त्यांना पसंत नव्हते. उजव्या कुशीवर झोपत, पालथे झोपणे अजिबात पसंत नव्हते. झोपताना ऊजवा हात उजव्या गालावर सामान्यतः टेकवून झोपत. उघडे झोपत व झोपताना स्वतंत्र लुंगी वापरत. वुजू करून सूरह इखलास, सूरह फलक व सूरह नांस पढून झोपत.

स्नानाच्या वेळी पडदा बांधल्याशिवाय कधीही स्नान करीत नसत. पावसात भिजण्यास आवडत असे. शौचास घरापासून दोन मैलावर जात. तसेच कोणतेही कार्य करताना ते उजव्या पायाने, उजव्या हाताने, उजव्या बाजूने सुरुवात करायची संवय होती.

प्रवासास बहुतेक गुरुवारी सकाळी निघत, प्रवासातून रात्री उशिरा परतणे आवडत नसे. प्रवासातून आल्याबरोबर प्रथमत: ते मशिदीत जाऊन नफील नमाज अदा करीत असत व घरी आपण आल्याची वर्दी देऊनच घरी जात. प्रत्यक्षात आपल्या सहकाऱ्यांबरोबर सर्व कामे करण्यात सहभागी होत. शारीरिक मेहनत करण्यात कधीही कमीपणा त्यांना वाटत नसे.

सर्वसामान्य संसारी माणसांप्रमाणे घरची कामे ते करीत. बाजारहाट करीत. उसवलेले व फाटलेले स्वत:चे कपडे स्वत:च शिवत असत. स्वत:ची पादत्राणे स्वत:च दुरुस्त करीत असत. त्यांना घरची कामे करण्यात कमीपणा वाटत नसे.

मनोरंजनाच्या आवडी

बागबगीच्यात फिरणे, पोहायला जाणे, पावसात भिजणे, विहिरीच्या कठड्यावर पाय सोडून बसणे, धनुष्य बाणाच्या नेमबाजीच्या स्पर्धा घेणे, पळायच्या स्पर्धा, पोहण्याच्या स्पर्धा मनापासून आवडत. शारीरिक व्यायामाची आवड होती. स्वत: आखाड्यात जात. उत्सवाच्या व लग्नकार्याच्या वेळी डफली वाजवली तरी हरकत नसे. उत्तम प्रकारचे शेर ऐकणे त्यांना आवडत असे. माननीय हस्सान व माननीय कअब बिन मालिक (रजि.) यांच्याकडून शेर जवळ बसून ऐकत. उत्तम शेर ऐकल्यावर म्हणत की "तलवारीइतकीच वाणीदेखील धारदार असू शकते."

घोड्यावर बसून दूरवर रपेट मारण्यास आवडत असे. अंधश्रद्धा, शकून पाहणे, शुभ व अशुभ शकून यावर त्यांना अजिबात विश्वास नव्हता. कोणासही पत्र लिहिण्यास सांगताना सुरुवातीस 'बिस्मिल्लाह' लिहिण्यास सांगत. पत्राच्या शेवटी स्वत:च्या अंगठीचा ठसा - मोहर लावत. त्यांना शांतता व भारदस्तपणा प्रिय होता.

शिष्टाचार

प्रेषित मुहम्मद (स.) यांचा शिष्टाचार अत्यंत नमुनेदार होता. त्यांचा आदर्श लोकांनी ठेवावा अशी सूचना कुरआनात आलेली आहे. कुरआनात म्हटले आहे, "अल्लाहचा प्रेषित तुमच्यासाठी उत्कृष्ट नमुना आहे." त्यांचे स्वत:चे कथन आहे, "उत्तम नीतीमत्ता श्रद्धेचा एक भाग आहे." सुसंस्कृतपणे वागणे त्यांना अल्लाहची देणगी होती.

वागण्यात भारदस्तपणा होता, पण गर्विष्ठपणा नव्हता. धनी होते पण उधळपट्टी त्यांना मान्य नव्हती. निरपेक्ष बुद्धीने त्यांचे वागणे होते. सहनशीलता, सौजन्य व संयमीपणा ही त्यांची वैशिष्ट्ये होती.

स्वत:चे मोठेपण ज्ञात असूनही अतिशय सौम्य, विनयशील वागणूक होती. माननीय आयेशांचे कथन आहे की त्यांच्याइतका संकोची व उच्च शिष्टाचार पाळणारा कोणीही नव्हता. ते अत्यंत न्यायी असून अत्यंत नि:पक्षपातीपणे वागत असत. चुगली-चहाडीविषयी त्यांना अतिशय चीड होती. टिंगल-टवाळीबद्दल त्यांना घृणा होती.

करुणा व मनाचे औदार्य

मक्केत भयंकर दुष्काळ पडला असताना त्यांचा एकेकाळचा कट्टर शत्रू अबू सुफियान याच्या विनंतीवरून प्रेषित मुहम्मद (स.) यांनी ईश्वराची करुणा भाकली व ताबडतोब सर्वदूर मोठा पाऊस झाला. मक्केवाले पैगंबरांशी वैराने वागत असले तरी समामा बिन उसाल रजि. यांनी नज्दकडून मक्केकडे जाणारे धान्य रोखले तेव्हा प्रेषितांनी तसे करण्यास मनाई केली. हुदैबियाच्या मैदानात आपल्या सोबत्यांसह नमाज पढत होते. त्याच वेळी त्यांची कत्तल करण्यासाठी ७०-८० माणसे उतरली. ते सर्वजण पकडले गेले. त्यांचा दुष्ट हेतू माहीत असतानाही प्रेषितांनी त्यांना कोणतीही शिक्षा न करता उदार अंत:करणाने सोडून दिले. त्यांच्या दारी आलेला कोणीही याचक रिक्तहस्ते गेला नाही.

ताईफ येथे इस्लाम प्रचारार्थ गेले असताना तेथील रहिवाशांनी प्रेषितांचा अनन्वित छळ केला. त्यांना धोंडे मारले, अंगावर चिखल फेकला, शिवीगाळ केली, अतिशय त्रास दिला आणि रक्तबंबाळ केले. प्रेषितांना भोवळ आली तरी त्यांनी आपल्या मनात कोणतीही अढी ठेवली नाही व शाप दिला नाही. आज नाही तर उद्या ते इस्लाम स्वीकारतील असा त्यांचा दुर्दम्य विश्वास होता. मक्का विजयानंतर त्यांनी ताईफच्या लोकांना सार्वत्रिक माफी दिली. कोणावरही सूड उगवला नाही.

त्यांचा स्वभाव अतिशय सहृदयी असून ते लाजाळूही होते. अबू सईद खदरी (रजि.) म्हणतात की प्रेषित मुहम्मद (स.) परदानशीन स्त्रीपेक्षाही लाजाळू होते. आयेशा (रजि.) म्हणतात की प्रेषितांना जर कोणाचे वागणे आवडले नाही तर ते अप्रत्यक्षरीत्या आपली नाराजी व्यक्त करीत, पण ते कोणाशीही तुसडेपणे वागत नसत.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याशी वाईट वागणाऱ्यांवरही ते उपकार करीत. कधीही ते सूड घेणारे नव्हते. ते नेहमी म्हणत. ईश्वरसेवेकडे लोकांना वळविण्यासाठी मला नबी

बनविले आहे, लोकांचे अहित चिंतण्यासाठी नव्हे. गारस बिन हरिस ज्याने त्यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यासाठी तलवार उपसली पण तोच चक्कर येऊन पडला. त्याला पण त्यांनी क्षमा केली. प्रेषितांच्या कन्येवर प्राणघातक हल्ला करणाऱ्या हिबारने क्षमा-याचना करताच त्याला त्यांनी क्षमा केली. प्रेषितांनी आपल्या जीवनात नेहमी औदार्याने वागल्याची व क्षमाशीलतेची अनेक उदाहरणे आढळतात.

निर्लोभी व निर्मोही वर्तन

प्रेषित मुहम्मद (स.) अत्यंत निर्लोभी व निर्मोही होते. संपूर्ण अरबस्तान त्यांच्या पायी असतानाही त्यांनी कधीही चैनी व ऐषारामी जीवन जगले नाही. कधी कोणाकडे काहीही मागितले नाही. अथवा कधी कोणाकडून हिसकावून घेतले नाही. आयेशा रजि. म्हणतात, "आमच्या घरी कधीकधी महिना महिना स्वयंपाक होत नसे. फक्त खजुराबरोबरच गुजराण चालत असे." मृत्युसमयीसुद्धा त्यांनी आपल्या जवळील सर्व धन धर्मात खर्च केले. त्यांनी कधीही उद्याची काळजी केली नाही.

उपदेश

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी केलेल्या उपदेशात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू समोर येतात.

एकेश्वरत्वाचे पालन करा. ईश्वर सर्व दयाळूंचा दयाळू आहे. ईश्वराचा नेहमी धाक बाळगा. ईश्वरनिष्ठांनी एकमेकांस सहकार्य करावे. एका मुस्लिमाने दुसऱ्याला कधीही उपद्रव देऊ नये. ईश्वराची निरपेक्ष बुद्धीने उपासना करा. आपल्या शक्तीबाहेरचे कोणतेही कार्य करू नये. ईश्वराने आपल्याला दिलेल्या शक्तीचा उपयोग नेहमी जनकल्याणासाठी करा. सत्यावर अटळ राहा. टिंगल-टवाळी करू नका. चहाडी व चुगलखोरी करू नका. सर्वांवर अलोट प्रेम करा. पवित्र आचरण ठेवा. इतरांमधील दोषांपेक्षा त्यांच्यातील गुणांची कदर करा. नेहमी समाधानी राहा. जो दिलेला शब्द पाळत नाही, दिलेले वचन पाळत नाही, केलेला वायदा निभावत नाही व शिवीगाळ करतो तो अत्यंत नास्तिक असतो. तुमचा हात नेहमी दान देणारा असावा दान घेणारा नसावा. दिखावा करून कधीही दान देऊ नका. निरपेक्ष मनाने दिलेले दानच खरे दान होय. जो इतरांवर दया करत नाही त्याच्यावर ईश्वर दया करत नाही. स्त्रियांना व अनाथांना सतावू नका, स्त्रियांचा योग्य तो आदर करावा.

त्यांच्या या उपदेशात औदार्य, क्षमाशीलता, दातृत्व, मनाचा मोठेपणा, दयाळूपणा व ईशनिष्ठा प्रतीत होते.

प्रेषितांच्या जीवनपद्धतीचे व त्यांच्या वर्तणुकीचे वर्णन त्यांच्या पत्नी आएशा (रजि.) यांनी फार रेखीवपणे केले आहे. ''त्यांचे नैतिक चारित्र्य कुरआन आहे.'' त्यांचा दैनंदिन जीवनक्रम कुरआनच्या शिकवणींचे बरहुकूम हुबेहूब चित्र होते. कुरआनात विशद केलेल्या सर्व सद्‌गुणांचे व सत्‌चारित्र्याचे ते साकारीत स्वरूप होते.

पिता, पत्नी, शेजारी, योद्धा, सेनापती, नेता, न्यायाधीश, शासनकर्ता, कायदेसंहिता देणारा व अल्लाहच्या एकनिष्ठ दासाच्या भूमिकेत ते कुरआनचे मूर्त स्वरूप होते.

त्यांच्या सवयी साध्या होत्या. त्यांचे खाणे, पिणे, पोशाख अत्यंत साधेपणाचा होता. सर्व सत्ताधीश झाल्यावरदेखील त्यांनी आपला साधेपणा सोडला नाही. ते भौतिक मोहात कधीही गुरफटले नाही. मृत्युसमयी त्यांची व्यक्तिग़त मालमत्ता म्हणजे एक चिलखत (तेसुद्धा एका यहुद्याकडे गहाण ठेवले होते), खजुरीच्या वाळलेल्या पानांची एक गादी आणि पाण्याची एक कातड्याची पिशवी इतकीच होती.

त्यांच्या ठायी असाधारण कल्पनाशक्ती होती. मर्यादाशीलता, सौजन्यशीलता व उदारता प्रकर्षाने जाणवणारी होती. कनिष्ठ व सेवक यांच्याशी अत्यंत सौम्यपणे वागत. त्यांच्याजवळ दहा वर्षे असलेले विश्वासू सेवक अनस म्हणतात की ते कधीही रागावून बोलले नाहीत. आपल्या कुटुंबियांशी अत्यंत जिव्हाळ्याने वागत. लहान मुलांवर फार प्रेम करीत. त्यांना कुरवाळत व त्यांच्याबरोबर लहान होऊन फुरसतीच्या काळी खेळत.

जीवनात त्यांनी सर्व चांगल्या गोष्टींचा नेहमीच स्वीकार केला. चवदार अन्नाचा आस्वाद घेण्यात त्यांना आनंद वाटत असे. कपडे साधे पण स्वच्छ आवडत असत. सात्त्विक व कोणालाही न दुखावणारे विनोद ते पसंत करीत. मानवांबद्दल प्रेम व करुणा वाटत असे. कमकुवत व अन्यायपीडितांबद्दल त्यांना विशेष अनुकंपा होती. ते इतरांच्या सद्‌गुणांची कदर करीत आणि योग्य व उपयुक्त असा कोणाचाही सल्ला स्वीकारण्यात त्यांना कमीतपणा वाटत नव्हता. ते सर्व गंभीर समस्यांवर सोबत्यांशी विचारविनिमय करीत.

अबुबकर सिद्दीक (रजि.) यांच्यावर प्रेषितांचे अत्यंतिक प्रेम होते. त्यांचे विशेषत: अली (रजि.), गुलाम झैदवर पितृमूल्य प्रेम होते. मुक्त झाल्यावरही झैद (रजि.) आपल्या सख्या पित्यासह राहण्यास न जाता प्रेषितांबरोबर मक्केतच राहिले. उस्मान (रजि.) व उमर (रजि.) हे त्यांचे खास लाडके होते. प्रतिकूल परिस्थितीत ज्यांनी साथ दिली होती त्या अन्सारांबद्दल आदर वाटत होता व त्यांची ते नेहमी सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत.

"मानवांसाठी दयानिधी म्हणून पाठविले आहे." त्यामुळे कोणाच्याही बाबतीत कधीही शापवाणी उच्चारत नसत. प्रेषितांना ज्यांनी पाहिले ते म्हणत, असा मानव बघितला नाही व असा मानव होणार नाही. त्यांच्या प्रत्येक कृतीत व हालचालीत साधेपणा व विनम्रता प्रकर्षाने जाणवत असे.

त्यांनी कोणतीही कृती घाईघाईने केली नाही. काळजीपूर्वक निर्णय ते घेत असत. त्यांनी कित्येक शत्रुंना औदार्याने वागून क्षमा केली. ते सतत, शांत, निग्रही, संतुष्ट व प्रसन्न असत. ईश्वरावर त्यांची अनन्यसाधारण श्रद्धा होती. तोच सर्वकाही कर्ता करविता आहे, आपण निमित्त मात्र आहोत ही त्यांची धारणा होती.

ते विनयशील व लीन होते. पण त्याचवेळी त्यांच्यापाशी धैर्य व शौर्य होते. टंचाई, प्रतिकुलता, सतत विरोध झाला तरी ते भक्कमपणे उभे राहात, कधीही विचलित झाले नाही.

अपमान, दहशत, धोके, अनन्वित व वारंवार होणारी उपासमार त्यांना विचलित करू शकले नाहीत. ईश्वरावरच्या अढळ श्रद्धेने ते कोणत्याही संकटांनी डगमगले नाहीत. त्यांच्या अनुयायांनीही अल्लाहवरील व प्रेषितांवरील आपला विश्वास ढळू दिला नाही.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याविषयी पवित्र कुरआनात म्हटल्याप्रमाणे, "मुहम्मद, यांना सांगा की मी तुमच्यासारखाच एक मनुष्य आहे. फक्त मला दृष्टांत दिला गेला आहे की, ईश्वर एकच आहे आणि म्हणून जो कोणी या ईश्वराला भेटण्याची इच्छा बाळगतो त्याने फक्त एकाच ईश्वरावर श्रद्धा ठेवावी व सत्कृत्य करत जावे." (१८:११०)

आयत क्रमांक १३:३८ यात सर्व प्रेषित सर्वसामान्य माणसांप्रमाणेच असतात व फक्त ईशआज्ञा पोहचवतात. ते आपल्या पदरचे काही सांगत नाहीत. पैंगबर मुहम्मद (स.) यांनादेखील विविध आयतीत स्पष्ट बजावले आहे की, "तुमचे काम फक्त संदेश पोहोचविणे आहे." (१३:४०). त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे, "मी शेवटचा प्रेषित आहे व माझ्या येथेच प्रेषित शृंखला संपणार आहे."

प्रेषित मुहम्मद (स.) भूतकाळातील इतर प्रेषितांप्रमाणेच होते. तरी ते इतरांपेक्षा दोन बाबतीत वेगळे आहेत. इतर हे विशिष्ट समाजापुरते व विशिष्ट कालावधीकरता पाठवले गेले होते. काही वेळा वेगवेगळे प्रेषित एकाच वेळेस पाठवले होते. काही एकमेकांचे समकालीन होते किंवा काही उदाहरणे अशी आहेत की एकाच समुदायामध्ये एकाच वेळेस एकापेक्षा जास्त प्रेषित पाठवले गेले होते. एकाचे आगमन आधीच्या

प्रेषिताच्या कालावधीचा अंत असे. परंतु मुहम्मद (स.) मात्र या भूतलावरील सर्व समुदायांसाठी, येणाऱ्या सर्व काळांसाठी जगाच्या अंतापर्यंतचा प्रेषित म्हणून पाठविले आहे. "सांगा की, मानवानों, मी तुम्हा सर्वांकडे त्या अल्लाहचा प्रेषित आहे जो पृथ्वीचा व आकाशांच्या राज्यांचा स्वामी आहे." (७:१५८)

"आणि हे प्रेषित, आम्ही तुम्हाला अखिल मानवजातीसाठी खूशखबर देणारा व सावधान करणारा बनवून पाठवले आहे. परंतु बहुतेक लोक हे जाणत नाहीत."

(३४:२८)

३३:४० प्रमाणे, "ते अल्लाहचे प्रेषित आणि अंतिम प्रेषित आहेत."

(१) मायकेल हार्ट यांनी आदमपासून आजपर्यंत एकूण शंभर जणांची यादी केली आहे. ज्यांनी मानवी जीवनावर प्रभाव पाडला आहे. त्या यादीत मुहम्मद (स.) यांचे नाव पहिल्या स्थानावर आहे.

(२) विनोबा भावे यांनी म्हटले आहे, "प्रेषित मुहम्मद (स.) महापुरुष होते. त्यांचे चरित्र डोळ्यांसमोर आले की माझी समाधी लागते."

(३) "मी अंधकारापासून प्रकाशाकडे आलो याचे मूळ कारण महामानव प्रेषित मुहम्मद (स.) यांची पवित्र शिकवण आणि उच्च चारित्र्य होय."

- डॉ. जियाउर्रहमान.

(४) "लाखो प्रेषितांमध्ये केवळ प्रेषित मुहम्मद (स.) यांचेच अस्तित्व असे आहे की त्यांना प्रेषितांचा नायक मानावा लागेल." - डॉ. कार्लायल.

(५) "प्रेषित मुहम्मद (स.) केवळ मुस्लिमांचेच नाहीत तर ते सर्वांचे प्रेषित आहेत."

- बॅरिस्टर बाबासाहेब भोसले.

(६) "प्रेषित मुहम्मद (स.) एक थोर प्रेषित होते. त्यांनी अरबांना जगाचे मार्गदर्शक केले. त्यांनी अरबांच्या हाती जगाच्या संस्कृतीची मशाल दिली."- साने गुरुजी.

(७) "प्रेषित मुहम्मद (स.) यांचे मानवजातीवर अनंत उपकार आहेत. त्यांनी वेगवेगळ्या देवी-देवतांच्या जागी केवळ एकाच स्वामीवर श्रद्धा ठेवण्याची शिकवण दिली. त्यांनी जगातील वाईट चाली आणि अंधश्रद्धा मुळातून उखडून टाकल्या." - साने गुरुजी.

(८) डॉ. नेवेन वेमेंट - "प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या चरणी पूर्व व पश्चिम मिळतात."

(९) "प्रेषित मुहम्मद (स.) हे एक महामानव, एक महान सेनापती, एक महान न्यायाधीश, एक महान दार्शनिक आणि जगात महान क्रांती आणणारे एक महान प्रेषित होऊन गेले." - महंमद अली जिना.

(१०) "प्रेषित मुहम्मद (स.) यांनी ना केवळ फौज, कायदा, शासन आणि राज्य अस्तित्वात आणले, किंबहुना तत्कालीन जगाच्या एकतृतियांश लोकसंख्येच्या अंत:करणासही स्पर्श केला. एवढेच नव्हे तर त्यांनी वाद, धर्म, विचार, आस्था इत्यादींचे स्वरूपच बदलून टाकले." - लेमरटाइन.

(११) "त्यांची सत्यप्रियता, शुद्धहृदयता, प्रामाणिकपणा व न्यायशीलतेची स्तुती न केवळ मुस्लिम किंबहुना अबु जहल आणि अबु सुफियानसारखे रक्तपीपासू शत्रुंनीही केली, तीच खरीखुरी प्रशंसा होय जी विरोधकांनीही मान्य केली." - लाला काशीराम चावला.

(१२) बर्नार्ड शॉ - "मी प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या चारित्र्याचा अभ्यास केला आहे. ते एक महान मानव होते. माझ्या मते त्यांना मानवतेचा मुक्तिदाता म्हटले पाहिजे. माझी धारणा आहे की जर त्यांच्यासारखा मनुष्य वर्तमान विश्वाचा अधिनायक झाला असता तर त्याने विश्वाच्या समस्त जटील समस्यांचे अशा प्रकारे निराकरण केले असते की मानवविश्व अपेक्षित सुखशांतीच्या संपत्तीने संपन्न झाले असते."

प्रेषितांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना किंवा त्यांच्या बाबतीत घडलेले चमत्कार आश्चर्यकारकरीत्या ईशसामर्थ्याची चुणूक दाखवतात.

यात मेअराज, चंद्र दुभंगणे, हिजरतच्या वेळची घटना व पवित्र कुरआनचे अवतरण या स्तंभित करणाऱ्या घटना आहेत.

मेअराज

प्रेषित मुहम्मद (स.) यांना अल्लाहच्या बोलावण्यावरून फरिश्ते जिब्राईल (अ.) यांच्याबरोबर बुर्राकवर बसून आकाशात विश्वाच्या अतिउच्च स्थानावर ज्याला 'अर्श' म्हणतात - जेथे अल्लाह विराजमान आहेत, तेथे गेले. याच घटनेला 'मेअराज' असे म्हणतात. ही घटना हिजरतच्या केवळ एक वर्ष अगोदर घडली. 'मेअराज'बद्दल कुरआनात सूरह 'बनी इस्त्राईल,' आयत क्रमांक एक मध्ये माहिती मिळते.

"पवित्र आहे तो जो आपल्या दासाला एका रात्री मस्जिदे हराम (काबागृह) पासून दूर त्या मस्जिदीपर्यंत घेऊन गेला जिच्याभोवती आम्ही समृद्धी राखली आहे, अशासाठी की त्यांना आपल्या काही निशाण्या दाखवाव्यात. निश्चितच तोच सर्वकाही ऐकणारा व पाहणारा आहे." (१७:०१)

हदीसमध्ये स्वत: प्रेषित मुहम्मद (स.) यांनी जे वर्णन केले आहे ते याप्रमाणे आहे - "रात्रीच्या वेळी अल्लाहचे फरिश्ते जिब्राईल (अ.) येऊन मला बुर्राक नावाच्या आकाशातील स्वारीवर बसवून अक्सा मशिदीजवळ घेऊन गेले. तेथे मी दुसऱ्या प्रेषितांबरोबर प्रार्थना केली. आकाशात मी वेगवेगळ्या प्रेषितांना भेटलो. शेवटी अतिउच्च स्थानावर ज्याला 'सिदरतुल मुनतहा' असे नाव आहे, पोहोचलो. पुढे मी स्वत:च जाऊ लागलो. जिब्राईल (अ.) म्हणाले, "सिदरतुल मुनतहाच्या एक पाऊल पुढे मी जाऊ शकत नाही. पुढे पाऊल टाकल्यास माझे पंख जळून जातील." पुढे मी एकटाच जाऊ लागलो. तेथे अतितेजस्वी प्रकाशच प्रकाश होता. पुढे मला याच वेळी स्वर्ग, नरक दाखवण्यात आले. कौसर हौद आणि इतर बऱ्याच गोष्टी मी पाहिल्या." पाच वेळा फर्ज नमाजची आज्ञा येथेच मिळाली. प्रेषितांनी ही घटना सांगताच त्यांची काफिर, यहुदी, मुशरिक यांनी टिंगल-टवाळी सुरू केली. लोकांना विविध ठिकाणची माहिती जेव्हा सांगितली तेव्हा सर्वजण आश्चर्यचकित झाले. कारण काही लोकांनी हा भाग अक्सा मशीद वगैरे पाहिलेला होता. प्रेषित नवीनच माहिती सांगत आहेत असे एका मुशरिकने म्हणताच अबु बकर म्हणाले, "जर प्रेषित सांगत असतील तर ते सत्यच असणार, यात शंका नाही."

चंद्र दुभंगणे

"अंतिम निवाड्याची वेळ जवळ आली आणि चंद्र दुभंगला." (५४:०१)

चंद्राच्या दुभंगण्याची घटना जी मक्केपासून जवळ मिना या ठिकाणी सुमारे ८ नबवीमध्ये घडली. कुरआन व अहदीस सहीह दोघांद्वारे सिद्ध आहे आणि समस्त भाष्यकारांचे याबाबत एकमत आहे. कुरआनची ही आयत या संदर्भात स्पष्ट करते की, 'चंद्र दुभंगला होता' या गोष्टीचे लक्षण होय की, अंतिम प्रलय (कयामत) जवळ येऊन ठेपला आहे आणि हे लक्षण कयामतीचे द्योतक बनून प्रकट झाले आहे. काफिरांनी या घटनेची जादू म्हणून संभावना केली.

याबाबतीत हदीस अशी आहे - "माननीय अब्दुल बिन मसऊद फर्मावितात की प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या काळात चंद्र दुभंगून त्याची शकले झाली होती. एक पर्वताच्या वर आणि दुसरा त्याच्या मागे. प्रेषितांनी फर्माविले, साक्षी राहा." (सहीहुल बुखारी किताबुत्तफसीर)

चंद्राच्या दुभंगण्याची ही घटना यावरून हा एक ईशचमत्कार होता. हे दुभंगणे असमान्यरीत्या घडले होते. सर्व भाष्यकार याबद्दल ठामपणे म्हणतात की, हा चमत्कार कोणाला दाखवण्यासाठी घडलेला नाही. यात 'कयामत लवकर येणार आहे' हे दाखविले गेलेले लक्षण होय.

एके ठिकाणी म्हटले आहे, ('महान प्रेषित', पान नं.६०) भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर मलबारचा राजा हरेश्वर्धन यानेसुद्धा चंद्राचे दोन तुकडे पाहिले व ते लगेच जुळले. त्या राजाला ती घडना घडली असे अनेक ठिकाणच्या लोकांनी येऊन सांगितले. तो राजा नंतर इस्लामचा स्वीकार करून धर्मप्रचारक बनला.

हिजरतच्या वेळची घटना

प्रेषित मुहम्मद (स.) व त्यांचे सोबती ईशआज्ञेप्रमाणे मक्का सोडून जाण्यास निघाले तेव्हा काफिरांनी त्यांच्या घरावर पहारा ठेवला होता. सूरह यासीनचे पठण करत त्या लोकांच्या दिशेकडे जेव्हा प्रेषितांनी मूठभर माती फेकली तेव्हा त्या काफिरांना हे दोघे त्यांच्या देखत जरी निघून गेले तरी दिसले नाहीत. तसेच पुढे ते गेले व आपला नक्कीच पाठलाग होईल हे त्यांनी ओळखले. म्हणून ते सूर पर्वतावर चढून गेले व तेथील एका गुहेत थांबले. ते गुहेत शिरताच गुहेच्या तोंडावर कोळ्याने जाळे बांधले व तोंडावरच एका कबुतराने अंडे घालून ते उबवत बसले. काफिरांनी येथे ज्याअर्थी कबुतर आहे व जाळे आहे त्याअर्थी तिकडे कोणी गुहेत जाणे शक्य नाही हे जाणून ते मागे फिरले. तीन दिवस तेथे ते राहिले व नंतर मदीनेकडे गेले. तेथेही त्यांचा पाठलाग एकजण (शुरका) करत होता, पण त्याच्या वाटेत इतकी विघ्ने आली की शेवटी त्याने पाठलाग करणे सोडले. १० जून ६२२ रोजी हिजरतची आज्ञा दुपारी आली व त्याप्रमाणे त्यांनी प्रयाण केले. मजल दरमजल करत ते मदीनेस पोहचले. इतक्या प्रतिकूल परिस्थितीतून ते मदीनेस सुखरूप पोहचले हा चमत्कारच होता.

पवित्र कुरआनचे अवतरण

पवित्र कुरआनचे अवतरण हासुद्धा एक महान चमत्कार आहे. 'उम्मी' - निरक्षर असलेल्या प्रेषितांवर हा ग्रंथ अवतरित झाला हाच मोठा चमत्कार आहे. अरबी भाषातज्ज्ञ मानतात की, कुरआनसारखी रचना बांधणे हे मानवी शक्तीच्या पलीकडचे आहे. आतापर्यंत तशी रचना करण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. पण कोणासही यश लाभले नाही. ईश्वराच्या मदतीखेरीज जगातील कोणाचीही मदत घ्या. जेवढ्यांनी एकत्र यायचे त्यांनी एकत्र येऊन प्रयत्न करा व या ग्रंथातील एका अध्यायासारखी रचना करून दाखवा. हे सर्वांना आव्हान दिले गेले आहे, पण आजपर्यंत ते आव्हान कोणी स्वीकारू शकले नाही. कुरआनात आलेली भविष्यवाणी, वैज्ञानिक सत्ये, नैसर्गिक घटना, भाषेचा प्रासादिकपणा, उच्च वाङमयीनता, भौगोलिक माहिती सातत्याने २३ वर्षे अवतरित होऊनही कोठेही विसंगती नाही. अशा एक ना अनेक गोष्टींवरून स्पष्टपणे जाणवते की कुरआन हा खरोखरीच महान ईशचमत्कारच होय. विशेष म्हणजे यात एकही आक्षेप आलेला नाही. जसे अवतरित झाले तसेच आज आपल्यापर्यंत आले आहे.

प्रेषित मुहम्मद (स.) यांचे विवाह

प्रेषित मुहम्मद (स.) हे वयाच्या २० व्या वर्षी मक्केतील खदीजा (रजि.) या विधवा कुरैश धनाढ्य स्त्रीच्या व्यापाराचे व्यवस्थापक म्हणून काम पाहू लागले. त्या खुलवैद यांच्या कन्या होत्या. सुशील व धनवान असून त्यांच्या शुद्ध आचरणामुळे त्यांना 'ताहिरा' म्हणत असत. त्या आपला व्यापारी माल सभ्य व प्रामाणिक कुरैश लोकांच्या व्यापारी काफिल्याबरोबर परदेशी पाठवीत असत. मुहम्मद (स.) यांचे उच्च चारित्र्य, प्रामाणिक वर्तन व त्यांच्याबद्दल विश्वास वाटल्यामुळे माननीय खदीजा आपल्या व्यापारी मालाबरोबर आदरणीय मुहम्मद (स.) यांनाही परदेशी पाठवत असत. असेच एकदा बसरा व सीरियास तिने त्यांना आपला एक गुलाम मैसराह याच्यासह पाठविले होते. त्यांनी तो माल चांगल्या किंमतीस विकला व दुसरा नवा माल खरेदी केला आणि ते मक्केस परतले. माननीय खदीजा यांना सर्व व्यवहार समजावून सांगितले आणि ते आपल्या घरी परतले. खदीजा यांच्या मैसराह या विश्वासू गुलामाने मुहम्मद (स.) यांचे सद्वर्तन, सत्यशीलता, सौम्य स्वभाव, उदार व नम्र वागणूक आणि प्रामाणिकपणा याबद्दल तारीफ केली. खदीजा यांची मैत्रीण नफीसा हिने मुहम्मद (स.) यांच्याबरोबर विवाह करण्याचा सल्ला दिला. तिनेच पुढाकार घेऊन मुहम्मद (स.) यांच्या चुलत्याकडून (अबु तालिब) संमती मिळवली व मुहम्मद (स.) यांचा विवाह खदीजा यांच्याबरोबर झाला.

या विवाहाच्या वेळी मुहम्मद (स.) याचे वय २५ वर्षे होते व खदीजा यांचे वय चाळीस वर्षे होते. त्या या लग्नापूर्वी दोन वेळी विधवा झालेल्या होत्या व पहिल्या नवऱ्यापासून एक मुलगी आणि दुसऱ्या नवऱ्यापासून एक मुलगा व एक मुलगी अशी संतती होती. त्या पहिल्या नवऱ्यांबद्दल अशी माहिती मिळते की, पहिल्या पतीचे नाव अतीक बिन आइज असून त्याच्यापासून हिंद नावाची मुलगी होती. दुसऱ्या पतीचे नाव अबु हाला असून त्याच्यापासून हिंद व हाला नावांची संतती होती. अबु हालाच्या मृत्युनंतर त्यांनी प्रेषितांशी विवाह केला.

प्रेषितांबरोबर २५ वर्षे वैवाहिक जीवन जगून प्रेषितत्व प्राप्त झाल्यानंतर प्रेषितत्वाच्या दहाव्या वर्षी रमजान महिन्यात ६५ व्या वर्षी माननीय खदीजा (रजि.) यांचा मृत्यु झाला. त्या जिवंत असेपर्यंत प्रेषितांनी दुसरा विवाह केला नाही. खदीजा (रजि.) यांच्यावर त्यांचे अतिशय प्रेम होते. आयेशा (रजि.) यांनी प्रेषितांना खदीजा (रजि.) यांच्याबद्दल विचारले असताना त्यांच्यावर माझे गाढ प्रेम होते व त्यांना मी

आयुष्यात विसरू शकणार नाही, असे प्रेषित म्हणाले होते. प्रेषितांना त्यांचा फार मोठा मानसिक आधार होता आणि प्रत्येक कठीण प्रसंगी त्या प्रेषितांच्या मागे ठाम उभ्या राहिल्या होत्या. त्यांच्या मृत्युनंतर प्रेषितांनी स्वत: आपल्या हातांनी खदीजांचा शव कबरीत दफन केला होता.

आदरणीय मुहम्मद (स.) यांच्या वैवाहिक जीवनाविषयी जनमानसात मोठे कुतुहल आहे आणि ते साहजिक आहे. त्यांच्या वैवाहिक जीवनाचा व संततीचा त्रोटक वृत्तान्त याप्रमाणे होय. प्रेषितांचा इतिहास लिहिणारे व इतर ठिकाणांहून मिळणारी माहिती यावरून स्पष्ट होते की, त्यांना एकूण अकरा पत्नी होत्या आणि त्यातील माननीय आयेशा (रजि.) एकमेव कुमारिका होत्या आणि बाकीच्या सर्वांचे पूर्वी विवाह झालेले होते.

(१) माननीय खदीजा (रजि.), (२) माननीय आयेशा (रजि.), (३) माननीय सौदा (रजि.), (४) माननीय हफ्सा (रजि.), (५) माननीय जैनब बिन्ते जहश (रजि.), (६) माननीय सलमा (रजि.), (७) माननीय जैनब बिन्ते खुजैमा (रजि.), (८) माननीय जुवैरिया (रजि.), (९) माननीय हबीबा (रजि.), (१०) माननीय सफीया (रजि.) आणि (११) माननीय मैमुना (रजि.)

माननीय खदीजा (रजि.) यांनाच फक्त संतती झाली. त्यांना चार मुली व दोन मुलगे झाले. याशिवाय मारिया किब्तीया या (दासी) पत्नीपासून एक पुत्र (इब्राहीम) झाला. प्रेषितांच्या निधनाच्या वेळी फातिमा (रजि.) या एकमेव कन्या जिवंत होत्या आणि त्याही प्रेषितांनंतर सहा महिन्यांनी निधन पावल्या. प्रेषितांचे सर्व पुत्र अगदी बालपणीच गेले.

आयेशा (रजि.) अत्यंत बुद्धिमान असून त्यांच्या अनेक हदीस आहेत. प्रेषितांनंतर धर्माबाबतीत त्यांनी अनेकांना मार्गदर्शन केले. त्यांचा मदीनेत मृत्यु झाला आणि तेथेच जन्नतुल बकीमध्ये त्यांना दफनवले गेले.

माता सौदा (रजि.) या हबशास स्थलांतरित आपल्या पतीबरोबर गेल्या होत्या. हफ्शा (रजि.) अत्यंत धार्मिक असून सतत ईशउपासनेत मग्न असत. माननीय जैनब (रजि.) अत्यंत दानी असून त्यांना 'गरिबांची आई' असे म्हटले जात असे. त्यांचा पती बद्रच्या लढाईत हुतात्मा झाला. पुनर्विवाहानंतर केवळ आठ महिन्यांनीच त्यांचा मृत्यु झाला. माननीय सलमा (रजि.) याही विधवा होत्या. त्यांचे पती उहदच्या लढाईत मारले गेले. माननीय सलमा (रजि.) अत्यंत सुस्वरूप होत्या व त्यांच्या सौंदर्याची तारिफ आयेशा (रजि.) यांनी केलेली आहे. प्रेषितांच्या पत्नींत सर्वांत शेवटी मृत्यु पावल्या माननीय जैनब

(रजि.) यांचा प्रेषितांच्या दत्तक पुत्राबरोबर विवाह झाला होता व तलाकनंतर प्रेषितांशी विवाह झाला. सूरह 'अहजाब' मध्ये त्याविषयी माहिती मिळते. त्या अत्यंत दानी असून स्वकष्टाने मिळणाऱ्या मिळकतीतून त्या दान करीत असत. माननीय जुवैरिया (रजि.) याही मदीनेत मृत्यु पावल्या. या सरदार हारिस यांची कन्या होत्या. माननीय हबींबा (रजि.) ऊर्फ मर्यला ऊर्फ हिंद या प्रेषितांच्या नवव्या पत्नी होत्या. माननीय सफीया (रजि.) या दहाव्या पत्नी. राजकीय सलोख्याच्या रूपात हा विवाह केला गेला. माननीय मैमुना (रजि.) या अकराव्या पत्नी असून त्यांचे खरे नाव बर्रा होते. पण प्रेषितांनी तें बदलून मैमुना केले. त्या अत्यंत कष्टाळू व दयाळू म्हणून प्रसिद्ध होत्या असे माननीय आयेशा (रजि.) म्हणतात. त्या सतत ईशआराधनेत मग्न असत.

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी हे विवाह विधवा व शहीद झालेल्या आपल्या सोबत्यांच्या स्त्रियांशी आणि त्यांना आपले पत्नीपद देऊन समाजात उच्चदर्जा प्राप्त करून देण्यासाठी केले, तर एक-दोन विवाह हे राजकीयदृष्ट्या केले गेले. प्रेषितांच्या मृत्युसमयी माननीय खदीजा (रजि.) व माननीय जैनब (रजि.) सोडून बाकी नऊ पत्नी हयात होत्या.

प्रेषित मुहम्मद (स.) यांची संतती

बहुतेक इतिहासकारांचे व हदीस लिहिणाऱ्यांचे मत आहे की, प्रेषितांना चार मुली असून दोन पुत्र झाले. ही सर्व संतती खदिजा (रजि.) यांच्यापासून झाली. यातील त्यांचे दोन पुत्र अगदी लहान असतानाच मरण पावले. त्यांना इब्राहीम नावाचा एक दासीपुत्र झाला होता. तोही मांडीवर असतानाच गेला. इब्राहीम हा मारिया किब्तियापासून पुत्र झाला. कासिम, अब्दुल्लाह व इब्राहीम हे तीन पुत्र झाले. यातील मुलींची नावे - (१) जैनब (रजि.), (२) रुकैय्या, (३) उम्मे कुलसुम आणि (४) फातिमा होत.

प्रेषितांची सर्व संतान फक्त फातिमा सोडून, त्यांच्या आधीच निधन पावली. फक्त फातिमा हयात होत्या व त्याही प्रेषितांच्या नंतर सहा महिन्यांनी गेल्या. त्यांचे इमाम हसन आणि हुसैन हे दोन पुत्र होते. करबलाच्या लढाईत हुसैन शहीद झाले. प्रेषितांच्या फातिमा या मुलीकडून वंश आजही चालू आहे.

प्रेषितांच्या सर्व पत्नींचा मुस्लिमांसाठी त्यांचा दर्जा मातांचा आहे, "प्रेषितांच्या पत्नी त्यांच्या (श्रद्धा बाळगणाऱ्या) माता होत." (कुरआन - ३३:०६)

"तुमच्या मानसपुत्रांना त्यांनी तुमचे खरे पुत्र बनविले नाही." (कुरआन - ३३:०४) दत्तकपुत्राच्या पत्नीस सून म्हटले जात नाही. त्यामुळे अशा पुत्राने पत्नीस तलाक दिल्यावर सासरा विवाह करू शकतो. असाच विवाह प्रेषितांनी जैनब (रजि.)

यांच्याबरोबर केला होता. त्या प्रेषितांच्या सात क्रमांकाच्या पत्नी होत्या. "मुहम्मद तुमच्या पुरुषांपैकी कोणाचेही बाप नाहीत." (कुरआन - ३३:४०) इस्लामने दत्तक ही संकल्पना या घटनेने कायमचीच नाकारली आहे.

कुरैशांशी जे सशस्त्र संग्राम सुरु झाले, त्यांत त्यांचे सोबती शहीद झाले आणि त्यांच्या पत्नी व मुले निराधार झाल्या. अशा विधवांचे व त्यांच्या मुलाबाळांचे दु:ख निवारण करण्यासाठी प्रेषितांनी आपल्या स्वत:वर ती जबाबदारी घेतली. त्यांना पत्नीत्व देऊन समाजात उच्च दर्जा व स्थान प्राप्त करून दिले. त्यांना संरक्षण दिले. केवळ आपल्याशी जवळीक असणाऱ्यांच्या विधवांना नव्हे, तर शत्रुंच्या तीन विधवांशी विवाह केला. त्या म्हणजे, जवैरिया, मैमुना आणि सफीया होत. प्रेषितांच्या घरांत त्यांचा प्रवेश झाल्यामुळे विविध टोळ्यांशी त्यांचे संबंध अधिक बळकट झाले. वैराचे व आकसाचे लढे व रक्तपात थांबले.

पवित्र प्रेषितांचे विवाह आपल्या निष्ठावान अनुयायांच्या विधवांना दु:खावस्थेततून मुक्तता करण्यासाठी करुणा व दया भावनेपोटीच केले. तर शत्रुपक्षातील प्रमुखांशी मेळमिलाफ करण्यासाठी काही वैवाहिक संबंध जोडले.

त्यांच्या काही पत्नींमुळे अनेक स्त्रियांचे नैतिक व धार्मिक प्रशिक्षण त्यांना साधता आले. या पत्नी इतर स्त्रियांना मार्गदर्शन करणाऱ्या दीपस्तंभ बनल्या. त्या पत्नींनी विश्वासपूर्वक व प्रामाणिकपणे प्रेषितांच्या खाजगी जीवनाबद्दल जी पवित्र माहिती पुरविली त्याबद्दल त्यांची उम्मत त्यांचे ऋण मानते. त्यातूनच "खचितच प्रेषितांच्या जीवनचरित्रात तुमच्यासाठी उत्तम आदर्श आहे." (कुरआन - ३३:२१) हे अनेक निष्ठावान लोकांना मार्गदर्शक ठरले. खुद्द कुरआन - ३३:५२ प्रमाणे यानंतर नवीन विवाह करण्यास प्रेषितांना हक्क नाकारला गेल्याचे दिसते. कारण त्यांना जी सामाजिक व धार्मिक प्रचाराची आता आवश्यकता होती ती उरली नाही.. तसेच कोणत्याही विद्यमान पत्नीस तलाक देण्याचा अधिकारही नाकारला गेला. प्रेषित नेहमी ईशभय ठेवूनच आपले वर्तन ठेवीत. या आयतीच्या अवतरणानंतर त्यांनी कोणताही नवीन विवाह केला नाही.

प्रेषितत्व, हिजरत व जिहाद

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या चरित्राचा अभ्यास करताना हे लक्षात येते की प्रेषितत्व प्राप्त होण्यापूर्वीचे त्यांचे जीवन अगदी सर्वसामान्य माणसाप्रमाणे होते. एखाद्या सामान्य संसारी माणसासारखे ते वावरत होते. संसाराच्या जबाबदाऱ्या पार पाडत. बाजारहाट करीत, घरची कामे संसारी माणसाप्रमाणे सांभाळत. वरून जरी ते अत्यंत

सामान्य माणसाप्रमाणे जगत असले तरी त्यांचे चित्त कधी स्थिर नव्हते. सतत या जगात घडणाऱ्या घटना, त्यांचे अन्योन्य संबंध, या सर्वांचा कोण आहे रक्षणकर्ता, सर्व विश्वाचे व्यवहार नियंत्रण कोण करितो? यासारखे अनेक प्रश्न त्यांना अस्वस्थ करीत आणि त्यांची उकल कशी कळावी याने ते व्याकूळ होत. याचे सतत चिंतन व मनन चालत असे. काहीवेळा त्या अवस्थेतूनच ते 'गारे हिरा' येथे कित्येक दिवस चिंतनात व्यतीत करत. ईशचिंतनाने त्यांना प्रेषितत्व प्राप्त होण्यापूर्वी पहाटे तांबडे फुटताना काही अस्पष्ट व सूचक अशी दृश्ये दिसत असत, असा उल्लेख त्यांच्या चरित्रात येतो.

रमजान महिन्यात आद्य ईशदूत जिब्राईल (अ.) यांनी एका रात्री प्रकट होऊन त्यांना प्रेषित म्हणून निवडल्याची घोषणा केली आणि कुरआनमधील 'अल अलक' या सूरहच्या पहिल्या पाच आयती अवतरित झाल्या. त्यांना त्या पठण कर म्हणून बजावले. कारण निरक्षर आहोत, असा खुलासा केला तेव्हा, त्यांना तीनदा आपल्या उराशी आवळून सोडले आणि प्रेषित त्यानंतर ईशसंदेश धडधड म्हणू लागले. कुरआनचे हे सुरू झालेले अवतरण तेही निरक्षर माणसावर हाच मोठा दैवी चमत्कार ठरला. त्या वेळी प्रेषितांचे वय ४० वर्षे होते आणि पुढे २२ वर्षे ५ महिने हे अवतरण थोडे थोडे करून अवतरित होत राहिले. ''आम्ही थोडे थोडे करून कुरआन अवतरित केले.'' याची साक्ष कुरआनच देतो.

कुरआन अवतरित होताना ते विसरू नये म्हणून प्रेषित घाईघाईने पठण करीत होते तेव्हा ''घाबरू नका, तुम्ही सावकाश पठण करा. हे अवतरण सुरक्षित राहील, काळजी करू नका.'' अशी ग्वाही खुद्द कुरआनमधील 'अल हिज्र' अध्यायातील ९व्या आयतीत ईश्वराने दिलेली आहे.

जबूर, तौरात व इंजील या ईशग्रंथात आणि कुरआनात महत्त्वाचे दोन फरक आहेत. पहिला म्हणजे बाकीचे ईशग्रंथ एकाच वेळी अवतरित झाले पण कुरआन थोडे थोडे करून अवतरित झाला. इतर ईशग्रंथात मानवी प्रक्षेप पुढील काळात आले. पण कुरआन जसे अवतरित झाले तसेच्या तसे एका कानामात्रेचा फरक न होता आजपर्यंत आपल्याकडे आले आहे.

प्रेषित निरक्षर असल्याचा उल्लेख कुरआनात चार-पाच ठिकाणी आला आहे. कुरआनची ओघवती, ओजस्वी, तेजस्वी व मधूर भाषाही त्याच्या ईशावाणी असल्याची साक्ष देते.

ईश्वराने ज्या गोष्टी शुद्ध व रास्त म्हटल्या आहेत त्यांना निषिद्ध ठरवण्याचा अधिकार प्रेषितांना नाही, हे स्पष्टपणे बजावण्यात आले आहे. कुरआनात खुद्द

प्रेषितांना काही ठिकाणी जेथे ते चुकले तेथे लगेच तंबी दिली गेली आहे. शेवटी आपण मानवच आहोत व आपल्या हातून चुका घडू शकतात हे ओळखून प्रेषितांनी ईश्वराची क्षमायाचना केलेली दिसते. प्रेषितांचे कुरआन हे आत्मलेखन आहे याचे त्यामुळे खंडन होते.

"प्रेषित स्वत:च्या मनाने काही सांगत नाही. हा तर एक दिव्यबोध आहे जो त्यांच्यावर अवतरला जातो." (कुरआन - ५३:३,४)

"आम्ही तुम्हाला पाठवलेले आहे हे प्रेषित! एक संदेश म्हणून सर्व मानवजातीकडे आणि अल्लाहची साक्ष पुरेशी आहे." (४:७९)

"सांगा (हे प्रेषित!) हे माणसांनो, मी तुम्हा सर्वांसाठी अल्लाहचा प्रेषित म्हणून आलो आहे." (७:१५८)

"हे प्रेषिता! आम्ही तुम्हाला अखिल मानवजातीसाठी आमच्या करुणेचा अविष्कार म्हणून पाठविले आहे." (२१:१०७)

पहिली तीन वर्षे इस्लामची शिकवणही प्रामुख्याने आपल्या जवळच्यांना दिली गेली. पण तीन वर्षांनी सर्वत्र शिकवण प्रसारित करण्याचा ईशआदेश आला आणि त्याप्रमाणे प्रेषितांनी आपले कार्य जाहीररीत्या सुरू केले व त्याबरोबर रूढीप्रिय व सनातनी कुरैशांनी त्यांचा व त्यांच्या अत्यल्प असलेल्या अनुयायांचा भयंकर छळ सुरू केला. शेवटी तुकड्या-तुकड्यांनी त्यांनी ॲबिसेनियाकडे प्रयाण केले.

प्रेषितांचा, त्यांच्या कुटुंबियांचा सामाजिक बहिष्कार घालून जगणे दुरापास्त केले गेले. काही काळाने तो मागे घेतला गेला. पण त्रास देणे सुरूच राहिले. शेवटी प्रेषितांना हिजरतचा (स्थलांतराचा) आदेश ईश्वराकडून आला आणि त्याप्रमाणे अबूबक्र व प्रेषित एका रात्री मक्केहून निघाले. पुढे तीन दिवस त्यांनी गारे सौर येथे मुक्काम केला. ईशकृपेने ते पाठलाग करणाऱ्यांना सापडले नाहीत. नाहीतर त्यांना जीवनिशी संपविण्याचाच विविध कुरैशांच्या प्रमुखांनी इरादा केला होता आणि योजनाही आखल्या होत्या. पण त्यांना यश आले नाही आणि प्रेषित व अबूबक्र सुखरूप मदीनेस पोहचले.

पूर्वी मक्केला यात्रेस येणाऱ्या मदीनेतील अन्सारांनी ईमान आणले होते. त्यांनी प्रेषितांना मोठे सहाय्य केले. अनेक ठिकाणी प्रेषितांनी अन्सारांच्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केलेली आढळते.

प्रेषित मुहम्मद (स.) मदीनेत पोहचल्यावर त्यांना उसंत मिळेल आणि शांतता लाभेल असे वाटत होते. पण त्यांना चिरडून टाकण्यासाठी काफिर कुरैश मोठ्या सैन्यासह तिकडे चालून आले. प्रेषितांची शक्ती काहीच नव्हती. पण अल्लाहच्या मदतीमुळे

प्रेषितांना विजय मिळाला. ती पहिली लढाई 'बद्रची लढाई' म्हणून ओळखली जाते. याच काळात ''तुम्ही आता शस्त्र हाती घ्या'' अशी आज्ञा अवतरली आणि त्यापासूनच उहूदची लढाई, खंदकांची लढाई, हुनैनचे युद्ध, तबुकचे न झालेले युद्ध, ज्यू टोळ्यांचा उपद्रव नष्ट करण्यासाठी आदेश आला. बंडखोरीच्या पवित्र्यात असलेल्या अरबांशी लढाया. अशी सशस्त्र संघर्षांची मालिका सुरू झाली. स्वसंरक्षणासाठी तसेच इस्लाम प्रसाराच्या आड येणाऱ्यांशी लढाया, असा सिलसिला सुरू झाला. त्यांनाच 'जिहाद'ची मालिका म्हटले जाते. या लढायांत स्त्रिया, मुले, रुग्ण अशांना सूट दिली होती. तसेच यातूनच 'जिझिया'ची सुरुवात झाली. जिहादमध्ये अकारण रक्तपात, अनाचार, अतिरेक, अत्याचार यांना स्थान नाही असे सांगणाऱ्या अनेक आयती आल्या आहेत. यात मुलूखगिरी करण्यासाठी लढायांना स्थान नाही. प्रेषितांनी स्वत: नेतृत्व केलेला जिहाद होता आणि बाकीच्या अनेक लढाया त्यांच्या अनुयायांच्या नेतृत्वाखाली झाल्या. या लढायांना धार्मिक अधिकार होते. साम्राज्यवादासाठी जे अनेक मुस्लिम आक्रमक झाले, महत्त्वाकांक्षी राजांनी आपले राज्ये वाढविण्यासाठी केलेली आक्रमणे ही जिहाद नव्हती. ते सर्व 'किताल' होते.

प्रेषितांच्या जिहादविषयीच्या ज्या अनेक हदीस आल्या आहेत त्यावरून अल्लाहला अपेक्षित असलेला जिहाद जगासमोर येईल. खरा जिहाद म्हणजे आपल्यातील षड्‌रिपूंविरुद्ध केलेला संघर्ष होय. अबू सईद अली खूद्रीच्या निवेदनानुसार प्रेषितांनी म्हटले आहे, ''एखाद्या जुलमी व क्रूर शासनकर्त्याच्या तोंडावर बेडरपणे सत्य मांडणे हा सर्वोत्तम जिहाद आहे. जिहाद म्हणजे हिंसाचारी कृत्य नव्हे, तर तो अल्लाहच्या मार्गात केला जाणारा सर्वंकष लढा आहे. जिहाद म्हणजे 'न्याय्य लढाई होय.''' (कुरआन - ५:३५) या आधारे अनेक हदीस आल्या आहेत. ''जे श्रद्धा बाळगतात ते अल्लाहच्या मार्गात युद्ध करतात व जे अश्रद्ध आहेत ते सैतानाच्या मार्गात लढतात.''

(कुरआन - ४:७६)

जिहाद म्हणजे भौतिक लाभासाठी केलेले सशस्त्र आक्रमण नव्हे. राष्ट्राच्या किंवा कबिल्याच्या शक्तीचे ते स्वैर प्रदर्शन नसते. मानवाच्या कल्याणासाठी प्रत्येक मुस्लिमावर नेमून दिलेले ते आद्यकर्तव्य आहे.

प्रेषितांनी विविध ठिकाणच्या सत्ताधीशांना इस्लामकडे येण्याचे आवाहन केले आणि कित्येक ठिकाणी ते प्रचारकार्य चालविण्यासाठी त्यांनी आपले प्रतिनिधी पाठवले, शिष्टमंडळे पाठवली. प्रचारकार्य जोमाने सुरू झाले आणि अनेक ठिकाणच्या लोकांनी इस्लाम स्वीकारला. संपूर्ण अरबस्तानमध्ये इस्लाम स्वीकारून आणि जगाच्या विविध भागात वेगाने इस्लाम प्रसार पावत गेला.

प्रेषितांच्या काळात झालेल्या लढाया

प्रेषितांच्या सर्व कार्याची सांगता त्यांच्या झालेल्या लढाया यांचा विचार केल्याशिवाय होत नाही. प्रेषितांच्या काळात झालेल्या लढायांच्या काळात विविध आयती कुरआनात अवतरित झालेल्या आहेत. तेथूनच 'जिहाद' या शब्दाचा वापर पुढील काळात सतत आलेला दिसतो. सर्वसाधारणत: 'धर्मयुद्ध' म्हणून जिहादचा अर्थ घेतला जातो.

जिहादला इस्लाममध्ये फार महत्त्व आहे, जिहादला इस्लामचा सहावा स्तंभ असेही म्हटले जाते. मुस्लिम पंडित जिहाद हा इस्लामचा गाभा आहे असे मानतात. या शब्दाचा स्थूल मानाने अर्थ 'पराकाष्ठा करणे', 'ईश्वरी कार्यासाठी/हेतूसाठी प्रयत्न करणे.' जिहाद हा मुळात कोणत्याही प्रयत्नांसाठी, संघर्षासाठी वापरला जाणारा सर्वसामान्य शब्द आहे. हा अरबी शब्द असून मूळ धातू 'जूहद' किंवा 'जहद' यापासून बनलेला आहे. जिहाद हा तीन प्रकारचा संघर्ष आहे. (१) दृश्य (मानवी) शत्रुविरुद्ध (२) सैतानाविरुद्ध आणि (३) स्वत:विरुद्ध.

कुरआनात जिहादविषयी आलेले आदेश

पहिला आदेश : "ज्या लोकांवर अत्याचार केला गेला आहे, त्यांना माझा (अल्लाहचा) लढाईसाठी हुकूम दिला जात आहे. अल्लाह त्यांच्या सहाय्यतेचे सामर्थ्य ठेवतो. यात शंका नाही." (कुरआन - सूरह अल हज्ज, आयत ३९) जिहादची ही पहिली आज्ञा होय.

दुसरा आदेश : "जे तुमच्याशी युद्ध करीत आहेत त्यांच्याविरुद्ध तुम्हीही युद्ध करा." सूरह 'बकरा,' आयत १९०. "आणि उपद्रव संपेपर्यंत युद्ध करा." (२:१९३) "जिहाद करणे तुमच्यावर फर्ज (अनिवार्य) आहे." (२:२१६) आणि अल्लाहसाठी युद्ध करा." (२:२४४)

"श्रद्धावंतांनो, सभोवतालच्या नकार देणाऱ्यांशी युद्ध करा." (९:१२३)

"हे प्रेषित! नाकारणारे आणि दांभिक दोन्हींशी युद्ध करा आणि त्यांच्याशी कठोरपणे वागा." (९:७३)

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी प्रत्यक्ष भाग घेतला अशी युद्धे

१) इस्लामसाठी नखलावरील चाल (इ.स. ६२३).

२) बद्रचे युद्ध (इ.स. ६२४) मक्केच्या कुरैशींविरुद्ध पहिली सर्वंकष लढाई.

३) बनू कैनुका टोळीची हकालपट्टी (इ.स. ६२४) मदीनेहून हुसकावून लावलेली पहिली ज्यू टोळी.

४) उहूदचे युद्ध (इ.स. ६२५) प्रेषितांच्या नेतृत्वाखालील मुजाहिदांची मक्केतील कुरैश टोळीकडून झालेली पिछेहाट.

५) बनू नझीर टोळीची हकालपट्टी (इ.स. ६२५).

६) बनू मुस्तलिक विरुद्ध जिहाद (इ.स. ६२६-६२७) मुस्तलिक ही अरब टोळी होती.

७) खंदकाचे युद्ध (इ.स. ६२७) याला 'अहजाब'चे युद्ध असेही म्हणतात. या युद्धात प्रेषितांच्या सरसेनापतीत्वामुळे वेढा घालणाऱ्या कुरैशना मदीनेतून परतावे लागले.

८) बनू कुरैशाचा सर्वनाश (इ.स. ६२७) मदीनेतील तिसऱ्या ज्यू टोळीला नष्ट केले.

९) हुदैबियाची मोहीम (इ.स. ६२८)

१०) खैबरवरील विजय (इ.स. ६२८)

११) मक्केवरील विजयानंतर (इ.स. ६३०)

१२) हुनैनचे युद्ध (इ.स. ६३०) मक्केवरील विजयानंतर व ताईफच्या वेढ्यापूर्वी झालेली लढाई.

१३) तबुकची मोहीम (इ.स. ६३०)

जिहाद हे भौतिक लाभासाठी केले जात नसते. तसेच स्त्रिया, वृद्ध, रुग्ण व मुले यांना उपद्रव होता उपयोगी नाही. निरपराधी लोकांना त्रस्त केले जाण्यास मनाई आहे.

हज्जतुल विदा (निरोपाची हज-यात्रा)

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी हिजरी दहामध्ये हजयात्रा करण्याचे जाहीर केले. ईशसंदेश प्रसाराचे कार्य पूर्ण झाले होते. अज्ञानात खोलवर बुडालेल्या लोकांना पवित्र प्रेषितांनी प्रकाश दिला आणि अल्लाहवरील गाढ श्रद्धेची त्यांना प्रेरणा दिली. 'तोच एकमेव विश्वाचा निर्माणकर्ता, धनी व पालनकर्ता आहे' हे त्यांच्या मनावर बिंबवले. सततच्या लढायात अविरत रक्तपात करणाऱ्या विस्कळीत लोकांत विचार व आचाराची एकात्मता निर्माण केली आणि त्यांना प्रेम व बंधुभावाच्या बंधनात गुंफले. त्यांचे जीवन म्हणजे एक उदात्त कार्य, उदात्तपणे व अत्यंत विश्वासाने केलेल्या कार्याच्या नोंदीचे एक संपूर्ण दप्तरच आहे. ते कार्य त्यांनी अशा उत्साहाने व तळमळीने केले की त्यात त्यांनी

कसलीही तडजोड केली नव्हती. ते कार्य अविरत चालू राहिले. हे कार्य मोठ्या धैर्याने त्यांनी पार पाडले. त्यांनी विरोध, प्रतिकार याची तमा केली नाही. हेच एकमेव कार्य ठरवून त्यांनी आपले उद्दिष्ट साध्य केले.

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी हिजरी सन १० मध्ये हजयात्रेचा कार्यक्रम जाहीर केला. त्याप्रमाणे त्यांनी मदीनेहून आपल्या यात्रेस सुरूवात केली. प्रेषित मुहम्मद (स.) हजयात्रेस निघाल्याचे कळल्यावर अरबस्तानच्या विविध भागांतून हजारोंच्या संख्येने सहाबा या यात्रेत सामील होण्यासाठी मक्केकडे निघाले.

प्रेषितांनी हजयात्रेच्या संधीचा फायदा घेण्याचे ठरविले. काबागृह पूर्णत: स्वच्छ व शुद्ध करण्यात आले. कोणत्याही मूर्तीपूजनाचा विधी शिल्लक राहिला नव्हता. ते यात्रेला निघाले, या त्यांच्या यात्रेस 'हज्जतुल विदा' (निरोपाची यात्रा) संबोधले जाते. कारण ही प्रेषितांची अंतिम हजयात्रा होती.

अरबस्तानच्या सर्व भागांत यात्रेचा संदेश देण्यासाठी सांडणीस्वार पाठविले गेले. या महान यात्रेत सहभागी होण्यासाठी लोकांना निमंत्रणे पाठविली गेली. याचे कारण स्वत: आपल्या डोळ्यांनी यात्रेचे सर्व विधी पहावेत आणि यात्रेतील आदेशांची व आचरणाची त्यांना नीट ओळख व्हावी व ज्ञान लाभावे म्हणून मुद्दाम निमंत्रणे दिली गेली होती. या सर्व विधींमध्ये अज्ञानकाळातील कोणत्याही प्रथांचा, रीती-रिवाजांचा लवलेशही नव्हता. आणि यापुढे निरंतर काळासाठी ही पद्धत निष्ठापूर्वक चालवावयाची होती.

पवित्र प्रेषितांनी जिलहज्ज महिन्याच्या पाच दिवस आधी यात्रेचा पेहेराव (एहराम) अंगावर घातला. त्यांच्याबरोबर १ लाख १४ हजार, काहींच्या मते १ लाख २४ हजार तर काहींच्या मते १ लाख ४४ हजार लोकांसह मक्केकडे निघाले. त्यांच्या सर्व पत्नी त्यांच्याबरोबर होत्या. सर्वजण "लब्बैक! लब्बैक!" असा उद्घोष करीत होते. त्याचा अर्थ "मी येथे आहे, तुझ्या सेवार्थ, मी येथे आहे, हे स्वामी! तुझा कोणीही सहभागी नाही," ही घोषणा करण्यासाठी मी येथे आहे. सर्व स्तुती आणि अनुग्रह तुझ्यासाठीच आहे. तुझेच एकूण सार्वभौमत्व आहे, तुझ्या सेवेसाठी मी येथे आहे. तुझा कोणीही वाटेकरी नाही. हे अल्लाह! प्रेषित मुहम्मद (स.) व त्यांचेबरोबर सर्व यात्रेकरू तसाच उद्घोष करीत होते.

प्रेषित मुहम्मद (स.) जिलहज्जच्या ५ तारखेस मक्केस पोहचले. त्यांनी पवित्र काबागृहाला सात प्रदक्षिणा (तवाफ) घातल्या. इब्राहीमच्या स्थळापाशी (मुकामे इब्राहीम) दोन रकआत नमाज अदा केली आणि मग ते 'सफा' टेकडीवर चढले. तेथून त्यांनी घोषणा केली की, "अल्लाहखेरीज कोणीही ईश्वर नाही. त्याचा कोणीही सहभागी

नाही. सर्व सार्वभौमत्व व स्तुती केवळ त्याचीच आहे. तोच जीवन देतो तसेच मरणही देतो. तो सर्व वस्तूंवर सर्वोच्च प्रभावशाली व सर्वसमर्थ आहे. त्याने आपल्या वचनाची पूर्तता केली. त्याने आपल्या दासाला सहाय्य केले आणि त्यानेच एकट्याने अश्रद्धांची सर्व शक्ती चिरडून टाकली.'' दरम्यानच्या काळात येमेनच्या यात्रेकरूंसह अली (रजि.) प्रेषितांना येऊन मिळाले.

जिलहज्जच्या आठ तारखेस प्रेषित आपल्या सोबत्यांसह 'मीना' येथे गेले. सबंध रात्र त्यांनी तेथेच घालवली आणि नऊ तारखेला सकाळी प्रार्थना केल्यानंतर ते 'अराफत' या ठिकाणी गेले. तेथे अराफतच्या मैदानात कसवा उंटीणीवर बसून त्यांनी आलेल्या सहाबांसमोर जे प्रवचन केले त्याच प्रवचनास 'हज्जुतल विदा'चे प्रवचन किंवा 'हज्जतुल बलाग' म्हणतात. हे प्रवचन अंतिम प्रवचन ठरते. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या या प्रवचनात विदाईचा रंग आढळतो. त्यांनी निरवानिरवीची भाषा सूचित केल्याचे अभ्यासकांच्या सहज लक्षात येते.

१) या हजयात्रेत त्यांनी सर्वांना बजावून सांगितले, ''हज यात्रा कशी करावी, हे नीट पाहा व लक्षात ठेवा. जे हजर नसतील त्यांनाही यात्रेची पूर्तता कशी करावी हे सांगा.'' यातच ही आपली शेवटची हजयात्रा आहे. हेच त्यांनी सूचित केलेले दिसते.

२) अराफतच्या मैदानात प्रवचनाच्या सुरुवातीलाच त्यांनी सांगितले, ''लोकहो मी व आपण अशा रीतीने पुन्हा कधी एकत्र येऊ किंवा नाही.'' म्हणजे हे संमेलन शेवटचे संमेलन होय, हेच त्यांनी स्पष्टपणे ध्वनीत केले होते. (मादबुल अमाल, हदीस नं. ११०७, वाबसा रजि. यांचे कथन इब्ने असाकीर.)

३) त्यानंतर लोकांना उद्देशून म्हणाले, ''जे जे ईश्वराने मला सांगितले ते मी आपल्यापर्यंत पोहचवले आहे. याला तुम्ही साक्षी आहात.'' लगेच लोकांनी प्रेषितांना उद्देशून म्हटले, ''हो! आपल्यापर्यंत जे आले ते आपण आमच्यापर्यंत पोहचते केले आहे.'' त्याच वेळी आकाशाकडे तर्जनी करून प्रेषित म्हणाले, ''अल्लाह! हे लोक जे सांगत आहेत याची तू पण खात्री करून घे.'' अर्थात अल्लाहने आपणावर जे सोपवलेले कार्य होते ते आपण पूर्ण केले, हेच त्यांनी स्पष्टपणे सुचवलेले दिसते.

४) ''लोकांनो! माझे शब्द लक्षपूर्वक ऐका. मी तुम्हाला संदेश देत आहे की तुम्ही तुमच्या स्वामीसमक्ष हजर होण्याच्या काळापर्यंत तुमचे रक्त आणि मालमत्ता व तुमची अब्रू पवित्र आणि अभंग आहे. आजच्या दिवसाइतके आणि

महिन्याइतकेच ते सर्वांसाठी पवित्र आहे. खचितच तुम्ही तुमच्या स्वामीला भेटाल आणि तुमच्या कृत्यांबद्दल तुम्ही उत्तरदायी असाल. मी तुम्हाला संदेश पोहचविला आहे, नाही काय? हे अल्लाह तू साक्ष राहा."

५) "ज्या कोणाकडे विश्वस्त म्हणून काही ठेवलेले असेल, ते त्याने ठेवीदाराला परत करावे. सावध राहा. जो अपराध करील, त्याच्याखेरीज अन्य कोणीही त्या अपराध्याला जबाबदार नाही, पित्याच्या अपराधासाठी त्याचा मुलगा जबाबदार नाही. तसेच मुलाच्या गुन्ह्यांसाठी त्याचा बाप जबाबदार नाही."

६) "एक मुस्लिम दुसऱ्या मुस्लिमाचा भाऊ आहे आणि त्या सर्वांचा मिळून एक बंधु समाज बनतो. एका मुस्लिमाचे दुसऱ्या मुस्लिमाने जबरदस्तीने घेणे उचित व कायदेशीर नाही. अज्ञानकाळातील सर्व रुढी व अज्ञानकाळातील रिवाज-परंपरा माझ्या टाचेखाली आहेत. अज्ञानकाळातील रक्ताचा सूड उगवण्याचे दिवस आता क्षमा करून सूट दिली गेली आहे."

७) "व्याज घेण्याची सक्त मनाई आहे. तुमची मुद्दल वसूल करण्याचा तुम्हाला अधिकार आहे. अल्लाहचा हुकूम आहे की, व्याजाचा व्यवहार हराम ठरवला आहे. व्याजाचा व्यवहार नसावा. अल्लाहने हुकूम दिला आहे व त्याच्या पालनाची सुरूवात मी करतो आणि अब्बास बिन अब्दुल बिन मुत्तलीब यांना येणे असलेली व्याजाची रक्कम सोडून देतो. खचितपणे पूर्ण रक्कमच सोडून देण्यात आली आहे."

८) "खचितच अल्लाहच्या हमीवरच तुम्ही पत्नीचा हात हातात घेतला आहे. अल्लाहच्या शब्दावरच त्यांचे शरीर तुम्हाला वैध ठरविले आहे. खचितच तुमच्या पत्नीवर तुमचे काही अधिकार आहेत आणि तुमच्या पत्नीचे तुम्हावर काही अधिकार आहेत. वैवाहिक अधिकारांचा आदर राखणे हे त्यांचे अवश्य कर्तव्य आहे. अनुचित कार्य न करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. पत्नीने अनुचितपणे वागले तर तिला शिक्षा करण्याचा तुम्हाला अधिकार आहे, पण ती कठोर असू नये. ती अनुचित कृत्यांपासून दूर झाली तर तिच्या सर्व खाण्यापिण्याची कपड्यालत्याची व्यवस्था करा, पत्नींना आदेश द्या, पण मायेने व कृपेने.

९) "प्रत्येकाला त्याच्या वारसाहक्काचा वाटा मिळावा असा अल्लाहचा हुकूम आहे. जन्मलेले मूल जर विवाहशय्येचे असेल. बंधनाचे उल्लंघन करण्यावर धोंडमार केली जाईल. जो कुलपरंपरेचा संबंध पित्याखेरीज इतरांकडे लावतो त्याच्यांवर

अल्लाहचा, फरिश्त्यांचा आणि लोकांचा धिक्कार असो. अल्लाह त्याच्या पश्चात्तापाचा अगर नेकीचा स्वीकार करणार नाही.''

१०) ''सैतान खचितच निराश झाला आहे की तुमच्या या देशात त्याची पूजा कधीही होणार नाही. धर्माच्या बाबतीत त्याच्यापासून सावध राहा.''

११) ''खचितच माझ्या मागे अल्लाहचा ग्रंथ आणि माझ्या शिकवणी (हदीस) तुमच्यात सोडून जात आहे. ते जर मजबूत धराल तर तुम्ही कधीही भटकणार नाही.''

१२) ''आणि माझ्याबद्दल विचारण्यात आले तर तुम्ही काय सांगाल? लोकांनी उत्तर दिले, आम्ही ग्वाही देतो की तुम्ही ईशसंदेश आम्हापर्यंत पोहचविला आहे व तुम्ही तुमचे धर्मकार्य पूरे केले आहे.''

पवित्र प्रेषितांनी शुक्रवारच्या दिवशीही त्या जमावाला उद्देशून प्रवचन केले. जिलहज्जच्या दहा तारखेस मागील मुद्द्यांना धरून पुढे नव्या बाबींवर त्यांनी प्रकाश टाकला.

१३) ईशस्तवन करून त्यांनी पुढील प्रवचनास सुरूवात केली. महिन्यांना आपल्या सोयीने घटविणे अथवा वाढविणे किंवा बदलवणे बेकायदेशीर घोषित केले. अल्लाहने ते उल्लंघनीय व निषिद्ध ठरविले आहे.

१४) ''अल्लाहसाठी महिन्यांची संख्या बारा आहे व त्यातील चार महिने पवित्र आहेत.''

१५) ''हा महिना पवित्र आहे. हा दिवस बलिदानाचा आहे व हा भूप्रदेश पवित्र आहे.''

१६) ''तुम्हाला जाणीव करून देतो की तुमचे प्राण, तुमची मालमत्ता आणि तुमची अब्रू एकमेकांसाठी आजच्या पवित्र दिवसाप्रमाणे, पवित्र महिन्याप्रमाणे व पवित्र भूप्रदेशाप्रमाणे पवित्र आहे.''

१७) ''तुमच्या गुलामांना तुमच्यासारखेच कपडे व अन्न द्या, त्यांच्या हातून चूक झाल्यास क्षमा करा. शक्य असेल तर त्यांना मुक्त करा, कारण तेही अल्लाहचे दास आहेत.''

१८) ''दिवसात पाच वेळा नमाज अदा करा, रमजानचे उपवास करा, काबागृहाची यात्रा करा. तत्परतेने जकात द्या. असे झाले तर तुम्हाला स्वर्गात प्रवेश मिळेल.''

१९) ''तुमचा आमचा सर्वांचा ईश्वर एकच आहे.''

२०) "आपण सर्व आदम (अ.) चीच संतान आहोत."

२१) "आपण सर्व आपसात बंधु आहोत."

२२) "आदमची निर्मिती मातीपासून झाली आहे."

२३) "जात, पात, वर्ण, वंश, गोरे, काळे सर्व माणसे समान आहेत. कोणीही कोणापेक्षा श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नाही."

२४) "संयमशीलता व ईशनिष्ठा याशिवाय कोणाचा कोणावर वरचढपणा नाही."

२५) "महाप्रलयाच्या (कयामतच्या) दिवशी ईश्वरासमोर उभे राहून तुम्हाला जाब द्यावा लागेल व तुमचा न्यायनिवाडा, तुमच्या कर्माचा न्यायनिवाडा दिला जाईल."

२६) "मृतांच्या मालमत्तेत कुरआनने सांगितल्याप्रमाणे प्रत्येक नातेवाईकाला व वारसाला त्याचा हिस्सा द्यावा."

२७) "कुरआनने सांगितल्याप्रमाणेच तुमचा वारसाहक्क मानला जाईल. त्याबाबतीत तुम्हाला उल्लंघन करता येणार नाही."

२८) "माणसाचे रक्त एक-दुसऱ्यासाठी निषिद्ध आहे. अकारण कोणीही एकमेकाचे रक्त सांडू नये."

२९) "ईशभयाने वागून मिळविलेली मिळकत अल्लाहजवळ रास्त आहे. तशा रीतीने वर्तन करणारा अल्लाहला प्रिय आहे."

३०) "सट्टा, जुगार, लॉटरी, व्याज हे सर्व निषिद्ध मार्ग आहेत. त्यातून मिळणारी मिळकत निषिद्ध आहे."

हे प्रवचन इ. सं. ६३२ मध्ये हजयात्रेच्या वेळी दिलेले आहे. यात दिलेला संदेश केवळ मुस्लिमांसाठीच नसून सर्व मानवजातीस मार्गदर्शन करणारा आहे. हा उपदेश मानवतावादाचा पाया आहे.

प्रेषित आपल्या उंटावरून खाली उतरले व त्यांनी दुपारची आणि तिसऱ्या प्रहरीची नमाज एकत्रित अदा केली व त्या वेळी धर्म (जीवनपद्धती) परिपूर्ण केल्याची आयत अवतरित झाली. सूरह 'अल मायदा'ची आयत क्रमांक तीन (५:०३) -

"या दिवशी तुमच्यासाठी तुमचा धर्म (जीवनपद्धती) परिपूर्ण केला आहे आणि तुमच्यावरील आमची कृपा आम्ही पूर्णत्वास नेली आहे आणि तुमचा धर्म (जीवनपद्धती) म्हणून इस्लाम पसंत केला आहे."

हे भाषण वक्तृत्वपूर्ण, तेजस्वी, ओजस्वी असून अखिल मानवजातीसाठी उदात्त व भव्य संदेश आहे. प्रेषितांचे चित्त शांत होते. धार्मिक आचरणाची एका आदर्श स्वरूपात प्रस्थापना केली गेली.

हजयात्रेचे सर्व विधी व सर्व धर्मकर्तव्ये आजपर्यंत त्या यात्रेत दर्शविल्याप्रमाणेच चालू आहेत.

आपल्यावर सोपविलेल्या सर्व जबाबदाऱ्या आपण परिपूर्ण केल्याचे समाधान प्रेषितांना या यात्रेमुळे लाभले. या प्रवचनात मांडलेल्या सर्व गोष्टींचे मूळ कुरआनात व हदीसमध्येच आढळते.

सर्व प्रवचनाचे बारकाईने अध्ययन केल्यास अभ्यासकास हा अंतिम संदेश दोन विभागांत विभागता येतो.

(१) धार्मिकदृष्ट्या आपल्या अनुयायांना ज्या ज्या आचरणाचे पालन करण्याचा आदेश दिला आहे तो एक भाग व (२) सर्व जगासाठी व अखिल मानवजातीसाठी दिलेला दिव्य संदेश व केलेले मार्गदर्शन हा दुसरा भाग होय.

यातील पहिला भाग धार्मिक स्वरूपाचा असून पुढील अर्धा भाग अखिल मानवजातीसाठी केलेला सदुपदेश आहे. त्यात त्यांनी मानवास स्पष्टपणे जाणीव करून दिली आहे, "तुझे या जगातील वास्तव्य हे क्षणिक असून सरतेशेवटी तुला ईश्वरासमोर हजर राहावे लागेल. ईश्वर तुला येथील तुझ्या प्रतिष्ठेबद्दल, दर्जाबद्दल, श्रीमंती अथवा गरिबीबद्दल काहीच विचारणार नाही. ईश्वर फक्त येथील तुझ्या आचरणाबद्दलच विचारणा करेल आणि तुझ्या आचरणाचाच हिशेब घेतला जाईल. ते तू विसरू नकोस. म्हणजेच ईश्वराजवळ तुझ्या कर्माचेच फक्त मूल्यमापन केले जाईल," याची स्पष्ट जाणीव दिली गेली.

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी जी शिकवण देण्यासाठी पूर्ण आयुष्य वेचले त्या शिकवणीचे संपूर्ण सार या प्रवचनात आढळते. त्यांनी "ईशसंदेश जसेच्या तसे प्रमाणिकपणे पोहचते केले याची ईश्वरास स्मरून तुम्ही साक्ष द्या," असा त्यांनी प्रवचनाचा समारोप केला व लोकांनी पण उत्स्फूर्तपणे "हो! आम्ही साक्षी आहोत." असे उत्कटतेने जाहीर केले.

अंतिम प्रेषित - प्रेषित उपसंहारक

"ते अल्लाहचे रसूल (प्रेषित) आणि अखेरचे नबी (प्रेषित) होत."

(कुरआन - अल अहजाब, आयत ४० म्हणजेच ३३:४०)

वरील आयतीत प्रेषित मुहम्मद (स.) हे अंतिम प्रेषित आहेत. 'लिसानुल अरब' या शब्दकोषाप्रमाणे अंतिम म्हणजे जे त्यांचे शेवटचे प्रेषित होत.

(लिसानुल अरब, खंड १२, पृष्ठ १६४)

अर्थात प्रेषित 'खातमुन्नबीय्यीन' म्हणजे अंतिम प्रेषित होय, अंतिम नबी होत. रसूल व नबी यात असलेला फरक लक्षात ठेवला पाहिजे. प्रत्येक रसूल हा नबी असतोच, पण प्रत्येक नबी हा रसूल असेलच (म्हणजे नबी पदाच्या दृष्टीने) असे नाही. या आयतीद्वारे त्यांचा नबी असण्याचा व रसूल असण्याचा आणि तोही अंतिम असण्याचा स्पष्ट उल्लेख झालेला आहे. या आयतीचा दुसरा अर्थ हा येतो की, आदरणीय मुहम्मद (स.) यांच्यानंतर कोणीही रसूल किंवा नबी अर्थात प्रेषित येणार नाही. मुहम्मद (स.) हे अंतिम प्रेषित ठरल्यामुळे आता कोणताही नवा धर्मग्रंथ येणार नाही. कारण कोणताही धर्मग्रंथ हा प्रेषितावर अवतरित होत असतो व आता कोणी प्रेषित जर येणार नाही तर कोणताही ग्रंथ येणार नाही हे आपोआपच स्पष्ट होते.

प्रेषित मुहम्मद (स.) अंतिम नबी असल्याबद्दल अनेक हदीस आलेल्या आहेत. येथे काही हदीसचा उल्लेख करीत आहे.

१) बनी इस्राईल वंशाचे प्रेषित जेव्हा नेतृत्व करीत आणि जेव्हा एक नबी मरण पावत असे तेव्हा त्या ठिकाणी दुसरा नबी वारसदार म्हणून बनत असे. परंतु "माझ्यानंतर कोणीही येणार नाही" किंवा खलीफा असतील. (बुखारी)

२) "नबुवतची (प्रेषितत्वाची) इमारत पूर्ण झाली आहे व त्यातील मी अंतिम वीट आहे." (बुखारी)

३) "मला समस्त ईशनिर्मितीकडे रसूल बनवून पाठविले आहे आणि प्रेषितानुक्रम माझ्यावर संपविला गेला आहे." (बुखारी)

४) "मी अंतिम प्रेषित आहे. माझ्यानंतर कोणीही प्रेषित येणार नाही." (तिर्मिजी)

विशेष म्हणजे प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यानंतर काही सुधारक आले, काही खलीफा आले, पण त्यानंतर कोणीही प्रेषित आजपर्यंत आला नाही व येणार नाही.

पवित्र कुरआनमध्ये प्रेषित मुहंम्मद (स.) यांच्या ईशनजरेतील स्थानावर सूरह ३३:४५-४६ मध्ये जास्त स्पष्टपणे प्रकाश टाकलेला दिसतो.

"हे प्रेषित! आम्ही तुम्हास 'शाहिद' (साक्ष देणारा), 'मुबश्शीर' (शुभ समाचार देणारा) आणि 'नजीर' (खबरदार करणारा) म्हणून बनवून पाठवले आहे."

तसेच "आणि अल्लाहकडे त्याच्या आदेशाने आवाहन करणारा आणि उज्वलदीप बनवून पाठविलेला." (३३:४६)

येथे प्रेषित मुहम्मद (स.) यांची काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये निवेदली गेली आहेत. जी प्रेषितपदाशी संबंधित आहेत. 'शाहिद' म्हणजे जाणणारा, जे निवेदन करील ज्या गोष्टीस तो जाणतो. प्रेषितांच्या शाहिद असण्याचा अर्थ असा की, ते ईशसंदेशाच्या अवतरणामुळे अल्लाहचे स्वत्व व त्याची गुणवैशिष्ट्ये, त्याचे आदेश आणि त्याच्या प्रिय-अप्रिय बाबींची अटळ खबर देणारे आहेत. प्रेषित अल्लाहतर्फे सत्य धर्माची साक्ष देणारे आहेत.

वरील अर्थाचीच सूरह 'मुज्जमिल' मधील १५ व्या आयतीत म्हटले आहे, "आम्ही तुम्हा लोकांकडे एक प्रेषित तुमच्यावर साक्षी बनवून पाठविला आहे. ज्याप्रमाणे आम्ही फिरऔनकडे पाठविला होता." (७३:१५)

याशिवाय २:१४३, 'हज्ज' मधील ७८ यातही शाहिद हा शब्द आलेला आहे. ज्याचा अर्थ फक्त साक्ष देणारा असाच आहे.

प्रेषितांचे दुसरे वैशिष्ट्य असे की, प्रेषित 'मुबश्शीर' आहेत म्हणजे ईमान (श्रद्धा) बाळगणाऱ्यांना अल्लाहची कृपा व निरंतर यशाची शुभवार्ता देणारे आहेत. याचे स्पष्टीकरण प्रेषितांच्या हदीसमध्येही आलेले आहे. प्रेषित 'नजीर' आहेत हे त्यांचे तिसरे वैशिष्ट्य आहे. याचा अर्थ कुफ्र सत्यविरोध व विद्रोहीपणे वागणाऱ्यांना अल्लाहचा प्रकोप व आखिरतच्या दुष्परिणतीपासून खबरदार करणारे आहेत. दुराचारापासून सावध करण्याबद्दल अनेक हदीस आलेल्या आहेत. चौथे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी लोकांना अल्लाहच्या आदेशकडे व आवाहनाकडे बोलवावे. याचे वैशिष्ट्य हे आहे की, ते मार्गदर्शनाचा उज्ज्वल दीप होत.

प्रेषितांचे या सर्व मार्गदर्शनावरच त्यांचे अस्तित्व चिरदायी आहे, असे वाटू लागते.

प्रेषितांच्या अंतकाळी त्यांनी आपल्या सर्व अनुयायांना बजावून सांगितले, "मी तुमच्यासारखाच सामान्य माणूस आहे. मला ईशत्व देऊ नका." आणि त्यांनी निक्षून बजावले, "माझ्या मृत्युनंतर माझ्या कबरीसमोर कोणीही सजदा करू नये. सजदा फक्त अल्लाहसमोरच केला जातो." त्यांचा शेवटचा आदेश होता, "माझ्या मजारला मस्जिद बनवू नका." यातच त्यांचे मोठेपण आहे व आपण सर्वसामान्य माणूसच आहोत, याचे भान त्यांनी शेवटपर्यंत ठेवले.

कुरआनातील अद्भूत सत्ये

कुरआनचे अध्ययन करताना अशी अद्भूत माहिती समोर येते की, वाचणारा अक्षरश: चक्रावून जातो. यात काही ऐतिहासिक घटना आहेत तर काही खगोलशास्त्रीय सत्ये आहेत. काही पदार्थविज्ञान, भूगर्भशास्त्रीय, वनस्पतीशास्त्रीय तर काही आहारशास्त्रीय, प्राणीशास्त्रीय सत्ये आली आहेत. विशेष म्हणजे ही कुरआनच्या अवतरणकाळात मांडली आहेत. म्हणून इ.स. ६१० ते इ.स. ६३२ पर्यंतच्या काळात ज्याची आधुनिक विज्ञानाशी ओळखसुद्धा नव्हती, ती माहिती अशिक्षित प्रेषितांवर अवतरीत झाली आहे. म्हणजे ती माहिती प्रेषितांकडून सांगितलेली नसून तिचा ज्ञानस्रोत हा जगन्नियंत्याकडून आलेला आहे.

विशेष म्हणजे आज एकविसाव्या शतकात यातील अनेक गोष्टी सिद्ध होत आहेत. यातील काही माहिती १९ व्या व २० व्या शतकात सिद्ध झालेली आंहे. अशा आलेल्या सत्यतेच्या गोष्टींचा आढावा घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.

पुरातत्वशास्त्रीय सत्य

"स्मरण करा त्या वेळेचे जेव्हा मूसाने आपल्या समाजासाठी पाणी मिळावे म्हणून प्रार्थना केली. तेव्हा आम्ही त्यांना सांगितले, "तुझी लाठी खडकावर मार" त्यामुळे बारा झरे वाहू लागले आणि प्रत्येक परिवाराने आपल्या झऱ्याची माहिती करून घेतली. अल्लाहने दिलेल्या आहारामधून खा व प्या आणि जमिनीवर अत्याचार माजवित फिरू नका." (अल बकरा, आयत साठ)

यहूद्यांचा धर्मग्रंथ तौरातवरून अशी माहिती मिळते की ही प्रार्थना प्रेषित मूसा (अ.) यांनी सीना वाळवंटात केली होती. त्यांनी ईशआज्ञेप्रमाणे तेथील एका खडकावर आपली लाठी मारली त्याबरोबर त्या खडकातून पाण्याचे बारा झरे निघाले होते.

(जुना करार, गणना २०:११)

बनी इस्राईलचे बारा परिवार होते व ईश्वराने बाराच झरे निर्माण केले. अशा रीतीने प्रत्येक परिवाराने आपला झरा निश्चित केला व आता पाण्याच्या प्रश्नावरून तंटा निर्माण होण्याचे कारण राहिले नाही. 'वाळवंटात मुबलक पाणी देणारे झरे' ही खरोखरच ईशकृपा ठरली.

या ज्यूंच्या जमातीत निर्माण झालेल्या संघटनेवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. याच अरबी वाळवंटातून केलेल्या ज्यूंच्या प्रवासाचीही माहिती मिळते. याकूब (अ.) यांच्या बारा मुलांवरून निर्माण झालेल्या बारा जमातीविषयी माहिती मिळते. यातील लेव्ही

कुटुंबाकडे धार्मिक पुजारीपणाची कामे सोपविली गेली होती. त्यांना लष्करी कार्यापासून मुक्त ठेवण्यात आले होते. सर्व जमातीत तो मुलुख समान वाटण्यात आला. लेव्हीज यांना विशेष प्रतिष्ठा प्राप्त होती. मूसा (अ.) व हारून (अ.) हे या लेव्हीजपैकी होते. इजिप्तमध्ये यूसुफ (अ.) उच्च दर्जास पोहचले होते.

मूसा (अ.) यांनी पाण्यासाठी ईश्वराची प्रार्थना केली तेव्हा ईश्वराने लाठी ज्या खडकावर मारण्याची आज्ञा दिली होती तो खडक आजही पाहावयास मिळतो. त्याविषयी अशी माहिती मिळते.

सिनई टेकडीजवळील होरेबनजिक मूसा (अ.) यांना कायदेसंहिता दिली होती. त्याजवळच लाल ग्रॅनाइटचा एक प्रचंड खडक आहे ज्याची उंची १२ फूट आहे व ज्याचा परिघ ५० फूट आहे. यूरोपियन पर्यटकांना इ.स. च्या पंधराव्या शतकात तो खडक आढळला. तेथून बारा झरे वाहताना आढळले. ते झरे आजही तेथे अस्तित्वात आहेत.

ही माहिती आजही आपल्याला प्रत्यक्ष जमिनीवर दृष्टीस पडते. प्रेषित मुहम्मद (स.) यांना ती माहीत असणे शक्य नाही. युरोपीय पर्यटकांमुळे ही माहिती उजेडात आली.

ही माहिती भौगोलिक व भूतकालीन असून केवळ कुरआनात आल्यामुळे आपल्यापर्यंत पोहोचली आहे. पुरातत्व खात्याने तो खडक व बारा झरे यांच्या अस्तित्वास दुजोरा दिला आहे.

भूगर्भशास्त्रीय सत्य

"काय आम्ही ज़मिनीला बिछाइत नाही बनवली आणि पर्वतांना मेखा."

(सूरह अन्नबा, आयत क्र. ६ व ७)

पृथ्वी वातावरणात अधांतरी आहे आणि ती सूर्याभोवती फिरते किंवा फिरत असते. जरासुद्धा तिच्यामध्ये अस्थिरता नाही. त्याचप्रमाणे तिच्या पृष्ठभागाला अशा प्रकारे पसरविण्यात आले आहे की त्यावर वस्ती करणे शक्य झाले आहे. इतकेच नव्हे तर असे वाटते की खास माणसाला वसविण्यासाठी जमिनीला बिछायत बनवून त्या सर्व गोष्टींची व्यवस्था केली गेली आहे ज्या मानवी जीवनासाठी आवश्यक आहेत. याचाच अर्थ असा की माणसाला वसविण्याचे कार्य एका विशिष्ट योजनेनुसार अंमलात आणले गेलेले आहे. यात अल्लाहच्या पालकत्वाची व त्याच्या ज्ञानाची स्पष्ट खूण दिसत नाही का?

जमिनीवर पर्वतांच्या मेखा रोवल्या गेल्या कारणाने पृथ्वीची गती व वेगामध्ये समतोल राखला गेलेला आहे आणि त्यामुळे अस्थिरता नाहीशी झाली आहे. त्याचप्रमाणे पर्वतांपासून मानवास निरनिराळे फायदे होत असतात. वन्य वनस्पती, औषधी फळे शिवाय पाण्याचे ओघ मिळतात. जलसंचय त्यामुळे शक्य होतो. पर्वतांमुळे खनिज संपत्तीदेखील सुरक्षित राहिली आहे. म्हणूनच नद्यांना व पर्वतांना महत्त्वपूर्ण राष्ट्रीय संपत्ती मानली जाते. कुरआनात अनेक आयाती आल्या आहेत दर्शवितात,

"पृथ्वीचा तोल सांभाळण्यासाठी पर्वत उभारण्यात आले आहेत, त्याने (अल्लाहने) आकाशांना (आकाशातील ग्रह-ताऱ्यांना) दृश्य खांबाशिवाय उभारले आहे आणि पर्वतांची उभारणी केली आहे. अन्यथा पृथ्वी तुम्हाला घेऊन कलंडून गेली असती."
(कुरआन - सूरह लुकमान, आयत क्र.१०)

"आणि त्याने जमिनीवर पहाड कायम केले, जेणेकरून ती तुमच्यासवे डगमगू नये, त्याने नद्या प्रवाहीत केल्या आणि मार्ग काढलेत यासाठी की तुम्हाला मार्ग सापडावा."
(कुरआन - अन नहल, आयत क्र.१५)

ज्या काळात कुरआनचे अवतरण झाले त्या काळात निश्चितच पर्वताचा काय उपयोग व काय महत्त्व आहे नक्कीच उमगले नव्हते. भूगर्भशास्त्रज्ञांनी अलीकडे 'पृथ्वीचा तोल' या संकल्पनेचा उलगडा केला आहे. ब्रिटानिका एन्सायक्लोपीडियात याचा असा उल्लेख केला गेला आहे. पृथ्वीवरील सर्व मोठमोठ्या आकारमानाच्या वस्तू पृष्ठभागामध्ये ११० किलोमीटर अंतरापर्यंत दाट घनता असलेल्या पट्ट्यात तरंगत आहेत असे कल्पून समजला जातो, त्यास 'तात्त्विक तोल' म्हणतात. पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढे पर्वत आहेत तेवढ्यांचा काटछेद घेऊन अदृश्य असे थर पृथ्वीच्या पृष्ठभागाखाली तेवढ्यात वजनाचे असले पाहिजेत, भले त्यांचा पृथ्वीवरील दृश्य भाग वेगवेगळ्या आकारमानाचा असेल. याचा अर्थ पृथ्वीवर समुद्रपाटीवर जेवढे जास्त खडक डोंगराळ भाग आपणास दिसतात तेवढेच पृथ्वीच्या पृष्ठभागाखाली असावेत.

समतोलाच्या या सिद्धान्तात, समुद्रसपाटीच्या वर जेवढा भाग आहे तेवढाच भाग खालून आकारलेला आहे आणि अशा तऱ्हेने एका विशिष्ट खोलीवर पृथ्वीच्या अंतर्भागात सर्व ठिकाणी प्रति एकक वजन सारखेच आहे यास 'भरपाई खोली' म्हटले जाते.

पर्वतांचे दर्शनीय अपरिवर्तनियत्व कुरआनात उल्लेखिलेल्याप्रमाणे अचल आहे. यासंबंधी विश्वशब्दकोशात पुढीलप्रमाणे खुलासेवार वर्णन केले आहे.

पृथ्वीचे कवच पृथ्वीवर असलेल्या स्थिर पाण्याने समास्थितीत तोलले गेले आहे. अर्थात जेव्हा कवचाची झीज होते आणि नद्या पाण्याच्या रूपाने उंच भागातील खडे, माती, रेती वगैरे समुद्रात आणून टाकतात तेव्हा आपोआपच किनाऱ्याच्या मागचा भाग भर पडल्याने उचलला जातो की त्याचा जवळचा समुद्रकिनारा पाण्यात बुडतो.

असे मानतात की पृथ्वीच्या कवचाचा हलका भाग वर उचलला जाऊन त्यांचे पर्वत बनले व जो जड भाग होता तो अधिक खचला जाऊन त्यांचे समुद्र बनले. अशा तऱ्हेने हे उभरले व खोल खोल खळगे तयार होणे यामुळे पृथ्वीचा तोल सावरला गेला आहे. (O.R. Von Englen, Geography, New York, 1948, Page 262)

कुरआनच्या या आयतींचा येवढा अर्थ मिळतो.

खगोलशास्त्रीय सत्य

(१) "आणि आम्ही आकाशात बुरुज बनविले व पाहणाऱ्यांकरिता त्यांना मनोहर बनविले." (अल हिज्र, आयत १६)

'बुरुज' म्हणजे प्रकाशमय ताऱ्यांचे पुंज होत. ज्यांची मनमोहकता बघणाऱ्यांच्या दृष्टीला आकृष्ट करते. काही भाष्यकार याचे याप्रमाणे भाष्य करतात. 'बुरुज' म्हणजे जाहीर होणे व देखावा आणि किल्ला व प्रासाद असा होतो. आकाशातील नक्षत्रपुंज अशा रीतीने प्रकाशमान दिसतात जणू सजविलेले उंच प्रासाद आहेत. ताऱ्यांच्या पुंजांना बुरुज संबोधिले गेले आहे. प्रकाशमान दिसणाऱ्या ताऱ्यांचे पुंज यांनी आकाशाची मैफल सजवली आहे. येथे असे मानतात की सैतानशक्तींच्या आकाशावरील उड्डानास रोखण्यासाठी गोळ्यांचा वर्षाव केला जातो. बुरुजवाल्या आकाशास पाहिल्यावर चिंतन व मनन करून शक्तीची कल्पना जाणवू शकते.

(२) "आणि आम्ही आकाशाला सुरक्षित छत बनविले, परंतु लोकांनी त्याच्या नियंत्याकडे तोंड फिरविले आहे." (अल अंबिया, आयत ३२)

आकाश मजबुत छत याचा अर्थ असा घेतला जातो की, आकाशाला अशा वैशिष्ट्यांसह बनविले गेले आहे की त्यात कोठेही व कसलेही वैगुण्य नाही. वर्षानुवर्षे लोटल्यानंतरही ते आपल्या मूळ स्थितीत कायम आहे. त्यात जुनाटपणा दिसत नाही. त्यात जुनाट होण्याची लक्षणे कधीही निर्माण झाली नाहीत की ज्यामुळे जमिनीवर राहणाऱ्यांकरिता ते कोसळण्याचा धोका निर्माण व्हावा.

आपण आपल्या सद्‌सद्‌विवेक बुद्धीचा वापर करून आकाशात दिसणाऱ्या खाचा-खुणांकडे दृष्टिक्षेप टाकला तर, असे लक्षात येते की, आकाश एक भक्कम छत आहे, जे आपल्या विश्वनियंत्याची साक्ष देत आहेत, असा निर्माता जो अत्यंत सामर्थ्यवान व सर्वशक्तिमान आहे. जोपर्यंत सामर्थ्यवान आणि शक्तिमान अल्लाहची मर्जी आहे तोपर्यंत त्याची साक्ष सतत मिळत राहणार आहे. अमर्याद समृद्धीचा छताचा निर्माणकर्ता आपल्या प्रभुत्वामध्ये परिपूर्ण आहे. त्याचबरोबर तो महान रचयिता व व्यवस्थाकुशल चालवणारा आहे.

(३) "मग दृष्टिक्षेप टाका, कोठे तुम्हाला दोष दिसून येतो? मग वारंवार दृष्टिक्षेप टाका, तुमची दृष्टी थकून असफल होऊन परत येईल." (अल मुल्क, आयत ४)

आकाशाचे अवलोकन करण्याचे आवाहन वारंवार आले आहे आणि आवाहनपूर्वक सांगितले गेले आहे की, तुमची दृष्टी थकून जाईल, पण तुम्हाला या खगोल विश्वात एकही दोष सापडणार नाही. आज अतिशय मोठमोठ्या दुर्बिणींद्वारे ग्रह-नक्षत्रांचे अवलोकन करीत राहिले तरी कोठेही यतकिंचितही दोष अथवा उणीव लक्षात

येत नाही. तसेच या कौशल्याचे वैशिष्ट्य हे आहे की, कोट्यवधी वर्षे झाली तरी या ईशनिर्मितीत कोठेही जीर्णता अथवा बिघाड निर्माण झालेला नाही. यातच विश्वनिर्मात्याच्या अफाट व अचाट सामर्थ्याची स्पष्ट कल्पना येते.

खगोलशास्त्रीय ही वैशिष्ट्ये सामान्य माणसाच्या बुद्धीसामर्थ्याच्या आवाक्यात न येणारी आहेत.

(१) "आणि आकाशाला आम्ही सामर्थ्याने बनविले आणि आम्ही मोठी व्यापकता बाळगणारे आहोत." (कुरआन - ५१ : ४७)

(२) "We have built the filament with might and we indeed have vast power." (कुरआन - ५१ : ४७)

(३) "अंतरिक्ष आम्ही शक्तीसह बनविला आहे. खरे पाहता आम्ही त्याचा विस्तार करीत आहोत." (कुरआन - ५१ : ४७)

वरील आयत नीट लक्षात यावी म्हणून त्याची निरनिराळ्या भाष्यकारांनी केलेले भाषांतर आपल्या समोर मांडले आहे.

आज आपण पाहतो की, आधुनिक खगोल शास्त्रज्ञांनी या संकल्पनेची शास्त्रीय सिद्धता पूर्ण केली आहे. त्यांनी असेही सिद्ध केले आहे की, अति प्रचंड घनता व तापमान यातून निर्माण झालेल्या एका प्रचंड स्फोटातून (Big Bang) हे विश्व निर्माण झाले आहे आणि अतिशय घनदाट व तप्त वायूपासून वातावरण निर्माण झाले ज्यातच तारे, आकाशगंगा, धूळ व इतर वायुरूप द्रव्ये यांचा समावेश आहे. सध्याचे आकाशगंगेचे बाह्य प्रसरण म्हणजे वरील प्रचंड स्फोटाचा परिणाम आहे. ब्रिटिश एनसायक्लोपीडिया आता बहुतेक वैज्ञानिकांनी मान्य केला आहे. एकदा ही प्रसरणाची क्रिया ६०० महापद्म (सहाबर १४ शून्ये) वर्षांपूर्वी सुरू झाली, ती अद्याप सुरूच आहे. कारण ग्रहगोल केंद्रबिंदूपासून जेवढे लांब फेकले गेले तेवढे त्यांच्या एकमेकांवरील आकर्षणाचे प्रमाण कमी होत आहे. अगदी सुरुवातीला हा मूळप्रभाचा परिघ एक हजार दशलक्ष प्रकाश वर्ष एवढा होता तो आता मूळच्या विस्तारापेक्षा दशपट अधिक झाला आहे. असे प्रा. एडिंग्टन यांच्या संशोधनाने दाखवून दिले आहे. ही विस्ताराची क्रिया सतत वाढत जात आहे. प्रा. एडिंग्टन म्हणतात, "तारे आणि आकाशगंगा म्हणजे एखाद्या रबरी फुग्यांवरील खुणांसारखे आहे, जो फुगा नेहमी फुगत जातो आणि सर्व आकाशस्थ ग्रहगोल एकमेकांपासून अधिकाधिक दूर जातात. पूर्वीच्या लोकांची अशी समजूत होती की, पृथ्वीवरून हे जितक्या एकमेकांच्या जवळ दिसतात, तेवढेच आकाशातसुद्धा असावेत. परंतु ही कल्पना चुकीची होती. त्यामुळे कुरआनातील सूरह

५१ आयत ४७ किती अर्थपूर्ण व महत्त्वाची आहे हे लक्षात येते. आता विज्ञानाने हे दाखवून दिले आहे की ख्रिस्तपूर्व ९० हजार दशलक्ष वर्षांपूर्वी विश्व अस्तितवात आले आहे तर त्याचा विस्तार सहा हजार ते साठ हजार दशलक्ष प्रकाश वर्ष एवढा झाला असावा. याचा अर्थ अंतराळातील ग्रहगोलकांची एकमेकातील अंतरे अगदी न मोजता येणारी एवढी प्रचंड असली पाहिजेत. आता असेही सिद्ध झाले आहे की ज्याप्रमाणे आपली पृथ्वी आणि इतर ग्रह भ्रमण करीत आहेत, त्याप्रमाणे ते सर्व आकाशगंगेचा एक भाग म्हणून भ्रमण करीत आहेत.

वरील विवेचनातून "अंतरिक्ष आम्ही शक्तीसह बनविला आहे. खरे पाहता आम्ही त्याचा विस्तार करीत आहोत." यावरून ही आयत किती महत्त्वपूर्ण ठरते!

सूर्य व चंद्र यांचे चक्र : सूर्य व चंद्र हे सर्वस्वी ईश्वराधिन आहे. ते त्याच्या आज्ञेबाहेर जाऊ शकत नाहीत. दिवस व रात्रीची निरंतरता आणि त्यांच्या वेळेमध्ये होणारी वाढ व घट, उन्हाळ्यात दिवस मोठा व रात्र लहान तर हिवाळ्यात दिवस लहान व रात्र मोठी हे अल्लाहच्याच अधिन आहेत. त्या सर्व बाबींमध्ये इतर कोणाचाही अधिकार नाही. जगातील अनेकेश्वरवादी दिवसाची व रात्रीची वेगवेगळी देवता मानतात, त्या विचारांचे खंडन पुढील आयतीत केले गेले आहे.

"तो दिवसाला रात्रीत शिरकाव करतो आणि रात्रीचा दिवसामध्ये, त्याने सूर्य व चंद्रास अधीन करून ठेवले आहे. प्रत्येक एका निर्धारित वेळेपर्यंत चालत आहेत. तोच अल्लाह तुमचा रब (स्वामी आहे) त्याचीच अधिसत्ता आहे. त्याला सोडून तुम्ही ज्यांना पुकारता ते कणभरदेखील अधिकार बाळगत नाहीत." (सूरह फातिर, आयत १३)

सूर्य व चंद्र हे स्वयंशक्ती बाळगणारे नाहीत. अल्लाहने घालून दिलेल्या नियम व निर्बंधात ते पूर्णपणे जखडलेले आहेत.

सूर्य व चंद्र चालत आहेत म्हणजे ते कार्यरत आहेत, दोघेही गतीशील आहेत आणि आजचे अंतरिक्ष विज्ञानदेखील सूर्याला गतीशील मानते. The Sun rotates on its axis in a period of about 25.1/3 days. (The Marveland Mysteries of Science, Page 15)

अर्थात सूर्य आपल्या आसाभोवती २५.१/३ दिवसांत एक फेरी पूर्ण करतो आणि शास्त्र म्हणते की सूर्य आपल्या आसाभोवती फिरत नाही किंवा आपल्या ग्रहांसह सेकंदाला २०० मैल या गतीने आपल्या गुरुत्वकेंद्राभोवती फेरी घालत आहे. Our own star, the Sun is not exception to the general rule, for which its attendant planets it is moving through space at the speed of 200 miles a second, travelling around the centre of gravity of its cosmic system. At this speed it requires 250,000,000 years to complete a revolution in its gigantic orbit.

या आयतीत पवित्र कुरआन स्पष्टपणे म्हणते की, सूर्य व चंद्र यांचे भ्रमण निर्धारित मुदतीशिवाय नाही. अर्थात ते भ्रमण एका निश्चित मुदतीपर्यंत आहे. म्हणजे ही मुदत महाप्रलयाच्या (कयामतच्या) दिवसापर्यंत आहे. मग कयामतच्या दिवशी विश्वाचे अंथरूण लपेटले जाईल व एक नवे विश्व अस्तित्वात आणले जाईल.

माणसाने आपल्याभोवती असलेल्या सृष्टीचे गांभीर्याने अवलोकन केले तर त्याच्या लक्षात येईल की या सर्व व्यापामागे बुद्धिकौशल्ययुक्त योजना कार्यान्वित आहे. हे सर्व पवित्र कुरआनात मांडले गेले आहे की, एक महान समर्थ, सर्वज्ञानी अशी शक्ती या सर्वामागे आहे. ती शक्ती म्हणजे फक्त ईश्वरच आहे. इतर कोणासही हा सर्व कारभार चालवणे केवळ अशक्य आहे. म्हणून माणसाने हे जाणून असावे की, अनेकेश्वरवादी ज्या विविध देवदेवता विविध कार्य पार पाडतात अशी श्रद्धा ठेवतात. ते असत्य आहे. कारण या आयतीत शेवटी म्हटले आहे, "तुम्ही ज्यांना पुकारतात ते कणभरदेखील अधिकार बाळगत नाहीत."

(संदर्भ ग्रंथ - दावतुल कुरआन, अध्याय ३५ व सर्व तळ टीपा, असेच अध्याय आले इमरान व सूरह अर रअद)

"आणि तोच होय ज्याने रात्र व दिवस आणि सूर्य-चंद्र बनविले. सर्व (आपापल्या) कक्षेत तरंगत आहेत." (सूरह अल अंबिया, आयत ३३)

"ना सूर्याच्या आवाक्यात आहे की चंद्राला जाऊन धरावे आणि ना रात्र दिवसापूर्वी येऊ शकते. सर्व एकेका कक्षेत गतिमान आहेत."

(सूरह यासीन, आयत ४०)

ग्रह-ताऱ्यांच्या कक्षा यांना अरबी भाषेत 'फलक' म्हटले जाते. कुरआनात आकाश या अर्थाने हा शब्द ना कुरआनात वापरला गेला आहे आणि ना प्राचीन अरबी भाषेत या अर्थाने परिचित होता. नंतरच्या काळात खगोल शास्त्राच्या परिभाषेनुसार हा शब्द आकाश या अर्थाने वापरला जाऊ लागला. फारसी व उर्दू भाषेत तर हा शब्द आकाश या अर्थाने वापरला जातो. ज्यावरून आपापल्या कक्षेत हा अर्थ निर्माण झाला. यात अनेकवचनी शब्दाच्या अर्थाने कक्षांसाठी आला आहे म्हणून केवळ चंद्र व सूर्यच नव्हे तर सर्व ग्रह-तारे आपापल्या कक्षेत तरंगतात.

सूर्य-चंद्रादी सर्व ग्रह-तारे गतीशील आहेत व ते आपला प्रवास आपल्या कक्षेत राहूनच करतात. ते निर्धारित कक्षेबाहेर जात नाहीत. या नियमबद्धतेसह त्यांचे हे कार्य या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण आहे की हे समस्त ग्रह-ताऱ्यांचे सूत्रसंचालन एका परिपूर्ण सामर्थ्यशाली व अत्युच्च सत्ताधिकार बाळगणाऱ्या शक्तीच्या हातात आहे.

खगोलशास्त्रास हे ज्ञात आहे की चंद्र-ताऱ्यांचे आपापल्या कक्षेत भ्रमण चालते. सूर्य व ताऱ्यांचे भ्रमण त्यांच्या आसावर चालते हे ठीक आहे, पण त्यांच्या कक्षीय परिक्रमाबाबत आजचे विज्ञान फक्त अनुमान सांगते.

सूरह 'यासीन' मधील आयत ४० मध्ये म्हटल्याप्रमाणे, सूर्य व चंद्र एकमेकास धरू शकत नाही. रात्र व दिवस एकमेकास पूर्णत: किंवा अल्प प्रमाणात आच्छादू शकत नाहीत.

अर्थात सूर्य आपल्या कक्षेबाहेर जाऊन चंद्राच्या कक्षेत प्रवेश करू शकत नाही. त्यामुळे ना दिवसाढवळ्या रात्र प्रकट होऊ शकते. प्रत्येकासाठी जी कक्षा निर्धारित केली आहे त्याला कोणीही ओलांडू शकत नाही. सर्व ग्रह तारे आपापल्या कक्षेत राहूनच गतिमान राहात असतात.

वरील खगोलशास्त्रीय सत्ये कुरआनात १४०० वर्षांपूर्वी मांडली आहेत. जसजशी खगोलशास्त्राची प्रगती होत गेली तसतशा अनेक गोष्टी स्पष्ट होत गेल्या आहेत. तरी अजून अनेक खगोलशास्त्रीय सत्यांच्या बाबतीत अनुमानेच काढली आहेत.

या एवढ्या विश्वाचा सर्व व्यवहार निश्चित अशा नियमांनी जखडलेला आहे, त्यात तसूभरही फरक होऊ शकत नाही. कोणतीतरी 'सुपरपॉवर' या सर्वांवर नियंत्रण ठेवते, ती कुरआनाप्रमाणे अल्लाहच आहे.

"आणि आम्ही आकाशात बुरुज बनविले व पाहणाऱ्यांकरिता त्यांना मनोहर बनविले." (सूरह अल हिज्र, आयत १६)

'बुरुज'शी अभिप्रेत प्रकाशमय ताऱ्यांचे पूंज होत, ज्यांची महानता बघणाऱ्यांच्या दृष्टीला आकृष्ट करते.

'बुरुज'ने अभिप्रेत ताऱ्याच्या त्या बारा काल्पनिक खूणा किंवा बारा कक्षा नाहीत. ज्या जून्या खगोलशास्त्राच्या विशिष्ट परिभाषा आहेत. अभिप्रेत तेजस्वी नक्षत्रपुंज होत. जी आकाशाची शोभा बनले आहेत आणि त्याचे तेजोवलय माणसाला दृष्टीसुख देते. 'बुरुज'चा शब्दार्थ जाहीर होणे व देखावा आणि किल्ला व प्रासाद आहे. आकाशातील नक्षत्रपुंज अशा प्रकारे प्रकाशमान दिसते की जणू ते सजविलेले उंच प्रासाद आहेत.

प्राचीन खगोलशास्त्रात मानवाने आपल्या माहितीकरिता आकाशाला कलिंगडाची आकृती समजून अकलेचे तारे तोडून त्याला बारा चिऱ्यांमध्ये विभागून दिले आणि आपल्या समजुतीप्रमाणे त्यांची नावेदेखील ठेवलीत. अरबी, इंग्रजी आणि संस्कृतमध्ये या किल्ल्यांची नावे ठेवण्यात आलेली आहेत.

अरबी	**संस्कृत**	**इंग्रजी**
जदी	मकर	CAPRICORN
दलो	कुंभ	AQUARIUS
हूत	मीन	PISCES
हयल	मेष	ARIES
सूर	वृषभ	TAURUS
जोआअ	मिथून	GEMINI
सरतान	कर्क	CANCER
असद संुबुली	सिंह	LEO
मिजान	कन्या	VIRGO
अकरब	तुळा	LIBRA
कौस	वृश्चिक	SCORPIO
		SAGITRAUS

हे किल्ले सर्व ग्रहांचे मार्ग किंवा कक्षा आहेत. प्राचीन काळापासून मानवभाषेमध्ये या किल्ल्यांकरिता जे शब्द प्रचलित होते ते ज्योतिषशास्त्राच्या माध्यमातून दुसऱ्या भाषांमध्येदेखील रुढ झाले. यावरून स्पष्ट होते की सृष्टीत आकाशाचे स्थान केवळ भ्रमाचे नसून ज्ञान आणि संशोधनाचे राहिले आहे. पूर्वी कदाचित त्यात नवीन संशोधनामुळे काही दोष आढळले असतील, पण ते प्रगत ज्ञानाने काढले गेले असून खरे ज्ञान मानवास ज्ञात होत गेले. जेव्हा मानवाने संशोधनास सुरूवात केली तेव्हा त्याला या किल्ल्यांची हद्दी अगोचर असल्याचा भास झाला आणि येथूनच मानवाला ज्ञात झाले की, ते मार्ग आहेत. एखाद्या वस्तूचे एका मार्गातून किंवा कक्षेतून दुसऱ्या मार्गात किंवा कक्षेत प्रवेश करणे फारच कठीण आहे. म्हणजे दोन कक्षांच्या मध्ये वातावरणात हद्दी कायम आहेत. ज्या वरच्या विश्वाचा भक्कमपणा आणि व्यवस्थेची माहिती करून देतात.

कुरआनचे अभ्यासक व कुरआनात आलेल्या आयतींवर चिंतन मनन करणाऱ्या जगातील शास्त्रज्ञ व खगोलशास्त्राच्या लोकांनी अभ्यास करून संशोधन केल्यास ज्ञानाची नवी दालने उघडली जातील, असा विश्वास कुरआनच्या अनेक भाष्यकारांनी व्यक्त केला आहे.

वरील आयतीस मिळतीजुळती आयत म्हणजे 'शपथ आहे मजबूत किल्लेदारी आकाशाची' ही आहे. (कुरआन - अल बुरुज, आयत १)

''आणि यांच्यात चंद्राला प्रकाश आणि सूर्याला दिवा बनविले.''

(सूरह नूह, आयत क्र. १६) (सूरह अन्नबा, आयत क्र. १३)

"आणि अल्लाहनेच तुम्हाला जमिनीतून विशेषरित्या उगविले."
(सूरह नूह, आयत क्र.१७).

चंद्र आणि सूर्य यांचे अस्तित्व हे आकाश विश्वात आहे. त्यामुळेच त्यांचा संबंध आकाशांशी दाखविला गेला आहे. सूर्याला असा प्रकाशमान बनविला आहे की त्याचा प्रकाश किंवा तेज कधीही फिके पडत नाही. प्रचलित विज्ञानाच्या प्रकाशात सूर्याचे अवलोकन केल्यास अल्लाहच्या कौशल्याचे विविध पैलू आणखीन स्पष्ट होतात. सूर्याचे तापमान एक कोटी ४० लाख डिग्री सेंटिग्रेड आहे. तो पृथ्वीपेक्षा १०० हून अधिक पटीने मोठा आहे. त्याला पृथ्वीपासून एक कोटी ३० लाख मैलावर ठेवले आहे. त्यामुळे पृथ्वीतलावर अती उष्णता अथवा अती थंडी नसते. सजीव प्राण्यासाठी हे उष्णतामान आवश्यक आहे. या उष्णतामानामुळे पाऊसही पडतो व पिकेही तयार होतात. सूर्य या प्रकाशमान दिव्यामुळे तुमचे जीवन सुखमयी बनवले आहे.

कुरआन विविध ठिकाणी मानवाची निर्मिती आम्ही मातीपासून केली आहे, मानवाची इतकी तुच्छतेने निर्मिती असून त्याच्या विकासासाठी ईश्वराने ही योजना आखली आहे.

"आणि चंद्र की आम्ही त्याच्या मजली निर्धारित केल्या आहेत, येथपावेतो की तो खजुरीच्या जुन्या फांदीप्रमाणे होऊन राहतो." (सूरह यासीन, आयत क्र.३९)

चंद्र आपली प्रदक्षिणा एक महिन्यात पूर्ण करतो. त्याचे स्वरूप बदलले जाते. चंद्रकोर व नंतर पूर्णचंद्र बिंबापर्यंत त्याची वाढ होते. त्यानंतर त्याच्या घटण्यास सुरुवात होते. वाढण्यास व घटण्यास 'कला' म्हणतात. कलेने तो वाढतो व घटतो. पूर्णचंद्राकडून घटून तो जणू खजुरीच्या जुन्या फांदीप्रमाणे सुकून वाकडा होते. चंद्राची ही अवस्था वक्रमार्गी भ्रमणाच्या परिणामस्वरूप होते. म्हणूनच त्याच्या या घडामोडीस पडावांचा (मजलांचा) प्रवास या अर्थाने घेतले जाते. म्हणूनच तो मजल दरमजल आपली प्रदक्षिणा पूर्ण करतो.

प्रजनन शास्त्र

"तोच होय, ज्याने तुम्हाला मातीपासून निर्माण केले, नंतर वीर्यबिंदूपासून, मग जमलेल्या रक्तापासून, नंतर तो तुम्हाला अर्भकाच्या स्वरूपात बाहेर आणतो, मग तुम्हाला वाढीस लावतो यासाठी की तुम्ही आपल्या तारुण्याप्रत पोहचावे, मग तुम्हाला आयुष्य देतो यासाठी की तुम्ही वार्धक्याप्रत पोहचावे आणि तुमच्यापैकी काहींना याआधीच मरण दिले जाते आणि हे अशासाठी होते की तुम्ही निर्धारित केलेल्या वेळेप्रत पोहचावे आणि यासाठी की तुम्ही समजून घ्यावे." (सूरह अल मोमिन, आयत ६७)

माणसाला मातीपासून निर्माण केल्याचा कुरआनात उल्लेख आहे. त्यानंतर मानवाचा वंशक्रम ज्या रीतीने चालू राहिला आहे त्याची माहिती पुढे अशी येते की, मानवाची वीर्यबिंदूपासून वंशवृद्धी चालू राहते. माणसाचा जन्म, वीर्यबिंदूच्या अत्यल्प भागाने होतो. ज्याला 'नूतफा' - पाण्याचा थेंब म्हणतात. मानववंशाची वृद्धी या रीतीने चालू आहे हे आता सर्वांना माहीत असलेल्या हकीगतीशी आहे.

आजच्या काळात गर्भवृद्धी शास्त्राच्या प्रगतीने Embryology ने आता सर्व माहिती पुढे आली आहे. हे पाहून अल्लाहच्या सामर्थ्याची माणसास जाणीव होते. एकाच वेळी जे वीर्य स्खलित होते त्यात दोनशे दशलक्ष शुक्रजंतु असतात. एक शुक्रजंतु स्त्री बीजांडास गर्भघडित (Fertilize) होण्या पुरेसा असतो. स्त्री बीजांड, कोषातून प्रत्येक महिन्याला एकच बाहेर पडते व गर्भाशयाशी लागून असलेल्या नलिकेत हळूहळू पुढे जात असते, जर शुक्रजंतू व बीजांड यांचा मिलाप झाल्यास बीजांड गर्भयुक्त होते, तात्पर्य ही गर्भाची सुरुवात होते.

गर्भधारणेनंतर काही दिवसांत झालेल्या रक्ताचा गोळा बनतो. काही दिवसांनी तो गोळा मासाचा तुकडा बनतो. गर्भधारणेनंतर ४ आठवड्यात येतो. यानंतर या तुकड्यास एक विशेष आकार येऊ लागतो. प्रसंगी आकार येण्यापूर्वीच गर्भपात होतो.

डॉ. मुहम्मद अलवार यांनी यावर सखोल विवेचन केले आहे, जे कुरआनशी तंतोतंत मिळते जुळते आहे. गर्भधारणेनंतर चौथ्या आठवड्यापासून इंद्रियसंपन्न उत्पत्ती ही प्रक्रिया सुरू होते.

अर्थात गर्भाचे दिवस पूर्ण झाल्यावर मूल जन्मास येते. कुरआन - २३:१३-१४ आणि ३९:०६ यात म्हटले आहे, "आम्ही गर्भात तीन पडद्यात सुरक्षित ठेवलेले असते. एक आईचे उदर, दुसरे गर्भाशय व तिसरे पातळ गर्भावरण."

"आम्ही माणसाला मातीच्या सत्वापासून निर्माण केले." (२३:१२)

"मग त्यास वीर्य बनवून एका सुरक्षित जागी ठेवले." (२३:१३)

"मग वीर्यास रक्ताचे स्वरूप दिले, मग त्या रक्तगोळ्यास मांसाचा तुकडा बनविले, नंतर मांसाच्या तुकड्यास हाडांचे स्वरूप दिले. नंतर हाडांवर मांस चढविले. मग त्यास एक आगळिक निर्मिती बनवून उभे केले. तो मोठा समृद्धशाली आहे, अल्लाह सर्वोत्कृष्ट निर्माता." (२३:१४)

"उचंबळणाऱ्या पाण्यापासून, जे पाठीच्या मणका व फासळ्यामधून निघते."
(सूरह तारीक, आयत ६ व ७)

जीवशास्त्राने माणसाच्या उत्पत्तीसंदर्भात अनेक सत्य परिस्थितीचा उलगडा केला आहे. माणसाच्या शरीरातून एकाच वेळी जे वीर्य बाहेर पडते त्यात कोट्यवधी शुक्रजंतु असतात. म्हणजे कोटी, (वीर्याच्या) थेंबात एवढ्या मोठ्या संख्येत मनुष्य निर्माण करण्याची क्षमता असते. मग प्रत्येक शुक्रजंतुमध्ये २४ जोडी 'क्रोमोझोम्स' असतात. हे 'क्रोमोझोम्स' आपल्या मुलाकडे त्यांच्याद्वारे स्थानांतरित होतात. तेव्हा जर एक थेंब पाण्यात एक मानवविश्व सुप्त असते तर संपूर्ण मानववंशास अस्तित्वात आणणाऱ्या जीवजंतूंचा संचय आपल्या पाठीत केला जाणे व त्यांचा मूलत: प्रज्ञादेखील असणे शक्य नसते. तसेच या जीवजंतूंना त्यांच्या निर्मात्याने आमच्या पाठीतून काढून त्यांच्या सुप्त प्रज्ञेला त्यावेळी जागृत केले असावे व त्यांच्याकडून वचन घेतल्यानंतरच त्यांना पुन्हा आदमच्या पाठीत परतून दिले असावे. यासाठी की त्या भांडारापासून मानववंशाचा हा क्रम आपल्या मूलभूत वैशिष्ट्यांसह चालू रहावा यात बुद्धीच्या विपरित गोष्ट कोणती!

(सूरह अअराफ, आयत १७२)

सूरह तारीकमधील आयत ६ व ७ चे स्पष्टीकरण असे करता येते. पाठीचा मणका आणि फासळ्यामधून वीर्य बाहेर पडल्याचा जो उल्लेख केला आहे त्याने या गोष्टीचे खंडन होत नाही की वीर्य, वीर्यपिशवीमधून बाहेर पडले. कारण वीर्यपिशवी पोटाच्या पोकळीमध्ये असते, जो शेवटच्या फासळीच्या खालचा भाग आहे आणि त्याच्या दुसऱ्या बाजूस पाठीचा कणा आहे. आणि म्हणूनच व्यापक अर्थाने हे या सांध्यामधूनच बाहेर पडते. ज्याचा पुढील भाग फासळ्या आहेत व मागील भाग पाठीचा कणा आहे.

वीर्य बाहेर पडण्याच्यासंबंधी ॲनाटॉमीच्या परिभाषेत विचार करणे कदाचित योग्य होणार नाही. कुरआन माणसाची निर्मिती ज्या वीर्याने होते त्यावर विचार करण्याचे आवाहन करते. आधुनिक शोधांचा अभ्यास करणारा हे पाहून थक्क होतो. आधुनिक शोधांप्रमाणे एकाच वेळी जे वीर्य बाहेर पडते त्याचे प्रमाण २ ते ५ मिलीलीटर असते. प्रत्येक मिलीलिटरमध्ये ४० ते १०० दशलक्ष शुक्रजंतु असतात. (Textbook of Phyiology by Geogobell Edinbugh, Page 643) पुरुषाच्या एका वेळच्या वीर्य स्खलनात इतकी शक्ती असते की तो ५० कोटी माणसे निर्माण करू शकतो. कमाल ही आहे की एक किंवा दोन जंतुंपेक्षा अधिक जंतू फलनक्षम होतच नाहीत. त्यामुळे मानवनिर्मितीचे प्रमाण मर्यादेबाहेर जात नाही.

समाजशास्त्रीय सत्य

"आणि जमिनीवर चालणारे कोणतेही जनावर व पंखांनी उडणारा एकही पक्षी असा नाही की त्याचे तुमच्यासारखे समूह नसावेत." (सूरह अनआम, आयत क्र.३८)

ज्याप्रमाणे मानवजातीत सामूहिकता व एकसूत्रता आहे तसेच पशु असो अथवा पक्षी, जमिनीवरील प्राणी असोत किंवा जलचर असोत, मुंग्या असोत की फुलपाखरे असोत; हे सर्व समूह करूनच जगतात. त्यांची प्रत्येक समूहाची स्वतंत्र संगोपनाची व उपजीविकेची एक व्यवस्था असते. मुंग्या किंवा मधमाशा यांची व्यवस्था पहिली की आपण स्तंभित होतो. त्यांचे चलनवलन विशिष्ट व निर्धारित पद्धतीने चालते. सृष्टीत जे काही आहे ते एका योजनेनुसार होत असते त्यात कोठेही फरक पडत नाही.

जगातील सर्वच पशु, पक्षी, प्राणी, जलचर, जीव-जंतू, कीटक त्यांच्या वर्गाप्रमाणे सामूहिक जीवन जगत असतात. पंखधारी पक्षी व वटवाघळासारखे सस्तन प्राणी सामूहिक जीवन जगत असतात.

कुरआनात म्हटल्याप्रमाणे मानव, सर्व चतुष्पाद माणसाळलेले व हिंस्र पशु, पक्षी, सरपटणारे प्राणी, जलचर, पृथ्वीवर पाण्यात व जमिनीवर दोन्ही ठिकाणी राहणारे प्राणी हे सामूहिक व सामाजिक जीवन जगतात. म्हणूनच म्हण आहे की, 'बर्डस ऑफ द सेम फेदर फ्लाय टुगेदर'.

सृष्टीतील सर्व सजीव आपापल्या समूहातच जीवन जगत असतात. विभिन्न प्रकारचे प्राणी एकत्र येऊन एकत्र सामाजिक व सामूहिक जीवन जगत नाहीत ते एकमेकांशी जमवून घेऊन एकत्रित जीवन जगत नाहीत.

प्रत्येक सजीवास मर्यादित पण उपजत बुद्धी दिली आहे, त्यांना मर्यादित पण नेमके ज्ञान दिलेले आहे. मानव ज्याप्रमाणे सामाजिक व सामूहिक जीवन जगतो त्याप्रमाणे सर्वच सजीव आपल्या गटात शिरून सामूहिक जीवन जगत असतो हे जीवशास्त्राने वैज्ञानिक सत्य सिद्ध केलेले आहे.

भौगोलिक सत्य

आपले सर्व खंड म्हणजे पहिल्यांदा एकसंघ असा जमिनीचा मोठा भूभाग होता. 'प्रचंड स्फोट' झाल्यानंतर ते सर्व खंड पृथ्वीच्या पृष्ठभागावर विभागले गेले आणि समुद्र व महासागरांमुळे वेगवेगळे खंड हे अस्तित्वात आले.

कुरआनात असे म्हटले आहे की ज्या वेळी अल्लाह मातीचा ढीग पाण्यापासून वेगळा करीत होता, त्यावेळी पृथ्वीचा जन्म झाला.

''त्याचे छत उंच केले व त्याला दुरुस्त आणि समतोल केले, त्याची रात्र आच्छादिली आणि त्याचा दिवस प्रकट केला, त्यानंतर जमिनीला पसरविले.''

(कुरआन - ७९:२८-३०)

भाष्यकार याचा अर्थ असा लावतात, "ती फकून तिचे पाणी व चारा निर्माण केला आणि तिच्यावर पर्वत रोवले, कारण त्यामुळे तुमच्या व तुमच्या जनावरांच्या जीवनाची सामुग्री उपलब्ध व्हावी."

अल्फ्रेड वेजनेर या जर्मन भूगर्भ शास्त्रज्ञाने या सिद्धांताचा व्यवस्थित खुलासा केला आहे. या सर्व खंडांची चित्र एकमेकाशेजारी ठेवून बसवली तर व्यवस्थित जुळतात. उदाहरण म्हणून त्यांनी दाखविले आहे की दक्षिण अमेरिकेची किनारपट्टी आफ्रिका खंडाच्या पश्चिम किनारपट्टीशी तंतोतंत जुळते.

अशा तऱ्हेच्या एकमेकांच्या विरुद्ध बाजूस असलेल्या महासागरांच्या किनाऱ्यावर एकमेकांशी जुळणारी अनेक उदाहरणे सापडू शकतात. सारख्या आकारांचे पर्वत, एकाच काळातील खडक, प्राणी, मासे आणि एकाच जातीच्या वनस्पती वगैरे वगैरे.

प्रा. रोनाल्ड गुड यांनी 'फूलझाडांचा भूगोल' या पुस्तकात म्हटले आहे की पृथ्वीवर वेगवेगळ्या भागात आढळणाऱ्या काही वनस्पती अशा कशा आहेत यासंबंधी एकच खुलासा होऊ शकतो की पूर्वी कधीतरी हे भाग जुळलेले असले पाहिजेत. या बाबतीत सर्वच वनस्पती शास्त्राज्ञांचे जवळजवळ एकमत आहे. जमिनीत गाडल्या गेलेल्या प्राण्यांचे अथवा वनस्पतीचे ठसे पाहता या सिद्धान्ताला पुष्टीच मिळते आणि हे एक शास्त्रीय प्रमाण वचन बनले आहे. एखाद्या खडकातील कणांच्या दिशेने, त्याचे विशुववृत्तापासूनचे अंतर व समुद्रसपाटीपासूनची उंची यावरून पूर्वकाळी कधीतरी ते एकाच मोठ्या खडकाचे भाग असावेत असे पक्के जाणवते. यावरून दिसते की जमिनीचा काही भाग आज ज्या स्थळी आहे तो त्या स्थळी नसावा. उलट खंडाचे विलगीकरण जेथून सुरू झाले असेल तेथे जे भाग नेमके असलेच पाहिजेत. भौतिकशास्त्रज्ञ पी. एम. ब्लॅकेट यांच्या मते ७० दशलक्ष वर्षांपूर्वी भारत हा प्रदेश विशुववृत्ताच्या दक्षिणेस असावा आणि दक्षिण आफ्रिकेतील खडकांच्या निरीक्षणावरून आफ्रिका खंड ३०० दशलक्ष वर्षांपूर्वी दक्षिण ध्रुवापासून मोठा भूभाग म्हणून अलग झाला असावा. कुरआनात विलग करण्याचा उल्लेख 'दहू' या शब्दाने आलेला आहे. आधुनिक विज्ञानाने लागलेले शोध यावरून स्पष्ट होते की, त्याविषयीचे ज्ञान फक्त ईश्वरालाच ठाऊक होते, ज्याने कुरआन अवतरित केले.

रास्त आहार

"श्रद्धा बाळगलेल्या लोकांनो! ज्या शुद्ध वस्तु आम्ही तुम्हाला प्रदान केल्या आहेत त्या खा आणि अल्लाहचे आभार माना, जर तुम्ही त्याची गुलामी करत असाल."

(सूरह अल बकरा, आयत क्र. १७२)

''त्याने तुमच्यासाठी फक्त मेलेले (जनावराचे मांस) रक्त, डुकराचे मांस आणि ते ज्याच्यावर अल्लाहशिवाय इतराचे नाव घेतले असेल... निषिद्ध केले आहे.''

(सूरह अल बकरा, आयत क्र. १७३)

या आयतींमध्ये स्पष्टपणे बजावले आहे की जर तुम्ही खरे श्रद्धावंत असाल तर फक्त ज्या वस्तु शुद्ध असतील त्याच तुमच्या आहारात घ्या. ज्या निषिद्ध म्हटल्या आहेत त्याचे तुम्ही कधीही खान-पान करू नका.

मांसाहाराबाबत स्पष्ट उल्लेख केला आहे की कोणत्याही जनावराचे रक्त कधीही पिऊ नका. कोणतेही मुर्दाड जनावराचे मांस खाऊ नका, ठेचकळून पडलेले, इतर जनावराने मारलेले. जखमी होऊन मेलेले जनावर तुम्ही निषिद्ध समजा. तसेच ईश्वराचे नाव न घेता कापलेले जनावर निषिद्ध ठरवलेले आहे. हे जे नियम अथवा काटेकोरपणे सूचना पाळा म्हणून सांगितले आहे त्यामागील असलेली वैज्ञानिक कारणे इ.स. च्या सातव्या शतकात लोकांना ज्ञात होती का? याविषयी साशंकता आहे.

आज मात्र जनावराचे रक्त, हलाल पद्धतीने न मारलेले जनावर अथवा मेलेले जनावर का खाऊ नये याची वैज्ञानिक कारणे आपणास आहारशास्त्राप्रमाणे स्पष्ट झालेली आहेत.

सूरह 'अल माइदा' मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे,

''तुमच्यासाठी चारा खाणारी जनावरे, खूर-दुभंगलेली जनावरे.'' रास्त मानली गेली आहेत.

ज्यांना सुळे आहेत व हिंस्त्र पशु खाण्यास निषिद्ध ठरवली आहेत. नैसर्गिक मृत्यु पावलेली अथवा अपघाताने मेलेली जनावरे निषिद्ध ठरवलेली आहेत. कारण त्या जनावरांचे रक्त शरीरातच थिजून अथवा साखळून राहते ते वाहून जात नाही. हलाल पद्धतीने मारलेल्या जनावराचे मांस शुद्ध मानले आहे. कारण त्याचे रक्त संपूर्ण वाहून जाते. विज्ञानाने हे सिद्ध झालेले आहे की मानवासाठी रक्त हे अपायकारक व घातक आहे. कारण रक्ताच्या पृथ:करणाने स्पष्ट झाले आहे की रक्तात असणारे युरिक ॲसिड हे मानवासाठी विषासमान आहे. हलाल पद्धतीत फक्त घशाजवळची मुख्य मोठी नस इतर नसांना धक्का लागू न देता ईश्वराचे नाव घेऊन कापली जाते. त्यामुळे जनावराच्या शरीरातील सर्व रक्त वाहून जाते. इतर त्याच्या महत्त्वाच्या अवयवांना नुकसान पोहचत नाही. मेंदू, यकृत, हृदय हे महत्त्वाचे अवयव कापले गेले तर जनावर तात्काळ मरते. त्यामुळे त्याचे रक्त वाहून जात नाही. ते शरीरातच भिजते. मानवास अत्यंत घातक व विषासमान ठरते. हलाल पद्धतीने जनावर कापले गेल्यास सर्व रक्त वाहून जाते त्यामुळे युरिक असिडदेखील वाहून जाते.

कुरआनने डुकराचे मांस निषिद्ध ठरवले आहे त्याची त्याकाळी मानवाला कारणे माहीत नव्हती. पण आज त्यामागील कारणे ज्ञात झाली आहेत. मानवाच्या व प्राण्यांच्या शरीरात युरिक ॲसिड असते जे मुत्रपिंडाद्वारे शोषले जाते व मुत्रातून शरीराबाहेर फेकले जाते. डुकराची अवयव रचनाच अशी आहे की त्याच्या शरीरातील युरिक ॲसिड ९८ टक्के त्याच्या शरीरातच राहते व फक्त दोन टक्के बाहेर पडते. मानवाच्या बाबतीत ९८ टक्के बाहेर मुत्राद्वारे पडते. डुकरांना मुख्य व्याधी ही संधीवाताची असते. त्यामुळे डुकराचे मांस खाणाऱ्यांना संधीवाताची बाधा मोठ्या प्रमाणावर वाढते. हे महत्त्वाचे वैद्यकीय कारण आहे. १४०० वर्षांपूर्वी मानवांना ही कारणे ज्ञात नव्हती ती आज सर्वांना समजली आहेत.

जून-जुलै २००३ मध्ये भारतात मेंदू ज्वराची मोठी साथ आली होती. या ज्वराने लहान मुलांचा मोठ्या प्रमाणावर बळी घेतला. त्यांचे विषाणू हे डुकराच्या अंगावरच निर्माण होतात हे नुकतेच वैज्ञानिक संशोधनाने सिद्ध झालेले आहे.

आयुर्वेदिक सत्य

"मग प्रत्येक प्रकारच्या फळांचा रस शोषून घे आणि आपल्या पालनकर्त्याने अनुकूल केलेल्या मार्गावर चाल. तिच्या पोटातून विविध रंगाचे एक पेय बाहेर पडते ज्यात लोकांकरिता आरोग्य आहे. नि:संशय यात निशाणी आहे त्या लोकांकरिता जे विचार व चिंतन करतात." (सूरह अल नहल, आयत क्र.६९)

मानवी शरीरासाठी मध हा अत्यंत पोषक आहे. त्यात आरोग्याच्या दृष्टीने अनेक महत्वाची उपयुक्त द्रव्ये आहेत.

संशोधक डॉ. डब्ल्यू. जी. साकेत यांनी आपल्या संशोधनाने हे सिद्ध केले आहे की, दुधाप्रमाणे मधात रोगजंतू नष्ट करण्याची क्षमता आहे. शुद्ध मधात टाकलेले जंतू नष्ट होतात. हिवतापाचे जंतू, आतड्यात सूज आणणारे जंतू, सेप्टोसेमिया व न्यूमोनियाचे जंतू तात्काळ ९६ तासांत नष्ट होतात. माणसाच्या शरीरात निर्माण होणाऱ्या जंतुंचा नायनाट करण्याची मोठी शक्ती मधात आहे हे फोर्ट सॅडो कॉलिक्स कृषी महाविद्यालयात काम करणाऱ्या या संशोधकाने सिद्ध करून दाखविले आहे.

डॉ. बोडगे बेक यांच्या म्हणण्याप्रमाणे मधात हवेतील ओलावा धरून ठेवण्याची क्षमता आहे. त्यामुळे सूक्ष्म जंतूतील ओलसरपणा मध शोषून घेतो. सूक्ष्म जंतूसुद्धा जिवंत पेशींप्रमाणे पाण्याअभावी मरतात. मधात सूक्ष्म जीवाणूंच्या शरीरामधून पाणी शोषून घेण्याची अफाट शक्ती आहे. मधात धातू, काच इतकेच नव्हे तर दगडातील ओलसरपणा शोषून घेण्याची क्षमता आहे. मधमाशा या दूरपर्यंत व विविध प्रकारच्या फुलांमधून मध शोषून आपल्या मोहोळापाशी परतून येतात.

मधाचे विविध रंग असतात. पिवळे, पांढरे लाल वगैरे. ज्या रंगाची फुले व फळे यांचा रस मधमाशा शोषतात तसा त्यांच्या रंगात, स्वादात व औषधी तत्त्वात फरक पडतो. मध केवळ स्वादिष्ट व लाभदायक खाद्य असल्याशिवाय आरोग्यप्रद औषधही आहे. मधात 'प्रिझर्व्हेंटिव्ह' गुणवत्ता आहे. त्यामुळे 'बॅक्टेरिया' वाढू शकत नाहीत. मधात खनिज द्रव्ये व जीवनसत्वेदेखील असतात.

१९व्या शतकात मधातील औषधी द्रव्यांचा शोध लागला व त्यानंतर त्याच्यावर सतत संशोधन होऊन अनेक गोष्टींचा नव्याने उलगडा झाला. आयुर्वेदात मध अत्यंत गुणकारी द्रव्य मानले जाते.

वनस्पतीशास्त्रीय सत्य

"आणि तोच आहे ज्याने ही पृथ्वी विस्तृत केली आहे व तिच्यात पर्वतांच्या मेखा रोवल्या आहेत आणि नद्या प्रवाहित केल्या." (सूरह अर रअद, आयत क्र.३)

"आणि आम्ही जमिनीला पसरविले, तिच्यात पर्वत रोवले आणि तिच्यात प्रत्येक प्रकारच्या वस्तू योग्य प्रमाणात उगवल्या." (सूरह अल हिज्र, आयत क्र.१९)

आपण जर उघड्या डोळ्यांनी वागलो व नीट आजुबाजूचे अवलोकन केले तर ईश्वराने ज्या पद्धतीने या पृथ्वीतलावर विविध प्रकारच्या वस्तू विखुरल्या आहेत ते पाहिल्यावर लक्षात येते की या प्रत्येकामागे काही ना काही अन्योन्य संबंध आहे.

ईश्वराने पृथ्वीतलावर नद्यांचे प्रवाह निर्माण केले, ज्यांचा मानवाने कल्पकतेने उपयोग केल्यास समृद्ध जीवन आपण निर्माण करू शकतो. नद्यांवरती धरणे बांधून पाणी संचय निर्माण करून आपला पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवू शकतो. धरणे बांधून त्यावर कृत्रिम जलसिंचनाद्वारे आपले धनधान्य वाढवू शकतो. यांचा पुरेपूर उपयोग केल्यास पृथ्वी सुजलाम सुफलाम करू शकतो. याच आयतीत म्हटले आहे, "प्रत्येक प्रकारच्या फळांचे दोन प्रकार निर्माण केले आहेत." सुका मेवा, धान्य, पालेभाज्या यांचा यात समावेश आहे. जमिनीवर वनस्पती अशाप्रकारे उगवते की त्यांचे जोडे निर्माण होतात. त्यात नर मादी आढळून येतात. वनस्पतीशास्त्र या सर्वांचे विवरण आश्चर्यकारकरीत्या सादर करते. रोपट्यांमध्ये पेशी, रंगद्रव्ये असतात, जे अनुवंशिक सहाय्याने पाहिले जाऊ शकतात. फुलांमधील पराग कण, त्यांचे स्थलांतर व त्यातून होणारी फळधारणा ही सर्व आश्चर्यजनक व्यवस्था आहे.

जमिनीपासून वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू निर्माण होऊ शकतात. धान्य, भाजीपाला, फळे अशा विविध खाद्यपदार्थांची निर्मिती होते. मानवी जीवनाच्या सर्वांगीण पूर्ततेसाठी धान्ये, फळे, सुका मेवे, गळीत धान्ये या सर्व प्रकारच्या वस्तुंची योग्य

प्रमाणात निर्मिती करण्याची व्यवस्था निसर्गाने निर्माण केली आहे. हे सर्व देणगी ईश्वराचीच आहे. ईश्वराने कोणत्याही गोष्टीची व्यर्थ निर्मिती केली नाही.

निरनिराळ्या धातूंची भूगर्भात निर्मिती करून गरजांची पूर्तता केली आहे.

सागरीय विज्ञान सत्य

"आणि तोच आहे ज्याने दोन जलप्रवाह (नदी व सागर) आपसात मिळविले. एक गोड स्वादिष्ट व दुसरा खारा कडू आणि दोघांच्या दरम्यान त्याने एक आवरण टाकले व एक अडसर उभा केला आहे." (अल फुर्कान, आयत ५३)

"त्याने दोन समुद्रांना सोडले की, आपसात मिळावेत त्यांच्या दरम्यान एक पडदा असतो ज्याचे ते उल्लंघन करीत नाही." (सूरह अर रहमान, आयत १९-२०)

मूळ ग्रंथात बहरैन (समुद्र-नदी, दोन प्रवाह) हा शब्दप्रयोग आला आहे, ज्याचा अर्थ समुद्र असा आहे. अरबी भाषेत बहर समुद्रालाही म्हणतात व नदीलादेखील. यास्तव नाईल नदीला अल बहरूल अरजक 'ब्लू नाईल' व अल बहरूल अब्ज 'व्हाइट नाईल' म्हटले जाते. या आयतीत दोन बहरशी अभिप्रेत नदीचे सागराला मिळणे होय. नदीचे पाणी गोड असते व समुद्राचे खारे परंतु ज्या ठिकाणी दोघांचेही पाणी आपापल्या हद्दीत आपले वैशिष्ट्य बाळगून असते.

समुद्राच्या भयंकर लाटा नदीशी टक्कर घेत असतात; परंतु त्याच्या पाण्याला खारे करीत नाही. जणू दोघांच्या दरम्यान आड-पडदा आहे. जो दिसून येत नाही आणि एक आवरण आहे जे दोघांना आपल्या जागी कायम राखते. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकामध्ये या रहस्योद्‌घाटनांचा उल्लेख आलेला आहे. उत्तर सायबेरिया किंवा रशियाच्या समुद्र किनाऱ्याला ज्या ठिकाणी मोठमोठ्या नद्या उत्तर महासागरास मिळतात, त्याचे ताजे पाणी प्रमाणात कमी असल्यामुळे पृष्ठभागावरच राहते जेव्हा की उत्तर समुद्राच्या सखोलतेत खारे पाणी नेहमीप्रमाणे असते. (Because this first water is less dense it remains on the surface, the salinity of greater depth, in the Arctic ocean is normal for sea water. Encyclopaedia Britanica, Vol. 13, P.487)

या गोष्टीवरून स्पष्ट होते की या ठिकाणी एक नियंत्रण राखणारी शक्ती आहे. जिचे कायदे अशाप्रकारे लागू होत आहेत की, प्रत्येक वस्तू आपल्या कक्षेत आहेत. कोणतीही वस्तू मर्यादेचे उल्लंघन करू शकत नाही. लोक या गोष्टीस निसर्गनियम या अर्थाने घेतात. परंतु कोणताही कायदा लागू करणाऱ्या शक्तीशिवाय अंमलात येत नाही, मग हे निसर्गनियम (Physical Laws) लागू करणाऱ्या शक्तीशिवाय कशाप्रकारे अंमलात आले?

आज आपण पाहतो की बांगलादेशातील चितगावपासून आणि ब्रह्मदेशातील अरकानपासून दोन नद्या एकमेकींना भेटतात. दोन्ही नद्यांतील पाणी सर्व ठिकाणी वेगवेगळे वाहताना स्पष्ट दिसते आणि एक 'पट्टी' अशी दिसते की, जी खारे पाणी व गोडे पाणी यात फरक दाखवून देते.

अशाच तऱ्हेची घटना अलाहाबादजवळ गंगा व यमुना यांच्या संगमावर दिसते. दोन्ही नद्या एकत्रितपणे वाहतात पण एकीपासून दुसरी स्पष्टपणे वेगळी दिसून येते.

ज्या नद्या किनाऱ्यालगत वाहतात, त्यांच्यावर समुद्राच्या भरती-ओहोटीचा निश्चित परिणाम होतो. त्यांच्यामध्ये समुद्राच्या उंच लाटा येतात तेव्हा खाऱ्या पाण्याचे प्रमाण जास्त दिसून येते. पण पाणी पुन्हा एकत्र होत नाही ते नाहीच. खऱ्या पाण्याचा थर वरचा बनतो तर गोड्या पाण्याचा खालचा थर बनतो. ओहोटीच्या वेळी खारे पाणी तसेच वाहून जाते व गोडे पाणी पूर्ववत वहात राहते. मेक्सिकोच्या आखातातील निळ्या पाण्यात मिसीसीपीचे तपकीरी गोड पाणी स्पष्टपणे दूरवर वाहताना दिसते. भूमध्य सागरातील अधिक क्षारयुक्त पाणी उत्तर अटलांटिकाच्या पाण्याच्या पातळीच्या अधिक खालून वहाते. ते जवळजवळ एक हजार मीटर खोलीपर्यंत जाते.

जणूकाही जेथे एक प्रकारच्या दोन वेगवेगळ्या घन्यता असलेल्या पाण्यामध्ये अडसर निर्माण झाला आहे. 'अडसर' हा अगदी योग्य शब्द कुरआनात वापरला गेला आहे.

ऐतिहासिक सत्य

"स्मरण करा त्या वेळेचे जेव्हा मूसाने आपल्या समाजासाठी पाणी मिळावे म्हणून प्रार्थना केली. जेव्हा आम्ही त्यांना सांगितले, तुझी लाठी खडकावर मार त्यामुळे बारा झरे वाहू लागले आणि प्रत्येक परिवाराने आपापल्या झऱ्याची माहिती करून घेतली. अल्लाहने दिलेल्या आहारामधून खा व प्या. आणि जमिनीवर अत्याचार माजवत फिरू नका."

(सूरह अल बकरा, आयत ६०)

तौरात (यहुद्यांचा धर्मग्रंथ) वरून अशी माहिती मिळते की ही प्रार्थना 'सीना' वाळवंटामध्ये केली गेली होती आणि मूसाने खडकावर लाठी मारल्यावर पाण्याचे बारा झरे निघाले होते. (जुना करार गणना २०:११)

बनी इस्राईलचे बारा परिवार होते आणि ईश्वरानेदेखील बारा झरे निर्माण केले. अशा रीतीने प्रत्येक परिवाराने आपला झरा निश्चित केला. आणि पाण्याच्या प्रश्नावरून तंट्याचे कारण राहिले नाही. वाळवंटामध्ये ही व्यवस्था म्हणजे ईश्वराची मोठी मेहेरबानी मानली गेली.

या ज्यूंच्या जमातीत निर्माण झालेल्या जमात संघटनेवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. अरबी वाळवंटातून ज्यूंच्या प्रवासाची माहिती दिलेली आहे. याकूब (अ.) यांच्या बारा मुलांवरून निर्माण झालेल्या बारा जमातींविषयी माहिती मिळते. यातील लेव्ही कुटुंबाकडे धार्मिक पुजारीपणाची कामे सोपविली गेली होती. त्यांना लष्करी कार्यापासून मुक्त ठेवण्यात आले होते. सर्व जमातीत तो मुलुख समान वाटण्यात आला. लेव्हीज यांना विशेष प्रतिष्ठा प्राप्त होती. मूसा (अ.) व हारून (अ.) हे या लेव्हीजपैकी होते. इजिप्तमध्ये यूसुफ (अ.) उच्च दर्जास पोहचले होते.

मूसा (अ.) यांनी ईश्वराची प्रार्थना केली तेव्हा ईश्वराने मूसा (अ.) यांना ज्या खडकावर लाठी मारण्याची आज्ञा दिली होती तो खडक आजही पाहावयास मिळतो त्याविषयी अशी माहिती मिळते.

सिनाई टेकडीजवळ होरेब नजीक जेथे मूसा (अ.) यांना कायदेसंहिता दिली होती त्या ठिकाणाजवळच लाल ग्रॅनाइटचा एक प्रचंड खडक आहे. ज्याची उंची १२ फूट आहे व ज्याचा परिघ ५० फूट आहे. युरोपियन पर्यटकांना इ.स. च्या पंधराव्या शतकात तो खडक आढळला ज्यातून बारा झरे वाहताना आढळले. ते झरे आजही तेथे अस्तित्वात दिसतात.

वरील मिळालेली माहिती आजही आपल्याला प्रत्यक्ष जमिनीवर दृष्टीस दिसते. प्रेषित मुहम्मद (स.) यांना या गोष्टी माहीत असणे शक्य नव्हते. मूसा (अ.) हे ईसा (अ.) पूर्वी शेकडो वर्षे झाले. कुरआनात ही माहिती आल्याने आपणापर्यंत आली आहे. ही भौगोलिक व पूर्वकालीन माहिती कुरआनात आलेली आहे. कुरआनात आलेली ही माहिती कुरआनानंतर हजार-बाराशे वर्षांनी आपल्याला समजली व त्याचा तपशील विविध अशा पर्यटकांनी दिल्यामुळे प्रकाशात आला.

ज्या माहितीस कुरआनात आलेली भौगोलिक व ऐतिहासिक माहिती म्हणून मांडले जाते, तसेच यहुदी जमातीतील विविध जमाती व त्यांच्याविषयी माहिती कुरआनामुळे जगाला परिचित झाली.

"परंतु त्यांनी तोंड फिरवले, तेव्हा आम्ही त्यांच्यावर बांधाचा महापूर पाठविला आणि त्यांच्या बागांना अशा दोन बागांमध्ये परावर्तित केले की ज्यात बेचव फळे, झाडे-झुडुपे आणि फार थोडीशी बोरी होती." (सूरह सबा, आयत १६)

या आयतीत 'सबा' नावाच्या जनसमूहाची भयंकर असा बांध फुटल्याने झालेल्या महापुराने पार वाताहत झाल्याचा वृत्तान्त आहे. जे आज ऐतिहासिक सत्य म्हणून सिद्ध झाले आहे.

सबा या जनसमूहाची राजधानी मारिब असून हा जनसमूह यमनच्या प्रदेशात वसत होता. ही राजधानी सनआच्या पश्चिमेस १९३ कि. मी. अंतरावर आहे. सूरह 'नमल' मध्ये या सबांच्या राणीचा उल्लेख आलेला आहे. सबा जनसमूह शेकडो वर्षे राज्य करीत होता आणि तेथे सुख-संपन्नता नांदत होती. परंतु कालांतराने त्याच्यात उन्मत्तपणा आला आणि ते गर्विष्ठ बनले आणि ही सुबत्ता चिरकाल राहील या नशेत राहिले.

ज्या इलाख्यात ते वसत होते तेथे नांदणाऱ्या संपन्नतेमुळे न माजता नम्रतापूर्वक वर्तन करून ईश्वराचे आभार मानून ईशभयाने जीवन व्यतीत करावयास पाहिजे होते. या इलाख्यात बागा फळांनी बहरलेले वृक्ष हिरवेगार शेते यामुळे तो भाग नयनरम्य झाला होता. ते ऐहिक संपन्नतेत मग्न झाले.

सबा लोक स्थापत्य शास्त्रात प्रविण होते. त्यांनी धरणे बांधून कृत्रिम जलसिंचन प्रस्थापित केले होते. सबा जनसमूहाने आपली राजधानी मआरिबमध्ये दोन पर्वतांच्या दरम्यान बांध बांधला होता. ते धरण 'सद्दे मआरिब' या नावाने प्रसिद्ध होते. अलबलक या दोन पर्वतांच्या मधील भागात त्यांनी बांध घातला. त्यामुळे पावसाचे पाणी व झऱ्यांचे पाणी साठविले जाई. त्यावर पाटबंधारे बांधून शेतीला पाण्याचा पुरवठा केला जाई. यात ते प्रविण होते. या धरणाचा तपशील 'अर्जुब कुरआन' ज्याचे लेखक सय्यद सुलैमान नदवी, खंड १ ला, पान २५४ मध्ये दिलेला आहे.

या धरणाचे भग्नावशेष आजही मआरिबमध्ये आहेत. या अवशेषांचे विवरण डॉ. अब्दुल अलीम अब्दुल रहमान खिजर यांच्या "मफाहिम-ए-जॉगरफिया फिल किताबिल कुरआनी" यात मिळते. हे धरण माती व चुन्याचे बांधण्यात आले होते. टी. जे. अनॉर्ड या फ्रेंच पर्यटकाने १८४३ मध्ये पाहून याविषयी लिहिले आहे, "या अतिभव्य व विशाल कामाविषयी तेथील शिलालेखांवरून माहिती मिळते. १८७४ च्या 'एशियाटिक जानेवारी जर्नल'मध्ये माहिती विस्ताराने आलेली आहे. डब्ल्यू. बी. हॅरिस यांच्या 'जर्नी थ्रू येमेन' यातही याविषीय माहिती आलेली आहे. अनॅडी अरनॉडच्या माहितीप्रमाणे हे धरण २ मैल लांबीचे असून त्याची उंची १२० फूट होती. काहींच्या मते इ.स. पू. २ च्या शतकात ही धरणफुटी घडली तर युरोपियन अध्ययन करणारे इ. स. १२० च्या आसपास मानतात.

या विध्वंसाने समृद्ध असलेला भाग काट्यकुट्यांनी व बेचक फळांनी भरलेला बनला. एकेकाळी समृद्ध व खुशहाल असलेला भूभाग ईशकोपाने उद्ध्वस्त झाला व येणाऱ्या पिढ्यांना त्याची साक्ष देत उभा आहे.

ही माहिती कुरआनात आली आहे व पुढील संशोधनाने हे ऐतिहासिक सत्य समोर आले आहे.

"रोमन पराभूत झालेत." (कुरआन - ३०:२)

"जवळच्या प्रदेशात आणि ते आपल्या पराभवानंतर वर्चस्वशाली होतील काही वर्षांच्या आत." (कुरआन - ३०:०३)

पवित्र कुरआनात मांडलेली दोन ऐतिहासिक सत्ये प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या जीवनाशी निगडीत असलेली आहेत.

प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आगमन काळात दोन विशाल साम्राज्ये होती. (१) फारस साम्राज्य ज्यात इराण व इराक सम्मिलीत होते. (२) रोमन साम्राज्य ज्यात पॅलेस्टिन, सिरीया व तुर्कस्तान वगैरे समाविष्ट होते. ज्याची राजधानी कुस्तुतुनिया होती. रोमन ग्रंथधारक असून प्रेषित ईसा (अ.) यांना मानणारे होते. परंतु अंतर्गत बंडखोरीमुळे त्यांचे साम्राज्य बरेच कमजोर झालेले होते. पारसी लोक मजुसी म्हणजे अग्नीपूजक होते. त्यांनी सतत हल्ले करून सिरीया व पॅलेस्टिनच्या प्रदेशावर कब्जा केला. इ.स. ६१६ मध्ये प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या प्रेषितत्वाच्या सातव्या वर्षी ते अरब देशाच्या उत्तर सीमेपर्यंत पोहचले होते. ज्या ठिकाणी रोमन लोकांचा कब्जा होता. रोमनांच्या पराभवाने मक्केचे अनेकेश्वरवादी आनंदित झाले, कारण मुस्लिमांप्रमाणेच ईशग्रंथधारक स्वतःस म्हणतात, ते रोमन जर सत्यावर असते तर पराभूत का झाले असते? फारसी अनेकेश्वरवादी होते ते विजयी झाले होते. याचा अनेकेश्वरवादी मक्केतील कुरैशांना आनंद झाला होता. रोमन जसे पराभूत झाले तसे मुस्लिमही पराभूतच होणार अशी कुरैशांना खात्री वाटू लागली होती.

परंतु या आयतींनी ही स्पष्ट भविष्यवाणी केली गेली. रोमन आज पराभूत असले तरी लवकरच वर्चस्वशाली होतील. येथे कुरआनात 'विजय' हा शब्दप्रयोग केला गेला आहे, ज्याचा अरबी भाषेत 'विजअ' म्हणजे तीन नऊपर्यंत वापरला जातो. याचा अर्थ रोमन लोक नऊ वर्षांत निश्चित विजयी होतील.

हिजरी दोन म्हणजे इ.स. ६२४ मध्ये बद्रची लढाई झाली ज्यात अनेकेश्वरवादी कुरैश मुस्लिमांकडून वाईटरीत्या पराभूत झाले. रोमन सम्राट हर्क्यूलसने सैन्याची पुनर्बांधणी केली व फारस साम्राज्यावर चढाई करून विजय प्राप्त केला. फारसी साम्राज्याच्या अगदी अंतर्भागापर्यंत चढाया करून ते साम्राज्य नामशेष केले.

हिजरी दोन - इ.स. ६२४ मध्ये रोमन यशस्वी झाले व बद्रच्या लढाईत मुस्लिम यशस्वी झाले. कुरआनात कथन केल्याप्रमाणे नऊ वर्षाच्या आत ते वर्चस्वशाली झाले. हदीस वचनाच्या उल्लेखावरून स्पष्ट होते की त्यानंतर अनेकांनी इस्लामचा स्वीकार केला.

वरील विजय ही ऐतिहासिक सत्यता आहे. ती कोणीही नाकारू शकत नाही.

"(हे प्रेषित!) आम्ही तुम्हाला निश्चितच खुला विजय प्रदान केला."

(सूरह फतह, आयत क्र. ०१)

यात प्रदान केलेला विजय म्हणजे मक्का विजय होय. ज्याची प्रस्तावना हुदैबियाच्या तहाने झाली. हा करार झाल्याच्या दोन वर्षांच्या आत हिजरी सन आठमध्ये प्रेषित मुहम्मद (स.) यांना मक्केवर विजय प्राप्त झाला. खुला विजय प्रदान केला ही कुरआनात विहीत केलेली भविष्यवाणी तंतोतंत खरी ठरली. जे सर्वमान्य ऐतिहासिक सत्य आहे. जे कोणीही नाकारू शकत नाही.

हुदैबियाचा तह जेव्हा झाला तेव्हा तो मुस्लिमांना अत्यंत अप्रिय वाटला होता. हा या तहाचा एक पैलू मुस्लिमांच्या मनाला अत्यंत सलत होता. कारण त्यांना उमरा न करताच परत जावे लागले होते. परंतु अल्लाहच्या व प्रेषितांच्या दूरदृष्टीस याचे चांगले परिणाम दिसत होते. आणि विशेष म्हणजे वस्तुस्थिती अशी आहे की इस्लामच्या विजयाचा क्रम हुदैबियाच्या तहानंतरच सुरू झालेला दिसतो.

ही नांदी होती एका भव्य आणि दिव्य अशा विजयाची ज्याद्वारे सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या प्रेषित व आपल्या सैन्यास प्रतिष्ठा प्रदान केली आणि लोकांनी जथ्थ्या जथ्थ्याने इस्लाम धर्माचा अंगीकार केला. तेव्हा हा तह विजयाचे द्वार होते. तसेच त्याची पूर्व घोषणा ठरली. हा तह एक भव्य विजय होता, कारण त्याच्यामुळेच लोकांना शांती लाभली. मुस्लिमांना अनेकेश्वरवादींशी भेट गाठ घेण्याची, त्यांच्यासमोर सत्य आवाहन प्रस्तुत करण्याची, त्यांना कुरआन ऐकवण्याची व निर्भयपणे त्यांच्याशी इस्लामबाबत चर्चा करण्याची संधी मिळाली. ज्यांनी गुप्तपणे इस्लाम स्वीकारला होता, तहाच्या कालावधीत ज्यांना अल्लाहने सुबुद्धी दिली त्यांनी इस्लामचा स्वीकार केला. म्हणून अल्लाहने त्यास फतह मुबीन (स्पष्ट विजय) ठरविले. बाह्यत: मुस्लिमांना हा तह आपला हक्क हिरावून घेणारा वाटला, परंतु त्याच्या अंतरंगात प्रतिष्ठा, विजय व अल्लाहची मदत होती. असे भाष्य जादुल मीआद, खंड २, पृष्ठ १३० वर आलेले आहे.

येथे एका विशिष्ट परिस्थितीत हा तह केला गेला होता. ज्याचा प्रस्ताव मक्केतील अनेकेश्वरवादींनी मांडला होता मुस्लिमांनी नव्हे. "धैर्य सोडू नका आणि तह बोलावू नका." (मुहम्मद ३५) बद्रचे युद्ध हिजरी २, उहदचे युद्ध हिजरी ३ व खंदकाचे युद्ध हिजरी ५ मध्ये लढले गेले. हुदैबियाचा तह काळ संपल्यानंतर मुस्लिमांनी बळाच्या दबावाने मक्का ताब्यात घेतली. त्यानंतर त्यांनी बाहेरच्या सत्तांनाही आव्हान देणे सुरू केले. आव्हान आणि आवाहन ह्या दोन्ही आघाड्या आता सुरू झाल्या.

अल्लाहने अशी मदत केली की, जो कोणी टक्कर देईल तो क्षतविक्षत होईल. बायबलमध्ये मत्तय (२१:४३,४४) मध्ये विजयाचे भाकित आले ही व अशी भाकिते विविध हदिसवरूनदेखील आलेली आहेत जी भविष्यात खरी ठरली आहेत.

वैद्यकीय सत्य

"ते तुम्हाला दारू व जुगाराबद्दल विचारत आहे. सांगा या मोठ्या पापाच्या गोष्टी आहेत..." (सूरह अल बकरा, आयत क्र. २१९)

"सैतान तर हे इच्छितो की दारू आणि जुगारात व्यस्त ठेवून तुमच्यात वैर निर्माण करावे." (सूरह अल माइदा, आयत क्र.९१)

"आणि खजूर व द्राक्षाच्या फळापासून तुम्ही मादक वस्तूही निर्माण करू शकता आणि चांगली उपजीविकादेखील प्राप्त करता. नि:संशय यात निशाण्या आहेत त्या लोकांकरिता जे बुद्धीने काम घेतात." (सूरह अन नहल, आयत क्र.६७)

या तीन्ही आयतींचा संबंध मद्य सेवनासंबंधित आहे. पवित्र कुरआनात व हदीसमध्ये मद्य सेवनास निषिद्ध मानले आहे. कारण अगदी स्वच्छ व स्पष्ट आहे की, ते मानवास आरोग्याच्या दृष्टीने, नैतिक दृष्टीने, आर्थिक दृष्टीने अत्यंत घातक आहे. जीवन उद्ध्वस्त करणारे आहे.

दारूमुळे माणसात कामाची झपाट्याने पूर्तता करता येते. मोठी स्फूर्ती मिळते, असा पिणाऱ्यांचा समज असतो. आज वैद्यकीय शास्त्राने स्पष्ट केले आहे की, (१) माणसात मद्य सेवानाने कार्य करण्याची क्षमता वाढते हे निखालस असत्य आहे. (२) मद्याचे एनर्जीत (ऊर्जेत) परिवर्तन होत नाही. (३) मद्य हे शरीरात मद्यच राहते व तसेच शरीरातून बाहेर पडते. शक्तीत त्याचे कधीच रूपांतर होत नाही. (४) मज्जासंस्थेस तात्पुरते उद्दिपीत करते, पण त्याचा मज्जा संस्थेवर विपरित परिणाम होतो. (५) मद्य अतिसेवनाने माणसाच्या विविध ज्ञानेंद्रियांची क्षमता नष्ट होते. (६) अकाली वृद्धत्व व शक्तीपात होतो. (७) मानवाच्या शरीरातील ३५० विविध कार्य करणाऱ्या लिव्हरला 'डॅमेज' करते व शरीर स्वास्थ्य धोक्यात येते. (८) दृष्टीवर, मुत्रपिंडावर अत्यंत प्रतिकूल परिणाम होतो. (९) नैतिक अध:पतन होऊन मद्यपीची सारासार विचारशक्ती नष्ट होते. (१०) त्याची व कुटुंबाची वाताहत होते.

एनसायक्लोपीडिया ऑफ रिलिजन आणि एथिक्समध्ये अगदी विस्तृतपणे मद्यपानावर चर्चा केलेली आहे. आत्मसंयम जातो, माणूस हिंसक बनतो. मुलाबाळांचे व कुटुंबाचे अतोनात नुकसान होते, 'प्रोटोप्लाझम'साठी मद्य हे विष आहे. जगात मद्याने कोट्यवधी लोक अल्पवयात मृत्युमुखी पडतात. हृदयरोग, मेंदूचे असंतुलन अशा एक ना अनेक हानिकारक रोगांना निमंत्रण देतात.

मद्यपानाची निर्भर्त्सना करणाऱ्या अनेक हदीस आलेल्या आहेत.

प्रत्येक प्रकारच्या जोड्या आहेत

"त्याने प्रदेश प्रकारचे जोडे निर्माण केले." (सूरह जारियात, आयत क्र.४९)

"आणि प्रत्येक वस्तूच्या आम्ही जोड्या निर्माण केल्या यासाठी की तुम्ही बोध ग्रहण करावा." (सूरह जारियात, आयत क्र.४९)

"आणि काय आम्ही तुम्हाला जोड्या-जोड्याच्या स्वरूपात निर्माण नाही केले." (सूरह अन्नबा, आयत क्र.८)

"स्वच्छ शुद्ध आहे तो ज्याने प्रत्येक प्रकारच्या जोड्या निर्माण केल्या, जमिनीवरील वनस्पतींपैकीही त्यांच्या स्वतःमधूनही आणि त्या गोष्टींमधूनही ज्यांना ते जाणत नाहीत." (कुरआन)

प्रत्येक निर्मितीचे हे वैशिष्ट्य आहे की प्रत्येक निर्मितीत धन आणि ऋण हे असतातच. त्या एकसारख्या असतात व त्या एकमेकांची पूर्तताही करतात.

वनस्पतीतही जोड्यांचे स्वरूप अस्तित्वात असते. काही वनस्पती, झाडे फळे देणारे आहेत. तर काहींना फळेच येत नाहीत. ज्या झाडांना फळे येत नाहीत त्या झाडाला नर म्हणतात. (पपईमध्ये अगदी स्पष्ट लक्षात येते.)

काही फळे दोन भाग मिळून एकत्र असल्याचे सर्वांनाच माहिती आहे. हरभरे, विविध डाळी, बदाम, काजू, पिस्ता यांचे दोन भाग सहज करता येतात. जी वेगवेगळ्या लिंगाची असतात. पण प्रत्येक झाडावर दोन्ही प्रकारची फुले असतात आणि त्यांच्यात फळधारणा झाल्याने फळे निर्माण होतात. वनस्पती शास्त्रानुसार बीमधून अंकूर दोन भागांतून विभागून बाहेर पडतो. वनस्पती शास्त्रानुसार हे विभाजन बहुतेक वनस्पतींमध्ये उत्पत्तीची क्रिया होय. प्रत्येक झाडा-झुडुपातही पेशी असतात आणि प्रत्येक पेशीत 'क्रोमोझोम्स'च्या जोड्या असतात.

अल्लाहने अशा अनंत जोड्या निर्माण केल्या आहेत, मानवाला त्यापैकी अनेकांची जाणही नाही. जड पदार्थांतही अशा जोड्या असतात. आज हे आधुनिक विज्ञानाने सिद्ध केले आहे. प्रत्येक वस्तूचे संपूर्ण विभाजन होते. त्यातील लहानात लहान घटक म्हणजे अणु होय. प्रत्येक अणुमध्ये एक केंद्रस्थान असते. ज्यात धन विद्युत व ऋण विद्युत असते. इलेक्ट्रॉन्स व प्रोटॉन्स हे सर्व आपल्या केंद्राभोवती फिरत असतात विशेष म्हणजे, केंद्रस्थान हे न्यूट्रॉन व प्रोटॉन यांनी बनते.

कुरआनात मांडलेली अद्भुत सत्ये सर्वज्ञ अशा अस्तित्वाकडून प्रदान झालेली आहेत. विशेष म्हणजे १४०० वर्षांपूर्वी कुरआनातही मांडली गेली आहेत.

कोणाचीही ज्याच्याशी जोडी नाही तो एकमेव अल्लाह आहे.

फिरऔनचे शव

"तेव्हा आज आम्ही तुझे शव वाचवू, अशासाठी की नंतरच्या लोकांकरिता तू (बोधचिन्ह) ठरावेस आणि वस्तुस्थिती अशी की बहुतेक लोक आमच्या निशाण्यांपासून असावध राहतात." (कुरआन - १०:९२)

बनी इस्राईलची समुद्र ओलांडण्याची घटना सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे एक उघड चमत्कार होता. याविषयी सूरह 'शुअरा'मध्ये अधिक माहिती मिळते.

फिरऔनचे शव समुद्रात विरघळले नाही. किंबहुना ते किनाऱ्यावर आले अशासाठी लोकांनी त्याचे प्रेत पाहून बोध घ्यावा की अत्याचारींवर अल्लाहचा कोप कसा कोसळतो आणि जे आपल्या मोठेपणाचा गर्व करतात. त्यांचा कसा शेवट होतो हे दाखविले गेले आहे.

बायबलच्या भाष्यकाराने बनी इस्राईलच्या अवागमनास इ.स. च्या १३०० वर्षांपूर्वी झालेल्या घटना मानली आहे. हा फिरऔन संभवतः रॅमसे दुय्यम होता. (Peak's Commentary on the Bible Newyork, Page 115) आणि रॅमसे दुय्यमची ममी आजदेखील काहरा (कैरो) च्या संग्रहालयात आहे आणि आपल्या अवस्थेबाबत जणू सांगत आहे. बोधप्राप्त करणारी दृष्टी असेल तर मला पाहा. His mummy is now in the museum at Bubek (a dictionary of Bible - World Pharaoh, Page, 600)

जगाची उत्पत्ती

"काय इन्कार करणाऱ्यांनो, या गोष्टीवर विचार चिंतन नाही केले की आकाश व जमीन एकमेकास मिळालेले होते. नंतर आम्ही त्यांना अलग केले आणि पाण्यापासून प्रत्येक सजीव निर्माण केला तर काय ते या उपरान्तही श्रद्धा बाळगणारे नाहीत."

(सूरह अल अंबिया, आयत क्र. ३०)

"मग त्याने आकाशाकडे लक्ष दिले जे धूर स्वरूप होते. त्याने त्याला (आकाशाला) व जमिनीला फर्माविले, आदेश पालन करा राजीखुशीने किंवा नापंसतीने. ते म्हणाले, आम्ही पालन केले राजीखुशीने."(सूरह हामीम अस्सजदा, आयत क्र. ११)

या वरील दोन आयती प्रामुख्याने सर्वत्र फक्त धूरच होता, म्हणजे सृष्टीच्या निर्मितीच्या अगदी पहिल्या अवस्थेत सर्वत्र फक्त 'गॅस' स्वरूप होते. नंतर ते द्रवरूप झाले व त्यानंतर घन अवस्था निर्माण झाली. हे वैज्ञानिक सत्य मांडलेले आहे. विशेष म्हणजे या गोष्टी वैज्ञानिकदृष्ट्या मांडल्या गेल्या व सिद्ध झाल्या त्या आधुनिक विज्ञानकाळात. परंतु या आयतींच्या अवतरणाचा काळ हा इ.स. ६१० ते इ.स. ६३२ पर्यंतचा आहे. ही सर्व वैज्ञानिक सत्ये प्रेषित मुहम्मद (स.) जे निरक्षर होते, त्यांनी मांडणे शक्यच नाही. तर ती अल्लाहकडूनच प्रेषितांवर अवतरित झालेली आहेत हे यावर चिंतन व मनन करणाऱ्यांच्या लक्षात येईल.

सृष्टीला ना आरंभ आहे ना अंत हे समजणे मोठी चूक आहे. कुरआनात याबद्दल असे विवेचन आले आहे की, निर्मात्याने सृष्टी निर्माण केली. तिचा प्रारंभ अशा प्रकारे झाला की प्रथम एक पदार्थ (दुखान) घडविला. जे 'कुरआन ४१:११' मध्ये सांगितले गेले आहे. जो ढिग दुखान स्वरूपात होता व मग त्यापासून जमीन, आकाश, तारे, सर्व ग्रह बनविले. म्हणजे प्रथमतः जमीन व आकाश एकत्रच होते व नंतर ते मग दुभंगून वेगळे झाले.

जर आपण बारकाईने विचार केला तर लक्षात येईल की जमीन व आकाशात सुसंगती आहे. सूर्य, चंद्र, पृथ्वी यांच्यात सुसंगती आहे विसंगती नाही. आता तर चंद्रावर पृथ्वीप्रमाणेच माती दगड आहेत.

ज्या ज्या प्रत्येक वस्तूला जीव आहे त्याला सजीवता पाण्यामुळेच लाभते. जीवशास्त्राप्रमाणे एक जलपेशी म्हणजेच प्रोटोप्लाइझम जीवनतत्त्वच आहे जे प्रत्येक सजीवात आढळते.

जमिनीच्या मूळ तत्त्वानेच क्रमाक्रमाने उन्नत स्वरूप अंगीकारले. आकाश व जमिनीचे तत्त्व एकच आहे. प्रथम जमीन व नंतर आकाश हेही विज्ञान मानते. प्रथमतः आकाश धूर स्वरूपात म्हणजे उष्ण वायू अशा रूपात असा आशय असावा.

आकाश आणि जमीन जड पदार्थ असले तरी त्यात सातत्याने बदल घडतात. वैचित्र्यपणे एकात्मता आढळते. सौर रचनेचा अभ्यास केल्यास लक्षात येते की सूर्यावर जितके काळे डाग जेवढे जास्त तेवढी चुंबकीय वादळांची तीव्रता जास्त. गुरुत्वाकर्षणामुळे सर्व वस्तुमान दृढ धरले जाते. पृथ्वी व आकाश एकत्रच होते व नंतर सृष्टीत झालेल्या प्रचंड स्फोटामुळे ते विभक्त झाले व एकमेकांपासून वेगळे झाले.

पक्ष्यांविषयीचे वैज्ञानिक सत्य

"काय हे पक्ष्यांना पाहात नाही की कशाप्रकारे आकाशाच्या वातावरणात मुग्ध आहेत. अल्लाहनेच त्यांना सावरून धरले आहे. निःसंशय, त्यात निशाण्या आहेत त्या लोकांकरिता जे श्रद्धा बाळगतात." (सूरह अननहल, आयत क्र.७९)

"काय यांनी आपल्यावर पक्ष्यांना पंख पसरविताना व ते मिटताना पाहिले नाही? रहमानखेरीज असा कोणी नाही जो त्यांना (सुखरूपपणे) थांबवून ठेवतो. तोच प्रत्येक गोष्टीचा निरीक्षक आहे." (सूरह अल मुल्क, आयत क्र.१९)

पक्षी एखाद्या कृत्रिम सामर्थ्याचा आश्रय न घेता आपल्या पंखाद्वारे कशाप्रकारे आकाशात उडतात. कोण आहे ज्याने त्यांना उडण्याकरिता पंख दिलेत व कशाप्रकारे उडण्याचे प्रशिक्षण दिले, ज्यायोगे ते आकाशात मैलोगणिक प्रवास करतात व अधांतरी

उडत राहतात. पण खाली पडत नाहीत. तो कोण आहे ज्याच्या हुकूमाच्या व नियमाच्या हे आधिन आहेत. शेकडो फुटावर उडणाऱ्या घारीला इतकी तीक्ष्ण नजर कोणी दिली? गिधाडाला कित्येक मैलावर असलेल्या त्याच्या अन्नाचा कसा वास येतो? त्याचे घ्राणेंद्रिय इतके कोणी तीक्ष्ण बनविले? बदलत्या हवामानाप्रमाणे पक्षी आपल्या जागा कशा बदलतात, शेकडो मैलांचा प्रवास करीत पक्षी विशिष्ट जागी उतरतात, तेथे वास्तव्य करतात. त्या जागी त्यांचे प्रजनन होते, विशिष्ट काळ तेथे घालवून ते परत आपल्या दुसऱ्या स्थळी कसे परत जातात व पुढच्या वर्षी कसे परत येतात? ही सर्व त्यांची हालचाल घडवून आणणारा कोण आहे ? तोच सृष्टीनिर्माता एकमेव अल्लाह! हवेतून उडणे, तरंगणे, खाली न पडता सुखरूप परतणे हे सर्व स्तिमित करणारेच आहे.

मातीच्या सत्त्वापासून उत्पत्ती

"आम्ही माणसाला मातीच्या सत्त्वापासून निर्माण केले."

(सूरह मोमिनून, आयत क्र. १२)

"मग त्यास वीर्य बनवून एका सुरक्षित जागी ठेवले."

(सूरह मोमिनून, आयत क्र. १३)

"मग वीर्यास जमलेल्या रक्ताचे स्वरूप दिले. मग त्या रक्त गोळ्यास मांसाचा तुकडा बनविले, नंतर मांसाच्या तुकड्यास हाडांचे स्वरूप दिले. नंतर हाडांवर मांस चढविले. मग त्यास एक आगळीच निर्मिती बनवून उभे केले, तेव्हा मोठा समृद्धशाली आहे अल्लाह सर्वोत्कृष्ट निर्माता." (सूरह मोमिनून, आयत क्र. १४)

"आम्ही तुम्हाला मातीतून निर्माण केले, मग वीर्याने, नंतर रक्ताच्या गोळ्याने, मग मांसाच्या तुकड्याने जो साकारही असतो व निराकारही (हे अशासाठी घडते) की, तुम्हावर (आपल्या सामर्थ्य शक्तीची चमत्कृती स्पष्ट करावी आणि आम्ही ज्याला इच्छितो, पोटात एक निर्धारित वेळेपर्यंत थांबवून ठेवतो. मग तुम्हाला बाळाच्या रूपाने बाहेर आणतो." (सूरह हज्ज, आयत क्र. ५)

माणसाला मातीतून निर्माण केले, याचा अर्थ जणू काही हा मातीचा सत्त्वगुण होता ज्याद्वारे प्रथम मनुष्यनिर्मिती झाली. म्हणूनच माणसाच्या स्वभावात ती समस्त गुणवैशिष्ट्ये सामावलेली आहे. जशी एखादी जमीन मृदु असते त्याचप्रमाणे एखादा कोमल मनाचा असतो, तर एखादा कडक स्वभावाचा असतो. अशी माती विविध रंगाची असते, तद्वत माणसाचे रंग वेगवेगळे असतात. पहिल्या मानवाला मातीतून निर्माण केल्यानंतर त्याचा वंशक्रम वीर्याद्वारे चालू ठेवला जातो तो एक पाण्याचा थेंब मात्र असतो. त्यास गर्भाशयासारख्या सुरक्षित जागी राखण्याची त्याची व्यवस्था केलेली

आहे. वीर्यबिंदू ज्या अवस्थेमधून जाऊन गर्भाचे स्वरूप धारण करते त्याचे स्पष्टीकरण सूरह 'हज्ज'च्या ५व्या आयतीत आलेले आहे. स्पष्ट असावे की रक्ताचा गोळा (अलक) सर्वसामान्यपणे अवगत होणारे आहे. आज गर्भवृद्धीशास्त्राने आश्चर्यकारक रीतीने उलगडली आहेत. वीर्यबिंदूला रक्ताच्या गोळ्याचे रूप दिले जाते. तो जळूप्रमाणे दिसतो. नंतर त्याचे रूप चोथ्याप्रमाणे बनते. त्यावर अस्थी बनतात व त्याच्यावर मांस चढवले जाते. नंतर त्याचे नव्या रूपात रूपांतर होते.

'अज-ज्जुमर' या ३९ व्या सूरहमध्ये म्हटले आहे, "तुम्हाला तुमच्या मातांच्या उदरात अंधाराच्या तीन पडद्यांत सुरक्षित ठेवतो. ते तीन पडदे म्हणजे (१) आईच्या उदराची पोकळी (२) गर्भाशयाची पिशवी (३) Amnichronic membrane Composed of the fused amnion and Chronion. पातळ त्वचा जिने गर्भाला आच्छादून टाकलेले असते.

कुरआनातील ७५:३७ ते ३९ व ७७:२० मध्ये म्हटले आहे ते असे,

"काय तो वीर्याचा एक थेंब नव्हता जो उदरात टाकला जातो, मग तो रक्ताचा गोळा (अलक) झाला, मग अल्लाहने त्याचे शरीर बनविले आणि त्याला दुरुस्त केले. मग त्यापासून जोडी बनविली पुरुष आणि स्त्री."

(सूरतुल कियामत, आयत ३७, ३८, ३९)

"काय आम्ही तुम्हाला तुच्छ पाण्यापासून निर्माण केले नाही? आणि त्यास एका सुरक्षित स्थानी राखले. एका निर्धारित मुदतीपावेतो."

(सूरह मुर्सलात, आयत क्र. २०-२२)

वीर्यबिंदू मुळातच एक मिश्रण असते. अर्थात त्यात अनेक प्रकारचे द्रव असतात. आधुनिक शरीर विज्ञानाप्रमाणे एक द्रव असा असतो ज्यात शुक्रजंतू असतात आणि हे शुक्रजंतू अंडकोषामधून निघून वीर्यथेंबामध्ये जमा होतात आणि तिसरा द्रव शुक्राशय पिंडाचा असतो. जो त्यात एक विशिष्ट गंध निर्माण करतो आणि चौथा द्रव पिंड निर्माण करतो, जो मुत्रनलिकेजवळ असतो व त्यास चिकट बनवितो. वीर्यबिंदू या सर्व घटकांचे मिश्रण असते. मग जेव्हा हा वीर्यबिंदू उदरात बीजांडातील रजोगोळाशी संयुक्त होतो तेव्हा जे अंडगर्भ मुक्त फलन होते व गर्भधारणा होते. अशा प्रकारे मानव उत्पत्तीचा आरंभ पुरुषाच्या वीर्याशी स्त्रीच्या बीजांडाच्या मिश्रणाद्वारे होतो.

अशा रीतीने इतक्या विशिष्ट प्रक्रियांतून गेल्यावर नवा जीव अस्तित्वात येतो व मातेच्या पोटातून बाहेर पडेपर्यंत अल्लाह त्याला सुरक्षित ठेवतो.

वर दर्शविल्याप्रमाणे सर्व 'स्टेजेस' प्रमाणेच गर्भधारणेपासून प्रसुतीपर्यंत घडते जे वैज्ञानिक सत्य आहे हे आज सिद्ध झालेले आहे.

"त्याने तुम्हाला एका जीवापासून निर्माण केले, मग त्याद्वारे त्याची जोडी बनवली, तो तुम्हाला तुमच्या मातांच्या उदरात अंधाराच्या दरम्यान निर्माण करतो, एका उत्पत्तीनंतर दुसऱ्या उत्पत्तीत, तोच अल्लाह तुमचा पालनकर्ता आहे. त्याचीच सत्ता आहे." (कुरआन - ३९:०६, ७:१८९)

सुरुवातीला सूरह 'मोमिनून'मधील आयती १३ व १४ मध्ये असे वैज्ञानिक सत्य मांडले आहे जे इ.स. १९४० मध्ये सिद्ध झालेले आहे.

वास्तविक कुरआनात स्पष्ट उल्लेख आला आहे,

"ज्याने तुम्हाला एका जीवापासून निर्माण केले आणि त्याच्यापासूनच त्याचा जोडा पण निर्माण केला." (कुरआन - ४:०१)

याचा अर्थ हा आहे की हव्वाचा जन्म आदमपासूनच झाला, कारण स्पष्ट उल्लेख आला आहे की एका जीवापासून निर्माण केले. आज हे सर्वांनाच ज्ञात आहे की, एकपेशी जीव सुरुवातीला होता व नंतर त्याचे विभाजन होऊन त्यातूनच नर व मादा निर्माण झाले व पुढे त्यातूनच अनेक नर, मादा निर्माण झाले व त्यातूनच सर्व जगभर मानववंशाचा प्रसार झालेला आहे.

येथे जीव हा अंधारात कोंडलेला राहतो व आता उत्पत्तीशास्त्राने हे सिद्ध केले आहे की हे तीन अंधकार म्हणजे गर्भाभोवती तीन आवरणे होत. मातेचे उदर, गर्भाशय व तिसरे आवरण ती पातळ त्वचा होय, जिने गर्भाला अच्छादून टाकलेले असते. ही सर्व निरनिराळ्या अवस्थांतून अंधकारात घडत जाते. तीन आवरणांच्या दरम्यान जन्मास येणाऱ्या बाळाला या अशा अवस्थांतून स्वरूप बदलत जावे लागते. ज्याविषयी सूरह मोमिनूनमध्ये सविस्तर माहिती दिलेली आहे.

अवकाश विज्ञान

"आणि आकाशाला आम्ही सामर्थ्याने बनविले आणि आम्ही मोठी व्यापकता बाळगणारे आहोत." (सूरह अज्जारियात, आयत क्र.४७)

आकाशाला पाहिल्यावर अल्लाहच्या विशाल सामर्थ्याची कल्पना येते. आजकाल अतिशय शक्तिशाली दुर्बिणीच्या सहाय्याने अनेक खगोलशास्त्रीय गोष्टींचा उलगडा होतो. आकाशगंगांची व्यवस्था आणि मोठमोठ्या इतर अनेक आकाशगंगा, एवढ्या उंचीवर तारे ज्याचा प्रकाश कित्येक प्रकाशवर्षांनी जमिनीवर पोहचतो. हे समजत असले तरी या सृष्टीचा खरा थांगपत्ता लागत नाही. सृष्टी ही सतत पसरत चालली आहे. या आयतीवरून अल्लाहच्या अथांग सामर्थ्याची कल्पना येते.

"हे मनुष्य व जीन्नांच्या समूहांनो! जर तुम्ही आकाशांच्या व जमिनीच्या सीमेबाहेर जाऊ शकत असाल तर जा, पण सामर्थ्याशिवाय निघू शकत नाही."

(सूरह अर रहमान, आयत क्र.३३)

आकाशाच्या व जमिनीच्या हद्दीबाहेर माणूस व जिन्न जाऊ शकत नाहीत. त्यांचे उड्डाण या विश्वाच्या हद्दीपलीकडे नाही. जाणकार मानतात की ही आयत 'Conquer of Space' कडे निर्देश करते. काही भविष्यकाळात मानव हा अवकाशाला भेटून जाताना यशस्वी होईल इकडे इशारा करतो.

"आणि पाण्यापासून प्रत्येक सजीव निर्माण केला."

(सूरह अंबिया, आयत क्र.३०)

"आकाशातून पाणी वर्षविले. मग त्याद्वारे निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पती निर्माण केल्या." (सूरह ताहा, आयत क्र.५३)

"आणि अल्लाहने प्रत्येक सजीवास पाण्याद्वारे निर्माण केले."

(सूरह नूर, आयत क्र.४५)

उन्हाळ्यात सर्वत्र रखरखीत ऊन असते. कोठेही जीवनाचा मागमूसही दिसत नाही. परंतु पावसाचा वर्षाव होताच धरतीला नवजीवन मिळते. सर्वत्र हिरवेगार दिसू लागते. नव्या वनस्पती उगविलेल्या दिसतात. हिरवागार भाजीपाला दिसू लागतो. नवनवीन फळझाडे तरारून उभरतात. पाण्याशिवाय वनस्पती जगु शकत नाही. आपल्या लक्षातही येत नाही इतक्या प्रकारच्या वनस्पती दिसू लागतात. वनस्पती शास्त्रानेही सिद्ध झाले आहे की वनस्पती या निर्जीव नसून सजीव आहेत. 'प्रोटोप्लाझम' हा मूळ घटक आहे प्रत्येक सजीवासाठी व तो जलरूपातच असतो.

"काय तुम्ही पाहात नाही की अल्लाह आकाशातून पाणी वर्षवतो, त्याद्वारे फळे निर्माण करतो, ज्यांचे रंग वेगवेगळे असतात." (सूरह अल फातिर, आयत क्र.२७)

कुरआनात अनेक आयती आल्या आहेत ज्यात प्रत्येक ठिकाणी सजीवाची उत्पत्ती ही पाण्यापासून झाली आहे असे दर्शविलेले आहे.

पर्जन्य, पिके व बागा

"आणि काय मेघांद्वारे भरपूर पाण्याचा वर्षाव नाही केला, यासाठी की त्याद्वारे पिकवावे धान्य आणि वनस्पती आणि घनदाट बागा."

(सूरह अन्नबा, आयत क्र.१४-१६)

ढगांद्वारे मानवी वस्त्यांना मुबलक पाणीपुरवठ्याची व्यवस्था आणि त्याच्या सहाय्याने अन्नधान्य व भाजीपाला आणि घनदाट बागा ज्यांच्याद्वारे माणसाच्या उदरनिर्वाहाचे साहित्य अखंडपणे निर्माण होत असते. काय हे सर्व मानवाच्या कल्याणासाठी नाही?

पाण्याशिवाय पृथ्वीतलावरील जीवसृष्टी अस्तित्वात येणे शक्यच नाही. पावसामुळे तर मानवी जीवन सुखी होऊ शकते. सर्व प्रकारची अन्नधान्य उत्पत्ती ही पावसावर अवलंबून असते. पावसाळ्यामुळे सृष्टीत जलसंचय होतो किंवा जलपुरवठा हा पावसावरच निर्भर आहे. पाण्याशिवाय जीवनपूर्ती होतच नाही. तुमची अन्नधान्ये, भाजीपाला, फळफळावळ व जलअन्न पाण्याशिवाय वाढूच शकत नाही अथवा पिकू शकत नाही. म्हणूनच पाण्याला 'जीवन' हा शब्द आहे. पावसाळा, हिवाळा व उन्हाळा हे चक्र मानवी जीवन सुखावह बनवते, त्यात बिघाड झाल्यास मानवी जीवन विविध आपत्तीने घेरले जाते. कृत्रिम जलसिंचन हेदेखील पावसावरच अवलंबून असते.

मानव वंशवृद्धी

"काय तो वीर्याचा एक थेंब नव्हता, जो (उदरात) टाकला जातो. मग तो रक्ताचा गोळा (अलक़) झाला. मग अल्लाहने त्याचे शरीर बनविले आणि त्याला दुरुस्त केले आणि त्यापासून जोडी निर्माण केली पुरुष आणि स्त्री."

(सूरह कियामत, आयत क्र. ३७-३९)

"काय आम्ही तुम्हाला तुच्छ पाण्यापासून निर्माण केले नाही. आणि त्यास सुरक्षित स्थानी राखले. एक निर्धारित मुदतीपावेतो." (सूरह अल मुर्सलात, आयत क्र. २०-२२)

वरील दोन्ही आयतीमध्ये मानवी जन्माची सुरुवात कशी झाली याचे यथार्थ वर्णन केलेले आहे. मातेच्या उदरांत एक तुच्छ थेंब म्हणून तो दाखल केला जातो व नंतर विविध अवस्थांतून तो वाढत जाऊन मानवाचे मूल म्हणून जन्माला येतो. ज्याची अगदी तपशीलवार माहिती कुरआनातील २३:१२-१४ व ९६:०२ मध्ये आलेली आहे. एका तुच्छ थेंबाचे रूपांतर पायरीपायरीने वृद्धिंगत होते हा अल्लाहचा चमत्कार आहे.

वरील आयतीत थेंबापासून मानवी उत्क्रांती होऊन तो मनुष्य अवस्थेस पोहचतो व हा मानव निर्मितीचा उपक्रम पुरुष व स्त्री यांच्या जोडीने पुढे चालू राहतो. पुरुष व स्त्री हे एकमेकांस पूरक आहेत. एकाच्या हाती वंशवृद्धी नसते तर पुरुष व स्त्रीच्या मिलनातूनच मानवी वंश चालू राहतो. हे सत्य कुरआनात मांडण्यात आले आहे.

मानवनिर्मितीच्या अवस्था

"आम्ही माणसाला मातीच्या सत्त्वापासून निर्माण केले. मग त्यास वीर्य बनवून एका सुरक्षित जागी ठेवले." (सूरह अल मोमिनून, आयत क्र. १२-१३)

"मग वीर्यास जमलेल्या रक्ताचे स्वरूप दिले, मग त्या रक्त गोळ्यास मांसावा तुकडा बनविले, नंतर मांसाच्या तुकड्यात हाडांचे स्वरूप दिले. नंतर हाडांवर मांस चढविले. मग त्यास एक आगळीच निर्मिती बनवून उभे केले. तेव्हा मोठा समृद्धशील आहे अल्लाह सर्वोत्कृष्ट निर्माता." (सूरह अल मोमिनून, आयत क्र. १४)

"निर्माण केले माणसाला जमलेल्या रक्ताने."

(सूरह अल अलक, आयत क्र. ०२)

वरील आयती मानवाच्या, निर्मितीविषयीच्या विविध अवस्थांचे यथार्थ वर्णन करतात.

मातीच्या सत्त्वापासून माणसाला निर्माण केले. म्हणजे मातीचे सत्त्वगुण म्हणजे माणसाच्या स्वभावात मातीचे सत्त्वगुण दिसतात. एखादी जमीन मृदु असते तर एखादी कणखर, तद्वतच एखाद्या माणसाचा स्वभाव कोमल असतो, तर एखाद्याचा सक्त, मातीचे विविध रंग असतात तसे माणसाचेही वेगवेगळे रंग असतात.

वीर्याचा थेंब ज्या अवस्थेतून जाऊन गर्भाचे स्वरूप धारण करतो. माणसाचा जन्म वीर्यबिंदूच्या अल्पशा भागाने होतो. ज्याला पाण्याचा थेंब 'नूतफा' म्हणतात. आजच्या काळात गर्भवृद्धीशास्त्राने सत्य गोष्टींचे रहस्योद्‌घाटन केले आहे. एकाच वेळी जे वीर्य स्खलीत होते त्यात दोनशे मिलियन शुक्रजंतू असतात. जेव्हा एक शुक्रजंतू स्त्रीबीजांडास गर्भयुक्त करण्यासाठी पुरेसा असतो, बीजांड, स्त्रीच्या बीजांडकोषामधून प्रत्येक महिन्याला एकच बाहेर पडते व गर्भाशयाशी लागून असलेल्या नलिकेत हळूहळू पुढे जात असते. शुक्रजंतू व बीजांड यांचा मिलाप झाला तर बीजांड गर्भयुक्त होते. नंतर काही दिवसांत जमलेल्या रक्ताचा गोळा बनतो. नंतर मांसाचा तुकडा गर्भधारणेनंतर चौथ्या आठवड्यात नंतर तो विशेष रूप धारण करू लागतो.

'खलकुल इन्सान बैनत-तिब वल कुरआन' या अरबी भाषेतील पुस्तकात स्पष्टीकरण दिलेले आहे. इंद्रियसंपन्न उत्पत्ती म्हटले जाते त्याला गर्भधारणेनंतर चौथ्या आठवड्यापासून आरंभ होतो आणि आठव्या आठवड्यापर्यंत घडत असतो. वीर्याचा एक थेंब उत्थानात्मक अवस्थांमधून जाऊन मनुष्यरूप अंगीकारण्याच्या अवस्थेत पोहचतो. गर्भ त्याचे दिवस पूर्ण झाल्यावर या जगात जन्माला येतो.

वरील चार आयतींत मानवाच्या या जगात जन्म होण्यापूर्वीच्या सर्व अवस्था कुरआनात आलेल्या आहेत. ही सर्व वैज्ञानिक सत्ये कुरआनात १४०० वर्षांपूर्वी मांडली गेली आहेत.

पवित्र कुरआन ज्ञानाचा मूळस्रोत आहे. ज्ञान जे सत्य आहे.